अयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ




SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 825301

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
संधी आणि आव्हाने
प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे
SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)

75 आज़ादी का अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने



मुख्यसंपादक
प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने


मुख्य संपादक

**प्राचार्य डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे**

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी ता. गेवराई, जि. बीड.



**SIDDHI PUBLISHING HOUSE**

**NANDED – 431605.**

**ISBN No.: 978-81-958253-0-1**

**मुख्य संपादक**
**प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे**
**मो. नंबर : 7875827115**

*

**प्रकाशक**

सिद्धी पब्लिकेशन,

मारोती मंदिराजवळ,

भावसार चौक, तरोडा खु. नांदेड

मो. 9623979067

ईमेल – shrishprakashan2009@gmail.com

Website : www.wiidrj.com

*

**अक्षर जुळवणी**
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर

*

**मुद्रक**
अनुपम प्रिंटर्स

श्रीनगर, नांदेड. मो. 9175324437

© **सर्व अधिकार संपादकाकडे**

*

**प्रथम आवृत्ती**
**24 मे 2022**
**किंमत : 400 /- रु**

सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकूराकरीता सदरील संशोधक स्वतः जबाबदार राहतील संपादक जवाबदार असणार नाही.

# :: शूभेच्छा ::



आपल्या महाविद्यालयाने **"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने"** या अनुषंगाने सर्व विषयाला सामावून घेणारे आंतरराष्ट्रीय ई चर्चा सत्र घेतले याचा मला मनापासून आनंद आहे.

स्वातंत्र्य लढा आणि स्वातंत्र्याचा इतिहास हा सर्व भारतीयासाठी सतत प्रेरणादायी आहे. अस्मिता, राष्ट्रहित व राष्ट्र – भक्ती या बाबतीत अनेकांच्या योगदानाचा हे चर्चासत्र जागर करणारे ठरेल याचा मला विश्वास वाटतो. समता, स्वातंत्र्य, बंधुता व मानवतेच्या आधारावरची महाशक्ती म्हणून भारताची पुढची वाटचाल रेखाटण्यासाठी अशा विचार विनिमयाची गरज भासणारच आहे.

या ई चर्चासत्रासाठी संशोधकांनी पाठवलेल्या शोध निबंधाचे तीन खंडातून प्रकाशन होत आहे. हे कौतुकास्पद व जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या परंपरेस उज्वल करणारे आहे. हा ग्रंथ अभ्यासक व वाचकांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल. यासाठी माझ्या मन: पूर्वक शुभेच्छा ....!



**अमरसिंह शिवाजीराव पंडित**
अध्यक्ष
जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई.

# :: संपादकीय ::

**"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** आज देशभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होत आहे. स्वातंत्र्य संग्रामातील अनेक हुतात्मे, स्वातंत्र्य संग्रामात अनेकांनी दिलेले योगदान याचाही आढावा घेतला जात आहे. त्या निमित्ताने या सर्वांप्रती ऋणभाव व्यक्त करुन, आपल्या वर्तमानाला योग्य दिशा मिळावी म्हणून आमच्या महाविद्यालयानेही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ई चर्चासत्राचे सहेतूकपणे आयोजन केले. **"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने"** हा विषय घेवून महाराष्ट्र, भारत आणि भारता बाहेरुनही अनेक मान्यवरांनी या चर्चासत्रा मध्ये मोठया संख्येने सहभाग घेतला. मार्गदर्शन, चर्चा आणि संशोधन लेखांच्या माध्यमातून या संबध काळाचा पट उलगडण्याचा प्रयत्न या चर्चासत्रातून झाला. २४ मे २०२२ रोजीच्या ई चर्चासत्रात युटयुब, फेसबुक, झुम इत्यादी विविध समाज माध्यमाद्वारे अनेकांनी यात सहभाग घेतला. त्या सर्वांचे प्रेमपूर्वक धन्यवाद.

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी हे तसे ग्रामिण भागात कार्यरत असणारे महाविद्यालय आहे. उच्च शिक्षण बरोबरच अनेक शैक्षणिक, सामाजिक पातळीवर विधायक कार्यक्रमांचे नेहमीच आयोजन आमचे महाविद्यालय करत असते. त्या बरोबरच वैचारिक, संशोधनात्मक क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरही महाविद्यालयाने सक्रीय संचार केलेला आहे. या मध्ये आमच्या जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. संस्थापक अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव दादा पंडित, अध्यक्ष मा. श्री. अमरसिंह पंडित, सचिव मा. श्री. जयसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांनी अशा नाविण्यपुर्ण उपक्रमांना

सतत पाठबळ दिलेले आहे. हेच पाठबळ या चर्चासत्राच्या आयोजनाचे आणि यशाची प्रेरणा आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या पाठीमागे "भारत जोडो" ही उदात्त भावना आहे. शासन, प्रशासन आणि जनसामान्याच्या पातळीवर याच भूमिकेला सर्व व्यापी करण्याचे काम केले जाते. एकात्मतेची जी काही पोकळी मागच्या काळात निमार्ण झाली, ती या माध्यमातून भरुन निघावी याच अपेक्षेने या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे अयोजन करून अनेकांना बोलण्याची – लिहिण्याची संधी देण्याचा आमचा प्रयत्न होता.

चर्चासत्राचे उदघाटन युवा नेते मा. श्री. रणविर राजे पंडित यांनी केले. स्वातंत्र्याचे सार्वत्रीकीकरण होणे आजही गरजेचे आहे. असा संदेश त्यांनी दिला. बीजभाषक म्हणून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपुर जि. लातुर यांनी गेल्या पंचाहत्तर वर्षातील संधी आणि पुढील आव्हानाचाही उहापोह केला. प्रमुख पाहूणे प्रोफेसर अभिजय पाटणे (अमेरिका) व प्रो. डॉ. प्रशांत अमृतकर (अधिष्ठाता, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद) यांनी विषयाच्या कक्षा विस्तारीत करण्याचे विवेचन करुन, पुढच्या वाटचाली संदर्भानेही महत्वपूर्ण मार्गदर्शन करुन या चर्चासत्राचा व्यापकता व आवश्यकतेचा विचार व्यक्त केला.

गेल्या पंचाहत्तर वर्षातील आपली वाटचाल नेमकी कशी राहीली आहे याचा उहापोह सहभागी मान्यवरांनी या प्रसंगी केला. आपल्या समोर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व अंतर्गत स्तरावरच्या ज्या ज्या काही संधी म्हणून होत्या, त्या आपण नेमकेपणाने कशा साधल्या, जो काही विकास घडवला, प्रगतीच्या दिशेने आपली म्हणून जी काही वाटचाल केली, ती नेमकी कशी आहे? या सबंधीची चर्चा या माध्यमातून घडवून आणता आली, ही खरच माझ्यासाठी व महाविद्यालयासाठी अत्यंतिक आनंदाची गोष्ट आहे.

भारत “देश” म्हणून जी काही सामर्थ्य स्थळे आहेत त्याचा तर आपण जय घोष करतोच, पण ज्या काही उणिवा असतील त्याही योग्य आचार विचार आणि पुढाकाराने भरुन काढू शकतो. विकासाची व्यापकता मोजमापाच्या पट्टीत बसवून सामान्य माणूस नेमका कुठे आहे, याचाही धांडोळा घेता येतो आणि हेच महत्वाचे काम या महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या माध्यमातून केले असावे, असा आमचा प्रामाणिक प्रयत्न होता.

राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक क्षेंत्रातला भारताचा वावर आणि पुढच्या प्रवासाची स्पष्टता आणखीच ठसठसीत व्हावी म्हणूनच हा अमृत महोत्सव सर्वासाठीच महत्वाचा टप्पा म्हणून गणला जाईल. भारत हा तर विविधतेने नटलेला देश आहे. इथे काही सार्वकालीक व सर्व समावेशक अशा काही घटना असतात की जीवनाची सर्व क्षेत्रे त्यामुळे प्रभावित होतात. तसेच काही अपवादात्मक प्रसंगाने कधी कधी हे सारेच ढवळून निघते. म्हणून तर भाषा, वेश, धर्म, जात, पंथ अशा वेगवेगळया जीवन पध्दती आणि तत्वांना सामावून घेणारा भारत मानवी मूल्यांचे, स्वातंत्र्यांचे, समतेचे, मानवतेचे गीत गातांना कायम दिसला पाहिजे. तरच अमृत महोत्सव साजरा करुन हिरक महोत्सवी वाटचाल सोयीस्कर होईल यात शंका नाही.

काळ बदलला तसे संदर्भ बदलतात, परिस्थती नुसार आवस्था आणि तत्वानुसार धारणाही बदलत जातात. पण राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्र निष्ठा प्रखर व्हाव्या आणि राजकारणी, समाजकारणी यांच्या पासून सर्वसामान्यांपर्यंत त्यांचा धागा एक समान असावा तरच “विविधतेत एकता” हे तत्व अबाधित राहील. ही कुणा एकाची नसून सर्वाची जबाबदारी आहे याची जाणीव या आंतरराष्ट्रीय चर्चा सत्राच्या माध्यमातून सर्वांना व्हावी याचीही मला आशा आहे. ही भूमीका केंद्रवृत्ती मानून जे जे या

उपक्रमात सहभागी झाले त्या सर्वांचे आभार. तसेच राजकीय, सामाजिक क्षेत्रात आपुलकी, बांधीलकी व मानवतेची वृत्ती वृद्धींगत व्हावी, म्हणून भुत, वर्तमान आणि भविष्यालाही प्रेरक ठरणारी ही विचारांची लेखमाला तीन खडातून प्रकाशित होते आहे. ती तुम्हा सर्वांना निश्चितच आवडेल व पुढच्या प्रवासाला मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. या ई चर्चासत्रासाठी आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अपार परिश्रम घेतले त्यांच्या सहकार्या शिवाय हे पुर्ण होणे शक्यच नव्हते. तसेच प्रकाशक डॉ. राजेश गं. उंबरकर व त्यांच्या सहका–यांनी यासाठी जी महेनत घेतली ते ही न विसरण्याजोगेच. हे सर्व श्रेय वरील सर्वांचेच म्हणूनच ही लेखमाला तुमच्या हाती पुस्तक रुपाने देतांना आम्हाला मनस्वी आंनद होतो आहे.


**मुख्य संपादक**

**प्राचार्य डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे**

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,

गढी ता. गेवराई, जि. बीड.

## :: सहसंपादक ::

प्रो. डॉ. फाटक आर. सी

प्रा. डॉ. यशवंतकर एस. एल

प्रा. कटके डी. के

प्रा. डॉ. जाधव आर. जे

प्रा. डॉ. काकडे एस. आर

प्रा. डॉ. पवळ ए. डी

प्रा. डॉ. खताळ आर. डी

प्रा. डॉ. घुगे एस.पी

प्रा. डॉ. सिद्दीकी झेड. एस

प्रा. डॉ. पठाण के. एम

प्रा. डॉ. ढवळे जे. एस

प्रा. रिंगणे आर. बी

प्रा. श्रीमती रकटे जे. बी

प्रा. श्रीमती पोटकूले एच. टी

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपरचे नांव | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | “भारतातील वित्तीय समावेशन आणि शासनाची भूमिका” | गणेश हरिभाऊ गंडे<br>प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे | १५ |
| ०२ | **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांची अंमलबजावणी** | **प्रा. धर्मराज केशवराव कटके** | २६ |
| ०३ | भारतीय शेती मधील गुंतवणूक व अनुदान | ज्ञानेश्वर उद्धवराव आवचार<br>प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे | ३६ |
| ०४ | व्यायाम आणि खेळाचे व्यक्तिविकास व आरोग्य जीवनातील महत्त्व व्यायामाचे जीवनातील महत्त्व : एक अभ्यास | Prof. Ashtekar Nitin Vasantrao | ४२ |
| ०५ | **अवंतिकाबाई गोखले** यांचे **भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान : एक ऐतिहासिक अवलोकन** | **प्रा. डॉ. नारायण ज्ञानोबा नाईक** | ५० |
| ०६ | **जळगाव व नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास** | **डॉ.विशाल शिवाजीराव करपे**<br>**आरती प्रकाश सोनटक्के** | ५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क | प्रा. डॉ. कऱ्हाळे विलास लिंबाजी | ७० |
| ०८ | भारतीय लोकशाही : संधी आणि आव्हाणे | डॉ. जयराम ढवळे | ७५ |
| ०९ | भारतीय लोकसंख्येची कारणे, परिणाम आणि उपाय | डॉ. मोरे अर्जून मोहनराव | ८३ |
| १० | भारताच्या विधी शिक्षणाची सद्यस्थिती | डॉ. कल्पना जाधव | ९२ |
| ११ | "भारतीय स्वातंत्र्य लढयातील रणरागिणी" | डॉ. रामहरी चांगदेवराव फाटक | ११६ |
| १२ | ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्येची समस्या | प्रा. डॉ. आर. डी. खताळ | १२१ |
| १३ | महाराष्ट्रातील सिंचन सुविधा | प्रा. डॉ. विजय मांटे | १२८ |
| १४ | हैदराबाद मुक्तीसंग्राम आणि आजचा मराठवाडा एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी | १३८ |
| १५ | सर्वसमावेशक वाढ आणि भारतीय अर्थव्यवस्था : एक अभ्यास | प्रा. देविदास गोकुळ गवळी | १४२ |
| १६ | भारतीय अर्थव्यवस्था आणि समावेशक वृध्दी | प्रा. रमेश शंकर माने | १५१ |
| १७ | भारतीय समाजकार्याचा इतिहास आणि तत्त्वज्ञान | डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे | १६१ |
| १८ | स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण योजनांचा अभ्यास - बचत गटाच्या संदर्भात | कविता ज्ञानेश्वर सोनुने | १७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | कृषी विकासात जलसंधारणाचे महत्त्व : एक अभ्यास | **प्रा. एस. टी. कावळे** | १८३ |
| २० | महाराष्ट्र राज्य जल धोरण अभ्यास | डॉ कलंदर मुस्तफा पठाण | १८८ |
| २१ | **भारतातील मासेमारी संस्थांचे आणि सागरी नियमनाचे स्वरूप** | **प्रा. डॉ. सिताफुले एल. एस.** | १९४ |
| २२ | **भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार** | **प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे** | २०१ |
| २३ | **भारतातील नगदमुक्त आर्थिक व्यवहार** | **डॉ. संजय मुंडकर** | २११ |
| २४ | **स्वातंत्र्योत्तर काळातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे आरोग्य, आहार व समस्या** | **श्रीमती सय्यद शाहीन शफी** | २१८ |
| २५ | **“मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास”** | **डॉ. बाळासाहेब आश्रुबा सरपते सोनवणे राहूल गौतम** | २३० |
| २६ | **स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण योजनांचा अभ्यास – कुपोषणाचा विशेष संदर्भ** | **वर्षा प्रभाकर पाईकराव** | २३६ |
| २७ | **आदिवासी साहित्याची वाटचाल आणि जडणघडण : एक चिकित्सक अभ्यास** | **डॉ. वर्षा मोहनराव बिलोलीकर** | २४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | **भंडारा जिल्हयातील कोसा उदयोगधंदयातील विणकरांच्या विकासात शासकीय योजनांची भूमिका – एक अध्ययन** | **डॉ. माधुरी एस. खोब्रागडे** | २५५ |
| २९ | **भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि किमान आधारभूत किमतीला कायद्याच्या आधाराची गरज** | डॉ. सुरेश एकनाथ घुमटकर<br>डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर | २७१ |
| ३० | **भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार** | **प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे** | २८१ |
| ३१ | **भारतीय लोकशाही आणि मुलभूत अधिकार** | डॉ. इरलापल्ले पल्लवी भागवतराव | २९१ |
| ३२ | **भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने** | बांगर नितीनकुमार बाबासाहेब | २९५ |
| ३३ | **सेनापती दादा चौधरी आणि अहमदनगरचा स्वातंत्र्यलढा** | **डॉ. अर्चना टाक** | ३०३ |
| ३४ | "वृध्द महिलांची सद्यस्थिती" | डॉ. सलमा खमरोद्दीन शेख | ३१० |
| ३५ | **ग्रामीण शेतकरी आत्महतेच्या समस्या** | प्रा. प्रियंका राजेंद्र आठे | ३१६ |
| ३६ | **नंदुरबार जिल्ह्यातील शेतीचे पीक रचनेतील आधुनिकीकरण व पर्यावरणावरील प्रभाव** | **संजय खिल्लारे<br>प्रा. डॉ. एस. पी. घुगे** | ३२६ |
| ३७ | भारतीय स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव आणि कुटूंब निवृत्ती वेतन धारक एक अध्ययन<br>संदर्भ : नांदेड जिल्हा | वामन रामराव काकडे | ३३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | क्रांतिकारी आदिवासी जननायक भागोजी नाईक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान: एक अभ्यास. | **प्रा. डॉ. दत्ता मा. तंगलवाड** | ३४० |
| ३९ | **महिला आणि मानवी अधिकार** | **प्रा. डॉ. शामल भिवराज जाधव** | ३४८ |
| ४० | **भारतीय लोकशाही पुढील आव्हाने** | डॉ. एन. जी. शेरे | ३५३ |
| ४१ | **अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने** | डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर | ३६१ |
| ४२ | **पर्यटन आणि भारतीय अर्थव्यवस्था** | प्रा. डॉ. मोहोकर हरिहर शिवदास | ३६६ |
| ४३ | **ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती** | श्री एस. के. वाहुळकर | ३७४ |
| ४४ | **ग्रामीण उद्योजकता : ऊर्जितावस्थेची गरज** | डॉ . पी. एम. शहापूरकर | ३८३ |
| ४५ | **इतिहास से वर्तमानतक भारत-चीन संबंधोके बदलते आयाम – एक राजकीय विश्लेषण** | **प्रा. राजेंद्र घोरपडे** | ३९१ |
| ४६ | नमाज की क्रियाएं साधारण योग | डॉ. शेख मुसाभाई इमामभाई | ४०१ |
| ४७ | **संवेदनशीलता एवं आधुनिक मानव** | जयवीर सिंह | ४१० |
| ४८ | **१९४२ ई० के भारत छोड़ो आंदोलन में बिहार के युवाओं की भूमिका** | **डॉ० कुमारी प्रेमलता** | ४२१ |
| ४९ | बुजुर्गों की समस्याएं :– भारतीय समाज की चुनौती | **डॉ. जयश्री बाथम** | ४३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | ''केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना स्रोतों एवं मल्टीमीडिया सूचना स्रोतों की उपलब्धता एवं उपयोगिता का अध्ययन : दुर्ग जिले के चयनित केन्द्रीय विद्यालयों के विशेष संदर्भ में '' | राजलक्ष्मी पाण्डेय<br>डॉ संगीता सिंह | ४४० |
| ५१ | **रेशीम शेती : भारताच्या ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली आणि सद्यस्थिती** | कृष्णा गंगाधर गोरे<br>डॉ. पी. एम. कल्याणकर | ४४९ |
| ५२ | **ग्रामीण शेतकरी आत्महतेच्या समस्या** | प्रा .प्रियंका राजेंद्र आठे | ४५९ |
| ५३. | **शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न एक सामाजिक समस्या** | **डॉ. शेषराव क. राठोड**<br>**नलिनी पंडितराव जाधव** | ४७० |

# “भारतातील वित्तीय समावेशन आणि शासनाची भूमिका”

**संशोधक**

**गणेश हरिभाऊ गंडे**

पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे**

प्राध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद–431004

**गोषवारा: (Abstract)**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वित्तीय समावेश ही संज्ञा म्हणजे आर्थिक सुधारणेचा एक महत्वाचा भाग आहे. त्यामुळे गरीब तसेच वंचित घटकाला आर्थिक विकासात सहभागी होण्याची संधी मिळते. लोकांच्या आर्थिक जीवणमानाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीकोणातुन वित्तीय समावेशनाची संकल्पना समोर आली आहे. तसेच याद्वारे शासनाला थेट लाभार्थ्यांपर्यंत निधी हस्तांतरणाचा मार्ग सोपा झाला आहे. वित्तीय समावेशनाबरोबरच वित्तीय साक्षरता देखिल महत्वाचा भाग आहे. कारण त्यामुळे लोकांना योग्य आणि परिणामी आर्थिक निर्णय घेता येतात. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील वित्तीय समावेशनाचा इतिहास, वित्तीय साक्षरतेची सद्यस्थिती आणि यामधील शासनाची भूमिका मांडण्यात आली आहे. समोर आलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्याआधारे काही निष्कर्ष मांडले आहेत. शेवटी भारतासारख्या देशात जेथे वेगवेगळे सामाजिक आणि आर्थिक घटक आहेत. तसेच येथील लोकांना वेळोवेळी आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. अशा गरीब आणि वंचित घटकांना या आर्थिक विकासाच्या संकल्पनेतुन नवा मार्ग मिळेल हा संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

**विशेष शब्द** : (keywords)

वित्तीय समावेशन, वित्तीय साक्षरता, बॅकिंग सेवा, ग्रामीण वित्तीय समावेशन, शहरी वित्तीय समावेशन

**प्रस्तावनाः**

भारतात वित्तीय समावेशन प्रक्रियेची सूरवात औपचाकरित्या सन 1904 मध्ये सहकारी संस्था कायद्याअंतर्गत पत सहकारी संस्थांच्या स्थापनेपासून झाली. पुढे स्वातंत्र्यानंतर सन 1954 च्या अखिल भारतीय ग्रामीण पत पाहणी समितीच्या शिफारशीमुळे या प्रक्रियेला वेग आला. सन 1969 मध्ये असे दिसून आले की सहकारी संस्था अपेक्षेनुसार राष्ट्रीय स्तरावर काम करण्यात काही प्रमाणात अपयशी ठरल्या आहेत. किंवा त्यांना अपेक्षित तेवढे यश मिळाले नाही. त्यामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागात बँकिंग सेवांचा विस्तार करण्यासाठी व्यापारी बँकांच्या भूमिकेसह मल्टी एजन्सी पध्दतीचा अवंलब करणे अधिक उपयोगी होईल. असे अखिल भारतीय ग्रामीण पत पाहणी समितीने सूचविले. त्यामुळेच तात्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधीनी सन 1969 मध्ये 14 प्रमुख व्यावसायीक बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यास मंजुरी दिली. ज्या व्यापारी बँकांचे भागभांडवल 100 कोटी होते, अशा 14 व्यावसायीक बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हाच खऱ्या अर्थाने वित्तीय समावेशनाला सुरवात झाली असे म्हटले तरी काही चुकीचे ठरणार नाही. त्यानंतर बँकिंग व्यवस्था नसलेल्या भागात जलद बँकिंग प्रणालीचा विस्तार करण्यासाठी सन 1980 मध्ये आणखी 6 व्यावसायीक बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अशा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात लोकांचा बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास वाढला. शहरी भागात मोठ्या प्रमाणात लोकांचा सहभाग वाढला, मात्र दळणवळनाच्या सोयीअभावी निमशहरी व खेड्यांमध्ये बॅकांच्या शाखांचा विस्तार झाला नाही. अर्थव्यवस्थेच्या वित्तीय गरजा पुर्ण करण्यासाठी आणि वित्तीय संस्थांच्या प्रयत्नामध्ये समन्वय साधण्यासाठी सन 1970 मध्ये भारत सरकारने 'अग्रणी बँक' योजना सूरु केली. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक बँक 'लिड बँक' म्हणून कार्य करेल.

त्या जिल्ह्यात वित्तीय सूविधा देण्यासाठी ही बँक महत्त्वाची भूमिका पार पाडेल. तसेच त्या जिल्हयातील वित्तीय समावेशन करण्याची संपूर्ण जबाबदारी या लिड बँकेवर असेल. यामुळे अशा दुर्गम भागात बँकिंग सेवाचा विस्तार होण्यास मदत झाली.

**संशोधन साहित्याचा आढावा :**

संशोधन करत असतांना त्या संशोधन विषयाच्या संबंधीत साहित्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरत असते. त्यामुळे संशोधन कार्याला योग्य दिशा मिळते. या अनुषंगाने येथे काही मोजक्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**रघुराम राजन : (2017)**

यांनी आपल्या "**हॉट डु हॉट आय डु**" या पुस्तकात सर्वसमावेशक विकासाची संकल्पना मांडली असून रिझर्व्ह बँकेने ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना चांगल्या दर्जाच्या वित्तीय सेवा देण्यासाठी कटिबध्द राहिले पाहीजे असे विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, दुर्गम भागात जास्तीत जास्त वित्तपुरवठा करण्यासाठी बँकांनी अशा भागात शाखांचा विस्तार केला पाहिजे. यासाठी रिझर्व्ह बँकेने बँकांवर बंधने घातले पाहिजे.

**Lusardi Annamaria: (2019)**

यांनी आपल्या **"Financial Literacy and the Need for Financial Education, Evidence and Implications"** या संशोधन लेखात आर्थिक साक्षरतेची जागतिक स्थिती अभ्यासली आहे. लेखकाने आर्थिक साक्षरतेविषयी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी केलेल्या अध्ययनातून असे दिसून आले की, प्रगत देशात सुध्दा काही प्रमाणात आर्थिक साक्षरतेचा अभाव दिसून आला आहे. तसेच संशोधन लेखात आर्थिक साक्षरतेच्या मार्गातील अडथळे दाखवुन देऊन त्याचा जागतिक बाजारावर होणारा परिणाम याचे विश्लेषण केले आहे. तसेच व्यक्तीगत जीवनातही त्याचा मोठा प्रभाव पडत असल्याचे दिसून आले आहे.

**Azzez Abdul Akhtar Zaved : (2019)**

यांनी आपल्या **“Financial Literacy and Inclusion in India”** या पुस्तकात भारतातील वित्तीय समावेशन आणि वित्तीय साक्षरता याविषयी भाष्य केले असून याचे सखोल विवेचन केले आहे. त्यांच्या मते, भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादनाबाबत व त्याच्या वितरणाबाबत आर्थिक विषमता आढळून येते. देशात उत्पादनाची साधने मोठ्या प्रमाणात श्रीमंत वर्गाकडे केंद्रित झाली आहेत. त्याच्यामते, उत्पादन साधनांचे विकेंद्रिकरण करून आर्थिक विषमता नष्ट करता येते. परंतु त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे दिसून येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. वित्तीय समावेशनाचा अभ्यास करणे.

२. वित्तीय सेवांच्या विस्तारामध्ये शासनाची भूमिका अभ्यासणे.

३. वित्तीय साक्षरतेचा अभ्यास करुन त्याच्या वाढीसाठी शिफारशी सूचविणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध ग्रंथ, शोधनिबंध, शासनाचे विविध अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ इत्यादी दुय्यम साधनांद्वारे माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. शोधनिबंधाच्या उद्दिष्टानुसार घेतलेल्या माहितीची मांडणी आणि विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**वित्तीय समावेशनाचा अर्थ :**

वित्तीय समावेशन म्हणजे अधिकृत वित्तीय प्रणालीद्वारे कमी उत्पन्न असलेल्या आणि बचत, विमा, कर्जे, पेमेंट आणि निधी हस्तांतरण इत्यादी सेवांपासून वंचित राहिलेल्या समुहांना त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार माफक किंमतीत अशा सेवांचे वितरण करणे होय.




वंचित (Disadvantaged) याचा अर्थ व्यापक स्वरूपात घेउन त्यात ग्रामीण गरीबांसोबत लहान भुधारक शेतकरी, भूमिहीन मजुर यासोबतच महिला, असंघटीत कामगार आणि निवृत्ती वेतनधारक इ.चा समावेश करण्यात आला आहे.

**वित्तीय साक्षरतेचा अर्थ :**

आर्थिक व्यवहार करतांना म्हणजेच बचत, विमा, कर्जे, गुंतवणूक आणि निधी हस्तांतरण याविषयी परिणामकारक निर्णय घेण्याची क्षमता ज्या व्यक्तीमध्ये आहे त्या व्यक्तीला वित्तीय साक्षर असे समजले जाते.

**भारतातील वित्तीय समावेशानाची सद्यस्थिती :**

भारताला स्वातंत्र्य मिळुन जवळजवळ सहा दशके झाली. यामध्ये आर्थिक सहभागाच्या विविध योजना राबविल्या गेल्या. परंतु आजही भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय चर्चेत गरीबिचा विषय केंद्रस्थानी आहे. वित्तीय समावेशनचा उद्‌देश ज्यांना आर्थिक सेवा मिळत नाहीत त्यांच्यापर्यंत बँकांमार्फत अशा सेवा देऊन वंचित घटकांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात सामावुन घेणे हा आहे. सन 2011 च्या जनगणनेनूसार देशातील शहरी भागातील 24.47 कोटी कुटूंबांपैकी 14.48 कोटी कुटूंबे (58.7 टक्के) बँकिंग सेवेशी जोडली गेली आहेत. तर ग्रामीण भागातील 16.78 कोटी कुटूंबांपैकी 9.14 कोटी कुटूंबे (54.46 टक्के) बँकिंग सेवांशी

जोडली गेली आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार ज्या गावांची लोकसंख्या 2000 पेक्षा अधिक आहे. अशा 74,351 गावांतील नागरिकांसाठी व्यवसाय प्रतिनिधीमार्फत स्वाभिमान अभियान सुरू करण्यात आले. त्याद्वारे बँकिंग सेवा देण्याची सुरवात झाली. मात्र या कार्यक्रमाची व्याप्ती कमी राहिल्याने एकुण परिणाम मर्यादीत राहिला आहे. देशात सन 2014 च्या स्थितीनुसार देशात 1,15,082 इतक्या बँक शाखा असून 1,60,055 एवढी एटीएम केंद्रे आहेत. त्यापैकी 43,962 बँकशाखा (38.2 टक्के) आणि 23,334 एटीएम केंद्र (14.58टक्के) ग्रामीण भागात कार्यरत आहेत. या व्यतिरीक्त सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि क्षेत्रीय ग्रमीण बँकांचे 1.4 लाख व्यवसाय प्रतिनिधी (बँकमित्र) ग्रामीण भागात कार्यरत आहेत. हे बँक प्रतिनिधी बँकेत खाते उघडणे, रोख जमा करणे, पैसे काढणे, निधी हस्तांतरण करणे, खाते नोंद उपलब्ध करून देणे. अशा मुलभूत बँकिंग सेवा देतात. मात्र एका पाहणीनुसार या प्रतिनिधीपैकी अनेक जन प्रत्यक्षात काहीच काम करत नसल्याचे दिसून आले आहे.

31 मार्च 2015 पर्यंत बँकांच्या 1,25,857 एकुण शाखा कार्यरत होत्या. त्यापैकी 48.5 टक्के शाखा ग्रामीण भागात कार्यरत होत्या. सध्या प्रत्येक 12000 लोकसंख्येसाठी व्यापारी बँकेची एक शाखा आहे. जी त्यांची बँकिंग विषयीच्या गरजा भागविते. वरील बाबींची कारणमीमांसा केल्यास आजही खातेदारापर्यंत पोहचण्याचे बँकांचे प्रयत्न अपुरे असल्याचे दिसत आहे.

**बँकिंग सेवा उपलब्धता आलेख:**




स्त्रोत: **www.financialservices.gov.in**

तक्ता क्र 1 मध्ये भारतातील बँकिंग सेवांच्या उपलब्धतेची स्थिती दिली आहे. 2001 च्या जनगनणेनूसार बँकिंग सेवांची एकुण उपलब्धता 35.5 टक्के होती. ती वाढून 2011 च्या जनगणनेनंतर 58.7 टक्के झाली. अर्थातच या एका दशकामध्ये बँकिंग सेवांच्या उपलब्धतेत लक्षणिय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तसेच ग्रामीण भागात 2001 च्या जनगणनेनूसार 30.1 टक्के बँकिंग सेवांची उपलब्धता होती ती वाढुन 2011 मध्ये 54.4 टक्के झाली. शहरी भागात 2001 च्या जनगणनेनूसार बँकिंग सेवांची उपलब्धता 49.5 टक्के होती. ती वाढुन 2011 च्या जणगणनेनूसार 67.8 टक्के झाली असल्याचे दिसून येते. यामध्ये अजुन एक गोष्ट स्पष्ट होते की, बँकिंग सेवा विस्ताराचा कल ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अधिक आहे. यासाठी सरकारने पुढाकार घेवुन ग्रामीण भागात बँकिंग सेवा विस्तारावर भर दिला पाहिजे.

**वित्तीय समावेशनामध्ये रिझर्व्ह बँकेची भूमिकाः**

रिझर्व्ह बँकेने सन 2005 मध्ये वित्तीय समावेशनाचे महत्व लक्षात घेउन त्यासाठी काही पाउले उचलली आहेत. बँकांविषयी धोरणे आखतांना काही नियम शिथील करण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे

मुलभूत खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली. हे खाते शुन्य शिल्लक किंवा अल्प रक्कम भरून उघडता येते.

सोप्या अटींवर क्रेडिट कार्ड मिळण्याची सुविधा करण्यात आली आहे. त्यासाठी पुरक तारणाची आवश्यकता नाही. बचत गटांसाठी लघुकर्ज योजना तसेच कर्जफेडीसाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. केवायसीचे नियम सोपे केले आहेत. बँकांच्या शाखाविस्तारासाठी उदार धोरणाचा अवलंब केला आहे. अशा रितीने रिझर्व्ह बॅकेच्या वरील सर्व नियमामुळे वित्तीय समावेशनाला गती मिळालेली दिसून येत आहे.

**ग्रामीण वित्तीय समावेशन :**

सन 2013–14 या आर्थिक वर्षात राष्ट्रीयीकृत बँकांनी देशभरात एकुण 7840 शाखा उघडल्या आहेत. यापैकी 25 टक्के शाखा ग्रामीण भागात होत्या. सन 2013–14 च्या अंदाजपत्रकीय

भाषणातील घोषनेनूसार सर्व शाखांमध्ये एटीएम सेवा सुरू करण्यासाठी 40 हजारापेक्षा अधिक एटीएम मशिन्स बसवण्यात आले. मार्च 2014 च्या स्थितीनुसार संपुर्ण देशात 1,15,082 बॅंकशाखा कार्यरत असून देशभरात एकंदर 1,60,055 एटीएम केंद्र आहेत. यापैकी 23,334 एटीएम केंद्रे ग्रामीण भागात आहेत. आणि उर्वरित एटीएम केंद्रे शहरांमध्ये तसेच महानगरांमध्ये आहेत. कर्मचाऱ्यांअभावी ग्रामीण भागात बॅंकांच्या पुरेशा शाखा सुरू झाल्या नाहीत, त्यामुळे आजही या भागातील शाखांची मागणी पुर्ण झालेली नाही. ग्रामीण भागाची ही मागणी पुर्ण करण्यासाठी सेवा क्षेत्राच्या मदतीने संपुर्ण देशाचा एक आराखडा तयार करून बॅंक मित्र आउटलेट ची सेवा त्यांना देण्याची गरज आहे.

स्वाभिमानी गाव योजनेमार्फत सन 2011–12 मध्ये बॅंकांनी 2000 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या 84000 पेक्षा अधिक गावांमध्ये बॅंकेची सुविधा उपलब्ध झाली आहे. या एकुण 74,351 गावांमध्ये 1+1 किंवा 1+2 अशा कमीत कमी मनुष्यबळामार्फत कायम स्वरूपी शाखा सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे कार्य पुढील 3 ते 5 वर्षात पुर्ण होणार आहे.

**शहरी वित्तीय समावेशन :**

सन 2011 च्या जनगणनेनूसार शहरी भागात एकुण 7 कोटी 89 लाख निवासी घरे आहेत. यापैकी 5 कोटी 34 लाख घरांतील लोकांना बॅंकांची सेवा उपलब्ध आहे. 31 मार्च 2014 पर्यंत बॅंकांच्या विविध शहरांत, महानगरात, आणि सेमी अर्बन गावात 71 हजार 120 शाखा आणि 1 लाख 36 हजार 721 एटीएम केंद्रे आहेत. शहरी भागातही जेथे आवश्यकता आहे तेथे बॅंकींग व्यवसाय प्रतिनिधी नियुक्त केले जाणार आहेत. शहरातील नेमक्या किती घरांमध्ये अजुनही बॅंकेची सेवा नाही याची आकडेवारी निश्चित स्वरूपात उपलब्ध नाही, परंतु अशा घरांची संख्या सुमारे दिड कोटी इतकी असण्याची शक्यता आहे.

**वित्तीय साक्षरतेची सद्यस्थिती :**

एका सर्वेनुसार भारतात 29 टक्के पुरुषांकडे आणि 34 टक्के महिलांकडे बँक खाती नाहीत. परंतु भारतीयाना त्यांच्या बचतीच्या सवयीसाठी ओळखले जाते, हे बचत गट (SHG) आणि बँक लिकेंज प्रोग्रामने सिध्द केले आहे. 70 दशलक्ष बचतगट याची प्रचिती देतात की गरीबातील गरीब सुध्दा बचत करण्यास सक्षम आहे. सकल कौटुंबिक बचत दर जो 1990 च्या दशकाच्या सुरवातीस सरासरी 19 टक्के होता, तो 2003–04 मध्ये 23 टक्क्यापर्यंत वाढला आहे. आणि आता हा दर जीडीपीच्या 38 टक्के आहे. जेव्हा ही केलेली बचत बँकामधील मुदत ठेवींमध्ये किंवा जोखीमयुक्त सरकारी रोखे किंवा कमी उत्पन्न देणाऱ्या साधणांमध्ये म्हणजेच सोने किंवा रियल इस्टेट सारख्या गैर आर्थिकमालमत्तेत गुंतवली जाते. तेव्हा चिंता निर्माण होते. बहुतेक भारतीय लोक त्याच्या निवृत्तीसाठी बचत करत काही कारण त्याच्याकडे आर्थिक दृष्टीकोण नसतो. तसेच त्यांनी तर्कसंगत पोर्टफोलियो विश्लेषण केलेले नसते. बरेच लोक महागाई समायोजित परताव्याचा वास्तविक दर समजुन घेवुन गुंतवणूक करत नाही. त्यामुळे बचत करूनही अशा कुटूंबांच्या स्थितीमध्ये सुधारणा होत नाही. आजही सुमारे 25 टक्के शहरी कुटूंब आणि 40 टक्के ग्रामीण कुटूंब वैद्यकिय रूग्णालयाचा खर्च भागविण्यासाठी अनौपचारिक स्त्रोताकडून कर्ज घेतात. रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार भारतीय घरघुती बचतीपैकी केवळ 5 टक्के बचत आधुनिक आर्थिक साधनामध्ये जसे की इक्विटी, म्युच्युअल फंड आणि डिबेंचर्समध्ये गुंतवली जाते. आर्थिक साक्षरता आणि कर्ज सुविधेचा लाभ खातेदारंना घेता यावा यासाठी त्यांच्यात आर्थिक साक्षरता निर्माण करण्याची गरज आहे. कर्ज घेण्यापुर्वी किंवा बँक खाते सुरू करण्यापुर्वी जनतेला वित्तीय प्रणाली, बचत, कर्ज, कर्जाची मुदतीत परतफेड, खात्याचे रेकॉर्ड चांगले ठेवणे आदींबाबत माहिती देणे आवश्यक आहे. त्यासाठी आर्थिक साक्षरता केंद्र सुरू करून त्याद्वारे जनतेला बँक सेवांची माहिती व मार्गदर्शन मोफत दिले पाहिजे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार देशात

आतापर्यंत 718 आर्थिक साक्षरता केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. जनजागृती शिबीरे, चर्चासत्रे, मेळावे या माध्यमातून सन 2012–13 मध्ये एकुण सुमारे 2 कोटी 20 लाख लोकांना बँक सेवांची माहिती देऊन जनजागृती करण्यात आली आहे. काही ग्रामीण भागात असे साक्षरता केंद्रे स्थापन करण्यात आली नाही त्या भागात अशा आर्थिक साक्षरता केंद्राचा विस्तार करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. भारतात आर्थिक साक्षरता आणि आर्थिक समावेशनाचा उपक्रम सर्वापर्यंत पोहचवण्यासाठी राष्ट्रीय प्रतिभूमी बाजार संस्था म्हणजेच (NISM) एन.आय.एस.एम. ने वित्तीय क्षेत्रातील रिझर्व्ह बँक, सेबी, आय.आर.डी.ए. अशा संस्थांच्या मदतीने आर्थिक साक्षरता केंद्राची स्थापना केली आहे. यापुढेही आर्थिक साक्षरता केंद्राचे कार्य अधिक व्यापक व सक्षम केले जाणार आहे.

**निष्कर्ष :**

बॅकिंग सेवांची उपलब्धता ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात जास्त असल्याचे दिसून आले आहे. यासाठी सरकारने पुढाकार घेवुन अशा भागात बँकिंग सेवांचा विस्तार केला पाहिजे. सन 2001 च्या तुलनेत सन 2011 मध्ये बँकिंग सेवांमध्ये लक्षणिय वाढ झाली आहे. परंतु ही वाढ सर्वसमावेश नसल्याचे दिसून आले आहे. ग्रामीण भागात एटीएम केंद्राची संख्या कमी आहे. त्या तुलनेत शहरी भागात एटीएम केंद्राची संख्या जास्त असल्याचे दिसून आले आहे. यामागचे मुख्य कारण ग्रामीण भागात वित्तीय साक्षरता कमी असल्याने बँका अशा भागात एटीएम केंद्राच्या उभारणीसाठी पुढाकार घेत नसल्याचे दिसून आले आहे. वित्तीय समावेशनात रिझर्व्ह बँकेची भुमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते. कारण वित्तीय समावेशन वाढीसाठी रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी आर्थिक धारेणात बदल केल्याचे दिसुन येत आहे. ग्रामीण भागात काम करण्यासाठी बँकांमधील कर्मचारी वर्ग तयार होत नसल्याचे दिसुन आले आहे. यासाठी सरकाने अशा भागात दळणवळणाच्या सोयी–सुविधा निर्माण केल्या पाहिजे. आर्थिक समावेशन योजनेच्या प्रभावामुळे अलिकडे कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले आहे

परंतु कर्ज परतफेड करण्यास शेतकरी वर्ग असमर्थ ठरत असल्याने काही वेळा त्यांना आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यामुळे आर्थिक समावेश कार्यक्रमाबरोबर आर्थिक साक्षरता निर्माण करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


1. Kochhar Sameer. (2014). Defeating poverty Jan Dhan and Beyond. Skoch Media Pvt.Ltd. Gurgaon, Haryana. Page No.-331.
2. Padmja Mishara, Alok Ranjan Behera and Himanshu Sekhar Rout. (2014). Financial Inclusion, Inclusive Growth and the poor. New Century Publication, New Delhi. Page No. 03,04.
3. इंडियन इन्स्टिटीट्युट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनान्स. (2018). समावेशक बँकिंग. टॅक्समन्न पब्लिकेशन, न्यु दिल्ली. पृ.क्र.–209, 210.
4. www.financialservices.gov.in
5. रघुराम राजन. अनुवादः अजित ठाकुर. (2019). आय.डु व्हॉट आय डु. मंजुल पब्लिशिंग हाऊस, पुणे.
6. काटार सिंह आणि अनिल शिसोदिया. (2017). ग्रामीण विकास. सेज पब्लिकेशन इंडिया. प्रा.लि, दिल्ली.
7. Maharashtra Times. Date 27/03/2017
8. https://www.loksatta.come/arth-lekh. date-14/08/2017


***

# बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांची अंमलबजावणी

**प्रा. धर्मराज केशवराव कटके**

लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, गढी

'सर्वांसाठी शिक्षणाच्या' बीजरोपणाचे श्रेय महात्मा फुले यांनाच जाते. महात्मा फुले म्हणतात निर्मिकानेच सर्व मानव निर्माण केल्यामुळे तो सर्वांना सारखेच अधिकार देईल. त्यांच्यात भेदभाव करणार नाही. या सिद्धान्तानुसार शिक्षण घेण्याचा अधिकार समाजातील प्रत्येक व्यक्तीला आहे. कोणत्याही जातीत मनुष्य जन्माला येवो तो शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. असे आग्रहीपणे प्रतिपादन ज्योतिबांनी केले. बुद्धी किंवा शिक्षण घेण्याची पात्रता जन्मजात नसते हेच त्यांना सुचवायचे होते म्हणून तत्कालीन संकेत व परंपरा तोडून त्यांनी सगळयांना शिक्षण घेण्याचा संदेश दिला. शिक्षणाचा प्रारंभ प्राथमिक शिक्षणापासूनच होतो म्हणून मागासवर्गातील निरक्षर लोकांच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण हे फार विशेष महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “प्राथमिक शिक्षणाचा सार्वजनिक प्रसार हा सर्वांगिण, राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया होय.” डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. असे सांगून ते इशारा देतात की, "केवळ लोकांच्या खुशीवर ही बाब सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कित्येक वर्ष लागतील.”

शिक्षण ही विकासाची किल्ली आहे याची विकसित आणि विकसनशील देशात स्वागतार्ह जाणीव झालेली आहे. नोबेलपुरस्कार विजेते अमर्त्य सेनसुद्धा एका ठिकाणी असे म्हणतात की, 'आर्थिक विकासात पायाभूत शिक्षणाचे महत्व आहे. सक्तीच्या शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. मानवतेच्या उत्थानाच्या दृष्टीने विकसित आणि विकसनशील देशांकरिता शिक्षणाची गतिमान प्रक्रिया एक महत्वाचा मुद्दा राहतो. भारतातील बौद्धकालीन शिक्षण प्रक्रियेचे स्वरुप हे 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' अशा स्वरुपाचे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात युरोपीयन मिशनरीजनी आपल्या पद्धतीने शैक्षणिक उपक्रम सुरु केले व शिक्षण संस्था ह्या लोकांशी संपर्क ठेवण्याचे महत्त्वपूर्ण साधन असून, त्याद्वारे धार्मिकतत्वांची ओळख लोकांना करून देता येवू शकते या विचारातून त्यांनी शैक्षणिक कार्य सुरु ठेवले. चार्ल्स ग्राण्ट यांनी ब्रिटिश पार्लमेंटला भारतीयांच्या शिक्षण विषयक संयोजनाची आत्यंतिक गरजेची जाणीव करून दिली. वूडच्या खलित्यामुळे शिक्षणाचा प्रसार हा विशिष्ट वर्गातच होण्याऐवजी 'सर्वांसाठी शिक्षण' ही संकल्पना विकसित होण्याची संधी प्राप्त झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात इ.स. १८७० मध्ये ब्रिटिश राजवटीत 'सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम' संमत करण्यात आला. थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर आयोगापुढे भारतीय नागरिकांना मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्याची मागणी केली होती. भारतात सर्वप्रथम बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ब्रिटिशांकडून मोफत शिक्षणाची वाट न पाहता. इ.स. १८८३ मध्ये अमरेली येथे तालुक्यातील मुलींसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. पुढे १९०६ मध्ये या योजनेचा विस्तार घडवून आणला. गोपालकृष्ण

गोखले यांनी १९०६ मध्ये इंपिरियल विधान परिषदेपुढे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा प्रस्ताव मांडला. पुढे तो १९१७ मध्ये विठ्ठलभाई पटेलांनी ना. गोखले यांचा प्रस्ताव मंजूर करून घेतला आणि तो पटेल ॲक्ट नावाने पास झाला. त्याच काळात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी केली. ब्रिटिश शासनाने १९१८ मध्ये या कायद्याचा घटनात्मक सूचीमध्ये समावेश केला. भारतीय राज्यघटनेत सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेचे तत्व स्वीकारलेले आहे. संपूर्ण भारतामध्ये ही तत्वे प्रस्थापित करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकार, राज्यनीतिची मार्गदर्शक तत्वे व मूलभूत कर्तव्ये इत्यादी विषयक विविध कलमांची तरतूद करण्यात आलेली आहे. या विविध कलमान्वये केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देशात शिक्षणविषयक बाबींची पूर्तता करण्यासाठी व प्रोत्साहीत करण्यासाठी अनिवार्य केले आहे.

भारतीय राज्यघटनेतील राज्यनीतिच्या मार्गदर्शक तत्वांतील कलम ४५ मध्ये, भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीच्या प्रथम दहा वर्षामध्ये १४ वर्ष वयापर्यंतच्या बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षण देण्याचे प्रयत्न राज्याकडून केले जातील असे म्हटले आहे. बालकांना शिक्षणावरील हक्क देण्यासाठीचा कायदा बनविण्यासाठीच्या चर्चेला तोंड फुटले ते १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात चर्चा चालू होती ती घटनेच्या कलम २१ बाबतची, २१ वे कलम जीवन जगण्याच्या मूलभूत अधिकारासंबंधीचे नागरिकाच्या जीवन जगण्याचा मूलभूत हक्क जतन करणे म्हणजे त्यास अन्न, वस्त्र, निवारा पुरविणे एवढाच अर्थ मर्यादित नसल्याचा खुलासा सर्वोच्च न्यायालयाने केला व जीवन जगण्याकरिता

अन्न, वत्र व निवा-यासोबतच शिक्षणाची व आरोग्यसेवेची हमी अधोरेखीत केली आहे. भारतीय राज्यघटनेतील ७ व्या अनुसूचीनुसार शिक्षणाचा समावेश 'समवर्ती' सूचीत करण्यात आला आहे. म्हणजे केंद्र आणि राज्य सरकार हे यावर कायदे, धोरणे आखू शकतात. ८६ व्या घटनादुरुस्तीपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाच्या अधिकाराचा अर्थ अनेकवेळा अनुच्छेद २१, २४, ३०(१), ३९ (ड) व (च), ४१ ४५ आणि ४६ नुसार लावला आहे. उन्निकृष्णन् वि. आंधप्रदेश खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले आहे की, शिक्षणाचा हक्क हा कलम २१ मधील जीवित आणि व्यक्तीगत स्वातंत्र्याअंतर्गतच येतो. मोहिनी जैन वि. कर्नाटक या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणविषयक हक्काचे महत्व समजावून सांगताना म्हटले आहे की, "शिक्षणाच्या हक्कशिवाय खूप मोठा वर्ग आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहू शकतो. भाषण स्वातंत्र्य आणि इतर मूलभूत हक्कांचा उपयोग शिक्षणाचा हक्क असेल तरच होवू शकतो. कलम २१ अंतर्गत जीविताचे स्वातंत्र्य म्हणजे फक्त जगण्याचा हक्क नसून 'सम्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क आहे. म्हणून मूलभूत शिक्षणाशिवाय जीवन जगण्याचा हक्क अर्धवट राहू शकतो. इ.स. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वजिकीकरणाचे जोरकसपणे प्रयत्न सुरु झाले. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायलय यांनी वेळोवेळी शिक्षणविषयक मूल veryभूत अधिकाराचे महत्व विशद केले. १४ मे २००१ मध्ये प्राथमिक शिक्षणाचा अधिकार हे विधेयक राज्यसभेत संमत करण्यात आले. २८ नोव्हेंबर २००१ रोजी हे विधेयक लोकसभेत सर्वानुमते संमत करण्यात आले. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वे सन २००२ मध्ये राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारात 'जीविताच्या

अधिकारा अंतर्गत २१ 'अ' हे नवीन कलम समाविष्ठ करण्यात आले. कलम २१ 'अ' मध्ये “The Sate Shall provide free and compulsory education to all children of the age of six to fourteen in such manner as the state may, by the law. determine" असे नमूद केले आहे.

तसेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वजिकीकरण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान सुरु करण्यात आले होते. सर्व शिक्षा अभियानामध्ये सन २००३, २००७, २०१० पर्यंत प्राप्त करावयाचे उदिष्ट ठरविण्यात आले; परंतु या अभियानाअंतर्गत विविध योजना, उपक्रम राबवून देखील अपेक्षित उदिष्ट पूर्ती साध्य करता आली नाही म्हणून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये सहा ते चौदा वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यात आली. या अधिनियमाचे सात प्रकरणांमध्ये ३८ कलमांचे विश्लेषण करण्यात आले आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम ३८ (१) व (२) मध्ये संबंधित राज्यशासनास या अधिनियमाच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता अंमलबजावणीसाठी अधिसूचनेद्वारे आवश्यक असे नियम करण्याचा अधिकार आहे. अधिनियमातील या कलमान्वये महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११” तयार केला. या संशोधन लेखामध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांची अंमलबजावणी बाबत काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढण्यात आलेले आहेत. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडून येत आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाविषयक हक्कांबाबत समाजामध्ये जाणीव जागृती वाढत आहे व त्यामुळे शिक्षण घेणा-या बालकांचे प्रमाण वाढत आहे.

मध्यान्ह भोजन योजनांसारख्या शासकीय योजनांमुळे शाळेतील बालकांच्या प्रवेशात वाढ होऊन शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढले आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण विषयक अधिनियमाच्या अंमलबजावणीमुळे बालकांना शाळेतून काढून टाकणे, नापास करणे विविध स्वरुपाच्या शिक्षा देणे अशा विविध बाबींना प्रतिबंध झालेला आहे.

शाळांकडून शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करून शाळाबाह्य बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जात आहे. तसेच शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत चालवण्यात येणा-या शाळामध्ये प्रवेश घेण्याबाबत पालकांची सकारात्मक मानसिकता दिसून येते.

यावरून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडून येत असल्याचे संशोधनामध्ये दिसून येते. बालकांचे आर्थिक शोषण कमी होऊन शिक्षण विषयक हक्कांचे संरक्षण होत आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या अंमलबजावणीमुळे बालकांना त्यांच्या जवळच्या भागात शाळेची उपलब्धता झालेली दिसून येते. तसेच या अधिनियमाच्या अंमलबजावणीमुळे बालकांना शाळेत प्रवेश घेण्यामध्ये सुलभता निर्माण झालेली आहे. बालकांना शाळेत प्रवेश घेण्यासाठीच्या छाननी किंवा चाचणी परीक्षेत प्रतिबंध झालेला दिसून येतो. प्राथमिक शाळांमध्ये डोनेशन विरहित प्रवेश होत आहेत. या सर्व बाबींवरून

बालकांचे आर्थिक शोषण कमी होऊन बालकांच्या शिक्षण विषयक हक्कांचे संरक्षण घडून येत असल्याचे दिसून येते.

**शिक्‌षण विषयक हक्कांसमोरील समस्या व आव्हाने**

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि अर्थपूर्ण अध्ययन अध्यापनासाठी आवश्यक अशा मानवी आणि भौतिक संसाधनाच्या बाबतीत काही प्रमाणात कमतरता दिसून येते. बालकांच्या शाळेतील स्थगन आणि गळतीसाठी दारिद्र्य, शेतीविषयक कामे, पालकांची भटकंती, अज्ञान, शिक्षण विषयक आवडीचा अभाव व नैसर्गिक आपत्ती इत्यादी विविध घटक जबाबदार असल्याचे दिसून येतात. शहरी भागातील बालकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील बालकांमध्ये न्युनगंडाची भावना अधिक दिसून येते. शिक्षकांवरील वाढत्या अशैक्षणिक कामामुळे अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि अर्थपूर्ण अध्ययन अध्यापनामध्ये अडथळे निर्माण होतात.

**शिक्षण विषयक अधिकाराची व्यापकता**

शिक्षण विषयक हक्कांमुळे सर्व समाज घटकांतील सर्व बालकांना शिक्षण विषयक संधी उपलब्ध झाली असून, शिक्षण विषयक हक्कांमुळे संख्यात्मक वाढी बरोबरच बालकांच्या शिक्षणाची गुणात्मकता वाढत आहे. शिक्षण विषयक अधिकार हा व्यापक दृष्टीने समानता, उपलब्धता आणि गुणवत्ता असे  सांगतो.

शिक्षण विषयक मूलभूत अधिकार प्राप्त होण्यास विलंब झालेला आहे असे असले तरीही तो आज पूर्व प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत मोफत आणि सक्तीच्या स्वरुपात असावा. शिक्षण देणारी व्यवस्था ही फक्त सार्वजनिकच असावी म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विकास होऊन सर्वसमावेशकतेच्या तत्त्वाने सर्वांना गुणवत्तेचे शिक्षण

उपलब्ध होईल. सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेमुळे राष्ट्रीय हित जोपासले जाऊन राष्ट्रीय एकात्मता देखील वाढीस लागेल वंचित आणि दुर्बल घटकांतील बालकांना २५ टक्के राखीव जागाच्या तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी “एक खिडकी योजना" अंमलात आणण्यात यावी. खाजगी शिक्षण संस्थामधील RTE Act २५ टक्के आरक्षणामधील विद्यार्थ्यांची फिस शासनाने त्वरीत द्यावी किंवा ती वेळेवर द्यावी म्हणजे वंचित आणि दुर्बल घटकांतील बालकांना खाजगी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्यास संस्थाचालकांचा विरोध होणार नाही व पालकांना त्याचा नाहक मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागणार नाही. परिणामी बालकांच्या शिक्षण विषयक हक्कांचे संरक्षण घडून येईल. आरटीई २५ टक्के प्रवेशाबाबत स्वयंसेवी संघटना, प्रसार माध्यमे, पालक संघटना आणि सजग नागरिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभवावी. काही शाळा फिस म्हणजे उत्तम शिक्षण या तत्वाच्या पुरस्काराने चालवल्या जातात. त्यामुळे त्यांचा परिणाम दुस-या शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दिसून येतो. ही बाब बालकांच्या शिक्षण विषयक हक्कांच्या दृष्टीने अयोग्य आहे. त्यामुळे सर्व प्राथमिक शाळा या सार्वजनिक असावयास हव्या म्हणजे या बाबतीत कसल्याही स्वरुपाची भेदभाव पूर्ण वागणूक नसेल..

शासनाने औरंगाबाद विभागात प्राथमिक शाळेतील बालकांची स्थगन आणि गळतीची समस्या कमी करण्यासाठी वस्तीपासून नजिकच्या भागात शाळेची स्थापना करणे, अवघड क्षेत्रात विद्यार्थी शिक्षक प्रमाणाचे संतुलन राखणे, जनसंपर्क वाढविणे, ग्रामीण भागात शेतीच्या हंगामानुसार शाळेचे वेळापत्रक तयार करणे तसेच अज्ञानी लोकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जाणीव

जागृतीचे कार्य हाती घ्यावे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या व शिक्षणाच्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, स्वयंसेवी संस्था तसेच शासकीय व प्रशासकीय यंत्रणांनी आपल्या स्तरावर वरील शिफारशींचा स्वीकार करावा म्हणजे कोणतेही बालक शिक्षण विषयक अधिकारापासून वंचित राहणार नाही.

**निवडक संदर्भ ग्रंथ ( Reference Books)**


१. Agrawal S.P. & Kauta Naresh, (1990), “Child Education in India, India to shortly writing in Indian", Educational Journals and News Pages, Since Independence, Concept Publishing Company, Navi Delhi.

२. Basu Durga Das, (2003), "Introduction to the constitution of India", Lexis Nexis, Gurgaon, Haryana.

३. Sharma Usha, (2006), "Child Labour In India", Mittal Publications, Navi Delhi.

४. Seerai H. M. (1976), "Constitutias Law of India", Vol.2. N.M. Tripathi Pvt. Ltd., Bombay.C. Raj Kumar, "International Human Right Perspective of the Fundameutal Right to Education Constitution", 12 Tulane, Journal of International Comparative Law.

५. Kochhar S.K., (2005), "Pivotal Issues in Indian Education", Sterling Publishers Pvt. Ltd. Navi Delhi.

६. Pandey V. C., (2005), "Democracy and Education, Isha Books Delhi, He said in the preference of the Book", In a democracy, Community.

७. The Gazatte of India, Extraordinary, Part-II, Section-I, Published by Authority No.39. Navi Delhi- August 27, 2009.

८. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०१२, (२०१२), अधिसूचना बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग चार असाधारण क्रमांक ६५, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वे (भाग-एक-एक अ आणि एक ल) नियम व आदेश, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई.

९. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये, (२०१४), महाराष्ट्र शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आरटीई-१९१४ दि. २० ऑगस्ट २०१४.


***

# भारतीय शेती मधील गुंतवणूक व अनुदान

**संशोधक**

## ज्ञानेश्वर उद्धवराव आवचार

एम, ए, एम,फिल अर्थशास्त्र,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा,विद्यापीठ, औरंगाबाद

**मार्गदर्शक**

## प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे

प्राध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**गोषवरा :**

देशाच्या आर्थिक विकासामध्ये कृषि क्षेत्राचे योगदान हे फार महत्वाचे आहे. देशामधील वाढत्या आर्थिक विकासाबरोबरच कृषि क्षेत्रामधे देखील विकास होणे गरजेचे आहे. पण अलिकडील काळात तसे होताना दिसत नाही. ज्या प्रमाणात सर्व क्षेत्रामध्ये विकासानी उच्चांक गाठलेला आहे. परंतु शेती आजही मागसालेली आहे. विकसीत देशांसी तुलना करता भारतामधील शेती विकास हा अत्यल्प प्रमाणात आहे. त्याचे कारणे अनेक आहेत. परंतु त्यामधीलच एक मूळ व महत्वाचे कारण भारतीय शेतीमधील गुंतवणूक आहे. त्या अनुषंगाने हा संशोधनलेख निवडलेला आहे.

**उदिष्टे :**

1 भारतीय शेतीमधील गुंतवणूकीचा अभ्यास करणे.

2 1991 चे धोरण अभ्यासणे

3 भारतीय शेतीसाठी असलेल्या तरतुदीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिंबधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ शोधनिबंध, शासनाचे अहवाल, वर्तमानपत्रे इंटरनेट इत्यादी  दुय्यम साधनाद्वारे माहिती संकलित करण्यात आलेली आहे. शोधनिबंधाच्या उदिष्टानुसार घेतलेल्या माहितीची मांडणी व विश्लेषण करण्यात आलेल आहे.

**प्रस्तावना :**

हवामान बदल आणि उपजाऊ जमीनीचा कमी होत जानारा कस यामुळे शेती क्षेत्राला नेहमीच अव्हानांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, साधन सामग्रीचा जास्त खर्च बाजारातील असलेली अनिश्चितता हवमानातील बदल या सर्व घटकांचा कृषी क्षेत्रावर परीणाम झालेला आपणास वारंवार पाहयाला मिळेल त्या अनुसंगाने कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन यासाठी शासनामार्फत अनेक विविध योजना व कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. कृषी पतपुरवठा, कृषी पणन व कृषी प्रक्रिया क्षमतामध्ये वाढ शेतक–यांचे उत्पन्न वाढवण्यात साहयभूत ठरतात शेतीमधील जोखिम व्यवस्था पत आणि जोखिम कमी करण्याचा उपाय म्हणून विविध पीक विमा योजना राबविण्यात येत असून यामुळे शेतक–यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे या उदेशाने शासनाने विविध धोरणात्मक उपाय योजना हाती घेतल्या असल्या तरी भारतीय कृषीमध्ये मोठया प्रमाणात बदल घडवून आले नाही. मागील काही दशकात कृषी व संलग्न कार्य या क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवद्धीमधील सरासरी हिस्सा 11.70 % होता तर पीक क्षेत्राचा हिस्सा 7.6 % होता

केंद्र शासनाने राष्ट्रीय ई–शासन–कृषी अंतर्गत शेतक–यामधील जागरुकता ज्ञान आणि कार्यक्षमता यामध्ये सुधारणा होण्यासाठी सर्वसमावेशक माहिती, संप्रेषण, तंत्रज्ञान कार्यप्रणाली विकसीत केली आहे. कृषी क्षेत्रातील 13 योजनेखालील आर्थिक लाभ व अनुदान कार्याचा बॅक खात्यात महा डीबीटी वेबपोर्टलद्वारे थेट जमा करण्याची कार्यवाही सन 2020 पासून सुरु करण्यात आली राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या मुल्य निर्धारण प्रक्रियेमध्ये किमान मानवी हस्तक्षेप व त्रुटी राहण्यात या उदेशाने राज्य शासन महामदत ही ई–शासन प्रणाली स्थापित केली आहे.

केंद्र सरकारने भारतीय शेतीवर आकारलेल्या अनुदानांचा व योजनांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. याकरितहा संशोधन लेख विषय निवडण्यात आला आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्वपूर्ण असते. वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शेतीवरील अवलंबून असणा–या लोकांची संख्या कमी होत आहे. मात्र हि स्थीती साध्य करण्यासाठी शेती क्षेत्राची मदत फार महत्वाची ठरते. जपान मध्ये विकासप्रक्रियेत शेतीची भूमिका महत्वाची आहे. देशाचा विकास

झााला तरी वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरविण्याची गरज फक्त शेतीमध्येच आहे. भारतासारख्या विकसनशील देशात राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा मोठा वाटा आहे.

भारतीय जनतेच्या उदरर्निवाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी होय. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या भांडवल निर्मितीत कृषी क्षेत्राचा वाटा 1950—51 मध्ये 17.7 टक्के होता. 2016—17 मध्ये 15.5 टक्के झाला आहे. कृषी क्षेत्र भारतातील सर्वात मोठे मुक्त खाजगी क्षेत्र आहे. तसेच सर्वात मोठे व असंघटित क्षेत्र आहे. शेती हा मानवाचा सुरूवातीच्या काळामधील व्यवसाय आहे. सर्वसामान्यपणे पीकांची लागवड करणे व त्याचप्रमाणे प्राण्याची जोपासना करणे म्हणजे शेती समजली जात असे.

**कृषी उगम :**

कृषी हा मानवाचा सर्वात जुन्या व्यवसायापैकी एक महत्वाचा व्यवसाय आहे. सर्वसामान्यपणे पिकांची लागवड करणे व त्याच प्रमाणे प्राण्यांची जोपासणे करणे म्हणजे कृषी समजले जाते. म्हणून कृषीचा उगम हा पीक लागवड करणे आणि प्राण्यांची जोपासणा करण्यास जेंव्हा सुरुवात झाली, तेंव्हाच झाला आसावा. जरी मानव पीक वनस्पती आणि प्राणी सतत एकत्र राहत असले आणि परंपराशी निगडीत असले तरी मानवाने कधी आणि कसे कोठे वनस्पती व प्राण्यांच्या पालनास सुरुवात केली. याची खात्री देता येत नाही.

1991 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे एका बाजूने विचार केला तर कृषी खर्चात वाढ झालेली अपनास दिसून येते तर दुसरी कडे शेती मालाच्या किमती घसरल्या आहेत. शेती क्षेत्रातील गुंतवणूक व आर्थिक संस्था कडून कर्जपुरवठा हा मोठया प्रमाणात कमी झालेला आहे त्यामुळे शेतीमध्ये अडचणी वाढल्याचे दिसते. विश्वव्यापार संघटनेने घातलेले निर्बंध हे भारतीय शेतीला एक श्रापच म्हणावे लागेल. एकीकडे भांडवलशाही देशात शेतकरी शेती अनुदान दिले जाते त्याच ठिकाणी मात्र भारत देशावर शेतक—यावरील अनुदानाला निर्बंध घातलेले आहेत. व तसेच कृषीनाशक औषधावरचा वाढता खर्च व शेतमालाच्या घसरत्या किंमती या दुहेरी मा—यामुळे शेतकरी हा डबघाईला आलेला दिसून येतो. हे एक शेतक—यांचा आत्महत्येकडे भर देणारे कारण दिसते.

उदारीकरणाच्या पूर्वी राष्ट्रीयकृत बॅकानी ठरवलेला पतपुरवठा हा 18 टक्के कर्जपुरवठा करणे कृषी क्षेत्रासाठी

बंधनकारक होते. मात्र उदारीकरण्याच्या काळात तो कृषी पतपुरवठा 10 टक्कयावर आणला गेला तसेच जागतिकीकरणाच्या काळात मध्यस्थ देशी विदेशी दलालांच्या मोठया प्रमाणात सहभाग वाढला त्यामध्येच डंकेल प्रस्तावामध्ये असे नमूद केले की, मुळात आयातीबरोबर शेती अनुदानात कपात केली पाहिजे. याचा परिणाम कुठे तरी भारतीय शेतीवर झालेला दिसून येतो. कारण शेतीच्या विकासाचे सातत्य हे सर्वपने सार्वजनिक गुंतवणूकीवर अवलंबून असते, मात्र भारतीय शेतीमधील सार्वजनिक गुंतवणूकीचा अभ्यास करता शेतीमधील सार्वजनिक गुंतवणूक सातत्याने कमी झालेली आपनास मागील काही पंचवार्षिक योजनापासूनचा अभ्यास करता दिसून येते. भारतातील पंचवार्षिक योजना व शेती क्षेत्रासाठी आर्थिक तरतुद टक्केवारी मध्ये खालील तक्यात दशर्वली आहे.

| पंचवार्षिक योजना | कालवधी | खर्च एकूण | | शेतीमधील गुंतवणूक टक्कयामध्ये |
|---|---|---|---|---|
| | | अपेक्षित | प्रत्यक्षात | |
| पहिली | 1951–56 | 2348 | 1960 | 3% |
| अदुसरी | 1956–61 | 4800 | 4600 | 31% |
| तिसरी | 1961–66 | योजनेला सुटी | | |
| चौथी | 1966–69 | 15.902 | 15799 | 20% |
| पाचवी | 1969–74 | 37.250 | 39.426 | 21% |
| वार्षिक | 1974–79 | सरकारी योजना | | |
| सहावी | 1979–80 | 97,500 | 1,09,292 | 24% |
| सातवी | 1980–85 | 1800,00 | 2,18,729 | 22% |
| वार्षिक | 1985–90 | वार्षिक योजना औद्योगीक धोरण | | |
| वार्षिक | 1990–91 | वर्षिक योजना | | |
| आठवी | 1992–97 | 4,34,100 | 4,74,121 | 21 % |
| नववी | 1997–2002 | 8,75,000 | 9,41.040 | 12.8 % |
| दहावी | 2002–2007 | 15,25,639 | 16,18,460 | 20.2 % |

स्त्रोत – देसले किरण (2015) स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र 1 पृ, 303–406

पंचवार्षिक योजनेत ठेवण्यात आलेली शेती उत्पादनाच्या वार्षिक वाढीचे सरासरी 4.5 टक्के हे उदिष्टे गाठणे कठिण आहे असे दिसते कारण त्यासाठी शेतीच्या विकासासाठी सरकारडून अनुदान मिळणे अपेक्षित आहे, परंतु डंक्केल प्रस्तावानुसार विकसित देशात 20% तर विकसनशील देशात 13.33 % अनुदान कपात करणे बंधनकारक आहे. यास अनुसरुन भारत सरकारने सुद्धा अनुदानात कपात करण्यास सुरुवात केली.

वरील तक्त्यामधून योजना आयोगातर्फे शेती क्षेत्रासाठी केलेली गुंतवणूक ही पहिली योजना पासून पाहता 14 % वरुन काही मोजक्याच योजना जसे की पहिली योजना 14% तर दुसरी योजना 11.3 % त्यानंर हा गुंतवणूक दर साततत्याने कमी होत गेलेला दिसून येतो. यामध्ये अपवादत्मक वार्षिक योजना वगळता बाकी काळात हा दर कमी झालेला पाहयाला मिळतो. यामुळे शेतीच्या विकासावर परिणाम झाला असून शेतीचा विकासाचा दर अल्प राहिलेला दिसून येतो. शेतीचा विकास दर वाढविण्यासाठी शेती व शेती संबधीत क्षेत्रासाठी आधिअधिक गुंतवणुकीची गरज आहे. त्याच बरोबर अलीकडील काळात भारत सरकारने शेतीसाठी केलेल्या तरतुदी

सरकारने भरघोस अशा योजना आणि आर्थिक तरतुद केली आहे. केंद्र सरकार चालु आर्थिक वर्षात ग्रामीण भागातील तरुणांना शेतीसंबधीच्या स्टॉटप्सना नाबार्ड तर्फे मदत करणार आहे. तसेच किसान झोनच्या माध्यमातून पिकांचे मूल्यमापन केले जाणार आहे. या आर्थिक वर्षात सेंद्रीय तसेच रसायनमुक्त शेती करण्यासाठी शेतक—यांना प्रोत्साहन दिले जाईल.

विशेष म्हणजे देशातील सर्व कृषिविद्यापीठांना आधुनिक झिरो बजेट तसेच तंत्रज्ञानयुक्त शेतीसाठी आभ्यासक्रम आखण्याचे सांगितले जाणार आहे. विशेष म्हणजे यावेळी सरकारने यावेळी शेतक—यांना एमएसपी अंतर्गत तब्बल 2.7 लाख कोटी देण्याचे जाहिर केले.

जास्तीत जास्त जमीन जलसिंचनासाठी आनण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यावेळी जलसिंचन योजनेतून तब्बल 1 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तेलबीयाच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

**समारोप :**

शेतीमध्ये एवढे अपयशाचे दिवस का आले आहेत. आज आपण पाहिले तर अगदी प्राचीन काळापासून शेती हा एकमेव पर्याय आहे. जो माणसाची अन्नाची गरज भागवते मग शेतीकडे पाहण्याचा शेतीबद्यल बोलण्याचा सर्वांचा एक वेगळा दृष्टिकोन तयार झााला आहे. शेती म्हटले की पारंपरीक पिक पद्धती तेच पिक तेच बियाणे आणी तेच संसाधने ही परंपरा झुगारुन देण्याची आज गरज आहे. शेती ही एक व्यवसाय म्हणून केली आणि अनुभवाच्या आधारावर केली तर कुठे तरी बदल घडवून येईल त्याच बरोबर शासनाने जास्तीत जास्त अनुदान व तंत्रज्ञावर भर देण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


1. कविमंडल विजय (2015) कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
2. फुले सुरेश (2012), कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, औरंगाबाद
3. गव्हाणे सतीश. (2012), कृषी क्षेत्रातील पेचप्रसंग आणि शेतक—यांच्या आत्महत्या. चिनमय प्रकाशन, औरंगाबाद
4. देसले किरण (2015) स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र 1. दिपस्तंभ प्रकाशन. 42 हाऊसिंग सोसायटी, जळगाव
5. भारतीय अर्थसंकल्प 2022—23
6. महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी अहवाल 2020—21


***

# व्यायाम आणि खेळाचे व्यक्तिविकास व आरोग्य जीवनातील महत्त्व

## व्यायामाचे जीवनातील महत्त्व : एक अभ्यास

**Prof. Ashtekar Nitin Vasantrao**

Physical Director, S.J.P. Mahavidyalaya, Lohara, TQ Lohara, Dist Osmanabad,

**गोषवारा :**

आधुनिक काळात व्यवसाय व नोकरीच्या नादात प्रत्येकाचे खेळाकडे व व्यायामाकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत आहे. लहान मुलांच्या बालवयातच त्यांचे बालपण त्यांच्याकडून हिरावून घेऊन त्यांचे पालक शिक्षणाकडेच जास्त लक्ष देत आहेत. पूर्वी लहान मुलांचे खेळणे, बागडणे, व्यायाम चांगल्या प्रकारे होत होते. मात्र वर्तमानकाळात मुलांचे भविष्य घडविण्याच्या नादात त्यांच्या शिक्षणाकडे अती लक्ष देऊन दुसऱ्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी असणाऱ्या गोष्टींना प्राधान्य देताना दिसत नाहीत. त्यातून बालवयात लहान मुलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे , व्यायाम व खेळ यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याने त्यांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडते. हाच नियम सर्व वयोगटातील लोकांना लागू होतो. व्यायाम व खेळामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकर्षक तर बनते, शिवाय त्याला आरोग्यसंपन्न आयुष्य लाभून आयुर्मान वाढते.

**महत्वाचे शब्द** : आधुनिक, बालपण, शिक्षण, भविष्य, आरोग्यसंपन्न, आयुर्मान इत्यादी.

**प्रस्तावना** :

एखादे काम जास्त काळ करीत राहण्याची क्षमता (टिकाऊपणा) ही महत्त्वाची आहे. उदा. लाकूड फोडणारा किंवा खणकाम करणारा मनुष्य दिवसभर ते काम करीत असतो. सवय नसलेला एखादा मनुष्य ते काम करताना पाच मिनिटांतच थकून जाईल. याचे रहस्य काय? त्या त्या कामाने विशिष्ट स्नायुगट जास्त सुदृढ होतात. उदा. लाकूडतोडयाचे दंडाचे स्नायू पीळदार असतात. या स्नायूंमध्ये जास्त धागे असतात, तसेच प्रत्येक धागा इतरांपेक्षा जास्त जाडजूड असतो. यात ऊर्जा साठवणही (ग्लायकोजेन) इतरांपेक्षा जास्त असते. या स्नायूंना लागणारा प्राणवायू व साखर (रक्तप्रवाह) पदार्थ पुरवत राहिल्यास हे स्नायू बराच काळ न थकता काम करत राहतील. अशी व्यक्ती ते काम हळूहळू पण सातत्याने करीत असते. तेच काम वेगाने केल्यास त्या स्नायूंना पुरवठा कमी पडून काम मंदावते व थांबवावे लागते. एखाद्या स्नायुगटाचे काम कमी क्षमतेवर पण जास्त काळ करत राहणे हे यातले विशेष तत्त्व आहे. काम करताना या तत्त्वाचा सर्वात जास्त फायदा होतो. लहानपणी अवयव बरेच लवचीक असतात. वयाप्रमाणे हे अवयव ताठर होऊ लागतात. स्नायूंची व सांध्यांची लवचीकता वाढवणे आणि टिकवणे हे महत्त्वाचे आहे. शरीराच्या निरनिराळया विभागांना नियमित उलटसुलट ताण दिल्याने ही लवचीकता वाढते व टिकते. उदा. कमरेची लवचीकता टिकवण्यासाठी मागे वाकणे, पुढे वाकणे, मागे वळणे, बाजूला वाकणे इ. अनेक प्रकार करावेत. योगासने यासाठी अगदी उत्कृष्ट आहेत. काही

प्रकारच्या व्यायामाने काही स्नायुकौशल्ये, स्नायुगटांचे समतोल इ. वाढतात. प्रत्येक खेळामध्ये विशिष्ट कौशल्य लागते. उदा. क्रिकेटच्या खेळात धावत जाऊन चेंडू झेलणे किंवा चेंडूचा अंदाज घेऊन बॅट मारणे इ. गोष्टी या विशेष कौशल्याच्या आहेत. खेळाप्रमाणे निरनिराळया कामांनाही कौशल्य लागते. त्या स्नायुगटांचे कौशल्य विशेष व्यायामांनी वाढवता येते. प्रत्यक्ष कामातूनही ते कौशल्य वाढतेच, व्यायाम त्याला पूरक होतो. स्नायूंची शक्ती वाढवणे हे व्यायामाचे एक उद्दिष्ट आहे. स्नायूंची शक्ती वाढते ती त्या त्या स्नायूंना व्यायाम दिल्याने. व्यायामाने स्नायू भरदार होतात. त्यांची तंतुसंख्या वाढते, आणि प्रत्येक तंतू जास्त जाडजूड होतो. त्यामुळे एकूण बळ वाढते. स्नायूंचे बळ वाढण्यामागे स्नायूचा ऊर्जेचा साठा वाढणे हेही एक महत्त्वाचे कारण असते. समजा एखादी वस्तू आपण जोर लावून ढकलतो आहोत, तो जोर जास्त वेळ टिकायला स्नायूतली ऊर्जा कामी येते. बहुतेक सर्व व्यायाम स्नायूंनी केलेले असतात, त्यात हृदय व रक्ताभिसरण संस्थेचे काम निसर्गतः येते. पण पोटातील अवयवांना व्यायाम देणे या पध्दतीने साधत नाही. त्यासाठी वेगळे व्यायाम करावे लागतात. यौगिक पध्दतीत उड्डियान,भस्त्रिका, नौली इ. विशेष प्रकार या दृष्टीने चांगले आहेत. याची माहिती स्वतंत्र प्रकरणात दिली आहे.

**व्यायाम न करण्याचे दुष्परिणाम :**

व्यायाम म्हणजे आपल्या डोळयासमोर पैलवान किंवा पीळदार शरीरे येतात. असे होण्यासाठी तर व्यायाम लागतोच, पण निरोगी राहण्यासाठीही व्यायाम लागतो हे अनेकांना माहितच नसते. भारतीय समाजामध्ये व्यायामाची आवड कमी आहे. सुशिक्षित सुखवस्तू समाजात तर व्यायामाची आवड अगदीच कमी आहे.

भारतातल्या जातिव्यवस्थेमुळे कष्टकरी वर्गाला अन्न कमी तर खाणा-यांना श्रमच नाही अशी परिस्थिती आहे. धट्टीकट्टी गरिबी म्हणण्याची आपल्यावर पाळी आहे. म्हणूनच व्यायामाचे महत्त्व आहे. व्यायाम केला नाही तर खालील दुष्परिणाम होतात.

१. एकूण शारीरिक क्षमता, सहनशक्ती कमी होते. अपेक्षित आयुष्य कमी राहते.

२. हृदय लवकर जीर्ण, दुबळे होणे.

३. सांधे आखडणे आणि स्नायू दुबळे होणे. या आरोग्य समस्या लवकर उत्पन्न होणे.

४. रक्तातली साखर वाढून मधुमेह होणे.

५. शरीरात चरबी साठणे, पोट सुटणे, शुध्द रक्तवाहिन्यांत चरबीचे थर साठणे, त्यामुळे रक्तवाहिन्यांत अडथळे होणे.

**भूक व पचनशक्ती मंद होणे.**

जे लोक व्यायाम करीत नाहीत त्यांना आज ना उद्या आरोग्यसमस्या जाणवतील. या सर्व हळूहळू वाढणा-या समस्या असल्याने त्यांची मनुष्याला सवय होऊन जाते. व्यायाम न करणेही अंगवळणी पडते. अनेकजण या आळसाचे समर्थन करतात. व्यायामाची आवड लहानपणापासूनच लावली पाहिजे. प्रत्येकाने काही ना काही व्यायाम आयुष्यभर नियमित करायला पाहिजे.

**खेळाचे महत्त्व :**

मानवाच्या उत्कर्षापासुनच क्रिडा त्याच्या जिवनाचा एक अमुल्य भाग बनला. शिकार करणे, पळण्याची शर्यत लावणे, झाडावर चढणे, पोहणे, नेम लावणे, हवेत पकडणे, उडया मारणे, इत्यादींमधून

त्यांच्या खेळाडू वृत्तीचे दर्शन होते. विविध क्रिडांमधून त्याचे मनोरंजन होते व ज्ञान मिळते.

क्रिडा कोण किती समर्थ याच्या जाणण्याचे साधन होते त्यामूळे प्रत्येकाची कूवत कळायची, त्यामुळे क्रिडा हे एक अत्यंत महत्वाचा भाग म्हणून मानवाच्या जिवनात अस्तित्वात होती. खेळ खेळल्यामुळे लहान मुलांचा विकास चांगल्या प्रकारे होतो. त्यांच्यातील आंतरीक कौशल्याचा विकास होतो. त्याच्या सर्व प्रकारच्या कौशल्यांच्या विकासामुळे त्यांचे स्वास्थ्य ठीक राहाते व त्याची वाढ झपाटयाने होते.

दररोज लहान मुल कोणता ना कोणता खेळ खेळतात त्यातुन त्यांची शारिरीक ऊर्जा खर्च होते त्यामुळे त्यांना अधिक उर्जेची गरज पडते परिणामी त्यांची वाढ चांगल्या प्रकारे होते. खेळांमुळे सहकार्य भावना वाढते मुल आणखी चांगली सामाजिक होतात, एकमेकांसोबत आपले सामंजस्य स्थापीत करतात. खेळांमुळे निर्णय क्षमता विकसीत होते. बुध्दीच्या सर्व कोशिकामध्ये उर्जा संचारली जाते. खेळांमुळे वर्चस्व व प्रभुत्व मिळविण्याची स्पर्धा लागते, प्रत्येक बाळ आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करतो. मुलं स्वयंकेंद्रीत बनतात. ते आपले विश्व बनवतात ज्यामध्ये ते जगतात. मुलांमध्ये स्पर्धात्मक गुणांचा विकास होतो.

१. आत्मियभाव निर्माण होण्यास मदत होते.

२. स्वभावात उत्साह वाढून उर्जावान वाटते.

३. शरीरात स्फूर्ती येते.

४. पालकांवर अवलंबून राहण्याची सवय कमी होते.

५. मुलांमध्ये सहकार्य भावना, नेतृत्व क्षमता आणि सामंज्यस्यता आणि स्पर्धात्मक प्रेरणा वाढविणे फार जरूरी आहे. त्यामूळे हे कौशल्य आत्मसात करता येते.

६. कौशल्यांना निखारणे.

७. आपल्या मुलात क्रिडा गुणांचा विकास करणे, त्यांचे शरीर व स्वास्थ्य उत्तम ठेवणे, अभ्यासात लक्ष केंद्रीत करणे त्यासाठी उत्साह निर्मीती करणे.

मनुष्याला रोगांपासून दूर राहण्यासाठी निरोगी शरीर असणे आवश्यक आहे. एका निरोगी शरीरातूनच निरोगी मन व बुद्धीचा विकास होतो. शरीराला स्वस्थ ठेवण्यासाठी खेळांचे भरपूर महत्त्व आहे. खेळांमुळे शरीर व मन दोघेही निरोगी राहतात. खेळ खेळल्याने मनुष्यात धैर्य, सहनशीलता आणि मानवी गुणांचा विकास होती. खेळ आजच्या व्यस्त जीवनात महत्त्वाची भूमिका बजावते. खास करून विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळांचे महत्त्व भरपूर आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला दिवसातून थोडा वेळ काढून खेळायला हवे. खेळ खेळल्याने तंदुरुस्ती सोबत मनोरंजनही होते. खेळांचे देखील वेगवेगळे प्रकार असतात काही खेळ शारीरिक तर काही मानसिक असतात. शारीरिक खेळ खेळण्यासाठी शरीराला श्रम करावे लागते, तर मानसिक खेळांमध्ये मेंदूचे कार्य असते. फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, टेनिस, कबड्डी इत्यादी शारीरिक खेळ आहेत. या खेळांना खेळण्यासाठी शारीरिक ताकत लागते. दुसरीकडे बुद्धिबळ, पत्ते, चौपट इत्यादी मानसिक खेळ आहेत, ज्यांना खेळण्यासाठी मानसिक शक्तीचा वापर करावा लागतो. या शिवाय इनडोर आणि आऊटडोर खेळांचे प्रकार आहेत. आजकाल इनडोर खेळांमध्ये कॉम्प्युटर व मोबाईल गेम्स

मोठ्या प्रमाणत खेळले जात आहेत. परंतु हे खेळ तुमचे स्वस्थ सुधारण्या ऐवजी बिघडवित आहेत. बाहेर खेळाला जाणार खेळ कोणताही असो तो आपल्या शरीराला स्वस्थ आणि मनाला प्रसन्न करतो. खेळ मनुष्याचा व्यक्तिमत्त्व विकास करतात. ते एकमेकांमध्ये सहकार्य व बंधुता वाढवतात. खेळांमुळे परंपरा सन्मान आणि प्रेम देखील वाढते. अश्या पद्धतीने खेळ आपल्याला गुणवान, चारित्र्यवान आणि एक खरा व्यक्ती बनवतात.

**संशोधनाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनात खेळ व व्यायामाचे व्यक्ती जीवनात असणाऱ्या महत्वाचे अध्ययन करण्यात आले आहे .

**संशोधनाचे उद्देश :**

१. व्यायामाचे महत्त्व अभ्यासणे.

२. व्यायाम न केल्याने होणारे दुष्परिणाम अभ्यासणे.

३. खेळामुळे होणारे फायदे अभ्यासणे.

४. खेळ व व्यायाम यामुळे व्यक्तीच्या जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष** :

१. व्यायाम केल्याने व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहत असल्याचे दिसते.

२. व्यायाम न केल्याने व्यक्तीला अनेक स्वरूपाच्या शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसते.

३. खेळामुळे शारीरिक व्यायाम होऊन मन दिवसभर प्रसन्न राहत असल्याचे दिसते.

४. खेळ व व्यायाम यामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

**संदर्भ** :


१. जैन राजीव, संपूर्ण योग विद्या.

२. पाटील बाजीराव , दररोजची योगासने.

३. Sheth Parul R. , Exercising For Good Health.

४. Lim John, Keep Fit.

५. Richard  Peter, Men's Guide to Yoga.

६. Kutler Karan, Home Exercise Guide


***

# अवंतिकाबाई गोखले यांचे भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान : एक ऐतिहासिक अवलोकन

## प्रा. डॉ. नारायण ज्ञानोबा नाईक

**प्रस्तावना :**

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात गांधीजींची पहिली भारतीय पट्टशिष्या म्हणून अवंतिकाबाई गोखले ओळखल्या जातात. हिंद महिला समाजाची स्थापना करणाऱ्या मुंबई पालिकेच्या पहिल्या महिला सदस्या, तसेच स्थायी व आरोग्य समिती सदस्या, सत्याग्रहीच्या १३ व्या तुकडीचे नेतृत्त्व करणाऱ्या व मीठाच्या सत्याग्रहात एकमेव महाराष्ट्रीय महिला म्हणून सहभाग घेतलेल्या, उत्तम परिचारिकेचे कार्य करणाऱ्या महात्मा गांधीचे पहिले मराठी चरित्र लिहिणाऱ्या लेखिका, इंग्रजी भाषेवर प्रभूत्व असलेल्या अवंतिकाबाई गोखले यांची केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात व भारत बाहेरील देशात ख्याती होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वावर कटाक्ष टाकल्यास अनेक स्त्रियांनी आपला खारीचा वाटा उचलून चळवळीला हातभार लावलेला आहे. हे अनेक उदाहरणावरून स्पष्ट होते. स्त्रियांनी केवळ राजकीय दृष्टिकोनातून देशाचा विचार न करता सामाजिक बांधिलकीची जबाबदारी स्विकारून स्वकर्तृत्व व स्वबळावर संस्था व संघटना याची उभारणी केली. अशा कर्तृत्त्ववान आणि स्वातंत्र्यलढ्यात कार्यकर्त्या म्हणून सहभागी झालेल्या स्त्रियांकडे दुर्लक्ष होत आहे. अशा अनेक स्त्रियांपैकी एक म्हणजे अवंतिकाबाई गोखले होय. अवंतिकाबाई गोखलेनी राजकीय व सामाजिक अशा दोन्ही अंगानी केलेले कार्य राष्ट्रीय जडण

घडणासाठी किती मोलाचे होते, हा इतिहास सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवावा असा आहे. याच दृष्टिकोनातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अवंतिकाबाई गोखलेंच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सदरच्या शोध निबंधातून केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. अवंतिकाबाई गोखले यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कार्याचा आढावा घेणे.
2. सविनय कायदेभंग चळवळीतील योगदानाचा परामर्श घेणे.

अवंतिकाबाई खूप कष्टाळू, परिश्रम करणाऱ्या व प्रामाणिकपणे वागणाऱ्या होत्या. त्यांच्या या गुण वैशिष्ट्यामुळे खरी साथ मिळाली ती पती व कुटुंबाची होय. बबनराव इंग्लंडमध्ये होते. तेव्हा अनेक स्त्रिया परिचारिकेचे व सुईणीचे काम करीत. हे प्रत्यक्षात पाहिले व त्यांचे अवलोकन केले. अवंतिकाबाईंनी हे कौशल्य अवगत करून समाजाला मदत करण्यात आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. परिणामी अवंतिकाबाईंनी परिचारिकेचा व सुईणीचा अभ्यासक्रम इ.स. १९०१ साली पूर्ण करून त्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला.' अवंतिकाबाईंच्या शिक्षणाला कलाटणी देणारा हा शिक्षणाचा प्रवास तत्कालीन स्थितीत किती महत्त्वाचा व क्रांतीकारी होता हे आजच्या स्त्रीने समजावून घेतले पाहिजे.[1]

इ.स. १९०३ मध्ये अवंतिकाबाईंच्या २१ व्या वर्षी समजासेवेच्या कसोटीचा काळ आला. तो म्हणजे त्या काळात महाराष्ट्रात मोठी देवीची साथ आली व हा देवीचा रोग परमेश्वरी कोपामुळे होतो ही अंधश्रद्धा सर्वसामान्य माणसात भिनली. तेव्हा अवंतिकाबाईंनी हा रोग देवी कोपाचा नसून लसीकरण अभावी होतो हे पटवून समाजात आरोग्यविषयक जाणिव जागृत केली. देवीची लागण झालेल्या रुग्णाची स्वतः त्यांनी सेवा करून त्यात पूर्णपणे झोकून दिले.

इ.स. १९०१ मध्ये घेतलेल्या परिचारिका शिक्षणाचा खरा उपयोग या ठिकाणी झाला. त्यांच्या कार्यातून समाजाप्रती त्यांची तळमळ दिसून येते. देशसेवा व त्यातूनची समाजसेवा यांचे मूल्य ठरविता येत नाही. हे कार्य आजच्या पिढीला खास करून महिला वर्गाला अनमोल मार्गदर्शन करणारे आहे.[2]

अवंतिकाबाईंच्या पतीने इंग्लडहून परतल्यावर बडोद्यापासून तीन कि.मी. अंतरावरील व्यापारा या ठिकाणी काडीपेटी तयार करण्याचा कारखाना सुरू केला. एकदा अचानक झालेल्या स्फोटाने बबनराव गोखलेंना हाताचा तळवा गमवावा लागला. अशा परिस्थितीत स्वतः अवंतिकाबाईने मोठ्या कौशल्याने व शिताफीने परिचारिका प्रशिक्षणाचा उपयोग करून पतीची शुश्रुषा केली. एवढेच नव्हे तर कारखान्याच्या कामात लक्ष घालून तेथील व्यवस्थापन ही पार पाडले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्या अचानक कारखाना भेटीत त्यांच्या निदर्शनास आले की कारखान्याची पूर्ण जबाबदारी स्विकारून व्यवस्थापनाचे काम अवंतिकाबाई उत्तमरितीने करीत आहेत. त्याप्रसंगी सयाजीराव महाराजांनी काढलेले गौरवोद्गार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात की, जर भारतीय स्त्रिया अशातऱ्हेने नवऱ्याबरोबर कामे करतील तर अल्पकालावधीतच भारत स्वावलंबी होईल आणि परकियांच्या जोखडातून मुक्त होईल."यावरून प्रसंगी स्त्रिया धाडसी निर्णय घेण्यास व कठीण प्रसंगी समस्येला सामोरे जाण्यास कमी पडत नाहीत हे सिद्ध होते.[3]

इ.स. १९१६ नंतर अवंतिकाबाई कार्याचा व्याप वाढत गेला. कुटूंबातून बाहेर पडण्याची संधी त्यांना चालून आली. इचलकरंजीच्या गंगामाई राणीसाहेबांना इंग्लंडला जायचे होते. राणीसोबत जाण्यासाठी समवयस्क शिक्षित व इंग्रजी भाषा जाणणारी स्त्री पाहिजे होती. मराठी भाषेबरोबरच इंग्रजी भाषेवर प्रभुत्त्व असणाऱ्या

अवंतिकाबाईंची याकामी निवड करण्यात आली. राणीसाहेबांच्या इंग्लंडच्या वास्तव्यात अवंतिकाबाईंची या कामी निवड करण्यात आली. राणीसाहेबांच्या इंग्लंडच्या वास्तव्यात इंग्लंडमधील अनेक इस्पितळे, बालवाड्या, संघटना व संस्थांना भेटी देऊन तेथील कार्यप्रणालीची माहिती, त्या कामाविषयीच्या अडचणी, व्यक्तीची काम करण्याची पद्धत समजावून घेऊन त्यावर सविस्तरपणे चर्चा करून त्याचा सखोल अभ्यास केला. या सर्व कामाशी धनिक व प्रतिष्ठीत कुटूबांतील स्त्रियांचा संबंध होता. ठराविक वर्गाने काम करावे असे नसून सर्व स्त्रियांना काम करताना त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले. त्यातून समाजाच्या दृष्टिकोनातून मूलतः बदल करण्याची गरज त्यांच्या लक्षात आली.[4]

**चंपारण्य सत्याग्रह :**

इ.स.१९१६ मध्ये अवंतिकाबाईच्या चंपारण्य सत्याग्रहातील कामगिरीने त्यांचे जीवनच पूर्ण बदलून गेले. राष्ट्राच्या स्वातंत्र्याइतकीच सामाजिक सुधारणा गांधीजींना महत्त्वाची वाटत होती. राजकीय स्वातंत्र्याची आकांक्षा हा सामान्य जनतेतील वाढत्या सामाजिक जाणिवेचा स्वाभाविक परिणाम होता. ही जागृती एकदा घडून आली की राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रावर तिचा प्रभाव पडल्याखेरीज राहणार नाही. सर्व सुधारणा चळवळी एकाचवेळी पुढे चालल्या पाहिजेत असे मत असणाऱ्या महात्मा गांधीजींची लखनौच्या काँग्रेस अधिवेशनात अवंतिकाबाई गोखलेंशी भेट झाली. भेटी अंती बिहारमधील अतिमागासलेल्या चंपारण्य भागात निळीची लागवड व शेतकऱ्यावर होणारा अन्याय याविषयी चर्चा झाली. बिहारमधील चंपारण्यासारख्या मागासलेल्या भागात इंग्रज निळीची लागवड करण्याची सक्ती लादत होते. शेतकऱ्याला हरघडीला जबाबदार धरून धमक्या देण्याबरोबर दंड करण्याची कृती होत होती. या अत्याचारी व

अन्यायी वागणुकीचा प्रकार शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी श्री. राजकुमार शुक्ला यांनी लखनौ काँग्रेसमध्ये महात्मा गांधीपर्यंत पोहोचविला.' या अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी महात्मा गांधींनी गुजरात व महाराष्ट्राच्या भागातून काही निवडक असे कार्येकर्ते शोधून काढले. त्या कार्यकर्त्यांनी बिहारमधील काही ठराविक गावामध्ये राहून तेथील असुविधा सहन करून गोऱ्या इंग्रजांच्या धमकीला न जुमानता शेतकरी वर्गात सुधारणा करणे अपेक्षित होते. अशा निवडक कार्यकर्त्यांमध्ये महात्मा गांधीजींच्या सांगण्यावरून सुशिक्षित गोखले दाम्पत्यांने सर्व सोयी सुविधायुक्त असलेल्या मुंबई शहराचा त्याग करून बिहारसारख्या चंपारण्य गावात राहणे पसंत केले. महात्मा गांधीजींना मनुष्याचे अंतःकरण ओळखण्याची एक विलक्षण शक्ती होती. या बळावर गांधीजींनी देशसेवेचे व्रत स्विकारता आपल्या वैभवशाली जीवनाचा त्याग करून जनसेवा करण्याच्या ध्येयाने झपाटलेल्या अवंतिकाबाई गोखलेची निवड केली. चंपारण्य सत्याग्रहात महाराष्ट्राच्या सत्याग्रही तुकडीत आनंदी वैशंपायन व अवंतिकाबाई गोखले या दोन महिला होत्या. गांधीजीं त्यांच्यासह चंपारण्यात पोहोचले. तेथील सामाजिक परिस्थितीची पाहणी केल्यानंतर अवंतिकाबाईंनी अज्ञान, निरक्षरता व आरोग्याची हानी याविरूद्ध लढा पुकारला. बिहारमध्ये फिरून महिलांना आरोग्याचे धडे दिले. मुलींच्या शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. बडहरवा गावी मुलींची शाळा काढली. या शाळेला पुरुषांबरोबर स्त्रियांनीही मोठा विरोध केला. त्यावर त्यांनी लिहिणे, वाचणे याविषयी विविध कार्यक्रम करून स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण करण्याचे विविध मार्ग अवलंबिले. स्वच्छता, प्रौढ शिक्षण याबद्दल हिमतीने लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. त्याच काळात त्यांनी महात्मा गांधीजींचे मराठी भाषेतील पहिले चरित्र लिहिण्यास सुरुवात केली. गांधीयुगाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्टाला गांधी जीवनाचा व विचारांना परिचय करून देणारे हे चरित्र लक्षणीय आहे. विशेष म्हणजे

लोकमान्य टिळकांची प्रस्तावना असलेले हे पुस्तक इ.स. १९१८ मध्ये प्रसिद्ध झाले. अवंतिकाबाईंचे मराठी भाषेबरोबरच इंग्रजी भाषेवरही प्रभुत्त्व होते. इ.स.१९१९ मध्ये नाशिकच्या सभेत लोकमान्य टिळकांसमोर त्यांनी अस्खलित इंग्रजीत त्यांनी जे भाषण केले त्यांने टिळक प्रभावित झाले. ते म्हणाले, महाराष्ट्राची सरोजनी आता तयार झाली आहे.[5]

इ.स. १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळीतून सत्याग्रहाची हाक महात्मा गांधीजींनी दिली. त्या अवंतिकाबाई गोखले, कमलादेवी चटोपाध्याय, हंसा मेहता, लिलावती मुन्शी, गंगाबाई पोशा नरवा, पेरिन कॅप्टन यांनी सत्याग्रहाचे नेतृत्त्व केले. जेव्हा गांधीजींना अटक करण्यात आली तेव्हा सरोजनी नायडूंच्या नेतृत्वाखाली बैठका आयोजित करण्यात आल्या. सत्याग्रहाची तीव्रता अधिक जोरदार करण्याचे सर्वानुमते ठरले. या सत्याग्रहात महिलांचा सहभाग मिळविण्यासाठी अवंतिकाबाईंनी हिंद महिला समाजाचे अध्यक्षपद सांभाळत सुत-कताईचे वर्ग सुरू केले. व्याख्याने, कीर्तने, प्रवचने, भजने यांचे आयोजन करून जनजागृती करण्याचा प्रयत्न अवंतिकाबाईंनी केला. त्याचा परिणाम होऊन स्त्रियास स्वतःहून असहकार व सत्याग्रह आंदोलनात भाग घेऊ लागल्या. प्रभातफेर्या, दारूबंदी, विदेश कापडाच्या होळ्या करण्यासाठी त्या पुढे सरसावल्या. “यात अवंतिकाबाईंचा वाटा लक्षणीय होता. त्यामुळे त्यांची प्रशंसा होऊ लागली अवंतिकाबाई स्वातंत्र्य लढ्याचा एक अविभाज्य अंग बनल्या. २१ जून १९३० रोजी आझाद मैदानावरील मोतीलाल नेहरूंच्या भाषणास कोणी एकत्र जमू नये म्हणून पोलिसांनी लाटीमार केला. अवंतिकाबाईंनी, 'आम्ही घरी जाण्यासाठी आलो नाही. तुम्ही शिक्षा केली तरी येथेच राहू.' असे कमिशनरला ठामपणे उत्तर दिले.

अवंतिकाबाईंना सक्रिय राजकारण करण्यास मनाई केली. तेव्हा हिंद महिला समाजमार्फत विधायक कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केले. अवंतिकाबाईंनी त्यांच्या स्वभावानुसार इ.स. १९३७ च्या प्रांतिक स्वातंत्र्यांच्या होणाऱ्या निवडणुकीस नकार दिला. सन १९४६ च्या चले जाव चळवळीत त्यांना भाग घेता आला नाही. कारण त्यांना कर्करोगाने ग्रासले होते. त्याचवेळी महात्मा गांधीजींची हत्या झाल्याने तो आघात त्यांना सहन न होऊन त्यानंतर अवघ्या सव्वा वर्षातच म्हणजे २६ मार्च १९४९ रोजी मुंबईच्या राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली. [6]

स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या अनेकांनी राजकारण बरोबर सामाजिक कार्याला देखील तितकेच महत्त्व दिले असे दिसून येते. अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकात आवर्जुन उल्लेखनिय कार्य करणाऱ्यापैकी अवंतिकाबाई गोखले यांचे उत्कृष्ठ संघटन कौशल्य, सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून ते देश विदेशातील विविध पदावर काम करणाऱ्या व्यक्तींशी सातत्यपूर्ण संवाद आणि स्नेहभाव, धडाडी, दुरदृष्टी, कोणत्याही संकटाचा सामना न डगमगता धीरोदत्तपणे करण्याची वृत्ती, काळानुरूप बदल करत सतत नवीन तंत्रज्ञान व कौशल्य समजावून घेण्याची वृत्ती, राष्ट्रीय एकात्मतेसाठी सातत्याने धडपड, कोणत्याही बाबतीत स्वत:ला झोकून देऊन अखंडपणे विधायक काम करण्याची प्रवृत्ती, नियोजनबद्ध काम अशा अनेक गुणांच्या समुच्चय असलेल्या अनेक भारतीय लढ्यात एक स्वातंत्र्य सेनानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अवंतिकाबाईंचे देशासाठी समर्पित केलेले योगदान म्हणजे आजच्या काळात पुरुष महिला वर्गाला मार्गदर्शन लाजवेल असे कार्य केले होते.[7]

**सारांश:**

स्वातंत्र्य चळवळीत अनेकांचा सहभाग होता. महात्मा गांधीजींच्या व्यक्तीमत्त्वामुळे समाजाच्या सर्व थरातून वाढता पाठिंबा

मिळत होता. अशा वेळी अवंतिकाबाईंनी आपले कर्तृत्व व नेतृत्व सिद्ध केले. महात्मा गांधीनीही त्याच्यातील गुण वैशिष्ट्ये ओळखली आणि त्यातून एक ध्येयनिष्ठ, कर्तृत्व संपन्न, धडाडीचे दूरदृष्टी असणारे आणि स्नेहभावांनी युक्त नेतृत्व उभे राहिले. अशा नेतृत्वामुळेच भारतीय स्वातंत्र्य लढा हा जगात प्रभावीपणे उठून दिसतो. पुढे भविष्यात वर्षानुवर्षे तो प्रेरणादायी ठरतो.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. डॉ.जे.सी.उपाध्याय, आधुनिक भारत का इतिहास, लक्ष्मीनारायण पब्लिकेशन, आग्रा, २००१ पृ. १३९

२. मदन मार्डीकर, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २००८ पृ.३५

३. मोदी नवाझ ब.(संपादक) वासंती फडके (अनुवादक) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया प्रथम आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, २००३. पृष्ठ क्र. १५७

४. नरवणे द.ना. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, सत्याग्रह, विश्वकोश, खंड १, पृष्ठ क्रं. ६६१

५. गवाणकर रोहिणी, गांधीजींची पट्टशिष्या अवंतिकाबाई गोखले, लोकसत्ता (चतुरंग), ऑगस्ट ३, २०१३ पृष्ठ क्रं. १

६. शिखरे द.ना. (संपादक), महात्मा गांधी संकलित वाडमय खंड १३, (जाने १९१५- १९१७) संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र विभाग, मुंबई, पृष्ठ क्रं. ५९९

७. फडके य.दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४, श्री विद्या प्रकाशन पुणे, १९९३, पृष्ठ क्रं. ५९


***

# जळगाव व नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. विशाल शिवाजीराव करपे**

**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय विसरवाडी.**

**आरती प्रकाश सोनटक्के**

**पीएच्. डी. संशोधिका विध्यार्थिनी.**

**गोषवारा :**

आर्थिक विकास म्हणजे केवळ देशातील उपलब्ध भौतिक आणि वित्तीय साधनसामुग्रीचा कार्यक्षम वापर करून राष्ट्रीय उत्पन्न वाढ करणे असा होत नाही, तर या बरोबर देशातील मानवी भांडवलाचा दर्जा विकसित करून भौतिक व वित्तीय साधनसामग्री जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करणे व दारिद्र्य निर्मूलन करून लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे आवश्यक असते. त्यामुळे अलीकडील काळात आर्थिक विकासाला पुरक म्हणून मानव विकास या संकल्पना बहुचर्चित झाल्या आहेत. मानवाची कार्यक्षमता वाढविणाऱ्या घटकांवर मानव विकास अवलंबून असतो. विशेषत: मानवीय भांडवलाच्या विकासावरील खर्च म्हणजे शिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार इत्यादी घटकांवर केलेला खर्च होय. मानवी भांडवलाचा मुख्य उद्देश मनुष्यबळाचा विकास करणे हा असतो. त्यातून मानवाच्या कार्यक्षमतेच विकास घडून येतो.

१९९० च्यामानव विकास अहवालानुसार "एखाद्या देशातील सर्वसामान्य लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघात व सामूहिक निर्णय प्रक्रियेतील सहभागात वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय."मानव विकास निर्देशांकात अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच शिक्षण, आरोग्य, आणि उपजीविकेचे साधन या सर्वसामान्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या बाबींचा समावेश आहे. आणि या बाबींची पूर्तता करण्यासाठी सर्व स्तरावर केलेले प्रयत्न त्यातून निर्माण झालेले शिक्षीत व प्रशिक्षित मानव म्हणजेच मानव विकास अर्थात मानवी भांडवल होय. थोडक्यात यावरून मानवी विकासात संधीच्या निवडीचे स्वातंत्र्य आणि अनेक पर्याय उपलब्ध असावे लागतात. त्यासाठी स्वातंत्र्य, समता, सबलीकरण, शाश्वती हे घटक आवश्यक असतात.

**प्रस्तावना:**

मानव विकास हि विकासाची व्यापक संकल्पना असून, ती राष्ट्रीय उत्पन्नाच्या चढ-उताराच्या ही पलीकडे जाते. ही संकल्पना पोषक वातावरण निर्मिती बाबत अशी आहे की, ज्यामध्ये व्यक्तींना त्यांचे पूर्ण क्षमता विकसित करता येतील व त्यामुळे त्यांच्या गरजा व रुची यांचा मेळ राखत सर्जनशील व फलदायी आयुष्य जगता येऊ शकते. मानवाची कार्यक्षमता वाढविणाऱ्या घटकांवर मानव विकास अवलंबून असतो. विशेषत: मानवीय भांडवलाच्या विकासावरील खर्च म्हणजे शिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार इत्यादी घटकांवर केलेला खर्च होय. मानव विकास हि बदलती संकल्पना आहे. लोकांचे पर्याय निवडीच्या जेवढे संधी आहेत तितके मानव विकासाचे पैलू आहेत. मानव विकासाशी निगडित महत्त्वाचे घटक कालानुरूप तयार होतात. देशातील मानवी भांडवलाचा दर्जा विकसित करून भौतिक व वित्तीय साधनसामग्री जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करणे व दारिद्र्य

निर्मूलन करून लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे आवश्यक असते. जोपर्यंत विकासाचे लाभ थेटपणे गरीब,स्त्रिया व इतर दुर्लक्षित समाजास मिळतात. प्रस्तुत संशोधन लेखात महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक व त्या अनुषंगाने  जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील मानव विकास संबंधित निर्देशांकाचा अभ्यास केला असून त्यात जळगाव व नंदुरबार जिल्ह्याच्या  तुलनात्मक अध्ययनाच्या माध्यमातून तथ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. महाराष्ट्रातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांकाचा अभ्यास करणे.
२. जळगाव व नंदूरबार जिल्ह्यातील तालुकानिहाय मानव विकास निर्देशांकाचा अभ्यास करणे.
३. जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील मानव विकासासंदर्भात उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची परिकल्पना :-**

१. महाराष्ट्रातील जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांकात तफावत आहे.
२. जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानिहाय मानव विकास निर्देशांकात तफावत आहे.
३. जळगाव जिल्ह्यापेक्षा नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी आहे.

**संशोधन कार्यपद्धती :-**

प्रस्तुत संशोधनाचा विषय, 'जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास' असा असून या

लेखाकरिता दुय्यम सामुग्रीचा आधार घेण्यात आला असून संशोधनाचा कालावधी हा २००५ ते २०२० या दरम्याचा निश्चित करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून जागतिक मानव विकास अहवाल, भारताचा मानव विकास अहवाल, महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, केंद्र व राज्य सरकार मार्फत स्थापन केलेल्या विविध समित्यांचे अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा परिषद अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, विविध संशोधन शोध निबंध, संशोधन प्रबंध व विविध संकेत स्थळांच्याद्वारे प्राप्त दुय्यम तथ्याच्या आधारे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, प्रतिशत तालिका, यांचा वापर केला आहे.

**मानव विकासात खालील बाबींचा समावेश होतो.**

१) सामाजिक प्रगती- ज्ञानार्जन, चांगले पोषण आणि आरोग्य सेवा यांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता.

२) आर्थिक- असमतोल कमी करण्यासाठी आणि मानवी विकासाचे स्तर उंचावण्यासाठी आर्थिक वाढीचे महत्व.

३) कार्यक्षमता- संसाधनाचा वापर उपलब्धता या स्वरूपात.

४) सहभाग व स्वातंत्र- नागरी व ग्रामीण, स्त्री -पुरुष, वय, धर्म, वंश, वाढ, भौतिक व मानसिक घटक इत्यादींनुसार असलेल्या गटाकरिता सक्षमीकरण, लोकाभिमुख प्रशासन, स्त्री- पुरुष समानता, नागरी व राजकीय हक्क, संस्कृतीक स्वातंत्र.

५)सातत्य- भावी पिढीसाठी पर्यावरण, आर्थिक व सामाजिक स्वरूपात असतात.

६) मानवी सुरक्षितता- उपासमार आणि बेकारी, दुष्काळ, धुफळी इत्यादी सारख्या आकस्मिक रित्या दररोज जीवनात येणाऱ्या अडथळया पासून संरक्षण.

मानव विकास निर्देशांक हे आयुर्मान ,ज्ञान आणि राहणीमान यांचे सर्वसाधारणपणे केलेले मोजमाप आहे. जरी, हा निर्देशांक मानव विकास या संकल्पनेला सोपे करण्याचा प्रयत्न करीत असला तरी इतर निर्देशांक अथवा निर्देशकांच्या गटापेक्षा जास्त गुंतागुंतीचा आहे.

**भारतातील मानव विकास निर्देशांक:**

भारत सरकारने २००१ मध्ये पहिला अहवाल 'राष्ट्रीय मानव विकास अहवाल' प्रसिद्ध केला. या मालिकेतील दुसरा अहवाल 'भारत मानव विकास अहवाल' २०११ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यात यशस्वी ठरणारे, आर्थिक वाढीसाठी मानवरूपी भांडवल आणि मानवी कार्यशक्तीत वाढ या महत्त्वाच्या गरजा असल्याचे तर्क भारत मानव विकास अहवाल मांडले आहेत. मानव विकास निर्देशांक परिगणित करण्यासाठी जागतिक मानव विकास अहवाल २०१० व भारत मानव विकास अहवाल २०११ मध्ये वापरलेले निर्देशक पुढील तकत्यामध्ये मध्ये दिलेल आहे.

तक्ता क्रं.१

| विविध मानव विकास अहवालामध्ये वापरलेले निर्देशांक | | | |
|---|---|---|---|
| **निर्देशक** | **जागतिक मानव विकास अहवाला २०११** | **भारत मानव विकास अहवाला २०१०** | **राज्य मानव विकास अहवाला २००२** |
| आरोग्य | जन्मा वेळीचे अपेक्षित आयुर्मान | जन्मा वेळीचे अपेक्षित आयुर्मान | अर्भक मृत्यु दाराच्या स्वरूपात आयुर्मान |

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षण | शिक्षणाची सरासरी वर्ष शिक्षणाचे अपेक्षित वर्ष | साक्षरता दर(७ वर्ष व अधिक) समयोजित शिक्षणाची सरासरी वर्ष | साक्षरता दर व शिक्षणाची सरासरी वार्ष यानुसार ज्ञानार्जन. |
| दरडोई उत्पन्न | दरडोई राष्ट्रीय स्थूल उत्पन्न (USA Dollar) | असमानतेच्या अनुषंगाने समयोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबीवरील वास्तव खर्च | दरडोई जिल्हा उत्पन्नानुसार आर्थिक साध्यता |

मानव विकास परिगणित करण्यासाठी वापरलेले मोजमापाचे मानक वरील तक्त्यामध्ये दर्शविले आहे. १९९९-२००० ते २००७-२००८ या कालावधीत भारताच्या विकास निर्देशांका मध्ये २१ टक्क्यांनी तर राज्याच्या मानव विकास निर्देशांकामध्ये १४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मानव विकास निर्देशांकात झालेल्या सुधारणांमध्ये शिक्षण निर्देशांक हा महत्त्वाचा घटक असून या कालावधीत त्यात झालेल्या वाढीमुळे ही वाढ दिसून येते. राज्याच्या आरोग्य निर्देशांकात ०.६०१ वरून ०.६५० इतकी वाढ, उत्पन्न निर्देशांकात ०.२९७ वरून ०.३५१ तर शिक्षण निर्देशांकात ०.६०६ वरून ०.७१५ इतकी झाली आहे. हा अहवाल केवळ आंतर राजीय खुशाली निर्देशांकाच्या प्रगतीमधील असमानतेवर केंद्रित नसून, देशातील जाती व सामाजिक गट यामधील असमानते वरही प्रकाश टाकतो. भारत मानव विकास अहवाल २०११ प्रमाणे देशात केरळ पहिल्या क्रमांकावर असून त्याखालोखाल दिल्ली, गोवा, पंजाब, महाराष्ट्राचा क्रमांक आहे. देशातील निवडक राज्याचे मानव विकास निर्देशांक खलील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहेत.

| भारतातील काही निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्य | १९९१ | | २००१ | | २०११ | |
| | मा.न.वि.न. | क्रमांक | मा.न.वि.न. | क्रमांक | मा.न.वि.न. | क्रमांक |
| केरळ | ०.५९१ | १ | ०.६७७ | १ | ०.७९० | १ |
| पंजाब | ०.४७५ | २ | ०.५४३ | ४ | ०.६०५ | ४ |
| तमिळनाडू | ०.४६६ | ३ | ०.४८० | ७ | ०.५७० | ६ |
| **महाराष्ट्र** | **०.४५२** | **४** | **०.५०१** | **५** | **०.५७२** | **५** |
| आंध्रप्रदेश | ०.३७७ | ९ | ०.३६८ | १२ | ०४७३ | ११ |
| उत्तरप्रदेश | ०.३१४ | १४ | ०.३१६ | १४ | ०.३८० | १४ |
| बिहार | ०.३०८ | १५ | ०.२९२ | १५ | ०.३६७ | १७ |

देशातील मानवी विकासाच्या संदर्भातील राज्याचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, महाराष्ट्र राज्य हे १९९१ च्या मानव विकास निर्देशांकानुसार ४ क्रमांकावर होते मात्र, २००१ आणि २०११ च्या मानवी विकास निर्देशांकानुसार त्याचा ५ वा क्रमांक वर पोहोचलेले आहे. म्हणजेच त्यात घट झाली आहे असा निष्कर्ष निघतो. मात्र मानव विकास मूल्यात वाढ झाल्याचे दिसून येते मानव विकास मुल्ये ०.४५२ वरून ०.५७२ वर पोहोचलेले आहे .तिन्ही दशकामध्ये केरळ राज्याचा मानव विकासात प्रथम क्रमांक लागतो हे विशेष आहे. सर्वात कमी बिहार राज्याचा १७ क्रमांक लागतो आहे .

**महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक:**

महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये आपला पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल तयार करण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोग यूएनडीपी व महाराष्ट्र शासनाच्या तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. या अहवालात महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक काढण्यात आले. तसेच या २०११ च्या अहवालानुसार महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ एवढा होता. या अहवालामध्ये मानव विकास निर्देशांकाचे चार स्तरांमध्ये वर्गीकरण केले. ते म्हणजे अति उच्च, उच्च, मध्यम व निम्न मानव विकास निर्देशांक या स्तरांमध्ये वर्गीकरण केले. मानवी विकासाच्या आधारित या वर्गीकरणा नुसार अतिउच्च मानवी विकासाची पातळी असणाऱ्या

जिल्ह्यामध्ये फक्त १० जिल्ह्यांचा समावेश होतो. तर उच्च मानवी विकास पातळी असणाऱ्या निर्देशांकामध्ये ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. तसेच मध्यम मानवी विकास  पातळी असणाऱ्या निर्देशांकामध्ये एकूण ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. व निम्न मानव विकास पातळी असणाऱ्या निर्देशांकामध्ये एकूण ९ जिल्ह्यांचा समावेश होतो. महाराष्ट्र मध्ये सर्वात उच्च पातळीवर मुंबई व मुंबई उपनगर या जिल्ह्याचा समावेश होतो. तर सर्वात निम्न पातळीवर नंदुरबार या जिल्ह्याचा समावेश होतो. २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाने मानव विकास अहवालामध्ये जिल्ह्याचा मानव विकासाचा स्थितीचा अभ्यास करण्यासाठी किंवा जिल्हास्तरावर मानवी विकासाचे मोजमाप करण्यासाठी शिक्षण, आयुर्मान व दरडोई उत्पन्न या तीन घटकांच्या सहाय्याने मानव विकास निर्देशांकाची मोजमाप करण्याचे निश्चित केले आहे.

**मानव विकास आणि जळगाव जिल्हा:**

जळगाव जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र २०११ च्या जनगणनेनुसार  ११ हजार ७६५ चौ. कि.मी आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ३.११ टक्के क्षेत्र व्यापलेल्या या जिल्ह्याचा राज्याचे एकूण क्षेत्रफळाचा विचार करता ९ वा क्रमांक लागतो.

जळगाव जिल्ह्यातील मानव विकासाची स्थितीचे वर्णन महाराष्ट्र मानव विकास अहवालात करण्यात आले आहे . २००२ मध्ये महाराष्ट्र शासनाने नियोजन आयोगाच्या सहकार्याने पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला. त्या मानव विकास अहवालानुसार ३५ जिल्ह्याचा क्रमवारीत जळगाव जिल्हा १९ व्या क्रमांकावर असून जळगाव जिल्ह्याचा २००१ नुसार  मानव विकास निर्देशांक ०.६२४ असून तो मध्यम मानव विकास निर्देशांकात मोडतो. पण २०११ नुसार मानव विकास निर्देशांकाच्या अहवालानुसार ३५ जिल्ह्यांपैकी जळगाव जिल्ह्याचा १५ वा क्रमांक असून,  त्याचा मानव विकास निर्देशांक ०.७२३  एवढा आहे. आणि तो उच्च मानवी विकासात मोडतो. या निर्देशांका वरून असे लक्षात येते की, जळगाव जिल्हा २००१ मध्ये मध्यम मानव विकास गटात मोडत होता, पण मागील  दहा वर्षांमध्ये केलेल्या प्रयत्ना मुळे त्यात वाढ होऊन तो २०११ मध्ये उच्च मानव विकास गटात समावेश झाला.

**जळगाव जिल्ह्याची लोकसंख्या**:

जळगाव जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २०११ नुसार ४२ लाख २९ हजार ९१७ एवढी आहे. एकूण लोकसंख्येपैकी नागरी क्षेत्रातील १३.४२ लाख लोक राहतात व ६८.२६ टक्के ग्रामीण भागात राहतात. लोकसंख्येच्या दृष्टीने जिल्ह्याचा जनगणना २०११ नु सार ८ क्रमांक लागतो. एकूण लोकसंख्येपैकी ३१.९७ लाख पुरुष व २०.३२ लाख स्त्रिया आहेत.

**जळगाव जिल्ह्याचे साक्षरता प्रमाण**:

२०११ नुसार जळगाव जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ७८.२० टक्के आहे. ग्रामीण भागात ७४.७६ टक्के आहे. व नागरी भागात ८५.३६ टक्के आहे. हे एकूण लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण आहे. जिल्ह्यातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण २५.२५ टक्के व स्त्रियांचे प्रमाण ७०.५६ आहे.

**मानव विकास आणि नंदुरबार जिल्हा:**

नंदुरबार जिल्हा आर्थिक दृष्ट्या आदिवासी व मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. नंदुरबार जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र २०११ च्या जनगणनेनुसार ५९५५ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापलेले आहे. राज्याचे एकूण क्षेत्रापैकी १.५ टक्के क्षेत्र व्यापलेल्या या जिल्ह्याचा राज्याचा एकूण क्षेत्रफळाचा विचार करता ३१ वा क्रमांक लागतो.

**नंदुरबार जिल्ह्याची लोकसंख्या**:

नंदुरबार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २०११ नुसार १६ लाख ४८ हजार २९५ एवढी आहे. एकूण लोकसंख्येपैकी नागरी क्षेत्रातील २ लाख ७५ हजार ४७४ वास्तव्य आहेत. व १३ लाख ७२ हजार ८२१ ग्रामीण भागात वास्तव्यास आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने जिल्ह्याचा जनगणना २०११ नुसार व क्रमांक लागतो. या जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी ८ लाख ३३ हजार १७० पुरुष व ८ लाख १५ हजार १२५ स्त्रिया आहेत. या जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९.२८ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे नंदुरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. राज्याच्या एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येपैकी १०.८६ टक्के लोकसंख्या नंदुरबार जिल्ह्यात

असून अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येबाबत नंदुरबार जिल्हा हा राज्यात ३ क्रमांकावर आहे.

**नंदुरबार जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण**:

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९७८ असून ग्रामीण भागासाठी व नागरी भागासाठी हे प्रमाण अनुक्रमे ९९६ व ८९३ आहे.

**नंदुरबार जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण**:

नंदुरबार जिल्ह्याच्या साक्षरतेच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असून, २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ६४.३८ टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात ५९.७५ टक्के आहे तर, नागरी भागात ८६.६० टक्के आहे तसेच, स्त्री व पुरुष साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७२.१७ व ५६.४७ टक्के आहे.

२००२ मध्ये महाराष्ट्र शासनाने नियोजन आयोगाच्या सहकार्याने आपला पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला. त्यात मानव विकास अहवाल २००१ नुसार ३५ जिल्ह्यांच्या क्रमवारीत नंदुरबार जिल्हाचा ३५ वा क्रमांक असून, नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक ०.५१३ असून तो सर्वात निम्न पातळीवर असून तो निम्न मानव विकास गटात मोडतो. तसेच २०११ च्या मानव विकास निर्देशांकाच्या अहवालानुसार नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक हा ०.६०४ एवढा असून ३५ जिल्ह्यांपैकी नंदुरबार जिल्ह्याचा ३५ वा क्रमांक लागतो . त्याचा समावेश पुन्हा निम्न मानव विकास गटातच केलेला आहे. गेल्या दहा वर्षात या जिल्ह्याची प्रगती झाली नाही, म्हणून तो निम्न मानव विकास निर्देशांक या गटातच राहिलेला आहे.

**निष्कर्ष :-**

नंदुरबार जिल्ह्याचे साक्षरता प्रमाण हे जळगाव जिल्हयापेक्षा कमी आहे. पण नंदुरबार जिल्ह्याच्या साक्षरतेच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असून २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ६४.३८ टक्के पर्यंत पोहचले आहे .

नंदुरबार जिल्ह्याचे आयुर्मान हे जळगाव जिल्हयापेक्षा कमी आहे. पण नंदुरबार जिल्ह्याच्या आयुर्मानात सातत्याने वाढ होत आहे.

जळगाव जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न हे नंदुरबार जिल्हयाच्या दरडोई उत्पन्ना पेक्षा जास्त आहे. जळगाव जिल्हा हा औद्योगिक दृष्ट्या पुढारलेलेला आहे. त्यामुळे जळगाव जिल्ह्याची राहणीमान पातळी नंदुरबार जिल्यापेक्षा तुलनेने जास्त आहे.

देशातील मानवी विकासाच्या संदर्भातील राज्याचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, महाराष्ट्र राज्य हे १९९१ च्या मानव विकास निर्देशांकानुसार चौथ्या क्रमांकावर होते. मात्र २००१ आणि २०११ च्या मानवी विकास निर्देशांकानुसार त्याचा क्रमांक घसरून पाचवा झाला. म्हणजेच त्यात घट झाली आहे असा निष्कर्ष निघतो. मात्र मानव विकास निर्देशांकच्या मूल्यात वाढ झाल्याचे दिसून येते. मानव विकास मूल्य ०.४५२ वरून ०.५७२ वर पोहोचलेले आहे.

देशात राज्यांतीला मानवी विकासाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते.

जळगाव व नंदुरबार या जिल्ह्यात मानवी विकासाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते

**संदर्भ साहित्य :**


१. Datta, Sundaram K.P.M. : “Indian Economy ”,(S.Chand & Company Ltd.New Delhi .)

२. UNDP (1997,1998):"The Concept of Human Poverty ",Human Development Report ,(New York : Oxford University Press)

३. महाराष्ट्र शासन (२००२) : "मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२", मुंबई नियोजन विभाग ,महाराष्ट्र शासन पृ. क्र.११७ ते ११९

४. महाराष्ट्र शासन (२०२०) : "जिल्हा व सामाजिक आर्थिक समालोचन ,२०२०जळगाव",(मुंबई:अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन),पृ. क्र.१०

५. महाराष्ट्र शासन (२०२०):"जिल्हा व सामाजिक आर्थिक समालोचन,२०२० नंदूरबार",(मुंबई:अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन),पृ. क्र.१६

६. अमोल लक्ष्मण खोडके :"भारतातील मानव संसाधन विकास- १" (प्रकाशक: युनिक अकॅडमी),आवृत्ती पहिली एप्रिल-२०१३

७. महाराष्ट्र शासन (२०१२) : "मानव विकास अहवाल महाराष्ट्र २०१२", मुंबई नियोजन विभाग ,महाराष्ट्र शासन
८. तुकाराम, जाधव (२०१३) :- २१ व्या शतकातील साक्षरता संपादक युनिक बुलेटिन दिवाळी अंक नोवेंबर २०१३ अंक ६
९. नाळे आर.के: "महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक स्वरूप व सद्यस्थिती", (अर्थसंवाद खंडाळा ३८ एप्रिल-जून २०१४)
१०. चव्हाण एन. एल.:- “भारतीय अर्थव्यवस्था”-१,१९८०पासून, प्रशांत पब्लिकेशन जळगाव

***

# भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क


## प्रा. डॉ. कऱ्हाळे विलास लिंबाजी

राज्यशास्त्र विभाग, नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ. बाळापूर ता. कळमनूरी जि. हिंगोली.


**प्रस्तावना**

आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतवर्ष महोत्सवी साजरा करत आहोत. भारतीय राजकारणात व समाजकारणात या 75 वर्षात काय व कोणकोणते बदल झाले. यावर विचार करणे आगत्याचे ठरते. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला आणि आज जगातील सर्वात मोठी लोकशाही शासन व्यवस्था म्हणून भारताची ओळख निर्माण झाली. स्वातंत्र्यपुर्व कालखंडात भारतात हूकुमशाही मानसिकतेची शासनव्यवस्था राज्य करत होती. या सरकारने भारतातील मानसांना मानुस म्हणून जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे मानवी हक्क नाकारले होते. त्यामुळे भारतातील नागरीकांना मरणयातना सहन कराव्या लागल्या होत्या. या सर्वांचा परिणाम म्हणून भारतातील प्रत्येक स्तरातील लोकांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात सहभाग घेतला वेळप्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. साहाजिकच स्वातंत्र्यानंतर भारतीय माणसाच्या मनात एका उज्वल, स्वातंत्र्य भारताचे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारताने लोकप्रशासनवादी, लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला व प्रत्येक नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांची सर्वांगिन प्रगती होण्यासाठी मानवी हक्क बहाल केले एवढेच नव्हेतर त्यांना घटनेचे कवच प्रदान केले.

मानवी हक्काबाबत, भारतीय लोकशाही बाबत वास्तवाचा विचार करणे आवश्यक आहे. लोकशाही मानवी हक्कांचा समावेश असलेली अल्पसंख्यांकाप्रति न्याय प्रस्थापित करणे

अपेक्षित असते. मानवी हक्काशिवाय लोकशाहीला काहीच अर्थ असू शकत नाही. समता, स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य आणि इतर सर्व मानवी हक्कातील घटक जे वास्तविक अर्थाने लोकशाही समाज निर्माण कारणीभूत होतात. केवळ मानवी हक्काची जाणीव असून फायदा होत नसतो. त्या मुल्यांची जोपासना करून ती वृंध्दीगत करण्यासाठी शासनाची शासन प्रणित संस्थाशी संघर्ष करण्याची तयारी असावी लागते. भारतात लोकशाही ही एक शासनप्रणाली नसून ती लोकांसाठी जीवन पध्दती असल्याचे दिसून ती कारण, भारतात घरगूती निर्णय सुध्दा लोकशाही पध्दतीने घेतले जातात. मानवी हक्काप्रत जाणिवा वृध्दिंगत करणारी समुहभावना जागृत होऊन स्वतंत्रपणे अन्याय व अत्याचाराच्या विरोधात लढा देतात हा भारतीय लोकशाही समाजाचा महत्वाचा गुण आहे. जयप्रकाश नारायण यांच्या मते लोकांना त्यांच्या हक्काविषयी जाणिव असलेल्या लोकशाहीचा अविष्कार हाच भारतीय लोकशाहीच्या यशाचे गमक आहे. भारतीय लोकशाहीत मूल्य व मानवी हक्क यात फारसा फरक नसून मानवतावादाचे प्रत्यक्षातील स्वरूप हेच भारतीय लोकशाहीचे वैशिष्टये आहे.

भारताने आपल्या राज्यघटनेत काही मुलभूत अधिकाराचा समावेश करून मानवी अधिकाराचे समर्थन करून त्यांना घटनात्मक संरक्षण दिले. एक लोकशाहीप्रधान व प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचे मानवी हक्कांबाबतचे उत्तरदायित्व व भूमिका महत्वाची असल्याची आठवते. भारतीय घटनाकारांनी घटना निर्मितीच्या वेळी नागरिकांच्या मुलभूत अधिकाराचा समावेश त्यात केला. ज्यास प्रामुख्याने भाषण व व्यक्तीस्वातंत्र्य कायद्यांसमोरची समानता अल्पसंख्यांकाच्या अधिकाराचे सरंक्षण या बाबीचा समावेश होतो. भारतीय संविधानाची उद्‌देश पत्रिका ही राज्यघटनेचा आत्मा आहे. या उद्‌देशपत्रिकेत मानवी हक्काचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. भारतातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकिय न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा व

राष्ट्राची एकता आणि अखंडता यांचे आश्वासन देणारी बंधुता देण्याचा घटनाकारांनी प्रयत्नपूर्वक संकल्प केल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेत सामाजिक व आर्थिक न्यायाच्या स्थापनेसाठी राज्यघटनेत मार्गदर्शक तत्वाचा समावेश करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या प्रकरणात कलम 38 ते 51 मध्ये राज्यांच्या मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख करण्यात आला. मार्गदर्शक तत्वाचे वर्गीकरण सामाजिक तत्वे, राजकीय तत्वे आर्थिक तत्वे न्यायविषयक तत्वे आणि परराष्ट्रविषयक तत्वे असे करण्यात आले आहे. न्या.छागला म्हणतात मार्गदर्शक तत्वाचे पूर्णपणे पालन केल्यास भारत हा देश पृथ्वीवरील स्वर्ग होईल. यात तथ्य वाटते.

आज भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेच्या मुल्यांकनाचा प्रश्न अनेक वेळा चर्चीला जातो. जगातील सर्वात मोठी लोकशाही शासन व्यवस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशात मुलभूत हक्कांची परिस्थिती काय आहे. आजही भारतातील आदिवासी समाजातील काही घटक हे मुलभूत हक्कापासून वंचीत असल्याचे दिसून येतात. दारिद्रय ही आदिवासी समाजातील सर्वात मोठी गंभीर समस्या आहे. वाढत्या जागतिकीकरणामुळे त्याची नैसर्गिक उपजिवीकेची साधने नष्ट झाल्याने त्याच्या वाटयाला गरिबी आली असून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या जीवनावश्यक गरजा सुध्दा ते पूर्ण करू शकत नाहीत. 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासी समाजाच्या साक्षरतेचे प्रमाण 58.96 टक्के ऐवढेच आहे. यावरून इतर समाजापेक्षा त्यांच्यात विकासाला अडचन निर्माण होत आहे. आदिवासी सोबतच दलीत समाजाची आवस्था ही लोकशाही शासन व्यवस्थेला लाजीरवाणीपणाची दिसून येते. आजही दलीतवस्तीमध्ये अनेक मुलभूत प्रश्न आ! वासून उभे आहेत. ते सोडविण्यात लोकशाही शासनाला अपयश आले आहे. आजही दलीतावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. खैरलांजी, भिमा कोरेगाव या सारख्या घटना घडत आहेत. जातीयता आज जरी कायद्याने नष्ट झाली असली तरी मनामनात ती आजही घर करून आहे. सामाजिक विषमते

बरोबरच आज आर्थिक विषमताही पराकोटीला पोहचली आहे. आज भारतात गरीब आणि श्रीमंत या मधील दरी दिवसेदिवस वाढत चालली आहे. गरीब अधिक गरीब तर श्रीमंत आधिक श्रीमंत होत चालला आहे. यातून बेकारीचा प्रश्न निर्माण झाला. कामगारांचा प्रश्न निर्माण झाला. या दोन्ही वर्गाला त्यांच्या कामाच्या व चांगले जिवन जगण्याच्या मुलभूत हक्कापासून वंचित ठेवण्याचा हा प्रश्न आज लोकशाही पुढे निर्माण झाला. यातूनच ग्रामीण जंगली भागातील नक्षलवादाबरोबरच शहरी भागातही नक्षलवाद्यांच्या कार्यवाहया सुरू झाल्या. अनेक नवतरूण या चळवळीकडे वळू लागली ती ही या शासन व्यवस्थेला कंटाळून. 'आहिरे आणि नाहिरे' वर्गातील दरी वाढत जाने समन्वयापेक्षा संघर्ष वाढत जाने. सामाजिक न्यायापेक्षा अन्याय दिसू लागणे हे लोकशाहीसाठी चांगले लक्षण नाही. लोकशाहीत समतेची दिशा ग्रहीत असते. समतेचा अर्थ सर्वांना समान वागवणे हा नव्हे तर समता प्रस्थापीत करणे हा असतो. आज नागरी अधिकार, नैसर्गिक अधिकार, राजकिय अधिकारांचा संकोच केला जात आहे. सर्व व्यवस्थांचे सर्व स्वायत्त संस्थांनचे राजकीयकरण मोठया प्रमाणात होत आहे. माध्यमे, सोसियल मिडीया लोकशाहीला मारक ठरणाऱ्या भूमिका घेतांना दिसतो. यामुळे सर्वसामान्य लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडत चालला आहे. लोकांचा लोकशाहीवरील विश्वास अटळ ठेवण्याची जबाबदारी शासनातील लोकांवर आहे. त्यासाठी व्यक्तीला एक मानव म्हणून चांगले, समृध्दजीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व मुलभूत हक्क कोणत्याही विलंबाशिवाय त्यांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या ठिकाणी महात्मा गांधीने लोकशाही संबंधी व्यक्त केलेले विचार समर्पक आहेत ते म्हणतात. ''धोक्यापासून अलिप्त कोणतीच मानवी संस्था नाही. जीतकी संस्था मोठी तेवढा दुरूपयोग होण्याची संभवता जास्त. लोकशाही ही फार मोठी संस्था आहे. म्हणून तिचा अधिकाधिक दुरूपयोग होण्याची शक्यता आहे. पण म्हणून लोकशाही टाळणे हा त्यावरचा उपाय नसून तिचा दुरूपयोग होण्याची संभाव्यता कमीत कमी करणे हा आहे.''

**संदर्भः–**


१. डॉ.जि.पी.नेमा, डॉ. के.के.शर्मा, मानवाधिकार सिध्दांत व व्यवहार.

२. जाधव तुकाराम, महेश शिरपूरकर, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया.

३. देशमुख अल्का, भारतीय लोकशाही प्रक्रिया

४. डॉ. सोलापूरे राजेश, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया.


***

# भारतीय लोकशाही : संधी आणि आव्हाणे

**डॉ. जयराम ढवळे**
राज्यशास्त्र विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई
जि. बीड.

**प्रस्तावना :**

भारत स्वतंत्र झाल्यापासून गेली ७५ वर्ष आपली लोकशाही सर्वात मोठी, स्थिर व चैतन्यशील म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रसिध्द आहे. भारतीय नागरीकांनाही त्याचा रास्त अभिमान आहे. लोकशाही कोणत्या ही स्वरुपाची असली तरी राजकीय पक्षाच्या अनुउपस्थित अकालनीय आहे. त्यामुळेच लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्ष अपिरहाय्र असतात त्यांना अनन्य साधारण महत्व असते. म्हणूनच पक्षीय व्यवस्था ही लोकशाहीचा प्राण ठरते. संसदीय लोकशाहीचा जाणीवपूर्वक, विचारपूर्वक स्विकार संविधानकारांनी केला आहे. कायदे करणे एवढेच संसदेचे कार्य नसून ते चर्चा करण्याचे व्यासपीठ आहे. म्हणून प्रसिध्द विचारवंत व्होल्टेअरचे ''तुम्ही म्हणतात ते मला मान्य नाही, ते म्हणण्याच्या तुमच्या अधिकाराचे मी अखेर पर्यंत समर्थन करेल'' हे वचन संसदेच्या प्रत्येक सदस्याने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. गांधीजीनीही दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारी नसेल तर लोकशाहीचा विकास शक्य होणार नाही. विरुध्द पक्षाचे मत ऐकूनच घेतले नाही किंवा ते ऐकून त्याची चेष्टा केली तर विचाराच्या देवाणघेवाणीचा मार्गच बंद होईल. एकदा असहिष्णूतेची सवय झाली की सत्य हातातून निसटून जाण्याचा धोका निर्माण होतो. यावरुन लोकशाही यशासाठी विशेषत: संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाला अनन्य साधारण महत्व असते. इतकेच नव्हे तर विरोधी पक्षाच्या भूमिकेवरच खऱ्याअर्थाने लोकशाहीचा विकास अवलंबून असतो.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही संसदीय पध्दती हीच व्यक्तिच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकते. सहकार्य,

शिस्त व समर्पणादी गुणाचा विकास करु शकते. उच्चत्तर प्रतिचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील, सचोटी धारीष्ठ्य इत्यादीचा परिपोष या पध्दतीतच होऊ शकतो. आपल्याला या समाजरचनेत मानाचे स्थान आहे, अशी जाणीव हिच पध्दती प्रादुर्भूत करीत असल्यामुळे व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग तिच्यामधून खुला होऊ शकतो. संसदीय लोकशाहीच मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरुपांशी सुसंगत ठरते. कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरुपाचे बदल घडवून आणण्याचा मुलमंत्र फक्त तिलाच अवगत असतो. नव्हेतर विविध मुद्या संबंधीचे निर्णय मनमोकळ्या चर्चेअंती व सर्वांच्या संमतीने घेण्याची तरतुद फक्त संसदीय पध्दतीतच असते. या सर्वांसाठी समर्थ सत्ताधारी पक्षा इतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे अत्यावश्यक असतो. म्हणूनच संसदीय शासन पध्दतीत विरोधी पक्षाचे स्वागत होते. एवढेच नव्हे तर उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. विशेष: सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही वर्तनापासून दूर ठेवण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्षच करु शकतो.[३] यावरुन प्रबळ विरोधी पक्षाच्या अस्तित्वाविना लोकशाहीची कल्पनाच करणे अशक्य आहे.

स्संदीय शासन पध्दतीमध्ये विरोधी पक्षाला फार महत्वाचे स्थान असते. विरोधी पक्ष हा शासन यंत्रणेचा एक भाग समजला जातो. इंग्लंड ही विरोधी पक्षाला राणीचा विरोधी पक्ष असे म्हणतात. विरोधी पक्षाच्या नेतृत्वाखाली एक छाया मंत्रिमंडळ ॅ;ैंकवू ब्वइपदमजद्ध असते त्यास सरकार प्रमाणेच प्रत्येक खात्यासाठी मंत्री असून ते सतत माहिती मिळवून अभ्यास करुन मंत्रीमंडळास प्रश्न विचारणे, विरोध करणे, टिका करुन त्यातील दोष लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतात. बजेहॉटने म्हटले आहे की, इंग्लडने राजाचा विरोधी पक्ष ही उक्ती शोधून काढली. परंतु विरोधी पक्षाने केलेली टिका इतकी महत्वाची होती की राज्यकारभार जितका महत्वाचा तितकीच राज्यकारभारावरील टिका महत्वाची होय. विरोधी पक्षाचे मुख्य कार्य मंत्री मंडळाचे दोष दाखविणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवून त्यांना

सर्वाधिकारी बनू न देणे हे होय. विरोधी पक्षाच्या आस्तित्वामुळे सत्याग्रह पक्षाचे मंत्रीमंडळ कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर राहते. राष्ट्रीयत्वाच्या मुलभूत प्रश्नाबाबत सत्तारुढ पक्षाला ते सहकार्य करतात. मंत्रीमंडळाचे सर्व लक्ष विरोधी पक्षाच्या नेत्याला स्वत:च्या पत्नीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे ओळखतो. भारतीय संसदीय लोकशाहीच्या संदर्भात विरोधी पक्षाची भूमिका ही एक काळजी करण्यासारखी महत्वाची बाब झाली आहे.

**राजकीय पक्षाची निर्मिती :**

ज्या समाजात राजकीय व्यवस्था उत्क्रांत होत जाते त्या समाजात विचारसरणींना क्रमश: आकार प्राप्त होत जातो आणि एका'एका विचारसरणीमधून पक्ष आकाराला येतात. भारतात तसे न घडता काँग्रेस पक्षातून अनेक पक्षाची निर्मिती झाली म्हणूनच भारतीय पक्षव्यवस्था ही पाश्चात्य देशामध्ये आढळणाऱ्या कोणत्याच प्रकारच्या चौकटीत बसू शकत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात वेगवेगळे पक्ष निर्माण होण्याची संधीच येथे प्राप्त होऊ शकली नाही. रिचर्ड एल पार्क यांनी स्वातंत्र चळवळ पाश्चात्य धर्तीच्या पक्षपध्दतीला जन्म दण्यास प्रतिकूल ठरले. साम्राज्यवादी सत्ताधिशाला विरोध करण्यासाठी व स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सगळे गट कटीबंध होऊन एका संघटनेत जगतात पुन्हा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ते फुटतात त्यातून लहान–लहान वर्तुळ निर्माण होतात असे अश देशासंबंधी लिहितांना म्हटले होते ते पूर्णपणे आणि हुबेहुब भारताच्या पक्षव्यवस्थेला लागू ठरते. कारण भारतात अशा प्रकारचे राष्ट्रीय चळवळीचे रुपांतर राजकीय पक्षात झाले. महात्मा गांधीच्या सल्याप्रमाणे काँग्रेस पक्षाचे विसर्जन न करता त्याच्या अनुयायांनी सत्तापक्ष बनविला. पुढे या पक्षातून १९४५ साम्यवादी पक्ष, १९४८ (अशोक मेहता यांच्या नेतृत्वाखाली) समाजवादी पक्ष, १९५१ (आचार्य कुपलानी यांनी) किसान मजदूर सभा (पुढे प्रजा समाजवादी पक्ष या नावाने ओळख) १९५१ मध्ये (डॉ. श्याम प्रसाद मुखर्जी यांनी) जनसंघ (आजचा भाजप) १९५९ (चक्रवती राजगोपालचारी यांनी) स्वतंत्र पक्ष हे आणि इतर पक्ष निर्माण झाले.

लेकमताचा आदर करत दरवेळी सत्तेचे हस्तांतरण झालेले आहे. यात शंका नाही. परंतु बऱ्याच वेळा आपल्या हातून सत्ता गेली याचे सत्तेतून बाहेर पडणाऱ्या पक्षाला इतके दु:ख होते की विरोधी पक्ष म्हणून कार्य करणे त्यांना कठीन जाते. विरोधी पक्ष किंवा विरोधी आघाडी आपल्याकडे अद्याप पचनी पडलेली नाही. पक्षातील जेष्ठ नेत्याची पर्यायी मंत्री अशा प्रकारची रचना करण्यासाठी पावले उचलने आवश्यक आहे. लोकशाहीसाठी निवडणूक लढविणाऱ्या पक्षांतच लोकशाही नाही. स्थानिक स्तरावर जनसंपर्क साधून निष्ठेने सार्वजनिक काम करण्याची प्रथच राजकीय पक्षातून नाहीशी झालेली दिसते. निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून पुढे येण्यासाठी धडपड व रसीखेच (ब्रिटन मध्ये स्थानिक पक्ष उमेदवार निवडते) असते. सर्व हायकमांडच्या मर्जीवर उमेदवार संसदेने निश्चितपणे निवडून येतो तो त्याच्या व्यक्तीमत्वामुळे किंवा त्यच्या कार्यक्षमतेमुळे अथवा त्यांच्या सारासार विचार करण्याच्या बुध्दीमुळे नव्हे तर त्यांच्या राजकीय पक्षामुळे हे मोदी लाटेच्या प्रभावातून सिध्द होते.

इंग्लंडमध्ये संसदेच्या प्रत्येक अधिवेशनातील २० दिवस हे विरोधी पक्षाच्या कामकाजाला अग्रक्रम देण्यासाठी उपलब्ध असतात आणि त्यातील दोन दिवसाची चार भागात विभागणी करुन ते त्यांनी सूचविलेल्या कामकाजासाठी वापरले जातात या २० दिवसातले तीन दिवस दुसऱ्या कामावरील विरोधी पक्षासाठी राखून ठेवलेले असतात इतका तर्कशुध्द आखणी केल्यावर कामकाज शिस्तबध्द पध्दतीने चालते. याचे आश्चर्य वाटायला नको. सत्ताधारी पक्षाला सत्तेवरुन खाली खेचून ती जागा स्वत: काबीज करण्याची विजिगोषू महत्वाकांक्षा त्यांच्या ठायी सहसा नसे त्यांचा प्रयत्न स्वत:चे शासन प्रस्थापित करण्यासाठी नसून आहे त्या शासनात आपल्याला चंचुप्रवेश करता यावा आपले साहचर्य घडावे आपले हितसंबंध जपले जावे, एवढ्ययाच मापक उदेशाना पदरात पाडून घेण्याचा असे सत्ताधारी पक्षाच्या प्रागल्यामुळे जेव्हा हेही पुरेशा प्रमाणात साध्य होत नाही असे या पक्षाच्या प्रत्ययास येई तेव्हा ते हताश व आगतिक होत.

विधिमंडळात सरकारवर टिका करण्याचा हेतू शासनाला ताब्यावर आणण्यापेक्षा जनमानसातील स्वत:ची प्रतिमा उजळणे हाच अनेकदा असे अशा कारणामुळे सर्वच पक्षाच्या कामकाजाचे शासन हेच केंद्र बनून गेले. शासनाशी संबंधित राहणाऱ्यालाच राजकीय अस्तित्व ठरते हे विधान व्यक्ती प्रमाणेच पक्षाबद्दलही लागू आहे. त्यामुळे सत्ताधारी काय किंवा विरोधी पक्ष काय शासनात व शासनाला चिकटून राहण्याचाच सदैव प्रयत्न करीत असतात. आपले वेगळेपण टिकविण्याच्या प्रयत्नात आपणास शासनाबाहेर फेकले जावे लागल आहे हे लक्षात येताच इथले सगळे पक्ष या वेगवेगळ्या पक्षाच्या खुशाल तडजोड करु लागतात.

भारतात खाजगी सदस्यांची विधेयक व खाजगी ठराव यासाठी आलटून पालटून केवळ शुक्रवारचा अर्धावेळ राखीव ठेवण्याची सध्याची पध्दतच समन्याची उदारणार्थ ४ डिसेंबर २००४ या एकाच दिवशी लोकसभेत ३२ व ३३ अशी एकूण ६५ खाजगी विधेयक संसदेत मांडली गेली असे दिसून आले. यावरुन स्वतंत्र्य असणारे विषय सदनात त्याचा पाठपुरावा करण्याकडे खासदाराचा कल असतो असेच दिसून येते. परंतु सरकारच्या चुकाकडे ठेवण्यात व जनतेसमोरील महत्वाच्या प्रश्नावर उपाय शोधण्यात अपयश येत असल्याची भावना विरोधी पक्षामध्ये निर्माण झालेली दिसते. सर्वांनी मान्य केलेल्या ठराविक प्रमाणानुसार सरकार व विरोधी पक्ष यांच्यात जर वेळ विभागून दिला तर विरोधात्मक वाटा बाहेर पडतील. नवी दिल्ली २५ नोव्हेंबर २००१ मध्ये संसद शिस्त अतिसभ्यता या विषयावर अखिल भारतीय परिषद नवी दिल्लीला भरली. संसद्याच्या दृष्टिकोनातून पाहता जनतेच्या तलारी सदनात भांडण्यासाठी यांना पुरेसा वेळ व संधी न मिळणे व त्यातून येणारे वैफल्य, गडबड गोंधळ होण्यामागील एक महत्वाचे कारण आहे असे या परिषदेने पारित केलेल्या ठरावात आधोरेखित केले होते. शिफारस केली की, सरकार व मंत्रीमंडळाने विरोधकाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन अधिक सकारात्मक व समजूतदार पणाचा ठेवावा व त्यांना सदनात मांडलेल्या प्रश्नाकडे

तातडीने लक्ष द्यावे. २००२ सालच्या हिवाळी अधिवेशनात विरोधकांना त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आल्याने संसदेच्या दोनही सदनात जास्तीत जास्त कामकाज पार पाडण्यात आले.

भारतावर राज्य करणे हा आपला जन्मसिध्द हक्कच आहे. अशी काँग्रेस पक्षाची धारण होती. मात्र बलिष्ट काँग्रेस पक्षाचा ऱ्हास झाला आणि ३५ वर्षाचा भारतीय जनता पक्ष सत्तारुढ झाला. उजव्या विचारसरणीचा पुरस्कार करणारा पक्ष म्हणून त्यांची वाटचाल नक्कीच गतिशील आहे. नव्हेतर नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर वर्षभरात भारतीय जनता पक्ष जगातील सर्वात मोठा (१० कोटी सदस्य संख्या) राजकीय पक्ष बनला. देशात कमी राजकारणी असे ओहत ज्यांच्यावर लोकांचा विश्वास आहे. त्यामध्ये नेंद्र मोदी यांचे स्थान सध्यातरी सर्वात वरचे आहे ही लोकशाही आहे. येथे कोणत्याही प्रकरची टिका, विरोध, आरोप खपवून घेतला जाणार नाही. सरकारी धोरणे, योजना व्यवस्था यास विरोध करणाऱ्यांना देशद्रोही ठरवून त्यांच्यावर बंदी घालण्यात येईल असा अध्यादेश मोदी सरकारने अद्यापक ाढलेला नसला तरी तो या देशात हळूहळू लागू होत आहे. अध्यादेश जारी करण्यात येतात. ही धोक्याची प्रथा आहे व त्यामुळे संसदेच्या विशेष अधिकारावर गदा येते. अत्यंत तातडीची बाब किंवा आणीबाणी असल्याखेरीज अध्यादेश काढणे लोकशाही विरोधी आहे. केवळ अचानक व ताबडतोबी ने एखादी घटना घडत असल्यास त्यासाठी ही तरतुद आहे. गेल्या काही वर्षात केंद्र व राज्य सरकारांनी या तरतुदीचा गैरवापर केला. संसद बहुमतांशी रबरी शिक्षण असल्याने शासन कोणताही प्रस्ताव सहजपणे पास करुन घेतात. केंद्र सरकारने देशातील ६९ स्वयंसेवी संस्थांना विदेशी देणग्या देण्यात बंदी घातली. त्यानंतर दहा बारा दिवसात आंध्र–तेलंगणातील तब्बल ११४२ स्वयंसेवी संस्थावरही अशीच बंदी घालण्यात आली होती. १४ विदेशी देणगी देताच त्यावरही अशीच बंदी घातली. या देणगीदार संस्थाकडून येणाऱ्या पैशातून येथे विकास विरोधी कामांना बळ पुरविले जाते. संसद हे लोकशाहीतील सर्वोच्च पीठ असल्याने देशभरासाठी महत्वाचे

असणारे विषय येथे चर्चिले जावेत उचित आहे. परंतु राजकीय पक्ष या बाबत पक्षपाती भूमिका घेतात असे दिसून येते. उदा. गोदा दंगलीतील चर्चेला भारतीय जनता पक्षाचा कडवा विरोध होतो तर ज्याच्या पक्षांना नंदीग्राम मधील चर्चा नको होती. मोदीलाटेवर निवडून आलेल्या खासदारांनी लोकसभेत प्रश्न विचारल्यानंतर उत्तर मिळाले नाही. म्हणून विशेष अधिकाराचे हनन झाल्याची तक्रार करतात. मग विरोधी पक्षाची भूमिका काय असावी याची कल्पना न केलेलीच बरी असे म्हणतात की, प्रत्येक नव्याने निवडून आलेल्या सरकारला मधूचंद्राचा अवधी मिळत असतो. निवडणुकीत जनता जेव्हा जुन्या सरकारला डावलते आणि नव्या सरकारला सत्तेवर आणते. तेंव्हा तिच्या मनात खास काही अपेक्षा असतात. त्या सर्वच त्यांच्या कालावधीत पूर्ण होतील असे नाही. परंतु ज्या चुकासाठी जुन्या सरकारला डावलले त्याची पुनर्रावृत्ती न करता जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने नवे सरकार काही निश्चित धोरण व कार्यक्रम कार्यान्वित करेल आणि त्या अंशत: सफल करण्यात यश मिळेल अशी जनतेची साहजिकच अपेक्षा असते. परंतु नव्या सरकारने योग्य दिशेने पावले टाकली नाहीत तर जनतेच्या अपेक्षा भंग होतात व नव्या सरकार बद्दल सुरुवातीला वाटणारी अपुलकी नाहीसी व्हायला लागते. शासनबाह्य सामाजिक, आर्थिक क्षेत्र सुध्दा राजकीय पक्षाच्या रचनात्मक कृतीची वाट पाहत असतात.

जोपर्यंत स्वच्छ चारित्र्याचे समाजसेवी बांधिलकी असणारे व देशापुढील समस्यांची जाणीव असणारे लोकहितवादी उमेदवार निवडून येत नाहीत. तोपर्यंत लोकशाहीतून देशाची प्रगती होत नाही. प्रशसन हे सरकारचे काम आहे. सरकारच्या समर्थकाचे काम पाठींबा देण्याचे आहे, टिका करणे हे विरोधकाचे कर्तव्य आहे. सरकारच्या धोरणांशी चर्चा करणे व त्यावर प्रश्न विचारणे हे संसदेचे काम आहे. सरकार प्रशासन राबवते पण विरोधी पक्ष टिका करतात हे या तत्वामधील खरा मुद्दा आहे. जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करण्यासाठी राजकीय परिपक्वता आवश्यक असते. संसद जर निरुपयोगी ठरली

तर विरोधी पक्ष मजबूत व प्रभावी होवू शकणार नाही. भ्रष्ट प्रशासन व सत्तालोलूप राजकारणाचा परिपाक आहे. स्वच्छ व पारदर्शक प्रशासनासाठी स्वच्छ राजकारण हवे आणि त्याची आग्रहाने मागणी करणारे राजकीय पक्ष हवेत असे पक्षच हे लोकशाहीचा प्राण ठरतात. अर्थात विरोधी पक्षाचे कार्य आयोग्य कार्याला विरोध करण्यासाठी आहे. राष्ट्राला विरोध करण्यासाठी नाही.

**संदर्भ सूची :**


१) भारतीय संसदीय लोकशाहीची अग्नी परीक्षा—माधव गोडबोले अनुवाद सुजाता गोडबोले.

२) तुलनात्मक शासन आणि राजकारण—श्रीराम येरणकर.

३) भारतीय शासन आणि राजकारण—डॉ. भा.ल. भोळे.

४) भारतीय शासन आणि राजकारण—डॉ. रा.ज. लोटे.

५) दैनिक लोकसत्ता पेपर संपादकीय लेख दि. १३/०४/२०१५.


***

# भारतीय लोकसंख्येची कारणे, परिणाम आणि उपाय

**डॉ. मोरे अर्जून मोहनराव**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर, ता. अंबाजोगाई जि. बीड

**प्रस्तावना :**

जगात भारताचा लोकसंख्याच्या दृष्टीने दुसरा क्रमांक आहे. जागतीक लोकसंख्या पैकी भारतात 16 टक्के लोक राहतात. याचाच अर्थ भारतात लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. लोकसंख्या वाढीची कारणे पाहितली असता निदर्शनास येते की, निरक्षरता, पुरुष सत्ताक पध्दती, मुलगा हा वंशाचा दिवा, संतती ही ईश्वराची देण बालविवाह बहुपत्नी विवाह अशी अनेक कारणे समोर येतात. लोकसंख्यावाढीचा स्फोट झाला असून सध्या देशाची लोकसंख्या 131 कोटी झाली आहे. भारत हे विकसनशिल राष्ट्र असून लोकसंख्या वाढीचा स्फोट परवडणारी गोष्ट नाही. लोकसंख्या वाढीमुळे लोकसंख्याची घनता वाढत आहे. तसेच बेकारी, दारिद्र्य यांचे प्रमाण्ा वाढत आहे. गुन्हेगारी, भ्रष्टाचार यांना चालना मिळत आहे. दरडोई उत्पादन घटत असून शासकीय सेवा, सुविधा, योजना यावर तान पडत आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीची समस्या ही एक प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. देशाची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्यामुळे औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, दळण - वळण इत्यादी क्षेत्रावर अनिष्ठ परिणाम होत आहेत. लोकसंख्यावाढ ही एक समस्या असली तरी ती अनेक समस्यांची जननी आहे. म्हाणून ज्या

देशाची लोकसंख्या जास्त त्या देशात दारिद्रय, बेकारी, गुन्हेगारी, बेरोजगार यांचे प्रमाण मोठया स्वरुपात असते.

देशाची लोकसंख्या वाढत गेल्यास सरासरी दरडोई उत्पन्नात घट होते. म्हणजेच उपलब्ध साधन संपत्ती पेक्षा जास्त असलेल्या लोकसंख्याला अतिरिक्त लोकसंख्या म्हटले जाते या अतिरिक्त लोकसंख्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर तान निर्माण होतो. तसेच मुलभूत गरजांच्या पुर्ततेकरीता अन्न - धान्य, कपडा यांच्या किंमती वाढतात. शासनाला नागरीकांच्या मुलभूत गरजांच्या पुर्तते करीता सातत्याने नवनवीन योजना आखाव्या लागतात. या योजनावर मोठया प्रमाणात खर्च येतो. त्यामुळे देश गरीब बनुन इतर राष्ट्राकडून कर्ज घेतो. कर्ज फेडीतून देशाला नवनवीन विकासाचे मार्ग सुरु करता येत नाहीत. लोकसंख्या वाढीमुळे अनेक समस्यांची निर्मिती होत आहे. लोकसंख्या वाढीचे स्वरुप, गती, कारणे परिणाम इत्यादी घटकांचे अध्ययन करण्याकरीता खालील प्रमाणे संशोधनाची उदिष्टये मांडण्यात आली आहेत.

**संशोधनाची उदिष्टये :**

1) भारतीय लोकसंख्याचा थोडक्यात आढावा घेणे.
2) भारतीय लोकसंख्येच्या वैशिटयांचा अभ्यास करणे
3) लोकसंख्या वाढीच्या समस्यांचा अभ्यास करणे
4) लोकसंख्या वाढीच्या परिणामाचे स्वरुप पाहणे

प्रस्तुत उदिष्टयांच्या पुर्तते करीता खालील प्रमाणे गृहितकाची मांडणी करण्यात आली आहे.

**गृहितके :**

1) भारताच्या लोकसंख्येची सातत्याने वाढ होत आहे.

2) वाढत्या लोकसंख्याने शासकीय सुविधावर तणाव निर्माण झाला आहे.

3) वाढत्या लोकसंख्यामुळे समाज व राष्ट्रीय विकास मंदावला आहे.

सदरील गृहितकांच्या पडताळणी करीता पुढील प्रमाणे संशोधन पध्दतीचा आवलंब करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या तथ्य संकलनाकरीता प्रामुख्याने व्दितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये प्रकाशित स्त्रोतात वेगवेगळे संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, वार्षीकअंक, शासनाचे अहवाल इत्यादीचा अवलंब करण्यात आला. तसेच अप्रकाशित स्त्रोता मध्ये निम्मशासकीय व खाजगी संस्थांचे अहवाल एम.फिल, पी.एच.डी चे प्रबंध इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला. सदरील संशोधन विषयाच्या मांडणी करीता वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा आवलंब करण्यात आला आहे.

**विषय प्रतिपादन :**

अतिरिक्त लोकसंख्या ही कोणत्याही देशाच्या अधोगतीचे मुळ कारण असते. अतिरिक्त लोकसंख्या नैसर्गिक साधन संपत्ती, शासकीय योजना यावर तणाव निर्माण करते. त्यामुळे निसर्गाचा समतोल जातो. शासकीय योनावर तणाव निर्माण झाल्यामुळे योजनामध्ये भ्रष्टाचार निर्माण होतो. त्यामुळे दंगली, हिंसा असे अनुचितकृत्य घडून येतात. या अतिरिक्त लोकसंख्या निर्मितीची कारणे पुढील प्रमाणे दिसून येतात.

**लोकसंख्या वाढीची कारणे :**

देशाच्या साक्षरतेचे प्रमाण 72 टक्के आहे. 28 टक्के जनता निरक्षर आहे. या निरक्षर जगात कुटूंब नियोजनाचे महत्व कळत नाही. तसेच ते संतती जन्मास येणे ही ईश्र्वराची कृपा मानतात त्यामुळे लोकसंख्या वाढते. तसेच मुलगा वंशाचा दिवा मानला जातो. मुलाच्या प्राप्ती करीता अनेक मुलींना जन्म दिला जातो. त्याच बरोबर मुला - मुलींचे विवाह करणे हे माता पित्याचे कर्तव्य मानले जाते. अनेक माता - पिता बालवयात मुला मुलीचे विवाह लावतात. त्यामुळे प्रजननाच्या कालावधी जास्त मिळतो. त्यामुळे लोकसंख्या वाढते. खोटी प्रतिष्ठा ज्यामध्ये अधिक मुले असली तर आपली जात, धर्म, गाव यामध्ये प्रतिष्ठा वाढते या समजूतीव्दारेही लोकसंख्या वाढत आहे. या लोकसंख्या वाढीचा परिणाम पुढीलप्रमाणे नमुद करता येतो.

**शासकीय योजनावर ताण :**

शासनाने जनकल्याणकारी योजना सुरु केलेल्या आहेत. जसेकी, निराधार योजना, बेकारी निर्मुलन योजना, जवाहर रोजगार योजना, ग्रामीण विकास योजना, इंदिरा अवास योजना, प्रधानमंत्री जनधन योजना इत्यादी योजनावर अतिरिक्त लोकसंख्याचा परिणाम होतो. हया योजनामध्ये वशिलेबाजी, भ्रष्टाचार घडून येतो. तेव्हा हया योजना असफल ठरतात.

**2) आरोग्य क्षेत्रावर ताण :**

अतिरिक्त लोकसंख्याचा परिणाम आरोग्य क्ष्ोत्रात येतो. प्राथमिक आरोग्य केंद्राची मर्यादा 50 रुग्णांची असेल तेथे 100 रुग्ण येत असतील तर सर्वांना चांगल्या पध्दतीत आरोग्य सेवा मिळत नाही. सर्वांना सामावून घेण्याकरीता गंभीर रुग्णाकडे दुर्लक्ष केले जाते.

अनेकवेळा रुग्णाला बाहेरुन औषध गोळया घ्याव्या लागतात. गरीब रुग्ण हे पैसे खर्च करु शकत नाहीत त्यांना आरोग्य सेवा मिळत नाही.

**3) शैक्षणिक क्षेत्रावर तणाव :**

अतिरिक्त लोकसंख्या मुळे शाळेतील हॉल मध्ये 30 विद्यार्थी बसु शकतात त्या ठिकाणी 90 विद्यार्थी बसवले तर गोंधळ निर्माण होतो. तसेच शैक्षणिक सुविधाचे समान स्वरुपात वितरण होत नाही. सर्वांना पुस्तक, दप्तर मिळत नाही. वर्गात गोंधळ निर्माण झाला की, शिक्षक मुलांना शांत बसवण्यात वेळ घालवतात, अध्यापन होत नाही, गरीबांच्या मुलांना वस्तीगृह मिळत नाही. शैक्षणिक कॉलरशिप वेळेवर मिळत नाही. एकाच हॉलमध्ये दोन वर्ग भरवावे लागतात.

**4) सामाजिक क्षेत्रावर तणाव :**

वाढीव लोकसंख्याचा सामाजिक क्षेत्रावर तान निर्माण होतो. यामध्ये रस्ते, नाल्या, समाज मंदीर, पाणीपुरवठा, सार्वजनिक ठिकाणी गर्दी इत्यादी वर तणाव निर्माण झाल्यामुळे इतर क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असलेले दिसून येते.

**5) आर्थिक घटकावर तणाव :**

लोकसंख्या वाढीमुळे औद्योगिक क्षेत्र, कृषी विकास अन्नधान्याचे उत्पादन यावर परिणाम झाला आहे. शासनाला वाढीव लोकसंख्यावर अधिक खर्च करावा लागत असल्यामुळे कुठीर उद्योग, लघु उद्योग, आर्थिक बचत रोजगारांची निर्मिती याकडे दुर्लक्ष होत आहे. तसेच उत्पादीत माल बाहेरील बाजारपेठे मध्ये विक्री झाला पाहीजे तेव्हाच आर्थिक विकास घडून येतो. परंतु वाढीव लोकसंख्या उत्पादीत माल स्थानिक पातळीवर संपुष्ठात आनते. त्यामुळे आर्थिक विकास घडून येत नाही.

**अतिरिक्त लोकसंख्याचा सर्व सामान्य घटकावर परिणाम :**

1) लोकसंख्यावाढीमुळे अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांचा तुटवडा निर्माण होतो.

2) लोकांना अपुरे व निकृष्ट अन्न मिळत असल्यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. ज्यामध्ये कुपोषण, भुकबळी ही समस्या निर्माण होते.

3) लोकसंख्याच्या मानाने रोजगाराची सुविधा कमी असते. लोक रोजगार मिळवण्यासाठी स्पर्धा निर्माण होते. त्याचा परिणाम म्हणून मजुरीचे दर कमी होतात.

4) लोकांच्या किमान गरजा भागविण्यासाठी फारमोठया प्रमाणात इतर देशामधुन वस्तुंची आयात करावी लागते. तेव्हा निम्यापेक्षा आयातीचे प्रमाण वाढते त्यातुनच देशाचा आर्थिक समतोल बिघडत जातो.

5) लोकसंख्या वाढीमुळे ग्रामीण लोकांच्या मुलभूत गरजा पुर्ण होत नाहीत तेव्हा ते शहराकडे स्थलांतरीत होतात. ते शहरात मिळेल त्या ठिकाणी झोपडी उभारतात त्यामुळे झोपडपट्टीची समस्या निर्माण होतात.

6) लोकसंख्या वाढीमुळे जमिनीचे तुकडी करण होत आहे. तुकडीकरणामुळे क्षमता कमी होत आहे.

7) अतिरिक्त लोकसंख्यामुळे दरडोई उत्पन्न कमी होत जाऊन गरीब, बेकारी, दारिद्रय यांच्या मध्येवाढ निर्माण होत आहे.

8) अतिरिक्त लोकसंख्यामुळे इंधन, वाहतुक, औषधे, पाणी इत्यादीची कमतरता जाणवते.

9) अतिरिक्त लोकसंख्यामुळे जल, हवा, ध्वनी इत्यादी मध्ये प्रदुषण येते. तसेच कचरा प्रदुषणाचा ही प्रश्न निर्माण होतो.

10) औद्योगिक विकासावर भर देणे त्यामुळे तरुणांना रोजगार मिळेल तरुण रोजगार उभा करु शकेल, गुन्हेगारी, गुंडगीरी, तस्करी यांचे निर्मुलन होईल.

11) अतिरिक्त लोकसंख्यमुळे बुधिमत्ता, तज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या निर्मितीमध्ये घट होत आहे.

12) अतिरिक्त लोकसंख्यामुळे साक्षरतेचे प्रमाण घटते. निरक्षरतेचे प्रमाण वाढते. तसेच लोकांच्या आयुमार्नात घट होत आहे.

13) लोकसंख्या वाढीमुळे गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वाढ होते. यामध्ये बालगुन्हेगारी, गुंडगीरी, चोरी, वेशाव्यवसाय, तस्करी, चरस - गांजा विक्री, व्यसनाधिनता इत्यादी होय.

लोकसंख्या वाढीच्या समस्या ज्या प्रमाणे मांडता येतात त्याचप्रमाणे लोकसंख्या वाढीवर उपाय सुचवता येतात.

**लोकसंख्यावाढीचा समस्यावर, उपाय :**

लोकसंख्यावाढ ही सर्व समस्याचे मुळ कारण आहे. लोकसंख्यावाढ रोखण्याकरीता व निर्माण झालेल्या समस्यावर उपाय योजना पुढील प्रमाणे करता येतील.

1) लोकांना लोकसंख्या वाढीच्या समस्या समजून सांगणे वाढीव लोकसंख्याचा दुष्परीणाम कुटूंब, समाज, समुदाय यावर कसा परिणाम घडून येतो हे समजुन सांगितले तर लोक लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवतील.

2) लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याकरीता शिक्षणावर भर दिला पाहीजे. नागरीकात साक्षरतेचे प्रमाण वाढले तर तत्वीक विचार करतील.

3) अंधश्रध्दा निर्मुलनावर भर देणे अंधश्रध्दा निर्मुलन झाले की, नागरीकांना लोकसंख्या वाढीचे दुष्परीणाम लक्षात येतेल. ते लहान कुटूंब ठेवण्यावर भर देतात.

4) लोकसंख्या वाढ रोखण्याकरीता सक्तीचे कुटूंबनियोजन केले तर आपोआपच लोकसंख्या वाढ रोखेल

5) इंदीरा आवास योजनेचे प्रमाण्ा वाढवणे त्यामुळे वाढीव लोकसंख्याला घरांची उपलब्धता निर्माण होईल.

6) दळण वळणच्या सुविधा मध्ये वाढ करणे त्यामुळे सुविधा निर्माण होईल

**अध्ययनाचे महत्व :**

प्रस्तुत अध्ययनामुळे लोकसंख्या वाढीचा अर्थ स्वरुप, कारणे परिणाम आणि उपाय योजना इत्यादींचे अध्ययन घडून आले. त्याच बरोबर आधुनिक पिढीला लोकसंख्या वाढीचे दुषपरीणाम सहज लक्षात येतात. ते लहान कुटूंब ठेवण्यावर भर देतील लोकसंख्या वाढीच्या दुष्परीणामाची जाणीव झाली की ते समाजात लोकसंख्या वाढीच्या दुष्परीणामा संबंधी जनजागृती करतील.

**साराश :**

लोकसंख्याची समस्या ही आधुनिक काळात सातत्याने भेडसवणारी सममस्या आहे. या समस्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, आरोग्य, आर्थिक इत्यादी क्षेत्रामध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत या समस्यावर उपाय योजना करण्याकरीता शासन व स्वंयसेवी

संस्था सातत्याने कार्यकरीत आहेत. या प्रयत्नातून काही प्रमाणात लोकसंख्या नियंत्रण ठेवण्यास येईल.

**संदर्भ सूची :**


1. कुलकर्णी बी.डी. संशोधन पध्दती एव्हरेस्ट पब्लिसिंग हाऊस पुणे, 1976.
2. ढगे एस.के. संशोधन पध्दती के.एस.पी. पब्लिसिंग पुणे, 2011.
3. काचोळे दा.घो. लोकसंख्या आणि समाज, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, 2005.
4. दिपक भारती लोकसंख्या अध्ययन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद 2011.
5. ख्ातीब के.ए. लोकसंख्या भुगोल, विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगाबाद, 2011.
6. ताटे एस.व्ही. महाराष्ट्राचा भुगोल, चिन्मय प्रकाशन, पैठण गेट, औरंगाबाद 2016.
7. https//www.ineteconomics.org.
8. wikipeadia.


***

# भारताच्या विधी शिक्षणाची सद्यस्थिती

**डॉ. कल्पना जाधव**

ग्रंथपाल सिंबायोसिस लॉ स्कूल, पुणे

प्रस्तावना :

शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या, समूहाच्या व राष्ट्राच्या विकासास मदत होते. त्यामुळे समाजाचाही विकास होतो. विधी शिक्षणामुळे मनुष्याला कायद्याचे पालन करण्याचे शहाणपण येते.

विधी शिक्षण हे मूलत: बहुउद्देशीय व शिस्तबद्ध शिक्षण आहे. या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी मानवी संसाधने विकसित करणे आवश्यक आहे. या शिक्षणातून सक्षम वकिलाचा विकास होईल आणि त्याच्याद्वारे सामाजिक व राष्ट्रीय विकास होईल. Kulashreshtha (2002) विधी शिक्षणाला प्राधान्य देणे हे नेहमीच सर्वोत्कृष्ट व्यवसाय म्हणून मानले गेले आहे. सामान्य शिक्षणाचा एक भाग म्हणून विधी शिक्षणाकडे वेगळे पाहता येणार नाही. आज विधी शिक्षणामुळे समाजाची राजकीय व आर्थिकदृष्ट्या प्रगती होण्यासाठी प्रेरणा मिळते. आज विधी शिक्षण विधी महाविद्यालयांमध्ये व अनेक विकसित विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहे. Singh (1999) भारतामध्ये 1999 मध्ये लिगल एज्युकेशन इंडिया नावाची एक परिषद आयोजित केली होती. ती परिषद ऑल इंडिया लॉ टीचर्स काँग्रेसद्वारे आयोजित केली होती. त्यामध्ये 21 व्या शतकातील समस्या आणि संभाव्यता यावर चर्चा झाली.

कायदा (Law):

विधी शिक्षणाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करताना कायदा म्हणजे काय? हे पाहणे आवश्यक आहे. सर्वसामान्यपणे कायदा म्हणजे काय तर समुदायाने किंवा देशाद्वारे लागू केलेले नियम म्हणजे कायदा

होय. हे नियम अधिनियमित केलेले असतात. ही एक प्रणाली आहे. कायदा एक मजकूर आधारित शिस्त आहे.

कायद्याच्या व्याख्या :

Maxwell and Schafer (2008) यांच्या मते, विधी क्षेत्रात जगामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात पाठ्याधारित स्रोत आहेत.

Singh (2011) यांनी कायदेसंदर्भात स्पष्ट केले की, सर्व नियमांची रचना यात करताना एखाद्या विशिष्ट समुदायाच्या राज्यातील किंवा इतर गटांद्वारे अधिकार, कायदे याची अंमलबजावणी केली जाते.

Ganer and Black in Blacks Law Dictionary (2004) यांनी कायद्याला परिगणित केले आहे. न्यायालये मतभेद सोडविण्यासाठी न्यायालयीन पूर्वनियोजित विधीविषयक तत्त्वे, नियम आणि सिद्धांताचा वापर करतात.

Farlex Free Dictionary (2014) - सामान्य कायदे म्हणजे न्यायाधीशांकडून न्यायालयाद्वारा ते निर्मित केले जातात. दीर्घ कालावधीत न्यायाधीशांनी तयार केलेले ते नियम आहेत.

विधी शिक्षणाची गरज:

विधी ज्ञानाची गरज ही संविधानिक संदर्भात जरूरी ठरते. देशातील प्रत्येक नागरिक मग तो श्रीमंत असो अथवा गरीब, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा मानकरी ठरतो. अर्थातच कायद्याचे उल्लंघन न करणे व दुसऱ्या व्यक्तीच्या विधीविषयक अधिकारांची जाणीव ठेवणे हे त्याचे कर्तव्य ठरते. परंतु अशा परिस्थितीत, धार्मिक अंधश्रद्धा, गुलामगिरीची मानसिकता यांचा पगडा भारतीय समाजमनावरून अजून दूर न झाल्यामुळे, जनता संविधानात नमूद अधिकाराचा फायदा स्वतःसाठी व समाजासाठी करून घेऊ शकत नाही. भारतीय लोकशाहीची न्यायसंस्था हा एक मोठा आधारस्तंभ आहे. परंतु जनतेचा त्यावरील विश्वास हळूहळू कमी होत आहे. याच कारणांसाठी विधी शिक्षण अत्यंत जरूरी वाटते. न्यायव्यवस्था व तिची कार्यप्रणाली याचे ज्ञान लोकांना असणे आज काळाची गरज झालेली

आहे. न्यायसंस्थेशी निगडित अव्यवस्थेची जाणीव लोकांना करून देणे आज आवश्यक झालेले आहे. जिल्हा बार असोसिएशन या कामात मदत करीत आहे.

इंग्रजी साम्राज्याने न्यायव्यवस्थेची बांधणी त्यांचे साम्राज्य मजबूत करण्यासाठी केली होती. त्यात स्थानिक भारतीयांना न्याय देण्याची भूमिका नव्हती. इंग्रजांनी याच न्यायप्रणालीमार्फत देशभक्तांना देशद्रोही ठरवून तुरूंगात डांबले. असाच काहीसा अनुभव थोड्या फार फरकाने स्वातंत्र्यानंतरही आणीबाणीच्या काळात आला. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर झेंडा बदलला, राष्ट्रगीत बदलले पण न्यायव्यवस्था मात्र बदलली नाही. तिचे हवे तसे स्वदेशीकरण झाले नाही. आजही आपण इंग्रजांच्या कायद्यांच्या धर्तीवरच वाटचाल करीत आहोत.

विधी शिक्षणाचा इतिहास:

भारतात कायद्याची पाळेमुळे पुरातन रुढींवर आधारित आहेत. आर्यन संस्कृतीपासून ती अस्तित्वात आहेत. विधी शिक्षणाच्या प्रारंभाबद्दल विविध मते आहेत. मनू हा वकिलाला संबोधताना विप्र (ब्राह्मण) म्हणतो (Manu VIII 169). परंतु हे अशक्य असू शकते कारण विप्र हा सभ्य (Jury) च्या सदस्यालासुध्दा संबोधले असू शकते. Kane (1984) नमूद करतात, त्याला मानधन देऊन एखाद्या पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याचे काम सोपविले गेले असेल त्यासाठी त्याला मानधन मिळत असे.

Jayswal (2011) यांच्या मते, भारतात मनुस्मृतीच्या काळापासून व्यावसायिक वकील अस्तित्वात होते. Kane मात्र Jayswal यांच्या मताशी सहमत नाहीत. त्यांच्या मते, असे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, ज्याने हे सिद्ध होईल की भारतात तेव्हा व्यावसायिक वकील होते. ते नमूद करतात की, त्या काळी राजाच्या दरबारात लोकांचे प्रतिनिधित्व करणारे विधीतज्ज्ञ असू शकतात. परंतु राजावर त्यांचे मत बंधनकारक नव्हते. धर्मशास्त्रात व विधी पद्धतीत

निपुण असलेलेच प्रतिनिधित्व करू शकत होते. यात पात्रता नसलेल्यास व तरीही पैसे घेणाऱ्या राजा शिक्षापात्र मानून शिक्षा देत असे.

इंग्रजांच्या काळात जेव्हा त्यांनी प्रगत नवीन विधी प्रणालीची सुरुवात करण्याचा घाट घातला तेव्हा भारतीय विद्वानांनी भारताची पुरातन विधी प्रणाली खूप प्रगल्भ व प्रगत होती असा दावा केला. इंग्रज सरकारने विधी शिक्षणाला सहमती दिली व Bhavani (1962) एलफिन्स्टन विधी महाविद्यालय मुंबईत 1866 साली स्थापन झाले व बॉम्बे विद्यापीठ 1956 मध्ये अस्तित्वात आले. एलफिन्स्टन विधी महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाला संलग्न आहे. Ludo (1986) पूर्वी धर्मशास्त्राच्या काळात विधी विद्वान नसावेत. त्या काळी भारतात ऋषी असले पाहिजेत, जे वैदिक शास्त्रात निपुण होते. त्याचा भार वैदिक संहितेवर व तत्संबंधी ग्रंथ, पुराणे, जसे- ब्राह्मणा (Brahmana), आरण्यका (Aranyaka), उपनिषद (Upanishad), स्तोत्रसूत्र (Stotrsutra), गृह्यसूत्र (Grhyasutra), धर्मसूत्र (Dharmgsutra) यावर होता. तेव्हा धर्मशास्त्र व विधी तज्ज्ञ नव्हते, पण परिस्थिती बदलली. धर्मांवरील पुस्तके वैदिक शाळेच्या पगड्यातून वेगळी झाली. काही धर्मपंडित धर्मशास्त्रावर भर देऊ लागले.

Schmitneener (1986) भारतात जेव्हा पहिले ब्रिटिश कोर्ट मुंबईत 1672 साली Governor Gerald Angier ने स्थापन केले तेव्हा व्यावसायिक अस्तित्वात होते असे पुरावे आढळतात. गव्हर्नरने ॲटर्नी जनरल म्हणून जॉर्ज विल्कॉक्सला नेमले. त्यांना कायद्याचे उत्तम ज्ञान होते.

Hindu Law पश्चिमेला 18 व्या शतकात अवगत झाला तेव्हा जरी आजच्यासारखे विधी शिक्षण नव्हते तरीही ते ब्राह्मिक (Brahmie) पद्धतीत उपलब्ध होते. त्या काळी विधी शिक्षणाचे महत्त्व हे केवळ विधी कार्यवाहीचे ज्ञान असणाऱ्याला दावा चालविण्याची परवानगी होती व तो वादी-प्रतिवादीची केस मांडू शकत होता इथपर्यंत होते. प्राचीन राजे धर्मशास्त्राच्या आधारे राज्य करीत व

कायदा करीत. ब्रिटिश राज्य भारतात येईपर्यंत मनु, याज्ञवल्क्य (Manu, Yajna Volkya ) व इतर ह्यांनी केलेल्या कायद्याचे पालन केले जाई.

Koul (1999), '21 व्या शतकात भारतीय विधी शिक्षणामधील समस्या आणि भविष्यातील संभावना 'या विषयावर अखिल भारतीय विधी शिक्षक कॉंग्रेसतर्फे एक परिषद 1999 मध्ये आयोजित करण्यात आली होती. संपादकीय समितीने असे मत व्यक्त केले की, आज 84 विद्यापीठे विधी शाखेत पदवी प्रदान करत आहेत. सुमारे 1500 विधी महाविद्यालये देशात आहेत आणि प्रत्येक वर्षी तीन लाख विधी स्नातक विधी पदवीधर होतात. भारत हा जगामध्ये वकील लोकसंख्येत अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकांवर आहे व तरीही भारतीय लोकांच्या विधीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशा संख्येने वकील नाहीत असे मानले जाते.

ब्रिटिश काळात विधी शिक्षण:

वकिली व्यवसायाची प्राचीन भारतात प्रचलित अभिरूची होते, प्रथम ब्रिटिश न्यायालय हे राज्यपाल जेराल्ड अंगियरकडून 1662 साली बॉम्बेमध्ये स्थापन करण्यात आल्याने Gupta (2000) वकिली व्यवसायाच्या तरतुदी तेव्हा विधी प्रणालीचा त्यांच्यावर परिणाम होता. Britisher courts of Records, मद्रास, बॉम्बे आणि कलकत्ता ते राजे जॉर्जच्या सनदेने 24 सप्टेंबर 1726 रोजी सुरू झालेले Qyer court Terminer and Goal Delivery या गोष्टीवर प्रकाश टाकतात. की, वकील पक्षकारांचे प्रतिनिधत्व कोर्टात करीत होते व पक्षकारांना विधीविषयक सल्ला देत होते. वकिली व्यवसायही 1773 मध्ये जोमात होता. जेव्हा सनद व पेटंट पत्राने रेग्युलेटिंग ॲक्ट अस्तित्वात आला. सर्वोच्च न्यायालय फोर्ट विल्यम, बंगालमध्ये 26 मार्च 1774 ला स्थापन झाले. त्यात तरतुदी घालण्यात आल्या. ज्याचे नाव फोर्ट विल्यम, बंगालच्या रेकॉर्डवर असेल त्यांनाच न्यायालयात

उपस्थित राहून कामकाज व वकिली व्यवसाय करण्याचा अधिकार व पक्षकारांतर्फे केस लढण्याचा अधिकार प्रदान केला जाऊन तो अधिकार निव्वळ काही विशेष कारणाशिवाय रद्द होणार नाही; या वकिलांशिवाय इतर कोणीही सर्वोच्च न्यायालयात लढू शकणार नाही, त्यांना पक्षकारांचे प्रतिनिधित्वसुद्धा करता येणार नाही अशी तरतूद होती

विधी प्रणालीच्या या विवेचनावरून असे दिसते की, वकील हे इंग्लिश अथवा आयरिश होते. भारतीय वकिलांना कोर्टात केस लढण्याची परवानगी नव्हती. जेव्हा बॉम्बे व मद्रासमध्ये उच्च न्यायालये स्थापित झाली व त्याच पद्धतीने वकिलांची नोंदणी केली तेव्हा व्यवसाय सुधारला.

ब्रिटिश रेकॉर्डप्रमाणे मोगल कोर्टात प्रतिनिधित्व करणारे वकील हे कंपनीच्या कोर्टात व्यवसाय करीत व त्यांना बंगाल रेग्युलेशन VII of 1693 या कायद्याने कंपनीच्या कोर्टात वकिली व्यवसाय करण्यास अधिकच प्रोत्साहन मिळाले. बंगाल रेग्युलेशनमुळे वकील व प्लीडर्सची दिवाणी कोर्टात नेमण्याची कारवाई सुरळीत झाली. बंगाल, बिहार व ओरिसामध्ये ही न्यायालये होती. Sudder Diwani Adalat ला प्लीडर्सची यादी तयार करणे व त्याच प्लीडर्सना कंपनी कोर्टात उभे राहण्याची परवानगी देणे हा अधिकार दिला गेला व मानधन देण्याचे मापदंड ठराविले गेले. मालमत्तेच्या मूल्यावर मानधन अवलंबून असे व त्याची टक्केवारी ठरलेली असे. फक्त हिंदू वा मुसलमान यांचीच प्लीडर म्हणून यादीत नोंद होत असे.

बंगाल रेग्युलेशन XII of 1833 मुळे तर वकिली व्यवसायात महत्त्वाची प्रगती झाली व वकिली व्यवसायाला प्रतिष्ठा लाभली. कोणीही आवश्यक शिक्षण पात्रता असल्यास Sudder Diwani Adalat मध्ये प्लीडर म्हणून नोंदीकृत होऊ लागला. त्यात जात, पात, धर्म, राष्ट्र याची बाधा राहिली नव्हती. पुढे लिगल प्रॅक्टिशनर ॲक्ट, 1846 मुळे तीन महत्त्वाचे बदल घडून आले.

1) प्लीडरला लागणारी शिक्षणपात्रता, चांगले चरित्र असणाऱ्या व Sudder Courts नी दाखला दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्लीडर म्हणून काम करणे शक्य झाले होते.
2) भारतातील Majesty's Courts मध्ये व्यवसाय करणाऱ्या सर्व अॅटर्नी व बॅरिस्टर्सना Sudder Courts मध्ये त्या कोर्टाच्या नियमाप्रमाणे व भाषेप्रमाणे भाग घेता येत होता.
3) प्लीडर्सना आपल्या पक्षकारांशी फी संबंधी करार करता येत होता.

या कायद्याचा परिणाम Madras Code खाली काम करणाऱ्या वकिलांवर झाला नाही. द लिगल प्रॅक्टिशनर अॅक्ट, 1853 ने सर्वो च्च न्यायालयामध्ये काम करणाऱ्या अॅटर्नी व बॅरिस्टर्सना ईस्ट इंडिया कंपनी कोर्ट मध्ये त्यांच्या भाषेच्या नियमाप्रमाणे व इतर नियमांचे पालन करून प्लीडर म्हणून काम करण्याची परवानगी दिली गेली होती. प्लीडरना फक्त त्यांच्या पक्षकारांच्या सुनावणीव्यतिरिक्त कोर्टात हजेरी लावणे जरूरी नव्हते. थोडक्यात म्हणजे, अॅटर्नी व बॅरिस्टर्सना कंपनी कोर्टमध्ये व्यवसाय करणे शक्य झाले होते, तसेच भारतीय विधी व्यावसायिकांना सर्वोच्च न्यायालयामध्ये व्यवसाय करता येत होता. मात्र British Crown ने कंपनीकडून प्रशासन हाती घेतले व भारत सरकार कायदा 1858 पारित झाला. भारतीय उच्च न्यायालय कायदा, 1862 हा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने पारित केला. त्या कायद्याप्रमाणे Superme Courts, Sudhar Diwany व Sudder Nizamt Adalat च्या पेटंट पत्रानुसार उच्च न्यायालय स्थापन झाले. Clause of the letters Patent 1865 ने High Court in Calcutta मध्ये वकील व अॅटर्नीला मान्यता देऊन व नोंदणी करून पक्षकारांसाठी उच्च न्यायालयामध्ये त्यांच्या नियमानुसार काम करण्याची परवानगी दिली. पेटंट पत्रानुसार बॉम्बे व मद्रास उच्च न्यायालयालादेखील तसेच आदेश व अधिकार दिले गेले.

द लिगल प्रॅक्टिशनर ॲक्ट, 1879 काही प्रमाणात आजही प्रचलित आहे परंतु तो काही श्रेणीच्या लोकांसाठीच होता. ॲडव्होकेट ॲक्ट, 1961 वकिली व्यवसायात काही सुधारणा व कायद्याचे एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने पास केला होता व काही राज्यातच लागू होता.

औपचारिक विधी शिक्षण पद्धती भारतात 1855 मध्ये अस्तित्वात आली. Markose (1986) पहिली Professorship of Law Government एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये 1855 साली सुरू झाली. विधी शिक्षण हे विधी प्रणालीला सहाय्यभूत किंवा पूरक मानले जात होते. ब्रिटिश कायदे हे इंग्लिशमध्ये असत. कोणीही भारतीय इंग्लिश शिकल्यास कायदा शिकू शकत होता व तो वकिली व्यवसाय करण्यास पात्र समजला जात होता. बॉम्बे व मद्रास ही विद्यापीठे विधी शिक्षणासाठी B.L. पदवी 1857 पासून प्रदान करू लागल्या. त्यावेळी कला महाविद्यालयांशी कायद्याचे वर्ग जोडलेले होते, ते त्याचा भाग होता. त्या काळात व्यवसायास लागणाऱ्या कौशल्यांची गरज नव्हती. जर एखाद्याची विधी व्यवसायात उच्च कामगिरी करण्याची इच्छा असल्यास तो इंग्लंडला जाऊन Inns Court मध्ये दाखल होऊ शकत होता. परंतु त्यासाठी त्याची पैशाची ऐपत असणे आवश्यक होते. एका शतकापर्यंत 1857 ते 1957 पर्यंत विधी शिक्षण हे साचेबंद होते. आवश्यक विषय व्याख्यानांच्या माध्यमातून शिकविले जात. कोर्स दोन वर्षांचा असे. या काळातही उत्तर भारतातील विद्यापीठांनी काही पर्यायी विषय व प्रशिक्षणाचा (Tutorial) प्रयोग सुरू केला. 1958 पासून अनेक विद्यापीठांनी तीन वर्षाचा अभ्यासक्रम चालू केला. शासकीय विधी विद्यालय 1860 पासून मुंबई विद्यापीठांशी संलग्न आहे. त्याची स्थापना 1855 मध्ये झाली. आशिया खंडातील हे सर्वांत जुने विधी विद्यालय आहे. सरकारी विधी महाविद्यालयाला वारसाने लाभलेला व कायद्याचे वंशज मिळालेले विद्वतेचे भांडार आहे. या विधी महाविद्यालयाला डॉ. बी.

आर. आंबेडकर,  लोकमान्य टिळक, नानी पालखीवाला तसेच इतर मान्यवर यांना मार्गदर्शन करण्याचा बहुमान मिळाला आहे.

"मुंबई विद्यापीठाची स्थापना 1857 मध्ये लॉर्ड एलफिन्स्टन यांनी केली होती. त्यांचे कार्य म्हणजे कला, कायदा, औषध आणि अभियांत्रिकी क्षेत्रात परीक्षण आणि पदवी बहाल करणे हे आहे Hunter (1885). इ.स. 1923 मध्ये इंडियन लॉ सोसायटी (आय.एल.एस.) विधी महाविद्यालयाची स्थापना झाली. हे भारतातील पहिल्या दहा विधी महाविद्यालयांपैकी एक आहे. 4 मार्च 1923 मध्ये कायद्याच्या अनेक विद्वान लोकांच्या प्रयत्नांनी याची सुरुवात झाली. 1955 मध्ये स्थापना करण्यात आलेली महाविद्यालये भारतातील सर्वांत जुन्या विधी महाविद्यालयांमध्ये गणली जातात. 1929 मध्ये मद्रास विद्यापीठाचे एका आयोगाच्या शिारशीवरून संस्थाची पाहणी करून सरकारने शैक्षणिक वर्ष 1931-32 पासून महाविद्यालयामधील अर्धवेळ अभ्यासक्रमाचे रूपांतर पूर्णवेळ अभ्यासक्रमात केले.

मुस्लीम काळातील विधी शिक्षण:

हिंदू राज्ये पूर्णतः नष्ट झाली आणि भारतामध्ये मुस्लीम सत्ता अधिक मजबूत झाली. मुस्लीम सामाजिक प्रणाली त्यांच्या इस्लाम धर्मावर अवलंबून आहे. इस्लाम न्यायतत्त्व शास्त्र व कायदा हा कुराणावर आधारित आहे. शरीया (Sharia) हा त्याचा स्रोत आहे. त्यामुळे तो अक्षय आहे. Qurn a Sunna ह्या दोघांमधून काढलेला कायदा आहे. Saran (1526 - 1656) न्यायतत्त्वावर वेगवेगळ्या शाखा ह्यानंतर आल्या, ज्यात भांडणे होती. मुसलमानी कायदाप्रणाली ही प्राचीन काळी कमी गुंतागुंतीची होती व शहरातच अवगत होती. औपचारिक मीमांसा व प्रत्यक्ष कृतीत फरक होता. बादशाह हा सर्वेसर्वा असे. त्याला न्यायदानाचे अमर्याद सामर्थ्य होते. तो सर्व समाजातील, समुदायातील भांडण, तंटे यांना न्याय देऊ शकत होता. परंतु ही औपचारिक मीमांसा होती. प्रत्यक्ष कृतीत त्याचे सामर्थ्य मर्यादित होते.

कारण धार्मिक व सामुदायिक वादविवादात पक्षांना धार्मिक व सामुदायिक न्यायालयातून लढण्याची परवानगी होती.याव्यतिरिक्त खेडेगावातील पंचायतींमध्ये पूर्वीचे न्यायदानाचे कार्य पार पाडण्याची क्षमता होती व ती अबाधित होती. पंचायतीचा निर्णय मान्य नसल्यास सरकारी दरबारात अपील होऊ शकत होते. Calkins यांच्या मते, बहुतेक तंटे कोर्टाच्या बाहेरच मिटवले जात असत. मुगल साम्राज्याची सुरुवात 1526 मध्ये बाबर यांनी केली होती. जे ब्रिटिशांचे राज्य येईपर्यंत अंदाजे दोन शतकांपर्यंत होते.

इंग्रजांच्या विजयाच्या अगोदर मोगलकाळात जेव्हा इतर को णत्याही काळापेक्षा प्रशासनकेंद्रीत होते तेव्हाही मोगल कायद्याची अंमलबजावणी क्वचितच खेडोपाडी पोहोचत असे. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी होते व दळणवळणाची साधनेदेखील कमी होती व त्यामुळे खेडेगावी न्यायालय स्थापन करणे शक्य नव्हते.

Katju (1961) यांनी नमूद केले आहे की, त्यांचे न्यायालय मशिदीत भरत असे. जेथे गरीब श्रीमंत मोकळेपणे येऊ शकत होते. त्यांच्याकडे Katibs (साक्ष लिहिण्यासाठी) व अनुवादक (जर को णत्या पक्षाची किंवा साक्षीदारांची भाषा त्याला अवगत असेल तर अनुवादक) जर वादीने लेखी दावा आणला नसेल तर काझी त्यांना Katib कडे पाठवून त्यांचे दस्तऐवजावर दिलेल्या पद्धतीने उतरवून घेऊन प्रतिवादीना समन्स देत असे. त्याच्या असे निदर्शनास आले की, मोगल व सल्तनत काळात वकील हे स्थानिक व अनौपचारिक न्यायालयात नेमले जात नव्हते.

Wilson (1963) यांनी वकिलाची व्याख्या अशी केली की, वकील हा दुसऱ्या च्या लढ्यात सहभागी होण्याचा अधिकारी आहे. त्याला मुखत्यार, प्रतिनिधी, राजदूत होता येत होते. मोगलकाळात मात्र वकील हा कायदे पंडित म्हणून नव्हता तर फक्त एक प्रतिनिधी मानला जात होता. त्याचे काम फक्त मालकासाठी समान स्तरावर अथवा उच्च स्तरावर बोलणी घडवून आणून हवा असलेला उद्देश साध्य करणे हा होता.

Mehta आणि Gupta (2000) म्हणतात, "मोठे जमीनदार व परराष्ट्रीय व्यापारी कंपनी वकील नेमत. ज्याचे काम बादशाहच्या दरबारात हजेरी लावणे व महत्त्वाची माहिती काढणे आणि जरुर असल्यास मालकाच्या विरुद्ध काही वाद निर्माण झाल्यास त्याच्यासाठी लढणे हे होते." येथे लेखक असे नमूद करतात की, दोन्ही बाजू ऐकल्यावर केसचा तिथल्या तिथे निकाल देण्यासाठी बादशाह किंवा काझी हा कायदे पंडितांचा सल्ला घेत. तो सदैव हजर असे.

शेरशाहची न्यायालयीन सुधारणा ही इ.स. 1540 पासून 1555 पर्यंत होती. 1540 मध्ये शेरशाहनी मुगल सम्राट हुमायूनचा पराभव करुन भारतात सुरी राजवंशची स्थापना केली. या काळामध्ये लक्षणीय सुधारणा घडली. दिवाणी व फौजदारी प्रकरणासाठी स्वतंत्र न्यायालये सुरू करण्यात आली. प्रशासकीय सोयीसाठी काही गावांचा एक गट झाला. त्याला परगणा (Pargana) असे म्हणायचे. त्याचे नागरी न्यायाधीश, ज्याला मुन्सीफ म्हणतात हे शीर्षक आजपर्यंत टिकून आहे (अहमद 1941).

विधी शिक्षण - समस्या व त्यांचा संबंध:

भारतीय विधी पद्धती ही ब्रिटिश वारसा चालविणाऱ्या सामाजिक प्रणालीचा एक भाग आहे. भारत हे जगात मोठे लोकशाही राष्ट्र असल्याकारणाने विधी शिक्षणाची भूमिका व प्रगती महत्त्वाची आहे. विधी शिक्षणात चाळीस वर्षात आमूलाग्र बदल घडला आहे. विधी विद्यार्थ्यांना समाजात विविध भूमिका घेण्यास व विधीची विविध कार्ये करण्यास विधी शिक्षणाची मदत होते. विधी शिक्षणाचे कार्य हे वकिली व्यवसाय, विशेषज्ञ निर्माण करणे आहे, जेणेकरुन समाजाची प्रगती होईल व अंतिमतः पूर्ण राष्ट्रची प्रगती होईल.

वकिली व्यवसाय करणाऱ्यांमध्ये हे सामर्थ्य असणे आवश्यक आहे. जसे समस्यांचे विवेचन करुन, सामाजिक व अर्थशास्त्राला धरून व कायद्याचे नियंत्रण जाणून कैशल्याने संशोधनाची क्रिया करता येणे गरजेचे आहे. Pillai (2012) भविष्यात वकिली व्यवसाय करणाऱ्यांनी दक्षतेने राज्य व केंद्राने केलेल्या कायद्याचे निरीक्षण केले पाहिजे.

भारतीय विधी शिक्षणाचे मूल्य केवळ उच्च श्रेणी मिळविणाऱ्या विधी पदवीधरांचे मूल्य अधिक वाढविण्यासाठी नसून विधीच्या सामान्य विद्यार्थ्यांचा दर्जा वाढवून त्यांच्यात बदल घडविण्यासाठी असावे. मग ते कोणत्या विधी विद्यालयातून पदवी घेतात ह्याचा विचार करू नये. बार कौन्सिल ऑफ इंडियाने प्रथम पर्वाच्या सुधारणेअंतर्गत नॅशनल लॉ स्कूल स्थापन केल्या. ह्या विद्यालयामध्ये जागतिक दर्जाचे कायद्याचे शिक्षण भारतातही सर्वांना परवडेल असे उपलब्ध आहे हे दाखवून दिले. दुसऱ्या पर्वातील सुधारणा तीन स्तंभावर आधारित असतील. विस्तृतपणा समाविष्ट करणारे व श्रेष्ठत्व मिळवून देणारे बदल घडवून आणेल असे प्रतिपादन Moily (2010) यांनी केले.

नवीन रूपात उपलब्ध असलेली भरपूर माहितीने विधी व्यावसायिकांच्या संशोधन प्रक्रियेत बदल घडविला आहे. आज माहिती तंत्रज्ञानाच्या आघातामुळे अनेक विधी ग्रंथालये आपले सामर्थ्य ई-साधने, ऑनलाइन डेटाबेस इत्यादीच्या समावेशाने वाढवत आहेत. गणन यंत्राक्षरे बोटाने बटण दाबताच मिळणारी माहिती ही संशोधकाला व ग्रंथपालांना नेटवर उपलब्ध करून विधी व्यावसायिकांना देता येईल. Pillai (2002) world wide web (www) ने संशो धकांना विशेषतः विधी संशो धकांना अधिक सुसंधी मिळवून दिली आहे. नवीन विधी व्यावसायिक पिढीस स्वतःच्या राष्ट्रच्या कायद्यांसोबत इतर देशांच्या कायद्यांचे उत्तम प्रतीचे ज्ञान आज आवश्यक आहे.

भारतातील विधी शिक्षण:

प्राचीन भारतातील विधी शिक्षणाचा संक्षिप्त इतिहास : प्राचीन भारतात कायद्याला धर्म असे संबोधले जायचे व चार वेदांना कायद्याचे स्रोत मानले जात होते. वेद पवित्र मानले जातात. विशेषतः ॠग्वेद (ॠगावेद) हे महत्त्वाचे स्रोत मानून हिंदू समाज व समाजातील मूल्य सांभाळणारे मानत. 'मनुस्मृती' हा कायद्याचा संग्रह मानला जातो. त्यात व्यक्तिगत, सामाजिक अधिकार व कार्ये दिलेली आहेत. न्यायालयाची सुरुवात ही एकदम खालच्या स्तरापासून झाली. खेडेगावात ग्राम न्यायालये चालत होती. त्यात गावाचा मुखिया / मुख्य

माणूस भांडण-तंटे ऐकून न्याय करीत असे. त्यावर सुनावणी जिल्हा न्यायाधीशाकडे होत असे व त्यानंतर राजाच्या दरबारात पुढील निवाड्यासाठी जात असे.

सध्या अस्तित्वात असलेल्या विधी प्रणालीची सुरुवात 1774 मध्ये अतिउच्च न्यायालयाच्या कलकत्त्यातील स्थापनेने झाली. सुरुवातीला वकील होण्यासाठी पर्शियन भाषेचे ज्ञान असणे आवश्यक होते पण सन 1826 नंतर पर्शियन भाषेचे परिवर्तन हे इंग्रजी भाषेत झाले. भारतात औपचारिक शिक्षण 1855 साली अस्तित्वात आले. जेव्हा प्रथमच विधी प्राध्यापकी कार्य सरकारी एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये 1855 मध्ये सुरु झाले. नंतर उच्च न्यायालयाची स्थापना उच्च न्यायालय कायदा अंतर्गत 1861 मध्ये झाली. ज्यात तीन श्रेणीचे वकील न्यायालयात अशिलासाठी काम पाहात होते. त्यांना बॅरिस्टर, सॉलीसिटर व वकील असे संबोधिले जात होते. त्यामागोमाग अनेक उच्च न्यायालये स्थापित झाली. ह्याचे कारण भारतातील इतर भागातही खूप खटले वाढले होते. त्यामुळे भारतातील इतर भागातही 1857 साली औपचारिक विधी शिक्षण सुरू झाले. तीन विद्यापीठांतून विधी शिक्षण हा विषय शिकविला जाऊ लागला. ती तीन विद्यापीठे म्हणजे मद्रास, कलकत्ता व मुंबई ही होती.

लिगल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, 1879 ला पारीत केला गेला. त्याच्यामुळे उच्च न्यायालयांमध्ये व इतर कनिष्ठ कार्यालयात वकिली व्यवसाय करणाऱ्यांची यादी राखली जाई. उच्च न्यायालये वकिलांची परीक्षा घेत व त्यात उत्तीर्ण झालेल्यांनाच न्यायालयात दावे चालविण्याची मुभा दिली जात होती. मुंबई व मद्रास विद्यापीठांनी प्रथमच विधी पदवी प्रदान केली. जे वकिली व्यवसाय करण्यास योग्य होते त्यांना पदवी प्रदान करण्यात आली, कारण त्यांनी 10 वर्षे व्यवसाय करणाऱ्या ज्येष्ठ वकिलांकडे प्रशिक्षण घेऊन उच्च न्यायालयाची परीक्षा उत्तीर्ण केली होती.

वकील, बॅरिस्टर व सॉलीसिटर यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीतील फरक, विशेषतः ज्या खास सवलती बॅरिस्टर्सना दिल्या जात होत्या त्यामुळे सर्वत्र नाराजी होती. ऑल इंडिया बारची निर्मिती व्हावी अशी देशभर मागणी झाली. 1923 साली इंडियन बार कमिटीची स्थापना सर एडवर्ड शामियर ह्यांच्या अध्यक्षतेखाली हे मुद्दे पडताळण्यासाठी झाली.

Benjamin (2007) ह्या समितीच्या सूचनांवरुन इंडियन बार कौन्सिल हा कायदा 1926 मध्ये पारित झाला. त्या कायद्यामुळे विविध उच्च न्यायालयामध्ये बार कौन्सिल निर्माण झाले. ह्यात वकील व त्यांच्या क्षेत्रातील समस्यांना न्याय मिळाला.

स्वतंत्र भारतात विधी शिक्षण:

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ऑल इंडिया बार कमिटी, 1951 मध्ये अतिउच्च न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. दास यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. त्यांच्या सूचनेप्रमाणे बार कौन्सिल प्रत्येक राज्यांत स्थापन करून नावनों दणी करणे, स्थगिती देणे, कामावरुन कमी करणे अशी कार्य करतील. त्यांनी हे देखील सूचित केले की, प्लीडरशीपची परीक्षा वर्ज्य करावी व जे विधी पदवीधर नसतील त्यांची नावे वकिली व्यवसायाच्या यादीत नों दवू नयेत. 1961 साली ॲडव्होकेट ॲक्ट पारीत झाला. ज्याच्या अन्वये ऑल इंडिया बार कौन्सिल व प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र बार कौन्सिल स्थापन झाले. त्याच्याप्रमाणे न्यायालयात वकीली व्यवसाय करण्यासाठी किमान दर्जाचे नियम प्रस्थापित केले. त्यामुळे तीन वर्षाचा विधी अभ्यासक्रम 1967 पासून सर्व भारतातील विद्यापीठांनी सुरू केला.

Benjamin (2007) स्वातंत्र्याच्या काळात ज्यांना वकिली व्यवसाय करण्याची इच्छा असे, ते प्रथम इंग्लंडला जात व इंग्लिश बारमध्ये बॅरिस्टर म्हणून नाव नों दवत. ज्यांना हे परवडत नसे ते कोणत्याही भारतीय विद्यापीठातून विधी शाखेची पदवी घेऊन प्रांतीय किंवा राज्याच्या बार कौन्सिलची परीक्षा देऊन व्यावसायिक वकील

म्हणून प्रांतीय किंवा राज्याच्या उच्च न्यायालयात नाव नोंदवत असत. विद्यापीठात विधीचा अभ्यासक्रम दोन वर्षाचा होता व प्रत्येक वर्षाच्या शेवटी विद्यापीठाची परीक्षा होती. पदवी मिळाल्यानंतर त्यांना वर्षभर व्यावसायिक वकिलांकडे प्रशिक्षण घ्यावे लागे व त्यानंतर ते राज्य बार कौन्सिलची परीक्षा देण्यास पात्र ठरत. वकिली व्यवसायावर बार कौन्सिलचे नियंत्रण होते व अभ्यासक्रमावर विद्यापीठाचे नियंत्रण होते.

द ॲडव्होकेट ॲक्ट,1961 ने बार कौ न्सिल ऑफ इंडियाला विधी शिक्षणाच्या योग्यतेचे मोजमाप करण्याची जबाबदारी दिली व विधी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचीदेखील जबाबदारी सोपविली. 1967 साली त्यांनी विधी अभ्यासक्रम तीन वर्षाचा सुचविला व सर्व भारतातील विद्यापीठांनी तो स्वीकारला. एक वर्षाची उमेदवारी व बारची परीक्षा वर्ज्य करून त्या जागी एलएल.बी.च्या अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष शिक्षण देण्याचे ठरविले. बीसीआयने वेळोवेळी बदल घडवून नवीन विषय सुरू केले. ज्यावेळी विद्यापीठांना 5 वर्षांचे एलएल.बी. अभ्यासक्रम सुरू करण्यास उद्युक्त केले. ह्या पर्वाची सुरुवात नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया, युनिव्हर्सिटी, बेंगलोरने 1986 मध्ये केली. याच्या नियमित अभ्यासक्रमाचे कार्य 1 जुलै 1988 ला सुरू झाले. भारतीय विधी शिक्षण प्रणालीत यामुळे नवीन बदल घडवून आला, जो समान कायद्याच्या राष्ट्रंमध्ये पूर्णतः वेगळा होता.

पाच वर्षीय अभ्यासक्रमाचा उद्देश प्रगत दृष्टिको न ठेवून, समाजाची जाणीव बाळगून नवीन कायद्यांच्या तत्त्वावर नवीन समाज घडविणे हा होता. पाच वर्षीय अभ्यासक्रमाचे दोन भाग आहेत. पहिली दोन वर्षे विधीअगोदरचा अभ्यास शिकविला जातो व त्यानंतरची तीन वर्षे विधी अभ्यासक्रम शिकविला जातो. पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमने विधी व्यवसायाला पूर्ण वेळेचे महत्त्व प्राप्त करून दिले.

भारतातील विधी शिक्षणाची सद्यस्थिती:

विधी शिक्षणाविषयी नेहमी बोलले जाते की, हे तांत्रिक शिक्षण आहे की बौद्धिक, बुद्धिमत्तेच्या माध्यमातून मिळालेले आहे. तसे अनेक मान्यवरांनीदेखील विधी ग्रंथालयाला लॅबोरेटरी असे संबोधित

केले आहे. भारतात सुरुवातीला विधी शिक्षण परंपरागत स्वरूपात तीन वर्षाचा पदवी अभ्यास म्हणून चालविला जात होता. तथापि, 1987 पासून ही संरचना बदलण्यात आली आहे. भारतातील विधी आयोग आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया यांनी दिलेल्या सूचनेनुसार विधीच्या विशेषाधिकारातील विधी विद्यापीठांची स्थापना करण्याच्या बाबतीत भारतातील पहिले नॅशनल लॉ स्कूल बेंगलोरमध्ये स्थापित झाले. याचे नाव नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी (NLU) असे आहे. त्यानंतर इतर विद्यापीठांची स्थापना झाली व पाच वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमास सुरुवात झाली. ही विधी विद्यापीठे विधी शिक्षणासाठी एक बहुशिस्तबद्ध आणि एकीकृत पद्धत प्रदान करण्यासाठी होती, म्हणून भारतामध्ये एलएल .बी. किंवा बी.एल.ऐवजी दुसरी एक विधीशाखेची पदवी मंजूर करण्यात आली.

नॅशनल लॉ स्कूलचा पाच वर्षाचा विधी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना पुढील पदव्या दिल्या जातात. त्या म्हणजे बी.ए.एलएल.बी.(ऑनर्स) / बी.एस्सी, एलएल.बी.(ऑनर्स) / बी.कॉम.एलएल.बी.(ऑनर्स) / बी.बी.ए.एलएल.बी.(ऑनर्स) या पदव्या दिल्या जातात तीन व पाच वर्षाच्या बॅचलर डिग्रीशिवाय मास्टर इन लॉ, डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.), एम.बी.एल.एल.एल.एम. / एम.बी.ए. एलएल.एम. हे अभ्यासक्रम भारतात उपलब्ध आहेत. त्यानंतर ॲडव्होकेट ॲक्ट 1961 अंतर्गत पाच वर्षांचा एकत्रित विधी पदवी देणाऱ्या अनेक विधी महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली.

नॅशनल लॉ स्कूलच्या स्थापनेनंतर विधी महाविद्यालयांमध्ये सन 2000 पासून आमूलाग्र बदल होण्यास सुरुवात झाली Moily (2010). गेल्या 10 वर्षांमध्ये नॅशनल लॉ स्कूलचा आकडा एकवरून चौदावर गेला. Bar and Bench प्रमाणे मे 2010 मध्ये भारतात 913 विधी महाविद्यालये होती. आजमितीला त्यांची संख्या पंधराशे पेक्षा जास्त आहे. बार कौन्सिलऑफ इंडियाला या सर्वांवर लक्ष ठेवणे

फार कठीण झाले आहे. विधी महाविद्यालयांचा दर्जा उच्च राखण्यासाठी व व्यावसायिक दर्जा उंचविण्यासाठी प्रत्येक राज्यातील सरकारने आपल्या राज्यासाठी एक कायद्याचे विद्यापीठ स्थापन करावे. त्यामध्ये प्रमाणित विधी शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी राज्यांतील सरकारांनी कायद्याची स्वतंत्र विद्यापीठे स्थापित केली, ज्यांच्याद्वारे विधी शिक्षणाचा दर्जा पाहिला जातो. खालील कायद्याची विद्यापीठे भारतात उपलब्ध आहेत.

भारतातील विधी विद्यापीठे :

| अनु.क्र. | विद्यापीठाचे नाव | ॲक्टनुसार स्थापना वर्ष |
|---|---|---|
| 1 | नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी बेंगलोर, कर्नाटक | 1987<br>1986 चा कर्नाटका ॲक्ट |
| 2 | डॉ.बी.आर. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू, चेन्नई | 1996<br>1987 चा लेझिस्लेशन ॲक्ट 43 |
| 3 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, भोपाळ | 1997<br>1997 चा ॲक्ट नं. 41 |
| 4 | वेस्ट बंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युडिशियल सायन्सेस कलकत्ता,वेस्ट बेंगॉल | 1999<br>वेस्ट बेंगॉल ॲक्ट IX |
| 5 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, जोधपूर | 1999 मधील जोधपूर ॲक्ट |
| 6 | NALSAR युनिव्हर्सिटी ऑफ लॉ, हैद्राबाद | 1998<br>1998 चा आंध्र प्रदेश ॲक्ट 34 |
| 7 | गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, गांधीनगर | 2003<br>2003 चा गव्हर्नमेंट ऑफ गुजराथ नॅशनल युनिव्हर्सिटी ॲक्ट |
| 8 | हिदायतुल्ला नॅशनल लॉ | 2003 |

| | | |
|---|---|---|
| | युनिव्हर्सिटी, रायपूर | 2003 चा छत्तीसगढ अ‍ॅक्ट नं. 10 |
| 9 | नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅडव्हान्स लिगल स्टडिज, कोची | 2005<br>2005 चा केरला अ‍ॅक्ट 27 |
| 10 | राम मनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, लखनौ | 2005<br>2005 चा उत्तर प्रदेश अ‍ॅक्ट नं. 10 |
| 11 | राजीव गांधी नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लॉ, पटियाला | 2006<br>2006 चा पंजाब अ‍ॅक्ट नं. 12 |
| 12 | चाणक्य नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, पटणा | 2006<br>2006 चा बिहार अ‍ॅक्ट नं. 24 |
| 13 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, दिल्ली | 2008<br>2008 चा अ‍ॅक्ट नं. 1 |
| 14 | कर्नाटक राज्य लॉ युनिव्हर्सिटी, हुबळी | 2009<br>2009 चा कर्नाटका अ‍ॅक्ट नं. 11 |
| 15 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, औरंगाबाद | 2016<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अ‍ॅक्ट VI |
| 16 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर | 2017<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अ‍ॅक्ट VI |
| 17 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई | 2014<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अ‍ॅक्ट VI |

| | | |
|---|---|---|
| 18 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, कटक, ओरिसा | 2008<br>2008 चा ओरिसा ॲक्ट |
| 19 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ॲण्ड ज्युडिशिअल अकॅडेमी, गुवाहाटी, आसाम | 2009<br>2009 चा आसाम ॲक्ट नं. 25 |
| 20 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ऑफ स्टडी ॲण्ड रिसर्च इन लॉ, रांची, झारखंड | 2010<br>2010 चा झारखंड ॲक्ट नं. 4 |
| 21 | दामोदरम संजीवाय्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी,विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश | 2008<br>2008 चा आंध्रप्रदेश ॲक्ट |
| 22 | तामिळनाडू नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू | 2012<br>2012 चा तीरुचीलापल्ली तामिळनाडू ॲक्ट |
| 23 | हिमाचल प्रदेश नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, सिमला | 2016<br>2016 सिमला ॲक्ट |

परंपरागत पद्धतीने विधी शिक्षणात सद्यपरिस्थितीत अनेक बदल घडून आले आहेत. हे बदल घडूवन आणणारे राष्ट्रीय विधी विद्यालये (National Law Schools) व जागतिक विधी विद्यालये (Global Law Schools) आहेत. आंतरराष्ट्रीय Moots उन्हाळी शाळा (Summer Schools) व अदलाबदलीचे कार्यक्रम (Exchange Programmes) र्माफत विद्यार्थ्यांना नवीन व बदलत्या विधी शिक्षणाला सामोरे जाण्यासाठी सज्ज केले जात आहे.

विधी शिक्षणात सुधारणा :

विधी शिक्षणात महाविद्यालयांना उच्च व सन्मानाचे स्थान आहे. हे स्थान अधिक उंचावल्यास विधी शिष्यवृत्ती आणि संशोधन क्षेत्र सशक्त बनू शकते. विधी शिक्षण मूलतः शिस्तबद्ध, बहुउद्देशीय शिक्षण आहे, जे राष्ट्रीय विकास आणि सामाजिक परिवर्तनात अधिक

रचनात्मक पद्धतीने योगदान देतात. जागतिकीकरणाने भारतातील विधी शिक्षणाच्या भविष्यासाठी अनेक आव्हाने उभी केली आहेत. भारतात कोठेही बहुराष्ट्रीय कंपन्याचे आगमन झाल्यास वकिलांचे कार्य अत्यंत तांत्रिक असते. आवश्यक शिक्षण विधी शिक्षणाच्या योग्य सांस्कृतिक प्रशिक्षण घेणारे सक्षम वकील असणे आवश्यक आहे. विधी शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी हा एक आदर्श प्रकार आहे.

विधी शिक्षण केवळ कायद्याची निर्मिती करणाऱ्यांना (वकिलांना) नव्हे तर विधी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करुन गंभीरपणे विचार करण्यास लावणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांचे विचार स्पष्टपणे, खात्रीपूर्वक व सखोल लिखाणासाठी त्यांच्या अशिलांचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करण्यास प्रवृत्त करणारे असणे आवश्यक आहे.

विधी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना विधी शिक्षकांनी नवीन माहिती सुसंवाद तंत्रज्ञान वापरासंबंधी प्रशिक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. अशा तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थीकेंद्रीत शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये आणि विधी शिक्षणात वेळोवेळी सहभाग घेणे, व्यावहारिक आणि बौद्धिक उत्तेजन देणारे शिक्षण देणे आवश्यक आहे.

विधी शिक्षण सुधारण्यासाठी आयोग :

भारतात विधी शिक्षण सुधारण्यासाठी अनेक आयोग स्थापित केले, ते खालीलप्रमाणे आहेत :

1) कलकत्ता विद्यापीठ आयोग (1917 - 1919)

2) विद्यापीठ शिक्षण आयोग (1948 - 1949)

3) 1949 मध्ये विधी शिक्षण समिती ही शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी स्थापित करण्यात आली.

अखिल भारतीय बार समितीने 1951 मध्ये काही शिारशी केल्या हो त्या. 1954 मध्ये चौदावा विधी आयोग अहवाल आला, ज्यामध्ये भारताच्या विधी शिक्षणाची स्थिती आणि त्यात सुधारणा याबद्दल चर्चा व मान्यता देण्यात आली. ॲडव्होकेट्स ॲक्ट, 1961 हा विधी शिक्षणाचा केंद्रबिंदू झाला. भारतीय बार परिषद अंतर्गतचे

नियम हे ॲडव्होकेट्स ॲक्ट, 1961 मध्ये समावेश करण्यास इंडियन लॉ इन्स्टिट्यूट (दिल्ली) ची स्थापना झाली.

इंडियन लॉ इन्स्टिट्यूट (www.ilidelhi.org) ची स्थापना 1956 मध्ये प्रामुख्याने विधी संशोधनाच्या उद्देशाने केली गेली. ही संस्था नोंदणी कायदा 1860 अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आली आहे. ह्या संस्थेला स्वायत्तता प्राप्त झाली आहे. इंडियन लॉ इन्स्टिट्यूटचे ग्रंथालय देशात अनेक ग्रंथालयांपैकी एक सर्वोत्तम ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात 75,000 पेक्षा जास्त टायटल्स आहे. त्यात 270 विधी नियतकालिकांचे सदस्यत्व आहे. संस्थेला त्याची उद्दिष्टे अंमलात आणण्याचे आवश्यक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य आहे. मानवी संसाधन व विकास मंत्रालयाच्या शासन निर्णय सूचना क्रमांक फ 9-9/2001 - 03.03.2004 दिनांक 29.10.2004 च्या अंतर्गत अभिमत विद्यापीठ म्हणून दर्जा मंजूर करण्यात आला.

विधी शिक्षण सुधारण्यासाठी आयोग विधी शिक्षणावर राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे अहवाल :

राष्ट्रीय ज्ञान आयोगाची 2005 मध्ये भारताचे पंतप्रधान यांच्या हस्ते स्थापना करण्यात आली. त्याचा उद्देश भारताला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था मिळावी आणि त्यासाठी विविध सुधारणा कार्यक्रम राबविण्यात यावेत. समाजासाठी त्यात विविध शिारशी सुचविण्यात याव्यात, या उद्देशाने त्या आयोगाची स्थापना करण्यात आली. एन.के.सी.चे कार्य महत्त्वपूर्णपणे व्यावसायिक शिक्षण आणि विशेषतः विधी शिक्षणक्षेत्रात आहे. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन एन.के.सी.ने देशात विधी शिक्षणाच्या कार्यरत गटाची स्थापना केली. एन.के.सी.च्या अध्यक्षांनी काही सदस्यांची नेमणूक केली. त्यामध्ये श्री. साम पित्रोदा, कार्यरत गटाचे सदस्य न्यायमूर्ती जगन्नाथराव (अध्यक्ष), न्यायमूर्ती लीला सेठ, डॉ. माधव मेनन, डॉ. बी. एस. चिमणी, डॉ. मोहन गोपाल, श्री. पी. पी. राव आणि श्री. निशीय देसाई यांचा समावेश आहे. या कार्यरत गटाने गुणवत्ता आणि प्रमाणके विधी शिक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे विषय हाताळले आहेत.

1) विधी शिक्षणाची सद्यस्थिती आणि पुढील योजना आणि त्यासाठी व्यापक धोरण.
2) विधी शिक्षणाचे विषय व व्याप्ती.
3) हुकूमत संरचना
4) केंद्र सरकारने निधी उपलब्ध करुन दिलेले आणि 100 कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले कमीत कमी चार स्वतंत्र संशोधन केंद्र.
5) प्रवेश, अर्थसाह्य पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन.

समारोप :

भारतातील कायद्याची पाळेमुळे जरी पुरातन रूढीवर आधारित असली तरी आजचे विधी शिक्षण आंतरराष्ट्रीय पातळीवरील होण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया निरतंर प्रयत्न करीत आहे. आपला समाज न्यायाधिष्ठित समाज आहे विधीविषयक ज्ञानाची गरजही संविधानिक संदर्भात जरूरी ठरते आणि त्यामुळे गेल्या चाळीस वर्षात विधी शिक्षणात आमूलाग्र बदल झाला आहे. विधी शिक्षणाचे कार्य हे वकिली व्यवसायात विशेषज्ञ निर्माण करणे हे आहे. जेणेकरून सर्व समाजाची प्रगती होईल व सरतेशेवटी पूर्ण राष्ट्राची प्रगती होईल .

वकील, बॅरिस्टर व सॉलिसिटर यांना आज समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशभरात जवळजवळ 1500 विधी महाविद्यालये आजमितीला असून, त्यातील 780 खाजगी 270 सरकारी 80 Pvt. Public आहेत. देशात एकूण तेवीस विधी विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय उन्हाळी शाळा, अदलाबदलीचे कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जातात.

**संदर्भ**


1. Bhavani, J. K. C. (1962). Legal Education in India. *Journal of India Law institute*, *IV*. 167.
2. Farlex Free Dictionary (2014). Retrieved from http://www.thefreed ictio nary.com/law
3. Katju, K. K. (1961). The Days I Remember, II (52). 373-374.
4. Ludu, Rocher. (1986), Lawyer's in classical Hindu Law, *India Bar Review, 13* (3&4).

5. Markose, A.T. (1986). A Brief History of the steps taken in India for Reform of Legal Education. *Journal of the All India Law Teachers Association*, 75.
6. Maxwell, K. T. and Schafer, B. (2008). Concept and context in legal information retrieval. The Twenty-First Annual Conference on *Legal Knowledge and information Systems*. Nertherland: JURIX, 63-72. Retrieved from https://www.researchgate.net/profile/Burkhard_Schafer/publication/220809928_Concept_and_Context_in_Legal_Information_Retrieval/links/0fcfd50d9a01e4d11a000000.pdf
7. Moily, V. (2010). Law Minister Announces Vision for Legal Education Reform: A vision statement delivered by the Law Minister veerappa consultation for second Generation Reform in Legal Education held at the vigyan Bhavan,*The Bar council of India*, New Delhi. Retrieved from http://www.barcouncilofindia.org/law-ministers-vision-statement-for-second-generation-reforms-in-legal-education/

Pillai, K.N. Chandrasenkharan (2012). Legal Education and the Digital Era in Singh, R., Devroa, S., Rai, P. & Singh, A. (Eds.) International conference on Access to *Legal information and Research in Digital Age*. New Delhi, National Law University. Retrieved from http://nludelhi.ac.in/download/publication/2015/august/Conference%20Proceeding-International%20Conference%20on%20Access%20to%20Legal%20Infomration%20and%20Research%20in%
9. 0Digital%20Age%202012.pdf
10. Schmittheener, S. (1986). A sketch of the Development of the legal. Profession in India. *India Bar Review, 13* (3&4). 309.
11. Singh, J. A. (2011). Workshop on Research, ethics, and law. Faculty of Arts, University of Zululand at Protea Hotels, Empangeni.

**Books :**

1. Garner, B. A. and Black, H. C. (2004). *Black's law Dictionary*. 8th ed. St. Paul, M. N.: Thomson / West Group.
2. Gupta, S. and Mehta, P. L. (2000*). Legal Education and Profession in India*, Delhi, Deep and Deep Publications Pvt. Ltd.

3. Jayswal, K.P.(2011). *An Imperial history of India*, United Kingdom ,Nabu Press.
4. Retrieved from https://www.archive.org/details/imper...toryo035289mbp
5. Koul, A. K. (1999). Proceedings of the All India Law Teachers Congress. *Legal Education in India in 21st century problems and prospects*, Delhi, University of Delhi faculty of Law.
6. Saran, P. (2002). *The provincial Government of the Mughals.* New Delhi, Reliance Publishing House.

***

# “भारतीय स्वातंत्र्य लढयातील रणरागिणी”

**डॉ. रामहरी चांगदेवराव फाटक**

विभाग प्रमुख इतिहास, कला व विज्ञान महाविद्यालय,गढी

**प्रस्तावना :**

भारत या देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिलेले आहे. लहान-थोर सर्व जनता स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आसुसलेली होती. स्वातंत्र्याच्या या आंदोलनामध्ये स्त्रिया देखील मागे नव्हत्या. महिलांनी आपले घरदार, कुटूंब ही जबाबदारी सांभाळत भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सहभाग नोंदवला. असहकार,सत्याग्रह,ब्रिटिशांना विरोध, विदेशी मालावर बहिष्कार असे विविध उपाय त्यावेळच्या महिलांनी केले.

गांधीजींच्या व्यक्तिमत्वामुळे भारतातील व विदेशांतील अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. राष्ट्राच्या उन्नतीसाठी महात्माजींनी जे अनेक कार्यक्रम हाती घेतले त्या विविध कार्यक्रमात सहकारी म्हणून स्त्रियांना सामील करुन घेतले. गांधीजीकडून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. राष्ट्राच्या उन्नतीसाठी महात्माजींनी जे अनेक कार्यक्रम हाती घेतले. त्या विविध कार्यक्रमात सहकारी बदलून स्त्रियांना सामील करुन घेतले. गांधीजीकडून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया घराबाहेर पडल्या व स्वातंत्रय चळवळीमध्ये उतरल्या स्त्रिया या राष्ट्राच्या नागरीक आहेत म्हणून त्यांनीही पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीध्ये भाग घेतला पाहिजे अशी भूमिका गांधीजींनी मांडली होती.

आज समाजामध्ये स्वातंत्र्यलढयामध्ये गरीब ते गर्भश्रीमंत स्त्रियापर्यंत अनेक प्रकारच्या स्त्रियांनी केलेल्या कामगिरीबद्दल बरेच अज्ञान आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यलढयात भाग घेणाऱ्या आणि सर्वस्वांचे समर्पण करणाऱ्या या शूर महिलांचा भारताच्या या अमृत महोत्सवी वर्षामध्ये आपण अल्पसा परिचर करुन घेतला पाहिजे. अशाच काही महिलाबद्दल या लेखात आपण जाणून घेऊयात.

**बेगम हजरत महल -** राणी लक्ष्मीबाईचा स्वातंत्र्य लढा जर कोणी चालू ठेवला असेल तर तो अवधच्या बेगम हजरत महलने. तिचा लढा केवळ आपले राज्य वाचावे याकरीताच नव्हता तर ब्रिटिशांनी जे मंदिर आणि मस्जिद उध्वस्त करण्याचे धोरण अवलंबीले होते त्या धोरणासाठी बेगमने विरोध केला आणि आपलं बलिदान दिलं.

**भिकाजी कामा -** या देशातील सर्व धर्माच्या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सहभाग नोंदवल्याचे आपल्याला त्या वेळच्या इतिहासावरुन लक्षात येते. पारशी धर्मातील स्त्री-पुरुषही या स्वातंत्रयाच्या चळवळीमध्ये मागे नव्हते. पारशी धर्मातीलच एक जण म्हणजे मादाम कामा एका सधन पारशी घरातून आलेल्या या महिलेने आपली सर्व संपत्ती अनाथ मुलींच्या अनाथश्रमासाठी देऊ केली आणि स्त्री-पुरुष समानता यासाठी चळवळ हाती घेतली.

**कित्तूर राणी चन्नम्मा -** कर्नाटकातील कित्तूरमधील राणी चन्नमा हिने इंग्रजांच्या धोरणाविरुध्द आवाज उठवला. सैन्याने केलेल्या उठावाचे तिने नेतृत्व केले. वयाच्या 33 व्या वर्षी तिने ब्रिटिश फौजेच्या विरुध्द लढा दिला.

**कमलादेवी चट्टोपाध्याय -** ब्रिटिशांनी अटक केलेली पहिली महिला म्हणजे कमलादेवी चटोपाध्याय. कमलादेवी या खऱ्या समाजसुधारक

पण समाजसुधारणा करत-करत त्यांनी स्वातंत्र्यलढयातही सहभाग नोंदवला. मुळ त्या नाटकातील एक कलाकार,पण स्वातंत्र्य लढयात त्यांनी मोठ काम केलं. स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक लघुउद्योग त्यांनी सुरु केले. अखिल भारतीय महिला परिषद त्यांनी स्थापन केली. कमलादेवींनी गांधीजीच्या 1930 च्या मिठाच्या सत्यागृहात भाग घेतला होता.

**कॅप्टन लक्ष्मी सहगल –** नेताजींच्या आझाद हिंद फौजेतील स्त्रियांच्या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी केले. आझाद हिंद सेनेबरोबर काम करतांना लक्ष्मी सहगल यांनी हेच दाखवून दिलं की, अहिंसक मार्गाने होणारे आंदोलन असो किंवा लढाई करण्याची वेळ येवो महिला कुठेही मागे नाहीत.

**अरुणा आसफअली –** 'द ग्रेट ओल्ड लेडी' म्हणून त्या ओळखल्या जात. भारत छोडो आंदोलनाच्या वेळेस मुंबईमध्ये त्यांनी भारताचा ध्वज हातात घेऊन आंदोलनाचे नेतृत्व केले. ब्रिटिशाविरुध्द आवाज उठवला म्हणून त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असतांना कैदांना देण्यात येणाऱ्या वाईट वागणुकीबद्दलही त्यांनी आंदोलन केले.

**कनकलता बरुवा –** कनकलता बरुवा या भारतीय स्वातंत्र्यलढयातील वीरबाला म्हणून ओळखल्या जातात. संपूर्ण भारतभर त्यावेळेस ब्रिटिशांविरुध्द आंदोलन सुरु होते. कनकलता बरुवा या आसाममधल्या. आसाममधून त्यांनी 1942 च्या आंदोलनात भाग घेतला होता. त्या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी बारंगबारी येथून केलं. त्यावेळेस त्यांना 'भारत छोडो' च्या घोषणा देत गोहपूर पोलीस स्टेशन समोर आंदोलन करायचे होते आणि तिथे त्यांना तिरंगा फडकवायचा होता. परंतु ब्रिटिशांनी त्यांना मध्येच अडवले. त्या ब्रिटिशांना सांगत होत्या की,

आमचं आंदोलन हे हिंसक नाही तरीदेखील ब्रिटिशांनी त्यांचे काहीही ऐकून घेतले नाही. त्यांच्यावर जोरदार लाठीमार करण्यात आला आणि त्यातच वयाच्या केवळ 18 व्या वर्षी त्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले.

**फुलो आणि झानो –** भारतीय स्वातंत्र्यलढयातील बिहार व बंगाल क्षेत्रातील संथाल आदिवासींनी अत्याचारी इंग्रजाविरुध्द उठाव केले. या उठावाचे नेतृत्व फुलो आणि झानो या आदिवासी भगिनीनी आघाडीवर राहून केले. या दोन बहिनींनी एका रात्री “फुलो और झानो इन दोन बहनों को इंग्रजो की शिबीर में जाकर तलवार से 21 सिपाहीओं की हत्या कर दी” अशा या शुर पराक्रम आदिवासी भगिनीनी ब्रिटिशांना हैराण करुन सोडले होते.

**राणी आयडिनल्लू–** नागालॅडमध्ये जादोनाग यांनी ब्रिटिशाविरुध्द उठाव केले. या उठावात जादोनाग यांना त्यांची बहिण राणी गायडिनल्लूने साथ दिली. ब्रिटिशांनी जादोनांग यांना पकडून फाशीची शिक्षा दिली. यानंतर गायडिनल्लूने उठावाची सुत्रे आपल्या हाती घेऊन सैन्याचे संघटन करुन 4000 पेक्षा जास्त नागा जवानांची गुरेल्ला सेना तयार करुन इंग्रजांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. राणी गायडिनल्लूने घोषणा केली की, इंग्रज मरतील किंवा आम्ही. परंतु मागे हटणार नाही. इंग्रजांनी गायडिनल्लूला पकडण्यासाठी इनाम घोषित केला व जो पकडून देईल त्यास दहा वर्ष पर्यंत कर माफ केला. 19 जून 1932 मध्ये इंग्रज एजेंट जे.पी. मिल्स यांनी राणी गायडिनल्लूचा शोध घेण्याचे काम सुरु केले व राणीचे फोटो गावागावात लावण्यात आले. राणीला पकडण्यात इंग्रजांना यश आल्यानंतर तिला कोहीमच्या तुरुंगात ठेवण्यात आले. नंतर इंफाळच्या जेलमध्ये बंद करुन आजन्म

कारावासाची शिक्षा दिली. तुरुगात गेली तेव्हा राणी फक्त 17 वर्षाची होती. “भारत के इतिहास में सबसे कम उम्रवाली महिला क्रांतीकारी वह रही है.” भारताला स्वातंत्र्य् मिळेपर्यंत गायदिनल्लू तुरुंगातच होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिची सुटका करण्यात आली. पंडित नेहरुंनी त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या योगदानामुळे नागाराणी ही उपाधी दिली.

**सारांश –**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये अशा काही स्त्रिया आहेत की, त्यांना फारशी प्रसिध्दी मिळाली नाही. परंतु त्यांनी आपले ध्येय सोडले नाही. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील स्त्रियांचे कार्य काहीसे दुर्लक्षित राहिले ते इतिहासपटावर येणे गरजेचे आहे. तसेच आजच्या पिढीसमोर स्त्रियांनी दिलेला स्फुर्तीदायक लढयाचा इतिहास मांडणे आवश्यक आहे. पुरुषांपेक्षा महिलांची स्वातंत्र्य लढयातील भूमिका विशेष महत्वाची आहे. कारण रुढी परंपरांचा तोल ढळू न देता संसाराची जबाबदारी सांभाळत भारतीय स्त्रियांनी हा लढा यशस्वी लढला. हा आधुनिक भारतीय स्त्रियांसाठी स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांनी एक स्फुर्तिदायक असा इतिहासाचा आदर्श घालून दिला आहे.

**संदर्भ :**


1. https://www.inmarathi>14-uns...
2. https://www.weeklysadhana.in>roh...
3. तडवाल शंकर एवं सेनानी लक्ष्मण,आदिवासी विरांगणाएं, प्रकाशक दास ग्रामीण विकास केंद्र, अलीराजपूर, म.प्र.2016
4. सं.पाटील टी.एस.,अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद,27 वे राष्ट्रीय अधिवेशन, संशोधन पत्रिका 2018.
5. एस.एस.गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

# ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्येची समस्या

**प्रा. डॉ. आर. डी. खताळ**

कला व विज्ञान महाविद्यालय, गढी ता. गेवराई, जि. बीड (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. पारंपारिक काळापासूनच भारतीय समाजाचा विचार करता, भारतीय लोकसंख्येचा अधिकचा हिस्सा हा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचा असलेला आढळतो. शेती आणि शेतीचा व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या अधिकची आहे. पण अलीकडच्या काळात शेती आणि शेतीशी संबंधीत व्यवसाय करणाऱ्यांची आर्थिक स्थिती दयनिय होताना दिसते. विशेषत: शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच हालाकीची होताना दिसून येते. यातूनच शेतकऱ्याच्या आत्महत्या होताना दिसतात.

आधुनिक काळात 'शेतकरी आत्महत्या' ही भारतीय समाजातील एक प्रमुख समस्या म्हणून समोर आली आहे. भारतात शेती आणि शेतकऱ्यांना समाजाचा पालन-पोषण करणारा समजले जाते. अशा समाजात शेतकऱ्याच्या आत्महत्या होतात ही अत्यंत चिंतेची बाब आहे. आजपर्यंतच्या आकडेवारीवरुन भारतामध्ये सर्वांत जास्त आत्महत्या या प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रामध्ये होताना दिसून येतात. विशेषत: ग्रामीण विदर्भ आणि मराठवाड्यात होणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्याचे प्रमाण अधिकचे आहे.

**सन 2003 पासूनच्या दहा वर्षातील ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्या :**

| वर्षे | ग्रामीण आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|
| 2004 | 4147 |
| 2005 | 3926 |
| 2006 | 4453 |
| 2007 | 4238 |
| 2008 | 3802 |
| 2009 | 2872 |
| 2010 | 3141 |
| 2011 | 3331 |
| 2012 | 3786 |

समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा जीव सांभाळावाच वाटतो. आपणास अधिकाधिक दिवस जीवन जगता यावे यासाठी तो सतत धडपडत असतो. पण ग्रामीण शेतकरीच अधिक आत्महत्या का करतो? त्याला जीव प्रिय नाही का? असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. यासाठीच शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या कारणांचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते.

अलिकडच्या काळात इतर विविध सामाजिक समस्या बरोबरच आत्महत्या ही एक प्रमुख सामाजिक समस्या ठरताना दिसते. कारण शेतकऱ्यांची आत्महत्या हा विपरीत सामाजिक परिस्थितीचाच परिपाक ठरतो. म्हणून शेतकऱ्याला आत्महत्येस प्रवृत्त करणारी तेथील सामाजिक परिस्थिती असून त्याचे मूळ सामाजिक आणि आर्थिक

स्थितीमध्ये आहे. एमिल दरखिमनेही समाजशास्त्रामध्ये आत्महत्येला एक सामाजिक तथ्य मानले असून, त्याच्यामते आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे. म्हणून सामाजिक दृष्टीकोणातून शेतकऱ्याच्या आत्महत्येचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन पेपरमधून केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1) ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्याबाबतच्या सामाजिक आणि आर्थिक कारणांचा शोध घेणे.

2) ग्रामीण शेतकरी आत्महत्येच्या समस्येवर उपाय योजना सुचविणे.

**गृहितके :**

1) ग्रामीण शेतकऱ्यांच्या आत्महत्या सामाजिक आणि आर्थिक कारणांनी होतात.

2) ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी विविध उपाय योजनांची आवश्यकता आहे.

**संज्ञाचा अर्थ :**

**शेतकरी -**

शेतकरी ही व्यापक संज्ञा असून त्यामध्ये कृषीयोग्य जमिनीवर शासकीय नियमानुसार मालकी असणाऱ्या सर्व व्यक्तिचा समावेश होतो. तसेच दुसऱ्यांची शेतजमीन भाडेतत्त्वावर कसण्यासाठी केली असेल तर त्याची शासकीय कार्यालयामये नोंद असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला शेतकरी म्हणता येणार नाही.

**आत्महत्या -**

सर्वसामान्यपणे आत्महत्या हे समाजविरोधी आणि कायद्याविरोधी कोणत्याही व्यक्तीचे कृत्य होय. पण या कृतीला

व्यक्तीची स्वत:ची संमती असते.  एमिल दरखिमच्या मते, "आत्महत्या या संज्ञेचा वापर हा अशा प्रकारच्या व्यक्तीच्या कोणत्याही संदर्भात वापरला जातो ज्या क्रियेचा सकारात्मक वा नकारात्मक क्रियेच्या शेवट हात्याच्या मृत्यूत होत असतो "

**आत्महत्येची आर्थिक कारणे -**

१. ग्रामीण शेतकज्याच्या आत्महत्येस विविध प्रकारची आर्थिक कारणे प्रमुख ठरताततती खालीलप्रमाणे

२. नवीन आर्थिक धारणामुळे शेतकज्याच्या सबसिडीतील झालेली घट

३. शेतीमालाला योग्य बाजारभावाचा अभाव

४. शेतकज्यांचा कर्जबाजारीपणा

५. निसर्गाचा लहरीपणा

६. भौतिक सोयी-सुविधांचे आकर्षण

७. सिंचनाच्या तुटपुंज्या सुविधा

८. व्यापारी व दलालांकडून होणारी लूट

९. मजूरीचे वाढते दर आणि मजूरांची कमतरता.

१०.वाढता खर्च आणि कमी रोजगार उत्पन्न

११.बिगर कृषी क्षेत्रातील संधीचा अभाव

१२.प्रक्रिया उद्योगांची कमतरता

१३.व्यवहारिक ज्ञानाचा अभाव

१४.लघु आणि जोडधंद्याची कमतरता

१५.दर्जेदार बी-बियाणे, खते व अवजारांची कमतरता

१६.विजेचा तुटवडा

१७.शासकीय योजनांचा अभाव

१८.शासकीय धोरणातील उदासिनता

१९.वाढती महागाई

**आत्महत्येची सामाजिक कारणे -**

ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्येस काही सामाजिक कारणेही कारणीभूत ठरतात. त्यातील प्रमुख सामाजिक कारणे खालीलप्रमाणे-

1) शेतकऱ्यांतील व्यसनाधिनता
2) खोटी प्रतिष्ठा
3) आळस, अज्ञान आणि दैववाद
4) शिक्षणाची कमतरता
5) अतिरिक्त अपत्यांची संख्या
6) कौटूंबिक जबाबदाऱ्या
7) अंधश्रध्दा
8) अल्पभूधार शेतकऱ्यांचे वाढते प्रमाण
9) असंतुलित कौटूंबिक संबंध
10) कृषी क्षेत्रावरील वाढते परावलंबित्व
11) खाजगी सावकारी
12) शेतजमीनीचे विभाजन

**आत्महत्या : उपाय योजना -**

ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी उपाय-योजनांची आवश्यकता दिसूनयेते. शेतकऱ्याच्या आत्महत्येवरील प्रमुख उपाय-योजना खालीलप्रमाणे-

1) शेतकऱ्याच्या सबसिडीत वाढ
2) सिंचनाच्या सुविधांची उपलब्धता
3) शेतीपूरक व्यवसायांची निर्मिती
4) कर्जातील सुलभ पुरवठा
5) उत्पादनावर आधारित शेतीमालाला भाव

6) शिक्षणाच्या सुख-सुविधा
7) विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी
8) शेतकज्याात जाणिव जागृती करणे.
9) शेतीविषयक तंत्रज्ञानाचा विकास
10) कुटूंबाची सदस्य संख्येवर मर्यादा
11) उत्पन्न आणि खर्च यात समन्वय
12) शेतीमालाला योग्य भाव
13) शेतकज्यातील व्यसनमुक्ती
14) इतर क्षेत्रात रोजगारांच्या संधी
15) शेतकऱ्याच्या मुलांसाठी मोफत शिक्षणाच्या सोयी-सुविधा
16) शेतीला व्यवसायाचा दर्जा
17) व्यावसायिक शिक्षणाची पूर्तता
18) अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील सक्षमता

**समारोप -**

आधुनिक काळातील 'शेतकरी आत्महत्या' ही ग्रामीण प्रमुख आणि हुआयामी समस्या बनली असून यासाठी विविध घटक/कारणे कारणीभूत आहेत म्हणून एका क्षेत्रामध्ये बदल होऊन चालणार नाही. तर ग्रामीण शेतकज्यांचा सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने विविध उपाय-योजना होणे गरजेचे आहे. निसर्ग,समाज व्यवस्था, शासकीय धोरण, बदलता आर्थिक परिस्थिती आणि होणारे सामाजिक परिवर्तन याचा परिपाक म्हणजे, 'शेतकरी आत्महत्या' होय. शेतकज्याच्या आत्महत्येवर विविध उपाययोजना करुन त्या एकाएकी बंद करणे अशक्य आहे. यासाठी फक्त शासनाला जबाबदार धरुन चालणार नाही. म्हणून शेतकज्याच्या आत्महत्येच्या बाबतीत समाजाचा एक घटक म्हणून त्यांना परिवर्तनाच्या आणि विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातून प्रयत्नाच्या माध्यमातून व शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून

ग्रामीण शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण हळूहळू कमी होण्यास मदत होईल आणि एक दिवस ग्रामीण माथी लागलेला शेतकरी आत्महत्येचा कलंक नक्कीच पुसला जाईल यात शंका नाही.

**संदर्भ :**


1) शेतकरी मासिक
2) दैनिक दैशोन्नती
3) बळीराजा मासिक
4) ढोबळे विष्णू - शेतकऱ्याच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका
5) दैनिक सकाळ
6) लोकराज्य
7) डॉ.गव्हाणे एस.जे. शेतकऱ्याच्या आत्महत्या, दै.महाराष्ट्र टाईम्स


***

# महाराष्ट्रातील सिंचन सुविधा


## प्रा. डॉ. विजय मांटे

अर्थशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय अमळनेर


प्रस्तावना –

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास त्या देशाच्या उद्योग क्षेत्रावर अवलंबून असतो परंतु उद्योग क्षेत्राचा विकास होण्यासाठी कृषी क्षेत्राचा सुद्धा विकास होणे आवश्यक असते. कृषी क्षेत्राचा विकास होण्यासाठी पाणीपुरवठा, वीज, वाहतूक व्यवस्था, पतपुरवठा, विपणन व्यवस्था आणि मुबलक आदाने या बाबी आवश्यक असतात या सर्वांमध्ये महत्त्वाचा घटक म्हणजे सिंचन व्यवस्था होय. सिंचनाचा मूलभूत उद्देश कृषी उत्पादनात वाढ करून ग्रामीण जीवन समृद्ध करणे हा आहे. त्याचप्रमाणे अलीकडील काळात वाढती लोकसंख्या, तसेच वाढत जाणारी उद्योगक्षेत्राची संख्या आणि इतर कारणासाठी पाण्याची मागणी वाढत आहे आणि विशेष म्हणजे शाश्वत विकासाची जी उद्दिष्टे ठेवण्यात आली आहे त्यामध्येही पाण्याच्या बचतीवर लक्ष देण्याचे सूचित केले आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे-**

1) राज्यातील कृषी क्षेत्राचा आढावा घेणे
2) महाराष्ट्रातील जलसंपत्तीचा अभ्यास करणे
3) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत संशोधनासाठी संपूर्णपणे दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केलेला असून यामध्ये विविध लेख, अहवाल,मासिके, वृत्तपत्रे, तसेच इंटरनेट वरील विविध संकेत स्थळावरील माहितीचा आधार घेतलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राची आर्थिक पाहणी आणि जलसंपदा विभाग अहवालातून सांख्यकीय आकडेवारी घेऊन विश्लेषण केले आहे

महाराष्ट्राने भारताचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेला आहे आणि राज्याला अरबी समुद्राची सुमारे 720 किलोमीटर लांबीची

समुद्र किनारपट्टी लाभलेली आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 11.24 कोटी इतकी लोकसंख्या आणि 3.08 लाख चौरस किलोमीटर इतके भौगोलिक क्षेत्र लाभलेल्या महाराष्ट्राची लोकसंख्या प्रमाणे देशात दुसरा क्रमांक आणि भौगोलिक क्षेत्रानुसार तिसरा क्रमांक लागतो. राज्यात मोठ्या प्रमाणावर नागरी करण झाले असून 45.2 टक्के इतकी लोकसंख्या शहरात राहते राज्यात उष्ण कटिबंधीय मोसमी हवामान असते. राज्यात पर्जन्याच्या स्वरूपामध्ये स्थळ व कालावधी बाबतीत खूप तफावत आढळते. राज्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान 400 ते 6000 मिलिमीटर या दरम्यान असते. राज्यात वारंवार अवर्षण परिस्थिती उद्भवत आहे जवळजवळ 42.50 टक्के इतके क्षेत्र अवर्षण प्रवण आहे.राज्यातील 2015-16 नुसार पिकाखालील एकूण क्षेत्र 22.9 लक्ष हेक्टर इतके आहे व पेरणी खालील क्षेत्र 17.9 दशलक्ष हेक्टर इतकी आहे आणि एकापेक्षा अधिक वेळा पेरणी खालील क्षेत्र 5.92 दशलक्ष आहे राज्यातील अर्धी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे

**राज्यातील जलसंपत्ती-**

राज्यातील क्षेत्र गोदावरी, कृष्णा ,तापी ,नर्मदा आणि पश्चिम वाहिनी नद्यांची खोरे या पाच प्रमुख नदी खोऱ्यात व्यापले आहे. तसेच राज्याच्या ईशान्य भागातील अत्यल्प क्षेत्र ही महानदीच्या खोऱ्यात येते.राज्याच्या जलसंपत्तीची अंदाजीत सरासरी वार्षिक उपलब्धता 198 अब्ज घनमीटर इतकी असून त्यात 164 अब्ज घनमीटर इतक्या भूपृष्ठ जलाचा आणि 34 अब्ज घनमीटर इतक्या भूजलाचा समावेश आहे. जून 2017 पर्यंत राज्यस्तर जलसंपत्ती प्रकल्पामार्फत 42.85 घनमीटर इतकी साठवण क्षमता निर्माण झाली आहे.

पश्चिम वाहिनी नद्या वगळता उर्वरित चार नद्यांची खोरी महाराष्ट्र व लगतच्या राज्यांशी सामायिक आहे. आंतरराज्य नदी यासंबंधीचे पाणी वादाचे निवाडे, करारनामे आणि निर्णय यामुळे

राज्याला भूपृष्ठावरील जलसंपत्तीच्या वापरास सुमारे 126 अब्ज घनमीटरची मर्यादा असून त्यापैकी 69 अब्ज घनमीटर इतके प्रमाण पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यांचे आहे. या क्षेत्राचे लागवडी योग्य क्षेत्र फारच मर्यादित 10.6 टक्के असून त्यात सह्याद्री पर्वत रांगा व अरबी समुद्र यादरम्यान च्या पन्नास किलोमीटर इतक्या अरुंद पट्टीचा समावेश आहे त्यामुळे एकूण उपलब्ध पाण्याच्या स्थानिक वापरावर मर्यादा आहे. पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यात उपलब्ध असलेल्या संपूर्ण पाण्याचा स्थानिक उपयोग करता येत नाही तसेच सदर खोरे 610 मीटर पेक्षा उंचीच्या पर्वत रांगा मुळे उर्वरित खोऱ्यापासून वेगळे झाल्याने इतर खोऱ्यात सुद्धा सदर अतिरिक्त पाणी आर्थिक दृष्ट्याही वळविता येत नाही. उलटपक्षी लागवडीखालील क्षेत्राच्या 89.4% इतके क्षेत्र असणाऱ्या उर्वरित चार नद्यांच्या खोऱ्यात एकूण जलसंपत्ती पैकी केवळ 45 टक्के इतकी जलसंपत्ती आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे 42. 50 टक्के क्षेत्र तुटीच्या किंवा अति तुटीच्या खोऱ्यात येते राज्याला पाणीटंचाई व अवर्षणाचा वारंवार सामना करावा लागतो

नदी खोरे व उपखोरे यांच्या सीमा विचारात घेऊन राज्याची विभागणी प्रामुख्याने 1531 पाणलोट क्षेत्रामध्ये करण्यात आली आहे. सन 2013-14 मध्ये केलेल्या पाणलोट क्षेत्र निहाय भूजल निर्धार नुसार निव्वळ भूजलाची उपलब्धता 31.84 अब्ज घनमीटर इतकी आहे आणि वार्षिक उपसा सुमारे 17.07 अब्ज घनमीटर इतका आहे.

**पाटबंधारे आणि लघुसिंचन प्रकल्पाची संख्या , निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| Particulars | Projects of Water Resources Department | Number of minor irrigation projects (local sector completed & ongoing |
|---|---|---|

| | Major & Medium | Minor | Total | **Total** (K.T. Weirs, Lift Irrigation schemes, Other important types ,l M.I. Tanks ,Percolation tanks) | **Total State level & Local level** |
|---|---|---|---|---|---|
| No. of projects completed & ongoing as on 30th June, 2020 | 405 | 3,472 | 3,877 | 113618 | 117495 |
| **Irrigation potential (lakh ha)** | | | | | |
| (i)Irrigation potential created upto June, 2019 | 39.18 | 13.86 | 53.04 | 18.96 & June 2020 19.26 | 72.00 |
| (ii)Area under irrigation by canal & river | 19.57 | 7.03 | 26.60 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| during 2019-20* | | | | | |
| (iii)Area under irrigation by wells in comman d area during 2019-20* | 11.79 | 2.13 | 13.9 2 | - | - |
| Total irrigation potential utilised during 2019-20 (ii+iii)* | 31.36 | 9.16 | **40.5 2** | **8.63** | **49.15** |

Source : 1) Chief Auditor, Water and Irrigation, Aurangabad under Water Resources Department

2) Office of the Chief Engineer, Minor Irrigation (Local), GoM

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील पाटबंधारे प्रकल्पाची आणि स्थानिक स्तरावरील लघु सिंचन प्रकल्पाची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र दाखविले आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की 30 जून 2020 ला पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या मोठ्या मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्पाची संख्या 3877 इतकी आहे त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावरील कोल्हापूर बंधारे, उपसा जलसिंचन योजना, पाझर तलाव आणि इतर सर्व प्रकारचे महत्त्वाचे स्त्रोत यांची संख्या 1,13,618 एवढी आहे. दोन्ही मिळून राज्यस्तर आणि स्थानिक स्तर 1,17,495 एवढे मोठे, मध्यम लघु प्रकल्प व इतर स्त्रोत आहेत.

तक्त्यावरून असे दिसून येते की 30 जून 2019 ला राज्यात जलसंपदा विभागाच्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत 53.04 लाख हेक्टर आणि स्थानिक स्तरावर 18.9 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्मित होती

आणि यावर्षी 2019 - 20 मध्ये एकूण 40.52 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. तर स्थानिक प्रकल्पांतर्गत 8.63 लाख हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळाला याप्रमाणे एकूण 49.5 लाख हेक्टर क्षेत्रासाठी निर्मित सिंचन क्षमता वापरली . एकूणच असे दिसून येते की राज्यस्तरावरील पाटबंधारे प्रकल्पाच्या निर्मित सिंचनक्षमतेच्या 76 टक्के सिंचन क्षमता वापरली गेली तर स्थानिक स्तरावर अंदाजे 35% सिंचन क्षमता वापरली गेली

**उपयुक्त जलसाठा , सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र**

**Live storage of water, irrigation potential and actual irrigated area**

| Year | Storage capacity as per project design (MCM) | Live storage as on 15th October (MCM) | Percentage of live storage | Irrigation potential created (as on 30th June) (Lakh ha) | Actual irrigated area (1st July to 30th June) (Lakh ha) | Percentage of actual irrigated area to irrigation potential created |
|---|---|---|---|---|---|---|
| 2015-16 | 42,960 | 17,712 | 41.2 | 49.10 | 24.07 | 49.0 |
| 2016-17 | 43,241 | 29,971 | 69.3 | 49.65 | 40.58 | 81.7 |
| 2017-18 | 43,752 | 27,607 | 63.1 | 50.37 | 39.42 | 78.3 |
| 2018-19 | 43,572 | 23,004 | 52.8 | 51.23 | 35.97 | 70.2 |
| 2019-20 | 44,183 | 30,579 | 69.2 | 53.04 | 40.52* | 76.4 |

MCM : Million Cubic Meters *Tentative

Source : Chief Auditor, Water and Irrigation, Aurangabad under Water Resources Department

वरील तक्त्यामध्ये 2015 -16 पासून राज्यातील उपयुक्त जलसाठा ,सिंचनक्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र दर्शवले आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की मोठे, मध्यम व लघु पाट बंधारे राज्य स्तरावरील जलाशयामध्ये 15 ऑक्टोंबर 2019 रोजी उपयुक्त

जलसाठा 30,579 दसलक्ष घनमीटर होता. हे प्रमाण प्रकल्प आराखड्या नुसार जलसाठा क्षमतेच्या एकूण 70.2 टक्के होते तक्त्यावरून असे निदर्शनास येते की 2016 17 यावर्षी प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राची निर्मित सिंचन क्षमतेशी असणारी टक्केवारी सर्वाधिक 81.7% आहे.

**राज्यातील एकूण सिंचित क्षेत्र-**




Figure - Area irrigated by surface and groundwater in 2014 from the state and local sector projects and groundwater in Maharashtra.

वरील वर्तुळ आकृती वरून असे दिसून येते की, 2014 -15 मध्ये भूस्तर आणि भूजल या दोन्ही स्त्रोतांचा विचार करता राज्य आणि स्थानिक स्तरावरील प्रकल्पामधून राज्यात एकूण 6.74 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. यामध्ये भूस्तरावरील कालवा सिंचनाद्वारे 1.78 लाख हेक्टर, धरणाच्या परिक्षेत्रातील विहिरी द्वारे 1.11 लाख हेक्टर आणि नदी नाल्याद्वारे 0.35 लाख हेक्टर व  स्थानिक स्तरावरील लघू सिंचनाद्वारे 0.50 लाख हेक्टर असे 3.74 लाख हेक्टर क्षेत्र भू स्तरावरील पाण्यामुळे सिंचनाखाली आले तर भूजल स्त्रोता द्वारे ठिबक आणि स्प्रिंकलर 1.50 लाख हेक्टर आणि पृष्ठभागावरून 0.5 लाख

हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले एकूणच या वर्षी राज्यातील सर्व स्त्रोता द्वारे किती क्षेत्र सिंचनाखाली आले आहे हे दर्शविले आहे

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-**

खात्रीशीर सिंचनाखालील लागवडीयोग्य क्षेत्र वाढवणे, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जल वापर क्षमतेत वाढ करणे, अचुक सिंचन आणि तुषार व ठिबक सिंचन (प्रति थेंब अधिक पीक )अशा पाणी वाचवणाऱ्या सिंचन पद्धतीच्या वापरामध्ये वाढ करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. ही योजना राज्यात 2015 -16 पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना 55 टक्के आणि इतर शेतकऱ्यांना 45 टक्के अंशदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा पाच एकर आहे .सन 2019-20 मध्ये नव्याने 1,23,300 हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले.

**तुषार व ठिबक सिंचन संचाचे वितरण आणि झालेला खर्च-**

**Sprinkler & drip irrigation sets distributed and expenditure incurred**

| Year | Sprinkler irrigation sets | | Drip irrigation sets | | Expenditure incurred (`Crore) |
|---|---|---|---|---|---|
| | No. of sets | Area (ha) | No. of sets | Area (ha) | |
| 2017-18 | 1,10,610 | 72,814 | 1,53,589 | 1,36,180 | 687.84 |
| 2018-19 | 71,161 | 44,812 | 1,03,921 | 85,731 | 415.95 |
| 2019-20 | 67,531 | 40,794 | 97,161 | 82,505 | 402.14 |
| 2020-21 (Target) | 69,979 | 63,617 | 1,21,685 | 1,10,623 | 667.66 |

Source : Commissionerate of Agriculture, GoM

वरील तक्त्यामध्ये तुषार व ठिबक सिंचन संचाचे वितरण आणि झालेला खर्च दर्शवला आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की तुषार आणि ठिबक सिंचन संच याची तुलना करता ठिबक सिंचन द्वारे

अधिक क्षेत्र सिंचनाखाली आले आहे 2020-21 मध्ये तुषार सिंचनाद्वारे 63, 617 हेक्टर आणि ठिबक सिंचनाद्वारे 1,10,623 हेक्टर असे एकूण1,74,240 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे लक्ष ठेवण्यात आले होते.

**निष्कर्ष-**

वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत चालली आहे तसेच वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे व्यवस्थापनावरील तान वाढत चालला आहे. सप्टेंबर 2015 मध्ये भारतासह 193 सदस्य राष्ट्रे पुढील पंधरा वर्षात साध्य करावयाच्या सतरा शाश्वत विकास उद्दिष्टांकरिता वचनबद्ध झालेली आहे.

"सर्वांसाठी शुद्ध जल व स्वच्छता" यांची सुनिश्चिती करणाऱ्या शाश्वत विकास उद्दिष्ट सहा (SDG-6) द्वारे जल मुद्दा जागतिक कार्यसूची वर ठोसपणे आला आहे. आरोग्यपूर्ण जीवनमान सुनिश्चित करणे, भुकेची समस्या संपुष्टात आणणे, आर्थिक वाढ व इतर उद्दिष्टे सुद्धा पाण्याशिवाय साध्य करता येणार नाहीत. याशिवाय शाश्वत विकास उद्दिष्ट 12 आणि 15 (SDG-12 & 15) यामध्ये सुद्धा शाश्वत वापर व उत्पादन पद्धती आणि स्थलीय पारिस्थितिकी च्या(Terrestrial Ecosystem) शाश्वत वापरास चालना देणे या बाबींना महत्त्व देण्यात आले आहे. आणि म्हणून शाश्वत विकास उद्दिष्टात मांडण्यात आलेली धेय्य साध्य करण्याकरिता जलसंपत्ती चा विकास व व्यवस्थापन प्रभावीपणे करणे ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील पाण्याची उपलब्धता विषम आहे. राज्यातील मोठा भूभाग हा अवर्षण प्रवण आहे तर काही अल्प भूभागावर पाण्याची विपुल उपलब्धता आहे.वातावरणातील बदलाच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिकच बिकट होणार आहे. हे सर्व टाळण्यासाठी पाण्याचा

वापर काटकसरीने कार्यक्षम करण्याबरोबरच त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे

संदर्भ:-

१. Economic survey of Maharashtra 2020-21 Page no 110,111 & 118
२. महाराष्ट्र राज्य जलनीती -२०१९
३. "EXPERIENCES IN IRRIGATION REFORMS IN MAHARASHTRA" Suresh A. Kulkarni Secretary Maharashtra Water Resources Regulatory Authority
४. MWRRA Annual Report 2017-18
५. water conservation and saving in Agriculture -Initiatives, Achievements and Challenges in Maharashtra

***

# हैदराबाद मुक्तीसंग्राम आणि आजचा मराठवाडा एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी**

**अध्यक्ष देवगिरी प्रांत, इतिहास विभाग प्रमुख, गांधी महाविद्यालय**

**कडा ता.आष्टी, जि.बीड.**

**प्रस्तावना**

मराठवाडा मुक्तीसंग्राम हे भारताच्या स्वातंत्र्य एक महत्त्वपूर्ण भाग समजला जातो हा इंग्रजाविरुद्ध नसून तो हैद्राबादच्या निजामाविरुद्ध होती इंग्रजांच्या राजवटीमध्ये भारतात जवळपास ५६३ देशी राज्ये व संस्थाने होती या राज्याचा आणि संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पाहत असत. अनेक संस्थानापैकी हैद्राबाद संस्थान हे एक मोठे संस्थान होते. १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश सरकारने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. पुढे याच कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर अनेक संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली पण हैद्राबाद, जुनागड व काश्मीर संघराज्यात विलीन न होता आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यापैकी हैद्राबाद हा सुभा मोगली साम्राज्याचा दक्षिणेकडील एक भाग असून मोगल सुभेदार मीर कमरुद्दीन उर्फ चिनकिलीचखान उर्फ निजाम-उल-मुल्क याने १७२४ मध्ये स्वतंत्र हैद्राबाद राज्याची स्थापना केली. या घराण्यात एकूण सात निजाम होऊन गेले. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधीशांना निजाम व 'आसफजाह' या नावाने ओळखले जात असे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

1. मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या चळवळीचा आढावा घेणे.
2. मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्टेट काँग्रेस च्या कार्याचा परामर्श घेणे.

हैद्राबाद राज्यात मराठवाडा, तेलंगणा व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता. या राज्याचा शासक मुस्लिम होता पण बहुसंख्य जनता हिंदू होती. निजामाची अन्यायी, अत्याचारी व जुलमी सत्ता होती. भारताच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले हैद्राबाद हे राज्य स्वतंत्र राहणे राज्यातील जनतेच्याच नाही तर देशाच्याही हिताचे नव्हते. या राज्याच्या विलिनीकरणाशिवाय भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व येऊ शकत नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन व्हावे म्हणून सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी लष्करी कारवाई करून हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करून घेतले (१७ सप्टेंबर १९४८) [1]

**हैद्रबाद संस्थानामधील तत्कालीन मराठवाडा**

हैद्राबाद संस्थान हे देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे संस्थान होते. १९४९ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या १.१२.३८,५३४ एवढी होती तेलगु, मराठी या तीन भाषिकाचे मिळून हैद्राबाद संस्थान बनले होते. तेलगु भाषिक ८. मराठी भाषिक ५ व कन्नड भाषिक ३ अशा एकूण १६ जिल्ह्यांचा समावेश हैद्राबाद संस्थानामध्ये होता. हैद्राबाद संस्थानामध्ये मराठवाड्याचे ५ जिल्हे समाविष्ठ होते त्यात औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड व उस्मानाबाद यांचा समावेश होता संस्थानामधील मराठवाड्याचे एकूण क्षेत्रफळ २७५९१ चौ.मैल एवढे होते आणि एकूण लोकसंख्या ५२१९५२८ एवढी होती हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम (मराठवाडा मुक्तीग्राम) अभ्यास करताना महाराष्ट्र परिषद, स्टेट कॉंग्रेसचे कार्य, हिंदू महासभा, आर्य समाजाची चळवळ, इत्तेहादुल मुसलमीन रझाकार संघटना, वंदे मातरम् चळवळ इ पैलूंचा विचार करता येईल.[2]

**आर्य समाजाची स्थापना**

१० एप्रिल १८७५ रोजी स्वामी दयानंद सरस्वती यानो मुंबई येथे आर्य समाज या संघटनेची स्थापना केली. हैद्राबाद संस्थानामध्ये

बीड जिल्हयातील किल्ले धारूर याठिकाणी सर्वप्रथम आर्य समाजाची स्थापना झाली. त्यासाठी पंडित भगवती प्रसाद, गोपाळ प्रसाद, मदन प्रसाद, मयनलाल, रामचंद्र भाई, माणिक प्रसाद, बाबुरावजी वैद्य, बाबू गणेश सिंह वर्मा, मन्सीलाल तिवारी यांचे प्रयत्न मोलाचे ठरले. सन १८९२ मध्ये आर्य समाजाच्या शाखेचे स्थलांतर हैद्राबाद येथील 'सुलतान बाजार' याठिकाणी करण्यात आले. तेथूनच खऱ्या अर्थाने आर्य समाजाच्या कार्याची सुरुवात झाली. बॅरिस्टर विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष तर उदगीरचे भाई बन्सीलालजी हे मुख्यमंत्री होते. मराठवाड्यातील औरंगाबाद, नांदेड, लातूर, उदगीर, बीड, अहमदपूर, हिंगोली, परभणी व जालना येथे आर्य समाजाच्या शाखा झाल्या.[3]

**महाराष्ट्र परिषद व अधिवेशने**

तेलंगणा विभागात १९२१ मध्ये आंध्र महासभा, कर्नाटकात १९३७ मध्ये कर्नाटक परिषदेची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर १९३७ मध्येच महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यासाठी गोविंदभाई श्राफ, दिगंबर बिंदू, केशवराव कोरटकर, अनंत भालेराव, काशीनाथराव वैद्य, पुरुषोत्तम चपळगावकर, वामनराव नाईक, रा.गो. परांजपे, रामचंद्रराव अंतू, एकनाथराव कुलकर्णी आदिवा मोलाचा वाटा होता. महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन जालना जिल्हचतील परतूर येथे दि.१ जून १९३७ मध्ये गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली भरले. हे अधिवेशन तीन दिवस चालले. यासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते व पुढारी आले होते. केंधळीचे गोविंदराव घारे हे परतूरच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष बनले. या परिषदेला गोविंदभाई श्राफ, अच्युतराव देशपांडे, गोपाळशास्त्री देव, शामराव बोधनकर, स्वामी रामानंद तीर्थ आदि पुढाऱ्यांसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. या अधिवेशनात सार्वत्रिक शिक्षण, स्त्री शिक्षण तसेच उर्दू माध्यमाला विरोध या विषयावर चर्चा झाली. या अधिवेशनात जवळजवळ ३४ ठराव मांडण्यात आले होते. परतुरच्या अधिवेशनातूनच स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्व उदयास आले. या परिषदेमुळे महाराष्ट्र

परिषदेचे कार्य संपूर्ण मराठवाड्यत विस्तारु लागले. थोडक्यात निजामाच्या जुलमी, अन्यायी राजवटीविरुद्ध संघटित होण्याचे मनोबल या अधिवेशनामुळे जनतेत निर्माण झाले.[4]

**स्टेट कॉँग्रेस**

लातूर येथील महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन संपताच निजाम सरकारने महाराष्ट्र परिषदेला जातीय संस्था म्हणून घोषित केले. त्यानंतर वातावरण चिघळले. अशातच महाराष्ट्र परिषदेच्या आदेशावरून स्वामी रामानंद तीर्थ यानी अंबाजोगाई सोडून हेद्राबादला स्थायिक झाले व तेथूनच निजामाविरुद्ध कार्य गतिमान केले. त्यांच्यासोबत आनंद वाघमारे व दिगंबरराव बिंदू राहत असत. संपूर्ण हैद्राबादसाठी एक राजकीय संघटना आवश्यक असून सरकारच्या दडपशाही विरुद्ध कायदेभंग व सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला पाहिजे म्हणून पुढे हैद्राबाद मधील काही नेत्यांनी २९ जून १९३८ रोजी एक बैठक बोलाविली. त्या बैठकीस स्वामी रामानंद तीर्थही हजर नव्हते. याच बैठकीत हैद्राबाद स्टेट कॉँग्रेसची स्थापना करण्यात आली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे पहिले अध्यक्ष श्री. गोविंदराव नानल व सरचिटणीस रामकिशन धूत हे होते. गोविंदराव नानल व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना अटक होऊन शिक्षा झाली. त्यामुळे स्टेट कॉँग्रेसची जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ यांच्याकडे आली व त्यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम सुरु झाला. निजाम सरकारने स्टेट कॉंग्रेसवर बंदी घातली. गोविंदराव नानल यांनी केलेल्या सत्याग्रहानंतर तीन दिवसांनी म्हणजेच २७ ऑक्टोबर १९३८ ला स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रह केला. निजाम सरकारने स्वामी रामानंद तीर्थ यांना अटक केली. तेव्हा स्वामीजींनी एका निवेदनात म्हटले की, "सरकारच्या धमक्यांना आम्ही मुळीच भीक घालत नाही. या सरकारने जनतेचे नैतिक पाठबळ गमावले आहे.

## संदर्भग्रंथ सूची :


१. डॉ.सोमनाथ रोडे, मराठवाड्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००४ पृ.४९.

२. भालेराव अनंत, मराठवाड्याचा इतिहास, मौज प्रकाशन, मुंबई, २००५ पृ.६७

३. डॉ. अनिल कठारे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००६ पृ.१०५

४. डॉ.साहेबराव गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००८ पृ.५५.

# सर्वसमावेशक वाढ आणि भारतीय अर्थव्यवस्था : एक अभ्यास

**प्रा. देविदास गोकुळ गवळी**

पदवी, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख, म. शि. प्र. मंडळाचे, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

स्वातंत्र्योत्तर काळात देशाने लक्षणीय प्रगती साध्य केली आहे. आपली अर्थव्यवस्था आता अशा वळणावर पोहोचली आहे की, यापुढे स्थायी विकास साध्य करून भारतीय जनतेचे महत्तम कल्याण साधून जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर वाटचाल करणे आपणास शक्य झाले आहे. परंतु अद्यापही समाजातील एक मोठा समूह या सर्वांपासून दूर आहे. उत्पन्नामधील विषमता, प्रादेशिक असमतोल, अज्ञान, निरक्षरता, स्त्री-पुरूष भेदभाव, दारिद्र्य, कुपोषण, उपसामारी, अनारोग्य, भ्रष्टाचार इत्यादीमुळे धिक विकासापासूनचे प्राप्त लाभ सर्वापार्यंत पोहोचू शकले नाहीत. अर्थात आपला अधिक विकास हा सर्वसमावेशक नाही. दावोस (स्विझर्लंड) येथे आयोजित जागतिक आर्थिक विकास मंच (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) या बैठकीत सर्वसमावेशक विकास निर्देशांक २०१८ जाहीर करण्यात आला. यामध्ये १०३ अर्थव्यवस्थांच्या प्रगतीचे आकलन वृद्धी व सर्वसमावेशक वाढ या आधारावर केले गेले आहे. यानुसार नॉर्वे हा जगातील सर्वात सर्वसमावेशक आधुनिक विकसित अर्थव्यवस्था ठरली आहे तर भारत ६२ व्या क्रमांकावर आहे. भारताच्या एकूण गुण कमी प्रतीची असले

तरी वेगाने वाढणाऱ्या १० उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश आहे.

सर्वसमावेशक वाढ हा देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेतील धोरणाचा महत्त्वाचा भाग बनविण्यात आलेला आहे. ज्यामध्ये गरिबी निर्मूलन, पोषण आणि आरोग्य, जनसांख्यिकीय लाभांश, ग्रामीण भागाचा विकास, कृषी क्षेत्र, रोजगार, पायाभूत सुविधा, यामध्ये असणाऱ्या समस्या आणि यामध्ये अधिक प्रमाणात विकास घडवून आणण्यासाठी सरकारमार्फत वेळोवेळी केल्या जाणाऱ्या उपाययोजना आणि कायदे यांसारख्या बाबींचा एकत्रितपणे विचार केला गेलेला आहे. आर्थिक वृद्धी जर सर्वसमावेशक असेल तरच अधिक प्रमाणात आर्थिक संधी प्राप्त करता येतील. सरकारने वाढीची प्रक्रिया सर्वसमावेशक व समन्यायी करण्यासाठी विविध प्रकारच्या विकासात्मक योजना सुरू केलेल्या आहेत. या योजना दारिद्रयनिर्मूलन, गटामधील समानता, प्रादेशिक समानता, पर्यावरण शाश्वतता, शिक्षण व आरोग्य, शाश्वत पद्धतीने शेतीची वाढ, आर्थिक समावेशकता, पायाभूत सुविधा या क्षेत्राशी संबंधित आहेत ज्यामुळे होणारी वृद्धीची प्रक्रिया सर्वसमावेशकतेच्या दिशेने होणारी असेल. आर्थिक विकास हा फक्त वस्तू व सेवांच्या उत्पादनाशी निगडीत नसून समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये विकासात्मक बदल घडून येणे होय. रोजगाराच्या संधी, दारिद्रय कमी होणे, आर्थिक विषमता कमी होणे, समाजातील सर्व घटकांचे जीवनमान उंचावणे, यालाच आर्थिक विकास म्हटले जाते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत काही मूठभर लोकांनाच फायदा न होता ग्रामीण व प्राथमिक क्षेत्रातील बहुसंख्य लोकांना फायदा व्हावा म्हणून ११ व्या योजनेपासून सर्वसमावेशक वाढ ही संकल्पना पुढे आली आहे.

**अभ्यासाची उदिष्ट्ये** :

प्रस्तुत अभ्यास करताना खालील प्रमाणे उदिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

१. सर्वसमावेशक वाढ ही संकल्पना अभ्यासणे

२. सर्वसमावेशक वाढ या संकल्पनेत अंतर्भूत घटकांचा अभ्यास करणे

३. सर्वसमावेशक वाढीसाठी आवश्यक योजनांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे यात संदर्भ ग्रंथ,मासिके, पाक्षिक, दैनिके, विविध विभागाचे वार्षिक अहवाल यांचा वापर केला आहे. तसेच याबरोबरच इंटरनेटचा आधार घेतला आहे.

**विषय विवेचन :**

सर्वसमावेशक वाढ संकल्पना: खाजगी सहभाग व सामाजिक कल्याण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वसमावेशक वृद्धीची संकल्पना १८ व्या शतकामध्ये झाली असली तरी ती पूर्णत्वापासून बरीच दूर आहे. रिकार्डोपासून, मिल्स, माल्थस आणि मार्क्स या अर्थशास्त्रज्ञापर्यंत सर्वांनी औद्योगिकरणामुळे समाजातील गरीबांच्या परिस्थितीमध्ये फारसा बदल घडून आणण्यात आला नाही अशी औद्योगिक क्रांतीच्या परिणामांची वास्तविकता नमूद केली. अँडम स्मिथची अदृश्य हाताची संकल्पना विकेंद्रित बाजारपेठीय व्यापारामुळे फक्त उत्पादन आणि वितरण यांचे इष्टतम बाह्य स्वरूप साध्य

करण्यासाठी मांडण्यात आली. भारतीय नियोजनाला अर्ध्या शतकापेक्षा अधिक काळ लोटून देखील भारतात सर्वसमावेशक वृद्धीचा प्रयत्न असफल ठरला. भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोक विशेषत: अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय लोकांच्या आर्थिक स्थितीत व जीवनमानात अपेक्षेनुसार सुधारणा झाली नाही. म्हणून अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात (२००२-२००७) प्रथमच "वेगवान आणि अधिक सर्वसमावेशक वृद्धीच्या दिशेने" हे शीर्षक टाकण्यात आले.

सर्वसमावेशक वृध्दी ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. जेव्हा समाजातील सर्व व्यक्तिचा आर्थिक विकासामधील सहभाग आणि योगदानास निश्चित केले जाते तेव्हा त्यास सर्वसमावेशक वृध्दी असे संबोधले जाते. अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार सर्वसमावेशक वाढीची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. "समाजातील सर्व घटकांसाठी व्यापक तत्त्वावर आधारित लाभाची आणि समान संधीची सुनिश्चितता करणारी वृद्धीची प्रक्रिया म्हणजे सर्वसमावेशक वाढ होय".

अमर्त्य सेन यांच्या मते, आर्थिक विकासाबरोबरच गरिबांची क्रयशक्ती वाढल्यास सामाजिक कल्याण साधले जाऊन आपोआप सर्वसमावेशक वृध्दी घडून येईल. डॉ. मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांच्या मते, या बहुआयामतेचा एक परिणाम असा आहे की, विविध आयामांमध्ये जी प्रगती घडून येत आहे. ती वेगवेगळी असू शकते. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ अभिजित सेन यांच्या मते, कृषी आणि बिगर-कृषी क्षेत्रातील प्रतिव्यक्ति उत्पन्नामधील तफावत न रूंदावणे ही सर्वसमावेशक वृध्दीची आवश्यक अट आहे. जागतिक बँकेच्या २००६ मधील अहवालानुसार, जात, धर्म, पंथ, लिंग, श्रीमंत-गरिब अशा

प्रकारचा कोणताही भेदभाव न करता मनुष्य हा घटक विचारात घेऊन आर्थिक वृध्दीची प्रादेशिक व्याप्ती वाढविणे. सर्वसमावेशक वाढीचे मुख्य निर्देशक म्हणून खालील घटकांचा स्वीकार करण्यात आला आहे.

**अ) आर्थिक विकास :**

१) वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनात ८% दराने वृध्दी घडवून आणणे.

२) ४% दराने कृषी क्षेत्राची वृध्दी

३) १०% दराने विनिर्माण क्षेत्राची वृध्दी

४) प्रत्येक राज्याद्वारे अकराव्या योजनेच्या तूलनेत बाराव्या योजना कालावधी दरम्यान

५) अधिमानत: उच्च सरासरी वृध्दी दर साध्य केला पाहिजे.

**ब) दारिद्रय आणि रोजगार :**

१) योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ववर्ती अंदाजाच्या तुलनेत दरडोई उपभोग वाढवून दारिद्र्यात १०% ने घट करणे.

२) योजना कालावधीत बिगर कृषी क्षेत्रात ५० मिलियन नवीन कार्यसंधींची निर्मिती आणि याच प्रमाणात कौशल्य प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे हे शिक्षण होय.

३) योजनेच्या अखेरपर्यंत शालेय शिक्षणाचे नोंदणी वय वाढवून सात वर्ष करणे.

४) अर्थव्यवस्थेत कौशल्य आवश्यकतेस अनुसरून प्रत्येक तुकडीसाठी दोन दशलक्ष अतिरिक्त जागा निर्माण करून उच्च शिक्षणापर्यंत पोहोच वृध्दींगत करणे.

५) शालेय नोंदणीमधील लैगिक व सामाजिक दरीस (मुलामुलींदरम्यान, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,

मुस्लीम आणि उर्वरित लोकसंख्येदरम्यान) योजनेच्या अखेरपर्यंत दूर करणे.

**क) आरोग्य :**

१) योजनेच्या अखेरपर्यंत नवजात शिशु मृत्यू दरात २५ पर्यंत घट आणि माता मृत्यू दर प्रति १००० जिवित प्रसुतीत ९ पर्यंत घट ब बालक लिंग गुणोत्तरात (०-६ वर्ष) ९५० पर्यंत सुधारणा घडवून आणणे.

२) योजनेच्या अखेरपर्यंत एकूण प्रजनन दरात घट घडवून आणून २१ करणे

३) ०-३ वयापर्यंतच्या बालकांमधील अल्पपोषणात घट घडवून "NFSH- ३ स्तराच्या निम्यावर आणणे.

**ड) ग्रामीण आधारभूत सुविधांसहित आधारभूत सोयी-सुविधा :**

१) पायाभूत न सुविधांमधील गुंतवणूकीमध्ये वाढ करून १ स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ९% वर आणणे.

२) स्थूल सिंचित क्षेत्रात ९० दशलक्ष हेक्टर वरून १०३ दशलक्ष हेक्टरपर्यंत वाढ घडवून आणणे.

३) सर्व गावांना विज उपलब्ध करून देणे. आणि वीजगळती २० % वर आणणे

४) सर्व गावांना बारमाही रस्त्यांना जोडणे

५) राष्ट्रीय व राज्य महामार्गाचा दर्जा किमान दुपदरीवरआणणे.

६) पूर्वोत्तर व पश्चिमी समर्पित मालवाहतूक जोडमार्ग पूर्ण करणे.

७) ग्रामीण प्रसारणास ७०% पर्यंत वृध्दींगत करणे.

८) ५०% ग्रामीण लोकसंख्येला नळाद्वारे पिण्याच्या - पाण्याचा सुतलभ पुरवठा आणि करणे ५०% ग्रामपंचायतींना निर्मल ग्रामचा दर्जा प्राप्त करून देणे.

**इ) पर्यावरण आणि शाश्वतता :-**

१) हरित आच्छादन क्षेत्रात (प्रतिवर्षा एक दशलक्ष हेक्टरची वृध्दी साध्य करणे.

२) नुतनीकरण / नवीकरणीय उर्जा क्षमतेत ३०,००० मेगावॅटची वृध्दी करणे.

३) स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या उत्सर्जन तीव्रतेस सन २०२० पर्यंत २००५ मधील स्तराच्या तुलनेत २० ते २५% घटविण्याचे लक्ष्य

**ई) सेवांची पोहोच:**

१) ९०% भारतीय कुटुंबांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचविणे

२) बँक खात्याशी जोडण्यात आलेल्या आधार व्यासपीठाचा उपयोग करून मुख्य अनुदाने व कल्याणासंबंधी लाभार्थी रक्कमेचे थेट रोख हस्तांतरण करणे.

**सर्वसमावेशकतेसाठीच्या योजना :**

अकराव्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशकता स्वीकारून लोकांच्या जीवनमानात वाढ घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी पूर्वीच्या काही योजना कायम ठेवून अनेक नवीन योजना आखण्यात आल्यात यातील काही महत्वाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत

१. मनरेगा,

२. इंदिरा आवास योजना,

३. राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम,

४. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,

५. राष्ट्रीय कृषी विकास योजना,

६. पेयजल योजना,

७. पंडित दीनदयाळ ग्रामीण विद्युतीकरण योजना,

८. जल संसाधन कार्यक्रम,

९. मध्यान्ह भोजन योजना,

१०. एकात्मिक बाल विकास सेवा योजना,

११. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन इ.

**समारोप :**

देशाच्या विकासाचा विचार करत असताना आजवर दरडोई उत्पन्नाचा वाढणारा दर, अर्थव्यवस्था वाढीचा दर, उत्पादनवाढीचा दर, आयात-निर्यात व्यापारातील तूट, वित्तीय तूट अशा मुद्द्यांचाच प्रामुख्याने विचार केला जात होता. अशा आर्थिक प्रगतीचे लाभ सर्व नागरिकांपर्यंत पोहचतात की नाही याकडे विशेष लक्ष दिले गेलेले नव्हते. पण सद्य:स्थितीमध्ये आर्थिक विकास समाजाच्या सर्व स्तरापर्यंत एकसमान पद्धतीने करता यावा आणि जे लोक या आर्थिक विकासात्मक प्रक्रियेपासून वंचित राहिलेले आहेत त्यांना या विकासात्मक प्रक्रियेत सामावून घेतले गेले आहे. एकूणच देशाच्या आर्थिक विकासात्मक प्रक्रियेला सर्वसमावेशक बनविण्यासाठी सरकारमार्फत विविध धोरणे व योजनांची आखणी करण्यात आलेली आहे. हे सर्व काही सर्वसमावेशक वाढ साध्य करण्याच्या धोरणाचा भाग आहे. अलीकडील काळामध्ये सर्वसमावेशक वाढ हा घटक आर्थिक विकास प्रक्रियेतील धोरणाचा महत्त्वाचा भाग बनविण्यात आलेला

आहे. आर्थिक वृद्धी जर सर्वसमावेशक असेल तरच अधिक प्रमाणात आर्थिक संधी प्राप्त करता येतील. तसेच याच्या जोडीला सर्वाना समान स्वरूपात संधी सुनिश्चित करता येतील, ज्याद्वारे शाश्वत वाढ साध्य करता येईल हा मुख्य उद्देश सरकारच्या सर्वसमावेशक वाढीच्या धोरणात्मक नीतीचा भाग आहे; सरकारमार्फत ११व्या आणि १२ व्या पंचवार्षकि योजनांमध्ये सर्वसमावेशक वाढ साध्य करण्यासाठी विशेष भर देण्यात आलेला आहे.

**संदर्भ :**


१. भोसले ,काटे भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन कोल्हापूर २०१३.

२. डॉ. जी. एन. झामरे, भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र ,पिंपळापुरे पब्लिशर्श कंपनी नागपूर जून २०१५

३. दत्त एव सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था,एस चंद कंपनी ली.नई दिल्ली २०१८

४. योजना मराठी ,महाराष्ट्र शासन मुंबई , एप्रिल २०१४

५. योजना मराठी ,महाराष्ट्र शासन मुंबई , ऑगस्ट २०१५

६. विविध मराठी दैनिके (महाराष्ट्र टाइम्स, सकाळ, लोकमत. लोकसत्ता,दिव्य मराठी इ.)

७. विविध संकेतस्थळे


***

# भारतीय अर्थव्यवस्था आणि समावेशक वृध्दी

(Indian Economy and Inclusive Growth)

**प्रा. रमेश शंकर माने**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड. ता.शिराळा, जि.सांगली.

**प्रस्तावना :**

सर्वसमावेशक किंवा समावेशक वृध्दी ही प्रत्येक देशाच्या शाश्वत विकासासाठी आणि संपत्तीच्या समान वाटपासाठी आवश्यक असते. भारताने अकराव्या पंचवार्षिक योजनेत 'समावेशक वृध्दी या उद्दिष्टाला अधिक महत्व दले. अलिकडील काळात जगातील अनेक देशांनी अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशक वृध्दीला विशेष महत्व दिले आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करताना समाजातील अनेक घटक विकासापासून वंचित राहतात. त्यातून अत्पन्न विषमता व सामाजिक विषमता निर्माण होते. आणि देशात गरिब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत जाते. आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात तर गरीब अधिक गरीब राहतात.त्यामुळे सद्याच्या युगात समावेश वृध्दीच संकल्पना सर्वच देशांसाठी महत्वाची मानली जाते.

**समावेशक वृध्दीची संकल्पना : (Concept of Inclusive Growth)**

नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थशास्त्र डॉ.अमर्थ्य सेन यांनी ''दारिद्रयात घट होण्यासाठी समावेशक वृध्दीची गरज असते'' असे म्हंटले आहे. यासाठी विकासाचा पाया विस्तृत असावा लागतो. विकासाच्या प्रक्रियेत ''सर्वसामान्य माणूस'' हा विकासाचा केंद्रबिंदू असायला हवा. 'कृषी व बिगर कृषि क्षेखातील श्रमिकांच्या उत्पन्नतील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक वृध्दीचे उद्दिष्ठ असले पाहिजे. सन २००६ मध्ये जागतिक बॅकेने जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत असा विचार न करता 'मनुष' हा घटक केंद्रबिंदू माणूस आर्थिक वृध्दीची प्रादेशिक व्याप्ती वाढवायला हवी. असे स्पष्ठ केले आहे. तरच भविष्यकालीन पिढीसाठी साधन संपत्ती,

बाजारपेठा आणि विविध संधीतील समानता निर्माण होवून शाश्वत विकास होईल. यावरून जागतिक बॅकेने समावेशक वृध्दीची संकल्पना शाश्वत विकासासाठी खूपच विस्तारित केल्याचे दिसून येते.

भारतीय नियोजनमंडळाचे तत्कालीन उपाध्यक्ष डॉ.अहलुवालिया यांनी विकास साधताना विकासाचा लाभ वेगवेगळया परिस्थितीत राहणाऱ्या लोकांना मोठया प्रमाणात मिळाला पाहिजे असे मत व्यक्त केले होते. तर सन २००८ च्या यू.एन.डी.पी.च्या अहवालात समावेशक वृध्दीच्या संकल्पनेत समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील लोकांचा उत्पादनातील सहभाग आणि विकास व वितरणातील समानता महत्वाची मानली आहे. मनुष्याचा सर्वांगीण विकास हाच अर्थ विकासात अभिप्रेत असतो. त्यामुळे विकासाचे साधन 'मनुष्य' आहे हे सत्य मानून मानवी विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्न वाढीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'समावेशक वृध्दी' ची संकल्पना महत्वाची ठरते.

**समावेशक वृध्दीचे निकष किंवा आवश्यकता :**

**१) दारिद्रय निमूलन :**

भारतासाख्या जगातील अनेक विकासनशील देशांत 'सार्वत्रिक द्रारिद्रय' ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. भारतात सन २००९–१० मध्ये ४४ कोटी लोकसंख्या दारिद्रयात जीवन जगत होती. सन २०११–१२ मध्ये भारतामध्ये दारिद्रयात जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण २१.९ टक्के एवढे होते. आजही भारतात २३ कोटी लोक दारिद्रयात जीवन जगत असल्याचे दिसून येते. आतरराष्ट्रीय पातळीवर ४० टक्के लोकसंख्या दारिद्रयरेषेखालील जीवन जगत असल्याचे स्पस्ट झाले आहे. दारिद्रयातील लोकसंख्येचे आकारमान व प्रमाण कमी करण्यासाठी देशातील शेती आणि उद्योगांचा मानवी कौशल्ये विकास करून रोजगारात वाढ घडवून आणणे गरजेचे असते. यासाठी 'समावेश वध्दी' संकल्पना महत्वाची ठरते.

**२) जीवनावश्यक वस्तूची उपलब्दता :**

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी देशातील सर्व लोकांना माफक दरात व मुबलक प्रमाणात जीवनावश्यक वस्तुंची उपलब्दता करून देणे आवश्यक असते. हे सरकारचे मूलभूत कर्तव्य मानले जाते. यामध्ये अन्नधान्य, भाजीपाला, पिण्याचे शुध्द पाणी, शिक्षण, आरोग्य, पोस्टाच्या

सुविधा, पेट्रोल, डिझेल, दूध इ. चा रास्त दराने व मुबलक पुरवठा होणे अपेक्षित असते. भारताने अकराव्या योजनेत समावेशक वृध्दी तत्वाची अंमलबजावणी करताना जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्दतेकडे विशेष लक्ष पुरविले आहे. परंतु भारतासारख्या मोठया लोकसंख्येच्या देशात सरकारचा लोकांबध्दल असणारा दृष्टिकोण महत्वाचा ठरतो. सरकारने लोकांच्या हितासाठी अनेक लोकेपयोगी योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करणे गरजेचे असते.

**३) रोजगारनिर्मितीतून बेरोजगारी कमी करणे :**

देशातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या उत्पन्नपातळीत समतोल वाढ घडवून आणण्यासाठी समावेश वृध्दी महत्वाची असते. कारण देशात रोजगाराच्या संधी वाढल्या तरच लोकांच्या उत्पन्नात वाढ होईल. रोजगार निर्मिती हा समावेशक वृध्दीचा महत्वाचा निकष मानला जातो. समाजातील वंचित लोकांच्या उत्पन्नात जेव्हा वाढ होईल तेव्हा विकासाच्या प्रक्रियेतील लोकांचा सहभाग वाढेल. भारताच्या विविध पंचवार्षिक योजनांमध्ये रोजगारनिर्मितीसाठी भरीव कार्य केल्याचे दिसून येते. परंतु अलिकडे सन २०२० मधील कोरोना महामारीमुळे देशातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक कामगारांना कारखानदारांनी कामावरून काढून टाकले आहे. शिवाय सद्या डिझेल, पेट्रोलचे वाढते दर, बेरोजगारी, वाढती महागाई यामुळे शाश्वत विकासात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. यासाठी समावेश वृध्दीचा दृष्टीकोण महत्वाचा ठरतो.

**४) लोकांची खरेदी शक्ती वाढविणे :**

प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ.अमर्थ्य सेन यांच्या मते सरकारने व्यापक प्रमाणात श्रीमंतांची श्रीमंती आणि गरिबांची गरीबी कमी करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केला तरच समावेशक वृध्दी शक्य होईल. भारतासारख्या देशात गरिब लोकांकडून विविध वस्तूंना मागणी वाढविण्यासाठी, त्याचे दरडोई उत्पन्न वाढविण्यावर भर दिला पाहिजे. गरिबांची खरेदी शक्ती वाढली तरच देशातील परिणामकारक मागणीत वाढ होईल आणि शाश्वत विकासाला प्रेरणा मिळेल. सद्या भारतामध्ये संपत्तीचा संचय श्रीमंत भांडवलदारांकडे वाढत असल्याचे दिसून येते. म्हणून समावेशक वृध्दीची परिणामकारक अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे.

**५) ग्रामीण व शहरी भागातील विषमता कमी करणे :**

जागतिक बॅकेच्या सर्वसमावेशक वृध्दीच्या संकल्पनेत गरीब व श्रीमंत व्यक्तींच्या उत्पन्नतील विषमता कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतासारख्या देशात अजुनही मूठभर श्रीमंतांच्या हातात संपतीचा फार मोठा हिस्सा असल्याचे दिसून येते. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजातील सर्वच घटकांकडे समानतेने वाटप झाले तरच देशाचा सर्वांगीण विकास होईल. शहरी व ग्रामीण भागातील लोकांना सामाजिक न्याय मिळवून देवून आर्थिक समता प्रस्तापित करण्यासाठी समावेश वृध्दीचे लक्ष पूर्ण करण्यावर अधिक भर देणे गरजेचे आहे.

**६) महिलांचे सबलीकरण :**

देशाच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांचा हिस्सा साधारण ५० टक्यांपर्यंत आहे. अशा वेळी स्त्रियांचे सक्षमीकरण व सबलीकरण करणे हा समावेशक वृध्दीचा महत्वाचा निकष ठरतो. देशात स्त्री व पुरूष यांच्यात असमानता निर्माण झाल्यामुळे समावेशक वृध्दीमध्ये अनेक अडथळे निर्माण होतात. यासाठी शहरी व ग्रामीण भागातील महिलांची किमान कौशल्ये विकसित करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्द करून देणे आवश्यक असते. कारण सर्वसमावेशक वृध्दीमध्ये देशातील स्त्रिया व मुली यांची परिस्थिती सर्वच बाबतीत सुधारणे गरजेचे असते. परिणामी स्त्री व पुरूष यांच्यातील आर्थिक व सामाजिक विषमता कमी होवून समावेशक वृध्दीला चालना मिळेल. अलिकडील काळात भारत सरकारने महिला सबलीकरण व सक्षमीकरणावर अधिक भर दिला आहे.

**७) मानवी संसाधनांचा विकास घडवून आणणे:**

देशात मानवी संसाधनांचा जेवढा अधिक विकास होईल तेवढा तो देश अधिक प्रगत होतो. मानवी विकासाठी देशातील सर्व लोकांना आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा मुबलक प्रमाणात व रास्त दराने उपलब्द होणे आवश्यक असते. भारतामध्ये आर्थिक नियोजनातून अशा सुविधा उपलब्द करून देण्यावर सरकारने अधिक भर दिला आहे. १९९१ पासून स्वीकारलेल्या जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या युगात देशातील शिक्षण आरोग्याच्या सुविधाना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शिक्षण व आरोग्याच्या सुविधांच्या उपलब्दतेवरच समावेशक वृध्दी आणि मानवी विकास अवलंबून असतो.

**८) विकासाच्या प्रक्रियेतील प्रमुख डावपेच ठरविणे :**

विकासाच्या प्रक्रियेत भूमिहिन शेतमजूर, सीमांत शेतकरी, अनुसूचित जाती–जमाती, इतर मागासवर्ग, महिला इ. घटक विकासाच्या फायद्यांपासून वंचित राहतात. त्यामुळे समावेशक विकासाच्या प्रमुख डावपेचांमध्ये समाजातील सर्व घटकांना विकासाचे लाभ मिळवून देणे महत्वाचे असते. अशा डावपेचांमध्ये दारिद्रय निर्मूलन, रोजगार निर्मिती, आरोग्य, शिक्षण आणि विविध सामाजिक क्षेत्रांचा पुढाकार इ. बाबींचा समावेश होतो.

## भारतीय अर्थव्यवस्था आणि समावेशक वृध्दी (Indian Economy and Inclusive Growth)

### १) आर्थिक समावेशन (Economic Inclusion)

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे फायदे देशातील सर्व जनतेला मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना आर्थिक समावेशन असे म्हटले जाते. राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे फायदे देशातील मुठभर भांडवलदार आणि श्रीमंत लोकांपुरतेच मर्यादित न राहता हे फायदे समाजातील सर्व व्यक्तींपर्यंत पोहचविण्याचे कार्य सरकारला करावे लागते. त्यादृष्टिने भारत सरकारकडून ११ व्या पंचवार्षिक योजनेत 'वेगवान आणि अधिक समावेशक वृध्दी' तर १२ व्या योजनेत 'वेगवान शाश्वत विकास आणि अधिक समावेशी वृध्दी' यावर अधिक भर दिला आहे.

### २) वित्तीय समावेशन : (Financial Inclusion)

वित्तीय समावेशन याचा अर्थ देशातील मोठया वंचित व अल्प उत्पन्न गटातील लोकांना कमी खर्चात बॅकींग सेवा–सविधा उपलब्द करून देणे होय, देशातील सर्व जनतेला कोणताही भेदभाव न करता बॅकींग व पेमेंट सेवा उपलब्द करून देण्यासाठी भारतीय रिझार्व्ह बॅकेने अगोदरपासूनच प्रयत्न केले आहेत. व्यापारी बॅकांचे राष्ट्रीयीकरण व शाखाविस्तार, सहकारी संस्था व प्रादेशिक ग्रामिण बॅकांची स्थापना, अग्रक्रम क्षेत्र कर्ज पुरवठा, अग्रणी बॅक योजना, स्वयसहाय्यता गटांना बॅकेशी जोडणे, नाबार्डची स्थापना इत्यादी सेवा–सुविधा रिझर्व्ह बॅकेने उपलब्द करून दिल्या आहेत. याशिवाय २००५–०६ पासून शून्य किंवा अत्यल्प बॅलन्स असणारी 'नो फ्रिल' खाती उघडण्यास व्यापारी बॅकांना परवाणगी दिली आहे. तसेच

'बिझनेस फॅसिलीटेटर' आणि ''बिझनेस करस्पॉडन्ट मॉडेल' इ. सेवा व्यापारी बॅकांना उपलब्द करून दिल्या आहेत.

**वित्तीय समावेशनाची सद्यास्थिती :**

**अ) बॅकिंग सेवांची उपलब्धता :**

देशातील शहरी व ग्रामीण भागापर्यत बॅकिंगच्या सुविधांची उपलब्दता व्हावी म्हणून रिझर्व्ह बॅकेने विशेष प्रयत्न केले आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार देशातील २४.६४ कोटी कुटुंबापैकी १४.४८ कोटी म्हणजे ५८.७ टक्के कुटुंबांना बॅकिंगच्या सेवा उपलब्ध करून दिल्या होत्या. यामध्ये ५४.४६ टक्के ग्रामीण आणि ६७.६८ टक्के शहरी कुटुंबांचा समावेश होतो.

**ब) ए.टी.एम्.ची सुविधा :**

अलिकडील काळात बॅका आपल्या ग्राहकांना दर्जेदार सेवा पुरविण्याकडे विशेष लक्ष देत आहेत. बहुतेक बॅका मानवी श्रमशक्तीचा वापर कमी करून स्वयंचलित यंत्रांचा अधिक वापर करीत आहेत. त्यामुळे संगणकीकरण, इ—बॅकिंग, टेली बॅकिंग, ए.टी.एम्. इ. सेवा सुविधांचा वेगाने विस्तार होत आहे. ग्राहकांना त्यांच्या मागणीप्रमाणे पैसे देणे व त्यांची रक्कम जमा करून घेणारे स्वयंचलित यंत्र म्हणजे ए.टी.एम् होय. ही सेवा बॅका २४ तास ग्रहाकांसाठी उपलब्ध करून देत असतात. मार्च २०१४ अखेर देशातील ३८.२ टक्के बॅक शाखा व १४.५८ टक्के ए.टी.एम्. ग्रामीण भागात उपलब्ध होते. एकटया स्टेट बॅकेच्या देशभरात जानेवारी २०२० पर्यंत ५०००० ए.टी.एम्. मशीन्स कार्यरत होत्या. २०१६ पर्यंत देशभरात दोन लाखापेक्षा अधिक ए.टी.एम्. मशीन्स होत्या.

**क) एस्.एच्.जी. लिंकेज प्रोग्रॅम :**

नाबार्डचा हा जगातील सर्वात मोठा सूक्ष्म वितपुरवठयचा कार्यक्रम आहे. यामध्ये बचत गटांची खाती व्यापारी बॅका, सहकारी बॅका, प्रादेशिक ग्रामीण बॅका इ. मध्ये काढून अशा बचत गटांना अल्पव्याजदराने लहान लहान कर्जे दिली जातात. विशेष करून देशातील महिलांमध्ये असे बचत गट स्थापन करून त्यांना लहान—मोठे व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**ड) किसान क्रेडिट कार्डस् :**

ऑगस्ट १९९८ पासून व्यापारी बॅका व प्रादेशिक ग्रामीण बॅकांनी किसान क्रेडिट कार्ड योजना सुरू केली आहे. किसान क्रेडिट कार्डच्या सहाय्याने देशातील शेतकऱ्यांना खते, बी–बियाणे, कीटकनाशके इ. ची सहजपणे खरेदी करता यावी म्हणून सन १९९८’९९ च्या अंदाजपत्रकात केंद्रीय अर्थमंत्र्यांनी या संबंधी तरतुद केली होती. किसान क्रेडिट कार्ड योजने अंतर्गत बॅकाकडून शेतकऱ्यांना १.६० लाख रूपयांचे कर्ज कोणतेही तारण न घेता फक्त ४ टक्के व्याजदराने दिले जाते. ऑक्टोंबर २०२१ मध्ये केंद्र सरकारने एक अधिसूचना कढून देशातील २.५ कोटी शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डचे वितरण केले होते.

**इ) बॅक साथी किंवा बिझिनेस करस्पॉडन्ट योजना :**

देशातील असंख्य ग्रामीण व शहरी भागातील लोकांचे बॅकेत खातेच नसल्यामुळे त्यांना कोणत्याही बॅकिंग सेवांचा लाभ मिळत नाही. २००६ मध्ये रिझर्व्ह बॅकेने व्यापारी बॅकांना ही योजना सुरू करण्यास संमती दिली. ‘बिझिनेस करस्पॉडन्ट’ योजनेअंतर्गत बॅकेचे अधिकारी समाजातील वंचित व दुर्गम भागातील व्यक्ती पर्यंत पोहोचून त्यांचे ‘नो फ्रिल’ खाते काढतात. अशा खातेदारांना वेळोवेळी भेटून खात्यात पैसे भरणे, पैसे काढणे, पैसे हस्तंतरित करणे या सारख्या सेवा उपलब्द करून देतात. यासाठी ‘पॉईन्ट ऑफ ट्रॅन्झॅक्शन’ मशीनचा वापर केला जातो. हे एक ‘हॅण्ड हेल्ड’ मशीन असते. या मशीनच्या सहाय्याने तो व्यक्ती जिथे राहतो तिथेच ट्रॅन्झॅक्शनचे व्यवहार पूर्ण केले जातात. या योजनेला ‘बॅक मित्र’ योजना असेही म्हटले जाते.

**ई) स्वाभिमान योजना :**

देशपातळीवर समाजातील गरीब व निर्धन व्यक्तींना अर्थिक सहाय्य मिळावे म्हणून १० फेब्रुवारी २०११ पासून श्रीमती सोनिया गांधी यांनी ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत २००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या देशातील ७४००० गावांना बॅकिंग सेवा उपलब्द करून देण्याचे अद्दिष्ट निश्चित केले होते. ‘बॅकमित्र’ योजने अतंर्गत समाजातील प्रत्येक स्तरांपर्यंत पोहचण्याचे उद्दिष्ठ होते. सन २०२२ पासून महिला स्वाभिमान योजना सुरू करून देशातील स्त्रियांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**३) प्रधानमंत्री जनधन योजना :**

२८ ऑगस्ट २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेची सुरूवात केली आहे. योजनेअंतर्गत समाजातील दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गटातील लोकांना बचत खाते, गरजेनुसार कर्जाची उपलब्दता, विमा, पेन्शन इ.सुविधा उपलब्द करून दिल्या जातात. देशातील १००० ते १५०० कुटुंब असलेल्या गावांना ५ कि.मी. च्या आत बॅकिंग सेवा उपलब्ध्द करून देण्याची तरतुद या योजनेत करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०१८ पर्यंत जनधन योजनेतील लाभार्थीची संख्या ३३.३० कोटी होती यामध्ये १९.७० कोटी. ग्रमीण व १३.५८ कोटी शहरी लाभार्थी होते. या योजनेअंतर्गत बॅकेत खाते सुरू केलेल्या ग्राहकांना २६.३४ कोटी रूपे कार्डाचे वाटप केले आहे.

**४) सामाजिक सुरक्षा योजना :**

वित्तीय व सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने ९ मे २०१५ पासून केंद्र सरकारने खालील तीन सामाजिक सुरक्षा योजना सुरू केल्या आहेत.

**५) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना : (PMSBY)**

ही योजना कुटुंबातील १८ ते ७० वर्षे वयोगटातील बचत खातेदारांच्या अपघाती मृत्यू किंवा पूर्ण अपंगत्वासाठी सुरू करण्यात आली आहे. अपघाती मृत्यू किंवा पूर्ण अपंगात्वासाठी २ लाख रू चे संरक्षण या योजनेनुसार दिले जाते. याचा प्रिमियम प्रतिग्राहक रू. १२ इतका कमी असून या विम्याचे कव्हेरेज एका वर्षासाठी असते. एका वर्षानंतर पुन्हा नव्याने हा विमा घेता येतो.

**६) प्रधानमंत्री जीवन ज्येती विमा योजना : (PMJJVY)**

या विमा योजनेत १५ ते ५० वयोगटातील सर्व बॅक खातेदारांना कोणत्याही कारणाने झालेल्या मृत्यूसाठी २लाख रूपयांचे विमा संरक्षण दिले जाते. याचा प्रिमियम प्रतिवर्ष ३३० रू असून विमा कव्हर एका वर्षासाठी आहे. दरवर्षी हा विमा घेता येतो.

**७) अटल पेन्शन योजना : (APY)**

ही योजना १८ ते ४० वयोगटातील असंघटीत क्षेत्रासाठी सुरू करण्यात आली आहे. या वयोगटातील व्यक्तीना या योजनेअंतर्गत भरावयाच्या रक्कमेनुसार वयाच्या ६० व्या वर्षी रू.३०००, रू.४०००, रू. ५००० एवढी किमान पेन्शन दर महिन्याला मिळत राहते. भारताच्या

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत समाजवादी समाज रचनेचे तत्व स्वीकाल्यापासून समावेशक वृध्दीला आर्थिक नियोजनात महत्व देण्यात आले आहे. गेल्या ६५ ते ७० वर्षाच्या काळात नियोजनातून सर्वसमावेशक वृध्दी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु अजुनही हे ध्येय फारशे यशस्वी झालेले नाही. असे खेदाने नुमुद करावे लागते. भारतात आजही समाजिक व आर्थिक समता प्रस्तापित झालेली नाही. विविध शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांप्रर्यत पोहचलेला नाही. १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यस्थेच्या रचनेत मूलभूत बदल होणे आवश्यकक होते. म्हणजे विकासातून वगळल्या गेलेल्यांचा विकास प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात समावेश करणे आवश्यक होते. त्यासाठी समावेशक वृध्दीच्या तत्वाचा विस्ताराने अवलंब करणे गरजेचे आहे. देशात समावेशक वृध्दीची व्यापकता वाढविण्यासाठी खालील उपाय योजनांची अंमलबजावणी होणे गरजेचे वाटते.

**समावेशक वृध्दीची व्यापकता वाढविण्यासाठी उपाययोजना :**

१) देशातील दारिद्रयाची  वास्तव स्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

२) मानवी कौशल्याचा विकास करणे

३) विकास प्रक्रियेतील महिलांचा सहभाग वाढविणे

४) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक व्यापक व प्रभावी बनविणे

५) देशात साक्षरतेचे प्रमाण वाढविणे

६) बॅकांच्या पतपुरवठयात वाढ करणे

७) बालमृत्यूच्या प्रमाणात घट घडवून आणणे

८) जनसामान्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे

९) मांतांच्या आरोग्यात सुधारणा करणे व लिंग समानता आणणे

१०) शिक्षण व आरोग्याच्या सुविधा माफक दराने पुरविणे

११) प्रादेशिक असमतसेल कमी करणे

१२) राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे समान वाटप करणे.

१३) विविध पातळयांवर विकास योजनांची प्रभावी आणि प्रमाणिकपणे अंमलबजावणी करणे.

अशा उपाययोजनांचा अवंलंब करून देशात समावेशक वृध्दीची व्यापकता वाढविता येईल. त्यामुळे शाश्वत विकासाला गती प्राप्त होईल.

**समारोप :**

भारतातील समावेशक वृध्दीने केलेली वाटचाल अगदीच निराशाजनक आहे असेही म्हणता येणार नाही परंतु आपण निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या किती जवळ पोहचलो याचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. समावेशक वृध्दी लोकांकरीता, जनसामान्यांसाठी काय करते हाच न्याय परीक्षणाचा खरा निकष असतो. परंतु भारतामध्ये आतापर्यंत समावेशक वृध्दी फारशी घडून आलेली नाही. असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. शासन पातळीवर काम करणारे लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी हे वेगवेगळया विकासाच्या योजनांची अंमलबजावणी किती प्रमाणिक व कार्यक्षमतेने करतात, यावरच समावेशक वृध्दीचे यश आणि भवितव्य अवलंबून आहे. डॉ. अमर्थ्यसेन यांच्या मते 'सामान्य माणूस' साकारण्यासाठी समावेशक वृध्दीचे तत्व स्वीकारले पाहिजे.

**संदर्भ :**

१) भारतीय अर्थव्यस्था – श्री रंजन कोळंबे
२) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.के.एम्.भोसले, डॉ.एस्.एम्.भोसले, डॉ.पी.एच.कदम
३) बॅका आणि वित्तीय संस्था – प्रा.भोसले प्रा.काटे
४) बॅका आणि वित्तीय बाजारपेठ – डॉ.एस्.एम्.भोसले, डॉ.पी.एच.कदम, डॉ.सी.आर. जाधव
५) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.के.एच्. ठकर, प्रा.जी.व्ही.कुंभोजकर
६) स्पर्धापरीक्षा अर्थशास्त्र – डॉ.किरण जी. देसले
७) प्रधानमंत्री जनधन योजना – ऑनलाईन लेख

***

# भारतीय समाजकार्याचा इतिहास आणि तत्त्वज्ञान

**डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, जालना

मानव हा सामाजिक प्राणी आहे. तो समूहाने राहतो. एकटा तो राहू शकत नाही. समाजाचा एक घटक असल्यामुळे तो समाजात राहतो, वावरतो, वाढतो व कार्यरत असतो. अधिकाधिक समाजाभिमुख राहण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ही मानसिकता यांच्या समाजामध्ये एकरुप करुन घेण्यासाठी आवश्यक असते. त्यांच्या व समाजातील इतर घटकांच्या अडचणीची व समस्यांची जाणीव, माहिती त्याला होत असते. म्हणूनच इतरांना मदत करण्यास तो प्रवर्तक होतो. येथे समाजकार्याचा प्रारंभ होतो. थोडक्यात सांगायचे झाले तर समस्या सोडविण्यासाठी समस्याग्रस्त व्यक्तीला मदत करणे आणि मार्गदर्शन करणे म्हणजे समाजकार्य होय.

प्राचीन काळापासून समाजकार्याच्या बाबतीत वेगवेगळया देशातील आणि धर्मातील सामाजिक दृष्टीकोनाचा आढावा घेतल्यास असे आढळून येते. गुप्तकालीन काळात आणि समाजात तथागत् भगवान गौतम  बुध्द, महावीर जैन हयांच्या तत्त्व प्रणालीचा प्रसार झाल्यावर समाजातील हया शोषित आणि दुर्लक्षित व्यक्तीनां दयेची, सहानूभूतीची वागणूक  मिळावी, गरीबांचा छळ न करता त्याच्यावर प्रेम करावे प्रारंभीच्या काळात सर्वच धर्मामध्ये व देशामध्ये निराधार व निराश्रितांच्या पुनर्वसनाची कल्पना त्यांना दया दाखवणे, पोटभर जेवायला घालने, अंगभर वस्त्र देणे आणि निवारा देणे, शिरावर छप्पर उपलब्ध करुन देणे, एवढयापुरतीच मर्यादित होती. हिंदू धर्मासह जवळजवळ सवर्च धर्मामध्ये वंचिताकडे कल्याणकारी भूमिकेतून बघितले जात होते. दया आणि दानधर्म हया दोनवर अधारित

आश्रम आणि संस्था स्थापित झाल्यावर यांच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा आणि देखभाल यावर मुख्यतः भर दिला गेला. अनाथांच्या पुनर्वसनाला लांबलचक भूतकाळ आहे. प्रस्तुत लेखामध्ये आपण 'भारतीय समाजकार्याचा इतिहास आणि तत्त्वज्ञान' या विषयावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न. मनोसामाजिक समस्याचे समाधान आणि निदान करण्याच्या वैज्ञानिक पध्दतीला समाजकार्य असे म्हणतात. हयाचा विकास आधुनिक समाजातील जटील समस्यांच्या संदर्भात झाला आहे. परंतु हया स्वरुपाच्या आधी हयाचे स्वरुप धर्म, दान तथा परोपकार इत्यादी प्रकारे करण्यात येणाऱ्या सेवाशी संबधीत होते.

समाजकार्य ही एक अशी कला आहे की ज्यामध्ये विविध साधनाचा वापर करावा लागतो. वैयक्तीक सामूहीक आणि सामूदायीक गरजांची पूर्ती करण्याकरिता एका अशा शासकीय पध्दतीचा वापर केला जातो की ज्यामुळे व्यक्तीची मदत केली जाते जेणे करुन ते स्वतः आपली मदत करु शकतील. मानवतावाद हे व्यक्तीगत स्वातंन्र्य आणि त्या सृजनशक्तीवर विश्वास ठेवतो. कारण मानव हा विवकेशील प्राणी आहे. मानवतावादी दर्शनमध्ये मानवाला सृष्टीची सर्वप्रथम उपलब्धीच्या रुपात स्विकारले आहे.

समाजकार्य ही एक मदत करणारी क्रिया आहे. या कार्याद्वारे व्यक्ती, समुह आणि समुदाय यांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत केली जाते. समस्या सोडविण्याकरिता समाजकार्यात निश्चित अशी कार्यपध्दती निर्माण केली गेलेली आहे. उदा. व्यक्तीसहायय कार्य (Case Work), समुदाय संघटन (Community Work), गटकाय (Group Work), सामाजिक क्रिया (Social Action), समाजकल्याण प्रशासन (Social Welfare Administration), समाज कार्य संशोधन (Social Work Research) इत्यादी समाजकार्याला तत्त्वज्ञानाचा आधार आहे. म्हणून ते एक शास्त्र समजल्या जाते. समाजकार्याद्वारे व्यक्तीला, समुहाला कायम

स्वरुपात मदत करण्यात येते. याचा उद्देश पुनर्वसन करणे हा असतो. समस्या निर्माणच होऊ नये म्हणून समाजकार्याद्वारे प्रतिबंधात्मक उपाययोजना सुध्दा केली जाते. थोडक्यात समाजकार्य हे व्यक्तीला स्वतःला स्वतः मदत करणारे कार्य आहे. विशिष्ट तंत्राचा उपयोग करुन विज्ञानावर आधारित व व्यावसायिक पातळीवर समाजाची केलेली सेवा म्हणजे समाजकार्य होय.

**वाल्टर ए. फ्रिड लेण्डर (Fried Lander)** यांचे मतानुसार, “समाजकार्य मानव संबंधाचे वैज्ञानिक ज्ञान आणि कौशल्यांवर आधारित एक व्यावसायिक सेवा आहे. जे व्यक्तींना स्वतः किंवा समुहामध्ये, सामाजिक आणि वैयक्तीक संतुष्टी व स्वातंत्र्य प्राप्त करण्याकरिता आहे. हे कार्य साधारणतः एक सामाजिक संस्था किंवा संगठनेद्वारे करण्यात येते.”

**एण्डरसन** (Anderson) यांचे मते, “समाजकार्य लोकांसाठी व्यावसायिक सेवा आहे. ज्याचे उद्देश व्यक्ती आणि सामुहिकपणे त्यांची मदत करतात. ज्यामुळे व्यक्ती आपली इच्छा आणि योग्यतेनुसार संतुष्टी व उच्च जीवनस्तर प्राप्त करु शकते.”

**हर्बर्ट हेविट स्ट्रोप** (Herbert Hewitt Stroup) यांचे मते, “समाजकार्य एक कला आहे जे वैज्ञानिक पध्दतीच्याद्वारे व्यक्ती, समुह व समुहास त्यांच्या उपलब्ध साधनानुसार आपली मदत स्वतः करण्यास त्यांना मदत करते.”

**आर्थर फिंक** (Arthor Fink) यांचे मतानुसार, “समाजकार्य सेवांचे साधन आहे की, जे व्यक्तींना व्यक्तीगत किंवा सामुहिक रुपात वर्तमान आणि भावी मनोसामाजिक अडचणी सोडविण्यास मदत करते जे त्यांना समाजामध्ये पूर्ण व प्रभावशाली भाग घेण्यास थांबतात.”

**भारतीय समाजकार्य सम्मेलन** (Indian Conference of Social Work) “समाजकार्य एक कल्याणकारी क्रिया आहे जे मानवीय दर्शन वैज्ञानिक ज्ञान तांत्रीक कौशल्यावर

आधारित आहे. हे व्यक्तीसमुह आणि समुहास संपन्न जीवन व्यतीत करण्यास मदत करते.”

**प्रो. राजाराम शास्त्री** यांच्या मते, “मनोसामाजिक समस्यांचे निदान आणि उपचारांचे जे नवीन मार्ग विकसित झाले आहे ते म्हणजे समाजकार्य आहे.”

वरील व्याख्यांचा निष्कर्ष असा निघतो की, समाजकार्य हे व्यावसायिक सेवा असून कल्याणकारी क्रिया आहे. समाजातील व्यक्ती, समूह तथा गट आणि समुदायांच्या समास्या सोडवण्याकरिता समाजातील साधनाचा पूरेपूर उपयोग करणे व त्यांची समस्या त्यांनीच सोडवावी हया दृष्टीने मार्गदर्शन करणे अशी आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या दृष्टीने इंग्लंडमधील समाजकार्य प्राचीन आहेत. इसाई धर्माच्या प्रसाराबरोबर दुसऱ्यांना मदत करणे धर्माचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. सहाय्यता घेणे. आणि देणे हे दोन्ही कार्य पवित्र मानले गेले. हळूहळू धार्मिक मठाचा प्रसार झाला आणि त्याच्या माध्यमातून गरीब व्यक्तींना अन्न, वस्त्र आणि आश्रय हया सारखी अन्य मदत करण्यात येऊ लागली. परंतु वैज्ञानिक क्रांतीमुळे समाजात परिवर्तन झाले. आणि गरीबांना सहाययता करण्याच्या पध्दती मध्ये परिवर्तन झाले. इंग्लंड मध्ये 1556 मध्ये एक कायदा पास करण्यात आला या कायद्यानुसार प्रत्येक रविवारी चर्च मध्ये गरीबांना मदत करण्यासाठी धान संचय केला जाऊ लागला सोबतच स्वस्थ व्यक्तीना भिक किंवा दान करणे वर्जीत केले गेले.

महारानी एलिझाबेधच्या शासन काळामध्ये निर्धन सहाययता कार्यक्रमामध्ये प्रगती झाली महारानी एलिझाबेधनी 1601 मध्ये निर्धन सहाययता कायदा पारीत केला. या कायद्यानुसार गरीबांना मदत करण्यासाठी शहरातील लोकांवर, कर लावले गेले व त्या धनराशी मधून गरीबांना मदत करण्याचा प्रयास केला गेला या कायद्यानुसार मदत होणाऱ्या व्यक्तीला

तीन श्रेणीमध्ये विभाजित करण्यात आले. 1. स्वस्थ शरीरवाले निर्धन 2. रोजगाराकरिता अयोग्य निर्धन/गरीब 3. आश्रीत मुले. अमेरिकेत खालील समुदायाद्वारा गरजूंना मदत दिली जात होती. निर्धन गृह आणि कार्यालय या माध्यमातून मदत केली जात होती. हळूहळू हा अनुभव आला की प्रत्येक व्यक्तींना आवश्यकतेच्या वेळी मदत करण्यास स्थानीय समुदाय समर्थ नाही. म्हणूनच राज्य सरकारने पण हयासाठी कार्य केले पाहिजे. सर्वप्रथम अमेरिकामध्ये राज्य सरकार द्वारा मुकबधीर व्यक्तींसाठी संस्थागत कार्य 1822 मध्ये सुरु झाला. 1837 मध्ये आंधाळयांसाठी व 1840 मध्ये किशोर वयातील विकृत मस्तीष्क तथा मानसिक रोगी असलेल्या व्यक्तीच्या देखभाल करण्याचे कार्य सुरु करण्यात आले. या सेवेच्या संचालनासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक कल्याण संघटनांची निर्मिती केली नव्हती. परिणामतः मानसिक विकृत असलेल्या व्यक्तींची म्हणूनच सर्वप्रथम केंसचुट्स या संस्थाद्वारा 1863 मध्ये मेंसचुट्स राज्यदान बोर्डची स्थापना केली. या दानबोर्डचा प्रमुख कार्य गरजू लोकांचे संरक्षण करणे. त्यांना मदत करणे होता.

अमेरिकामध्ये हळूहळू व्यावसायिक समाजकार्यापासून विकास सुरु झाला आणि समर स्कूल मीलेन्थ्रोफी वर्कस्‌ची स्थाापना करण्यात आली. या संस्थामध्ये व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था होती. अमेरिकामध्ये समाजकार्याच्या विकासासाठी खाजगी संस्था, दान संघटक, गिरजा घर तथा चर्च या सर्वांनी योगदान दिलेले आहे.

भारतीय संस्कृती ही प्राचीन संस्कृती आहे. प्राचीन कालापासून येथे समाजकार्यांचे विविध स्वरुप दिसून येतात. पाप, पुण्य, अतीथी, सेवा, दुर्बल, निराश्रीत, दुःखी इ. व्यक्तींची मदत करणे हा महत्त्वपूर्ण धार्मिक कार्य आहे. पुण्याचे कार्य समजले जात होते. राजाप्रजाचा सेवक किंवा पालक समजला जात होता. प्रजांचे कल्याण हेच त्याचे प्रथम कर्तव्य होते. कालानुसार भारतीय समाजकार्याच्या इतिहासाचे प्रमुख तीन कालावधी आहेत.

प्राचीन व मध्ययुगीन समाजकार्याचा कालावधी सर्वात मोठा आहे. प्राचीन काळात धर्माला विशेष महत्त्व होते. मंदीर, आश्रम यांच्या मार्फत कार्य केले जात होते. उपाशी व्यक्तीला अन्नदान करणे, निराश्रीतताला आधार देणे, रोग्याची सेवा करणे, पाहुण्यांचा आदर, सत्कार करणे इ. बाबी दिसत होत्या. समाजातील प्रजेचे कल्याण राजाचे पहिले कर्तव्य होते. प्राचीन काळातील धार्मिक ग्रंथ, इ. मध्ये समाजकार्याचा उल्लेख दिसून येतो.

मध्ययुगीन समाजकार्य चक्रवर्ती महान सम्राट अशोकाच्या काळात रुग्णावर औषधोपचार करण्यासाठी गावोगावी सेवा करीत आणि सार्वजनिक रुग्णालय होते. असे स्पष्ट होते. रुग्ण सेवा या बाबीचे खुपच महत्त्व होते. रस्ते, तलाव तसेच धर्मशाळा, विश्रामगृहे यांचे महत्त्व, बौध्द धम्माच्या प्रभावामुळे त्याच बरोबरच सम्राट अशोक मानवतावादी दृष्टीकोनामुळे समाजकार्य समाजात दिसून येत होते. चंद्रगुप्त मौर्याच्या शासनकाळात अपंग, वृध्द, यांची काळाजी घेणे, त्यांच्यावर उपचार करणे हे अत्यंत पवित्र कार्य मानले जात होते. निराश्रीत/निराधार, अनाथ बालकांचे शिक्षण, निवास आणि भोजनाची व्यवस्था करणे हे धार्मिक कार्य मानले जात होते. गुरु आश्रमामध्ये शिष्यांना निशुल्क शिक्षण देत असते. राजा आश्रमाला सर्व परीने मदत करीत होते. त्यानंतर 13 व्या शतकामध्ये भारतात इस्लाम राज्ये आले. अकगर बादशहाने रस्ते, सार्वजनिक रुग्णालये या प्रकारच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या. या काळात भारतात इस्लाम धर्माचा प्रसार झाला. असहायय तसेच निर्धन व्यक्तीला मदत करणे इस्लाम धर्माचे आधारभूत अंग होते. त्यानंतर 1707 मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर भारतात सतत संघर्ष सुरु होते. त्यानंतर भारतात पेशव्यांचे शासन आले. या काळात अनेक समाजसेवा कार्य करण्यात आले. उदा. रस्त्याच्या आजुबाजूला झाडे लावणे, नदीवर घाट बांधणे, गरीबांना दान करणे यासारखे महत्त्वपूर्ण कार्य केले जात होते. सुयुक्त कुटुंब, जातीपंचायत, ग्रामपंचायत

यांचे महत्त्व पाळले होते. आणि त्यांच्या माध्यमातून समाजकार्य केले जात होते.

मुघल बादशाहा व जहागीर यांच्या काळात युरोपीय लोक व्यापाराच्या दृष्टीने भारतात आले, यामध्ये डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज प्रामुख्याने आले. युरोपीय लोक समुद्र मार्गाने भारतात आले. याचा प्रमुख उद्देश व्यापाराचा होता. परंतु इंग्रज हे भारताचे शासक बनले.

ब्रिटीश कालीन समाजकार्यात खालील बाबींचा समावेश होतो. 1. 1780 ते 1880 या काळात समाजकार्य, 2. 1880 ते 1900 या काळातील समाजकार्य, 3. 1900 ते 1920 मधील समाजकार्य, 4. 1921 ते 1936 मधील समाजकार्य आणि 5. 1937 ते 1947 मधील समाजकार्य

**1780 ते 1880 या काळात समाजकार्य** :–

इंग्रज लोक भारतात मोठया प्रमाणात व्यापाराच्या उद्देशाने आले. तत्कालीन भारतीय राजे व मुस्लीम शासन यांच्यातील आपसातील भेदभावाचा अचुक फायदा त्यांनी उचलला. इ. स. 1850 मध्ये संपूर्ण भारतात इस्ट इंडीया कंपनीद्वारे ब्रिटीश राज्याची स्थापना झाली. 1857 मध्ये प्रथम स्वातंन्त्र्य चळवळ सुरु झाली होती. परंतु ते अपयश ठरले. त्यानंतर हीच भूमिका पार पाडली नाही तर ख्रिश्चनमधर्माचा प्रसार केला. गिरजा घराच्या माध्यमातून धर्माचा प्रसार आणि सोबतच शाळा दवाखाने इ. सेवा माध्यमातून लोकांची सहानुभूती प्राप्त केली. या काळात भारतातील सामाजिक स्थिती ही अत्यंत वाईट होती. आणि समाज सुधार चळवळीचा उदय बंगालमधून झाला. कारण या राज्याची सामाजिक स्थीती अत्यंत वाईट होती. जात–पात, उच–निच, बालविवाह, सतीप्रथा, पडदाप्रथा, अंधश्रध्दा इ. स्थिती भारताच्या सर्व प्रांतात दिसत होती. बंगालमध्ये राजा राममोहन मोहनरॉय यांनी प्रथम समाज सुधार आंदोलन संपूर्ण भारतात पसरवले. नंतर सतीप्रथा बंद झाली. बालविवाह रोखण्यासाठी कार्य करण्यात आले. सामाजिक विषमता कमी झाली. अस्पृश्यता निवारणासाठी कार्य सुरु झाले इ. कार्य सुरु झाले.

**1880 ते 1900 या काळातील समाजकार्य :–**

समाजकार्य संस्थाद्वारे समाजसुधार आंदोलन 18 व्या शतकाच्या सुरुवातीपासून 19 व्या शतकाच्या समाप्ती पर्यंत संपूर्ण लोकसंख्या व्यसनाधिनता, औद्योगीकरण, गरीबी, गलीच्छ वस्ती इ. समस्यांची निर्मिती झाली होती. ख्रिश्चन मिशनरीने या परिस्थितीचा लाभ घेऊन गरीब लोकांसाठी कार्य केले. पण त्यांचा उद्देश धर्म परिवर्तन हा होता. 1882 मध्ये रमाबाई यांनी तसेच क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानल्योती सावित्रीमाई फुले यांनी या काळात पुष्कळ संस्थांची स्थापना केली. त्यात अनाथालय मुलांची शाळा प्रमुख आहे. 1887 मध्ये शशीप्रसाद बॅनर्जी यांनी विधवांसाठी विधवागृहांची स्थापना केली. देशश्राय या काळात विभिन्न कार्यक्रम सुरु होते.

**1900 ते 1920 मधील समाजकार्य :–**

या काळात समाजकार्य क्षेत्रात पुष्कळ कार्य सुरु झाले. 1904 मध्ये समाज सुधारकांचे अखिल भारतीय संम्मेलन आयोजित करण्यात आले. 1905 मध्ये भारत सेवक समाजाची स्थापना गोपाल कृष्ण गोखले यांनी केली. या समाजाचा मुख्य उद्देश राजकीय होता. पण त्याच बरोबर आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक गरीब वर्गाच्या विकासासाठी कार्य करीत होते. 1906 मध्ये रामजी शिंदे यांनी दलित वर्ग समाजाची स्थापना केली. 1917 मध्ये ॲनी बेझंट यांनी मद्रास या ठिकाणी भारतीय महिला संघाची स्थापना केली. या काळात प्रामुख्याने दलीत वर्ग महिलांसाठी शिक्षण, विधवा गृहाची स्थापना, सतीप्रथा, विरोधक इ. कार्य सुरु होते.

**1921 ते 1936 मधील समाजकार्य :–**

1. 1920 मध्ये मद्रास या ठिकाणी बाल कायदा लागू झाला. 2. 1922 बंगाल मध्ये बाल कायदा लागू झाला. 3. 1924 मध्ये मुंबई येथे बाल कायदा सुरु करण्यात आला. 4. 1921 मध्ये हिंदू वारसा कायदा पास झाला. या कायद्याअंतर्गत मुलगा, मुलगी, पत्नी, भाऊ बहीण यांनाही हक्क मंजूर करण्यात आले.
1929 मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा सुरु झाला. अशाप्रकारे वेगवेगळे कायदे व विधेयक करण्यात आले. सामाजिक जागृती

आणि सुधारणासाठी या कायद्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. 1920 मध्ये मुंबई या ठिकाणी समाजसेवा संघा मार्फत समाजकार्य कर्तासाठी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था सुरु झाली. परंतु या संस्थांचा मुख्य उद्देश कार्यकर्ता पर्यंत मर्यादित होता. 1936 मध्ये सर दोरबजी टाटा यांनी ग्रॅज्युएट स्कुल ऑफ सोशल वर्कची स्थापना करुन व्यावसायिक समाजकार्य प्रशिक्षणाची सुरुवात केली.

**1937 ते 1947 मधील समाजकार्य :–**

या कालावधी मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीची चळवळ आपल्या संपूर्ण भारतात सुरु होती. स्वातंत्र्य सोबतच दलित वर्गाच्या विकास, मागास वर्गीयांच कल्याण, महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी पण कार्य सुरु होते.

15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वतं. भारत राष्ट्राला कल्याणकारी राष्ट्र घोषीत करण्यात आहे. भारत आणि पकिस्तान दोन राष्ट्रांची सवतंत्र निर्मिती झाली. पाकिस्तानातून मोठया संख्येत निर्वासीत व्यक्ती भारतात येऊ लागले.निर्वासीत नागरीकांना राहण्याची व्यवस्था करण्यासाठी किंवा त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पुनर्वसन मंत्रालयाची स्थापना करण्यात आली.

यानंतर स्वतंत्र भारतात राज्यघटनेची निर्मिती महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. राज्य घटना 26 जानेवारी 1950 मध्ये लागू झाली. बाबासाहेबांनी राज्य घटनेद्वारे नागरिकांना मौलिक अधिकार व कर्तव्य प्राप्त करुन दिले. याच बरोबर स्वतंत्र भारतात अनेक कायद्यांची निर्मिती करण्यात आली. कायदे लागू झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना, महिलांना, बालकांना, समस्त नागरीकांना यांचा फायदा झाला.

समाजकल्याणचे कार्य मोठयाप्रकारे व्हावे यासाठी समाज कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागाअंतर्गत 1. बाल कल्याण, 2. महीला कल्याण, 3. युवा कल्याण, 4. कुटुंब कल्याण, 5. श्रमकल्याण, 6. आदिवासी कल्याण, 7. अपंग कल्याण संबंधीत कार्य केले जातात. 1953

मध्ये केंद्रीय समाज कल्याण बोर्डची स्थापना झाल्यानंतर या विभागाद्वारे स्वयंसेवी संस्थांना कार्य करण्यासाठी अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली.

समाजकार्याला व्यवसाय रुपात ग्रहण करण्यासाठी भारतामध्ये प्रशिक्षणाची सुरुवात उशिरा झालेली आहे. भारतात सर्वप्रथम 1920 मध्ये मुंबई या ठिकाणी समाजसेवा संघ या संस्थेद्वारे समाज कार्याच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती. या संस्थेद्वारे फक्त प्रशिक्षण देण्याचे काम केले जात होते. कोणतीही व्यवसायिक डिग्री प्रदान केली जात नव्हती. भारतात व्यवसायिक शिक्षणाचा आरंभ मुंबई मध्ये 1936 मध्ये झाला. जेव्हा सरदोरबजी टाटा यांनी ग्रॅज्युएट स्कुल ऑफ सोशल वर्कची स्थापना केली. वर्तमान मध्ये या संस्थेचे नाव टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्स आहे. T.I.S.S. एक स्वतंत्र विद्यापीठ आहे. या विद्यापीठाद्वारे समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जाते.

त्यानंतर 1947 मध्ये दिल्ली स्कुल ऑफ सोशल वर्कची स्थापना करण्यात आली. त्याच वर्षी काशी विद्यापीठाअंतर्गत वारानसी या ठिकाणी पण समाजकार्य प्रशिक्षणाची सुरुवात केली. नंतर 1950 मध्ये बडोदा येथे समाजकार्य प्रशिक्षणाची सुरुवात झाली. नंतर पटना स्कुल ऑफ सोशल सायन्स दयपूर स्कुल ऑफ सोशल वर्क आणि 1963 मध्ये इंदौर स्कुल ऑफ सोशल वर्कची स्थापना करण्यात आली.

भारतात मुंबई येथे 1936 मध्ये समाजकार्य प्रशिक्षणाची सुरुवात झाली होती. प्रशिक्षणाची सुरुवात झाल्यानंतर 1957 पर्यंत 9 समाजकार्य महाविद्यालय सुरु झाले होते. 1965 पर्यंत 34, 1980 पर्यंत 45 आणि 1990 पर्यंत 61 व 2000 पर्यंत 106 समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यात आले होते.

आज 106 महाविद्यालयापैकी 54 महाविद्यालय एकटया महाराष्ट्रात आहेत. अर्थात पूर्ण महाविद्यालयापैकी 50.94 टक्के महाविद्यालय महाराष्ट्रात आहेत. सर्व प्रथम विदर्भ नागपूर येथे 1958 मध्ये मातृसेवा संघ या ठिकाणी समाजकार्य प्रशिक्षण सुरु

करण्यात आले. नंतर 1968 मध्ये तीरपुडे कॉलेज ऑफ सोशल वर्क सुरु करण्यात आले. भंडारा जिल्हयातील 3 सप्टेंबर 1992 मध्ये आठवले समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यात आले. समाजकार्य महाविद्यालयापैकी नागपूर विद्यापीठ 21, अमरावती विद्यापीठ 10, कोल्हापूर विद्यापीठ 5, नांदेड विद्यापीठ 5, जलगाव विद्यापीठ 4, औरंगाबाद विद्यापीठ 5 आणि पुणे विद्यापीठ 3 महाविद्यालये संलग्नीत आहेत. या व्यतीरिक्त भारतीय विद्यापीठ पुणे आणि टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्सेस मुंबईचे समाजकार्य महाविद्यालयाचे स्वतंत्र विद्यापीठ आहेत.

समाजकार्याचे तत्त्वज्ञान फार गहन व उच्च कोटीचे आहे. हयाच तत्त्वज्ञानाच्या आधारावर भारताची राज्यव्यवस्था सुरळीत सुरु आहे. व्यक्ती सहाय्य कार्य, गट सहाय कार्य, समुदाय संघटन कार्य आणि सरकारी खाजगी अशा प्रकारच्या सर्व कार्यात समाजकार्याचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या उपयोगात आणल्या जाते. हया ठिकाणी पुढील काही मुद्यांचा आधार घेऊन हया बाबतीत चर्चा केल आहे.

**स्वतंत्र महत्त्व** :– प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र महत्त्व असते. त्याचप्रमाणे स्वतंत्र व्यक्तीमत्त्व असते. हे व्यक्तीमत्व प्रत्येक व्यक्तीला अनुवंशीक गुणातून वातावरणातून प्राप्त होते.

**वेगळे व्यक्तीमत्त्व** :– प्रत्येकाचे व्यक्तीमत्व वेगळे असल्यामुळे दोन व्यक्ती कधी समान नसतात. या आधारारुन आपण असे म्हणतो की, कोणत्याही दोन व्यक्तीच्या अडचणी वेगवेळया असतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या समस्येचे उत्तर वेगळे असते.

**स्वयंनिर्णयाचा अधिकार** :– कोणत्याही व्यक्तीची समस्या सोडविताना त्याला त्याची समस्या स्वतः सोडवण्याकरिता मार्गदर्शन केले जाते  व त्यामध्ये स्वतःचे निर्ण घेण्याचा अधिकार त्याला असतो.

**गरजांचे प्रमाण वेगळे असते** :– प्रत्येकाला स्वतः स्वतःची मदत करायची असते. सर्व मानवाच्या सर्वसामान्य गरजा समान

असतात. पण प्रत्येकाला प्रत्येकाला लागणारे त्याच प्रमाण वेगळे असते.

**व्यक्तीचा स्वीकार** :– हयामध्ये प्रत्येक व्यक्तीचा स्वीकार केल्या जाते. कोणत्याही प्रकारच्या वैयक्तीक बाब म्हणजे जात, धर्म, लिंग, भाषा इत्यादी स्वीकाराच्या आड येत नाही. प्रत्येक माणसाचा एक व्यक्ती म्हणून स्वीकार केल्या जातो.

**विकासाचा अधिकार** :– प्रत्येक व्यक्ती आणि समुदायास त्याचा विकास घडवून आणण्याचा अधिकार आहे. स्वतः प्रयत्न, मेहनत करुन इतरांचे मार्गदर्शन मिळवून प्रत्येक व्यक्ती, आपला विकास घडवून आणू शकतो. हयावर समाजकार्याच्या तत्त्वज्ञानावर विश्वास आहे.

**संरक्षणाचा अधिकार** :–निसर्ग नियमानुसार प्रत्येकाला आपले मन, शरीर, संपत्ती व इतर मूलभूत अधिकार इत्यादीचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे.

**बदल घडून येतो** :– प्रत्येक गोष्टीमध्ये निसर्ग नियमानुसार विकास होत असतो व प्रत्येक गोष्ट बदलत असते अर्थात हा बदल विकासांच्या दिशेने असायला पाहिजे. नियमानुसारच प्रत्येक व्यक्तीत शारीरिक, मानसिक, बौध्दिक बदल होत असतो व त्यानुसार त्याच्या आवश्यकता व गरजा आणि कार्य, कर्तव्य व जबाबदाऱ्या बदलत असतात.

**ज्ञानाची चाचणी** :– समाजकार्यकर्त्यांनी आपल्या जवळ असलेल्या ज्ञानाची चाचणी घणे आवश्यक असते. त्यावरुन त्याला आपली योग्यता कळण्यास मदत होते. जेव्हा आपल्याला स्वतःची योग्यता निश्चितपणे माहीत होते तेव्हा आपण जास्त प्रमाणात समाजकार्य करु शकतो. कार्यकर्त्याला कार्य करीत असतानाच त्याच्या ज्ञानाची जाणीव होते. इतर समस्यांची सोडवणूक करीत असताना त्याला स्वतःला येणाऱ्या अडचणीतून तो काही नवीन गोष्टी शिकत असतो व त्यातूनच त्याच्या ज्ञानात भर पडत असते.

यावरुन असे लक्षात येईल की समाजकार्य हे समस्याग्रस्त व्यक्तीला त्याची समस्या सोडविण्याकरिता त्याला मार्गदर्शन करते. समाजकार्य म्हणजे संकटकाळात व्यक्तीसमूह

किंवा समूदायाच्या समस्या सोडविण्याकरिता करण्यात आलेले कार्य किंवा मदत म्हणजे समाजकार्य होय. याला मनोसामाजिक समस्यांचे समाधान आणि निदान करण्याची वैज्ञानिक पध्दती असेही म्हणता येईल. प्राचीन काळी संगती,सोबती आणि शेजाऱ्याकरिता त्याग आणि सेवाभाव मानवी मनात रुजलेला होता. त्या काळी दानशिलता आणि भातृभावनेला जास्त मान दिला जात असे समाजकार्याची संकल्पना ही निराश्रितता आणि निर्धनता दूर करण्याचे एक साधन आहे. समस्येशी संबंधीत समाजकार्याचे रुप बदलले आहे. आर्थिक मदतीच्या रुपात व्यक्तींना मदत करणे, समस्याग्रस्त व्यक्तीला त्याची समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करणे व भविष्यात तशा प्रकारची समस्या निर्माण होऊ नये म्हणून योग्य ती खबरदारी घेण्याचे मार्गदर्शन करणे होय. समाजकार्य अशी व्यावसायिक सेवा आहे की ज्याच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सेवा प्राप्त करुन दिली जाते. समाजकार्याचा सहसंबंध सामाजिक संबंधांतर्गत उत्पन्न झालेल्या अडचणीशी आहे. हया अडचणी कुटुंब, शाळा, दवाखाने, शेजार, किंवा राष्ट्राशी संबंधित असू शकतात.

भारतीय समाजात धर्म, जात, पंथ, भाषा, प्रदेश इत्यादी आधारावर विभिन्नता आढळून येते. त्यामुळे देशात, कधी धर्म, कधी जात तर कधी प्रदेशाच्या आधारावर संघर्ष होतो. अशाप्रकारच्या संघर्षामुळे देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली आहे. सांप्रदायिकता, जातीयता, भाषावाद, प्रदेशवाद इत्यादी कारणामुळे देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेवर आघात होत आहे. त्यामुळे आज देशाला राष्ट्रीय एकात्मतेची अत्यंत आवश्यकता आहे. त्याशिवाय राष्ट्राचे भवितव्य उज्ज्वल होणार नाही. भारतीय समाजकार्याचा इतिहास आणि तत्त्वज्ञान भारतातील सर्वच धर्मामध्ये प्रामुख्याने रुजल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


१) प्रा. नरेश कोलते/प्रा. ज्योती नाकतोडे, व्यावसायिक समाजकार्याचे सिध्दांत आणि व्यवहार, यश प्रकाशन, नागपूर

२) प्रा. शास्त्री राजाराम, समाजकार्य, प्रकाशक मधुकर द्विवेदी, लखनऊ, 1997.

३) शाह भारती, समाजकार्य परिचय, विद्या प्रकाशक, नसगपूर, 1999.

४) डॉ. टाकसाळे प्राजक्ता, व्यावसायिक समाजकार्य, संकल्पना व सैध्दांतिक ज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2002.
५) प्रा. निंबाळकर संजिव के., समाजकल्याण, केशवकृष्णा प्रकाशन, चंद्रपूर, 2005.
६) प्रा. लक्कावार निलप्रभा, समाजकार्याची रुपरेषा, रेखा रामचंद लक्कावार प्रकाशन, नागपूर, 2001.
७) प्रा. प्रदीपकुमार, समाजकार्याकरिता मानसशास्त्र, यश पब्लिशर्स, महाल, नागपूर,
८) Dr. Jha Jinendra Kumar, Encyclopedia of Social Work.

***

# स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण योजनांचा अभ्यास - बचत गटाच्या संदर्भात

**कविता ज्ञानेश्वर सोनुने**

**प्रस्तावना**:

महिलांचे सबलीकरण म्हणजे स्त्रीने स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेऊन क्षमतांचा विकास करावयाचा व घरगुती सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे. स्वतःच्या क्षमतांचा विकास करणे व स्वतःच्या समस्यांचे निराकरण करून आत्मनिर्भरतेने व आत्मविश्वासासाठी काम करणे. यासाठी मदतीची माहिती मिळविणे, जागतिक बँकेच्या मते व्यक्तींना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृती मध्ये आणि फलप्राप्ती मध्ये उतरविण्याची क्षमता, वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय.

१९७८ साली यूनो ने जागतिक स्तरावरील कार्यशाळेत व्हेनेसा ग्रिफेन ने सांगितले कि स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रम करण्याची, संघटित करण्याची क्षमता मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार ए. करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय पातळीवर व राज्य पातळीवर योजनांची आखणी व अंमलबजावणी केली आहे. महिला व बालकांच्या विकासासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र

योजना जाहीर केल्या आहेत, तर राज्य सरकारनेही अशा योजना जाहीर करून त्यांची अंमलबजावणी केली आहे. महिला सबलीकरणासाठी आखण्यात आलेल्या योजनांची माहिती महिला, बिगर शासकीय संस्था, बँका, महिला सबलीकरणासाठी कार्य करणारे शासनाचे विभाग व बचत गट याना मिळावी हा उद्देश आहे.

एगलेन्टाईन जेब या इंग्रजी समाज सेविकेने सेव्ह द चिल्ड्रन या नावाची संघटना १९१९ मध्ये स्थापन केली. जेब ने या संघटने अंतर्गत बालहक्कांची घोषणा तयार केली होती. तेव्हाच्या राष्ट्र संघाने जेब च्या या घोषणेचा थोड्या अधिक फरकाने स्वीकार करून २० नोव्हेंबर १९२४ रोजी बालहक्कांची सुप्रसिद्ध अशी जिनेव्हा घोषणा जाहीर केली. आंतरराष्ट्रीय स्तरावर बालकांच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी उचललेलं हे पहिले पाऊलच आहे. या जिनेव्हा घोषणेत ५ तत्वे होती. पुढे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने २० नोव्हेंबर १९८९ रोजी जिनेव्हा घोषणेवर आधारित बालहक्काचा आंतरराष्ट्रीय करार स्वीकारला. २० नोव्हेंबर ला आंतरराष्ट्रीय बालदिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली.

जगातील सर्वात जास्त बालकांची संख्या भारतात आहे. बालकांच्या विकासासाठी, कल्याणासाठी व संरक्षणासाठी विविध धोरणे, योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी शासन करते.

**महिला कल्याणासाठीच्या योजना:**

**1. स्वर्ण जयंती ग्राम रोजगार योजना** स्थापना : १ एप्रिल १९९४

**उद्दिष्टे**:१. स्वयं सहायता गटामार्फत स्वयं रोजगाराच्या संधी ग्रामीण लोकांना उपलब्ध करून देणे. त्याकरिता त्यांना सरकार तर्फे कमी व्याजाच्या दराने कर्ज उपलब्ध करून देणे.

२. ग्रामीण भागातील अनेक छोटे उद्योग लाभार्थी कुटुंब वैयक्तिक रित्या किंवा गटाने याचा लाभ घेऊ शकतात.

३. ३ वर्षांमध्ये दारिद्र्य रेषेच्या वर आणून ठेवणे.

लहान उद्योग सुरु करताना अधिक प्राधान्य समूह उद्योगांना दिले जाते. याकरिता प्रत्येक ब्लॉक मध्ये ४ ते ५ प्रकारचे उद्योग ठरविले जातात. हे ठरवताना उपलब्ध बाजारपेठ याचा विचार केला जातो. मुख्य कार्य हे ब्लॉक पातळीवर पंचायत समितीव जिल्हा पातळीवर डी आर डी ए किंवा जिल्हा परिषद यांच्या मार्फत निवडले जातात.

**स्वयंसिद्ध योजना** स्थापना: १२ जुलै २००१

हि स्वयं सहायता समूह आधारित योजना आहे. पूर्वीची इंदिरा महिला योजना व महिला समृद्धी योजना यांचे एकत्रीकरण करून हि योजना तयार केली.

**उद्देश:** महिलांचे सामाजिक, आर्थिक सशक्तीकरण करणे.

**इतर तरतुदी:**

पहिल्या टप्प्यात योजनेला देशातील ६५० विकास भागात संचालित केले गेले.

इंदिरा महिला योजना राज्यातील १४ जिल्ह्यातील २१ तालुक्यांमध्ये कार्यरत होती. हे सर्व तालुके या योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आले असून त्यात १५ नवीन तालुक्यांची भर घालण्यात आली. अशा एकूण ३६ तालुक्यात ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजने अंतर्गत जुन्या तालुक्यांमध्ये महिलांचे ५० स्वयंसहायता गट व नवीन तालुक्यामध्ये महिलांचे १०० स्वयं सहायता गट स्थापन करण्यात येणार आहेत.

या योजनेचा संपूर्ण खर्च केंद्र शासनामार्फत करण्यात येतो.

या योजनेअंतर्गत प्रत्येक तालुक्या करिता ५ वर्षात एकूण ७.८५ लाख निधी देण्यात येतो. या निधीतून गट निर्मिती आणि गटाचा प्रशिक्षण खर्च भागवायचा आहे .

**गंगेच्या मध्य मैदानी प्रदेशामध्ये महिला सक्षमीकरण आणि उपजीविका कार्यक्रम (प्रियदर्शिनी):**

**उद्दिष्ट**: महिलांच्या सवयं सहायता गटाची निर्मिती आणि उपजीविकेच्या संधी मध्ये सुधारण्याला प्रोत्साहन याद्वारे वंचित समाज गटातील महिला आणि किशोरवयीन मुलींचे संपूर्ण सक्षमीकरण करणे.

**इतर तरतुदी:**

ही योजना प्रायोगिक स्वरूपात उत्तर प्रदेशातील ५ जिल्हात (श्रीवास, बरोच, रायबरेली, अमेठी आणि सुलतानपूर) आणि बिहार मधील २ जिल्ह्यातील (मधुबनी आणि सीतामराठी) १३ गटामध्ये राबविली जात आहे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये नाबार्ड बँक प्रमुख अभिकाला म्हणून कार्य करते.

ही योजना केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालय अंतर्गत राबविली जाते.

**महिला समृद्धी योजना:**

**सुरुवात**: २ ऑक्टोबर १९९३

**उद्देश**: शहरी व ग्रामीण भागातील महिलांना स्वयं सहायता बचत गटामार्फत कर्ज पुरवठा करणे.

**इतर तरतुदी:**

ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास मंडळाद्वारे राबविली जाते.

ही योजना चर्मकार समाजातील विधवा परित्यक्ता महिला आणि ज्या गावात राष्टियकृत बँका नाहीत तेथील महिलांना या योजनेअंतर्गत ४% व्याज दराने रुपये २५००० पर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. कर्ज परतफेडीचा कालावधी ३ वर्षे आहे.

ही योजने नुसार कृषी, कृषी आधारित आणि कारखानदारीवर आधारित व्यवसायाचा विचार केला जातो.

कर्ज वाटप करताना प्रामुख्याने विधवा महिलांना प्राधान्य दिले जाते.

लाभार्थी मागास वर्गातील असावी. ती महाराष्ट्राची रहिवासी असावी. तिचे वय १८ ते ५० वर्षे असावे.

**महिला उद्यम विविध योजना:**

**उद्देश**: महिलांना उद्योग उभारणी साठी आर्थिक साहाय्य करणे.

**इतर तरतुदी:**

या योजने खाली महिला उद्योजकांना १० लाख रुपयापर्यंतच्या प्रकल्प खर्चासाठी त्रुटी भरून काढण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या कमाल १५% अधिक ठेऊन समन्याय पद्धतीने अर्थ साहाय्य देण्यात येते. या अर्थसाहाय्यास प्रकल्प खर्चाच्या २५% किंवा जास्तीत जास्त २.५० लाख रुपये अशी वाढ करण्यात आली.

या योजनेनुसार महिला उद्योजकांना प्रकल्प खर्चाच्या १०% सहभाग अपेक्षित आहे.

या योजनेनुसार भागीदारी/ खाजगी मर्यादित कंपन्यांच्या बाबतीत महिला उद्योजकांना कमीत कमी ५१% सहभाग असणे आवश्यक आहे.

या योजने अंतर्गत वाहतूक कर्ज सोडून कोणत्याही औद्योगिक उत्पादनासाठी या योजनेखाली अर्थ साहाय्य पुरविण्यात येते.

योजना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ या मार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

**बालकांच्या कल्याणासाठीच्या योजना**

**बालसंगोपन योजना**

० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर व अन्य प्रकारच्या आपत्तीत सापडलेल्या बालकांची संस्थाबाह्य व कौटुंबिक वातावरणात संगोपन व्हावे या उद्देशाने राज्यात हि योजना राबविली जाते . अशा बालकांचे संगोपन करणाऱ्या राज्यात १३७ गैर सरकारी संस्था आहेत. अशा बालकांसाठी दार महा दार डोई ४२५ रुपये परीक्षा अनुदान व संस्थेस ७५ रुपये प्रति लाभार्थी प्रति माह अनुदान दिले जाते.

**शिशु गृह योजना (महाराष्ट्र राज्य)**

**उद्देश**: देशातील अनाथ बेवारस मुलांचे  दत्तक विधान भारतामध्येच करणे.

**इतर तरतुदी:**

या योजने अंतर्गत एका युनिट मध्ये १० मुले असतात.

या योजने अंतर्गत फक्त परित्याग केलेलीच मुले शिशु गृहात दाखल होऊ शकतात.

ही योजना महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभागामार्फत राबविली जाते व याच विभागाने हि योजना सुरु केली आहे.

ही योजना स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविली जाते.

या संस्थेमध्ये मुलांना वैद्यकीय सुविधा, आरोग्य विषयक सेवा, विशेष आहार पुरविल्या जातो.

मुलाचा संगोपन खर्च कायदेविषयक शुल्क, वैद्यकीय अधिकारी, समाजसेवक, आशा नर्स चा पगार यासाठी केंद्र शासनामार्फत सहाय्यक अनुदान देण्यात येते.

प्रत्येक संस्थेत दार वर्षी एकूण ६, ६३००० रुपये अनुदान देण्यात येते.

**निरीक्षण गृह योजना:**

राज्यात एकूण ६०० प्रवेश क्षमता असणारी १२ शासकीय निरीक्षण गृहे कार्यरत आहेत. अनाथ, आधारहीन, हरवलेली तसेच बालमजुरीत गुंतलेल्या बालकांना बालन्याय मंडळाच्या किंवा बालकल्याण समितीच्या शिफारशीने निरीक्षण गृहामध्ये प्रवेश दिल्या जातो. दार महिन्याला अशा बालकांना ९०० रुपये साहाय्य अनुदानही दिले जाते.

**बालगृहे:**

२,६६५ प्रवेश क्षमता असणारी २५ शासकीय बालगृहे राज्यात कार्यरत आहेत तसेच ८४८ अनुदानित व ६३ विना अनुदानित बालगृहे कार्यरत आहेत. दर महिन्याला येथील बालकांना १,२१५ रुपये सहायक अनुदान दिले जाते. एड्स ग्रस्त मुलांना देखील प्रवेश दिला जातो व त्यांना दार महा १,३०५ रुपये सहाय्यक अनुदान दिले जाते.

**अनुरक्षण गृहे:**

बालगृहामध्ये १८ वर्षे वयापर्येंत वास्तव केल्यास त्या नंतरच्या पुनर्वसनासाठी शिक्षण पूर्ण होऊन रोजगार मिळे पर्यंत अन्न , वस्त्र, निवारा,समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन मिळण्यासाठी अनुरक्षण गृहे कार्यरत आहे. येथे दार महा १,२१५ रुपयांचे सहाय्यक अनुदान दिले जाते.

**संदर्भ सूची:**

१. आर्थिक व सामाजिक विकास - डॉ. किरणजित देसले.

२. महिला व बालविकास अधिकारी - डॉ. अजित थोरबोले.

३. महिला स्वयंसहायता बचत गट - प्रा. एम. यू. मुलाने

४. महिलांसाठी विकास योजना आणि उद्योग व्यवसाय - अमोद

५. सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण - डॉ. उज्वला वैरागडे, प्रा. विद्युलता मुळे

***

# कृषी विकासात जलसंधारणाचे महत्त्व : एक अभ्यास

**प्रा. एस. टी. कावळे**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कै.शंकरराव गुट्टे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धर्मापूरी ता.परळी वै. जि.बीड

सारांश :

कृषिच्या विकासासाठी पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही प्रदेशाच्या विकासासाठी पाणी आवश्यक असते. पाणी हेच जीवन ह्या उक्ती प्रमाणे शेती, बांधकाम, औद्योगिकीकरण इत्यादीच्या कामासाठी पाण्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. पण आपल्या भारतामध्ये फक्त मान्सुन पासूनच पाण्याची उपलब्धता होत असते. म्हणून पाण्याचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

प्रस्तावना :

कृषिच्या विकासासाठी जलसिंचन हा अतिशय महत्वाचा घटक मानला जातो. गेल्या काही वर्षात मराठवाड्यातील कृषिला भिषण दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. याचाच परिणाम म्हणजे काही शेतकरी बांधवांना आपल्या प्राणाला मुकावे लागले इतकी भयंकर परिस्थिती निर्माण झाली. यामागील महत्वाचे कारण म्हणजे जलसिंचन. आपल्या देशात पावसाळ्यात एका दिवसात जेवढा पाऊस पडतो तितका पाऊस इस्त्राईल या देशात वर्ष भरातही पडत नाही. तरीदेखील तेथील कृषीचा विकास झाला आहे. याचे कारण म्हणजेच पडणाऱ्या पाऊसाचे योग्य नियोजन व पाण्याचा थेंब न थेंब कसा साठवता येईल याकडे दिले जाणारे लक्ष म्हणजेच ही गोष्ट आपल्या देशातही होऊ शकते आपणही पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करू शकतो.

म्हणूनच पावसाच्या पाण्याचे संधारण करणे काळाची गरज आहे. मराठवाड्यातील शेती व्यवसायावर दुष्काळाचा झालेला परिणाम पाहता या व्यवसायाला नवसंजिवनी देण्यासाठी जलसंधारण करणे आवश्यक आहे. भविष्यात कृषी व्यवसायात उत्पन्न वाढीसाठी तसेच योग्य नियोजनासाठी पाणी हा घटकच महत्वाचा ठरणार असून कोणत्याही ऋतुमध्ये पीक घेण्यासाठी व उच्च उत्पादनासाठी पाणी हा घटक महत्वाचा ठरणारा आहे. कारण सध्या हरितगृह तंत्रज्ञानाचा वापर करून कोणत्याही ऋतुमध्ये पीक घेता येऊ शकते.

उद्दीष्ट्ये:

१. जलसंधारणाच्या विविध साधनांचा अभ्यास करणे.

२. जलसंधारणाचे महत्त्व व उपयुक्तता अभ्यासणे.

३.जलसंधारणाच्या पद्धतीचा अभ्यास करणे.

अभ्यासपद्धती :

प्रस्तुत शोध निबंधासाठी जल शुद्धीकरण पद्धती तसेच साठा/ वाहक पद्धतीचा अभ्यास करण्यात आला असून याद्वारे पावसाच्या पाण्याचे संधारण केल्यास निश्चितच भूजल पातळी वाढू शकते. पद्धतीची पातळी वाढू शकते तसेच पाण्याचे योग्य नियोजन करणेही शक्य होते. “पावसाचे पाणी जमा करणे आणि त्याचा नंतर योग्य वेळी वापरासाठी साठा करणे अशी पावसाच्या पाण्याच्या साठवणीची (Rain Water Harvestings) व्याख्या करता येईल."

विषय विवेचन :

"पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या पाण्याचे संरक्षण, संवर्धन व विकास करून पाण्याची उपयुक्तता व शुद्धता वाढवण्यासाठी केलेले जल व्यवस्थापन म्हणजे जलसंधारण होय.” आज पिण्याचा पाण्याचा तुटवडा हा चिंतेचा विषय झाला आहे. आणि पावसाचे पाणी मात्र स्वच्छ शुद्ध असूनही उपयोगात न येता वाहून जात

आहे. म्हणूनच पावसाच्या पाण्याची साठवणीची आवश्यकता आहे. कुठल्याही पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी तीन प्रकारच्या पद्धतीचा वापर केला जातो पाणलोट क्षेत्र, वाहक व साठा.

या पद्धतीमध्ये छतावरील पावसाचे पाणी फ्लश डायव्हर्टर पद्धतीने शुद्ध केले जाते ते पाणी पाईपच्या साहायाने एका टाकीमध्ये जमा केले जाते वेगवेगळया प्रकारच्या टाक्यांचा यात वापर केला जातो भूमीगत टाकी किंवा जमिनीवर ठेऊनही यात पाणी जमा केले जाऊ शकते. दुसऱ्या पद्धतीमध्ये भूपृष्ठावर पडणारे पावसाचे पाणी वाहकाच्या माध्यमातून एखाद्या तलावात, हौदात, बंधाऱ्यात साठवले जाते हे पाणी वापरण्यासाठी तसेच कृषी व्यवसायासाठी अतिशय उपयुक्त ठरू शकते. म्हणजेच वाहून जाणाऱ्या पाण्याचे नियोजन या माध्यमातून करता येऊ शकते.

ग्रामीण भागातील पावसाच्या पाण्याची साठवण खेड्यात काही ठिकाणी सामुदायिक विहीरी बांधण्यात विहीरीजवळ काही अंतरावर बोअरवेल बनवून तिला हातपंप बसवावा. विहीर व हातपंपाभोवतीचा परिसर स्वच्छ ठेवावा. खेड्यातील पाण्याच्या टाक्या वेळोवेळी स्वच्छ कराव्या व यातील गाळ काढावे. लहान नद्या किंवा ओढे असतील तर त्यांच्यावर आडवे बंधारे बांधावे म्हणजेच पावसाचे पाणी रोखता येईल.

छतावरील पाणी साठवण्याची पद्धत :

पाण्याचे वितरण शक्यतोवर पाईपद्वारे करावे जेणे करून पाण्याचा अपव्यय टाळता येईल. छतावर पडणारे पावसाचे पाणी साठवण्याचा प्रथम वापर वाळवंटी भागात केला गेला. परंतू आज पर्जन्याच्या लहरीपणामुळे सर्वच भागात यांचा उपयोग करण्याची वेळ आली आहे. छतावरील पाणी साठवण करून पुढील ४ ते ५ महिने याचा वापर करता येऊ शकतो

पावसाच्या पाण्याची साठवण करण्याच्या यंत्रणेचे बांधकाम करण्याआधी जिथे पाण्याचा तुटवडा असतो. अशा शाळांची माहिती गोळा करणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढीलप्रमाणे रचना करून पाणी साठवण क्षमता करून घ्यावी. __ यामध्ये भूमीगत/ जमिनीखाली पाण्याची टाकी बांधली जाते. यामध्ये चुन्याचा वापर केला जातो. तसेच सध्या उपल्लाच्या साधनांचा वापरही यामध्ये करता येऊ शकतो. ही टाकी अतिशय मजबूत असून यामध्ये कित्येक महिने पाणी व हिवामा गरम पाणी मिळण्याचा हा नैसर्गिक स्त्रोत ठरू शकतो. अतिशय कमी खर्चात चांगल्या प्रकारे पाणी साठवण याद्वारे का येऊ शकते. टाकीचा आकार जमिनीच्या प्रकारावर अवलंबून राहील. मुळ आकार चौकोनी किंवा गोल असतो. तसेच खडकाळ भागात खड्डा जास्त खोल न घेता रूंद मोठा घ्यावा यामुळेही पाणी साठवण क्षमता वाढवता येऊ शकतो.

जलसंधारणाचे महत्त्व व उपयुक्तता :

१) पावसाचे पाणी नैसर्गिक स्त्रोत असून मोठ्या प्रमाणावर पाणी साठवता येऊ शकते.
२) भुजल पाणी पातळी वाढवण्याकरीता हा अतिशय महत्त्वाचा स्त्रोत आहे.
३) दुर्गम भागात, उंचावर शुद्ध पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी जलसंधारण महत्त्वाचे ठरते.
४) अत्यंत कमी खर्चात दिर्घकाळ टिकणारी ही यंत्रणा असून अत्यंत उपयोगी आहे.
५) भविष्यात दुष्काळासारख्या समस्या यामुळे समुळ नष्ट होऊ शकतात.
६) कृषी व्यवसायासाठी जलसंधारण नवसंजिवनी ठरू शकते.
७) शेतातील उत्पादन वाढून प्रति हेक्टरी उच्च उत्पादन यामाध्यमातून घेता येऊ शकते.

८) पाणी समस्येमुळे होणारे वाद यासाठी जलसंधारण महत्त्वाचे ठरू शकते.

९) "पाणी आडवा, पाणी जिरवा' या प्रकारचे कार्यक्रम सर्वत्र राबवल्यामुळे भूभागातील पाण्याची पातळी उंचावली जाऊ शकते.

१०) जलसंधारणाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे मानवी जिवनात पाण्याचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे हे लोकांना कळते.

निष्कर्ष :

आज भारतासारख्या कृषी प्रधान देशात जल संपत्तीचा तुटवडा निर्माण झाला आहे. याचा परिणाम कृषी उत्पन्नावर पडला असून यामुळेच दर्जेदार उत्पादन न होता, अन्नाची कमतरता निर्माण होत आहे. म्हणूनच जलसंधारणाच्या माध्यमातून ही समस्या दूर करता येऊ शकते प्रस्तुत शोधनिबंधात पावसाच्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करून विविध पद्धतीचा वापर करून पाणी साठवणे शक्य असून यासाठी जनजागृती आवश्यक आहे. सरकारी स्तरावरून यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जर आपण स्वत:च्या घरांच्या पावसाच्या पाण्याचे जलसंधारण करून एक आदर्श निर्माण करणे गरजेचे आहे. मराठवाडा हा दुष्काळग्रस्त प्रदेश असून या ठिकाणी देखील जलसंधारण्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त जमीन जलसिंचनाखाली आणता येऊ शकते.

संदर्भ ग्रंथ :

१. जलसिंचन - डॉ. सुधीर भोंगळे, सुज्ञान प्रकाशन, पुणे.

२. पावसाच्या पाण्याचे संधारण' - डॉ. विजय जाधव.

३. पर्यावरण परिचय - डॉ. व्हि. जे. पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

4. इंडिया वाटर पोर्टल अहवाल - २०१२.

५. महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर - २०१४.

***

# महाराष्ट्र राज्य जल धोरण अभ्यास

## डॉ कलंदर मुस्तफा पठाण

भूगोल विभाग कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी ता. गेवराई

जि. बीड

महाराष्ट्र राज्य नैसर्गिक रित्या संपन्न राज्य आहे. परंतु या राज्याच्या सर्व भागांमध्ये नैसर्गिक परिस्थिती सारखी नाही काही भागांमध्ये निसर्ग संपन्नता पहावयास मिळते तर काही भागात रुक्षता व अवर्षण प्रवण परिस्थिती पहावयास मिळते हा निसर्गाचा प्रादेशिक असमतोल  राज्यामध्ये पहावयास मिळतो त्यामुळे वाढती लोकसंख्या व दरडोई पाण्याची उपलब्धता याच्यामध्ये समतोल साधने राज्याला अवघड बनले आहे. यातच वाढत चाललेली दरी वाढते शहरीकरण व औद्योगीकरण यामुळे जल व्यवस्थापनावरील तान व खर्च वाढत चालला आहे आजच्या काळामध्ये जल व्यवस्थापन हे प्रत्येक राज्याच्या व देशासमोरील एक एक प्रमुख आव्हान ठरले आहे. जल धोरणात पाण्याचे नियोजन संवर्धन व वितरण हे घटक महत्त्वाचे आहे पृथ्वीवरील सर्व क्रिया प्रतिक्रिया ह्या पाण्याशी निगडित आहे. जसे पिण्याचे पाणी सिंचन औद्योगीकरण उत्पादन वीज निर्मिती बांधकाम वन संवर्धन जैवविविधता इत्यादी निसर्गातील सर्व क्रियांचे व विकास यासाठी पाण्याची गरज आहे. सप्टेंबर 2015 मध्ये संयुक्तराष्ट्रातील 193 सदस्य राष्ट्रांनी पुढाकार घेऊन पुढील पंधरा वर्षात साध्य करावयाच्या सतरा शाश्वत विकास उद्दिष्टं करिता करारबद्ध झालेले आहे. यामध्ये प्रमुख उद्दिष्ट म्हणजे **“सर्वांसाठी शुद्ध जल व स्वच्छता”** हे शाश्वत विकास करण्यासाठी व मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी महत्त्वाचा उद्देश आहे. यातून असे स्पष्ट होते की जल हा घटक संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यसूची वर स्पष्टपणे आलेला आहे. हे आरोग्यपूर्ण जीवन सुनिश्चित करणे, भुकेची समस्यांचा पूर्णपणे बिमोड करणे, आर्थिक

सुबत्ता व पर्यावरण पूरक औद्योगिक विकास यासह इतर उद्दिष्टे सुद्धा पाण्याशिवाय पूर्ण करता येणार नाही. यासोबतच निसर्गातील नैसर्गिक घटक यांचा वापर समय सूचकता व सद्सद्विवेकबुद्धी ने वापर करावा. यासोबतच निसर्गातील ज्या वेगवेगळया परिसंस्था आहे या परिसंस्थेचा देखील संतुलित विकास करणे गरजेचे आहे. यांच्या विकासाबरोबरच ती सौरक्षित व पुनर्स्थापित करणे जंगलाचे शाश्वत व्यवस्थापन, वाढत्या वाळवंटीकरण आला आळा घालने, जैवविविधतेचा होणारा रास थांबवणे या बाबी देखील महत्त्वाचे आहे. अशा पद्धतीने शाश्वत विकास द्वारे दिलेल्या उद्दिष्टांची ची मांडणी करण्यात आलेली आहे. ध्येय साध्य करण्यासाठी जल संपत्तीचा विकास व व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) राज्याच्या जल धोरणाचा अभ्यास करणे.

२) जल संवर्धनाला विशेष प्राधान्य देणे.

३) पाण्याचे न्याय वाटप करणे.

४) पाण्याची मागणी व पुरवठा यामधील असमतोलाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची ग्रहीतके :-**

(1)राज्याच्या जल धोरणाची माहिती प्राप्त होते.

(2) जलसंवर्धनला ऊर्जा मिळते व महत्व प्राप्त होते

(3) ती पाण्याची सर्वासाठी उपलब्धता करणे सोपे होते.

(4)पाण्याचा योग्य वेळी व योग्य जागी वापर लक्षात येतो.

**संशोधन पद्धती :-** सदरील संशोधन लेखामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती गोळा करून विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विधान :-**

"महाराष्ट्र राज्य जल धोरणाचा अभ्यास"

**अभ्यास क्षेत्र :-**

सदर शोध निबंधासाठी महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील अग्रगण्य राज्यांमध्ये गणले जाते या राज्यांमध्ये सर्वप्रथम जल धोरणाची सुरुवात 2003 मध्ये करण्यात आली. यात पूर् व अवर्षणाच्या समस्ये बरोबरच वाढते शहरीकरण व औद्योगीकरण सिंचनाच्या समस्या व इतर पाण्याशी निगडित समस्यांचा विचार न करता या जल धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली परंतु या जल धोरणांमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या त्यामुळे 2003 च्या जल धोरणाचा हे अडावा 2011 मध्ये घेण्यात येऊन त्यात थोड्याफार प्रमाणात बदल करून 2012 मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय जल धोरण जाहीर केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याने देखील राष्ट्रीय जल धोरणाची सुसंगत व्यापक आणि लवचिक जल धोरण 2019 मध्ये तयार केले. यालाच "महाराष्ट्राची जलनीती- 2019" असे म्हणतात या नव्या जल धोरणानुसार जल आराखडे तयार करताना महाराष्ट्र जल मंडळ व राज्य जल परिषद यांच्या मान्यतेशिवाय जल आराखड्यातील कामे करता येणार नाही . अशी तरतूद करण्यात आली. या जलनितीत राज्यातील जलक्षेत्रात समोरील पाण्याची मागणी व पुरवठा या मधील वाढते असंतुलन, पाण्याच्या उपलब्धतेची निश्चितता व वापरावरील मर्यादा पूर व अवर्षणाची समस्या जलक्षेत्र ची कार्यक्षमता, त्याची सिंचनक्षमता व पाण्याचा प्रत्यक्ष वापर यातील तफावत, भूजलात दिवसेंदिवस होणारी वजावट, नागरी व ग्रामीण भागातील जलवितरण प्रणाली, पाण्याच्या गुणवत्तेत दिवसेंदिवस खालवनारा दर्जा, नैसर्गिक जलसाठे, आणि नदी-नाले तलाव यांच्या कार्यक्षेत्रात होणारी अतिक्रमणे अशा अनेक समस्या व

आव्हाने राज्यासमोर आहे या अहवालाचा विचार करून. राज्याने नवीन जलनीती तयार करताना राज्यात शुद्ध जल व स्वच्छता याची सुनिश्चितता करणे. पाणी टंचाई व अवर्षणास समोरे जाण्यासाठी आवश्यक स्थितिस्थापकता (establishment) निर्माण करणे. विविध पाणी वापर घटकांमध्ये समन्यायी पद्धतीने पाण्याची क्षेत्रीय वाटप करणे. पाण्याचे समन्यायी वाटप करून वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे. त्यावर आधारित परिसंस्थाचे संरक्षण करणे. भूपृष्ट जल व भूजल यांच्या दर्ज्याची संरक्षण करणे. उपलब्ध पाण्याची उत्पादकता व कार्यक्षमता यात वाढ करणे. सुयोग्य सुधारणा सह जलसंपत्ती विकास करून एकात्मिक जलसंपत्ती व्यवस्थापनाकडे पद्धतशीरपणे संक्रमण करणे. ही उद्दिष्टे ठरवण्यात आली तसेच मूलभूत समस्या तत्वे आणि एकिकृत राष्ट्रीय दृष्टिकोन लक्षात घेऊनउन राष्ट्रीय जल नीती च्या धर्तीवर तसेच जलक्षेत्रांमधील राज्य सापेक्ष समस्या व आव्हाने यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने राज्याच्या 2003 च्या जलनीतीत सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र राज्य जलनीती 2019 ला शासनाची मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य जलनीती 2019 राज्यातील पाण्याची उपलब्धता प्रदेशानुसार विषम प्रमाणात आहे काही भागांमध्ये पाण्याची उपलब्धता जास्त तर काही भागात अत्यल्प आहे काही भागांमध्ये पाणी पिण्यासाठी ही उपलब्ध होत नाही. राज्याच्या बऱ्याच भागांमध्ये पर्जन्यछायेच्या प्रदेशात मुळे बराच भाग अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडतो तर काही भाग अतिवृष्टीने ग्रासलेला असतो वातावरणातील बदलांच्या संभाव्य धोक्यामुळे परिस्थिती बिकट होत चालली आहे पाणी हा राज्याच्या सूचीमधील विषय असल्यामुळे महाराष्ट्र राज्याने आपली स्वतःची जलनेती प्रथमतः 2003 मध्ये तयार केली त्यानंतर त्यात मे 2011 मध्ये अंशतः सुधारणा करून या जल नीतीचा अवलंब केला व त्यातून राज्याच्या जल विकासात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडू लागले त्याचबरोबर

जलक्षेत्रात भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने उद्यापर्यंत कायम आहे. त्यामुळे जलक्षेत्रात धोरणात्मक सुधारणा करणे गरजेचे आहे ही पार्श्वभूमी विचारात घेऊन भारत सरकारने जलनीती मध्ये सुधारणा करण्याची सुचित केले त्यामुळे राज्य सापेक्ष समस्या व आव्हाने यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय जलनीती च्या धर्तीवर राज्य जलनीती सुधारणा करण्यात आल्या त्यालाच महाराष्ट्र राज्य जलनीती 2019 असे म्हणतात. राज्य जलनीती धोरणाची व्याप्ती ही जलनीती राज्य शासनाने पाण्याशी संबंधित सर्व विभाग, राज्यातील निमशासकीय अभिकरणे, स्थानिक संस्था पाण्याचा वापर करणारी राज्यातील सर्व यंत्रणा, नागरिक यांचा समावेश या जलनीती धोरणामध्ये करण्यात आला,

**राज्य जल धोरण उद्दिष्टे :-**

१) राज्यात शुद्ध जल व स्वच्छता याची सुनिश्चितता करणे.

२) पाणी टंचाई व अवर्षणास समोरे जाण्याची कुवत निर्माण करणे.

३) पाणी वाटपामध्ये न्यायिक पाण्याची क्षेत्रीय वाटप करणे.

४) वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे.

५) सभोवतालच्या परिसंस्थेचे संरक्षण करणे.

६) भूजल व भूपृष्ठ जन यांच्या गुणवत्तेत वाढ करणे.

७) पाण्याची उत्पादकता व कार्यक्षमता यांच्यात वाढ करणे.

**राज्य जलनीती च्या केंद्रस्थानी असलेले विषय :-**

१) जल व्यवस्थापनामध्ये लाभधारकांच्या सहभागाची सुनिश्चित करणे.

२) धोरणात्मक नियोजन व गुंतवणुकीबाबत प्रधान्य देणे.

३) धोरणांची अद्यावतीकरण करणे.

४) मागणी व पुरवठा यांचे व्यवस्थापन करणे.

(5)पाणी वापरात सुधारणा करणे.

(6) वापरायोग्य पाण्याची प्रमाण वाढवणे.

**उपाय योजना** :-

(1)लाभधारक का चा सहभाग वाढवणे.

(2) क्षेत्रीय वाटप व्यवस्थित करणे.

(3) एकात्मिक जल आराखडा तयार करणे.

(4) जलसंपत्तीचे योग्य नियोजन करणे.

(5) पाण्याची मागणी व पुरवठा यांच्यातील तफावत कमी करणे.

(6) पाण्याची गुणवत्ता वाढवणे.

(7) जलसंवर्धन करणे.

(8) घरगुती रशी औद्योगिक पाणी वापराचे नियोजन करून व्यवस्थापन करणे.

(9) भूजल विकास व व्यवस्थापन करणे.

(10) अवर्षणाचा प्रभाव कमी करण्यासाठी वेगवेगळया प्रकारे जल संवर्धन करणे.

(11) समाजामध्ये जनजागृती करून समाजाला जलसंवर्धन करण्यासाठी प्रवृत्त करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची** :-

1. माझे गाव माझे तीर्थ, अण्णा हजारे, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी राळेगण सिद्धी, ता. पारनेर जि. अहमदनगर
2. पाणी आडवा पाणी जिरवा, हेमराज शहा, रिया पब्लिकेशन कोल्हापूर
3. कृषी विकास व आधुनिक सिंचन पद्धती ,डॉ मदन शिंदे, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
4. वॉटर्षेड डेव्हलपमेंट प्रोग्राम इन डॉट पॉर्न येरीया, राकेश कुमार, अध्ययन प्रकाशन न्यू देहली
5. जल जीवन का आधार ,कृष्ण कुमार मिश्र, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया.

# भारतातील मासेमारी संस्थांचे आणि सागरी नियमनाचे स्वरूप

**प्रा. डॉ. सिताफुले एल. एस.**

सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग वराडकर – बेलोसे कॉलेज, दापोली जि. रत्नागिरी

**प्रस्तावना :**

मासेमारी हा व्यवसाय प्राचीन काळापासून प्रचलित असलेला व्यवसाय आहे. भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता प्रस्तापित झाल्यानंतर देशातील नैसर्गिक बंदराचा विकास आणि मासेमारी व्यवसायाला चालना देण्यात आली. भारतामध्ये ब्रिटिश राजवटीच्या काळात मासेमारीवर शास्त्रीय संशोधनास सुरुवात झाली. फ्रान्सिस डे या वैद्यकीय क्षेत्रातील शास्त्रज्ञाने किनाऱ्यावर सापडणाऱ्या माशांचा वर्गवार सचित्र कोश तयार करण्यात आला. भारतामध्ये 1898 मध्ये सर फ्रेडरिक निकल्सन या अधिकाऱ्याने मद्रास इलाख्यात मत्स्यव्यवसायाबाबत एक अहवाल सादर केला आणि सन 1906 मध्ये देशातील पहिल्या मत्स्यव्यवसाय विभागाची स्थापना करण्यात आली. बडोदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी मत्स्यविषयक अभ्यास करण्यासाठी सर जेम्स हॉर्नेल या शास्त्रज्ञास पाचारण करण्यात आले होते. सन 1910 मध्ये बंगाल प्रांतात मत्स्य व्यवसाय विभागाची स्थापना करण्यात आली. 1932 नंतर मुंबई इलाख्यात सुध्दा मत्स्य विभाग सुरु करण्यात आला. मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी तारापोरवाला या दानशूर कुटुंबाच्या वैज्ञानिक दूरदृष्टीचा परिणाम म्हणून त्या कुटुंबाने मुंबईतील मरिन ड्राईवरील मोक्याची जागा आणि रोख रक्कम देणगी दिल्यामुळे मुंबई येथे तारापोरवाला मत्सालय व तारापोरावाला सागरी जीवशास्त्र संशोधन केंद्राची स्थापना 1951 मध्ये करण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी मत्स्य व्यवसायाकडे सरकारकडून विशेष

असे लक्ष देण्यात आले. मासेमारी व्यवसायाला गती देण्यासाठी विविध संशोधन संस्थाची स्थापना करण्यात आली.

**अ) केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था :**

या संस्थेची स्थापना 1947 साली करण्यात आली असून याचे मुख्य कार्यालय केरळ राज्यातील कोची येथे आहे. भारतातील सागरी मासेमारी व्यवसायाला चालना देण्यासाठी ही संस्था कार्य करीत असून या संस्थेचा समावेश कृषी मंत्रालयाअंतर्गत येतो. भारतीय कृषी अनुसंधान परिषद या संस्थेच्या व्यवस्थापनात मत्स्य संशोधन संस्थेचा समावेश 1967 पासून झाला आहे.

भारताच्या सागर संपत्तीचे सखोल संशोधन आणि विश्लेषण करून सागरी माशांच्या प्रजातीचा जैवसंपत्तीच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचे कार्य करते. या संस्थेचे उपकार्यालये मुंबई, मंगलोर, त्रिवेंद्रम, चेन्नई, मंडपम–रामेश्वरम, तुतीकोरीन, विशाखापटनम, पुरी, अंदमान, लक्षद्विप इत्यादी ठिकाणी उपकेंद्रे आहेत.

**ब) महाराष्ट्रातील प्रादेशिक सागरी बंदर कार्यालये :**

भारतीय बंदरे अधिनियम 1908 च्या पहिल्या अनुसूचिचा भाग दहा (10) मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्रात एक आंतरराष्ट्रीय सागरी बंदर मुंबई येथे आहे. 1989 पासून कृत्रिम बांधलेले न्हावा शेवा हे एक आंतरराष्ट्रीय बंदर अस्तित्वात आहे. महाराष्ट्रात एकूण लहान–मोठे 48 बंदरे आहेत. या बंदरातून सागरी मासेमारी केली जाते. बंदराच्या प्रशासकीय सोयीसाठी याचे पाच विभागात वर्गीकरण करण्यात आले असून अधिकारी, बंदर अधिकारी, बंदर निरीक्षक, सहायक बंदर निरीक्षक असे अधिकारी वर्ग बंदराची कामे करीत असतात. महाराष्ट्रातील सागरी बंदराचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे –

प्रादेशिक बंदर अधिकारी, वेगूर्ला बंदरे जि. सिंधुदूर्ग

प्रादेशिक बंदर अधिकारी मांडवी बंदरे, जि. रत्नागिरी.

प्रादेशिक बंदर अधिकारी, अलिबाग बंदरे, जि. रायगड.

प्रादेशिक बंदर अधिकारी, मोराबंदरे कोळीवाडा, मीठबंदर रोड ठाणे, पूर्व जि. ठाणे.

प्रादेशिक बंदर अधिकारी बांद्रा बंदरे खारदांडा, बांद्रा मुंबई

महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला अरबी समुद्राची सागरी किनारपट्टी 720 कि. मी. इतकी लाभली आहे. राज्यातील कोकण या प्रदेशातील सर्वच सहाही जिल्ह्यांना सागरी किनारा लाभला असून एकूण लहान–मोठे 48 बंदरे असून या बंदरातून सागरी मासेमारी केली जाते. प्रशासकीय सोयीसाठी या बंदराचे पाच प्रादेशिक बंदर कार्यालयात विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक बंदर कार्यालयात काही बंदराचा समावेश होतो. या लहान बंदराची देखरेख व प्रशासकीय कामे प्रादेशिक कार्यालयाकडून केली जातात.

अ) प्रादेशिक बंदरे कार्यालय वेंगूर्ला, जि. सिंधुदुर्ग यामध्ये किरणपाणी, रेडी, वेगूर्ला, निवती, मालवण, आचरा, देवगड, विजयदुर्ग या बंदराचा समावेश होतो.

ब) प्रादेशिक बंदरे कार्यालय मांडवी, जि. रत्नागिरी मध्ये जैतापूर, नाटे, पूर्णगड, रत्नागिरी (मिऱ्याबंदर), तिवरी, जयगड, बोर्या, पालशेत, दाभोळ, हर्णे, केळशी, बाणकोट इत्यादी बंदराचा समावेश होतो.

क) प्रादेशिक बंदरे कार्यालय अलिबाग, जि. रायगड यामध्ये श्रीवर्धन, कुंभारु, राजापूरी (दीघी), मुरुड, जंजिरा, नांदगाव, बोर्ली (मांडवा), रेवदंडा, अलिबाग, पनवेल इत्यादी बंदराचा समावेश होतो.

ड) प्रादेशिक बंदर अधिकारी मोरा बंदरे समूह चेदणी कोळीबाग, मीठबंदर रोड ठाणे पूर्व यामध्ये कल्याण, भिवंडी, ठाणे, मांडवा, करंजा (रेवस व धरमतर), मोरा, वसई इत्यादी बंदराचा समावेश होतो.

इ) प्रादेशिक बंदरे कार्यालय अधिकारी बांद्रा बंदरे (समूह) मुंबई यामध्ये बांद्रा, मनोरी, वर्सोवा, उत्तन, अर्नाळा (दातीवरे), केळवा (माहिम), सातपाटी, नवापूर, तारापूर, डहाणू इत्यादी बंदराचा समावेश होतो.

वरील सर्व सागरी बंदरालगतच्या परिसरातील मासेमारी करणारा समाज हा मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करीत असतो.

## क) सागरी मासेमारी नियमन :

1980 च्या दशकात भारतामध्ये सागरी मासेमारी यांत्रिक नौकांची संख्या वाढत गेली. भारतामध्ये भोई, कोळी, खारवी, गाबीत इत्यादी समाजाचे लोक आपला पारंपरिक व्यवसाय म्हणून हा मासेमारी व्यवसाय करीत होते. परंतु काही समाजातील लोकांनी या व्यवसायात भांडवल गुंतवणूक करून यांत्रिक नौकांच्या साहाय्याने मासेमारी करू लागले. तेव्हा पारंपरिक यांत्रिक होडीने आणि बिगर यांत्रिक होडीने व्यवसाय करणाऱ्या लोकांवर उपासमारीची वेळ येऊ लागली. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिक नौकांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली आणि त्याचा परिणाम मासेमारी करणाऱ्या दोन गटाच्या संघर्षात होऊ लागला. मासेमारी करताना परप्रांतीयांचे आक्रमणे, मच्छिमारी करणाऱ्या लोकांचे आपआपसातील भांडणे, तंटे होऊ लागली तेव्हा हे निवारण्यासाठी आणि मासेमारीसाठी काही नियमन करण्यात यावेत असे विचार पुढे आले आणि मासेमारी व्यवसायातील संघर्ष टाळण्यासाठी मासेमारीवर काही निर्बंध घालण्यासाठी आवश्यकता भारत सरकारला वाटली आणि सागरी मासेमारी नियमनासाठी कायद्याचा मसुदा विविध राज्य सरकारच्या मदतीने तयार करण्यात आला. भारतामध्ये 09 राज्यांना सागरी किनारा लाभले असून या राज्यातील किनाऱ्यालगतच्या भागातील लोक मासेमारी करतात. तेव्हा या राज्यांच्या राज्य सरकारांनी या नमुना विधेयकाच्या धर्तीवर कायदा करावा अशी विनंती भारत सरकारने विविध सागरी राज्यांना केली. भारतातील सागरी राज्यांनी सागरी मासेमारी नियमन कायदा संमत केला.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम 1981 हा कायदा महाराष्ट्रात संमत होऊन 4 ऑगस्ट 1982 पासून अंमलात आला. त्या कायद्यातील उद्देशांच्या आणि तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी नियमावली ही 1983 मध्ये करण्यात आली. या कायद्यान्वये मासेमारी व्यवसायाबाबत अनेक आदेश आणि निर्बंध काढले. ते अधिनियम पुढील प्रमाणे आहेत.

या अधिनियमनाची एकूण 26 कलमे असून चार प्रकरणात विभागणी करण्यात आली आहे. या अधिनियमाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर असून व समुद्रात प्रादेशिक जलाधीच्या मर्यादेपर्यंत म्हणजे 12 सागरी मैलापर्यंत म्हणजे सुमारे 22 कि. मी. आहे. मात्र त्या मर्यादेपलिकडे केलेल्या मासेमारीस हा कायदा लागू नसल्याचे या कलमात नमूद करण्यात आले आहे.
कलम 2 (अ) मध्ये असे नमूद करण्यात आले की, तालुक्याचा तहसिलदार हा अधिनिर्णय अधिकारी असून त्या तहसील परिसरातील मासेमारी बाबतचे तंटे निवारण व निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना असेल.

कलम 3 (1) नुसार सल्लागार समित्यांची रचना निर्माण केली जाईल. प्रत्येक किनारी जिल्ह्यासाठी एक समिती असेल या समितीचा अध्यक्ष कलेक्टर असेल आणि त्या जिल्ह्याचा सहाय्यक संचालक, मत्स्यव्यवसाय हा सदस्य सचिव असेल आणि राज्य बंदर विभाग व पोलीस विभाग याचे प्रतिनिधी हे सदस्य असतील.

कलम 04 मध्ये असे नमूद केले आहे की, सागरी संपत्तीचे जतन करणे, पारंपरिक मच्छिमाराचे हित जोपासणे, समुद्रात कायदा व सुव्यवस्था राखणे इत्यादी बाबींची तरतूद करण्यात आली आहे.
यांत्रिक बोटीच्या साहाय्याने मासेमारी करीत असताना पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांच्या जाळ्यांचे आणि दोरांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे..

महाराष्ट्र मासेमारी अधिनियम 1981 कलम 6 (1) नुसार मासेमारी बोटीचा परवाना किंवा लायसन्स घेऊन सागरी मासेमारी करण्याची परवानगी या बाबतची माहिती या कलमात स्पष्ट केली आहे. या कलमान्वये सागरी मासेमारीचे परवाने धारण करून आणि सागरी मासेमारी नियमाचे उल्लंघन न करता केले जावे असे नमूद करण्यात आले.

कलम 7 नुसार ज्या मच्छिमाराकडे मासेमारी बोटीची नोंदणी आणि लायसन्स नाही अशा मच्छिमारांना सागरी मासेमारी करता येणार नाही.

कलम 08 नुसार परवानाधारक मच्छिमारांने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमनाचे पालन करीत नाहीत असे स्पष्ट झाल्यास त्यांचे परवाने रद्द करण्याचा अधिकार मासेमारी अधिकाऱ्यास असेल.

कलम 09 (05) नुसार नोंदणी अधिकाऱ्याने त्या बोटीस नेमून दिलेले 'नोंदणी चिन्ह' नोंदणी केलेल्या बोटीस लावणे अनिवार्य असेल.

कलम 10 (01) नुसार बोट मालकाने बोटीची नोंदणी करीत असताना कोणत्या बंदरातून मासेमारी करण्यात येणार आहे, तो बंदर घोषित करणे गरजेचे असेल.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन 1981 नुसार राज्य शासनाने आतापर्यंत काही आदेश काढले आहेत.

सहा सिलेंडरपेक्षा जास्त मोठे इंजिन बसविलेल्या नौकेने महाराष्ट्रातल्या प्रादेशिक जलधीमध्ये मासेमारी करू नये..

तीन सिलेंडरपेक्षा जास्त मोठे इंजिन बसविलेल्या नौकेने ठाणे जिल्ह्याच्या प्रादेशिक जलाधीमध्ये गिलनेटने मासेमारी करू नये.

यांत्रिक मासेमारी नौकेने समुद्रात दरवर्षी 10 जून ते नारळी पौर्णिमा या कालावधीत मासेमारी करू नये.

मुंबई, ठाणे, रागयड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट ते बुरोंडीपर्यंतच्या भागात सागरी किनाऱ्यापासून 05 वाव खोलीपर्यंतच्या क्षेत्रात आणि बुरोंडीपासून दक्षिणेकडे रत्नागिरी जिल्हा आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात सागरी किनाऱ्यापासून 10 वाव खोलीपर्यंतच्या क्षेत्रात यांत्रिक नौका आणि ट्रॉल जाळ्याने मासेमारी करू नये.

यांत्रिक नौकांनी समुद्रात ट्रॉल जाळ्याने मासेमारी सायंकाळी 06 ते सकाळी 06 वाजेपर्यंत करू नये.

यांत्रिक नौकांना प्रादेशिक जलाधीमध्ये तसेच किनाऱ्यापासून 10 वाव पर्यंतच्या क्षेत्रात पर्ससीन जाळ्याने मासेमारी करू नये.

अशा प्रकारे मासेमारी अधिनियम तयार करण्यात आले आहेत. या नियमनाचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी गस्ती नौकांद्वारे नियम मोडणाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी अधिकारी नेमण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सागरी मंडळ अधिनियम 1996 नुसार महाराष्ट्र सागरी मंडळाची स्थापना कलम 03 (01) नुसार करण्यात येते. या महाराष्ट्र सागरी मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री असतो तर उपाध्यक्ष राज्यमंत्री असतो. वित्त विभाग, गृहविभाग, उद्योग विभाग यांचे सचिव हे त्यांचे पदसिद्ध सदस्य असतात.

महाराष्ट्रात सागरी मासेमारी व्यवसायात सुलभता आणण्यासाठी मच्छिमारांमधील संघर्ष, तंटे निवारण्यासाठी हे सागरी मासेमारी नियमन 1981 आणि 1996 हे महत्त्वपूर्ण आहेत.

**संदर्भ सूची**

1. बाळ द. वा. आणि नंदिनी देशमुख (1993) महाराष्ट्र सागरी मत्स्य संपत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
2. www.CMFRI.org.in
3. http://www.marathisruti.com
4. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन, अधिनियम 1981 महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई
5. कांत. म. सो. (1993) बंदरविकास व नौकानयन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
6. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम 1996, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई

***

# भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार

**प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे**

कला वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई. जिल्हा. बीड.४३१५१७.

**प्रस्तावना :**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील प्रगल्भ लोकशाही देशांमध्ये भारताचे नांव अग्रक्रमाने घेतले जात आहे. भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना भारतातील लोकशाही चे सिंहावलोकन करणे निश्चितच यथार्थ ठरेल. आपण स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षात लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करून काय कमावले आणि काय गमावले याचा अभ्यास केला तर पुढील पाऊले आपणास योग्य दिशेने टाकता येतील. लोकशाही मूल्ये आणि मानवाधिकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन बाबी एकमेकास पूरक आणि पोषक आहेत. लोकशाही शिवाय मानवाधिकार पूर्णपणे बहाल केले जाऊ शकत नाहीत आणि सर्वसामान्य जनतेला मानव अधिकार मिळाल्याशिवाय लोकशाहीला परिपूर्णता प्राप्त होऊ शकत नाही.

कोणत्याही विकसित देशाची किंवा सभ्य समाजाची ओळख त्या देशात तेथील नागरिकांना मिळणारे मानवाधिकार किती व्यापक प्रमाणात आहेत यावरून होते. म्हणून कोणत्याही शासन व्यवस्थेचे मानवाधिकार हे अभिन्न अंग आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत तर

मानव अधिकारांचे महत्त्व आणखीनच वाढले आहे. साधारणतः सन्मानाने माणूस म्हणून जगण्यासाठी जे जे अधिकार आवश्यक असतात ते सर्व अधिकार मानव अधिकारात समाविष्ट होतात. म्हणून व्यापक दृष्टीने विचार केल्यास नागरिकांना स्वतःची सर्वांगिन प्रगती घडून आणण्यासाठी आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास करण्यासाठी विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता असते. अशी विशिष्ट परिस्थिती निर्माण करण्यासाठीच त्याला काही अधिकार असणे आवश्यक असते. ठराविक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकार प्राप्त करून देणे ही एक समाजाची मूलभूत गरज असते. अशी परिस्थिती निर्माण करून देण्याची जबाबदारी शासन संस्थेवर येऊन पडते. व्यक्तीचा सर्वांगीण उत्कर्ष किंवा विकास, सुखी व उच्च जीवनमान जगण्याची व्यवस्था निर्माण केली आणि काही मूलभूत स्वरूपाचे अधिकार त्याला प्राप्त करून दिले तरच शक्य असतो. म्हणून जगभर मानव अधिकारांसाठी आंदोलने केली जातात. मानव अधिकारावर गदा आली तर लढा उभारला जातो. मोर्चे काढले जातात, उपोषणे केली जातात. सर्व प्रकारच्या मिडियामध्ये प्रसिद्धी दिली जाते. जागतिक पातळीवर अम्नेस्टी इंटरनॅशनल, एशिया वॉच, रेड क्रॉस इत्यादी स्वयंसेवी संस्था मानवाधिकारांसाठी कार्यरत असल्याचे दिसून येते. जसजसा समाज सभ्य होतो आणि विकसित होत जातो तसतसा तो आपल्या मानवी अधिकारासंबंधी जागृत होत जातो. त्यामुळे व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती करण्याची संधी मिळते.

**मानवाधिकाराची व्याख्या :**

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार. हे अधिकार त्याला जन्मतःच मिळतात. त्याचे कारण

मनुष्यप्राणी हा सुद्धा पक्षी, प्राणी किंवा समुद्री जिवांसारखा स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला आहे आणि स्वतंत्रतेला संलग्न काही मूलभूत अधिकार प्रत्येकाला असतात, या विचाराला जगभर मिळालेली मान्यता होय.

**व्याख्या :**

१) मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 नुसार," मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे आरोग्य, शिक्षण, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा, मानवी मूल्य इत्यादी संबंधित असून मानवाच्या प्रगतीसाठी प्रेरक व संरक्षक ठरतात."

२) जे.पी.एस. शिरोही यांच्या मते, संयुक्त राष्ट्र संघ इतर सर्व संस्थाद्वारे मानवाच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी संबंधित सर्व प्रकारचे संरक्षण प्राप्त करून देणे म्हणजे मानवी हक्क होय.

**३) मॅरिस कर्टसन :** मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च व पवित्र अधिकार असून त्याचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.

४) **रॅण्डम हाऊस विश्वकोशा** नुसार, मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्मत:च प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

५) **न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन** (भारताचे माजी सरन्यायाधीश व मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष) : यांच्या मतानुसार सर्व व्यक्तींना असमानता, वर्ग, लिंग, जाती, धर्म, वय आणि विकलांगांना सामाजिक भेदभावाच्या कारणाशिवाय कोणत्याही व्यक्तीला निसर्गदत्त अधिकाराचा उपभोग करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

वरील व्याख्या वरून असे निदर्शनास येते की, मानवी हक्क ही संकल्पना मानवाला सर्व पातळीवर कायदेशीर अधिकार व स्वातंत्र्य

प्राप्त करून देते. त्यामुळे मानवाला जीवन जगताना कोणत्याही हिंसेला अथवा कोणाच्याही दबावाला बळी पडू दिले जात नाही. मानवाचे हक्क तो जन्माला आल्या पासून सुरू होतात. जसे की जगण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क, महिलांचे हक्क, बालकांचे हक्क, रोजगार मिळवण्याचा हक्क, दिव्यांगांचे हक्क इत्यादी हक्क मानवाला जीवन जगण्यासाठी संरक्षण प्राप्त करून देतात.

**गृहितके**:

१) भारतीय लोकशाही प्रगल्भ होत आहे.

२) लोकशाही आणि मानव अधिकार परस्पर पूरक आहेत.

३) मानवाधिकार हे जगातील सर्वोच्च मूल्य आहे.

४) मानव अधिकार जास्त असलेल्या देशात विकास दर जास्त आहे.

५) मानव अधिकारामुळे हुकूमशाही संपुष्टात येऊन लोकशाही प्रगल्भ होत आहे.

**उद्देश :**

१) लोकशाही मूल्ये आणि मानवाधिकाराचा एकत्रित अभ्यास करणे.

२) मानवाधिकाराची रुजवणूक करणे.

३) मानवा मानवातील भेदभाव आणि संघर्ष कमी करणे.

४) मानवता हा धर्म वाढवणे.

५) वसुदेव कुटुंबकम ची शिकवण देणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे व माहिती संजाला चा उपयोग केला आहे.

**समस्यासुत्रन** :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात २६ जानेवारी १९५० पासून संसदीय लोकशाहीला सुरुवात

झाली. लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार आणि नियोजनबद्ध विकास याद्वारे भारताची प्रगती जागतिक पातळीवर वाखाणण्यायोग्य झाली आहे. लोकशाही मुळेच प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार म्हणजेच मानवाधिकार मिळाल्यामुळे आज प्रत्येक भारतीयाचा जीवनस्तर उंचावला आहे याबद्दल शंका किंवा दुमत असण्याचे कारण नाही. आज पासून सत्तर - पंच्याहत्तर वर्षापूर्वी भारतातील लोकांजवळ रेडिओ, सायकल, पक्के घर, नोकरी असेल अशी कल्पना सुद्धा करता येत नव्हती परंतु आज प्रत्येक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य सेवा, दूरदर्शन, वीज, पाणी, टेलिफोन आणि मोबाईल पोहोचला आहे. याही पुढे जाऊन काही गावात पब्लिक स्कूल, महाविद्यालये, दवाखाने सुरू झाली आहेत, मोबाईलद्वारे तीव्र गतीने माहितीची देवाण-घेवाण होत आहे. किसान क्रेडिट कार्ड, पिक विमा योजना, शेतकरी अपघात विमा योजना, शेतकऱ्यांना वेतन योजना इत्यादी योजनांमुळे शेतकरी सुखावला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेद्वारे लाखो लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. पंचायतराज संस्थांमध्ये महिला आणि मागासवर्गीय घटकांनाही नेतृत्व करण्याची संधी मिळत आहे. पंचायतराजमुळे लोकशाही चे विकेंद्रीकरण झाले आहे. पंचायतराज संस्था लोकशाहीच्या पाठशाळा ठरल्या आहेत. त्यामुळे सामान्य व्यक्तीला सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळत आहे. हे सर्व लोकशाही मुळे शक्य झाले आहे. तरीही मानवाधिकाराच्या बाबतीत भारतातील चित्र फारसे समाधानकारक दिसून येत नाही. काही प्रगत लोक विशेषतः शहरवाशी मानवाधिकार उपभोगत असले तरी ग्रामीण भागातील दुर्गम आणि आदिवासी लोकांना मानवाधिकारांची ओळख

आणि उपभोग घेता आलेला नाही. म्हणून भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार हा विषय प्रस्तुत शोधनिबंधासाठी घेण्यात आलेला आहे.

**इतिहास** :

भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार यांना फार मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. प्राचीन काळी भारताचे नाव ज्या भरत राजा च्या नावाने भारत असे पडले आहे. त्या भरत राजाला नऊ मुले होती. राजा भरताने दिग्विजय संपादन केल्यानंतर ज्या वेळी त्याचा वारस नेमण्याचा विषय आला त्यावेळी त्याने आपल्या पुत्रामध्ये युवराज म्हणून नियुक्त करण्यासाठी आवश्यक तेवढे गुण नसल्यामुळे राज्यातील एका सामान्य व्यक्तीच्या मुलाची शांतनु ची युवराज म्हणून निवड केली. नंतर शांतनु भारताचा राजा झाला. येथेच भारतातील लोकशाहीची पहिली मुहूर्तमेढ रोवली गेली. पुढे शांतनु चे वंशज कौरव-पांडव यांच्यामध्ये जे महाभारतरुपी युद्ध झाले त्यात सूर्यास्तानंतर दोन्ही बाजूने स्वयंस्फूर्तीने युद्धबंदी होत असे. सूर्यास्तानंतर जखमी योद्ध्यांना आवश्यक ती मदत केली जायची आणि दोन्ही बाजूचे योद्धे एकमेकांना भेटत असत. मानवाधिकारांचे एवढे प्राचीन आणि प्रगल्भ उदाहरण कोठेही सापडणार नाही. मानवाधिकाराची संकल्पना विसाव्या शतकात लोकप्रिय झाली असली तरी सर्व धर्मांच्या नैतिक मूल्यांनी मानव अधिकाराचीच शिकवण दिलेली दिसून येते. म्हणजेच मानवी सभ्यतेएऐवढाच मानव अधिकाराचा इतिहास जुना आहे. आधुनिक युगात मानवी समाजात अनेक युद्धे, महायुद्धे आणि नंतर शीत युद्धे झाली आहेत. आजही रशिया आणि युक्रेनचे युद्ध सुरू आहे. म्हणजेच मानवा मानवा तील संघर्ष आजही थांबलेला दिसून येत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर

जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकाराच्या घोषणापत्राला संयुक्त राष्ट्र संघाने मान्यता दिली.

**मानवाधिकाराचे जागतिक संदर्भ :**

भारताशिवाय जगातील इतर देशांमध्येही मानवाधिकाराचा इतिहास सापडतो. इसवीसन पूर्व २३५० सालातील लगारा मधील उरुकागिना येथील मानव अधिकार सुधारणेबाबत उल्लेख सापडतो. त्यानंतरचा उल्लेख नव सुमेरियन संस्कृतीतील उर - नम्मूच्या संहितेमध्ये आढळतो. प्राचीन इराणी साम्राज्याने इसवीसनपूर्व ५३९ साली घोषित केलेल्या सायरस वृत्तचिती हा मानवी हक्काविषयी चा पहिला लिखित दस्तऐवज मानण्यात येतो. या वृत्तचिती द्वारे गुलामीची प्रथा संपुष्टात आली. भारतातील मौर्य साम्राज्याने घालून दिलेली तत्वे तत्कालीन काळात अभूतपूर्व होती. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणांमध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. इस्लाम धर्माच्या उदयानंतर अरबस्तानात मानवी हक्कांना स्थान प्राप्त झाले. मुहम्मद पैगंबरांनी ६६२ मध्ये मदिने ची समद तयार केली होती. इंग्लंडमध्ये १२१५ मध्ये मॅग्रा कार्टा नावाची सनद जाहीर करण्यात आली होती. आजच्या लोकशाही व्यवस्थेची भारतासह इतर देशातील संसदीय लोकशाही व्यवस्थेचे मुळे या सनदेत आहेत. नैसर्गिक हक्कांची संकल्पना सॉक्रेटिस आणि त्याचे वारसदार विचारवंत प्लेटो व अरिस्स्टॉटल यांनी उचलून धरली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जिनिव्हा परिषदेत मानवाधिकारांच्या वैश्विक घोषणापत्रा च्या मागणीला जोर मिळाला. कॅनडाच्या मानव अधिकार घोषणा पत्राचा मसुदाकार जॉन पीटर्स हम्फ्रे होता. १० डिसेंबर १९४८ रोजी या

घोषणापत्रास ४८ देशांनी मंजुरी दिली. त्यात एकूण ३० कलमे होती. भारतात मानव अधिकार सुरक्षा अधिनियमाने १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना झाली. तर महाराष्ट्रात २००० साली महाराष्ट्र मानव अधिकार आयोग स्थापना झाली त्यामुळे प्रत्येक नागरिकास रोजगार, सामान्य जीवन स्तर, अन्न, वस्त्र, निवारा उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी बनली आहे. कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले आहेत. शिवाय न्याय, स्वातंत्र्य, समता इत्यादी अधिकार मिळाले आहेत. याशिवाय १७८९ साली फ्रान्स मध्ये राज्य क्रांतिकारकांनी राष्ट्रीय सभेत मानवी हक्कांची घोषणा केली. संयुक्त राज्य अमेरिकेत मूलभूत अधिकारांची मागणी एका विधेयकाद्वारे झालेली दिसते. नंतर बिल ऑफ राईट्स चा अमेरिकेच्या राज्यघटनेत समावेश करण्यात आला. १९३६ मध्ये रशियामध्ये स्टॅलिनने आपल्या राज्यघटनेत मूलभूत अधिकारांच्या रूपाने मानवी अधिकारांचा समावेश केला. जर्मनीच्या विमर राज्यघटनेत मानवाधिकार मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांच्या रूपात समाविष्ट केले आहेत.

**मानवी हक्कांचा जाहीरनामा आणि भारतीय लोकशाही :**

दिनांक 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्यात 30 कलमे होती. या कलमांमध्ये प्रामुख्याने समान कामासाठी कामासाठी समान वेतन, शिक्षणाचा अधिकार, मजूर संघटनांची स्थापना, विश्रांतीच्या अधिकार, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय इत्यादींचा समावेश होता. देशातील वेठबिगारी पद्धती बंद करणे, वर्णभेद, जातिभेद, गुलामगिरी यांना बंदी घालून, या सर्व बाबींना महत्त्वपूर्ण स्थान या जाहीरनाम्यात देण्यात आले होते.

तसेच मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आयोगांची निर्मिती करणे. हे ही स्पष्ट करण्यात आले होते. भारतामध्ये मागील पाच दशकांपासून मानवी अधिकारांच्या संरक्षणासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या योजना राबवताना मानवी अधिकारांच्या संरक्षणाचा विचार केला जात आहे. तसेच सुरुवातीला मानवी हक्कांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी या न्याय व्यवस्थेकडे सोपवली होती. नंतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगामार्फत आलेल्या तक्रारींची चौकशी करून व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले जाते. भारतीय संविधानात उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार, राजनीतिची मार्गदर्शक तत्वे इत्यादी भागातून मानव अधिकाराला प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

**सारांश** :

शोधनिबंधाच्या विस्ताराची मर्यादा लक्षात घेता असे निदर्शनास येते की, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकार घोषणापत्रातील अनेक कलमे भारतीय संविधानात समाविष्ट केलेली आहेत. त्यातून भारतीय लोकशाही परिदृढ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु अंमलबजावणी करताना मात्र मानव अधिकारांची पूर्णतः अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. भारतातील ग्रामीण लोक, महिला, मुले, आदिवासी घटक, मागास घटक, दुर्गम प्रदेशातील लोक, निराधार, निराश्रित, वृद्ध, निर्वासित इत्यादी घटक दारिद्र्यात खितपत पडलेले दिसून येतात. आजही हे घटक मानवाधिकारापासून कोसो मैल दूर दिसून येतात. तर मानवधिकाराचा दुरुपयोग अतिरेकी, नक्षली, देशद्रोही, समाजद्रोही, भ्रष्टाचारी, गुन्हेगार लोक मानवाधिकाराचा गैरफायदा घेऊन स्वतःचा बचाव न्यायालयात करताना दिसतात. हे मात्र चुकीचे होत आहे. गुन्हेगारांना मानव अधिकाराचा आश्रय

घेण्याची संधी असता कामा नये. जे परिस्थितीने गांजलेले लोक आहेत त्यांनाच मानव अधिकाराच्या द्वारे मदत केली पाहिजे.

**संदर्भासूची** :

१) संविधान और मानवाधिकार -डॉ.संजय सिंह.

२) महिला और मानवाधिकार - रमा शर्मा, के. मिश्रा.

३) भारत मे मानव अधिकार - अरुण चतुर्वेदी, संजय लोढा.

४) भारत मे मानव अधिकार- प्रो. मधुसूदन त्रिपाठी.

५) भारतीय राज्यघटना मराठी आवृत्ती 1995.

६) भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया - प्रा. के. आर. बंग

७) योजना - ऑगस्ट २००९.

८)https:// Mr. m. wikipedia.org.

***

# भारतातील नगदमुक्त आर्थिक व्यवहार

**डॉ. संजय मुंडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट

**प्रस्तावना—**

कॅशलेस ट्रान्झॅक्शन आणि कॅशलेस अर्थव्यवस्थेत गेल्या दशकात आश्चर्यकारक वाढ झाली आहे. कॅशलेस व्यवहाराची तीव्र वाढ ही केवळ विकसित देशांमध्येच नव्हे तर बऱ्याच विकसनशील देशांमध्येही झाली आहे. आज बहुतेक बाजार संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहे. किराणा दुकाने, हायपरमार्केट ते अशा बाजारातील प्रत्येक विभागात कॅशलेस व्यवहाराची उपस्थिती अनुभवली जाऊ शकते. इलेक्ट्रॉनिक मार्केट आणि इतर प्रगत बाजार उत्पादने आणि सेवा देणारी. प्लॅस्टिक कार्डचा मोठया प्रमाणात वापर, ऑनलाइन खरेदी आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट जमा होत आहेत. कॅशलेस व्यवहार हे जुन्या पारंपारिक रोकड व्यवहार पध्दतीला मागे टाकत आहे. सरकारचा पुढाकार आणि इतर संस्थांशी समन्वय साधून उच्च तंत्रज्ञानाची सेवा प्रदान करणे प्रेरणादायक आहे. कॅशलेस सोसायटी विकसित करण्यासाठी ग्राहकांच्या प्रेरणा महत्त्वाच्या आहेत. सध्या यूजरफ्रेंडलीसह जगभरात इंटरनेट उपलब्धतेमुळे कॅशलेस व्यवहार प्रगती करत आहे. सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यांच्या उपलब्धतेमुळे भारतीय बॅकिग क्षेत्रात बरेच बदल घडले आहेत. तो स्वातंत्र काळानंतरचा खूप मोठा बदल आहे. १९९० ते २००० च्या दशकात परिवर्तनाचा दर विशेषत: उच्च होता, जेव्हा अनेक नवकल्पकांनी बॅकिगची समजूत बदलली आणि पर्यावरणाची स्वायत्त आणि प्रेरित गरजांचा परिणाम झाला. अधिकाधिक वेगाने सेवांचा दर्जा देण्यासाठी

बॅकांनी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरुवात केली. माहिती तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना भौगोलिकदृष्टया वैविध्यपूर्ण ठिकाणी त्यांचे बॅकिग करणे सोपे झाले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

1. भारतातीय अर्थव्यवस्थेतील नगदमुक्त व्यवहाराचा आढावा घेणे
2. नगदमुक्त व्यवहाराच्या फायद्या तोटयांची चर्चा करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी उपयोगात आणलेल्या संशोधन पध्दतीचा विचार करता यासाठी प्रामुख्याने द्वितीय तथ्यांचा उपयोग केला आहे. यासाठी विविध पुस्तके, संकेत स्थळ, इत्यादी प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा आढावा घेतला आहे.

**भारतातील किरकोळ इलेक्ट्रॉनिक पेमेंट**

तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे भारत रोख रकमेपासून रोखविरहीत व्यवहराकडे वळला आहे. आजच्याप्रमाणे भारतातील रिटेल इलेक्ट्रॉनिक पेमेंटची वाढ खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्र.१**

**भारतातील किरकोळ इलेक्ट्रॉनिक पेमेंट**

| पेमेंट सिस्टम | प्रतिशत प्रमाण 'दर वर्ष याप्रमाणे' |
|---|---|
| डेबिट कार्ड | २१ |
| क्रेडिट कार्ड | २६ |
| EFT/NEFT | २८ |
| Electric Clearning Service | १५ |
| प्रिपेड पेमेंट Instant | ०६ |
| मोबाईल बॅकिंग | ०४ |

Source-RBI Data 2016

## आलेख क्र.१.
## भारतातील किरकोळ इलेक्ट्रॉनिक पेमेंटेचे प्रमाण




वरील तक्त्यात सन २०१६ च्या रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया च्या अहवालानुसार भारतातील किरकोळ इलेक्ट्रॉनिक पेमेंटचे प्रतिशत प्रमाण अभ्यासले आहे. रिझर्व्ह बॅकेच्या अहवालानुसार भारतात EFT/NEFT च्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पेमेंट करणाऱ्यांचे प्रमाण २८.०० टक्के, क्रेडीट कार्ड द्वारा पेमेंट करणाऱ्यांचे प्रमाण २६.०० टक्के, डेबिट कार्ड द्वारा पेमेंट करणाऱ्यांचे प्रमाण २१.०० टक्के, Electric Clearing Service च्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पेमेंट करणाऱ्यांचे प्रमाण १५ टक्के तर प्रिपेड पेमेंट आणि मोबाईल बॅकिंगच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पेमेंट करणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे ६ आणि ४ टक्के असलेले दिसून आले.

**नगदमुक्त व्यवहाराचे फायदे**

1. नगदमुक्त व्यवहाराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कर टाळण्याचे प्रमाण कमी होईल.

2. कोणत्याही दोन व्यक्तींना कोणत्याही ठिकाणाहून खरेदी विक्री व्यवहार करणे सोपे होण्यास मदत होईल
3. महागडया स्मार्ट फोन तसेच मोबाईल इंटरनेट कनेक्शनची आवश्यकता नाही.
4. काळया पैशाची पिढी संपुष्टात येईल. बाकी रकमेची चौकशी, कॅश काढणे, भरणे आणि आधार कार्डच्या सहाय्याने फंड ट्रन्सफर करणे सोपे होईल.
5. देशातील नकली नोटावर गदा आली.
6. नगदमुक्त व्यवहारामुळे मोठया प्रमाणावर स्विकारले तर प्रत्येकासाठी खुप सोईस्कर होतील.
7. नगदमुक्त व्यवहारामुळे मोठया प्रमाणावर रक्कम जवळ बाळगण्याचा धोका टाळता येतो.
8. नगदमुक्त व्यवहारात आपण आपल्या हिशोबाचा जमा खर्च केव्हाही तपासू शकतो.
9. सर्व नगदमुक्त व्यवहार हे दृश्य असतात त्यामुळे कोणीही कर चुकवू शकत नाही तसेच टाळू शकत नाही.
10. नगदमुक्त व्यवहारामुळे कागदी चलन मुद्रण आणि त्यासाठी होणारा खर्च कमी होईल
11. नगदमुक्त व्यवहारामुळे व्यवहार हे सोपे आणि सुरक्षित होतील.
12. पैसे चोरी जाण्यासारखे प्रकार कमी होईल.
13. पैशाचे अधिक अभिसरण होईल.
14. बॅकाची रोखता वाढून कर्ज पुरवठयात वाढ होईल त्यामुळे रोजगार वाढविण्यास मदत होईल. बॅकेत

खाते उघडल्यावर आपोआप डेबिट कार्ड मिळून जाते.ते पैसे काढण्यासाठी तसेच भरण्यासाठी जगभरातील कोणत्याही एटीएम मध्ये वापरता येते. ऑनलाईन व्यवहारासाठी कार्ड वापरले जाते.

15. खरेदीदार आणि विक्रेता यांच्यातील वादावर नियंत्रण येईल.

**नगदमुक्त व्यवहाराचे तोटे**

१) समाजामध्ये बहुतांश लोक आजही निरक्षर किंवा कमी शिक्षण घेतलेले आहेत. अशावेळी त्यांना क्रेडीट आणि डेबिट कार्ड बाबत फारसे ज्ञान नाही. किंबहूना त्यांना अशाप्रकारचे कार्ड उपयोगात आणता येत नाहीत.

२) वयोवृध्द लोकांचा विचार करता रोख व्यवहार हे नगदमुक्त व्यवहाराच्या तुलनेत चांगले आहेत.

३) भारतामध्ये अनेक व्यवसाय हे अशा लोकांमार्फत चालविले जातात जे इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार चालविण्यात असमर्थ आहेत.

४) आजही भारतातील अनेक भागात बॅकींग सुविधा उपलब्ध नाहीत.

५) बॅकींग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे लोकांमध्ये बॅकिग आणि नगदमुक्त व्यवहार याविषयी जागृकतेचा अभाव जाणवतो.

६) ग्रामीण भागातील लोकांना नगदमुक्त व्यवहारामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.

७) समाजातील प्रत्येक व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक व्यवहार तसेच इंटरनेटच्या माध्यमातून ॲपचा वापर करणे गैरसोयीचे आहे.

८) इंटरनेटच्या माध्यमातून तसेच ॲनारॉईड मोबाईलच्या माध्यमातून पैसे पाठविण्याची व्यवस्था करणे खर्चिक आहे.

९) यु.एस.एस.डी कोड लक्षात ठेवणे हे वाटते तितके सोपे काम नाही.

१०) शासनाने घोषीत केलेले इ—वॉलेट योग्य प्रकारे काम करीत नाही.

११) बहुतांश वेळा कनेक्टीव्हीटीची समस्या असल्याने क्रेडीट किंवा डेबिट कार्ड मशीन द्वारे स्विकारल्या जात नाही.

१२) नगदमुक्त व्यवहाराचा फटका हा जनसामन्यांना बसणार असून ज्या कॉरपरेट कंपण्या या सुविधा पुरवितात. त्या वस्तुच्या मुळे किंमतीपेक्षा जास्त पैसे वस्तु खरेदी करतांना ग्राहकांकडून आकारतात. त्यामुळे सामान्य ग्राहकांची पिळवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१३) शासकीय बॅकांच्या तुलनेत खाजगी कंपण्याद्वारे पुरविण्यात येणाऱ्या ॲप्स जलद कार्य करतात. परंतु त्याचे कमीशनचे दर मात्र जास्त आहेत.

थोडक्यात, ग्रामीण भागात नगदमुक्त आर्थिक व्यवहारासमोर अनेक आव्हाने आहेत, इंटरनेटची जोडणी, बॅकांचा अभाव, खर्चीक पध्दती, आर्थिक निरक्षरता, तंत्रज्ञानाबाबत उदासिनता यामुळे ग्रामीण भागात नगदमुक्त व्यवहारात अडचणी येत आहेत असे असले तरी यातून

मार्ग निघत असून प्रस्तुत प्रकरणात अभ्यासलेला इतिहास जागतिक स्तरावर कमी लोकसंख्या असणाऱ्या देशांना भारत नगदमुक्त आर्थिक व्यवहाराबाबत स्पर्धा देणारा एक महत्वाचा देश ठरला आहे. आधुनिक काळात भारतात नगदमुक्त व्यवहाराचे प्रमाण वाढत असून यामुळे लोकांना ऑनलाईन व्यवहाराची सवय लागली आहे. ही अनेक दृष्टीने लाभदायक ठरत आहे.

**संदर्भ**


1. Cashlessindia.gov.in. (2018). Cashless India. [online] Available at: http://cashlessindia.gov.in/ [Accessed 5 May 2018].
2. Dave, R. and Thanawala, H. (2018). 3 types of cashless transaction options via prepaid payment instruments for you. [online] The Economic Times. Available at:
3. http://economictimes.indiatimes.com/wealth/spend/a-look-at-various cashlessoptions/articleshow/55508641.cms [Accessed 5 May 2018]
4. Trask, N. T., and M.V. Meyerstein. (1999). Smart Cards in Electronic Commerce. BT Technology Journal. 17(3), .luly.
5. https://mr.vikaspedia.in/e-governance/92193f91c93f91f93
6. https://maharashtratimes.com/business/business-news/cashless-article/articleshow/55966318.cms


***

# स्वातंत्र्योत्तर काळातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे आरोग्य, आहार व समस्या


## श्रीमती सय्यद शाहीन शफी

संशोधक विद्यार्थीनी, गृहशास्त्र विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि.बीड.


**प्रस्तावना :-**

नोकरीसाठी ठराविक वेळी घरातून बाहेर पडणारी स्त्री हे दृश्य आज सर्वांच्याच परिचयाचे झालेले आहे. शाळा-महाविद्यालयातून शिक्षण घेतानाच मुलींच्या मनात नोकरीचे ध्येय जागे होत असते. एकेकाळी नोकरी करणे हे आजच्या इतके सर्रास ही नव्हते व प्रतिष्ठेचे ही नव्हते. लग्न जुळेपर्यंत किंवा निराधार विधवा स्त्रिया शाळेत शिक्षिका किंवा दवाखान्यात नर्सेस म्हणुन काम करताना दिसत असत पण बदलत्या आर्थिक परस्थितीने, वाढत्या महागाईने, आणि मुलींना दिल्या गेलेल्या शिक्षणाच्या समान संधींनी नोकरी ही वाट निश्चित होऊ लागली आहे.

एक काळ असा ही होता की स्त्री शिक्षक, प्राध्यापक, नर्सेस, डॉक्टर, कारकुन अशा दुय्यम पातळीवरच्याच नोकऱ्यांमध्ये लायक समजली जायची. प्राचार्या, एखाद्या संस्थेचे मुख्यपद, मॅनेजर अशी पदे जबाबदारीने सांभाळायची पात्रता तिच्याजवळ आहे हे मान्य होत नव्हते. पण आता अशा जबाबदारीच्या पदावरही ती कामे करु शकते हे तिने आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे. या क्षेत्रा व्यतिरीक्त ही पोलीस,

पायलट, हॉटेल, कंपनी, रेसकोर्स, चित्रपट निर्मिती अशा वेगवेगळया ठिकाणीही तिने आपल्या कर्तृत्वाची चमक दाखविली आहे.

स्त्रियांनी नोकरी करणे ही काळाची गरज आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीला नोकरी करता करता आपला प्रपंच ही सांभाळावा लागतो म्हणजेच तिला एकाच वेळी दोन भूमिका पार पाडाव्या लागतात. नोकरी करुन तिला गृहिणी, सुन, बायको, आई, घराची व कुटूंबाची स्वामिनी अशी अनेक जबाबदारीची पदे सांभाळावी लागतात. कुटूंबाची जबाबदारी व नोकरीची जिम्मेदारी पार पाडत असताना ती स्वत:कडे, स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते त्यामुळे तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रिया आपल्या आरोग्याच्या बाबतीत जागरुक आहेत का ? नोकरी करीत असताना त्यांना काही समस्या येतात का या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन त्यांना येणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी हा विषय शोध निबंधासाठी निवडण्यात आला.

**उद्दिष्टे :-**

1)नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कौटुंबिक समस्या जाणून घेणे.

2)नोकरी करणाऱ्या स्त्रियांची आर्थिक निर्णयाविषयीची मते अभ्यासणे.

3)नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आहाराचा दर्जा अभ्यासणे.

4)नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या समजून घेणे.

5)नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यावर उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती :-**

**1) नमुना निवड :-** या शोध निबंधाकरीता बीड शहरातील स्वराज्य नगर, धांडे नगर, शाहु नगर या भागात राहणाऱ्या 50 नोकरी करणाऱ्या स्त्रियांची निवड करण्यात आली.

**2) माहिती संकलन :-** माहिती संकलनाकरीता 50 नोकरदार स्त्रियांची मुलाखत व अनुसूचीद्वारे माहिती घेण्यात आली.

**3) सांख्यिकीय विश्लेषण :-** मिळालेल्या प्राप्त माहितीची टक्केवारी काढून विश्लेषण करण्यात आले.

**गत संशोधनाचा आढावा :-**

आज स्त्रिया अनेक क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक स्त्रिया राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये तसेच कॉर्पोरेट जगतात ही महिला सर्वोच्च पदावर कार्यरत आहेत. 1960 नंतर स्त्रियांच्या वेगवेगळया प्रश्नांना उठाव मिळाल्याचे दिसून येते. या संदर्भात अश्विनी धोंगडे लिहीतात की, इंग्लंड, अमेरिकेत स्त्री स्वातंत्र्याचे लढे, चळवळी दीड-दोनशे वर्ष लढल्या गेल्या आणि त्या मुख्यत्वे करुन महिलांकडून लढल्या गेल्या 1975 नंतर उदयास आलेल्या स्त्रीवादी चळवळीने स्त्री प्रश्नांकडे लोकांचे लक्ष वेधले आणि स्त्रीला तिचे सामर्थ्य ओळखण्याचे हक्क दिले. युनोने 1975 हे वर्ष स्त्रीदशक म्हणून जाहीर करुन स्त्रियांना नोकऱ्या, स्वातंत्र्य, अनेक संधी, आरोग्य सेवा मिळाव्यात म्हणुन जगभरात चालना दिली.

मार्च 2014 च्या द हिंदू या वर्तमानपत्रातील लेखामध्ये विविध शहरातील विविध प्रकारच्या 120 इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या 2800 स्त्रियांचे सर्वेक्षण केले असता त्यात असे निदर्शनास आले की, भारतातील 75% कामकरी स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे शारीरिक व मानसिक आजार आहेत. बऱ्याचजणी आपल्या आजाराविषयी अनभिज्ञ असुन काही स्त्रीया घरगुती उपचार करतात तर काही आजाराकडे दुर्लक्ष करतात त्याचा परिणाम देशाच्या सर्वांगीण विकासावर होतो.

**चर्चा व विश्लेषण :-**

संपुर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता स्त्रियांचे आरोग्य या घटकाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. आज आपल्या देशातील स्त्रियांचे आरोग्य ही चिंतेची आणि चिंतनाची बाब बनली आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ही स्त्रियांची स्थिती किती दुर्दैवी आहे हे आपल्या सहज लक्षात येते.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना आपल्या जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने पार पाडाव्या लागतात. कौटुंबिक कर्तव्ये पार पाडुन घर-संसार चालवावा लागतो. नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास अधिक असतो. नोकरी करणाऱ्या स्त्रिया आपल्या कुटूंबातील व्यक्तीच्या व मुलांच्या आरोग्य व आहाराकडे पुर्णपणे लक्ष देतात परंतु स्वत:च्याआरोग्य व आहाराकडे तसेच व्यक्तिमत्वाकडे त्यांचे दुर्लक्ष होते म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये पुरेसा आहार वेळेवर न घेतल्यामुळे अशक्तपणा, ॲनेमिया, चिडचिड, वारंवार आजारी पडणे अशी लक्षणे दिसुन येतात म्हणुन या संशोधनामध्ये बीड मधील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आहार व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या याची संपर्कपणे चिकित्सा करावयाची आहे.

**तक्ता क्र. 1**

**स्त्रियांच्या कामाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नर्स | 07 | 14 |
| 2 | शिक्षिका | 25 | 50 |
| 3 | खाजगी नोकरी | 05 | 10 |
| 4 | कारखान्यात काम | 13 | 26 |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकुण | 50 | 100 |

या शोधनिबंधसाठी स्वराज्य नगर, धांडे नगर, गणेश नगर येथील मध्यमवर्गीय कुटूंबातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांची निवड करण्यात आली त्यामध्ये 50 टक्के स्त्रिया या शिक्षिका, 14 टक्के नर्स, 26 टक्के कारखान्यात तर 10 टक्के खाजगी नोकरी करतात.

**तक्ता क्र. 2**

**नोकरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक समस्यांचा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | घरकामाच्या समस्या | 13 | 26 |
| 2 | सासरच्या मंडळीचा विरोध | 10 | 20 |
| 3 | बाल संगोपनातील अडचणी | 19 | 38 |
| 4 | पती - पत्नीतील मतभेद | 08 | 16 |
| | एकुण | 50 | 100 |

या शोधनिबंधसाठी  नोकरी करणाऱ्या महिलांना कौटुंबिक समस्येविषयी विचारले असता घरकामावरुन मतभेद 26 टक्के महिलांना अनुभवावे लागतात. सासरची मंडळी आम्हाला वेळ देऊ शकत नाहीस म्हणुन विरोध करणाऱ्यांची टक्केवारी 20 टक्के आहे, मुलांचे बालसंगोपन करण्यास 38 टक्के महिलांना अडचणी येतात तर पती पत्नीमध्ये मतभेद 16 टक्के महिलांना येतात.

**तक्ता क्र. 3**

**स्त्रियांच्या आर्थिक निर्णया विषयीचे मते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | फक्त कुटुंबासाठी खर्च करावा लागतो. | 13 | 26 |
| 2 | सर्व आर्थिक व्यवहार पतीकडेच असतात | 28 | 56 |
| 3 | पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य आहे | 09 | 18 |
| | एकुण | 50 | 100 |

स्त्रिया स्वत: नोकरी करत असून ही त्यांना आर्थिक निर्णय स्वत: घेता येत नाही. 26 टक्के स्त्रियांना आपली सर्व कमाई फक्त कुटूंबाकरताच खर्च करावी लागते. 56 टक्के स्त्रियांचे सर्व आर्थिक व्यवहार त्यांचे पतीच पाहतात त्यांना काहीही अधिकार राहत नाही. स्वत: कमवित असून ही मात्र 18 टक्के स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य आहे.

**तक्ता क्र. 4**

**स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | निरुत्साह | 08 | 16 |
| 2 | अशक्तपणा | 04 | 08 |
| 3 | कंबर दुखी | 05 | 10 |
| 4 | सांधे दुखी | 10 | 20 |
| 5 | ॲसिडीटी | 08 | 16 |
| 6 | स्थ्ुलता | 03 | 06 |
| 7 | डोकेदुखी | 07 | 14 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | मासिक पाळीची अनियमीतता | 05 | 10 |
| | एकुण | 50 | 100 |

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. सदरील संशोधनात निरुत्साह 16 टक्के स्त्रियांत आहे, अशक्तपणा 8 टक्के स्त्रियांना आहे, कंबरदुखी व सांधेदुखीची समस्या अनुक्रमे 10 व 20 टक्के स्त्रियांमध्ये दिसून आली. 16 टक्के स्त्रियांना ॲसिडीटीचा त्रास होतो. स्थुलता, कोलेस्ट्रॉलची समस्या 6 टक्के स्त्रियांना आढळून आली. डोकेदुखीचा त्रास 14 टक्के स्त्रियांना होतो, मासिकपाळी येण्याची अनियमीतता 10 टक्के स्त्रियांना होते.

**तक्ता क्र. 5**

**नोकरीच्या ठिकाणी उद्भवणाऱ्या समस्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पुरुष कर्मचाऱ्यांकडून होणारा त्रास | 17 | 34 |
| 2 | स्त्रियांना दुय्यम दर्जा | 15 | 30 |
| 3 | स्त्रियांच्या कामाला कमी महत्व | 18 | 36 |
| | एकुण | 50 | 100 |

नोकरीच्या ठिकाणी ही समस्या उदभवत असतात. पुरुष सहकार्यांना स्त्रियांचे वर्चस्व सहन होत नाही त्यामुळे ते काही ना काही कारणावरुन त्यांना त्रास देतात असा त्रास 34 टक्के स्त्रियांना दररोज सहन करावा लागतो. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी दुय्यम दर्जाची

वागणुक 30 टक्के स्त्रियांना मिळते. आपल्या कामाला महत्व दिले जात नाही असे 30 टक्के स्त्रियांना वाटते.

**तक्ता क्र. 6**

**नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आहाराच्या समस्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नोकरीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सकाळचा चहा | 20 | 40 |
| 2 | नाश्ता घेणे | 05 | 10 |
| 3 | शिळे अन्न जास्त खाणे | 15 | 30 |
| | एकुण | 50 | 100 |

नोकरी करणाऱ्या स्त्रिया आपल्या आहाराकडे लक्ष देत नाहीत. कुटूंबाच्या आहाराकडे लक्ष देतात पण स्वत:च्या आहाराकडे दुर्लक्ष करतात. सदरील शोध निबंधात नोकरी करणाऱ्या स्त्रियांना सकाळचा नाश्ता करण्याची सवय फक्त 10 टक्के स्त्रियांना आहे, चहा घेण्याची सवय 40 टकके स्त्रियांना आहे तर शिळे अन्न खाणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी 30 टक्के इतकी आहे. यावरुन लक्षात येते की नोकरी करणाऱ्या स्त्रिया स्वत:च्या आहाराकडे दुर्लक्ष करतात परिणामी त्यांना आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते.

**निष्कर्ष :-**

1. आपल्याकडील पुरुष प्रधान संस्कृतीमुळे स्त्री कितीही मोठया पदावर असली तरी ही तिला चुल व मुल ही सर्वात मोठी जबाबदारी पार पाडावी लागते. तिला स्वयंपाक, घरातील इतर कामे, मुलांचा अभ्यास, पाहुण्यांचे नातेवाईकांचे पाहुणचार, कुटूंबातील व्यक्तींचे आजारपण अशी अनेक कामे करावी लागतात त्यामुळे तिला स्वत:कडे वेळ देणे शक्य होत

नाही. त्यामुळे तिला आरोग्यविषयी समस्या येतात व ती बरेच आजार अंगावर काढते. समतोल आहाराविषयी माहिती असुनही वेळे अभावी ती समतोल आहार घेऊ शकत नाही. मानसिक ताण, शारीरिक ताण व कार्यालयीन कामकाजांचा ताण तिला सहन करावा लागतो ही नोकरी करणाऱ्या स्त्रियांची फार मोठी समस्या आहे.

2. नोकरी करणाऱ्या स्त्रिया फार सुखी आहेत असा समज आहे परंतु सदरील शोध निबंधावरुन असे निदर्शनास येते की नोकरी करणाऱ्या स्त्रियांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.
3. प्रत्येक नोकरी करणाऱ्या स्त्रियांना बालसंगोपनाची समस्या भेडसावते. मुलांसोबत वेळ घालवणे त्यांना शक्य नसते. मुले घरी एकटीच राहतात म्हणुन त्या सतत चिंतेत असतात.
4. घरकामाशी संबंधित समस्या असतात.
5. सासरकडील मंडळी ही माहेरच्यांना पैसे देते असा संशय घेतात.
6. आर्थिक स्वातंत्र्यही अनेक स्त्रियांना मिळत नाही. पतीची परवानगी घेतल्याशिवाय स्वत: साठीची खरेदी किंवा इतर कोणाला मदत ही करता येत नाही.
7. कामाच्या ठिकाणी ही स्त्रियांना कायम दुय्यम दर्जाची वागणुक मिळते. मुख्य जबाबदारी देणे टाळतात.
8. कामाच्या ठिकाणी बराचवेळा पुरुषांकडून पाठीमागे हसणे, टिंगल टवाळी करणे इ. त्रास सहन करावा लागतो.

9. नोकरी करणाऱ्या सियाना आरोग्याच्या समस्या असतात. अशक्तपणा, निरुत्साह, सांधेदुखी, मायग्रेन, ॲसिडीटी, स्थुलता या तक्रारी कायम असतात.
10. वेळेच्या अभावी त्या व्यायाम ही करु शकत नाहीत.
11. कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीची वेळ सांभाळता, सांभाळता त्यांचे स्वत:च्या आहाराकडे दूर्लक्ष होते त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

अशा प्रकारे स्त्रियांना आजही समस्या आहेत. ती नोकरी करीत असली तरीही तिच्या समस्या, त्रास संपलेला नाही. यातून स्त्रियांची सुटका होऊन त्यांना आनंदी सुखी जीवन जगण्यासाठी खालील प्रकारच्या उपाययोजना केल्यास त्याच्या स्त्रियांच्या समस्या निर्मूलनासाठी निश्चितच उपयोग होईल.

**शिफारसी / उपाय योजना :-**

1. स्त्रिया जेथे नोकरी करतात त्या ठिकाणी कार्यालयीन प्रमुखाने स्त्री पुरुष असा भेद करु नये.
2. कार्यालयीन ठिकाणी स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणुक देणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.
3. नोकरीच्या ठिकाणी त्यांच्या मुलांसाठी पाळणा घराचा नियम सक्तीचा असावा.
4. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी आरोग्याच्या दृष्टीने कार्यालयीन ठिकाणी चांगले प्रसाधनगृह असावे.
5. नोकरीनिमीत्त घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांच्या सोयीसाठी शहरात मोक्याच्या ठिकाण स्वच्छतागृहे असावीत.
6. नोकरदार स्त्रियांच्या सदृढ आरोग्यासाठी शासनामार्फत व्यायाम शाळांची निर्मिती व्हावी.

7. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांनाही प्रत्येक निर्णयात सहभागी करुन घ्यावे.
8. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना बालसंगोपनासाठी केंद्र शासनाप्रमाणे अधिकच्या रजा मिळाव्यात.
9. प्रत्येक कुटुंबाने नोकरदार स्त्रीला अधिकाधिक स्वातंत्र्य द्यावे.
10. प्रत्येक कुटुंबाने नोकरदार स्त्रीला सुन म्हणुन नवे तर मुलगी म्हणुन सहकार्य करावे त्यामुळे तिचा मानसिक ताण कमी होईल.
11. शासकीय कार्यालयाप्रमाणे प्रत्येक खाजगी कार्यालयातही महिला तक्रार निवारण समिती असावी.
12. महिला अधिकाऱ्यांनी स्त्रियांना समजुन घ्यावे.
13. नोकरदार स्त्रीला कुटूंबातील पुरुषाने सकारात्मकतेने समजून घ्यावे.
14. सणवार शुभकार्य इ. प्रासंगिक निमित्ताने नोकरदार स्त्रियांवर पारंपारिक बंधने कुटूंबाने लादू नयेत.
15. कुटूंबातील सदस्यांनी सकारात्मकतेने विचार केल्यास व कार्यालयीन ठिकाणी योग्य वातावरण असल्यास नोकरी करणारी स्त्री आनदांने जगू शकेल.

**संदर्भ सूची :-**

1. डॉ. विद्या व्यवहारे (1999) स्त्री गीताची सामाजिक सांस्कृतक पार्श्वभुमी
2. डॉ. उज्वला वैरागडे (2012) सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण
3. तुझी सखी आजची स्त्री जानवी पाटील यांचा ब्लॉग 16 फेब्रुवारी 2017
4. राजवाडे संजिवनी, दैनिक लोकसत्ता (20 सप्टेंबर 2018)

5. ए.आर.वाडगव (2019) महाराष्ट्रातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या अपुर्व नॉलेज, इंटरनॅशनल जर्नल ऑफ मल्टिडिसिप्लिनरी रिसर्च ISSN2348-2707(4)
6. डॉ. वंदना बनकर (फेब्रुवारी 2020) नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या व उपाययोजना, Current Global Reviewer (ISSN : 2319-8648 Vol.4)

***

# “मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास”

**डॉ. बाळासाहेब आश्रुबा सरपते**

मार्गदर्शक, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, जे. बी. एस. पी. महाविद्यालय, पाटोदा. बीड

**सोनवणे राहूल गौतम**

संशोधक, तुलसी संगणकीय मंडळाचे, कला आणि विज्ञान महाविद्यालय, बीड

**गोषवारा (Abstract)**

मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास करणे हे सध्याचा अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. या अभ्यासासाठी 18 ते 35 वयोगटातील शरीरसौष्ठव 220 खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली या प्राथमिक साधनांचा अवलंब करण्यात येणार आहे. संशोधन अभ्यासासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी प्रत्येक प्रतिसाद परिक्षेची वारंवारता आणि टक्केवारी या संख्याशास्त्राचा समावेश करणार आहे.

**प्रस्तावना :-**

शरीरसौष्ठव एक पिळदार शरीर, धष्ठपुष्ठ शरीर चार चौघात पटकन डोळयात भरण्यासारखे निरोगी शरीर पुरातन काळापासून बलवान आणि आपले श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी ताकदीचा उपयोग

करीत आले आहेत. आपल्या ताकदीच्या बळावर अनेकांनी जगात आणि भारतावर राज्य केले आहे. जुन्या काळी आकर्षक शरीरापेक्षा ताकदीला महत्व असे. अवाढव्या शरीर, ताकद सिध्द करण्याचे खेळ, सहासी खेळ अशा प्रकारचे खेळ खेळले जात असत. पण जसा-जसा काळ बदलत गेला तसा शरीरातील ताकदीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत गेला. आपले शरीर सुडौल, पिळदार, आकर्षक शक्तीशाली दिसण्यासाठी मग प्रयत्न करु लागले. त्यातुनच शरीरसौष्ठव चा जन्म झाला. मग हळू-हळू व्यावसायिक शरीरसौष्ठव स्पर्धा चालु झाल्या. पण सुरुवातीला परंपरागत साधनानी खेळाडू प्रशिक्षण घेत असे. जग आधुनिकताकडे वाटचाल करीत असतांना शरीरसौष्ठव आणि व्यायामामध्ये पण आधुनिकता आली. व ती शरीरसौष्ठव खेळाडुंनी स्वीकारली. जागतिक स्तरावर प्रथम शरीरसौष्ठव या मान उगेन सँडो या खेळाडुला जातो. तेव्हापासून शरीरसौष्ठव मध्ये प्रत्येक खेळाडुच्या शरीराचे अवयव तोलुन मापुन विजेता घोषित करण्याची प्रथा सुरु झाली. मग हळू-हळू शरीरसौष्ठव चा प्रसार सर्वत्र सुरु झाला. आज तर बॉडी-बिल्डींग मध्ये खुप प्रचार व प्रसार झाला आहे. आधुनिकता आली आहे. करियरच्या खुप संधी निर्माण झाल्या आहेत. उदा. जिम, जिम ट्रेनर, डायटिशन, बॉडी मसाज पार्लर, शरीरसौष्ठव खेळाडु पण शरीरसौष्ठव खेळाडु बनणे एक दिवसांच काम नाही. त्यासाठी नियमित शारीरिक अभ्यास, शारीरिक कष्ट, आधुनिक तंत्राचा वापर, डाईट आणि सातत्याने तुम्ही एक चांगला शरीरसौष्ठव खेळाडु बनऊ शकता. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास अभ्यासणे.

**प्रस्तावित समस्येचे महत्व –**

1. शरीरसौष्ठव या खेळामध्ये् चांगले खेळाडू निर्माण होतील हे महत्वाचे आहे.
2. क्रीडा शिक्षक आणि व्यावसायिक प्रशिक्षकांना शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मदत होईल म्हणून प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.
3. शरीरसौष्ठव खेळातील प्रशिक्षण कार्यक्रम आखताना येणाऱ्या समस्यांची सद्यस्थिती समजण्यास मदत होईल. म्हणून प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

**प्रस्तावित समस्येची गरज –**

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास" अभ्यासणे. समस्याचे महत्व लक्षात घेता शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना खेळात सहभागी होण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे आणि अडचणीवर मात करण्याकरिता सर्वप्रथम खेळातील खेळाडूंना सहभाग घेताना अडचणी का निर्माण होतात? याचा शोध घेणे गरजेचे आहे. खेळाविषयी आवड निर्माण करणे व टिकून ठेवण्यासाठी काही उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. कारण सतत येणाऱ्या अडचणीमुळे शारीरिक आणि मानसिकेवर परिणाम होऊ शकतो किंवा नाही हे अभ्यासणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळात सहभाग घेण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
2. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळाडूंच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

3. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळाडूंसाठी उपलब्ध् सोयी सुविधा अभ्यासणे.
4. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील विविध स्तरावरील सहभागाचा दर्जा अभ्यासणे.
5. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील खेळाडूंचा शहरी आणि ग्रामीण सहभाग याविषयी तुलनात्मकता अभ्यासणे.

**परिकल्पना –**

1. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील खेळाडूंचा शहरी आणि ग्रामीण सहभाग मधील सहसंबंध सार्थक आहे.
2. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील खेळाडूंचा शहरी आणि ग्रामीण मधील सहसंबंध सार्थक नाही.
3. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळात सहभाग घेण्यासाठी आर्थिक अडचणी येतात.
4. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळात सहभाग घेण्यासाठी आर्थिक अडचणी येत नाहीत.
5. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळात सहभाग कमी प्रमाणात आहे.
6. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील खेळाडूंचा शहरी आणि ग्रामीण दर्जा मधील सहसंबंध सार्थक आहे.
7. मराठवाड्यातील शरीरसौष्ठव खेळातील खेळाडूंचा शहरी आणि ग्रामीण दर्जा मधील सहसंबंध सार्थक नाही.

**संशोधनाच्या कार्याची व्याप्ती –**

**परिसीमा :-**

1. सदर संशोधन हे मराठवाड्यापुरते मर्यादित आहे.
2. सदर संशोधन हे मराठवाड्यातील 8 जिल्ह्यापुरतचे मर्यादित आहे.

3. प्रस्तुत संशोधन हे 18 ते 35 वयोगटातील खेळाडूपुरतेच मर्यादित आहे.
4. सदर संशोधन हे शरीरसौष्ठव खेळापुरतेच मर्यादित आहे.
5. सदर सशोधन हे शहरी व ग्रामीण भागातील स्पर्धेत सहभाग घेतलेल्या खेळाडू पुरतेच मर्यादित आहे.
6. हा अभ्यास फक्त मुले खेळाडूंपर्यंत मर्यादित केला आहे.

**मर्यादा :-**

1. प्रस्तुत संशोधनात खेळाडूंच्या आर्थिक व सामाजिक अशा घटकांवर संशोधकास नियंत्रण ठेवता येणार नाही.
2. प्रस्तुत संशोधनात खेळाडूंचा प्रतिसाद पूर्णपणे असेल नाही.
3. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया लोकसंख्या असलेल्या नमुन्यांवर हा अभ्यास करण्यात येईल.

**संशोधन पध्दती –**

''मराठवाड्यातील शरीरसौष्ठव क्रीडा प्रकारातील खेळाडूंना येणाऱ्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास'' या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात वापरण्यात येणारी चले (Variables) पुढीलप्रमाणे आहे. त्यामध्ये स्वाश्रयी चले (Independent Variables) : खेळाडूसाठीची प्रश्नावली, आश्रयी चले (Dependent Variables): शरीरसौष्ठव खेळातील मुले आणि अडथळा करणारे चले (Intervening Variables) : कंटाळा इ. आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी जनसंख्या ही मराठवाड्यातील 8 जिल्ह्यामधील असणार आहे. या संशोधनामध्ये 18 ते 35 वयोगटातील शरीरसौष्ठव खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी एकूण जनसंख्या संभाव्य पध्दतीने यादृच्छिक न्यादर्शन पध्दतीचा अवलंब करुन 220

खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामुग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वेक्षण पध्दतीतील अत्यंत प्रभावी साधन म्हणजे प्रश्नावली या प्राथमिक साधनांचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिवेचन करण्यासाठी संख्याशास्त्रीय साधनांद्वारे प्रत्येक प्रतिसाद परिक्षेची वारंवारता आणि टक्केवारी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

**निकाल:-**

संबंधित सांख्यिकीय विश्लेषणानुसार निकालाचे वर्णन केले जाईल आणि मांडलेल्या गृहीतकानुसार संबंधित संशोधनाच्या प्रकाशात चर्चा केली जाईल.

**संदर्भग्रंथ सूची :-**


1. पाटील सुरेश (2006) ''कृतिसंशोधन व नवोपक्रम संस्कार'' प्रकाशन, लातूर.
2. करवंदे अनिल (2000) ''शारीरिक शिक्षा सांख्यिकी'' अमित ब्रदर पब्लिकेशन, पुणे.
3. जर्दे श्रीपाद (1995) ''शारीरिक शिक्षण संशोधन तंत्र व पध्दती'' चंद्रमा प्रकाशन, कोल्हापूर
4. कांगणे सोपान (2020) ''शारीरिक शिक्षण निराली पब्लिकेशन, पुणे.
5. दांडेकर वा.णा. ''शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र'' श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
6. म.प. आलेगावकर (1994) ''प्रगत क्रीडा मानसशास्त्र'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे.


***

# स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण योजनांचा अभ्यास – कुपोषणाचा विशेष संदर्भ

**वर्षा प्रभाकर पाईकराव**

**प्रस्तावना**

कुपोषण म्हणजे शरीरासाठी आवश्यक असणारे एक किंवा अधिक पोषक तत्वे न मिळाल्यामुळे वारंवार संसर्ग होणे आणि वाढीसाठी उपयोगी असणाऱ्या प्रक्रियेसंबंधित अन्य कारणांनी कुपोषण होते. कुपोषण संपूर्ण जीवन चक्रात फिरत असते. ज्या बालिकेचा विकास योग्य होत नाही त्या अविकसित महिला बनतात आणि कमी वजनाच्या बाळाला जन्म देतात कारण त्या एका तरुण महिले मध्ये विकसित होत नसतात. आपल्या देशात सहा वर्षांहून कमी वयाच्या प्रत्येक दहा मुलांमध्ये चार मुले कुपोषित असतात. उत्तम पोषण मानवी जीवनासाठी समतोल आहाराची आवशक्यता असते. उत्तम पोषण हे मानवी जीवनातील अविभाज्य व महत्वाची बाब आहे. शरीराला आवश्यक काम करण्यासाठी लागणारी शक्ती ही आपण घेत असलेल्या आहारातील अन्नपदार्थपासून मिळत असते. आहारात पोषण घटकाची कमतरता असेल तर कुपोषण निर्माण होते. म्हणूनच निरोगी जीवनासाठी समतोल आहाराची आवश्यकता असते.

**कुपोषणाचा प्रभाव:**

शारीरिक वाढ कमी होणे किंवा न होणे

१. वाढीत अडथळा येणे

२. संसर्गाशी लढण्याची शक्ती कमी होणे आणि त्याचा परिणाम म्हणून आजाराची शक्यता असणे.

३. मांसपेशी अशक्त होणे.

४.  भूक न लागणे

५. बुद्ध्यांक  कमी होणे आणि मानसिक व मतिमंदत्व येते.

६.  शिकण्याची योग्यता  आणि शाळेतील कार्यकुशलता  कमी होणे.

७. थकवा, सुस्ती, चिडचिडेपणा (खेळामध्ये भाग न घेणे)

८. रोग प्रतिकार शक्ती कमी होणे.

**कुपोषणाची कारणे:**

पोषण आहाराशी संबंधित:

१. चीक (कोलस्ट्रम ) न पाजणे (जन्माच्या वेळी)

२. आईचे दूध उशिरा सुरु करणे.

३. वरचा पूरक आहार उशिरा सुरु करणे

४. प्रथिने व उष्मांक युक्त अन्नपदार्थ कमी देणे.

५. आहार देण्यात अस्वच्छता ठेवणे.

६. आजारपणात बालकांना व्यवस्थित आहार न देणे.

**आरोग्याशी संबंधित:**

१. जुलाबामुळे शरीरातील पोषक तत्वे कमी होणे

२. वारंवार आजारी पडल्यामुळे भूक न लागणे

३. कमी वजनाचे मूळ जन्माला येणे

४. व्यक्तिगत स्वच्छतेचा अभाव

५. आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता नसणे

**सामाजिक मुद्द्यांशी संबंधित:**

१. लवकर विवाह

२. मोठे कुटुंब

३. साधनांची कमतरता (गरिबी मुळे खाद्य पदार्थ खरेदी करू शकत नाही)

**कुपोषणाचे वर्गीकरण:**

**अल्पपोषण :**

यामध्ये पोषक घटकाच्या अभावामुळे शरीरावर हानिकारक परिणाम होतात. ज्या वेळी एक किंवा अधिक पोषण घटके शारीरिक आवश्यकते पेक्षा कमी प्रमाणात मिळतात त्यास अभावाचे कुपोषण म्हणतात. उदा. प्रथिनांच्या अभावी झुरणी.

**अधिक्याचे कुपोषण:**

जेव्हा एक किंवा अधिक पोषण घटके गन आणि परिमाणे आवश्यकते पेक्षा जास्त उपयोगात आणले गेल्या मुळे घडून येणाऱ्या पोषणास अधिक्याचे कुपोषण म्हणतात. उदा: कर्बोदकांच्या अधिक्यामुळे लठ्ठपणा.

कुपोषणाचे परिणाम कमी होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना खालीलप्रमाणे आहेत:

**I . आय.सी.डी.एस.** स्थापना: १९७५

**उद्दिष्टे:**

१. ० ते ६ वर्षांच्या बालकांचा आहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे

२. बालकांचा शारीरिक, मानसिक व सामाजिक विकास योग्य होण्याच्या दृष्टीने पाया भरणे

३. समाजामध्ये बालमृत्यू, रोगाचा संसर्ग, कुपोषण व शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये होणारी घट कमी करणे

४. बालकाचा विकास चांगला होण्याकरिता विविध बालक कल्याण विभागात समन्वयकता असणे.

५. स्त्रियांना योग्य आहार व आरोग्य विषयक प्रशिक्षण देऊन बालकाच्या आहार विषयक आवश्यकता व आरोग्य विषयक जाणीव निर्माण करणे.

**या अंतर्गत येणाऱ्या योजना:**

१. पूरक आहार

२. लसीकरण

३. आरोग्य तपासणी

४. आहार व आरोग्य शिक्षण

५. शाळापूर्व अनौपचारिक शिक्षण

**II. अनुदान साहाय्य योजना**

**उद्देश:**

आदिवासी भागातील कुपोषण, बालमृत्यू तसेच जन्माला येणाऱ्या कमी वजनाच्या नवजात बालकांच्या समस्येवर मात करण्यासाठी गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माताना एक वेळेचा चौरस आहार देणे.

**इतर तरतुदी:**

या योजनेअंतर्गत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प अंतर्गत न येणाऱ्या जिल्ह्यातील बिगर शासकीय (NGO) संस्थांना बालकामगार समस्येच्या निराकरणासाठी थेट निधी पलब्ध करून दिला जातो.

राज्य शासनाच्या शिगाराशीवरून केंद्रीय श्रम मंत्रालय या योजने अंतर्गत बालकामगारांच्या पुनर्वसन प्रकल्पाच्या ७५% पर्यंत वित्तीय साहाय्य देते. ही योजना केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालय मार्फत राबविली जाते.

**III राष्ट्रीय पोषण अभियान:**

सुरुवात: ८ मार्च २०१८

**उद्देश**: कुपोषणाच्या समस्येची व्यापक स्तरावर निर्मूलन करणे

**उद्दिष्टे**:

1. कुपोषणाचे प्रमाण प्रति वर्षी २%ने कमी करणे
2. मुलाची वाढ खुंटल्याचे प्रमाणे २०२२ पर्यंत ३८% वरून २५% वर आणणे.
3. कमी वजन व कमी उंचीच्या बालकांचे प्रमाण प्रति वर्षी २% ने कमी करणे
4. बालके ( ६ महिने ते ५ वर्षे)आणि महिला (१५ ते ४९ वर्षे) यांच्यातील ऍनेमिया चे प्रमाण प्रति वर्षी ३ % ने कमी करणे.
5. किशोरी आणि गर्भवती माता व स्तनदा माता यांची पोषण विषयक स्थिती सुधारणे
6. जन्माच्या वेळेस कमी वजनाच्या बालकांची समस्या कमी करणे

**IV. राजमाता जिजाऊ माता ब्लॅक आरोग्य आणि पोषण अभियान:**

सुरुवात: २००५

**प्राथमिक उद्दिष्टे:**

गर्भ धारणा झाल्यापासून पहिल्या १००० दिवसावर (९ ते २४ महिने) कालावधीत विशेष लक्ष केंद्रित करून राज्यातील बालकुपोषणचे प्रमाण कमी करणे

**अभियानाची उद्दिष्टे:**

1. राज्यात पिढ्या न पिढ्या होणाऱ्या कुपोषणाच्या दुष्ट चक्रावर मात करणे व यासाठी लाईफ सायकल अप्रोच वापरणे.

2. ९ ते २४ महिने या कालावधीवर लक्ष केंद्रित करून सर्व बालके साधारण श्रेणीत आणणे आणि आयुष्याची सुरुवात चांगली करणे
3. बुटकेपणाचे प्रमाण कमी करणे म्हणजे दीर्घकालीन कुपोषणावर मात करणे जेणेकरून पहिल्या दोन वर्षात मुलांची उंची योग्य प्रमाणात वाढेल

वरील बाबींचा विचार करताना सर्व ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग घेणे, लोक सहभाग घेणे, जनजागृती करणे व लोक चळवळ उभारणे.

**इतर तरतुदी:**

1. महाराष्ट्र हे कुपोषणाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी अभियान सुरु करणारे देशातील पहिले राज्य आहे
2. तांत्रिक दृष्ट्या हे अभियान महिला आणि बालविकास विभागाच्या अंतर्गत आहे
3. या अभियानाला संपूर्ण अर्थ साहाय्य युनिसेफ कडून पुरविले जाते.
4. या अभियानाचा भर आरोग्य आणि एकात्मिक बाल विकास सेवा यातील समन्वय सुधारण्यावर आहे.
5. राज्यातील ० ते ३ वयोगटातील बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी दि. १४ नोव्हेम्बर २०१३ ते ७ एप्रिल २०१४ या कालावधीत हे नव्याने राबविण्यात आले होते कारण या पूर्वी ३ ते ६ या वयोगटावरच अधिक भर होता परंतु कुपोषण हे ० ते २ वर्षापर्यंतच्या वयोगटात अधिक होते.

**V . डॉ. ए पी जे अब्दुल कलाम अमृत योजना:**

सुरुवात :२०१५ पालघर येथून

**उद्देश**: आदिवासी भागातील कुपोषण, बाल मृत्यू तसेच जन्माला येणाऱ्या कमी वजनाच्या नवजात बालकांच्या समस्येवर मात करण्यासाठी गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना ६ महिने एक वेळेचा चौरस आहार देणे.

**इतर तरतुदी:**

ही योजना १६ आदिवासी जिल्यातील ८५ एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या कार्य क्षेत्रात राबविण्यात येत आहेत.

चौरस आहाराचा खर्च सरासरी प्रति लाभार्थी २२ रुपये निश्चित करण्यात आला आहे. त्यासाठी केंद्राच्या THR च्या योजनेचा निधी वापरण्यात येणार आहे.

मुलामध्ये चेतना निर्माण करण्याच्या डॉ कलाम यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

या योजनेनुसार आहार यामध्ये चपाती, भाकरी, भात, कडधान्य, सोया, दूध, साखरेसह, शेंगदाणा लाडू, अंडी अथवा केळी, नाचणी हलवा, फळे, हिरवा भाजीपाला, खाद्यतेल, गुळ अथवा साखर, आयोडीन युक्त मीठ, मसाला, इ. समावेश असेल.

अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांना नियमित मिळणाऱ्या मानधनाशिवाय या योजनेचा आहार तयार करण्यासाठी दार महा प्रत्येकी २५० रुपये देण्यात येणार आहेत.

हि योजना आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणा खाली व एकात्मिक बाळ विकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.

या योजने अंतर्गत देण्यात येणार आहार खरेदी करण्यासाठी एका अंगणवाडी साठी महिला सरपंच किंवा ग्राम पंचायत सदस्य अनुसूचित जमाती यांच्या अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय आहार समिती

नियुक्त करण्यात येईल. या समितीला आहार घटक खरेदी करण्याचे अधिकार राहतील.

गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत तर स्तनदा मातांना प्रसूती नंतर ३ महिन्यांच्या कालावधीसाठी या योजनेचा लाभ देण्यात येईल.

**संदर्भ सूची:**

१. पोषण आणि आहार - शोभा वाघमारे

२. महिला व बालविकास अधिकारी - डॉ. अजित थोरबोले

३. सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण - डॉ. उज्वला वैरागडे, प्रा. मुळे

४. आर्थिक व सामाजिक विकास - डॉ. किरणजित देसले.

***

# आदिवासी साहित्याची वाटचाल आणि जडणघडण : एक चिकित्सक अभ्यास

## डॉ. वर्षा मोहनराव बिलोलीकर

एम. ए. (मराठी), पीएचडी, नेट स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड– ४३१६०६

**प्रस्तावना :–**

आदिम काळापासून आदिवासी साहित्य मौखिक स्वरूपात अस्तित्वात होते. परंपरेने चालत आलेल्या मौखिकतेला छेद देत या साहित्याने आदिम जमातीच्या जीवनातील व्यथा वेदनांना वाट मोकळी करून दिली. तसेच अन्याय अत्याचार, पिळवणूक शोषण दारिर्द्य मराठी साहित्यातून चित्रित केले जाऊ लागले मराठी भाषेच्या सान्निध्यात आल्यामुळे हे साहित्य लिखीत स्वरुपात विकसित झाले. आपल्या समाजावर होणा–या अन्याय अत्याचार याची जाणीव या समाजाला नव्हती आहे त्या परिस्थितीत तो आपले जीवन व्यतीत करू लागला. तो आधुनिक जीवनापासून दूर वनवासात जीवनाचा क्षण न क्षण जगत असे पण स्वातंर्त्योत्तर काळात ही परिस्थिती बदलली शैक्षणिक जागृतीमुळे अनेक नवशिक्षित यांना आत्मभान प्राप्त झाले व आपल्या जमात बांधवांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराबद्दल ते लिहू व बोलू लागले .त्यातूनच कथा, कविता, कादंबरी,आत्मकथा या साहित्यप्रकाराचा उदय झाला .आज या साहित्य प्रवाहात अनेक क्रांतीकारी बदल झाले आहेत.

**साठोत्तरी वाङमय प्रवाह उदय आणि विकासः**

आदिवासी मराठी साहित्याचा विचार करताना साठोत्तरी वाङमय प्रवाहाचा उदय आणि विकास कसा झाला याचा

आढावा घेणे गरजेचे आहे . १९व्या शतकात भारतामध्ये सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली. संपूर्ण देशामध्ये परिवर्तनवादी चळवळीच्या परिणामातून या वांड्मयीन प्रवाहात प्रामुख्याने दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे विविध साहित्य प्रवाह उदयाला आले. पण १९७०च्या दशकानंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचा स्वतंत्र परिवर्तनवादी साहित्य प्रवाह निर्माण झाला. पारंपारिक जीवनाला छेद देऊन ज्ञान आत्मसात करण्याची जिज्ञासा सर्व समाजघटकांना वाटू लागली. समाजात नवे विचार, आचार, भौतिक प्रगती याकडे सर्व समाज घटक आकर्षिला जाऊ लागला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे तळागाळातील लोकांसाठी, बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुली झाली. समाजातील सर्व स्तरांपर्यंत शिक्षण पोहोचले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शैक्षणिक जागृतीमुळे समाजातील सर्वसामान्य व्यक्ती शिक्षणाच्या प्रवाहात सामील झाली. शिक्षणामुळे तिच्यात आमूलाग्र बदल झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुता व भौतिक प्रगती या सर्वांमुळे नवशिक्षित तरुण सजग झाला. नवशिक्षितांना आत्मभान प्राप्त झाले. या सर्व तरुणांना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक विचारधारेतून समाजाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टीकोन प्राप्त झाला. मराठी साहित्याच्या क्षेत्रातही वरील नवनवीन विचारांनी नवा दृष्टिकोन रुजविण्यासाठी आरंभ केला. या वैचारिक धारेतून मराठी साहित्य क्षेत्रात साठोत्तरी वांड्मय प्रवाहाचा उदय झाला.

"स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या सर्वत्रीकरणामुळे आदिम जमातीतून संवेदनशील, सर्जनशील, जागृत व आत्मभान प्राप्त झालेली साहित्यिकांची एक पिढी निर्माण झाली. या पिढीने महाराष्ट्रातील आदिम, आदिवासी, डोंगरी व दुर्गम अरण्यवासी

परिवेशातील अनुभवविश्व् आपल्या ललित कलाकृतींचा व पारंपारिक लोकसाहित्याचा विषय केला १".

प्रामुख्याने या वांङ्मयीन प्रवाहात सर्वप्रथम दलित साहित्याने आपल्या व्यथा वेदना व दुःखांना साहित्यातून वाचा फोडली. नवशिक्षित तरुण आपल्या जीवनाचा शोध साहित्याच्या माध्यमातून घेण्यासाठी जमेल त्या पद्धतीने प्रयत्न करू लागला. पुढे यातूनच दलित साहित्याची निर्मिती झाली. दलित साहित्याप्रमाणेच इतर समाजातील तरुणांना शिक्षणामुळे स्वभान प्राप्त झाले व मराठी साहित्य क्षेत्रात विविध साठोत्तरी वांङ्मयीन प्रवाहाचा उदय झाला. उदा. स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, विज्ञान साहित्य, कामगारांचे साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी हे सर्व वांङ्मयीन प्रवाह १९६० ते १९८० या दोन दशकात मराठी साहित्यात उदयाला आले. परिणामी या साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

"आदिवासी साहित्य म्हणूनच ज्या साहित्याचा नामनिर्देश केला जातो ते साहित्य सामान्यता १९६० नंतर उदयाला आले आणि १९८० नंतर ते अधिकाधिक पुष्ट होत गेले खरे तर सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी साहित्य वैश्विक साहित्याचा मूलाधार ठरण्याची शक्यता वाढली आहे२". हजारो वर्षापासून मूक असलेल्या भावनांना शब्दाच्या द्वारे साहित्यातून वाचा फोडण्याचे काम आदिवासी साहित्यिकांनी केले. कथा, कविता, कादंबरीया वाङ्मय प्रकारांनी साहित्य समृद्ध व संपन्न बनविले.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून मौखिक स्वरूपात असलेले हे साहित्य साठच्या दशकानंतर ख–या अर्थाने विकसित झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात ठक्कर बाप्पा तंट्या भिल्ल श्री नारायण सिंह उईके या वीरपुरुषाने आदिवासींच्या जीवनाला न्याय देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. गोविंद गारे, डॉ विनायक तुमराम, नजुबाई गावित, बाबाराव मडावी, डॉ.माहेश्वरी गावित, माधव सरकुंडे, उषाकिरण आत्राम अशा अनेक आदिवासी अभ्यासकांनी आपल्या समाजाच्या व्यथा वेदनांचे चित्रण कथा, कादंबरी, आत्मकथा या साहित्य प्रकारातून केले. १९७० च्या दशकानंतर शब्दबद्ध झालेल्या आदिवासी साहित्याचा विकास ख–या अर्थाने भद्रावती जि.चंद्रपूर येथील साहित्य संमेलनाने झाला. प्रामुख्याने आदिवासी साहित्य निर्मितीचा काळ हा पहिल्या आदिवासी संमेलनापासून ग्राह्य धरला जातो. आदिवासी साहित्याची निर्मिती झाली तेव्हापासून ते आजपर्यंत अनेक नवोदित लेखकांनी या साहित्य प्रवाहात मोलाची भर टाकली आहे.

प्रामुख्याने मराठी साहित्य क्षेत्रात कथा, कादंबरी, कविता, नाटक, या वाङ्मय प्रकारच्या तुलनेत आदिम आत्मचरित्रांची संख्या कमी आहे. १९०० ते २००० या कालखंडात आदिवासी साहित्य म्हणून जे काय अस्तित्वात आले त्याचे पुढील प्रमाणे दोन भाग पाडता येतील.

१) आदिवासींत्तरांनी आदिवासींवर लिहिलेले साहित्य

२) आदिवासींनी आदिवासींवर लिहिलेले साहित्य

या दृष्टीने कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा या वांडमय प्रकारांचा विकास कसा होत गेला हे पाहणे गरजेचे आहे. कथा या साहित्य प्रकारात आदिवासी जमातीत फार पुरातन काळापासून कथाकारांनी कथेतून वाचा फोडली आहे. आदिवासी लेखकांनी आदिवासी वर लिहिलेल्या कथेत प्रामुख्याने उषाकिरण आत्राम यांचा उल्लेख केला जातो. ”अहेर“ हा त्यांचा

कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची धडपड मांडली आहे. "अहेर" या कथासंग्रहातील कथांमधून घडणारे जीवन चित्रण स्वानुभवातून आलेले आहे.

"सर्वा" हा माधव सरकुंडे यांचा कथासंग्रह असून या ग्रामीण आदिवासींच्या जीवनातल्या व्यथांचा सर्वा वेचला आहे. व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, कथा प्रस्तुतीकरणाची शैली या बाबतीत हा कथासंग्रह सरस ठरला आहे. हा कथासंग्रह प्रेरक व वास्तव लक्ष्यी आहे ."ताडम" हा माधव सरकुंडे यांचा दुसरा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातून आदिवासींच्या कष्टमयी जीवन, पाटील, सावकार यांच्याकडून त्यांचे केले जाणारे शोषण, शिक्षणाचे महत्त्व चित्रित केले आहे. वरील सर्व कथासंग्रह आदिवासींच्या व्यथा वेदनांचे चित्रण करणारे आहे.

कथेप्रमाणेच कादंबरी या वाङ्मय प्रकारातून आदिवासींनी आदिवासींच्या जीवनावर कादंबरी लेखन केले आहे. त्यात प्रामुख्याने नजुबाई गावित यांची "तृष्णा" ही आत्मवृत्तपर कादंबरी आहे. स्वतःच्या अस्तित्व व अस्मितेचा शोध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीत केला आहे. या कादंबरीतून प्रकटलेले आदिवासींचे जीवन चित्रण वास्तवतेच्या पातळीवरील आहे. स्वतः भोगलेल्या दुःख यातनांचे चित्रण प्रामुख्याने या कादंबरीत आले आहे. आदिवासी जमातींच्या जीवनाचा एक महत्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज म्हणजे "तृष्णा" ही कादंबरी आहे. "वाडा" ही माधव सरुकुंडे यांची कादंबरी आहे तसेच "टाहो" ही बाबाराव म्हणावी यांची कादंबरी १९९८ साली प्रसिद्ध झाली. आदिवासींचा छळ, पिळवणूक, लूट, वेठबिगारी, अंधश्रद्धा या सार्‍यांचे चित्रंण या कादंबरीतून पहावयास मिळते. "टाहो" हे आदिवासींच्या आर्थिक, शारीरिक, सामाजिक अशा सर्व शोषणाचे आक्रंदन आहे. या कादंबरीत आदिवासी वर होणार्‍या अन्याय अत्याचाराचे जिवंत

चित्रण आले असून अत्यंत नाजूक धाग्यांनी चढत्या आलेखाने ते चितारले आहे.

मराठी आदिवासी साहित्यात आदिवासी आत्मकथन हा साहित्यप्रकार लेखकाने हाताळलेला आहे. खऱ्या अर्थाने आदिवासींच्या जीवनातील वेदना, पिळवणूक, समस्या, परिवर्तन अशा विविध घडामोडींचा वास्तव संदर्भ घेत आदिवासी आत्मकथनांचा मराठी आदिवासी क्षेत्रात उदय झाला. १९७० ते १९७५ या दोन दशकांच्या कालखंडात ब—याच प्रमाणात आत्मचरित्र लिहिले गेले. एकूणच आदिवासी जमातींच्या लेखकांनी जी मराठी आदिवासी आत्मकथन लिहिली आहेत त्यात प्रामुख्याने ''आदोर'' नजुबाई गावित, "आकांत" बाबाराव म्हणावी यांचे आत्मकथन होय. संतोष पवार यांचे "चोरटा" हे आत्मकथन आहे. आदिवासी पारधी समाजातील दैनंदिन जीवनातील एकूणच मानवतेला लाजवेल अशा पद्धतीचे त्यांना मिळणारे वर्तन यात लेखकाने मांडले आहे. गोपाळ गवारी यांची "कोळवाडा" ही आत्मकथनपर कादंबरी आहे. तसेच "उघडा दरवाजा" हे रामराजे आत्राम यांचे आत्मकथन होय. सामाजिक जीवनाला न्याय मिळावा यासाठी लेखकाने केलेले चित्रण या आत्मकथनात पहावयास मिळते.

आदिवासी साहित्य हे मराठीतील एक स्वतंत्र व परिवर्तनवादी साहित्य म्हणून उदयाला आले. आदिम जीवनातील समूह जीवनपद्धती, देव—देवता, मातृसत्ताक कुटुंबपद्धती, सामाजिकता, निसर्ग यांचा समावेश आदिवासी साहित्यात आला आहे. शिक्षणाच्या सर्वत्रिकीकरणामुळे समाजातील सर्व सामान्यांना ज्ञान प्राप्त झाले. त्यामुळे साहजिकच आपल्या समाजावर होणा—या अन्याय अत्याचारा बद्दल आदिवासी जागृत झाला आणि अनेक आदिवासी नवशिक्षित तरुणांना आत्मभान प्राप्त झाले व कथा,

कविता, कादंबरी, आत्मकथा या वांग्मय प्रकाराला आपल्या लेखणीचे माध्यम त्यांनी बनविले. साठच्या दशकानंतर ही संख्या वाढत गेली व पहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाने खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याचा युगप्रवास सुरू झाला. आदिवासी साहित्याच्या निर्मितीत प्रामुख्याने डॉ. गोविंद गारे, डॉ. विनायक तुमराम, डॉ माहेश्वरी गावित, उषाकिरण आत्राम, राजाराम आत्राम, भुजंग मेश्राम, वाहरू सोनावणे, बाबाराव मडावी, माधव सरकुंडे अशा अनेक साहित्यिकांनी आपल्या कलाकृती द्वारे भर टाकली.

आदिवासी साहित्य संमेलन आणि आदिवासींच्या वास्तव जीवनाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले. आदिवासींचे उपेक्षित जीवन सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम आदिवासींच्या स्वतंत्र विचारपीठाने केले आहे. "आदिवासी साहित्य हा काहींना "सवतासुभा" वाटत असला तरी अनेकांनी मात्र आप्तभावनेने त्याला स्वीकारले आहे. मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह म्हणून का होईना त्याला मान्यता देऊन विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्याचा समावेशही केला आहे. परंतु आदिवासी साहित्य कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिद्ध आहे ३".

**आदिवासी साहित्याची वाटचाल**

साठच्या दशकानंतर मराठी साहित्यक्षेत्रात आदिवासी साहित्याचा युगप्रवास सुरू झाला. स्वातंत्र्यपूर्व काळापासून मौखिक स्वरूपात अस्तित्वात असलेल्या आदिवासी साहित्याला स्वातंत्र्योत्तर काळात गती प्राप्त झाली. १९७० ते १९९० या दोन दशकांच्या कालखंडात आदिवासी साहित्याबद्दल विपुल प्रमाणात लेखन झाले. कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा यांच्या माध्यमातून आदींम जीवनाच्या व्यथा वेदनांचे वास्तव जीवनाचे

चित्रण केले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून आदिवासी साहित्य लेखनाचा प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण पोहोचले. स्वातंत्र्य, लोकशाही, शिक्षण याबद्दल नवशिक्षित तरुण जागृत झाला. त्याचाच परिणाम म्हणून मराठी साहित्यात १९६० ते १९८७ या कालखंडात अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये आदिवासी साहित्य हा एक महत्वाचा प्रकार उदयास आला. या साहित्यप्रवाहांनी स्वजमातीच्या व्यथा वेदना अन्याय अत्याचार आपल्या लेखणीद्वारे मांडण्यास सुरुवात केली. यातूनच पुढे विविध ठिकाणी सभा साहित्य संमेलने होऊ लागले त्यामुळे स्वजमातीवरील व्यथा वेदना मांडण्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ मिळाले.

त्याद्वारे आपल्या जीवनातील व्यथा वेदना चे दर्शन समाजासमोर ते घडवू लागले. आज मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे कार्य देखील या साहित्यप्रवाह यांनी केले. आदिवासी साहित्याच्या वाटचालीला प्रवाहातून होऊं लागली १९६० च्या दशकानंतर कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा इत्यादी लेखनाचा उदय झाला. साहित्य संमेलनाद्वारे आपल्या जीवनाची समाजाची शोकांतिका लेखक सांगू लागले. पहिले आदिवासी साहित्य संमेलन १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी रोजी भद्रावती जि. चंद्रपूर येथे कृष्णमूर्तीजी मिरमिरा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. येथूनच ख—या अर्थाने आदिवासी साहित्याचे जमातींचे एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण झाले. याद्वारे अनेक कवी, लेखक, साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक यांची ओळख साहित्य जगताला झाली. आदिवासी साहित्याच्या निर्मितीला एक नवी दिशा प्राप्त झाली व आदिवासी साहित्याचा युगप्रवास सुरु झाला. शेकडो वर्षापासून मौखिक स्वरूपात

असणाऱ्या या साहित्य प्रवाहाला स्वतःच्या हक्काचे व्यासपीठ मिळाले व साहित्य शब्दबद्ध होऊ लागले.

एकूणच आदिवासी साहित्याच्या वाटचालीचा आढावा घेतांना कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा, गौरवग्रंथ या वांड,मय प्रकाराची सुरुवात, स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांचा विकास, जडण–घडण, परंपरा लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. आदिवासी साहित्यातून आदिवासी समाज जीवनाचे दर्शन घडते. आदिवासी साहित्य हे मराठी साहित्यातील एक स्वतंत्र व स्वयंभू असे साहित्य म्हणून ओळखले जाते. आदिवासी साहित्यातील एकूणच वातावरण आदिवासी जीवनातील दुःखाचा शोध घेणारे, आदिवासी हुंकारांनी भडकलेले व अंधाराशी झगडणारे आहे. म्हणून आदिवासी साहित्य हे मराठी साहित्य क्षेत्रातील परिवर्तनवादी साहित्य म्हणून ओळखले जाते. या साहित्याने शेकडो वर्षापासून रानावनात बंदिस्त जीवन जगर्णाया दारिदय, शोषण, अन्याय अत्याचार, व्यथा, वेदना सहन करणाऱ्या आदिम बांधवांच्या जगण्याला एक नवी दिशा दिली. त्यामुळे या साहित्याचे महत्व मराठी साहित्यात अनन्यसाधारण आहे.

साठोत्तरी वांड,मय प्रवाहांच्या उदयानंतर मराठी साहित्य क्षेत्रात ज्या साहित्यप्रवाहांचा उदय झाला. त्या प्रवाहामध्ये आदिवासी साहित्य हा वेगळा प्रवाह मानला जातो कारण या साहित्याची वैशिष्ट्ये ही वेगळी आहेत. या साहित्याची वैशिष्ट्ये आदिम जीवनाशी नागरी शहरी आधुनिक जीवनापासून शेकडोमैल अरण्यात राहणाऱ्या आदिम जमातींचे वास्तव्य जीवन रेखाटणारी जाणवतात म्हणून साहित्य प्रवाहांचे महत्व मराठी साहित्य क्षेत्रात अनन्य साधारण आहे.

मराठी साहित्यात आदिवासी साहित्याची निर्मिती हीच आदिवासी साहित्याचे वेगळपण दर्शविणारी आहे. मराठी साहित्यात आदिवासी साहित्याने आपला ठसा उमटविला आहे व

मराठी साहित्याचे दालन समृद्ध बनविले आहे. कथा, कादंबरी, आत्मकथा, नाटक, कविता, चरित्र असे विविध वाङ्मयीन प्रकार आदिवासी साहित्यात निर्माण झाले आहेत. आदिवासी साहित्यात आदिवासी लेखकांनी आपल्या कलाकृतीद्वारे आदिम जीवनाच्या वाताहतीचे चित्रण केले आहे. स्वानुभवावर आधारित केलेल्या लेखनाला वास्तवतेचा संदर्भ आहे. यातून आदिवासी साहित्याचे वेगळेपण लक्षात येते.

पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून आदिवासी साहित्याचे वेगळपण नोंदवताना सुप्रसिद्ध आदिवासी कवी वाहरू सोनवणे म्हणतात, "आदिवासी दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. त्यांची उत्तरे सुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील. वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह वेगळा ठरतो."४ आदिम जीवनाचा संस्कृतीचा त्यांचा व्यथा वेदनेचा, ग्रह जीवनाचा आक्रोश हा या साहित्याचा केंद्रबिंदू आहे.

आदिवासी साहित्य हे मराठी साहित्याचे नव्हे तर विश्व साहित्याचे वैभवलेणे म्हणून मराठी साहित्यात नावारूपास आले. एकूणच आदिवासी साहित्याची वाटचाल व जडणघडण अभ्यासतांना मराठी साहित्यात साठोत्तरी वाङ्मय प्रवाहांचा उदय व विकास आदिवासी साहित्याची निर्मिती व वाटचाल, मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचे स्थान अधोरेखित करून त्यांचे वेगळेपण नोंदवले आहे.

मराठी साहित्याचे वैभवलेणे म्हणून म्हणून आदिवासी साहित्याचा गौरव केला जातो. मराठी वाड्मयातील एक नवीन प्रवाह म्हणून या साहित्याची ओळख आहे. आदिवासींना वैभव संपन्न समृद्ध अशी संस्कृती लाभलेली आहे. समाज व्यवस्थेपासून दूर कोठेतरी जंगल, पहाडात, द–याखो–यात त्यांच्या आयुष्याला एक नवा अर्थ प्राप्त झाला. अशा आदिमांचे हे

साहित्य आहे. शोषित आदिवासी मनाचा हुंकार प्रकट करणारे हे साहित्य आहे. आज शेकडो मैल दूर असलेल्या आदिवासी समाजाला आत्मभान अस्तित्व प्राप्त करून दिले. आदिवासी साहित्य हे १९६० नंतर उदयाला आले व १९७५ नंतर ते अधिकाधिक पुष्ट होत गेले. आदिवासी संमेलनामुळे या साहित्याला एक नवी दिशा मिळत असून आदिवासी साहित्य असे एक साहित्याचे नवे स्वतंत्र दालन निर्माण झाले आहे. ह्या साहित्याने भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात आपले मानाचे स्थान निश्चित केले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासींच्या समस्यांचा विचार होऊ लागला. त्यांच्या विकासासाठी प्रयत्न होऊ लागले. त्यांच्या कल्याणासाठी अनेक योजना, कार्यक्रम राबविण्यात आले. त्यांच्या विकासासाठी अनेक सोयी–सुविधा राज्यघटनेत करण्यात आल्या. मराठी साहित्यात आदिवासी साहित्य हा साहित्य प्रवाह अस्तित्वात आला व इथूनच ख–या अर्थाने आदिवासी साहित्य स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून ओळखला जाऊ लागला.

**संदर्भ ग्रंथ**


1. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, आदिवासी मराठी साहित्य : एक अभ्यास , स्वरूप प्रकाशन, सिडको, औरंगाबाद, १७ नोव्हेंबर २०१२, पृष्ठ क्र. १
2. डॉ. माहेश्वरी गावित, आदिवासी साहित्य : विविधांगी आयाम , पैठण गेट, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन, मार्च २०१५, पृष्ठ क्र. १४९.
3. डॉ. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, सिडको , औरंगाबाद, १५ नोव्हेंबर २०१२, पृष्ठ क्र. २२.


***

# भंडारा जिल्हयातील कोसा उदयोगधंदयातील विणकरांच्या विकासात शासकीय योजनांची भूमिका – एक अध्ययन

**डॉ. माधुरी एस. खोब्रागडे**

एस.एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया

कोसा हा कापडाचा प्रकार प्राचीन काळापासून जगप्रसिदध आहे. रामायण महाभारत. प्राचीन संस्कृत ग्रंथात रेशमाचा उल्लेख कौशिकंम (कोशावरणापासून तयार करण्यात आलेले) चीनाशुंक या नावानी केलेला आढळतो. रेशीम कापड हे अजूनही श्रीमंतीचे तसेच पोशाखाचे, सौंदर्य, सुबकपणा व आकर्षकता यांचे प्रतिक मानले जाते. मुलायम रेशमी वस्त्र रेशीम कोशा पासून तयार करतात.

भारतामध्ये टसर रेशीम उत्पादन मात्र वनावर आधारित उदयोग नसून एक पांरपारिक जनजातिय कार्य आहे. आज देशात व विदेशामध्ये सुध्दा टसर रेशीम कापडाची मागणी सतत वाढत असल्याने टसर रेशीम उत्पादनाने एक पांरपांरिक कार्यापासून उदयोगाचे रुप धारण केले आहे.

विदर्भातील प्रामुख्याने चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या चार जिल्हयात सुमारे २५०० वर्षापासून ढिवर जातीचे ३००० कुटूंबे वंश परंपरेने टसर कोष उत्पादन करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत. सन १९५९ -६० ते १७ /०२ /१९६७ पर्यंत

शासनाच्या उदयोग खात्यामार्फत व त्यानंतर टसर रेशीम उदयोग महाराष्ट राज्य खादी ग्रामोदयोग मंडळामार्फत राबविल्या जात होता.१९८३-८४ पासून विदर्भ विकास महामंडळ व दिनांक ९ सप्टेंबर १९९७ पासून रेशीम संचालनालय महाराष्ट शासन मार्फत 'टसर रेशीम विकास योजना 'राबविली जात आहे, जंगलात टसर कोष उत्पादन करणा-या लाभार्थ्यांकरीता वनसंवर्धन कायदा शिथील करण्यात आलेला आहे. हा उदयोग कमी भांडवलात होत असल्याने इतरही समाजातिल लोक सुशिक्षित बेरोजगार इ. या उदयोगाकडे वळत आहेत. जगामध्ये भारताचा टसर रेशीम उत्पादनात दुसरा क्रमांक आहे.

**Keyword : - विणकर , शासकीय योजना**

**संशोधन विषयाची निवड :-**

भंडारा जिल्हायातील कोसा हा अतिशय प्रसिध्द आहे . जिल्हायात कोसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. अनेक कुटूंबाच्या उपजिविकेचे साधन कोसा उदयोग आहे. मलबरी व टसरचे उत्पादन हे भंडारा जिल्हायामध्ये होते. त्यातही टसरचे उत्पादन हे मलबरीपेक्षा जास्त होते. जिल्हायात या उदयोगाची भरभराट कशाप्रकारे करता येईल व त्याद्वारे जिल्हयाचा आर्थिक उलाढाल करणारा प्रमुख व्यवसाय म्हणून तो कसा नावारुपाला येईल याचे सर्वतोपरी प्रयत्न सर्वस्तरावर सुरु आहेत. प्रस्तुत संशोधनाने या उदयोगास हातभार लागेल असे वाटते. संशोधनकर्तीचे वास्तव्य भंडारा जिल्हातील असल्यामुळे व कापडाविषयी सर्वकष उत्सुकता मनात असल्यामूळे संशोधनकर्तीने भंडारा जिल्हयातील टसर कोसा हा विषय निवडला.

अध्ययन केल्यावर असे लक्षात आले की, या उदयोगाला अतिशय वाव आहे. परंतु या उदयोगधंदयातील विणकराची परिस्थिती

अतिशय ढासळत चाललेली आहे. शासनसुध्दा अनेक योजना या उदयोगासाठी राबवित आहेत. परंतु या योजनांचा पुरेपुर फायदा विणकर घेताना दिसत नाही म्हणून या योजनांचा पुरेपुर फायदा विणकरांना घेता यावा व या योजनाद्वारे आपल्या उदयोगधंदयाचा विकास करावा यासाठी या विषयाची निवड कंलेली आहे.

**संशोधनाची उदिष्टे: -**

१) हातमागावर कोसा वस्त्राच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधी अभ्यास करणे.

२) कोसा उदयोगधंदातील विणकर वर्गाच्या समस्यांचा अभ्यास करणे .

३) उदयोगधंदयातील गुंतलेल्या विणकर वर्गाच्या समस्या निर्मुलनात शासकीय योजनांच्या सहभागाचे अध्ययन करणे .

४) या उदयोगधंदातील शासकीय योजनांचा अभ्यास करणे .

५) शासकीय योजनांच्या यशापयशाचा आढावा घेणे .

६) योजना आणि विणकर वर्गाच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्ये :-**

१) आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत हातमागावरील कोसा कापड निर्मितीत वेळ व श्रमाचा अपव्यय होतो.

२) कोसा उदयोगधंदयातील विणकरांच्या समस्या निर्मुलनात शासकीय योजनांची भूमिका उादासीन आहे.

३) कोसा उदयोगसमुहातील विणकर वर्गाला शासकीय योजनांची पर्याप्त माहिती नाही.

४) योजनेशी संबंधीत प्रशासकीय यंत्रणा व कोसा उदयोगातील विणकर यांच्यात संदेशवहन अंतर आहे.

**मर्यादा :-**

१) संशोधनाकरीता केवळ भंडारा जिल्हातील टसर कोसा उदयोगातील विणकरांचाच अभ्यास करण्यात आला.

२) या संशोधनासाठी पवनी, निष्ठी, एकोडी, बांम्पेवाडा, मोहाडी, आंधळगाव, गणेशपूर, दवडीपार (खापा) जमनी, देवरी(गोंदी) किटाळी, इंदोरा या सर्वच भौगोलिक क्षेत्राची निवड करण्यात आली.

३) विणकरांकरीता राबवित असलेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करण्यात आला.

४) एकूण १५० विणंकराची अभ्यासाकरीता निवड करण्यासत आली

**संदर्भसाहित्य :-**

**कॅप्टन . डॉ. एल.बी. कलंत्री यांच्या मते:-**

विदर्भातील नक्षलग्रस्त गडचिरोली, चंद्रपूर भंडारा व गोंदिया या चार जिल्हात ढिवर समाजाचे आदिवासी बंधू पांरपारिकरित्या पिढीजात टसर कोष उत्पादन कार्यात गुंतले आहे. दृश्य स्वरुपात तरी मेहनत, चिकाटी आणि जोखीमपूर्ण हे काम आदिवासी शेतकरी उत्कृष्टरित्या करुन राज्याची व देशाची टसर रेशीमची मागणी भागवत आहेत. उपजिवीकेचे साधन म्हणून धैर्याने या भागातील सर्व तरुण आदिवासी बांधवानी हा उदयोग स्विकारल्यास त्याची आर्थिक उन्नती होईल असे मत वस्त्रोउदयोग मंत्री सतिश चतुर्वेदी यांनी व्यक्त केले. राज्याच्या निधीतून व केंद्रशासनाच्या राष्टीय

समविकास योजनेतून टसर रेशीम विकासाकरीता आदिवासी शेतक-यापासून विणकरापर्यंत अनेक योजना आर्थिक पाठबळाने राबविल्या जातात.

**वामन तुरीले यांच्या मते :-**

टसर कोसा कोष उत्पादन निर्मिती करणारा भंडारा हा राज्यातील एकमेव जिल्हा आहे. या उदयोगाला वर्षानूवर्षाची पंरपरा आहे. जिल्हातील "डोंगरी" ताणीचा कोसा कापडाला ते खूप महाग असूनही भारतभर मागणी होती. जिल्हातील मागावर ताण्याकरीता लावलेला उभा पिळलेला कोसा धागा जगभर प्रसिध्द होता.पंरतु शासकीय यंत्रणेच्या विसंगत कार्यपध्दती मुळे हा उदयोग संपुष्टात येत आहे .

भंडारा जिल्हातील हलबा, गढेवाला, कोष्टी, ढिवर समाजाचा व साकोली तालुक्यातील एकोडी ,बांम्पेवाडा हया गावाचा कोसा उत्पादन व कापड निर्मिती हा खास पांरपारिक उदयोग होता. कोसा चरख्यावर काढून मांडीवर पिळ देवून मागावरील ताणा तयार करणे हे वैशिष्टे होते. कोष उत्पादन महाराष्टात पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या चार जिल्हात होते . कोसा कापड मात्र फक्त भंडारा जिल्हातच तयार होते . १९९७ ला विदर्भ विकास महामंडळ तसेच स्वतंत्र रेशीम संचालयाद्वारे या उदयोगाला उर्जितावस्थेत आणण्याचा प्रयत्न झाला. मागील काही वर्षापासून या धंदयातील शेतक-यांना प्रशिक्षण देणे, अंडी सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देणे याकरीता वनक्षेत्र मिळवून देणे व उत्पादित कोष हमीभावात खरेदी करणे इ. गोष्टी होत आहेत .

**डॉ.चंद्रशेखर हिवरे यांच्या मते :-**

पारंपारिक शेतीसोबत टसर (रेशीम) शेती शेतक-यासाठी महत्वाची असून भूमिहिन शेतमजूर देखील टसर शेतीपासून आपला आर्थिक विकास करु शकतात. बुनियादी टसर बीज प्रगुणन एवं प्रशिक्षण केंद्र भंडारा व ग्रांमपंचायत किटाडीच्यावतीने किटाडी येथे आयोजित टसर शेतकरी मेळाव्यात रेशम निर्देशालय नागपूरचे निर्देशक डॉ. चंद्रशेखर हिवरे यांनी मेळाव्याचे उद्‌घाटन करुंन वरील विचार व्यक्त केले.

डॉ. चंद्रशेखर हिवरे पुढे म्हणाले की, रेशम संचालनातर्फे टसर उत्पादकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत आहे. लोकांनी टसर व्यवसायासाठी पुढे येऊन आपला आर्थिक विकास साध्य करावा.

**पुरुषोत्तम डोमळे यांच्या मते :-**

शासनाच्या उदासिन धोरणामुळे हातमाग व्यवसाय मोडकळीस आला आहे. भंडारा जिल्हात सानगडी, पवनी, तुमसर, मोहाडी, आंधळगाव यागावी सर्वाधिक हातमाग विणकर होते. प्राचीन काळी ही गावे कापडासाठी प्रसिध्द होती, कच्चा माल पुरवठा करणा-या संस्था होत्या . मात्र आता त्याही बंद पडल्या आहेत. परिणामत: विणकरांनी आपले मांगठे बंद करुन कुटूबांच्या निर्वाहासाठी खाजगी मजुरीच्या कामाला लागले असल्याने नेहमीच सुरु असलेली मांगठयाची फटक - फटक कायमची बंद झाली आहे .

शासनाने १ एप्रिल २००० पासून दिनदयाल हातमाग प्रोत्साहन योजना वस्त्रउदयोग विभागाकडून सुरु केली होती. परंतु नियोजना अभावी आणि पदाधिका-याच्या दुर्लक्षामुळे योजना

कायमची बंद पडली. शासनाच्या उदासिन धोरणामुळे हातमाग उदयोग बंद पडला आहे. विणकरांना प्रोत्साहन देऊन नव्याने हा व्यवसाय पुर्नजिवीत करण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षापासून हातमाग व्यवसायाला अवकळा येण्याची चिन्हे दिसताच या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी शासनाने हातमाग महामंडळाची स्थापना केली. हा व्यवसाय विदर्भात मोठयाप्रमाणत असल्यामुळे या महामंडळाचे अध्यक्षपद विदर्भाला देण्यात आले असून हातमाग व्यवसायात आमुलाग्र  बदल करण्याचा शासनाचा उदेदश होता. मात्र या व्यवसायाला बळकटी देण्याऐवजी तो पूर्णपणे बंद पडला आहे.

**प्रुल्ल लुंगे यांच्या मते :-**

बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राज्यात राबविल्या जाणा-या रेशीमविषयक अनेक योजनांचा प्रकल्प खर्च व अनुदान मर्यादेत भरीव वाढ केली आहे. शिवाय रेशीम उदयोगातील शेतकरी कामगार, पिक व संगोपन गृहासाठी विमा योजनाही मंजूर करण्यात आली आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनेक बाबीसाठी शेतक-यांना १०० टक्के अनुदान दिले जाणार आहे. शासनाने मंजूरी अध्यादेश जारी केल्याने शेतकरी रेशीम शेतीकडे वळण्याची शक्यता आहे.

**संशोधन पध्दती :-**

अध्ययनाकरीता भंडारा जिल्हातील मोहाडी, आंधळगाव, पवनी, निष्ठी, एकोडी, बांम्पेवाडा, गणेशपूर, दवडीपार (खापा), देवरी(गोंदी), किटाळी, इंदोरा, जमनी या सर्वच शासकीय व खाजगी कोसा उदयोग क्षेत्राची निवड  जनगणना पध्दतीने करण्यात आली. नमुना म्हणून  निवडलेल्या भंडारा जिल्हातील ठिकठिकाणी असलेल्या

सर्वच कोसा उदयोगक्षेत्रातील  विणंकराची एकक म्हणून निवड केली. एकूण १५० विणंकराची निवड ही जनगणना पध्दतीने करण्यात आली

भंडारा जिल्हामध्ये टसर कोशाचे राज्य व केंद्र शासनाचे कार्यालये आहेत. कार्यालयामध्ये प्रत्यक्ष जावून कोसा उदयोगक्षेत्राशी संबंधित माहिती घेंण्यात आली .

भंडारा जिल्हातील राज्य व केंद्र शासन कार्यालये खालील प्रमाणे आहेत

**कोसा उदयोगधंदा हा सहा टप्पामध्ये मोडते**

१) कोसा अंडीपुंज निर्माण करणरा अंडीपुंज वर्ग

२) झाड उत्पादक करणारा शेतकरी वर्ग

३) धागा निर्मिती करणारा वर्ग

४) विणकाम करणारा विणकर वर्

५) वस्त्र रंगाई करणारा वर्ग

६) विक्री करणारा व्यापारी वर्ग

या सहा टप्पाशिवाय कोसा उदयोगधंदा पूर्ण होवू शकत नाही. पण या संशोधनासाठी फक्त  विणकाम करणारा विणकर वर्गाचा व त्यातील नमुन्याचा अभ्यास करण्यात आला.

**तथ्य संकलन पध्दती :-**

हे अध्ययन निरीक्षणात्मक, संशोधनात्मक व विश्लेषणात्मक प्रकारातील आहे. म्हणून माहिती संकलनाकरीता प्राथमिक तथ्य संकलन पध्दती व दुय्यम तथ्य संकलन पध्दती या दोन्ही पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

या शोधकार्याकरीता नमुना म्हणून निवडण्यात आलेले एकक निरक्षर किंवा कमी शिकलेले, स्वत: प्रश्नावली भरु न शकणारे स्वता:च्या कामात व्यस्त असण्याची शक्यता लक्षात घेऊन अनुसूची

पध्दत व मुलाखत पध्दती निवडली. तसेच काही बाबतीत निरीक्षण करण्याची आवश्यकता आहे असे लक्षात आल्याने निरीक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला प्राप्त माहिती मध्ये एकरुपता येण्याकरीता संरचित मुलाखत पध्दतीचा उपयोग करण्यात आला. यामध्ये लिखीत अनुसूची तयार करण्यात आली व प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान भरण्यात आली.

संकलित तथ्यांचे प्रामाण्यसिध्द करण्याकरीता सांख्यिकीय पध्दतीची निवड करण्यात आली. भंडारा जिल्हातील कोसा उदयोगधंदयातील विणकर आणि उदयोगधंदयाशी संबंधित शासकीय योजनांची माहिती गोळा करण्यासत आली. ही माहिती आकडेवारीत प्रस्तुत करण्यासाठी प्रतिशत प्रमाणाचा उपयोग करण्यात आला.

कोसा उदयोगधंदयातील विणकरांच्या विकासात शासकीय योजनाची भूमिका आहे किंवा नाही ते तपासून बघण्यासाठी “Paired t Test चा उपयोग करण्यात आला.

**परिणाम व चर्चा**

**सारणी क्र. १**

शासकीय योजनांच्या अस्तित्वाबाबद असलेली माहिती

| अस्तित्व | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र.शेकडा |
| होय | ६८ | ४५.३३ % |
| नाही | ८२ | ५४.६६ % |
| एकूण | १५० | १०० % |

उपरोक्त दिलेल्या सारणीवरुन असे निदर्शनात येते की , ४५.३३ % विणकरांना शासकीय योजनांची माहिती आहे तर ५४.६६ % कोसा वस्त्र विणकरांना शासकीय योजनांची माहिती नाही.
यावरुन सर्वाधिक ५४.६६% कोसा वस्त्र विणकरांना शासकीय योंजनांची माहिती नाही असे दिसून येते.

**सारणी क्र. २**

लुम (यंत्र) खरेदी करीता आर्थिक सहाय्याचा प्रकार

| प्रकार | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र. श |
| खाजगी सहभाग | ८३ | ६५.३५ % |
| शासकीय योजना | ४४ | ३४.६४ % |
| एकूण | १२७ | १००% |

वरील दिलेल्या आकडेवारी नुसार असे दिसून येते की ६५.३५%विणकरांनी खाजगी आर्थिक सहाय्यादवारे लुमसाम्रुगी घेतले तर ३४.६४% शासकीय योतनादंवारें आर्थिक सहायय् विणंकरानी घेतलें टसर हातमागाकरीता न्युमॅटिक लिफटींग (२ लुम्स) व न्युमॅटिक लिफटींग या योजनेनुसार लाभार्थ्यांनां लुम देण्यात येते. या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी, बचत गट, महिला बचत गट यांना लाभ देण्यात येते. यामध्ये ५०% केंद्रिय हिस्सा, २५% राज्य हिस्सा आणि २५% लाभार्थी हिस्सा असतो.

थोडक्यात लुम खरेदी साठी विणकरांनी सर्वात जास्त ६५.३५%खाजगी सहभाग घेतला असे दिसून येते. त्यांच्याजवळ असलेले लुम(यंत्र) सामुग्री वैयक्तिक मालमत्तेची तसेच पिढीजात मालकीची असलेली दिसून येते .

**सारणी क्र. ३**

लुम मधील प्रकार

| प्रकार | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र.श |
| प्राचीन | ८६ | ५७.३३% |
| डॉबी | १६ | १०.६६% |
| जॅकार्ड | १३ | ०८.६६% |
| डॉबी,जॅकार्ड | ३५ | २३.३३% |
| पॉवर लूम | --- | --- |
| एकूण | १५० | १००% |

वरील दिलेल्या माहितीवरुन असें दिसून येते की ५७.३३% विणकरांजवळ प्राचीन, १०.६६% विणकरांच्या लुममध्ये डॉबी, ८.६६% विणकरंच्या लुममध्ये जॅकार्ड तर २३.३३% विणकरांच्या लुममध्ये डॉबी व जॅकार्ड आहेत .

यावरुन हे दिसून येते की जास्त ५७.३३% विणकरांजवळ प्राचीन लुमचाच प्रकार आहे.

**सारणी क्र. ४**

शासकीय योजनेदवारे डॉबी,जॅकार्ड यंत्रसामुग्रीची उपलब्धता

| उपलब्धता | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र. श |
| होय | ४९ | ७२.०५% |
| नाही | १९ | २७.९४% |
| एकूण | ६८ | १००% |

वरील दिलेल्या सारणी वरुन असे दिसून येते की ७२.०५%विणकरांना डॉबी, जॅकार्ड घेण्यासाठी शासकीय योजना मिळाली तर २७.९४% विणकरांना शासकीय योजनेचा लाभ झाला नाही.

यावरुन ७२.०५% विणकरांना डॉबी, जॅकार्ड घेण्यासाठी शासकीय योजनेचा लाभ झाला पण त्यापाठोपाठच बहुतांश विणकरांना शासकीय योजनेचा लाभ डॉबी, जॅकार्ड घेण्यासाठी झालेला नाही असे दिसून येते.

**सारणी क्र. ५**

प्रशिक्षणाची सोय

| तपासणी | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र. श |
| होय | ६८ | १००% |
| नाही | --- | --- |
| एकूण | ६८ | १००% |

वरील दिलेल्या सारणीवरुन असे लक्षात येते की १००% कोसा वस्त्र विणकरांच्या मते शासकीय योजना मिळाल्यानंतर त्यांना रेशीम उदयोग कार्यालया द्वारे प्रशिक्ष्णाची व्यवस्था करुन दिली जाते.

**सारणी क्र. ६**

प्राचीन पध्दतीने व डॉबी,जॅकार्ड मूळे एका दिवसात विणण्यात येणारे कापड

| | | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|

| प्राचिन पध्दत | विणलेले कापड (मिटर) | संख्या | प्र. श |
|---|---|---|---|
| | १-३ (मिटर ) | १३ | १९.११% |
| | ३-५ (मिटर) | ५५ | ८०.८८% |
| | एकूण | ६८ | १००% |
| डॉबी जॅकार्ड | ५ – ७ (मिटर) | ६० | ८८.२३% |
| | ७ –९ (मिटर ) | ८ | ११.७६% |
| | एकूण | ६८ | १००% |

वरील दिलेल्या सारणी वरुन असे निदर्शनास येते,की १९.११% विणकर १- ३ मिटर, ८०.८८% विणकर ३-५ मीटर कापड प्राचीन पध्दतीने एका दिवसात तर ८८.२३% विणकर ५ – ७ मीटर ,११.७६% विणकर ७ -९ मीटर कापड शासकीय योजनेद्वारे मिळालेल्या डॉबी, जॅकार्ड मुळे एका दिवसात विणतात.

यावरुन असे निदर्शनात येते की सर्वात जास्त ८०.८८% विणकर हे प्राचीन पध्दतीने एका दिवसात जास्तीतजास्त ३-५ मिटर कापड विणतात तर शासकीय योजनेद्वारे मिळालेल्या डॉबी, जॅकार्डमुळे एका दिवसात जास्तीतजास्त ८८.२३% विणकर ५ – ७ मीटर कापड विणतात.

**सांख्यिकीय विश्लेषण**

| | सरासरी विणलेले कापड | S.D | ‘ t’ value |
|---|---|---|---|
| अगोदरचे विणलेले | ३.५७ | ०.०६७ | २४.५९** |

| | | | |
|---|---|---|---|
| कापड | | | |
| नंतरचे विणलेले कापड | ६.४० | ०.१२३ | |

विणकरांनी पारंपारीक पध्दतीने एका दिवसात विणलेले कापड तसेच शासकीय योजनेदवारे मिळालेल्या डॉबी, जॅकार्डमुळे एका दिवसात विणण्यात येणारे कापड यामध्ये फरक पडला का हे पाहण्यासाठी pair – t Test या सांख्यिकीय चाचणीचा उपयोग केला

वरील सांख्यिकीय विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, विणकरांनी प्राचीन पध्दतीने विणलेले कापड एका दिवसातील अगोदरचे कापड ३.५७ तर शासकीय योजना मिळाल्यानंतरचे एका दिवसातील विणलेले सरासरी कापड ६.४० होते. या दोन्हीची तुलना केली असता दोन्ही विणलेल्या कापडात (०.०५ सार्थकता स्तरावर व ०.०१ सार्थकता स्तरावर) फरक जाणवतो

**सारणी क्र. ७**

समस्या निर्मुलन

| समस्या | प्रतिसादक संख्या व प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | प्र.श |
| आर्थिक | ११ | १६.१७% |
| स्वास्थविषयक | ११ | १६.१७% |
| मानसिक | ०४ | ०५.८८% |
| सामाजिक | ०६ | ०८.८२% |
| वरील सर्व | ०७ | १०.२९% |

| | | |
|---|---|---|
| कोणत्याच नाही | २९ | ४२.६४% |
| एकूण | ६८ | १००% |

वरील दिलेल्या माहितीवरुन असे निदर्शनात येते की १६.१७% विणकरांच्या आर्थिक, १६.१७% विणकरांच्या स्वास्थ विषयक, ५.८८% विणकरांच्या मानसिक, ८.८२% विणकरांच्या सामाजिक, १०.२९% विणकरांच्या आर्थिक, स्वास्थविषयक, मानसिक आणि सामाजिक अशा सर्वच समस्या सुटल्या आहेत तर ४२.६४% विणकरांच्या शासकीय योजनेमुळे कोणत्याच समस्या सुटलेल्या नाही. यावरुन असे लक्षात येते की सर्वात जास्त ४२.६४% विणकरांच्या कोणत्याच समस्याचे निर्मुलन शासकीय योजनेमुळे झाले नाही.

**निष्कर्ष :-** या संशोधनात्मक अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष हे पुढीलप्रमाणे :-

कोसा कापड निर्मितीसाठी आजही १०० प्रतिशत कोसा वस्त्र विणकर हस्तकरघा यंत्राचाच (प्राचिन लुमचाच) वापर करतात. विणकरांसाठी असलेल्या शासकीय योजनांची पर्याप्त् माहिती विणकरांना नसल्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त विणकरांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला नाही. ज्या विणकरांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला त्यांना डॉबी, जॅकार्ड ही साधनसामुग्री शासकीय योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आली. पांरपारीक पध्दतीने विणकर ३ –५ मीटर कापड एका दिवसात विणतात तर डॉबी, जॅकार्ड मुळे ५ – ७ मीटर कापड एका दिवसात विणल्या जाते. म्हणजेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत हातमागावरील कोसा कापड निर्मितीत वेळ व श्रमाचा अपव्यय होतो हे सिध्द होते. कोसा वस्त्र विणकरांच्या समस्या निर्मुलनार्थ असलेल्या शासकीय योजना ह्या अर्ध्यापेक्षा जास्त विणकरांना असमाधानी वाटतात. शासकीय योजनाचा लाभ घेतल्यानंतरही विणकरांच्या पुष्कळशा समस्या सुटलेल्या नाही.

यावरुन कोसा उदयोगधंदातील संबधित कामगारांच्यासमस्या निर्मुलनात शासकीय योजनांची भुमिका उदासिन आहे हे सिध्द होते.

शासकीय योजना मिळाल्यानंतर त्यांना रेशीम उदयोग कार्यालयाद्वारे प्रशिक्षणाची व्यवस्था करुन दिली जाते यावरुन योजनेशी संबधित प्रशासकीय यंत्रणा व कोसा उदयोगातील विणकर यांच्यात संदेशवहन अंतर असल्यामुळे विणकर सकारात्मक प्रतिसाद देत नाहित हे चुकीचे ठरते.

**संदर्भसूची :-**


१) मराठी विश्वकोष खंड १५(१९९५) लक्ष्मणशास्त्री जोशी- रेल्वे ते वादय व वादय वर्गिकरण .

२) टसर रेशीम उदयोगाचे तंत्र व मंत्र - ल.भि.कलंत्री - अधिकारराव जाधव जनसंपर्क व प्रसिध्दी अधिकारी , रेशीम संचालनालय नागपूर .

३) संचालक रेशीम संचालनालय - टसर रेशीम उदयोग कापड , विणकामाची अदयावत तांत्रिक पध्दती व टसर कताई .

४) सामाजिक संशोधनपध्दती - डॉ पु. ल. भांडारकर - श्री अ.अ .कुलकर्णी नियंत्रक, प्रकाशन समिती , महाराष्ट विदयापिठ ग्रंथनिर्मिती मंडळ , नागपूर.

५) भंडारा / गोंदिया जिल्हा विशेष - वर्षा राऊत - मृणाल प्रकाशन .

६) टसर रेशीम उदयोग - संचालक , रेशीम संचालनालय महाराष्ट शासन , नागपूर .

७) वस्त्रशास्त्र – विमल अढाऊ - वसंत पिंपळापुरे, महाराष्ट विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ औरंगाबाद .


***

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि किमान आधारभूत किमतीला कायद्याच्या आधाराची गरज

डॉ. सुरेश एकनाथ घुमटकर

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड

डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्रीमती सु रा मोहता

**प्रस्तावना:**

कृषी उत्पादनांच्या लागवडीपूर्वी पिकांच्या ज्या किंमतीची हमी सरकारद्वारे शेतकऱ्यांना जाहीर केली जाते त्या किमतीस किमान आधारभूत किंमत असे म्हणतात. थोडक्यात ज्या किमतीस शेतकऱ्यांकडून कृषी उत्पादन सरकार स्वतः खरेदी करण्यास तयार असते अशा किमतीस किमान आधारभूत किंमत असे म्हणतात.

कृषीचे उत्पादन जसे निसर्गावर अवलंबून असते तसेच ते बाजारात कृषी उत्पादनाच्या किमतीतील चढ-उतार यावर अवलंबून असते. निसर्गाने चांगली साथ दिली तर उत्पादन अधिक होते. त्यातून या वस्तूंचा पुरवठा एका विशिष्ट काळात म्हणजे हंगामाच्या काळात खूप जास्त वाढतो व बाजारातील या वस्तूंच्या किमती कमी होतात. किमती कमी झाल्याने उत्पादन वाढ होऊनही भारतीय शेतकऱ्यांना उत्पन्न कमी मिळते. त्याचा परिणाम म्हणजे, शेतकरी दुसऱ्या वर्षी अशा धान्यांचे उत्पादन करण्याचे टाळतात. त्यामुळे, दुसऱ्या वर्षी अन्नधान्याचे उत्पादन कमी झाल्यास त्याच्या किमती वाढतात. कृषी

उत्पादने ही आवश्यक गरजांमध्ये समाविष्ट असल्याने किंमत वाढीचा दूरगामी परिणाम समाजावर होतो. ज्या देशात दारिद्र्याचे प्रमाण अधिक असून बळीचे प्रमाण अधिक आहे. भारताच्या तात्कालीन 2019-20 वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात विशद केल्यानुसार बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण 36.9 टक्के असताना कमी कृषी उत्पादनामुळे या समस्येत अधिक वाढ होते व ते थांबविण्यासाठी परदेशातून कृषी उत्पादनांची आयात करावी लागल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची पत खालावते. कारण आवश्यक वस्तूंच्या उपभोगासाठी जर देशाला इतर देशांवर अवलंबून राहावे लागत असल्यास देशाच्या सार्वभौमत्वावर संकट येण्याची भीती असते.

**संशोधनाची उद्दिष्टे व पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करून मांडणी केलेली आहे. दुय्यम माहितीच्या आधारावर अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासाचा प्रमुख उद्देश म्हणजे भारतातील किमान आधारभूत किमतीची वास्तविकता जाणून घेऊन आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये किमान आधारभूत किमतीची आवश्यकता आणि त्यासाठी कायद्याच्या आधाराची गरज आहे की नाही याचा अभ्यास करणे होय.

**किंमत स्थिरतेसाठी किमान आधारभूत किमतीची गरज:**

अर्थव्यवस्थेत आर्थिक स्थिरता प्रस्थापित करणे हे प्रत्येक देशाच्या राजकोषीय आणि मौद्रिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. आर्थिक स्थिरतेचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे किंमत स्थैर्य निर्माण करणे होय. कृषी उत्पादने तुलनेने अधिक नाशवंत असल्याने त्यांच्या किमती मध्ये उत्पादनातील कमी जास्त प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणावर चढउतार होतात. अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार, “भाववाढ किंवा भावघट दोन्ही अर्थव्यवस्थेच्या चांगल्या आरोग्यासाठी हानिकारक असतात.” हे

सर्व टाळण्यासाठी आणि कृषी उत्पादन वाढीस चालना देण्यासाठी सरकार दरवर्षी पिकांच्या लागवडीपूर्वी काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमत जाहीर करीत असते.

याचा अर्थ असा आहे की, शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाला जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमती पेक्षा बाजारात अधिक किंमत मिळत असेल तर शेतकरी त्यांचा माल खुल्या बाजारात विकू शकतो. परंतु जर बाजारातील भाव हा किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी असेल तर सरकारला शेतकऱ्यांकडून त्याचे उत्पादन हमी दिलेल्या किमान आधारभूत किमतीला विकत घ्यावे लागते. किमान आधारभूत किमतीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाच्या किमतीची एक निश्चित हमी मिळते व त्यामुळे अशा अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

**कृषी खर्च व मूल्य आयोग आणि किंमत निश्चिती:**

भारतात 1965 मध्ये कृषिमालाच्या योग्य किमती ठरविण्यासाठी कृषी मूल्य आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाचे नाव 1985 पासून "कृषी खर्च व मूल्य आयोग" असे करण्यात आले. भारतातील उत्पादित होणाऱ्या शेतमालाच्या किंमतीबाबत सल्ला देण्याचे प्रमुख कार्य या आयोगाद्वारे पार पाडले जाते. जेव्हा शेतमालाच्या किमती बाजारात किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी होतात तेंव्हा हमीभावावर शेतमाल शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याची जबाबदारी नाफेड या संस्थेकडे आहे. कृषी उत्पादनाच्या बाबतीत विशेषतः अन्नधान्य, डाळी, तेलबिया, कापूस, ताग, ऊस, खोबरे, इत्यादी संदर्भात मागणी आणि उत्पादन या दोहोंमध्ये मागणीही सतत म्हणजे वर्षभर होत असते. तर, उत्पादन मात्र एका विशिष्ट वेळीच होते. जेव्हा उत्पादन होते तेव्हा बाजारातील ग्राहकांच्या मागणीपेक्षा पुरवठा खूप अधिक प्रमाणात वाढतो. त्यामुळे किंमत निश्चिती च्या नियमानुसार किमती कमी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. हे

टाळण्यासाठी शेतकऱ्यांना निश्चित किमतीची हमी किमान आधारभूत किमतीत मिळत असल्याने उत्पादनातून निश्चित उत्पन्न मिळण्याची हमी शेतकऱ्यांना मिळते. कृषी खर्च व मूल्य आयोग दरवर्षी किमान आधारभूत किमती निश्चित करून त्याची शिफारस केंद्र सरकारला करते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारद्वारे दरवर्षी पेरणीपूर्वी एकूण 22 पिकांच्या किमान आधारभूत किमती जाहीर केल्या जातात. किंमत ठरवीत असताना आयोगाद्वारे कृषी उत्पादनाचा उत्पादन खर्च, साधनांच्या किमतीतील बदल, श्रमिकांचा खर्च, जमिनीवरील खंड, बी-बियाणं वरील खर्च, खतांवरील खर्च, सिंचन खर्च, मशनरीचा खर्च आणि त्यांचा घसारा, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी केलेल्या श्रमाचा मोबदला इत्यादी खर्चाचा विचार करून सर्व खर्च भरुन निघावा या दृष्टिकोनातून किमान आधारभूत किंमत सरकारद्वारे जाहीर केली जाते. याला A2+FL खर्चावर आधारित किमान आधारभूत किंमत असे म्हणतात.

तक्ता क्रमांक 1

किमान आधारभूत किंमत (रुपये प्रति क्विंटल)

| पिके | २००९-१० | २०१३-१४ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|
| खरीप पिके | | | | | | |
| भात सर्वसाधारण | १००० | १३१० | १५५० | १७५० | १८१५ | १८६८ |
| भात ग्रेड अ | १०३० | १३४५ | १५९० | १७७० | १८३५, | १८८८ |
| ज्वारी हायब्रीड | ८४० | १५०० | १७०० | २४३० | २५५० | २६२० |
| ज्वारी मालदाणी | ८६० | १५२० | १७२५ | २४५०, | २५७० | २६४० |
| बाजरी | ८४० | १२५० | १४२५ | १९५० | २००० | २१५० |
| नाचणी | ९१५ | १५०० | १९०० | २८९७ | ३१५० | ३२९५ |
| मका | ८४० | १३१० | १४२५ | १७०० | १७६० | १८५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तूर | २३०० | ४३०० | ५४५० | ५६७५, | ५८०० | ६००० |
| मुंग | २७६० | ४५०० | ५५७५ | ६९७५ | ७०५० | ७१९६ |
| ऊडिद | २५२० | ४३०० | ५४०० | ५६०० | ५७०० | ६००० |
| शेंगदाणे | २१०० | ४००० | ४४५० | ४८९० | ५०९० | ५२७५ |
| सुर्यफुल बी | २२१५ | ३७०० | ४१०० | ५३८८ | ५६५०, | ५८८५ |
| सोयाबीन काळी | १३५० | २५०० | ३०५० | - | - | - |
| सोयाबीन पिवळी | १३९० | २५६० | | ३३९९ | ३७१० | ३८८० |
| तिळ | २८५० | ४५०० | ५३०० | ६२४९ | ६४८५ | ६८५५ |
| नायजर बियाणे | २४०५ | ३५०० | ४०५० | ५८७७, | ५९४० | ६६९५ |
| कापूस मध्यम धागा | २५०० | ३७०० | ४०२० | ५१५० | ५२५५, | ५५१५ |
| कापूस लांब धागा | ३००० | ४००० | ४३२० | ५४५० | ५५५० | ५८२५ |
| रब्बी पिके | | | | | | |
| गहू | ११०० | १४०० | १७३५ | १८४० | १९२५ | १९७५ |
| सातू | ७५० | ११०० | १४१० | १४४० | १५२५ | १६०० |
| हरभरा | १७६० | ३१०० | ४४०० | ४६२० | ४८७५, | ५१०० |
| मसूर | १८७० | २९५० | ४२५० | ४४७५ | ४८०० | ५१०० |
| मोहरी | १८३० | ३०५० | ४००० | ४२०० | ४४२५ | ४६५० |
| सुर्यफुल बी | १६८० | ३००० | ४१०० | ४९४५ | ५२१५ | ५३२७ |
| व्यापारी पिके | | | | | | |
| ताग | १५७५ | २४०० | ३७०० | ३७०० | ३९५० | ४२२५ |
| ऊस | १३९.१२ | २२० | | | | |
| खोबरे-मिलींग | ४४५० | ५२५० | ७५०० | ७५११ | ९५२१ | ९९६० |
| खोबरे गोल | ४७०० | ५५०० | ७७५० | ७७५० | ९९२० | १०३०० |

स्त्रोत: कृषी खर्च आणि मूल्य आयोग

आयोगाद्वारे प्रामुख्याने पाच वस्तू समूहांच्या किमान आधारभूत किमतीची शिफारस केली जाते. त्याचे वर्गीकरण- खरीप पिके, रब्बी पिके, ऊस, कच्चे ताग आणि खोबरे असे आहे. किंमत निश्चिती संदर्भात सर्वे केल्यानंतर राज्य सरकार, भारतीय अन्न महामंडळ, भारतीय राष्ट्रीय कृषि सहकारी विपणन महामंडळ, भारतीय कापूस महामंडळ, भारतीय ताग महामंडळ, व्यापारी संघटना, प्रक्रिया संघटना आणि महत्त्वाची मंत्रालयांच्या सोबत मीटिंग घेऊन किंमत निश्चितीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. या संदर्भातील शेवटचा निर्णय द कॅबिनेट समित्ती ओन इकॉनोमिक अफेअरस द्वारे घेतला जातो.

**किमान आधारभूत किंमतीस कायद्याचे संरक्षण:**

ऊस आणि कच्चा तागाच्या किमान आधारभूत किंमतीस कायद्याचे संरक्षण आहे. म्हणजे, भारतात खाजगी साखर कारखानदारांना उसाची खरेदी किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीत करता येत नाही. कमी किमतीने ऊस खरेदी केल्यास साखर कारखानदारांवर कायदेशीर कार्यवाही होते.

भारतात इतर कृषी वस्तूंच्या आधारभूत किमतीस कायदेशीर दर्जा द्यावा यासाठी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यासाठी 2020-21 मध्ये वर्षभरापेक्षा अधिक काळापर्यंत भारतीय शेतकऱ्यांनी आंदोलन केले. यासोबत शेतकऱ्यांची अशी मागणी आहे की, कृषीमध्ये उत्पादित होणाऱ्या प्रत्येक पिकास किमान आधारभूत किमतीचे संरक्षण मिळावे. असे झाल्यास कृषी उत्पादनांच्या किमतीत होणारे चढ-उतार थांबतील व आवश्यक वस्तूंच्या किमतीत स्थिरता येण्यास मदत होऊन शेतकऱ्यांना उत्पादन वाढीस चालना मिळेल.

या सर्वांवर उपाय करण्याऐवजी भारतातील तत्कालीन सरकारने “कृषी उत्पादनाचा व्यापार आणि वाणिज्य कायदा-2020”

आणले. यासंदर्भात सरकारद्वारे असे मत व्यक्त केले गेले की, शेतकरी खासगी कंपनीच्या लोकांसोबत कृषी उत्पादनाच्या किमती ठरवून करारानुसार त्यांना कृषिमाल विकेल व त्यास शाश्वत उत्पन्नाचा आधार मिळेल. परंतु करार शेतीच्या माध्यमातून उत्पादन विक्री खुल्या बाजारात करण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना राहणार नाही. तसेच बाजारात किमती कमी झाल्या तर अधिक ठरलेल्या किमतीवर खाजगी कंपनी मालक शेतकऱ्यांकडून वस्तू खरेदी करणार नाहीत. अशी वास्तविक भीती यासंदर्भात भारतीय शेतकऱ्यांना आहे. त्याचे कारण म्हणजे, यापूर्वीही करार शेतीतून शेतकऱ्यांसोबत असलेला अनुभव योग्य नाही, धोका झाल्याचा आहे.

**सरकारद्वारे शेतकऱ्यांची दिशाभूल:**

किमान आधारभूत किमतीचा फायदा केवळ 6 टक्के भारतीय शेतकऱ्यांना होतो अशी किमान आधारभूत किमतीवर टीका करून तात्कालीन सरकारने शेतकऱ्यांच्या "कृषी उत्पादनाचा व्यापार आणि वाणिज्य कायदा-2020" केला. भारतीय अन्न महामंडळ पुनर्रचना उच्चस्तरीय समितीचे प्रमुखांनी 2015 मध्ये सादर केलेल्या 2012-13 मधील माहितीवर आधारित एकूण 90.20 दशलक्ष शेतकऱ्यांपैकी किमान आधारभूत किमतीचा फायदा केवळ 5.1 दशलक्ष शेतकरीच घेऊ शकतात असे आपल्या अहवालात मांडले होते. या अहवालातील निष्कर्ष कसे चुकीच्या पद्धतीने काढून 6% शेतकऱ्यांनाच किमान आधारभूत किमतीचा फायदा झाला असे मानले याचे विस्तृत विवेचन इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.( संदर्भ-तक्ता क्रमांक 2)

तक्ता क्रमांक 2

क्रुषी उत्पादन आणि सरकारद्वारे करण्यात आलेली खरेदी ( दशलक्ष टन मधे २०१९-२०)

| पिक | उत्पादन | सरकारी खरेदी | सरकारी खरेदीचे उत्पादन प्रमाण % |
|---|---|---|---|
| तांदूळ | ११८.४३ | ५१. ३८ | ४३.३८ |
| गहू | १०७.५९ | ३८.९९ | २६.२४ |
| कापूस* | ३५४.५० | १०४.६2 | २९.५१ |
| हरभरा | ११.३५ | २.१० | १८.४७ |
| तूर | ३.४३ | ०.७२ | १८.८० |
| मूंग | २.४६ | ०.१४ | ५.६९ |
| मोहरी | ९.१२ | ०.८० | ८.७८ |
| शेंगदाणे | १०.१० | ०.७१ | ७.०९ |

*१७० किलोग्राम चे लाख गठ्ठे.

-स्त्रोत: भारतीय अन्न महामंडळ, नाफेड.

तक्ता क्रमांक 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, भारतातील कृषी उत्पादन आणि सरकारद्वारे किमान आधारभूत किमतीवर खरेदी करण्यात आलेल्या खरेदीचे प्रमाण दर्शवलेले आहे. सरकारद्वारे २०१९-२० या वर्षांमध्ये तांदळाची खरेदी त्याच्या एकूण उत्पादनाच्या ४३.३८ टक्के करण्यात आली होती. तर गव्हाची खरेदी २६.२४ टक्के करण्यात आलेली आहे. कापसाची खरेदी एकूण उत्पादनाच्या २९.५१ टक्के करण्यात आलेली आहे. तर हरभरा १८.४७ टक्के खरेदी करण्यात आला. अशा पद्धतीने सर्व

उत्पादनांची खरेदी ही ५.१ टक्क्यापेक्षा सर्वच उत्पादनांची खरेदी अधिक करण्यात आलेली आहे. याचा अर्थ सरकारद्वारे किमान आधारभूत किमतीविषयी करण्यात आलेले विवेचन हे आक्षेपार्ह ठरणारे आहे. ज्यातून शेतकरी आणि नागरिकांची दिशाभूल करणारे वक्तव्य होऊन भारतीय कृषीचा खऱ्या अर्थाने विकास करण्याचे उद्दिष्ट सरकारचे नाही हे लक्षात येते.

**सारांश:**

अधिक प्रमाणात कृषी उत्पादने अत्यावश्यक गरजांमध्ये येतात. कृषी उत्पादनाचे उत्पादन करण्यासाठी निश्चित कालावधी जावा लागतो. उद्योगाचे उत्पादन प्रत्येक कालावधीमध्ये वाढविणे शक्य होते परंतु तसेच कृषी उत्पादनाबाबत मात्र नाही. देशांमध्ये आर्थिक स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी किंमत स्थिरता निर्माण करणे अत्यावश्यक असते. त्यासाठी ग्राहकांना अत्यावश्यक वस्तू निश्चित किमतीत मिळतील अशी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असते तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याला अधिकाधिक उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून त्याच्या उत्पादनाला हमीभाव मिळेलच याची हमी देण्यासाठी सरकारने किमान आधारभूत किमतीची व्यवस्था निर्माण केली. ज्यातून बऱ्याच प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होत असला तरीही किमान आधारभूत किंमतीस कायद्याचा आधार नसल्यामुळे खाजगी व्यक्तीद्वारे किंवा व्यापाऱ्यांद्वारे कृषी उत्पादनाची खरेदी होत असताना किमान आधारभूत किमतीपेक्षाही कमी किंमतित कृषी उत्पादनाची खरेदी केली जाऊन शेतकऱ्यांचे शोषण होते. देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षे होत असताना भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी निश्चित असा हमीभाव आणि हमीभावास कायद्याचे पाठबळ मिळत नाही ही एक चिंताजनक बाब आहे. जर किमान आधारभूत किंमतीस कायद्याचा आधार दिला तर

खाजगी व्यक्तीने किंवा व्यापाऱ्यांनी किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीत शेतकऱ्यांकडून वस्तू खरेदी केल्यास व्यापाऱ्यावर अथवा खाजगी व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही होण्याची भीती असते. त्यातून शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत बाजारामध्ये शुद्ध उपलब्ध होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारू शकते तसेच अधिकाधिक उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.

**संदर्भ**:


1) http://164.100.47.193/Refinput/New_Reference_Notes/English/Minimum%20Support%20Price%20for%20Agricultural%20Produce.pdf
2) https://eands.dacnet.nic.in/PDF/MSP_July2018(English).pdf
3) https://eands.dacnet.nic.in/PDF/MSP%202021-22%20Eng.pdf
4) http://164.100.47.4/billstexts/lsbilltexts/asintroduced/533%20as.pdf
5) Explained: Why it's an underestimate to say only 6% farmers benefit from MSP | Explained News,The Indian Express.
6) https://thewire.in/agriculture/kisan-sansad-farmer-msp-swaminatha-commission
7) https://www.deccanchronicle.com/nation/in-other-news/090221/farmers-demand-a-law-on-msp-repeal-of-three-agriculture-marketing-law.html
8) https://egazette.nic.in/WriteReadData/2020/222039.pdf
9) डॉक्टर वसुधा पुरोहित (२०१६)"कृषी अर्थशास्त्र" विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.


***

# भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार

**प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे**

कला वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई. जिल्हा. बीड.४३१५१७.

**प्रस्तावना :**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील प्रगल्भ लोकशाही देशांमध्ये भारताचे नांव अग्रक्रमाने घेतले जात आहे. भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना भारतातील लोकशाही चे सिंहावलोकन करणे निश्चितच यथार्थ ठरेल. आपण स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षात लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करून काय कमावले आणि काय गमावले याचा अभ्यास केला तर पुढील पाऊले आपणास योग्य दिशेने टाकता येतील. लोकशाही मूल्ये आणि मानवाधिकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन बाबी एकमेकास पूरक आणि पोषक आहेत. लोकशाही शिवाय मानवाधिकार पूर्णपणे बहाल केले जाऊ शकत नाहीत आणि सर्वसामान्य जनतेला मानव अधिकार मिळाल्याशिवाय लोकशाहीला परिपूर्णता प्राप्त होऊ शकत नाही.

कोणत्याही विकसित देशाची किंवा सभ्य समाजाची ओळख त्या देशात तेथील नागरिकांना मिळणारे मानवाधिकार किती व्यापक प्रमाणात आहेत यावरून होते. म्हणून कोणत्याही शासन व्यवस्थेचे मानवाधिकार हे अभिन्न अंग आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत तर मानव अधिकारांचे महत्त्व आणखीनच वाढले आहे. साधारणतः

सन्मानाने माणूस म्हणून जगण्यासाठी जे जे अधिकार आवश्यक असतात ते सर्व अधिकार मानव अधिकारात समाविष्ट होतात. म्हणून व्यापक दृष्टीने विचार केल्यास नागरिकांना स्वतःची सर्वांगिन प्रगती घडून आणण्यासाठी आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास करण्यासाठी विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता असते. अशी विशिष्ट परिस्थिती निर्माण करण्यासाठीच त्याला काही अधिकार असणे आवश्यक असते. ठराविक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकार प्राप्त करून देणे ही एक समाजाची मूलभूत गरज असते. अशी परिस्थिती निर्माण करून देण्याची जबाबदारी शासन संस्थेवर येऊन पडते. व्यक्तीचा सर्वांगीण उत्कर्ष किंवा विकास, सुखी व उच्च जीवनमान जगण्याची व्यवस्था निर्माण केली आणि काही मूलभूत स्वरूपाचे अधिकार त्याला प्राप्त करून दिले तरच शक्य असतो. म्हणून जगभर मानव अधिकारांसाठी आंदोलने केली जातात. मानव अधिकारावर गदा आली तर लढा उभारला जातो. मोर्चे काढले जातात, उपोषणे केली जातात. सर्व प्रकारच्या मिडियामध्ये प्रसिद्धी दिली जाते. जागतिक पातळीवर अम्नेस्टी इंटरनॅशनल, एशिया वॉच, रेड क्रॉस इत्यादी स्वयंसेवी संस्था मानवाधिकारांसाठी कार्यरत असल्याचे दिसून येते. जसजसा समाज सभ्य होतो आणि विकसित होत जातो तसतसा तो आपल्या मानवी अधिकारासंबंधी जागृत होत जातो. त्यामुळे व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती करण्याची संधी मिळते.

**मानवाधिकाराची व्याख्या :**

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार. हे अधिकार त्याला जन्मतःच मिळतात. त्याचे कारण मनुष्यप्राणी हा सुद्धा पक्षी, प्राणी किंवा समुद्री जिवांसारखा स्वातंत्र्य

घेऊनच जन्माला आलेला आहे आणि स्वतंत्रतेला संलग्न काही मूलभूत अधिकार प्रत्येकाला असतात, या विचाराला जगभर मिळालेली मान्यता होय.

**व्याख्या :**

१) मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 नुसार," मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे आरोग्य, शिक्षण, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा, मानवी मूल्य इत्यादी संबंधित असून मानवाच्या प्रगतीसाठी प्रेरक व संरक्षक ठरतात."

२) जे.पी.एस. शिरोही यांच्या मते, संयुक्त राष्ट्र संघ इतर सर्व संस्थाद्वारे मानवाच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी संबंधित सर्व प्रकारचे संरक्षण प्राप्त करून देणे म्हणजे मानवी हक्क होय.

**३) मॅरिस कर्टसन :** मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च व पवित्र अधिकार असून त्याचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.

४) **रॅण्डम हाऊस विश्वकोशा** नुसार, मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्मत:च प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

५) **न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन** (भारताचे माजी सरन्यायाधीश व मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष) : यांच्या मतानुसार सर्व व्यक्तींना असमानता, वर्ग, लिंग, जाती, धर्म, वय आणि विकलांगांना सामाजिक भेदभावाच्या कारणाशिवाय कोणत्याही व्यक्तीला निसर्गदत्त अधिकाराचा उपभोग करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

वरील व्याख्या वरून असे निदर्शनास येते की, मानवी हक्क ही संकल्पना मानवाला सर्व पातळीवर कायदेशीर अधिकार व स्वातंत्र्य प्राप्त करून देते. त्यामुळे मानवाला जीवन जगताना कोणत्याही हिंसेला

अथवा कोणाच्याही दबावाला बळी पडू दिले जात नाही. मानवाचे हक्क तो जन्माला आल्यापासून सुरू होतात. जसे की जगण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क, महिलांचे हक्क, बालकांचे हक्क, रोजगार मिळवण्याचा हक्क, दिव्यांगांचे हक्क इत्यादी हक्क मानवाला जीवन जगण्यासाठी संरक्षण प्राप्त करून देतात.

**गृहितके:**

१) भारतीय लोकशाही प्रगल्भ होत आहे.

२) लोकशाही आणि मानव अधिकार परस्पर पूरक आहेत.

३) मानवाधिकार हे जगातील सर्वोच्च मूल्य आहे.

४) मानव अधिकार जास्त असलेल्या देशात विकास दर जास्त आहे.

५) मानव अधिकारामुळे हुकूमशाही संपुष्टात येऊन लोकशाही प्रगल्भ होत आहे.

उद्देश :

१) लोकशाही मूल्ये आणि मानवाधिकाराचा एकत्रित अभ्यास करणे.

२) मानवाधिकाराची रुजवणूक करणे.

३) मानवा मानवातील भेदभाव आणि संघर्ष कमी करणे.

४) मानवता हा धर्म वाढवणे.

५) वसुदेव कुटुंबकम ची शिकवण देणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे व माहिती संचालनालय इत्यादीचा उपयोग केला आहे.

**समस्यासुत्रन** :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात २६ जानेवारी १९५० पासून संसदीय लोकशाहीला सुरुवात झाली. लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार आणि नियोजनबद्ध विकास याद्वारे भारताची प्रगती जागतिक पातळीवर वाखाणण्या योग्य झाली आहे. लोकशाहीमुळेच प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार म्हणजेच मानवाधिकार मिळाल्यामुळे आज प्रत्येक भारतीयाचा जीवनस्तर उंचावला आहे याबद्दल शंका किंवा दुमत असण्याचे कारण नाही. आज पासून सत्तर - पंच्याहत्तर वर्षापूर्वी भारतातील लोकांजवळ रेडिओ, सायकल, पक्के घर, नोकरी असेल अशी कल्पना सुद्धा करता येत नव्हती परंतु आज प्रत्येक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य सेवा, दूरदर्शन, वीज, पाणी, टेलिफोन आणि मोबाईल पोहोचला आहे. याही पुढे जाऊन काही गावात पब्लिक स्कूल, महाविद्यालये, दवाखाने सुरू झाली आहेत, मोबाईलद्वारे तीव्र गतीने माहितीची देवाण-घेवाण होत आहे. किसान क्रेडिट कार्ड, पिक विमा योजना, शेतकरी अपघात विमा योजना, शेतकऱ्यांना वेतन योजना इत्यादी योजनांमुळे शेतकरी सुखावला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेद्वारे लाखो लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. पंचायतराज संस्थांमध्ये महिला आणि मागासवर्गीय घटकांनाही नेतृत्व करण्याची संधी मिळत आहे. पंचायतराजमुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरण झाले आहे. पंचायतराज संस्था लोकशाहीच्या पाठशाळा ठरल्या आहेत. त्यामुळे सामान्य व्यक्तीला सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळत आहे. हे सर्व लोकशाही मुळे शक्य झाले आहे. तरीही मानवाधिकाराच्या बाबतीत भारतातील चित्र फारसे समाधानकारक दिसून येत नाही. काही प्रगत लोक

विशेषतः शहरवाशी मानवाधिकार उपभोगत असले तरी ग्रामीण भागातील दुर्गम आणि आदिवासी लोकांना मानवाधिकारांची ओळख आणि उपभोग घेता आलेला नाही. म्हणून भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार हा विषय प्रस्तुत शोधनिबंधासाठी घेण्यात आलेला आहे.

**इतिहास** :

भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार यांना फार मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. प्राचीन काळी भारताचे नाव ज्या भरत राजा च्या नावाने भारत असे पडले आहे. त्या भरत राजाला नऊ मुले होती. राजा भरताने दिग्विजय संपादन केल्यानंतर ज्या वेळी त्याचा वारस नेमण्याचा विषय आला त्यावेळी त्याने आपल्या पुत्रामध्ये युवराज म्हणून नियुक्त करण्यासाठी आवश्यक तेवढे गुण नसल्यामुळे राज्यातील एका सामान्य व्यक्तीच्या मुलाची शांतनु ची युवराज म्हणून निवड केली. नंतर शांतनु भारताचा राजा झाला. येथेच भारतातील लोकशाहीची पहिली मुहूर्तमेढ रोवली गेली. पुढे शांतनु चे वंशज कौरव-पांडव यांच्यामध्ये जे महाभारतरुपी युद्ध झाले त्यात सूर्यास्तानंतर दोन्ही बाजूने स्वयंस्फूर्तीने युद्धबंदी होत असे. सूर्यास्तानंतर जखमी योद्ध्यांना आवश्यक ती मदत केली जायची आणि दोन्ही बाजूचे योद्धे एकमेकांना भेटत असत. मानवाधिकारांचे एवढे प्राचीन आणि प्रगल्भ उदाहरण कोठेही सापडणार नाही. मानवाधिकाराची संकल्पना विसाव्या शतकात लोकप्रिय झाली असली तरी सर्व धर्मांच्या नैतिक मूल्यांनी मानव अधिकाराचीच शिकवण दिलेली दिसून येते. म्हणजेच मानवी सभ्यतेएवढाच मानव अधिकाराचा इतिहास जुना आहे. आधुनिक युगात मानवी समाजात अनेक युद्धे, महायुद्धे आणि नंतर शीत युद्धे झाली आहेत. आजही रशिया

आणि युक्रेनचे युद्ध सुरू आहे. म्हणजेच मानवा मानवा तील संघर्ष आजही थांबलेला दिसून येत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकाराच्या घोषणापत्राला संयुक्त राष्ट्र संघाने मान्यता दिली.

**मानवाधिकाराचे जागतिक संदर्भ :**

भारताशिवाय जगातील इतर देशांमध्येही मानवाधिकाराचा इतिहास सापडतो. इसवीसन पूर्व २३५० सालातील लगारा मधील उरुकागिना येथील मानव अधिकार सुधारणेबाबत उल्लेख सापडतो. त्यानंतर चा उल्लेख नव सुमेरियन संस्कृती तील उर - नम्मूच्या संहितेमध्ये आढळतो. प्राचीन इराणी साम्राज्याने इसवीसनपूर्व ५३९ साली घोषित केलेल्या सायरस वृत्तचिती हा मानवी हक्काविषयी चा पहिला लिखित दस्तऐवज मानण्यात येतो. या वृत्तचिती द्वारे गुलामीची प्रथा संपुष्टात आली. भारतातील मौर्य साम्राज्याने घालून दिलेली तत्वे तत्कालीन काळात अभूतपूर्व होती. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणांमध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. इस्लाम धर्माच्या उदयानंतर अरबस्तानात मानवी हक्कांना स्थान प्राप्त झाले. मुहम्मद पैगंबरांनी ६६२ मध्ये मदिने ची समद तयार केली होती. इंग्लंडमध्ये १२१५ मध्ये मॅग्ना कार्टा नावाची सनद जाहीर करण्यात आली होती. आजच्या लोकशाही व्यवस्थेची भारतासह इतर देशातील संसदीय लोकशाही व्यवस्थेचे मुळे या सनदेत आहेत. नैसर्गिक हक्कांची संकल्पना सॉक्रेटिस आणि त्याचे वारसदार विचारवंत प्लेटो व अरिस्स्टॉटल यांनी उचलून धरली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जिनिव्हा परिषदेत मानवाधिकारांच्या वैश्विक घोषणापत्राच्या

मागणीला जोर मिळाला. कॅनडाच्या मानव अधिकार घोषणापत्राचा मसुदाकार जॉन पीटर्स हम्फ्रे होता. १० डिसेंबर १९४८ रोजी या घोषणापत्रास ४८ देशांनी मंजुरी दिली. त्यात एकूण ३० कलमे होती. भारतात मानव अधिकार सुरक्षा अधिनियमाने १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना झाली. तर महाराष्ट्रात २००० साली महाराष्ट्र मानव अधिकार आयोग स्थापना झाली त्यामुळे प्रत्येक नागरिकास रोजगार, सामान्य जीवन स्तर, अन्न, वस्त्र, निवारा उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी बनली आहे. कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले आहेत. शिवाय न्याय, स्वातंत्र्य, समता इत्यादी अधिकार मिळाले आहेत. याशिवाय १७८९ साली फ्रान्स मध्ये राज्य क्रांतिकारकांनी राष्ट्रीय सभेत मानवी हक्कांची घोषणा केली. संयुक्त राज्य अमेरिकेत मूलभूत अधिकारांची मागणी एका विधेयकाद्वारे झालेली दिसते. नंतर बिल ऑफ राईट्स चा अमेरिकेच्या राज्यघटनेत समावेश करण्यात आला. १९३६ मध्ये रशियामध्ये स्टॅलिनने आपल्या राज्यघटनेत मूलभूत अधिकारांच्या रूपाने मानवी अधिकारांचा समावेश केला. जर्मनीच्या विमर राज्यघटनेत मानवाधिकार मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांच्या रूपात समाविष्ट केले आहेत.

**मानवी हक्कांचा जाहीरनामा आणि भारतीय लोकशाही :**

दिनांक 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्यात 30 कलमे होती. या कलमांमध्ये प्रामुख्याने समान कामासाठी समान वेतन, शिक्षणाचा अधिकार, मजूर संघटनांची स्थापना, विश्रांतीच्या अधिकार, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय इत्यादींचा समावेश होता. देशातील वेठबिगारी पद्धती बंद करणे,

वर्णभेद, जातिभेद, गुलामगिरी यांना बंदी घालून, या सर्व बाबींना महत्त्वपूर्ण स्थान या जाहीरनाम्यात देण्यात आले होते. तसेच मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आयोगांची निर्मिती करणे. हे ही स्पष्ट करण्यात आले होते. भारतामध्ये मागील पाच दशकांपासून मानवी अधिकारांच्या संरक्षणासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या योजना राबवताना मानवी अधिकारांच्या संरक्षणाचा विचार केला जात आहे. तसेच सुरुवातीला मानवी हक्कांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी या न्याय व्यवस्थेकडे सोपवली होती. नंतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगामार्फत आलेल्या तक्रारींची चौकशी करून व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले जाते. भारतीय संविधानात उद्देश पत्रिका, मूलभूत अधिकार, राजनीतिची मार्गदर्शक तत्वे इत्यादी भागातून मानव अधिकाराला प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

**सारांश** :

शोधनिबंधाच्या विस्ताराची मर्यादा लक्षात घेता असे निदर्शनास येते की, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकार घोषणापत्रातील अनेक कलमे भारतीय संविधानात समाविष्ट केलेली आहेत. त्यातून भारतीय लोकशाही परिदृढ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु अंमलबजावणी करताना मात्र मानव अधिकारांची पूर्णतः अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. भारतातील ग्रामीण लोक, महिला, मुले, आदिवासी घटक, मागास घटक, दुर्गम प्रदेशातील लोक, निराधार, निराश्रित, वृद्ध, निर्वासित इत्यादी घटक दारिद्र्यात खितपत पडलेले दिसून येतात. आजही हे घटक मानवाधिकारापासून कोसो मैल

दूर दिसून येतात. तर मानवधिकाराचा दुरुपयोग अतिरेकी, नक्षली, देशद्रोही, समाजद्रोही, भ्रष्टाचारी, गुन्हेगार लोक मानवाधिकाराचा गैरफायदा घेऊन स्वतःचा बचाव न्यायालयात करताना दिसतात. हे मात्र चुकीचे होत आहे. गुन्हेगारांना मानव अधिकाराचा आश्रय घेण्याची संधी असता कामा नये. जे परिस्थितीने गांजलेले लोक आहेत त्यांनाच मानव अधिकाराच्या द्वारे मदत केली पाहिजे.

**संदर्भासूची** :


१) संविधान और मानवाधिकार -डॉ.संजय सिंह.

२) महिला और मानवाधिकार - रमा शर्मा, के. मिश्रा.

३) भारत मे मानव अधिकार - अरुण चतुर्वेदी, संजय लोढा.

४) भारत मे मानव अधिकार- प्रो. मधुसूदन त्रिपाठी.

५) भारतीय राज्यघटना मराठी आवृत्ती 1995.

६) भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया - प्रा. के. आर. बंग

७) योजना - ऑगस्ट २००९.

८)https:// Mr. m. wikipedia.org.


***

# भारतीय लोकशाही आणि मुलभूत अधिकार

डॉ. इरलापल्ले पल्लवी भागवतराव
सहयोगी प्राध्यपक आणि विभागप्रमुख लोकप्रशासन वसंतदादा पाटील महाविद्यालय , पाटोदा ता. पाटोदा , जिल्हा – बीड

**प्रस्तावना : -**

२६ जानेवारी १९५० रोजी भारत स्वतंत्र आणि सार्वभौम देश झाला, लोकशाही देश झाला. आपण लोकशाही टिकवू शकतोल का? असा प्रश्न त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पडला होता. कारण भारतात फार पूर्वीपासून बौद्ध काळात गणराज्ये होती, लोकशाही होती, संसदीय कार्यपद्धती देखील प्रचारात होत्या. मात्र तो वारसा आपण गमावला होता. आपली सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करून घ्यायची असतील तर आपण संविधानिक मार्गाचाच वापर केला पाहिजे. म्हणजेच क्रांतीचे रक्तरंजित मार्ग कटाक्षाने टाळले पाहिजेत, सविनय कायदेभंग, असहकार, सत्याग्रह ही लढतंत्रे आपण बाजूला ठेवून संविधानिक मार्गाचा अवलंब केला तर लोकशाही टिकवणे अवघड होणार नाही.

परंपरेने हा देश कधीच लोकशाही नवहता. समता, स्वातंत्र्य, भांडवलशाही, नागरिकांचे हक्क, निवडणुकांमधून लोकांनी निवडलेली सरकारे, सरकारांना प्रतिकार करण्याचा लोकांचा हक्क ई. गोष्टी या पूर्वी या देशात अभावानेच होत्या. त्यामुळेच प्रातिनिधिक लोकशाही संस्था येथे प्रयत्नपूर्वक जोपासल्या जाव्यात असा आग्रह स्वतंत्र आंदोलनाच्या नेत्यांनी धरला होता. संविधान सभेने त्याच भूमिकेशी इमान राखून सार्वत्रिक प्रौढ माताधीकारावर आधारित प्रातिनिधिक लोकशाहीची निर्मिती केली आहे.

**भारतीय लोकशाही :-**

प्रामुख्याने भारत हे लोकशाही राज्य आहे. स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय ही तर लोकशाही जीवन पद्धतीची आवश्यक तत्वे आहेत. समाजवादी धर्मनिरपेक्षतेची संकल्पना सांगून खऱ्या अर्थाने लोकशाहीचे स्वरूप कसे राहील याचेही स्पष्टीकरण उद्देश्पात्रिकेत आहे. भारतीय लोकशाही ही प्रातिनिधिक स्वरुपाची असल्यामुळे लोकप्रतीनिधीद्वारे ती संचालित असते. म्हणजेच लोकप्रतिनिधी सार्वजनिक धोरण ठरवीत असतात आणि प्रशासनाचे कामकाज निश्चित करीत असतात. तसेच त्यावर देखरेख करीत असतात. प्रशासक हे लोकप्रतिनिधींना निव्वळ जबाबदारच असत नाहीत तर लोकशाही राज्यव्यवस्थेच्या मागण्या आणि गरजा यांच्याशीही त्यांना समायोजित व्हावे लागते. लोकशाही शासन चालवण्यासाठी राजकीय पक्षांची गरज असते.सत्तारूढ पक्ष लोकशाहीत बदलत असतात. विरोधी पक्ष देखील महत्वाचा असतो. प्रशासनाला या सर्व राजकीय घटकांशी आपले समीकरण योग्य प्रकारे बसवावे लागते. लोकशाही शासन व्यवस्थेत नागरिक आणि प्रशासन यांचे परस्पर संबंध सद्भावनेवर आधारित असावे लागते द्वेषावर नाही. लोकसेवेच्या भावनेने प्रशासकाने काम केले पाहिजे. दबाव गटाला बळी न पडता सार्वजनिक हिताला सर्वोतपरीने महत्व द्यावयाचे असते.

**मुलभूत अधिकार :-**

नागरिकांचे मुलभूत हक्क आणि त्यातील प्रत्येक हक्कावरील मर्यादा यांचे जेवढे परिपूर्ण विवरण भारतीय संविधानात दिले आहे तेवढे जगातल्या कोणत्याच संविधानात आढळत नाही. '१९४० नंतरचे दशक हे मानवी हक्कांच्या जाणिवेचे दशक होते.मानवी हक्कांना जगभर प्रतिष्ठा मिळवून देणारे अटलांटिक चार्टर, युनोची सनद, मानवी हक्कांचा जाहीरनामा इ. दस्तऐवज याच काळात तयार झाले'. त्यामुळे मुलभूत हक्क संविधानात यावेत याबद्दल संविधान सभेत दुमत नव्हते.

मुलभूत हक्क संविधानात समाविष्ट झाल्यामुळे त्याला संविधानाचे पावित्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. राज्यकर्त्यांच्या मर्जीवर यांचे अस्तित्व अवलंबून राहत नाही अथवा सर्वसामान्य कायद्याद्वारे त्यात बदल अथवा काटछाट करू शकत नाही. प्रत्तेक

व्यक्तीला ती केवळ एक माणूस आहे व तिला काही हक्क मिळाले पाहिजेत या भावनेने मुलभूत हक्क संविधानाशी जोडले गेलेले आहे.

**मुलभूत हक्कांची गटवारी :-**

भारतीय संविधानात मुलभूत हक्कांची ६ गटात विभागणी केली आहे. पूर्वी हे ७ गात होते पण ५५ व्या विशोधानाने संपत्तीचा हक्क मुलभूत हक्कांच्या यादीतून काढल्यामुळे आता फक्त पुढील ६ च हक्क उरले आहेत.

समानतेचा हक्क (कलम १४ ते १८)
व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते 22)
शोषणाविरुद्ध हक्क (कलम 23 ते 24)
धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 2८)
सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम 29 ते 30)
घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32 ते 35)

मुलभूत हक्क नमूद करीत असतानाच प्रत्येक हक्कावरील मर्यादांचाही निर्देश संविधानकारांनी केला आहे. त्याचप्रमाणे ज्या अपवादात्मक प्रसंगी मुलभूत हक्क कायद्यान्वये संसद स्थगित करू शकते अश्या प्रसंगांचा (उदा.आणीबाणी) उल्लेखही केला आहे. कर्तव्यपालन वा शिस्तीच्या दृष्टीने काही नागरिकांचे (उदा. सैनिक दलातील व्यक्ती) तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने काही भागात (उदा. जिथे लष्करी कायदा पुकारलेला आहे तिथे) राहणाऱ्या व्यक्तींचे मुलभूत हक्क नियंत्रित वा रद्द करण्याचा अधिकार संविधानाने संसदेस दिला आहे. यावरून संविधानकारांनी व्यक्तींच्या हक्कापेक्षा राज्याच्या स्थैर्य व सुरक्षिततेला अधिक महत्वाचे मानले आहे असा रास्त अभिप्राय भाष्यकार देतात.

थोडक्यात जोपर्यंत नागरिकांना या मुलभूत अटी प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत त्यांना आपली सर्वांगीण विकास साधण्याची संधी प्राप्त होऊ शकत नाही. हे अधिकार अत्यंत पवित्र मानण्यात येतात. याचे स्वरूप आदर्शवादी बनले आहे. त्यांचा उद्देश केवळ व्यक्तीच्या अडचणी दूर करणे एवढ्यापुरताच मर्यादित राहिला नाही तर व्यक्तित्वाचा संपूर्ण विकास करणे असा झाला आहे. व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आवश्यकता पूर्ण करून व्यक्तीत न्याय, समता,

स्वातंत्र्य आणि बंधूतेच्या भावनेचे अंकुर निर्माण करणे असा झाला आहे.

**संदर्भ :-**


१) भोळे लक्ष्मण भास्कर, (प्रथम आवृत्ती जून २००३), 'भारताचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. ४४

२) जोशी प.ल., दवे, (प्रथम आवृत्ती जून 1991), 'भारतीय शासन व प्रशासन', विद्या प्रकाशन, नागपूर.

३) कांबळे बाळ, खांदवे एकनाथ, 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने',डायमंड प्रकाशन, न्यू दिल्ली.

४) http://www.aksharnama.com

५) http://www.bookganga.com

६) http://mr.m.wikipedia.org


***

# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

बांगर नितीनकुमार बाबासाहेब
सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय,वसई रोड (प) जि.पालघर-४०१२०२.

**प्रस्तावना:**

२० व्या शतकाला 'लोकशाहीचे युग' असे म्हटले जाते. जगातील बहुतेक देशामध्ये लोकशाही शासन पद्धती अस्तित्वात आहे. भारताने संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी खुल्या व स्वच्छ वातावरणात निवडणुका होऊन योग्य व पात्र अशा प्रतिनिधींची निवड होणे आवश्यक असते. लोकशाहीचा कारभार जनतेच्या संमतीतून आणि टीकेतून चालत असतो. लोकशाही प्रत्यक्षात येण्यासाठी निवडणूक यंत्रणा आवश्यक असते. लोकशाही व निवडणुका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.[१]

देशातील सर्व जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देऊ शकणारी तसेच व्यक्तीस्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांना विशेष महत्त्व देणारी राजकीय व्यवस्था भारतीय घटनाकारांना अभिप्रेत होती. त्याला अनुसरूनच भारतीय राज्यघटनेने देशासाठी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. लोकशाही म्हणजे केवळ शासन संस्थेचा एक प्रकार नसून लोकशाही व्यवस्था एक जीवन पद्धती आहे. अशा प्रकारचा विचार घटनाकारांनी केलेला दिसून येतो. राज्याच्या सत्तेचा वापर देशातील सामान्य लोकांच्या कल्याणासाठी झाला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. घटनाकारांचा लोकशाही सिद्धांतावर व मुल्यांवर तसेच जनतेच्या निर्णयक्षमतेवर व बुद्धीवर पूर्ण विश्वास होता. त्यामुळेच भारतासाठी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला आहे.

शासन संस्थेच्या विविध प्रकारांपैकी लोकशाही हा एक महत्त्वाचा शासन प्रकार आहे. आधुनिक काळातील लोकशाही शासन पद्धतीला

अधिकाधिक मान्यता मिळत गेल्याचे दिसून येते. जगातील बहुसंख्य देशांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. एवढेच नव्हे तर हुकूमशाही व्यवस्थेतील राज्यकर्त्यांना देखील आपण लोकशाहीवादी आहोत किंवा लोकशाहीवादी असल्याचा दावा करणे भाग पडत आहे. यावरून लोकशाही शासन पद्धतीचे महत्त्व लक्षात येते. इतर कोणत्याही शासन प्रकारापेक्षा लोकशाही हा अधिक चांगला पर्याय आहे असे आपणास दिसून येते. लोकशाही एक शासनपद्धती नसून लोकशाही एक सामाजिक जीवन पद्धती आहे. समाजातील व्यक्ती कशी वागते, इतरांशी व्यक्तीचे संबंध कसे आहेत, यावर लोकशाही जीवन अवलंबून आहे असा एक विचार प्रवाह आहे.

**गृहीतके:**

१) लोकशाही शासनपद्धती ही इतर शासनपद्धतीच्या तुलनेत चांगली शासनपद्धती आहे.

२) या शासनपद्धतीत सर्वांना स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास घडवून आणण्याची संधी दिली जाते.

३) सध्या लोकशाहीपुढे विविध आव्हाने निर्माण झालेली आहेत.

**लोकशाहीचा अर्थ:**

लोकशाहीचा अर्थ लोकांची 'सत्ता' असा होतो. लोकशाही या शब्दावरून लोकांना महत्त्व देणारी, लोकांच्या इच्छेनुसार चालणारी शासन पद्धती असे आपणास म्हणता येईल. लोकशाही शासन पद्धतीमध्ये खऱ्या अर्थाने राज्याची अंतिम सत्ता ही जनतेच्या हाती असते. याला अनुसरूनच अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या केलेली आहे. लिंकनच्या मते " लोकांचे,लोकांनी, लोकांसाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही होय."

**लोकशाहीपुढील आव्हाने:**

आधुनिक काळातील शासन संस्थेचा सर्वात चांगला प्रकार म्हणून लोकशाहीकडे पाहिले जात असले तरी सर्वच देशांमध्ये लोकशाही शासन पद्धती यशस्वी झाल्याचे दिसत नाही. पाश्चात्य देशांच्या तुलनेत आशिया व आफ्रिका खंडातील बहुसंख्य देशात लोकशाहीला अपेक्षित यश व प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकशाही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी त्या

ठिकाणची परिस्थिती अनुकूल असणे आवश्यक असते. वास्तविक पाहता लोकशाहीच्या मार्गामध्ये विविध अडथळे आहेत ते खालीलप्रमाणे होत.

**निवडणूकातील गैरप्रकार व हिंसाचार:**

लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना अतिशय महत्त्वपूर्ण स्थान असते. लोकशाहीमध्ये जनता राज्यकारभाराची जबाबदारी त्यांच्या निर्वाचित सदस्याकडे विशिष्ट कालावधीसाठी सोपवित असतात. विशेषत: सर्वसामान्य लोकांच्या लोकशाही अधिकारांचा वापर करण्याचे महत्त्वाचे प्रभावी साधन म्हणून निवडणुकांकडे पाहिले जाते. म्हणून निवडणूका खुल्या व मुक्त वातावरणात होणे आवश्यक असते. असे असले तरी सध्या मात्र निवडणुकामध्ये M3 चा म्हणजेच Money power, Muscle power & Mafia power व हिंसेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. आपल्या देशात अलीकडील काळात निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होताना दिसून येतात. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सर्वसामान्य लोकांचा लोकशाही व्यवस्थेवर दृढ विश्वास असणे आवश्यक असते. सध्या मात्र सामान्य लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होत चालला आहे. हे प्रचलित लोकशाहीपुढील प्रमुख आव्हान आहे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण:**

लोकशाही पुढील सर्वात महत्त्वाचे आव्हान म्हणजे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना मिळत असलेले राजकीय संरक्षण होय. निवडणुकीच्या काळात मनगटशाही व गुंडागर्दी यांचा सर्रासपणे वापर केला जातो. दिवसेंदिवस ही प्रवृत्ती बळावताना दिसून येते. म्हणून सर्वसामान्य लोकांमध्ये निवडणुका म्हणजे वाईट अशा प्रकारची भावना निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे एका पक्षातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना दुसऱ्या पक्षात सहज प्रवेश दिला जातो. आपला पक्ष सोडून इतर सर्व पक्ष व पक्षातील नेते हे भ्रष्टाचारी आहेत? असा सर्वच पक्षाचा असणारा अंध विश्वास, तसेच आपल्या पक्षातील भ्रष्टाचारी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पाठीशी घालणे हा प्रकार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पक्षांतर केलेला व्यक्ती पहिला पक्ष कसा वाईट

होता, कसा भ्रष्ट आहे व सदर पक्षात विकासाची कामे करता येत नव्हती याचे स्पष्टीकरण देताना दिसून येतात.

**वाढता निवडणूक खर्च:**

लोकशाही म्हणजे जास्तीत जास्त लोकांना राजकारणामध्ये सहभागी होता येते अशी व्यवस्था होय. सध्या मात्र निवडणुकांच्या वाढत्या खर्चाचा विचार करता सर्वसामान्य लोक निवडणुकीमध्ये सहभागी होऊ शकत नाही. दिवसेंदिवस निवडणुका या जास्तच महाग बनत चालल्या आहेत. परिणामी सामान्य लोकांना निवडणूक लढविणे कठीण झाले आहे. हा एक लोकशाही समोर मोठा धोका निर्माण झाला आहे.

**तत्त्वनिष्ठा व नैतिक मूल्यांचा ऱ्हास:**

सुरुवातीच्या काळातील राजकारणाला नैतिक अधिष्ठान असावे हा विचार आज कालबाह्य झाल्यासारखा दिसतो. सध्याच्या राजकारणात तत्त्वनिष्ठा व नैतिक मूल्य यांना गौण स्थान प्राप्त होऊ लागले आहे. राजकीय नेते व कार्यकर्ते यांनी सार्वजनिक जीवनातून तत्त्वनिष्ठेला त्याचबरोबर प्रामाणिकपणा, त्याग, वैचारिक निष्ठा, सामाजिक बांधिलकी, शुद्ध चारित्र्य इत्यादी गोष्टींना राजकारणात स्थान उरले नसल्याचे दिसून येते. परिणामी लोकशाही समोर नवीनच आव्हाने उभी राहिली आहेत.

**धर्माचा व जातीचा राजकारणातील वाढता प्रभाव:**

सध्याच्या परिस्थितीत भारतीय लोकशाही पुढील हे एक सर्वात मोठे आव्हान आहे. राजकारणातील धार्मिक कट्टरतावाद व जातिवाद यांच्या वाढत्या प्रभावामुळे देशात जातीय दंगली व राजकीय हिंसाचारामध्ये वाढ होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः अल्पसंख्याक लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना ही लोकशाहीच्या मार्गातील प्रमुख अडथळा ठरत आहे.

**राजकीय उदासीनता:**

लोकशाहीच्या यशासाठी लोकशाहीतील नागरिक राजकीयदृष्ट्या जागृत असणे आवश्यक असते. नागरिकांनी उदासीन वृत्ती धारण केली किंवा त्यांनी क्रियाशीलता दाखवली नाही तर राज्यकर्ते बेफिकीरपणे वागतात. त्यांच्यात एकाधिकारशाही प्रवृत्ती

निर्माण होते. याउलट राजकीयदृष्ट्या जागृत असलेले नागरिक राज्यकर्त्यांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकतात. बहुतांश मतदार तर मतदानही  करत नसल्याचे दिसून येते. आपण फक्त मतदान करायचं, नंतर अपोआप कोणीतरी निवडून येतो व तो सर्व करतो अशी लोकांची धारणा आहे. याचा विपरीत परिणाम म्हणजे बोगस मतदानात वाढ होते.  हा एक लोकशाही व्यवस्थेला धोका आहे.

**सामाजिक विषमता:**

सामाजिक विषमता हा एक लोकशाहीच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. सामाजिक विषमतेमुळे सर्वांना समान संधी मिळत नाही. विविध कारणावरून समाजामध्ये भेदभाव केला जातो. त्यामुळे समाजाची विभागणी अनेक गटात होते. उच्चनीचतेच्या कल्पना लोकांच्या मनात निर्माण होतात. त्यातून सामाजिक विषमतेची वृत्ती वाढीस लागते. अशा परिस्थितीत लोकशाही यशस्वी होणे कठीण आहे.

**प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार:**

सध्या सर्वच क्षेत्रात वाढता भ्रष्टाचार ही एक प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. यामुळे प्रशासनाची गुणवत्ता व दर्जा घसरतो. परिणामी  लोकशाही व्यवस्थेवरील लोकांचा असणारा  विश्वास कमी होऊ लागतो व लोकशाही व्यवस्था म्हणजे भ्रष्ट व्यवस्था, सामान्य लोकांची लूट करणारी व्यवस्था आहे असा समज सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण होतो. याचा परिणाम म्हणजे सामान्य माणूस राजकीय व्यवस्था व राजकारण याविषयी उदासीन आणि बेफिकर बनतो. लोकशाहीसाठी हा फार मोठा धोका ठरतो.

**राजकीय नेत्यांची विधिनिषेधशून्य वृत्ती: सामाजिक नियंत्रणाचा अभाव**

दिवसेंदिवस देशातील राजकीय परिस्थिती चिंताजनक बनत चालली आहे. सुरुवातीच्या काळी एखाद्या व्यक्तीकडून समाजविघातक कृती घडल्यास समाज काय म्हणेल? याची भीती वाटत होती. थोडक्यात समाजाचे एक प्रकारचं सामाजिक नियंत्रण (सोशल पोलिसींग) असे. सार्वजनिक जीवनात राजकीय पक्ष व नेते यांनी धारण केलेली विधिनिषेधशून्य वृत्ती लोकशाही पुढील एक मोठी समस्या आहे.

कोणत्याच चुकीच्या गोष्टीबद्दल वाईट न वाटणे अशा प्रकारची मनोवृत्ती सर्वच राजकीय पक्षांची तयार झालेली आहे.

**गैर संविधानिक व बेकायदेशीर कृतीचे समर्थन करणे.**

सध्याच्या काळात गैर संविधानिक असणाऱ्या गोष्टी करून त्या गोष्टींचे उदात्तीकरण व प्रदर्शन केलं जात आहे. विशेष म्हणजे अशा गोष्टींना समाजाकडून मिळणारा वाढता प्रतिसाद हे लोकशाही पुढील प्रमुख आव्हान आहे.

**केवळ लाभार्थी व्यक्तीच मतदान करताना दिसतात**

प्रत्येक सरकार समाजातील मागास व दुर्बल घटकासाठी विविध विकास योजना तयार करून त्या अमलात आणत असतात. परिणामी त्या विकास योजना ह्या त्या त्या सरकारच्या आहेत असं मानले जायचे. सध्या मात्र या योजना सरकारच्या नाही तर एका विशिष्ट राजकीय पक्षामधील सर्वोच्चपदी असणाऱ्या नेत्याच्याच आहेत, असा एक नविनच प्रकार समाजात अलीकडच्या काळात रुजू होऊ पाहतो आहे. हा लोकशाहीपुढील महत्वाचा धोका आहे.[२]

**शासकीय यंत्रणेवरील लोकांचा विश्वास कमी होणे:**

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी लोकांचा शासकीय यंत्रणेवर विश्वास असणे आवश्यक आहे. सध्या मात्र कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ तसेच इतर सर्व काही ज्या शासकीय यंत्रणा आहेत त्यावरील लोकांचा विश्वास कमी होत चालला आहे. हे एक लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे.

**सदृढ लोकशाही निर्माण करण्यासाठीच्या उपाययोजना:**

भारतात सदृढ लोकशाही निर्माण करण्यासाठी विविध घटकांमार्फत त्यांच्या पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**शैक्षणिक संस्थांची भूमिका:**

यामध्ये शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शाळेत शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना लोकशाही जीवनप्रणालीची ओळख करून देऊन ती अंगीकारता यावी व पुढील जीवनात एक जबाबदार नागरिक म्हणून 'भारत' घडविण्याचे कार्य करू शकतील असे विद्यार्थी घडविण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. असे झाले तरच सदृढ लोकशाही निर्माण होऊ शकेल.

**राजकीय सामाजिकीकरण:**

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सर्व नागरिकांचे राजकीय सामाजिकीकरण होणे आवश्यक आहे. की जेणेकरून प्रत्येक नागरिकाला आपली सामाजिक भूमिका काय आहे? ती कशी पार पाडली पाहिजे? यासाठी योग्य शिक्षण देऊन त्यांचे राजकीय सामाजिकीकरण घडवून आणणे गरजेचे आहे.

**नागरिकीकरणाचे शिक्षण:**

देशातील सर्व नागरिकांना नागरिकीकरणाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. ज्यामुळे लोकशाही व्यवस्थेत सर्व नागरिकांना लोकशाही मूल्यांचे महत्व पटवून देता येईल व सदृढ लोकशाही निर्माण करण्यास मदत होईल.

**नैतिकतेला महत्व:**

सार्वजनिक तसेच व्यक्तिगत एकूणच सामाजिक जीवनातील सर्वच क्षेत्रातील नैतिकता व नीतिमत्तेला महत्व देणे आवश्यक आहे.

**साधनशुचिता:**

केवळ ध्येय चांगले असून चालत नीही तर साधनसुचिता ही तितकीच महत्वाची असते. म्हणून ध्येय प्राप्त करण्याचा मार्ग हा योग्य व चांगला असणे आवश्यक आहे.

**कायद्याचे पालन:**

देशाचे नागरिक या नात्याने सर्वांनी कायदे व  नियम यांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. तसेच जे संसदीय संकेत आहेत त्यावर विशेष भर देणे गरजेचे आहे.

**गुणवत्तेला महत्त्व:**

आपण सर्वांनी प्रत्येक क्षेत्रात केवळ आणि केवळ गुणवत्तेला महत्त्व देणे आवश्यक आहे. तरच लोकशाही यशस्वी होण्यास मदत होईल.

**निष्कर्ष:**

आज भारतातील लोकशाही पैशाच्या, जातीच्या, धर्माच्या, गुन्हेगारीच्या व भ्रष्टाचाराच्या दोषांनी किडलेली दिसून येते. लोकशाहीच्या  यशस्वीतेसाठी सर्व मतदारांनी ‘लायकी’ या एकाच निकषावर उतरणाऱ्या व्यक्तीला मतदानाद्वारे निवडून देणे आवश्यक

आहे. थोडक्यात चांगल्या व्यक्तींना निवडून देणे आवश्यक आहे. जेव्हा मतदारांना काही चुकीचे दिसेल, तेव्हा त्यांनी आवाज उठविणे आवश्यक आहे. इतकेच नाही तर सर्व मतदारांनी निवडणूक प्रक्रियेचे कान व डोळे म्हणून काम करणे गरजेचे आहे. तरच निवडणूकीच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा घडून येऊ शकते.

**संदर्भ:**


१) प्रा. बी.बी. पाटील, प्रा .सौ. उर्मिला चव्हाण, भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती २००४ पेज.न. २९८

२) सुहास सरदेशमुख, वृत्तपत्र लोकसत्ता रविवार २४ एप्रिल २०२२ मधील लेख.

३) न्या.पी.बी.सावंत,अनुवाद: शारदा मराठे,लोकशाहीचे व्याकरण भाष्य प्रकाशन, मुंबई,२०१३

४) प्रा. घांग्रेकर, शासन आणि राजकारण भारताच्या संदर्भात, संपादन के. सागर आणि विरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे. २००३.

५) डॉ. फडके, लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९, अक्षर प्रकाशन, मुंबई. १९९९.

६) डॉ. दिलीप सरवटे, डॉ. उदय निरगुडकर, निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही, राजहंस प्रकाशन, पुणे. २००९.

७) विनय सहस्त्रबुद्धे, आहे लोकतंत्र तरीही, अमेय प्रकाशन, पुणे २०११.


***

# सेनापती दादा चौधरी आणि अहमदनगरचा स्वातंत्र्यलढा

**डॉ. अर्चना टाक**
इतिहास विभागप्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

श्री. कृष्णाजी नरहर उर्फ दादा चौधरी यांचा जन्म २ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला व मृत्यू इ. स. १९३८ मध्ये झाला. अवघ्या चाळीस वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. या चाळीस वर्षातील त्यांची सुरुवातीची वीस वर्षे विद्यार्थीदशेत गेली आणि उरलेली वीस वर्षे स्वातंत्र्य चळवळ व राष्ट्रीय शाळा चालविणे या कार्यात गेली. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात संपूर्ण अहमदनगर जिल्हा खदखदत्या अवस्थेत आणि आंदोलनाच्या आघाडीवर ठेवणाऱ्यात दादा चौधरी अग्रणी होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या इतिहासात त्यांनी बहुमोल कार्य केले. प्राचीन भारतातील गुरुकुल शिक्षण पद्धतीप्रमाणे दादा चौधरी ने आपले विद्यार्थी जीवन व्यतीत केले. त्यांच्या अभ्यासाची पद्धत, व्यायामाची गोडी व त्या विषयातील नैपुण्य, सर्व प्रकारचे शारीरिक कष्ट करण्याची तयारी, सत्याची आणि न्यायाची जाणीव, गुरूविषयी भक्ती आणि निष्ठा, सर्व प्रकारचे चांगले संस्कार ग्रहण करण्याची क्षमता या गोष्टी भारतीय विद्यार्थ्यांना आदर्शपूर्ण आहेत, यात शंकाच नाही.[१]

**राष्ट्रीय पाठशाळा स्थापनेपूर्वी ची बैठक:**

दादा चौधरींचे प्राथमिक शिक्षण शेवगाव व नेवासे येथे तर हायस्कूलचे शिक्षण अहमदनगरच्या सोसायटी हायस्कूलमध्ये झाले. पुण्यातील अनाथ विद्यार्थी गृहात राहून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पुण्यात शिकत असताना दादा व त्यांचे सहकारी विद्यार्थी मित्र श्री. रामचंद्र हिरे, श्री. बाबुराव चौकर, श्री.

काकासाहेब चिंचोरकर, श्री. भाई सथ्था इत्यादींनी अहमदनगर येथे लोकमान्य राष्ट्रीय पाठशाळा काढण्याचे ठरवले. दादा त्यावेळी बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला असल्याने 'तुझे कॉलेज चे शेवटचे वर्ष आहे, तू कॉलेज सोडू नकोस. आम्ही पुढे जाऊन शाळा सुरू करतो. तू नंतर आम्हास येऊन सामील हो.'[२] असे त्यांच्या मित्रांनी त्यांना सांगितले. परंतु दादा या राष्ट्रीयकार्यात मागे राहू इच्छित नव्हते. या कार्यात लगेचच सहभागी होण्यासाठी ते धडपडत होते. मात्र त्यावेळी त्यांच्या गुरूंनी दिलेल्या सल्ल्यामुळे नाइलाजाने त्यांनी बी.ए. चे राहिलेले शेवटचे अर्धे वर्ष पूर्ण करून मग अहमदनगरला लोकमान्य राष्ट्रीय पाठशाळेच्या कार्यात सहभागी होण्याचे ठरवले.

**स्थापनेचा मुहूर्त:**

इ. स. १९२० मध्ये २६ फेब्रुवारी या दिवशी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून राष्ट्रीय पाठशाळेची स्थापना करण्याचे ठरले. शाळेच्या सुरुवातीचा मुहूर्त म्हणून नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुण्यतिथी ची निवड करण्यात संस्थापकांनी मोठे औचित्य दाखविले यात शंकाच नाही. स्वतःच्या घरगुती अडचणी बाजूला सारून अपुऱ्या साधनानिशी बलाढ्य सत्तेला टक्कर देऊन राष्ट्रकार्यासाठी बलिदान करणाऱ्या या नरवीराच्या स्मृतीस अभिवादन करण्याने या तरुण मंडळींचा राष्ट्रविमोचनाचा ज्वलंत निर्धार येतो. त्यांच्याप्रमाणे आम्हीसुद्धा प्रसंगी स्वतःची आहुती देऊन या स्वराज्याच्या लढ्यात यशस्वी होऊ, ही दुर्दम्य आशा या निर्धारातून प्रकट झाल्यावाचून राहत नाही.

**स्थापना व संस्थापक सदस्य:**

श्री. रामचंद्र हिरे, श्री. भाई सथ्था, श्री. बाबुराव चौकर, श्री. काकासाहेब चिंचोरकर यांनी श्री. भाऊसाहेब चौकर यांच्या घरी घेतलेल्या बैठकीत राष्ट्रीय पाठशाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या पाठशाळेला पूर्वी ठरवल्याप्रमाणे लोकमान्य टिळकांचे नाव न देता अहमदनगर राष्ट्रीय पाठशाळा असे नाव देण्याचे ठरले. याचे कारण

म्हणजे लोकमान्यांचे नाव दिले असते तर कदाचित सरकारच्या रोषास बळी पडावे लागले असते आणि नुकतीच सुरू केलेली शाळा बंद करावी लागली असती. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे रामचंद्र बळवंत हिरे, नसरवानजी नवरोजजी सथ्था, नारायण विनायक उर्फ बाबुराव चौकर व व्यंकटेश श्रीधर उर्फ काकासाहेब चिंचोरकर हे राष्ट्रीय शाळा सुरू करण्यासाठी एकत्र आले. नगरचे वयोवृद्ध महर्षी भाऊसाहेब चौकर यांच्या निवासस्थानी एका प्रास्ताविक बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीत लोकमान्य टिळकांच्या नावाने राष्ट्रीय पाठशाळा सुरू न करता अहमदनगर राष्ट्रीय पाठशाळा असे तिला नाव द्यावे हा निर्णय घेण्यात आला. तत्कालीन सरकार धोरण लक्षात घेऊन नवजात रोपट्याला सरकारच्या वक्र नजरेची धग ताबडतोब लागू नये हा कदाचित उद्देश असावा.[३]

**राष्ट्रीय शिक्षण मंडळ:**

अभ्यासक्रम, ध्येय, धोरण आखण्यासाठी राष्ट्रीय पाठशाळेबरोबरच राष्ट्रीय शिक्षण मंडळ स्थापन करण्यात आले.

**शाळेची जागा:**

अहमदनगर राष्ट्रीय पाठशाळा सुरू झाली त्यावेळी सर्वात प्रथम ती पुणतांबेकर गल्लीमध्ये ऋषींच्या वाड्यात भरत असे. नंतर ती बाळासाहेब देशपांडे यांच्या राहत्या घरी भरू लागली. विद्यार्थी वाढल्याने तिथूनही तिचे स्थलांतर होऊन ती घासगल्लीतील कासारपंच वाड्यात दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर नेण्यात आली.

**शाळेस महात्मा गांधीजींची भेट:**

अहमदनगरच्या राष्ट्रीय पाठशाळा महात्मा गांधीनी भेट दिली होती. शाळेची पाहणी करून त्यांनी म्हटले होते की, “मैने शाला कि जांच की है। विद्यार्थी बहुत तीव्र बुद्धी के है। इस शालाको मै इतने बडे अंधकारमय समुद्र में एक छोटीसी सुंदर वाटिका समान देखता हु।”[४]

**विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न:**

राष्ट्रीय पाठशाळा सकाळी व दुपारी भरत असे. शाळेच्या वेळेव्यतिरिक्तही दादा विद्यार्थ्यांस विनामुल्य शिकवत असत. राष्ट्रीय

पाठशाळेतील व नगर शहरातील त्यावेळी प्रसिद्ध असलेली शाळा सोसायटी हायस्कूल मधील विद्यार्थी त्यांच्या घरी शिकण्यास येत असत. दादांनी विद्यार्थ्यांना स्वखर्चातून शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करत असत. दादांनी राष्ट्रीय पाठशाळेत कर्मयोगी नावाचे हस्तलिखित मासिक सुरू केले होते. ते मुलांकडून लिहून घेतले जाई. मुलांचे हस्ताक्षर चांगले व्हावे, मुलांना कर्मयोगाचे महत्त्व कळावे, लिखाण करता यावे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारावे हे उद्देश त्यामागे होते. राष्ट्रीय पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या सहलीही दादा नेत असत. परंतु त्या जाणीवपूर्वक पायीच नेत असत. कारण आपला प्रदेश विद्यार्थ्यांकडून पाहिला जावा, लोकांच्या स्थितीची त्यांना माहिती व्हावी, पुढील कष्टास तोंड देण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी हे यामागील हेतू असत. सुरुवातीला विद्यार्थ्यांना पिंपळगाव, डोंगरगण, वृद्धेश्वर, मांडवगण इ.जवळची ठिकाणे दाखविल्यानंतर त्यांनी आळंदी, देहू, तळेगाव, चिंचवड व सिंहगडची सहल काढली.

**राष्ट्रीय पाठशाळा व भारतीय स्वातंत्र्य चळवळ:**

त्यावेळी अहमदनगरमध्ये राष्ट्रीय पाठशाळेच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय संस्कार व विचार यांचा प्रसार करण्याचे काम दादा चौधरी करत होते. शाळेच्या विविध कार्यक्रमात प्रभातफेऱ्या व सायंफेऱ्या काढल्या जात असत. वंदे मातरम हे शब्द उच्चारण्याची चोरी असलेल्या त्याकाळात दादा निर्भयपणे राष्ट्रीय पदे म्हणत रस्त्यातून जात असत. त्यांच्या मागे त्यांना साथ देत त्यांचे विद्यार्थी असत. फेरी ज्या- ज्या भागातून जाई त्या- त्या भागात जनजागृतीचे वारे निर्माण होत असे. राष्ट्रपुरुषांच्या पुण्यतिथ्या, जयंत्या, गणपती उत्सव हे सार्वजनिक उत्सव शाळेत साजरे केले जात असत. त्या निमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असे. त्यातून मुलांमध्ये राष्ट्रीय बाणा व लोकांमध्ये प्रचार होत असे.

महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक सत्याग्रहाच्या लढ्यात अहमदनगर जिल्हाही आघाडीवर होता. पाठशाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ८० टक्के विद्यार्थ्यांनी या सत्याग्रह आंदोलनात भाग

घेतला होता. याचे श्रेय जाते ते म्हणजे या शाळेत विद्यार्थ्यांना मिळालेल्या शिक्षणाला. राष्ट्रकार्यास स्वतःला वाहून घेतलेले शिक्षक या शाळेत होते. या पाठशाळेत विणकाम, सुतारकाम, कागदाचे कातरकाम, छपाईचे काम, सुतकाम अशा हस्तव्यवसायांचेही शिक्षण दिले जाई. स्वतः सूत कातून त्यापासून विणलेल्या कापडाचे कपडे वापरण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जात असे. त्याद्वारे त्यांना स्वदेशीच्या प्रवाहात सामील करून घेतले जात होते.

प्रत्येक घरातून किमान एक माणूस देशसेवेला वाहिला जावा असे दादांना वाटत असे. देशाला कोण वाहून घेणार? असा प्रश्न ते वर्गात विद्यार्थ्यांना सतत विचारीत असत. भारतीय राष्ट्रीय सभेच्या शिबिरात किंवा कार्यक्रमात ते पाठशाळेच्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून काम करावयास लावत असत. त्यामुळे राष्ट्रीय नेत्यांची भाषणे, त्यांचे विचार विद्यार्थ्यांच्या कानावर पडत असत आणि त्यातील विचार त्यांच्या मनात खोलवर रुजत असत.

महात्मा गांधीजींनी राष्ट्रीय पाठशाळेला भेट दिल्यानंतर ही पाठशाळा स्वावलंबी करण्यासंबंधीचा विचार चालकांमध्ये सुरू झाला. त्यावेळी सुदर्शन छापखाना हा एकमेव छापखाना नगर शहरात होता. पाठशाळेचे छपाई कामही याच सुदर्शन छापखान्यातून करून घेतले जात असे.

१. पाठशाळेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे,

२. संस्थेला आर्थिक साहाय्य व्हावे.

३. शाळा स्वावलंबी व्हावी.

४. प्रचारासाठी वर्तमानपत्र चालवता यावे.

या उद्देशांनी प्रेरित होऊन दादांनी एक कल्पना मांडली .ती म्हणजे राष्ट्रीय शिक्षण मंडळाने एक छापखाना काढावा व त्यास महात्मा गांधीजींचे मोहन हे नाव द्यावे. त्यासाठी दादांनी लोकांकडून वर्गणी गोळा केली व ५ फेब्रुवारी १९२४ या दिवशी मोहन मुद्रा मंदिर

ची स्थापना केली. देशबंधू व संदेश ही दोन वृत्तपत्रे याच छापखान्यातून छापली जात असत.

**श्रीराम मेळा:**

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या शिवजयंती व गणेश उत्सवात वेगवेगळ्या मेळयांचे कार्यक्रम होत असत. मेळयांतून सादर होणारे कार्यक्रम हे लोकजागृतीचे एक साधन होते. म्हणून दादांनीही श्रीराम मेळा सुरु केला होता. या मेळयातील विद्यार्थी राष्ट्रीय वृत्तीची गाणी म्हणत असत. स्वतः दादा ही ऐतिहासिक विषयांवरील पोवाडे तन्मयतेने गात असत. हे पोवाडे गात असताना ते ऐतिहासिक प्रसंगास अनुरूप अभिनयही करत असत. मेळयाचे कार्यक्रम पहायला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने हजर राहत असत. पुढील काळात दादांना तुरुंगवास पत्करावा लागल्याने हा मेळा बंद पडला.

**हिंदुस्तानी सेवादल:**

डॉ. हर्डीकर यांनी भारतीय राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांसाठी देशभर राष्ट्रीय वृत्तीने स्वयंसेवक निर्माण करण्याची योजना आखली होती. स्वयंसेवकांच्या संघटनेला त्यांनी हिंदुस्तानी सेवादल असे नाव दिले होते. त्याच्या प्रचारासाठी त्यांनी भारतभर दौरा केला होता. इ. स. १९२५ यावर्षी महात्मा गांधीजींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राष्ट्रीय सभेच्या बेळगाव अधिवेशनास दादा व त्यांच्या राष्ट्रीय पाठशाळेचे इतर शिक्षक गेले होते. त्यावेळी तिथे दादांनी हिंदुस्तानी सेवादलाचे काम पाहिले. त्यांना ते आवडले. यासंदर्भात त्यांनी डॉ. हर्डीकर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर हर्डीकर यांनीही नगरला येऊन राष्ट्रीय पाठशाळेला भेट दिली. दादांची भेट घेतली. त्यांना पाठशाळा व छात्रालय यांच्या कार्याने खूपच प्रभावित केले. नगरला हिंदुस्तानी सेवादलाची शाखा उघडण्यात आली व दादा तिचे सेनापती बनले. दादांच्या नेतृत्वाखाली नगरला हिंदुस्तानी सेवादल सुरू झाले. तेव्हापासून ते सेवादलाचा गणवेश परिधान करत असत. पाठशाळेच्या छात्रालयातील विद्यार्थ्यांबरोबरच शहरातील इतर तरुणही सेवादलात सहभागी होत होते. सार्वजनिक कार्यात भाग घेत होते. ते

पुढील काळात इंग्रज सरकारच्या दप्तरी राजद्रोही व क्रांतिकारी तरुण निर्माण करणारी संस्था म्हणून नगरच्या हिंदुस्तानी सेवा दलाची नोंद झाली व सरकारने ही संस्था बेकायदेशीर ठरवून बंद पाडली. याच काळात नगरमध्ये श्री. कुं. सो. फिरोदिया हे एक लोकप्रिय वकील व राष्ट्रसभेचे नेते राहत होते. ते देशबंधू या वृत्तपत्राचे संपादक होते. परंतु या कामासाठी वेळ काढणे त्यांना शक्य होत नसे. म्हणून देशबंधू च्या संपादनाची जबाबदारी त्यांनी दादांवर सोपविली. दादांनीही ते योग्य प्रकारे पार पाडली.

अशा विविध कार्यांच्या द्वारे दादांनी नगर सारख्या राजकीयदृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यात चैतन्य निर्माण करून त्याला स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी तयार केले.१९३२ च्या कायदेभंगाच्या आंदोलन नगरच्या आंदोलन प्रमुखांची संख्या पाहून स्वतः महात्मा गांधीजी देखील चकित झाले होते. त्यामुळेच नगरचे नाव भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

## तळटीपा:

१) पटवर्धन रा. प., सेनापती दादा चौधरी, प्रकाशिका रुक्मिणीबाई चौधरी, मुंबई, पृ. १३.
२) तत्रैव, पृ. ३८.
३) तत्रैव, पृ. ४०.
४) तत्रैव, पृ. ४०.

## संदर्भ:

१) अहमदनगर नगरपालिका शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, अहमदनगर नगरपालिका प्रकाशन, अहमदनगर, १९५४.
२) अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल शतसांवत्सरिक व हिरकमहोत्सवी स्मारक ग्रंथ, अहमदनगर एज्युकेशन सोसायटी प्रकाशन, अहमदनगर, १९५५.
३) स्मरणिका, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर, जुलै १९७३.
४) पटवर्धन रा. प., सेनापती दादा चौधरी, प्रकाशिका रुक्मिणीबाई चौधरी, मुंबई

***

# "वृध्द महिलांची सद्यस्थिती"

डॉ.सलमा खमरोद्दीन शेख
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर,जि.जालना

प्रस्तावना :

जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीला, बालपण, तरुणपण म्हतारपण या तिन्ही अवस्थामधून जावेच लागते. वृध्दावस्था ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. सतत वाढणारी वृध्दांची लोकसंख्या हे जागतिक लोक संख्येचे वैशिष्ट्ये आहे म्हणजेच लोकसंख्या जसजशी वाढत आहे. तसतशी वृध्दांची लोकसंख्या ही मोठया प्रमाणात वाढत आहे. जन्मदराचे व मृत्यूदराच्या घटल्या प्रमाणामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते आहे. वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. वैदिक काळामध्ये वृध्द महिलांची स्थिती अत्यंत चांगली होती. त्यांना कुटूंबात व समाजात आदराचे स्थान दिले जात असे कुटूंबप्रमुख हा वृध्द असे कुटूंबातील कोणताही निर्णय त्यांच्या विचाराने मार्गदर्शाने घेतला जात असे. परंतु सद्या परिस्थितीत फार मोठा बदल झालेला आहे. "भारतात स्त्रीला देवीसमान मानले गेले आहे परंतु आजच्या काळात वृध्द महिलांना उपेक्षा व तिरस्काराचा सामना करावा लागत आहे. त्यांना पूर्वीप्रमाणे मान-सन्मान दिला जात नाही. आपलेपणा सुध्दा दिसून येत नाही" तर वेळोवेळी त्यांना तिस्कार, अपमानाची वागणूक कुटूंबाकडून मिळत असल्याचे दिसून येते पाश्चिमात्य सभ्यता आणि संस्कृतीच्या प्रवाभावामुळे समाजामध्ये वृध्द महिलांची स्थिती खालावली असून त्यांच्याकडे असहाय्य ओझ आणि निरुपयोगी वस्तू म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते.त्यामुळे वृध्दांच्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या.

21 व्या शतकाची सगळयात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवृधांचे आहे संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणी नुसार भारतात इ.स.2025 साली जेष्ठ लोकांची संख्या 96 कोटी 74 लाख होईल. ही आता जगातील 60 टक्के जेष्ठ नागरीक विकसनशील देशात राहतात. पतीच्या पश्चात वृध्द मातेला तिची मुले नोकरी करणारी असून समाजात त्यांना मानाचे स्थान असतांनाही त्यांची आर्थिक परिस्थिती

चांगली असूनही एखाद्या चेंडू प्रमाणे एका भावाकडून दुस-या भावाकडे तिची इच्छा नसतानाही तिला पाठवितात. म्हणजेच मुलांना आपल्या आईच्या भावनांना काहीच महत्व नसल्याचे दिसून येते. तर तिला दुय्यम वागणुक देत असल्याचे आढळून येते.

संशोधनाची उद्दिष्टये :

१) भारतातील वृध्द महिलांची सद्यस्थिती अभ्यासणे
२) वृध्द महिलांच्या समस्या जाणून घेणे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून यामध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ नियतकालिके, मासिके, इंटरनेट, साप्ताहिके इ.चा. वापर करण्यात आला आहे.

भारतातील वृध्द महिलांची सद्यस्थिती आणि त्यांच्या समस्यांचा आढावा घेत असतांना सर्वप्रथम वृध्द कोणाला म्हणायचे हे जाणून घ्यावे लागेल.

वृध्दाची परिभाषा व व्याख्या :

हेन्री व क्युमिंग: "जीवनाच्या महत्वपूर्ण उपयोगी आणि ज्याविषयी अभिलाषा असते अशा आरंभीच्या काळापासून दूर.

जेरे मी टनस्टॉल यांनी 'Old and alone' या ग्रंथात अमेरिकेत 65 वर्षावरील व्यक्तींचा समावेश वृध्दांमध्ये केला जातो असे म्हंटले आहे.

वृध्द महिलांची सद्यस्थिती वयोवृध्द सदस्य विशेषकरुन वृध्द महिला सद्य स्थितीतील कुटूंबात गंभीर समस्यांचा सामना करत आहेत. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये वृध्दांचे प्रमाण जास्त आहे आणखी महत्वाचे म्हणजे विधूर पुरुषापेक्षा विधवा महिलांचे प्रमाण जास्त आहे हा विचार करण्यासारखा विषय आहे. कारण पितृसत्ताक कुटूंबात विधवांचा दर्जा खालावलेला असतो. वृध्द विधवा आपल्या पती शिवाय अपमानीत जीवन जगते.

वृध्द स्त्री-पुरुष प्रमाण :

वृध्द स्त्रियांचे प्रमाण पुरुषापेक्षा जास्त आहे. लोकसंख्येत स्त्री पुरुष प्रमाणाचा विचार केला तर दर 1000 पुरुषांमागे 931 स्त्रिया असे प्रमाण आहे. पण तसे बघितले तर स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त दिर्घायुषी जगतात. 1981 ते 2001 च्या दशकांचा अभ्यास केला तर वृध्द

स्त्रियांची संख्या वृध्द पुरुषांपेक्षा जास्त आहे. भविष्यात एकाकी जीवन जगणा-या वृध्द महिलांना अनेक आव्हानाचा सामना करावा लागणारा आहे.

मानवीहक्क आणि वृध्द महिला "वृध्द महिला त्यांच्या वृध्दापकाळामध्ये अनेक समस्यांना तोंड देतात अशा प्रकारे मानवी हक्क आयोगाने त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांना या समस्यांना तोंड द्यावे लागते यामध्ये वृध्द महिला प्रामुख्याने खेडयामधील वृध्द महिला या पौष्टिक आहार घेवू शकत नाही कारण अनेक वृध्द या दारिद्रयावस्थेत जीवन जगत असल्याचे आढळून आले त्यामुळे त्यांना आरोग्याच्या समस्या भेडसावत असलेल्या दिसतात.

जेष्ठ महिलांचे प्रश्न :

स्त्रिया आणि पुरुष दोघांचेही वय होणे हे वेगवेगळया प्रकारचे असते पुरुष आणि स्त्रिया दोघेही वेगवेगळया पध्दतीने म्हतारे होत असतात आणि त्यामुळे त्या दोघांच्या वाढत्या वयाचे प्रश्नसुध्दा वेगळे असतात जेष्ठ महिलांच्या बाबतीत हा प्रश्न अधिक अवघड होतो याचे कारण स्त्रियांना जन्मभरच पुरुषांच्या पेक्षा कमी प्रतीची वागणूक मिळते. समाजामध्ये रुढ असलेल्या चालीरिती रुढी परंपरा याचा ही परिणाम होतो. घरातील सगळी कामे महिलांनी करावयाची पण मालमत्तेत त्यांना हिस्सा मिळत नसे. अशा विषम सामाजिक स्थिती अतिशय दुदैवी होते. या अवस्थेत महिलांची कार्यक्षमता कमी होते शरीराला शिथितला येते. शारिरीक बदल होत असतात. उंची व वजन कमी होते. त्वचा कोरडी होवून त्ववेवर सुरकुत्या पडतात. केस पांढरे होतात. डोळे खोलवर जातात. ऐकायला कमी येते बोलतांना आवाज, अडखळत बोलतात, स्मरणशक्ती कमी होते, मासिक धर्म थांबते.

या सर्व बदलांचा परिणाम त्यांच्या कौटूंबिक जीवनावर सामाजिक संबंधावर होतो. त्यामुळे वृध्द महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वृध्दत्व ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी समस्या म्हणून ही सर्वांना सारखीच कलेशदायक असेल असे मात्र नाही. आजच्या परिस्थितीत वृध्द महिलांशी समजुतदार पणे वागणारे मुलगा-सून असतील त्यांची योग्य काळी घेणारे असतील तर त्यांच्या मध्ये भांडणे कमी होतील. म्हणून वृध्दांची आरोग्याची काळजी घेणे

मानसिक व कौटूंबिक शांतता कायम राखणे इ. गोष्टी आवश्यक असतात.

वृध्द महिलांच्या सध्याच्या परिस्थितीच्या दृष्टीने महत्वाच्या बाबी.

दारिद्रय/एकटेपणा :

एकटेपणा वेगळेपणा वृध्द महिलांच्या जीवनावर फार परिणाम करतात. वृध्द महिला ह्या प्रामुख्याने त्यांचा मुलगा मुलगी किंवा नातवंडाकडेच राहत असल्यामुळे त्यांना एकटेपणा जाणवतो. सामाजिक,आर्थिक परिस्थिती, नोकरीसाठी स्थलांतर यामध्ये बदल झाल्याने, तसेच मोठया प्रमाणात विभक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात असल्यामुळे वृध्द महिलांना एकटेपणाला सामोरे जावे लागत आहे.

आर्थिक असुरक्षितता :

वृध्दावस्थेत कार्यक्षमता कमी झालेली असते थकवा लवकर येतो. पैसा जवळ असला तरी मुलांना दाखवून ते खर्च करु शकत नाही. दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागते.

परावलंबाची समस्या :

वृध्दावस्थेचे परावलंबन हे एक वैशिष्टये आहे कारण जसे बालपणी बालक आई वडिलांवर अवलंबून असते. तसेच वृध्दावस्थेत मुलांवर अवलंबून असतात. शारिरीक, मानसिक, आर्थिक दुर्बलतेमुळे त्या परावलंबी बनतात. विचारांचे मत प्रदर्शनाचा निर्णयाचे स्वातंत्र्य कमी होत जाते.

कुटूंबातील लोकांकडून होणारी उपेक्षा :

विभक्त कुटूंबात मोजकेच सदस्य असतात ते सर्व आप-आपल्या कामात व्यस्त असतात. त्यामुळे कुटूंबातील वृध्दांसाठी पुरेसा वेळ देवू शकत नाही. काही वेळ वृध्द व्यक्तींचा चिडचिडपणा, रागीट स्वभाव इ.कारणांमुळे त्यांच्या पासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात.

कुटूंबातील समस्यांना वृध्द व्यक्ती ओझ,अडचण वाटू लागतात वृध्द व्यक्तीमुळे आपल्या स्वातंत्र्यावर बंधने येतात अशी त्यांची समजूत होते. त्यामुळे ती वृध्दांची उपेक्षाकरु लागतात.

निष्कर्ष :

प्रस्तुत अध्यापना मधून असे निदर्शनास येते की, वैदीक काळामध्ये महिलांची स्थिती अत्यंत चांगली होती. त्यांना कुटूंब आणि

समाजामध्ये योग्य सन्मान दिला जात असे. आजच्या सध्याच्या आधुनिक काळामध्ये वृध्द महिलांना उपेक्षा व तिरस्काराचा सामना करावा लागत आहे. त्यांना पूर्वीप्रमाणे आदर सन्मान दिला जात नाही पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे समाजात वृध्द महिलांची स्थिती खालावली असून त्यांच्याकडे निरुपयोगी वस्तू म्हणून बघितले जाते. खेडयामधील वृध्द महिलांना आर्थिक परिस्थितीमुळे पौष्टीक आहार घेवू शकत नाही. वृध्द महिलांच्या आरोग्याच्या समस्या आढळून येतात. कुटूंबातील सदस्य वृध्द महिलांच्या स्वच्छतेकडे, आरोग्याकडे लक्ष देत नाही आणि वृध्द व्यक्ती तेवढया स्वत:ची काळजी घेण्यास सक्षम नसतात.

विभक्त कुटूंब पध्दतीमुळे वृध्द महिलांना एकटेपणा, एकाकीपणा या समस्यांना सामोरे जावे लागते. सामाजिक असुरक्षिततेमुळे वृध्द स्त्रियांचे जीवन असुरक्षित बनत आहे. व त्यांना कुटूंबाकडून दुर्लक्षित केले जाते. पतीच्या मृत्यू नंतर आईला सांभाळण्याची जबाबदारी मुलावर असल्याने ती जबाबदारी टाळतात. आईला स्वत:च्या घरात एखाद्या पाहुण्या प्रमाणे राहावे लागते.

या अवस्थेत वृध्द महिलांची कार्यक्षमता कमी झालेली असते शरीराला शिथिलता येते डोळे खोल जातात. दिसण्यास कमी येते स्मरणशक्ती कमी होते. कमी ऐकण्यास येते. या सर्व बदलांचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक जीवनावर, सामाजिक संबंधावर होतो. त्यांना दुस-यांच्या इच्छेवर अवलंबून राहावे लागते. दुर्लक्षपणा, हलगर्जीपणा, आर्थिक सहाय्यतेचा अभाव इ.मुळे वृध्द स्त्रिया आरोग्याच्या समस्याला तोंड देतात अनेक वृध्द महिलांना भावनिक असुरक्षिततेची समस्या भेडसावत असलेली दिसते. त्यामुळे वृध्द स्त्रियांची सद्यस्थिती अत्यंत खालावलेली असून त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

संदर्भ :


१) खडसे -2004, "भारतीय समाज आणि सामाजिक समस्या" हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई.
२) डॉ.बी.एस.क-हाळे-2010 "भारतीय समाज प्रश्न आणि समस्या" पिंपळापूरे ॲण्ड कं.पब्लिकेशस, नागपूर.
३) गोखले शरदचंद्र -2012, वार्धक्य जराविज्ञान आणि जीवनशैली, उत्कर्ष प्रकाशन,पुणे.

४) खैरनार दिलीप-2006, "वृध्दांच्या समस्या चिंता आणि चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
५) डॉ.प्रदीप आगलावे-2018, "भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या श्री.साईनाथ प्रकाशन,नागपूर.
६) प्रा.त्रिवेणी फरकाडे, सौ.सुलभा गोंगे-2003, "विवाह आणि कौटूंबिक संबंध", विद्या प्रकाशन,नागपूर.
७) www.agewellfundation.org.
८) https://www.mentalhoaltn.org.uk.atoz

***

# ग्रामीण शेतकरी आत्महतेच्या समस्या

प्रा. प्रियंका राजेंद्र आठे
समाजशास्त्र विभाग डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालया, जळगाव.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांमागील नेमकी कारणे शोधण्याची जबाबदारी सोपविलेल्या अकरा विभागाच्या प्रधान सचिवांनी शेतकरी आत्महत्यांमागे नापिकी नव्हे, तर व्यसनाधिनता, हुंडा, घरगुती भांडणे ही कारणे दिली आहेत. त्यांच्या अहवालावर सरकारी धोरण ठरणार आहे. त्यामुळे सरकारी पातळीवरच शेतकरी आत्महत्यांबाबत एवढी असंवेदनशीलता असेल तर धोरणांचे काय? उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी शेतकरी आत्महत्यांमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी आपल्या अकरा विभागांच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांना म्हणजे प्रधान सचिवांना उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यात पाठविले. ही कारवाई निश्चितपणे मुख्यमंत्र्यांच्या या प्रश्नाबाबतच्या तळमळीचे द्योतक आहे. पण प्रधान सचिवांनी बाधित कुटुंबांना भेटी देऊन आत्महत्यांची कारणे जाणून आपापले ३-३ प्राथमिक अहवाल मुख्य सचिवांना ५ जून रोजी सादर केले आहेत. त्यानुसार बहुतांश प्रधान सचिवांनी शेतकरी आत्महत्यांमागे नापिकी हे कारण नाही, तर व्यसनाधिनता, हुंडा, घरगुती भांडणे ही कारणे असल्याचे म्हटले आहे. प्रत्येक घराची तपशीलवार माहिती पोलिस पाटलांना असते म्हणून भविष्यात त्यांच्यावर याबाबत अधिक जबाबदारी टाकावी, असे मत दिसते. जर अशाप्रकारचे मत बहुतांश प्रधान सचिवांचे असेल तर सामान्यपणे मुख्य सचिव त्यांचेच संकलन करून स्वतःचा अहवाल तयार करून सादर करतील आणि सरकारी उच्च पदस्थांचा अहवाल असल्यामुळे व प्रत्यक्ष पीडितांना भेटून अहवाल तयार केला गेला असे म्हणत तो मान्यही होईल व त्यावर आधारित धोरण तयार करावे लागेल. ते धोरण कसे

असेल? व्यसनाधीनता कमी करण्यासाठी सरकारला संपूर्ण ग्रामीण जनतेचे (विशेषतः) दारूमुक्तीचे प्रबोधन करावे लागेल. दुसऱ्या बाजूने संपूर्ण विदर्भ-मराठवाड्यात दारूबंदी करावी लागेल हे शक्य आहे का? शक्य वाटत नाही. कारण दारूवरील उत्पादन व विक्रीकर हे राज्य सरकारचे खूप महत्त्वाचे महसूल साधन आहे, ते नष्ट होईल.

सरकार दारूपासूनच्या महसूलावर अवलंबून आहे. तो महसूल नसला तर पर्यायी कर उत्पन्नाची साधने कुठे आहेत? लोक टोलच द्यायला (रस्त्याची उपयोगिता मिळत असतानासुद्धा) तयार नाहीत तर दारूच्या कराची हानी भरून द्यायला कसे तयार होतील? आणखी गंभीर बाब तर दारू उत्पादक साखर कारखान्यांची आहे. चंद्रपूर जिल्ह्यात जी दारूबंदी नुकतीच केली गेली त्याविरुद्ध विधानसभेतील विरोधी पक्षांचे प्रमुख, काँग्रेसचे नेते आणि त्यांच्या साखर कारखान्याचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. त्यांनीच न्यायालयाला सादर केलेल्या माहितीनुसार त्यांच्या कारखान्याच्या दारू उत्पादनापैकी सुमारे ४ टक्के माल एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात विकला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील किती कारखाने विदर्भ-मराठवाड्याच्या किती जिल्ह्यांवर अवलंबून आहेत याची खरे तर एक श्वेतपत्रिका शासनाने प्रकाशित करावयाला हवी. पण या मुद्यापुरता निष्कर्ष असा की शेतकऱ्यांची व्यसनाधीनता कमी होऊ देण्यास खुद्द सरकार आणि पश्चिम महाराष्ट्रातील दारू उत्पादक राजकारणी तयार होणार नाहीत. म्हणजे व्यसनाधीनता घातच आहेच. परंतु सरकार आणि साखर कारखाने चालू ठेवायचे असतील तर व्यसनाधीनता चालू ठेवावी लागेल. हुंडा ही सामाजिक कुप्रथा आहेच. परंतु पीडित कुटुंबांपैकी जिथे लग्ने झाली नसतील तिथे अन्य कारणे घडलेली असणार, ती कोणती? घरगुती भांडणे ही तसे पाहता, कौटुंबिक जीवनातील सार्वत्रिक बाब आहे. मग त्यामुळे शेतकऱ्यांच्याच बाबतीत आत्महत्या घडून येतात त्याचे कारण काय? नापिकी (कदाचित सततची) हे उत्पन्न ऱ्हासाचे मुख्य कारण मानल्यास व्यसनाधीनता, हुंडाबळी, घरगुती भांडणे हे परिणामस्वरूप आहेत हे ध्यानात येईल.

त्यामुळे असे दिसते की प्रधान सचिवांनी परिणामांनाच कारणे म्हणून पुढे केले आहे, जेणेकरून आत्महत्यांची जबाबदारी आत्महत्या करणारांचीच होऊन जाते आणि बाकी सारे सहीसलामत.नापिकी हे आत्महत्यांचे खरे कारण आहे हे मान्य केले आणि सरकारची त्याबाबतची जबाबदारी शंभर टक्के आहे असे मानले तर त्यापैकी प्रत्येक प्रधान सचिवाचा हिस्सा किती आहे ते ठरविण्यात यावे व तो हिस्सा शून्य करण्याचे उद्दिष्ट व वेळापत्रक दिले जाणे आवश्यक आहे. म्हणजेच सगळयातच सरकारी विभागातील प्रशासन अधिक कार्यक्षम होईल. निर्धारित वेळेत उद्दिष्टपूर्ती झाली नाही तर इतके उच्चशिक्षित,इतके अनुभवी अधिकारी, इतकी प्रगत, सहकारी नोकरशाही व इतके कार्यक्षम मंत्रिमंडळ असण्याचा शेतकऱ्यांना उपयोग काय?नापिकीला आत्महत्यांचे प्रमुख कारण मानण्याला आधार असा की नापिकी नसली तर, म्हणजेच हानी समाधानकारक पैसा येत राहिला तर, लोक थोडीबहुत व्यसने करतीलही किंवा कुरकुर करीत हुंडा देतीलही. परंतु भविष्यात पुन्हा उत्पन्न मिळण्याची आशा असल्याच घरगुती भांडणे इतकी होणार नाहीत व ती आत्महत्यांच्या टोकापर्यंत जाणार नाहीत.नापिकी हे मुख्य मानण्याचे आणखी एक कारण असेही दर्शविता येईल की अगदी कितीही श्रीमंत परिवार असू द्या, नियमित येणाऱ्या उत्पन्नात ३-४ महिने खंड पडल्यास (उत्पन्नाची नापिकी झाल्यास) जे परिणाम शेतकरी कुटुंबावर होतात ते सर्वत्र दिसून येतील व कोणीही म्हणेल की मूळ कारण नापिकीच आहे.

**शब्द बीज :-**

शेतकरी आत्महत्या, नगदी पिके, अल्पभूधारक शेतकरी, निविष्ठा.

**शेतकरी आत्महत्यांची कारणे :-**

**शेतीसाठी आर्थिक मदत कमी होणे**

1991 च्या आर्थिक सुधारणा नुसार देशभरामध्ये शेतकऱ्यांना दिली जात असलेली सबसिडी कमी झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांना शेती करताना आणि पिके घेताना जो भांडवली खर्च येतो.त्याची तोंडमिळवणी करणे अतिशय जिकिरीचे झाले आहे. शेती

निसर्गाच्या लहरीपणावर जास्त अवलंबून आहे. गुंतवलेले आर्थिक भागभांडवल आपल्या पिकाच्या उत्पन्नातून पुन्हा प्राप्त करणे शेतकऱ्यांना फार कठीण जात आहे.

**शेतीमालाला बाजार भाव न मिळणे**

खुल्या आर्थिक धोरणामुळे परदेशातून अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर आयात होते महागाई वाढू नये म्हणून सरकार अन्नधान्य आयात करते. यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकविलेल्या अन्नधान्याला भाजीपाल्याला पाहिजे तसा बाजार भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उदासीनता निर्माण झालेली आहे.आपले आर्थिक चक्र कसे चालवावे हे शेतकऱ्यांपुढे उभे राहिलेले फार मोठे गंभीर संकट असते. बऱ्याचदा शेतीमाल चांगला पिकू नये मार्केटमध्ये शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याला आणि अन्नधान्याला कवडीमोलाने आणि बऱ्याचदा हमीभाव पेक्षाही कमी दराने व्यापारी खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्याला गुंतवलेले भांडवल सुद्धा पुन्हा उभे करणे शक्य होत नाही.

**खाजगी सावकारी व कर्जबाजारीपणा :-**

शेतकरी आपल्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी त्याचप्रमाणे शेतीसाठी भागभांडवल म्हणून अनेकदा खाजगी सावकारांकडून तसेच पतसंस्था कडून कर्ज उचलताना दिसून येतो. या परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला मोठ्या व्याजदराचा सामना करावा लागतो. जगभरामध्ये व्याजाचे प्रमाण अल्प असतानाही भारतात खाजगी सावकार आणि पतसंस्था मोठा व्याजदर लावतात. त्यामुळे कर्ज परतफेड शेतकऱ्यांना शक्य होत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होतात प्रत्येक ऋतूमध्ये असणारे पिके घेण्यासाठी भागभांडवल गरजेचे असते. एखाद्या हंगामात भांडवलही गेले आणि पुन्हा पुढील पिकासाठी आर्थिक चणचण भासू लागली की शेतकरी नैराश्यग्रस्त होतो. त्यातूनच खाजगी सावकार आणि खाजगी पतसंस्था कर्ज तगादा लावतात. त्यामुळे शेतकरी आपली मनस्थिती गमावून बसतो.

**रूढी व परंपरा :-**

काही भागांमध्ये आजही अनेक कालबाह्य रूढी व परंपरा टिकून आहेत. उदाहरणार्थ लग्न ठरवताना मोठ्या प्रमाणात हुंडा घेतला

जातो. शेतकरी यासाठी कर्ज तरी काढतो किंवा आपली जमीन तरी विकतो. त्याच्याकडे हुंडा देण्यासाठी पैसा नसतो. लग्न करण्यासाठी आवश्यक पैसा नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. लग्न समारंभ हा फार मोठ्या आर्थिक गळीचा आणि कळीचा प्रश्न निर्माण झाला आहे. कालबाह्य रूढी-परंपरा शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. हे समाजजीवनातील एक विदारक आणि अस्तित्वावर निर्माण करणारे प्रश्नचिन्ह आहे.

**सिंचन सुविधांचा अभाव :-**

शेतकरी प्रामुख्याने जिरायती शेती करून आपले कुटुंब चालवतात पुरेशा जलसिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे शेतकऱ्यांना जिरायती शेतीत करावी लागते. बागायती शेती करून नगदी पिके घेण्यासाठी पुरेशा जलसिंचन सुविधा असणे गरजेचे आहे. परंतु विकासाचा असमतोल आणि अनुशेष भरून काढणे कोणत्याही सरकारला अद्याप शक्य झालेले नाही. नगदी पिके घेण्यासाठी पुरेशा जलसिंचन सुविधा जोवर निर्माण होत नाहीत; तोवर शेतकऱ्याकडे आर्थिक समृद्धी येणे शक्य नाही हे वास्तव स्वीकारण्याची गरज आहे.

**आर्थिक साक्षरतेचा अभाव :-**

शेतकऱ्यांना आर्थिक साक्षरतेच्या अभावामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आर्थिक साक्षरता निर्माण होणे काळाची गरज आहे. शेतकरी जेव्हा एखादे पिक घेतो. तेव्हा त्यामागचे अर्थकारण केवळ ढोबळ मानाने न स्वीकारता निश्चित अशा धोरणाने शेतकऱ्यांनी पिके घेण्याची गरज आहे.

**वाढत्या भौतिक गरजा :-**

पूर्वीच्या काळी शेतकरी राहत असलेले गाव स्वयंपूर्ण असे त्याच्या भौतिक गरजा ह्या मर्यादित होत्या परंतु बदलत्या काळामध्ये भौतिक गरजा वाढलेल्या आहेत घरामध्ये विविध भौतिक सुविधांचा अभाव शेतकऱ्यांना सहन होत नाही सध्याच्या काळातील शेती ही भांडवली झाल्यामुळे विविध प्रकारची यंत्रे वापरून शेती करावी लागते.

**नैसर्गिक आपत्ती :-**

दुष्काळ गारपीट चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्ती यांनी शेतकरी अक्षरशहा मोडून पडतो पिकांचे अपरिमीत असे नुकसान होते त्यामुळे कोणत्याही पिकासाठी गुंतवलेले भांडवल पुन्हा उभे करणे अशक्य होते नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होतो दुष्काळामुळे एकशिपी घेता येत नाही गारपिटीमुळे पिके उध्वस्त होतात चक्रीवादळामुळे घरे-दारे ही व दोस्त होतात त्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज काढतो सरकारने दिलेली मदत तुटपुंजी ठरते त्यामुळे शेतकऱ्याला आपले जीवनमान अतिशय दारिद्र्यात काढावे लागते नैसर्गिक आपत्तीचे दुष्टचक्र हे सातत्याने चालूच असते त्यामुळे शेतकरी पुन्हा नव्याने सुरुवात करण्यासाठी मनाने तयार झाला तरी त्याच्यापाशी आवश्यक असे धन नसल्यामुळे नैराश्यग्रस्त होतो.

**अल्पभूधारक शेतकऱ्याचे वाढते प्रमाण :-**

भारतामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते मुळातच शेती कमी असल्यामुळे पाहिजे तितके उत्पादन आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न कमीच असते त्यातही निसर्गाचा लहरीपणा बाजार भावांचा अभाव यामुळे शेतकऱ्याला आपल्या अल्प अशा जमिनीमध्ये पाहिजे तितके उत्पादन घेता येत नाही परिणामी उत्पन्नही कमी येते आर्थिक उत्पन्न कमी आल्यामुळे आपल्या दैनंदिन गरजा भागविणे शक्य होत नाही. लोकसंख्येबाबत साक्षरतेचा अभाव असल्यामुळे अल्पभूधारक त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे एवढेच नव्हे तर शेतकरी भूमिहीन होऊन शहरांकडे स्थलांतरित होताना दिसून येतो.

**प्रक्रिया उद्योगाची कमतरता :-**

शेतकरी जे पीक आपल्या शेतामध्ये घेतो त्यावर असलेल्या प्रक्रिया उद्योगाची कमतरता हे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मागील एक मोठे कारण समजता येईल बऱ्याचदा प्रचंड उत्पादन ठेवू नये शेतकऱ्याला बाजार भाव मिळत नाही कारण त्या उत्पादनाला मागणी नसते शेतमालाची प्रक्रिया करून जर हा अतिरिक्त उत्पादित झालेला शेतमाल उद्योगांकडे गेला तर शेतकरी आपला आर्थिक उत्पन्न तर चांगल्या ठेवू शकतो यासाठी अधिकारी प्रक्रिया उद्योगांची उभारणी ग्रामीण भागातच होणे आवश्यक आहे.

**शासकीय पातळीवरील उदासीनता :-**

कोणतेही सरकार शेतकऱ्यांसाठी काही ना काही चांगले निर्णय घेत असते असे आपण सकारात्मक विचार करताना म्हणू शकतो परंतु ग्राउंड लेव्हल ला परिस्थिती वेगळीच असते शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या सुविधा आणि सवलती देत असताना विविध प्रकारचे अडथळे पार पाडावी लागतात शासनाचे अधिकारी कर्मचारी शेतकऱ्यांकडे आपुलकीच्या दृष्टीने पाहत नाहीत शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे एका शेतकऱ्याच्या मनोभाव आतून शेतकऱ्यांना शासकीय पातळीची उदासीनता कमी करून मदत दिली गेली पाहिजे.

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना**

**शेत-जमीन :-**

शेताची 'मालकी' या संकल्पनेला पहिला हादरा बसला तो स्वातंत्र्यानंतर पहिल्या घटनादुरुस्तीने. गावोगावचे 'मालक' सैरभैर झाले ते सरकारने जमीनधारणेच्या मर्यादा ठरवल्याने. ही उत्पन्नावरील, क्षमतेवरील मर्यादाही ठरते. भारतात इतर कुठल्याही व्यवसायावर ही क्षमतेची व उत्पन्नाची मर्यादा नाही. त्यावेळी संख्येने फार थोडी असली तरी अशी मातब्बर मंडळी सरकारने संपवली, याची धास्ती व जरब सगळया शेतकरी समूहाला बसली. शिवाय, हे सरकारचे म्हणणे न्यायाला धरून होते काय याची शहनिशा कोर्टाला करता येणार नाही अशी मेख नवव्या परिशिष्टाच्या रूपाने घटनेत आणली. यानंतर हळूहळू जमिनीचे क्षेत्र-मर्यादा, जमिनीची प्रत, दर्जा, भौगोलिक स्थान, विहिरी, पाट व इतर संसाधने या सर्व मालकीच्या बाबी जमिनीसंबंधीच्या कायद्याने जखडल्या. यातील बहुतेक सगळया गोष्टी न्यायिक तपासणीच्या कक्षेबाहेर आहेत, हे विशेष. असे करण्याचे धारिष्ट्य इंग्रजानीही केले नव्हते.उरल्यासुरल्या, वाटी आलेल्या जमिनीची वहिती वैयक्तिकच राहिली. वहितीचे क्षेत्र उत्तरोत्तर कमी होत गेले. वहितीसाठी का होईना, एकत्रीकरण, वहितीच्या पद्धती,

सामायिक मालकी, कंपनी/कॉर्पोरेट मालकी या गोष्टी भाडेपट्टा, करार, कामगार, मजूर याबद्दलचे कायदे यांच्यामुळे अश्यक्य झाल्या.

**कृषी उत्पादनापासून होणारी मिळकत :-**

शेतकऱ्यांना आपला माल खुल्या बाजारात विकता आला पाहिजे, म्हणजे सरकार किंवा इतर कोणालाही माल कुठे, कसा, कोणत्याही किमतीला, खुल्या स्पर्धेत विकता आला पाहिजे. लेव्ही म्हणजे शेतीवरील कोणतीही वस्तू सरकारला किंवा कुणालाही त्यांना हव्या त्या किमतीला दिलीच पाहिजे अशी तरतूद. शेतकऱ्यांनी आपली उत्पादने सरकारला दिलीच पाहिजेत म्हणजे मक्तेदारी खरेदी. शेतकऱ्यावर आपत्ती येते तेव्हा करावी लागते ती आपत्ती विक्री. या संकल्पना समजून घेतल्या की सरकार शेतकऱ्याची कशी लूट करते ते समजेल. हे सगळे स्वातंत्र्यानंतर आजपावेतो चालू आहे.

**नुकसान आणि भरपाई :-**

शेतकऱ्यांच्या मिळकतीवर आणि खर्चावर परिणाम करणारे सगळे घटक, सामाजिक आणि इतर कायदे नुकसानकारक ठरतात. गोहत्या-गोवंश हत्या बंदी; मोकाट जनावरे, कुत्रे, हरणे, डुकरे, गेंडे, हत्ती, जंगलातले इतर प्राणी, वन्य जीव रक्षणाचे कायदे; झाडे तोडणे, वन रक्षण, वन उत्पादने यांचे कायदे असे प्रत्यक्ष परिणाम करणारे आणि सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS), अन्नसुरक्षा, रोजगार हमी, जनुकीय सुधारित वाणबंदी (GMO ban), पर्यावरण रक्षण असे अप्रत्यक्ष परिणाम करणारे घातक निर्णय गेल्या पन्नास वर्षांपासून लाखो
शेतकऱ्यांसाठी टोकाची समस्या निर्माण करणारे ठरले आहेत. अशा बाबी दारिद्र्य, चिंता, जोखीम वाढवतात. यांचा आम्ही कधी गांभीर्याने विचार करत नाही. त्यांच्यापासून होणारे नुकसान व भरपाईबद्दल बोललेही जात नाही.

**निविष्ठा :-**

पाणी आणि खते ही खरी तर निविष्ठा नियंत्रण आणि आर्थिक विकृतीनिर्मिती क्षेत्रातील उत्कृष्ट उदाहरणे आहेत. पाणी हे मर्यादित साधन मान्य असेल तर त्याच्या किमतीवर वापराचे निर्णय होणे अपेक्षित आहे. ज्वारी, बाजरीला भाव असता तर ऊसासारखे पीक धरणाच्या किंवा भूगर्भातील पाण्याच्या जोरावर घेतले गेले नसते. कमी कार्यक्षमतेचे पंप प्रचंड खोलवरचे किंवा दूरवरचे पाणी आणण्यासाठी वापरले नसते. वीज नाही म्हणून टाहो फोडला नसता. सूक्ष्मसिंचन करा, पाणी जपून वापरा असा उपदेश करावा लागला नसता. असेच काही वास्तव शेती संयंत्रे/ अवजारे यांच्या वापराबद्दल. असून अडचण, नसून खोळंबा.

**शेतक़ऱ्यांचा कर्जबाजारीपणा :-**

या सर्व चर्चेत कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या कमी किमती हा मुद्दा कळीचा आहे, ही गोष्ट मान्य करण्याबद्दल अर्थशास्त्रज्ञ का मागे आहेत ते कळत नाही. बाकीच्या गौण बाबी उदा. शेती निविष्ठांच्या वाढत्या किंमती, पिकावरील संकट, उच्च व्याजाने कर्ज आणि सरकारी मदतीत घट किंवा अपुरेपण याबद्दल बोलण्यात नेत्यांना आणि स्वयंसेवी विद्वानांना आपण काही करतो आहोत याचा दिखावा किंवा समाधान मिळत असेल एवढेच. पण त्यामुळे प्रश्न सुटणार नाही हे खरे!

**विमा :-**

आजपर्यंत तरी हमखास दिलासा देणारी यंत्रणा असा विश्वास विमा योजनेतून मिळालेला नाही. तरीही एक तत्पर आणि किमान संरक्षण देणारी यंत्रणा म्हणून विमा योजना विकसित करता येणे शक्य आहे. नव्या योजनेची वाटचाल त्यासाठी महत्वाची ठरेल अशी अशा आहे. शेतीत शिरणे, शेतीतून बाहेर पडणे आमच्या कायद्यांमुळे शेतीवरील लोक शेतीचे गुलाम झाले आहेत. त्यांना लेनिन भूदास म्हणायचा. नव्यांना शेतीत शिरता येत नाही. शेतकऱ्यांना उद्योजक म्हणून बाहेर पडण्याची इच्छा आहे, पण निर्वासित म्हणूनही बाहेर पडता येत नाही अशी अवस्था आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) शेतकऱ्याची आत्महत्या (वास्तव आणि उपाय ),डॉ.संभाजी काळे/डॉ.विलास खंदारे,अथर्व पब्लिकेशन.

२) शेतकरी आत्महत्या कारणे व शाश्वत उपाय,विनायक हेगणा,चिन्मय पब्लिकेशन.

३) शेतकरी आत्महत्या एक चिंतन,गोविंदराव भोसले,निर्मल पब्लिकेशन.

४) गारपीट,भारत देवगावकर,आयडिया पब्लिकेशन.\

५) शेतकरी आत्महत्या उभारी पथक मार्गदर्शिका,डॉ.अनघा पाटील,दिलासा जनविकास प्रतिष्टान.

६) http://puneresearch.com/media/data/issues/58766fa61c6d2.pdf\

७) https://marathi.krishijagran.com/agripedia/farmer-suicides-a-crisis-on-indian-agriculture/


***

# नंदुरबार जिल्ह्यातील शेतीचे पीक रचनेतील आधुनिकीकरण व पर्यावरणावरील प्रभाव

संशोधक विद्यार्थी

**संजय खिल्लारे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. एस. पी. घुगे**

जे.बी.एस.पी.मंडल गेवराई कला आणि विज्ञान महाविद्यालय,शिवाजीनगर गडी तालुका गेवराई जिल्हा बीड

**सारांश -**

शेतक-यांच्या पिक रचनेची प्रवृत्ती यावर सर्वेक्षणात्मक संशोधन करून जिल्हयातील पिकरचना उत्पादन खर्च आदानातील बदल यासंबंधी निष्कर्ष मांडले असून सखोल व डोंगरी भागातील शेतक-यांच्या उत्पादनात पिकरचनेत तफावत आढळून आली आहे. कृषी विकासा बरोबर शेतकरी अन्नधान्य पिकाकडून व्यापारी पिकाकडे वळला आहे. तो व्यावसायिक पध्दतीने शेती करत आहे. आदिवासी व बिगर आदिवासी शेतक-याच्या पिकरचनेत बदल असून आदिवासी शेतकरी आजही अन्नधान्य, भाजीपाला, फळझाडांचे उत्पादन घेत आहे तर सखल भागातील शेतकरी व्यापारी पिकांचे उत्पादन घेत आहे. संशोधनाच्या कालखंडात जिल्हयातील पिक रचना बदलली आहे.

**परिचय –**

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, 2011 च्या जनगणनेनुसार, 69 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, ज्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देतो. रोजगार उपलब्ध करून देण्यासोबतच देशाच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा 14 टक्के आहे. शेती हा भारतातील लोकांचा सर्वात महत्त्वाचा रोजगार आणि उद्योग आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय मातीतील गरिबी संपुष्टात आणण्यासाठी, शेतीचा सर्वांगीण विकास आणि भारतीय जीवन समृद्धीसाठी, आर्थिक स्वातंत्र्याच्या योजनांमध्ये कृषी विकासासाठी प्रयत्न केले गेले आणि आता देश अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. . हरित क्रांतीचा उगम १९६६-६७ मध्ये झाला. हरितक्रांतीत ग्रामीण जीवनातील वैविध्य आणि समृद्धीची पार्श्वभूमी तयार करण्यात आली आहे. आधुनिक तंत्राने शेतीची कामे होऊ लागली. हरितक्रांती असली तरी कृषी क्षेत्रात झपाट्याने विकास झाला आहे, पण हा विकास देशाच्या प्रत्येक भागात एकसारखा नसून तो वेगळ्या पद्धतीने पाहिला जातो. यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांमध्ये प्रामुख्याने प्रदेशातील हवामान, सिंचन सुविधांचा विकास आणि अनेक आर्थिक आणि सामाजिक घटकांचा समावेश होतो. भारतातील कृषी क्षेत्रात वेगाने होत असलेल्या अनेक बदलांपासून राज्याच्याचे जिल्हे देखील अस्पर्श राहिले नाहीत. भारतीय अर्थव्यवस्थेनुसार, राज्याच्या अर्थव्यवस्थेतही शेतीचा दबदबा आहे, केवळ सिंचनाचे यांत्रिकीकरणच नाही, रासायनिक खतांचा वापर, कीटकनाशकांचा वापर आणि जास्त उत्पादन देणाऱ्या बियाण्यांमध्ये

प्रचंड वाढ झाली आहे. त्यातही बरीच सुधारणा झाली आहे. कार्यपद्धती आणि तंत्रज्ञान, ज्यामुळे कृषी उत्पादकता वाढली आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात नंदुरबार जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान आहे कारण या जिल्ह्याची शेतजमीन सुपीक आहे, तसेच येथे सिंचनाची सोय उपलब्ध आहे. परिणामी, हे क्षेत्र कृषी उत्पादनाच्या दृष्टीने सर्वोत्तम क्षेत्र आहे.

विविध कारणांमुळे आज कृषी क्षेत्रात लक्षणीय बदल होत आहेत. शेतकरी पारंपारिक शेतीपासून आधुनिक शेतीकडे वळत आहे. शेतीच्या आधुनिकीकरणातील प्रभावशाली घटक म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान, ज्यामुळे पर्यावरणात अनेक बदल झाले आहेत. शेतीमध्ये आधुनिक निविष्ठांच्या वापरामुळे सिंचन क्षेत्र वाढत आहे. ऊर्जेचा वापर वाढत आहे. पीक उत्पादनात झपाट्याने वाढ झाली आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येच्या अन्नासाठी, हरितक्रांतीच्या माध्यमातून आपण अन्न उत्पादनात मोठी वाढ केली. या विक्रमी अन्न उत्पादनासाठी वापरण्यात येणारी कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके आणि खते यांनी आपली धान्ये भरली, परंतु कीटकनाशकांच्या अंदाधुंद वापरामुळे पर्यावरणाचेही वाईट रीतीने प्रदूषण होऊ लागले. पिकांवर, भाजीपाला आणि फळांवर वापरल्या जाणाऱ्या या रासायनिक कीटकनाशकांच्या वापरामुळे ग्रामीण भागातील पाणी, जमीन आणि हवामानावर सर्वाधिक परिणाम होत आहे. मानवी शरीर हे अन्न आणि स्वच्छ वातावरणावर आधारित आहे आणि चांगले अन्न आणि स्वच्छ वातावरण हे फक्त कृषी पिकातूनच मिळते. त्यामुळे मानवाचे अस्तित्व आणि अस्तित्व शेती आणि पर्यावरणावर आधारित आहे. मानवी विकासासाठी कृषी, पर्यावरण आणि पर्यावरणाचा समतोल विकास

आवश्यक आहे. म्हणून, कृषी आणि पर्यावरणीय समस्यांसाठी, कृषी पर्यावरण आणि पर्यावरणाचा अभ्यास करावा लागेल. या अभ्यासासाठी क्षेत्र निवडणे आवश्यक आहे, त्यामुळे कृषी पर्यावरण आणि पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी अर्थशास्त्राचा मूलभूत आधार लक्षात घेऊन, नंदुरबार जिल्ह्याची अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे नंदुरबार जिल्ह्यातील शेतीच्या विकासासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करत असून त्याअंतर्गत जिल्ह्यात शेतीच्या विविध पैलूंचा क्षेत्रीय अभ्यास करणे आवश्यक आहे .

**संशोधन कार्याची उद्दिष्टे –**

कृषी पर्यावरणाचे विश्लेषण करणे जेणेकरुन या अभ्यासाद्वारे कृषी नियोजक, सामाजिक कार्यकर्ता, प्रशासक आणि क्षेत्राच्या कृषी विकास आराखड्यात सहभागी असलेल्या व्यक्तीला फायदा होईल आणि क्षेत्राच्या विकासासाठी योग्य असेल. योजना करण्यास सक्षम प्रस्तुत शोधनिबंधात शेतीच्या आधुनिक निविष्ठांमुळे किती फायदा झाला आहे आणि भविष्यात कृषी विकासासाठी कोणती संसाधने एकत्रित केली पाहिजेत याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आधुनिक कृषी निविष्ठांचा कृषी उत्पादन आणि कृषी उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

कृषी विकास संतुलनातील भूतकाळातील ट्रेंडच्या आधारे सद्यस्थितीत कृषी विकासाची पातळी मोजणे. ,

आधुनिक कृषी निविष्ठांच्या असंतुलित वापरामुळे वाढत्या पर्यावरणीय समस्यांसाठी कृषी पर्यावरण आणि पर्यावरणाचा अभ्यास करणे.

**संशोधन गृहीतक**

कृषी क्षेत्रात केलेल्या संशोधन कार्यामुळे, नवीन कृषी तंत्रांचा विकास, आधुनिक कृषी निविष्ठा, प्रगत बियाणे, रासायनिक खते आणि पिकांचे रोगांपासून संरक्षण करण्यासाठी वनस्पती संरक्षण औषधांचा वापर आणि आधुनिक कृषी निविष्ठा इत्यादींचा वापर करून, कृषी क्षेत्राचा विकास झाले आहे. आधुनिकीकरणाकडे वाटचाल.. अभ्यास क्षेत्रात प्रतिकूल आणि विविध भौगोलिक परिस्थिती असूनही, कृषी पर्यावरणशास्त्र हा शेतीच्या आधुनिकीकरणात एक प्रभावशाली घटक आहे.आधुनिक कृषी तंत्रज्ञान प्रक्रिया सुरू झाली, त्यामुळे पर्यावरणात अनेक बदल झाले आहेत, कृषी कामांचे यांत्रिकीकरण, सिंचन, रासायनिक खतांचा वापर, अधिक उत्पादन देणारी कीटकनाशके आणि बियाणे यांचा अधिक वापर, यामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. पण पद्धत आणि तंत्र देखील.शेतीमध्येही बरीच सुधारणा झाली आहे त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. हरितक्रांतीनंतरच्या काळात, शेतीच्या कामकाजात रासायनिक खतांवर जास्त अवलंबित्व, कीटकनाशकांचा अतिवापर, अवैज्ञानिक पाणी व्यवस्थापन यांमुळे जमिनीतील कोरडे पोषक घटक कमी झाले आहेत, त्यामुळे उत्पादनातही घट झाली आहे. गुणवत्तेत घसरण म्हणून.पण आपल्या पर्यावरणावरही वाईट परिणाम होत आहे.

**4. पद्धती**

हे संशोधन कार्य प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम माहितीवर आधारित आहे आणि या माहितीवरून, डेटावरूनच निष्कर्ष काढण्यात आला. या संशोधन कार्यासाठी कृषी विभाग, फलोत्पादन विभाग, भूमी अभिलेख विभाग, परिवहन विभाग कार्यालय यांच्याकडील प्रकाशित व

अप्रकाशित साहित्य व स्त्रोतांकडून दुसरी आकडेवारी प्राप्त करण्यात आली. याशिवाय हवामान विभाग व सांख्यिकी विभाग, येथून प्रसिद्ध झालेली माहिती तसेच दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक वृत्तपत्रे व मासिके यांच्याकडून प्राप्त माहिती प्राप्त झाली.

नंदुरबार जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून निवडलेल्या 100 व्यक्तींकडून मिळालेली माहिती स्वतंत्रपणे सारणीबद्ध करण्यात आली. साध्या सांख्यिकीय आणि गणितीय पद्धतींनी सारणीबद्ध पद्धतशीर तथ्यांचे विश्लेषण करून प्राप्त केलेल्या डेटामधून विश्लेषणापर्यंत पोहोचण्यासाठी अंकगणितीय माध्यमाचा वापरला गेला. मागील वर्षातील विविध पिकांचे प्रति हेक्टर उत्पादन सरासरी पद्धतीने काढले गेले. अशाप्रकारे मागील वर्षांतील विविध पिकांचे प्रति हेक्टर उत्पादन मोजल्यानंतर, उत्पादकतेची तुलना करून, उपलब्ध सांख्यिकीय उपायांच्या आधारे योग्य निष्कर्ष काढण्यात आले. कृषी पर्यावरणाच्या आधुनिकीकरणासाठी भौगोलिक क्षेत्राचे एकूण लागवडीयोग्य क्षेत्र, पीक तीव्रता निर्देशांक, निव्वळ क्षेत्राचे सिंचन क्षेत्र, सिंचनाची तीव्रता, आधुनिक यंत्रे आणि अझरचा वापर, बियाणांच्या सुधारित वाणांचा वापर, रासायनिक खतांचा वापर इ. गेले. टाइम सिरीज तंत्रज्ञानाच्या मदतीने भविष्यातील कृषी विकासाचे दीर्घकालीन प्रगतीच्या मदतीने विश्लेषण करण्यात आले. कृषी विकासासोबतच प्राथमिक माहितीच्या आधारे प्रश्नावली भरल्यानंतर कृषी आधुनिकीकरणाचा पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांवर चर्चा केली. गेला.

**निष्कर्ष**

नंदुरबार जिल्ह्याचे नाव कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. हा परिसर शेतीप्रधान क्षेत्र बनला आहे. शेतीच्या विकासात जमीन वापराचे

स्वरूप महत्त्वाची भूमिका बजावते. कोणत्याही क्षेत्राच्या जमिनीच्या वापरामुळे कृषी विकास प्रभावित होतो.

जिल्हयातील एकूण जमिनीच्या 40 टक्के जमीन हलक्या प्रतीची 35 टक्के मध्यम प्रतीची व 25 टक्के जमीन काळी कसदार आहे जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 5,03,423 हेक्टर ऐवढे असून लागवडी खालील एकूण क्षेत्र 3,13,076 हेक्टर आहे. तर लागवडी लायक क्षेत्र 3,60,760 हेक्टर आहे. बिगरशेती खालील क्षेत्र 28,117 हेक्टर आहे. तर जंगल व्याप्त क्षेत्र 103.930 हेक्टर असून एकूण भौगोलिक क्षेत्राचा 20.64 टक्के आहे तर पीत जमीन 26,350 हेक्टर आहे. जिल्हयात 8 मध्यम प्रकल्प असून 223 लघुसिंचन प्रकल्प व 385 कोल्हापूर बधारे आहेत. 21544 सिंचन विहिरी आहेत नर्मदा व तापीच्या खो-यात नैसर्गिक दृष्टया समृध्द जिल्हा असून तापी नदीवर प्रकाशा व सारंगखेडा येथे बंधारे आहे.

नर्मदा सरोवरात जिल्हयातील 33 गावातील 4.227 कुटूंबाची 1519 हेक्टर शेतजमीन व 6.288 वनक्षेत्र आणि इतर क्षेत्र 1.592 हेक्टर असे एकूण 9.399 हेक्टर क्षेत्र बुढीताखाली गेलेले आहे. जिल्हयात एकूण ओलीताखालील क्षेत्र 20.34 टक्के आहे. नदुरबार जिल्हयातील शेतजमीन सर्वच पिकांसाठी उपयुक्त असून सखल व डोंगरी भागात पिक रचनेत बदल दिसून येतो सखल भागात व्यापारी पिके घेतली जातात. यामध्ये कापूस, ऊस, केळी पपई याचा समावेश असून सातपुडयात व डोंगरी भागात विशेषतहा नधान्यांचे उत्पादन घेतले जाते डोंगरी भागात फळझाडीची लागवड मोठया प्रमाणावर होत आहे. यामध्ये आबा, सिताफळ, गहु, काजू, चिच यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**नंदुरबार जिल्हयातील पिकरचना व उत्पादन**

जिल्हयातील शेतकरी सर्वच पिकामे उत्पादन घेत असून सखोल भागातील शेतकरी व सातपूयातील शेतकरी यांच्या पिक रचनेत उत्पादन पद्धतीत आदानामध्ये पुरक व्यवसाय प्रक्रिया व्यवसायाने मोठी तफावत आढळून येते. पर्यायाने शाहू समाज व आदिवासी समाजातील शेतक-यांच्या उत्पादन पध्दतीत व पिक पध्दतीत फरक दिसून येतो. आदिवासी शेतकरी आजही पारंपारिक पध्दतीने सेन्द्रिय शेती करतो तर सखोल भागातील शाहू समाजातील शेतकरी आधुनिक पद्धतीने रासायनिक खताचा वापर अधिक करतो परिणामी उत्पादनात फरक पडत आहे. संशोधनाच्या 10 वर्षांचा कालावधीत पीक रचना बदलत असून शेतकरी व्यापारी पिके, तेलबिया याचे उत्पादन घेत आहे

शेती क्षेत्रात घटत्या उत्पादन फलाचा नियम अनुभवयास येत असून प्रत्यक्ष सर्वेक्षणानुसार मोठ्या धारण क्षेत्र असणाऱ्या शहादा तालुक्यातील पीक खर्चात सर्वाधिक प्रमाण असून त्या मानाने धडगाव तालुक्यातील पीक रचनेच्या खर्चावर परिणाम शहादा तालुक्याच्या तुलनेत कमी दिसून येतो.व्यापारी पिकाचा सर्वाधिक खर्च शहादा तालुक्यात असून अन्नधान्य पिकावरील सर्वात कमी खर्च हा धडगाव तालुक्यात दिसून आला.

नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी उत्पन्नात सातत्याने वाढ होत असली तरी कृषी विकासावर बरंच शेतकऱ्यांच्या पारंपारिक अथवा व्यापारी पिकाकडे शेतकरी आकर्षित होत आहे. शेती हा जीवनाचा महत्त्वाचा मार्ग असून व्यापारी पद्धतीने शेती आज मोठ्या प्रमाणात शहादा तालुक्यात धडगाव तालुक्यात पेक्षा जास्त प्रमाणात शेतकरी करीत आहे. शेतातील धोके आणि अनिश्चितता टाळण्यासाठी काही

सदन शेतकरी पिक विमा याचा आधार घेतात तर त्याच बरोबर शेतीसाठी उपयुक्त पूरक व्यवसायांचा विचार आज शेतकरी करू लागलेला आहे. डोंगरी भागात अन्नधान्य द्विदलधान्य भाजीपाला फळभाज्या यांचा सर्वाधिक प्रमाण दिसून येतो. कृषी तंत्रज्ञानात बदल झाल्याने तो बदल शेतकऱ्यांनी आत्मसात केल्याने कृषी उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते

**संदर्भ**


1. Mutatkar-Maharashtra Human Development Action Research study. Maharashtra Association Anthropological Sciences Pune 2004
2. Gazetter of India-Maharashtra State Gazetters, Dhule District, Bombay Gazetteers, Department of Government of Maharashtra, 1974, Page No 484, 504
3. महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्त विकास आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे 1988
4. जनवाद 2014 स्टेट बैंक ऑफ इंडिया जिल्हा नंदुरबार अहवाल 2013-14


***

# भारतीय स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव आणि कुटूंब निवृत्ती वेतन धारक एक अध्ययन : संदर्भ : नांदेड जिल्हा

**वामन रामराव काकडे**
पीएच.डी. संशोधक सामाजिकशास्त्रे संकुल स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावणा :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव भारत सरकारव्दारे साजरा करण्यात येत आहे. हा महोत्सव भारताला स्वातंत्र्य प्राप्त होवून ७५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे साजरा करण्यात येत आहे आणि या कार्यक्रमांव्दारे आपल्या भारतातील जे लोक आहेत ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी आहोरात्र प्रयत्न केलेले आहेत तसेच भारताचा समृध्द सांस्कृतिक वारसा आणि परंपरा यांची माहिती अनेक कार्यक्रमांव्दारे देण्यात येणार आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा दिनांक १२ मार्च २०२१, अहमदाबाद गुजरात येथून मा. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आली आणि यांचा शेवट हा १५ ऑगस्ट २०२३ या वर्षी होणार आहे.

भारत सरकारच्या निवृत्ती वेतन धारक आणि निवृत्ती वेतन धारकाचे कल्याण या विभागामार्फत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत निवृती वेतन धारकांसाठीचे ७५ नियम असा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत निवृत्ती वेतन धारक आणि निवृत्ती वेतन विभाग यांच्यामध्ये समन्वय साधून त्यांच्या दोघांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचा हेतू ठेवण्यात आलेला आहे.

**कुटूंब निवृत्तीवेतनाच्या व्याख्या :**

**१. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ :** ''कुटूंब निवृत्तीवेतन म्हणजे कर्मचारी तो सेवेत असताना निधन पावल्यास किंवा सेवानिवृत्ती नंतर निधन पावल्यास त्याच्या पती/पत्नी, मूलगा/मुलगी, बहीण/भाउ, वडिल/आई इत्यादींना त्यांच्या ह्यातभर किंवा प्रकरणचे विशिष्ट कालमर्यादेपर्यंत शासनाकडून दरमहा दिली जाणारी रक्कम यास कुटूंब निवृत्तीवेतन असे म्हणतात.

**२. निवृत्तीवेतन विकासपीडीया :** ''एखादया सरकार किंवा राज्य सरकार तसेच एखाद्या मालकाव्दारे आपल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास देण्यात येणारा आर्थिक मोबदला म्हणजे निवृत्तीवेतन होय.

**३. कॅब्रिज डिक्शनरी :** ''निवृत्तीवेतन म्हणजे असे वेतन की जे सरकारव्दारे किंवा एखाद्या खाजगी कंपनीव्दारे एका व्यक्तीस देण्यात येणारा वेतनरूपी मोबदला कारण आता तो खूप वृद्‌ध झाला आहे किंवा खूप अजारी आहे''.

**कुटूंब निवृत्ती वेतन मिळण्यासाठीच्या पात्रता :**

निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यू पश्चात त्यांच्या कुटुंबातील विधवा पत्नी किंवा विधूर पती, त्याची पाल्य, त्याचे पालक आणि त्याचे अपंग भाउ आणि बहिण यांना कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यासाठीच्या पात्रता खालील प्रमाणे आहेत.

**विधवा पत्नीस किंवा विधूर पतीसाठी च्या पात्रता :**

अ. एखादया निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यू पश्चात त्याच्या विधवा पत्नीस किंवा विधूर पतीस जीवनभर कुटुंब निवृत्तीवेतन मिळत असते. परंतु जर त्यांनी पुर्नविवाह केला तर मात्र हा लाभ मिळत नाही.

ब. एखादी विधवेला जर मुले नसतील व तिने जर दुसरे लग्न केले तरी देखील तिला कुटुंबनिवृत्तीवेतन मिळवण्याचा अधिकार आहे.

**निवृत्तीवेतनधारकाच्या पाल्यांसाठीच्या पात्रता :**

अ. कुटुंब निवृत्तीवेतन हे निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यू पश्चात त्याच्या अल्पवयीन पाल्यांना मिळण्याचा अधिकार आहे.

ब. कुटुंब निवृत्तीवेतन हे जुळ्या पाल्यांना देखील मिळत असेत.

तसेच या व्यतिरीक्त निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यू पश्चात जर त्यास पत्नी किंवा पाल्य नसतील तेव्हा त्याच्या पालकास कुटूंब निवृत्तीवेतन मिळत असते. परंतु यासाठी त्याचे पालक हे उदनिर्वाहासाठी सर्वस्वी त्या निवृत्ती वेतनधारकावरच अवलंबून असले पाहिजेत. त्या निवृत्तीवेतन धारकाच्या अपंग भाउ किंवा बहिण ही सुध्दा कुटुंब निवृत्तीवेतन मिळवण्यासाठी पात्र आहे पण यासाठी ते उदरनिर्वाहासाठी सर्वस्वी निवृत्ती वेतनधारकावरच अवलंबून असले पाहिजेत व त्याच पत्नी किंवा मुले नसले पाहिजे तेव्हा या कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ हा त्याच्या अपंग भाउ किंवा बहिणीस मिळत असतो.

**संशोधनाचे उद्देश :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचा कूटूंब निवृत्ती वेतन धारकास कशा प्रकारे फायदा झाला याचे अध्ययन करणे.

भारत सरकारच्या निवृत्ती वेतन विभागाने या महोत्सवांतर्गत कुटूंब निवृत्ती वेतन धारकांसाठी केलेले विशेष नियम यांचा अभ्यास करणे.

किती कुटुंब निवृत्ती वेतन धारकांनी या महोत्सवाचा लाभ घेतला याचे अध्ययन करणे.

या महोत्सवामुळे कुटूंब निवृत्तीधारक आणि वेतन विभागातील कर्मचारी यांच्या समस्या आणि त्यांचे निरसन याचे अध्ययन करणे.

**अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तूत संशोधनासाठी अध्ययन क्षेत्र म्हणून नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील राज्यशासकीय कुटुंब निवृतीवेतन धारकाची निवड करण्यात आली आहे. त्याकरीता नांदेड जिल्ह्यातील निवृत्तीवेतन विषयक कार्य करणाऱ्या कार्यालयाचा यात समावेश करण्यात आला आहे.

**नमुना निवड पध्दती :**

सदरच्या संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील एकूण ६००० कुटुंब निवृत्तीवेतन धारकांपैकी ४०० कुटूंब निवृत्ती वेतन धारकांची नमुना म्हणून साधा यादृच्छीत नमुना निवड पध्दतीतील लॉटरी नमुना निवड या तंत्राच्या सहाय्याने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या कडून माहिति मिळवण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांचा फायदा हा कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना झालेला आहे.

या महोत्सवाच्या निमिताने वेतन विभागाकडून करण्यात आलेल्या ७५ नियमांमुळे वेतन धारकांच्या समस्या कमी झालेल्या आहेत.

कुटूंब निवृत्तीवेतन धारकांना या महोत्सवामुळे वेतन विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांची माहीती झाल्यामुळे त्या दोहामध्ये होणारा वाद हा कमी झाला आहे. कुटुंब निवृत्तीवेतन धारकास या महोत्सवामुळे कागदपत्रे व प्रशासन विषयक माहीती मिळाल्यामुळे त्यांचा पैसा, वेळ आणि मानसिक त्रास हा कमी झाला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवामुळे कुटूंब निवृत्तीवेतन धारकाच्या मानव अधिकाराचे संरक्षण झालेले आहे.

**शिफारशी :**

शासनाने अशाच प्रकारचे महोत्सव साजरे करतांना कुटूंब निवृत्ती वेतन धारकांसाठी विशेष तरतूदी कराव्यात.

कुटूंब निवृत्ती धारकांनी सुध्दा अशा कार्यक्रमांचा अधिकाधिक फायदा करून घ्यावा.

निवृत्ती वेतन विभागातील कर्मचाऱ्यांनी या महोत्सवा नंतर सुध्दा असे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करावेत जेणे करून कुटूंब निवृत्तीवेतन धारकास सोय होईल.

शासनाने कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या पाल्यांसाठी विशेष सुविधा द्याव्यात.

**संदर्भग्रंथ सुची :**


१) कुलकर्णी वं. (२०१३), फॅमिली पेन्शन, नचिकेत प्रकाशन.

२) दातार प्र.य. (२००५), पेन्शन पूस्तक, श्री. मंगेश प्रकाशन.

३) प्रा.पाटूकले क्षितीज (२०१०), रिटायरमेंट प्लॅनिंग, सकाळ प्रकाशन.

४) सनी सूंठणकर (२०१२), जेष्ठ व सेवानिवृत्तीसाठी, उब्देली बुक्स प्रकाशन.

५) आगलावे प्रदीप (२०१०), सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, साईनाथ प्रकाशन.

६) सागर के. (२००६) महाराष्ट्रातील जिल्हे, अनिरूध्द प्रकाशन.

७) http://doppw.gov.in

८) https://bookganga.com

९) https://vikaspedia.in

१०) https://shodhganga.com


***

# क्रांतिकारी आदिवासी जननायक भागोजी नाईक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान: एक अभ्यास.

**प्रा. डॉ. दत्ता मा. तंगलवाड**
**सहयोगी प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख**
**महिला महाविद्यालय गेवराई ता. गेवराई जि. बीड .**

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात डोकावून पाहिले असता या भूमीवर अनेक शूरवीर पराक्रमी राजे, सेनापती, सरदार, होऊन गेले पण इतिहासाच्या पानावर सर्वांचीच दखल घेतली गेली नाहीत. त्यामध्ये अनेक उपेक्षित दुर्लक्षित राहिलेले शूर वीर आहेत. त्यापैकीच एक म्हणजे आदिवासी जननायक भागोजी नाईक. इंग्रज सत्तेला शह देण्यासाठी आवाज उठवण्यात अग्रेसर असलेल्या अनेक आदिवासी जमाती आहेत क्रांतीची मशाल पेटवून यात आदिवासी सर्वप्रथम पुढे सरसावले होते. मातृभूमी आदिवासींची भूमी असल्यामुळे देशात जेव्हा जेव्हा परकीय आक्रमणे झाली तेव्हा तेव्हा त्यांना शह देण्याचा पहिला प्रयत्न भारतातील आदिवासी लोकांनी केलेला आपल्याला पाहायला भेटतो पण त्यांच्या शौर्याची दखल कोणत्याही इतिहासकाराने घेतलेली नाही हे खेदाने नमूद करावीशी वाटते. इतिहासाच्या पानावर न उमटलेल्या अपेक्षित दुर्लक्षित असलेल्या अनेक आदिवासी जनानायका पैकी भागोजी नाईक यांच्या जीवन आणि स्वातंत्र्यलढ्यातील कार्याचा आढाव प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन विधान -**

**'क्रांतिकारी आदिवासी जननायक भागोजी नाईक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान: एक अभ्यास.'** या विषयाच्या अनुषंगाने आधुनिक कालखंडातील सामाजिक समतेचा व स्वातंत्र्याचा लढा उभारण्याचा अनेक आदिवासी क्रांतिकारकांनी प्रयत्न केला

त्यापैकी एक म्हणून भागोजी नाईक यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लघुशोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनात संशोधन विषयाच्या अनुषंगाने शास्त्रीय पद्धतीच्या आधारे माहिती संकलन करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा -**

प्रस्तुत संशोधनात वस्तुनिष्ठ तथ्ये संकलन करून निष्कर्षाप्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आली. भारतात अनेक आदिवासी जननायक होऊन गेले त्यापैकी फक्त भागोजी नाईक यांच्या जीवन आणि कार्याचा आढावा या लघुशोधनिबंध घेण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलनाची साधने –**

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलनासाठी संदर्भग्रंथ, नियतकालिके, पुस्तके, यांचा आढावा घेण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

उद्दिष्टांची मांडणी केल्यामुळे संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होते म्हणून प्रस्तुत संशोधनात पुढील उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली.

१) भागोजी नाईक यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेणे.

२) भागोजी नाईक यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके.-**

संशोधनाच्या गृहितकाची मांडणी केल्यामुळे संशोधन कार्य एका निश्चित दिशेने वाटचाल करीत असते म्हणून गृहीतकाची मांडणी करणे संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील गृहीतकांची मांडणी करण्यात आलेली आहे.

१) भागोजी नाईक यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानामुळे इतर आदिवासी बांधवांना स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्याची प्रेरणा मिळाली.
२) मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी व समाजाच्या उद्धारासाठी भागोजी नाईक यांनी स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतल्यामुळे हे अजरामर झाले असले तरी त्यांच्या नावाची इतिहासात नोंद घेतलेली दिसत नाही.

**माहितीचे विश्लेषण-**

75 वर्षाच्या पूर्वीचा कालखंड पाहिला तर संपूर्ण भारतावर इंग्रजांचे साम्राज्य पसरले होते. दीडशे वर्ष इंग्रजांनी भारतामध्ये सत्ता चालवली या कालखंडात भारतीय जनमानसावर वेळोवेळी वेगवेगळया प्रकारचे अन्याय-अत्याचार केले. त्यामुळे सामान्य जनतेला देखील इंग्रजांच्या सत्तेचा कंटाळा आलेला होता. होणारे अन्याय अत्याचार असेच चालू राहिले तर भविष्यकालीन भारतीय पिढीला जीवन जगणे असह्य होईल हे लक्षात घेऊन भारतातील सर्व जाती -धर्माच्या लोकांनी इंग्रज सत्तेला विरोध केला. त्याला आदिवासी समाज अपवाद असणार कसा? माउंट आबू पासून सुरु होणाऱ्या सातपुडा पर्वतापासून बस्तर पर्यंतच्या डोंगराळ भागात वेगवेगळया प्रकारच्या आदिवासी जमातीचे वास्तव्य असलेले आपल्याला पाहायला भेटतील. या सर्व आदिवासी जमातीच्या युवकांनी मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती दिली.१८१८ मध्ये मराठेशाहीचा अस्त झाल्यानंतर इंग्रजाच्या वाढत्या अन्याय अत्याचाराला लगाम घालण्यासाठी विंध्य व सातपुडा पर्वतातील बहादुर भिल्ल आणि महादेव कोळी या जमातीच्या तरुणांनी गनिमीकाव्याने इंग्रजांशी अनेक वर्ष झुंज दिली. सातपुडा, सातमाळ अजिंठ्याच्या डोंगराळ भागातील अनेक आदिवासी नायकांनी आपल्या जमातीतील तरुणांना एकत्रित करून इंग्रजांशी प्रखर लढा दिला. या अनेक आदिवासी जननायक यापैकी एक क्रांतिकारी आदिवासी जननायक म्हणून भागोजी नाईक, भीमा नाईक, तंट्या भिल्ल, गुजर सिंग यांचे योगदान अत्यंत मोलाचे कार्य आहे. महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेल्या विविध भागातील आदिवासी जननायकांनी आपल्या- आपल्या परीने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात

भरीव योगदान दिले आहे. म्हणून त्यांचा इतिहास इतिहासाच्या पानावर सुवर्णाक्षराने लिहायला हवा होता. पण दुर्दैवाने कोणत्याही इतिहासकारांनी इतिहासाच्या पुस्तकात त्यांच्या नावाला देखील जागा दिली नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे.म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये वेगवेगळया आदिवासी जण नाईकांनी स्वतंत्र लढ्यामध्ये केलेल्या योगदानाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त व्हावी म्हणून भागोजी नाईक यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भागोजी नाईक यांचा जन्म 1804 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नांदुर-शिंगोटे येथे एका भिल्ल कुटुंबात झाला. रानावनातील जंगल दऱ्यातील जीवन जगणारा एक कोतवालाचा मुलगा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. कुटुंबातील अठराविश्व दारिद्र्यामुळे त्यांना फारसे शिक्षण घेता आले नाही. त्यामुळे गुराढोरांच्या पाठीमागे जंगलात फिरणारा भागोजी वेगवेगळया प्रकारच्या युद्धनीतीचे शिक्षण घेत होता. काठी चालवणे, भाला चालवणे, निंशानेबाजी करणे अशा प्रकारचे उपक्रम त्यांच्यासाठी रोजचेच होते. जनावरे राखण्यासाठी जंगलात गेलेल्या भागोजी वर एक दिवस वाघाने आक्रमण केले. त्या आक्रमणाला आपल्या हातातील कुह्राडीच्या साह्याने प्रत्युत्तर देत त्या वाघाला ठार मारले. हे त्यांचे शौर्य पाहून ब्रिटिश सरकारने त्यांना पोलिसांची नोकरी बहाल केली. परंतु या नोकरी मध्ये आपल्याच देशबांधवांच्या विरोधात काम करावे लागते हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी ब्रिटिशांची गुलामगिरी युक्त असलेली नोकरी सोडून देऊन, स्वातंत्र्याच्या रणसंग्रामात भाग घेतला. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, सिन्नर, कोपरगाव आणि नाशिक जिल्ह्यातील निफाड, पेठ या भागातील भिल्ल व महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या तरुणांना एकत्रित करून स्वातंत्र्याचा लढा उभारण्याचे मोलाचे कार्य केले. म्हणून ते तरुणांचे प्रेरणास्थान ठरले. मनुष्यबळ, आर्थिक पाठबळ, शस्त्रास्त्रे इत्यादी बाबीचा अभाव असताना देखील सावधगिरीने नियोजन करून भागोजी नाईक यांनी निजामाच्या

मदतीने इंग्रजी सत्तेला सळो कि पळो करून सोडले. 1857 मधील भिल्ल व महादेव कोळयांच्या उठावाचे नेतृत्व केल्याचा आरोप भागोजी यांच्यावर लावून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यामुळे इंग्रज सरकारवर त्यांचा राग अधिकच वाढलेला होता. त्यामुळे त्यांनी आपल्या परिसरातील भिल्ल आणि महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या तरुणांना एकत्रित करून एक सैन्याची तुकडी तयार केली. नाशिक-पुणे महामार्गावर इंग्रजांना वावरणे कठीण केली आजही तो घाट भागोजी नाईक घाट या नावाने ओळखला जातो.1857च्या उठावानंतर अहमदनगरचे पोलीस अधीक्षक जे. डब्ल्यू. हेण्ड्रीने भागोजी नाईक यांच्या वाढत्या कारवायांचा कायमचा निपटारा करण्यासाठी विडा उचलला होता. नांदुर-शिंगोटे जवळच्या डोंगराळ भागातील वास्तव्याला असलेल्या भागोजीवर त्यांनी आक्रमण केले, पण भागोजी नाईक यांनी आपल्या अचूक नेमबाजीच्या बळावर हेण्ड्रीचा अंगरक्षक हेण्ड्री या दोघांनाही ठार केली. हे पाहताच सर्व पोलीस शिपाई क्षणात माघारी फिरली. भागोजी नाईक यांनी मारलेला हेण्ड्री हा पहिला इंग्रज अधिकारी होता. त्यानंतर त्यांनी 18 ऑक्टोबर 1857 रोजी भागोजी नाईक यांच्या होळीचा इंग्रजांची सैन्यासोबत जंगी सामना झाला,त्यामध्ये अनेक इंग्रज अधिकारी व पोलिस अधिकारी जखमी झाले.अनेक जण ठार झाले. त्यानंतर भागोजी नाईक यांनी त्रंबकेश्वरचा खजिना लुटला व 12 नोव्हेंबर 1857 रोजी हरसुलचा खजिना लुटला व सरकारी दप्तरातील होळी केली. या घटनेचा द्वेष मनात ठेवून इंग्रज अधिकाऱ्यांनी जंगलात वास्तव्य करणारे भिल्ल, कोकणा, रामोशी आणि महादेव कोळी जमातीच्या लोकांना पकडून फाशी दिली. 19 डिसेंबर 857 रोजी कॅप्टन वाॅकर, कॅप्टन बाॅस्वेल यांनी १० व्या तुकडीसह सुरतेवर आक्रमण केले. आदिवासी बंडखोरांना सहाय्य केले हा आरोप ठेवून सुरतेचे तत्कालीन राजे भगवंतराव भाऊराजे यांना इंग्रज सरकारने फाशी दिली. 18 फेब्रुवारी 858 रोजी येवला येथील किल्ल्यात भागोजी नायकांच्या टोळीवर कॅप्टन गिल यांनी अचानक

हल्ला केला या हल्ल्यात भागोजी नाईक यांनी इंग्रजाच्या 40 सैनिकांना ठार करून आपली सुटका करून घेतली, त्यानंतर ठिक-ठिकाणी भिल्ल युवकांना एकत्रित करून आदिवासी तरुणांची एक फलटण बनवली. त्यामध्ये त्यांचा मुलगा यशवंत नाईक याचा देखील समावेश होता. मातृभूमीचे आणि आपल्या समाजाचे संरक्षण करण्यासाठी ही तयार केलेली एक मोठी फलटण होती, असे म्हणायला हरकत नाही. या टोळीने ब्रिटिशांच्या छावण्यांवर हल्ले करून इंग्रज अधिकाऱ्यांना सळो कि पळो करून सोडले. भागोजी नाईक यांची वाढत चाललेली आक्रमकता कायमची संपविण्यासाठी कायमची संपविण्यासाठी 5 जुलै 1859 रोजी संगमनेर जवळच्या अभोरदरा येथे इंग्रज सैन्याने आक्रमण केले. या लढाईत त्यांचा मुलगा यशवंत नाईक मारला गेला व पुंजाजी नाईक यांना इंग्रज अधिकाऱ्यांनी कैद करुन नेले. त्याचा बदला घेण्यासाठी 26 ऑक्टोबर 859 रोजी भागोजी नाईक यांनी कोपरगाव तालुक्यातील  कोरहळे या गावाला लुटले. लुटलेली सर्व मालमत्ता आणि पैसा ते आपल्या आदिवासी जमातीतील गरजू लोकांना वाटत असत आणि आपल्या टोळीच्या गरजा भागवण्यासाठी लागणारे शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी लुटलेला वापरत असत. भागोजी नाईक यांचे दिवसेंदिवस वाढत चाललेले वर्चस्व पाहून इंग्रज अधिकारी बेभान झालेले होते म्हणून त्यांनी भागोजी नाईक यांचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरवले आणि भागोजी नाईक यांना पकडून देणाऱ्यास किंवा त्याच्या ठावठीकाण्याची अचूक बातमी देणाऱ्या मोठी रक्कम आणि जमीन बक्षीस देण्याचे ठरवले आणि मेजर फ्रा◌ॅक्साचर यांना पाचारण करण्यात आले.

भागोजी नाईक यांचे वाढत चाललेले वय दररोज होणारी धावपळ, उठाव, लढाया, यामुळे ते कमालीचे थकलेले होते आणि या सर्व कामातून विश्रांती घेण्यासाठी एका निवांत आणि गुप्त जागेची त्यांनादेखील आवश्यकता होती कारण इंग्रज सरकारने त्यांच्यावर ठेवलेला इनाम त्यांना देखील माहीत झालेला होता. म्हणून त्यांनी सिन्नर तालुक्यातील सांगवी येथील संगमबेटावरील खंडेराव काळे यांचे

निवासस्थान आपल्या वास्तव्यासाठी गोपनीय जागा म्हणून निवडलेले होते.परंतु इनाम म्हणून भेटणारी जमीन आणि पैसा या मोहाला बळी पडून जवळच्याच माणसाने त्यांना फसवले. भागोजी हे नाईक खंडेराव काळे यांच्या घरी आल्याची बातमी पोलिस अधिकाऱ्यांना दिली आणि रातोरात मेजर फ्रा◌ॅक्साचर यांनी दिनांक 10 नोव्हेंबर 1859 रोजीसंगमावरील बेटायला रातोरात पोलीस शिपायाचा वेढा दिला. सकाळच्या प्रहरी उडताच भागोजी नाईक यांच्या टोळीवर गोळयांचा बेछूट वर्षाव झाला.आपल्याच व्यक्तीने फितूर होऊन विश्वास घात केल्यामुळे त्यांचे अनेक सैनिक धारातीर्थ पडले भागोजी नाईक यांना शरणागती पत्करण्यासाठी फ्रा◌ॅक्साचर यांनी पुन्हापुन्हा आदेश दिला परंतु त्यांच्या आदेशाला भीक न घालता भागोजी नाईक यांनी लढत - लढत येणारे वीर मरण स्वीकारले. त्यांच्या पश्चात त्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांची इंग्रज अधिकाऱ्यांनी निष्ठूरपणे कत्तल केली आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करून टाकले. आणि भागोजी नाईक यांच्या नावाचा आणि कुटुंबाचा या ठिकाणी अस्त झाला. भागोजी नाईक यांचा अंत्यसंस्कार 11 नोव्हेंबर 1959 रोजी नांदुर-शिंगोटे गावापासून एक मैल अंतरावर करण्यात आला आजही त्या ठिकाणी भागोजी नाईक यांच्या नावाने विजय स्मारक असलेले दिसून येते.

अशाप्रकारे भारत मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी परकीय सत्तेशी संघर्ष करत वीर मरण पत्करणारे भागोजी नाईक यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. पितापुत्र यांनी मातृभूमीच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. ते देशासाठी लढले आणि अमर हुतात्मे झाले. परंतु इतिहासाच्या कोणत्याही पानावर त्यांच्या नावाला जागा मिळाली नाही हे या भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचे विदारक आणि वास्तव आहे. हे विसरून चालणार नाही. एका ठराविक जातीच्या लोकांनाच चर्चेत आणून मोठे करण्याचे काम इतिहासकारांनी केली की काय अशा प्रकारची जाणीव पुन्हा पुन्हा होते.

**निष्कर्ष -**

देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी देशातील वेगवेगळया भागात अनेक आदिवासी जननायकानी आपले पूर्ण आयुष्य वेचले आणि

आपल्या प्राणाची आहुती दिली परंतु त्यांचे नाव इतिहासाच्या पानापासून उपेक्षित राहिले, हे वास्तव आहे.इतिहासाच्या कोणत्याही पानावर या नावांचा उल्लेख दिसून येत नाही तर उलटपक्षी त्यांना गुंड, दरोडेखोरांच्या टोळया असा नामोल्लेख केलेला दिसून येतो ही अत्यंत घृणास्पद बाब आहे. तसेच इंग्रज सरकारच्या अन्याय अत्याचारापासून ग्रामीण समुदाय, आदिवासी समुदाय, आणि नागरी समुदाय पैकी कोणताही समुदाय अलिप्त राहिला नाही हे यातून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची-**


१) गौतम निकम, झाशीची आदिवासी झलकारीबाई आणि एक आदिवासी स्त्री: एक अभ्यास, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव.

२) गोविंद गारे,सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 3.सुरेशचंद्र वारघडे, महाराष्ट्रातील आदिवासी, वनश्री प्रकाशन, पुणे.

३) गौतम निकम, क्रांतिकारी आदिवासी जननायक, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव.

४) दिपक गायकवाड,आदिवासी चळवळी स्वरूप आणि दिशा,सुगावा प्रकाशन,पुणे.


***

# महिला आणि मानवी अधिकार

**प्रा. डॉ. शामल भिवराज जाधव**

मिल्लिया महाविद्यालय, बीड गृह विज्ञान विभाग,

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेने कायदयासमोर समानता हे तत्व स्वीकारून स्त्री-पुरुषांना समान स्थान दिले जाते. मानव अधिकार म्हणजे मानवाला जगण्यासाठी आवश्यक परिस्थिती, समानता, न्याय, सन्मान व स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे, म्हणजे मानव अधिकार होय. मानव अधिकार म्हणजे वंश, जात, कुळ, स्थान, लिंग रंग या आधारावर भेदभाव न करता सर्व मानवमात्रांना समानतेचे अधिकार प्रदान करणे, म्हणजे मानव अधिकार होय.

समाजात महिलांना गृहिणी माता उत्पादक, कामगार राज्याची नागरिक या सर्व भूमिका बजावत असताना वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागते. अधिकार म्हणून जो कलने मान्ये झालेली आहेत त्यांचा विचार केला असता प्रत्यक्ष भूमीकेत स्त्रियांची गळचेणे, अधिकाराची पायमल्लीच झालेली दिसते. कामाच्या ठिकाणी दुय्यम स्थान, त्यामुळे मिळणारे कमी वेतन आणि कामाच्या ठिकाणच्या जाचक अटी वाढत आहेत शोषणाचे प्रमाण वाढत आहे.

**उद्दिष्टे :-**

1. महिलांना असणान्या मानवी अधिकाराचा अभ्यास करणे.
2. महिलांच्या मानव अधिकारांचे महत्व अभ्यासणे

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलन दुय्यम खोतावर आधारीत आहे. यासाठी साप्ताहिके, पुस्तके, वृत्तपत्रे आणि मासिकांचा आधार घेण्यात आलेले आहे.

**विश्लेषणात्मक बाजू :-**

मानवी मूलभूत अधिकार अमर्याद असू शकत नाहीत, तसेच संसदेकडून त्यात वारंवार नियंत्रण किया मर्यादा येणेही योग्य नव्हे मूलभूत अधिकारांचा उद्देश केवळ निरंकुश शासनाच्या अन्यायापासून सुटका एवढाच मर्यादीत नाही. तर | व्यक्तीला तिच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक इ. क्षेत्रात सर्वांगीण विकासाची संधी प्राप्त करून देण्याचे आदर्श ध्येय त्यात सामावले आहे. म्हणूनच अधिकारांच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायालयावर टाकली आहे. प्रत्येक देशाच्या परिस्थितीनुरूप अधिकारांची व्यवस्था केलेली असते. भारतात नागरी, राजकिय व सामाजिक अधिकाराना प्राधान्य दिले आहे. रशियात आर्थिक अधिकाराला प्राधानये दिलेले आहे. साम्यवादी स्वरूपात आर्थिक आशय महत्वाचा आहे. पुढे त्याचा विचार आवश्यक करावा लागेल. उपजिवेकेच्या तरतुदीशीवाय अधिकार निरर्थक ठरतात. म्हणून त्यांचा उल्लेख मार्गदर्शक तत्वात आलेला आहे.

मूलभूत अधिकारांचा हेतू सामुदायिक हित जोपासणे व सर्वांना सार्वागीण विकासाची समान संधी निर्माण करून देणे हा असतो. लोकशाहीच्या यशासाठी राजघटनेत मूलभूत अधिकाराची हमी देणे आवश्यक असते. म्हणून भारतीय राजघटनेतील मानवी मूलभूत अधिकारांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**स्त्री विकासासाठी :**

स्त्रियाचे शोषण व पिळवणूक प्राचीन काळापासूनच सर्वच राष्ट्रात होत आहे. आजच्या विज्ञान युगातही यात कोणतीही हमी नाही. आजच्या विज्ञान युगातही यात कोणतीही कमी नाही उलट स्यामध्ये वृद्धी होत चालली आहे. महिलाच्या विरोधात हिंसा किया शोषण केवळ युद्ध वा शरणार्थी शिविगतच नाही तर स्वतःच्या घरात व काम करण्याच्या ठिकाणीही शोषण व पीळवणूक होत आहे. घरगुती हिंसेने आज व्यापक स्वरूप धारण केले आहे. यातून त्यांना शारीरिक पीडा व छळवणुकीला सामोरे जोव लागत आहे. संयुक्त राष्ट्र संपाच्या मानव विकास अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "असा एकही समाज नाही को जिथे खिया सुरक्षित आहेत आणि त्यांना बरोबरीचे स्थान दिले जाते.

व्यक्तीगत सुरक्षा त्यांचा पिच्छा पालनपोषनापासून ते स्मशानभूमीपर्यंत करते. बालपणापासून ते वृद्धापकाळापर्यंत सतत त्यांच्यावर लिंग आधारावर अन्याय, अत्याचार करण्यात येत आहे. संपूर्ण समाजात महिला वमुलींच्या विरूद्ध हिंसा चालू आहे. ज्यामुळे समाजाचा विकास खुंटला आहे. लिंगभेदामुळे महिलांना जीवन गमवावे लागते. भारतात प्रत्येक वर्षी पाच हजाराहून अधिक स्त्रियांना हुंडयांच्या कारणामुळे मारले जाते. भारतात महिला आज सर्वच |क्षेत्रात असुरक्षित आहेत. भ्रूणहत्य बलत्कार, बालबलत्कार, बालवेश्यावृत्ती उपेक्षा यांना सामोरे जावे लागते. अमेरिकते तर प्रत्येक १० सेकंदाला एका स्वीया तिच्या जवळच्या साक्षीदाराकडून दुर्व्यवहाराला सामोरे जावे लागते. महिला व मुलांचा व्यापार आंतरराष्ट्रीय क्षेत्रात वाढल्याचे दिसते. वेश्या व्यवसायासाठी महिलांची

सर्रास विक्री होत आहे. या गोष्टी चांगल्या तरच मानव विकासाचा संभव आहे

**मुलांच्या शैक्षणिक दृष्टीकोन :**

मुले ही कोणत्याही समाजाचे भवितव्य असतात त्यांच्या सर्वांगीण विकासाधी जबाबदारी त्यांच्या बरोबर राष्ट्राचीही असते. परंतु मुलांच्या बाबतीत समाजाची उदासीनता यावरून दिसून येते की, बालकामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत दारिद्रयामुळे कित्येक मुलांना मूलभूत सुविधा तर नाहीच, पण अन्न, वस्त्या अभावी कुपोषणाला सामोरे जावे लागते. लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका, पाकीस्थान इ. राष्ट्रासहीत भारतात ही कुपोषीत बालकांची संख्या काही कमी नाही. बिहार, उत्तरप्रदेश, महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्हयात कुपोषित बालकांची संख्या मोठया प्रमाणात आढळून येते. मुलांचा व्यापार, लैगिक शोषण, अंधश्रद्धेतून जाणारे बळी इ. घटना समाजात सर्रास घडतात हे सर्व पावणे गरजेचे आहे त्यांना त्यांचे जीवन घडविण्यासाठी सर्व सुख-सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असून हे मानव अधिकाराच्या माध्यमातून शक्य आहे.

**उपाययोजना :**

१. स्त्रियांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी होण्यासाठी साक्षर महिलांना सेवेत समावून घ्यायला हवे.
२. स्त्री पुरूषांना ज्ञान अधिकार कायदयाने दिले आहेत मात्र जो पर्यंत प्रत्यक्ष व्यवहारात त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही तो पर्यंत स्त्रिया मानव अधिकार भोगू शकत नाहीत.
३. महिलांना समाजात मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान असले पाहिजे.

४. कामाच्या ठीकाणी स्त्रियांना मानविय परिस्थिती असली पाहिजे पुरूष वर्चस्वाचा धाक असता कामा नये.
५. घरगुती हिंसा थांबली पाहिजे.
६. पुरूषांच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून आणला पाहिजे.
७. स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.
८. स्त्रियांना रोजगारांची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे.
९. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या काळात स्त्रियांना अधिकाधीक सक्षम व सामर्थ्यशाली बनवणे आवश्यक.
१०. खाया अर्थाने स्त्री सक्षमीकरण व खीसबळीकरण करावे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. त्रैमासिक निरंतर शिक्षणधारा मानवी हक्क कायदा साक्षरता विशेषांक भाग दुसरा, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साक्षरता परिषद पुणे.
२. मानवी हक्क प्रा.व्ही.बी. पाटील के सागर पब्लीकेशन.
३. प्रा. सुधाकर कुलकर्णी, जुन २००३, भारतीय संविधान: शासन आणि राजकारण: अभिजीत प्रकाशन लातूर.
४. वसंत पळशीकर आपले हक्क आणि त्यांची परिपूर्ती.


***

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

डॉ. एन. जी. शेरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग, जिल्हा.उस्मानाबाद.

**प्रस्तावना:**

जसे व्यक्तीच्या जीवनात अनेक समस्या अडचणी प्रश्न आव्हाने उद्भवतात त्याचप्रमाणे राष्ट्राच्या ही जीवनात अनेक आव्हाने निर्माण होतात.दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आपणाला दिसून येतो.ज्या राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केलेला नव्हता त्यांनीही लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला दिसून येतो. लोकशाही शिवाय विकास शक्य नाही हे त्यांना आता पूर्णपणे पडलेले दिसते. परंतु नुसती लोकशाहीची स्थापना झाली म्हणजे विकास झाला असे म्हणता येणार नाही.विकास करत असताना अनेक समस्या अडचणी प्रश्न आव्हाने याचीही सोडवणूक करणे आवश्यक आहे. तेव्हाच लोकशाही यशस्वीपणे टिकून वाटचाल करू शकेल. गेल्या सात दशकाच्या वाटचालीचा अभ्यास केल्यानंतर भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयाचा ज्यावेळेस आपण विचार करतो. त्यावेळेस प्रामुख्याने गरिबी बेरोजगारी विषमता वाढती लोकसंख्या निरक्षरता अज्ञान या आव्हानांची चर्चा करीत असतो. स्वातंत्र्यप्राप्ती पासून भारतीय लोकशाही पुढील असणारी ही आव्हाने आजही कमी झालेले नाही. यातील काही आव्हाने यशस्वीपणे सोडवण्याचा प्रयत्न आजपर्यंतच्या राजकारण आणि लोकांनी केलेला आपल्याला दिसून येतो. परंतु बदलत्या परिस्थितीतून आणि नवीन आव्हाने देखील भारतीय लोकशाही समोर उभी राहिलेली आपणाला दिसून येतात. यामध्ये प्रांतवाद, दहशतवाद, भ्रष्टाचार, नक्षलवाद,

गुन्हेगारीकरण, जातिवाद आणि सरकारी यंत्रणेचा दुरूपयोग ही अशी अनेक आव्हाने आज लोकशाही पुढे उभे राहिलेले आहेत.

**संशोधनाचा उद्देश:**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने लोकशाही पुढील आव्हाने या विषयाचा अभ्यास करणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केला व त्यासंबंधी आवश्यक असणारी माहिती संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिक या साधनाद्वारे प्राप्त करून विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे.

**भारतीय लोकशाही पुढील आव्हाने:**

भारतीय लोकशाही समोर सर्वच पातळीवर मोठ्या प्रमाणात आव्हाने निर्माण झालेली आहेत त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

1) **भ्रष्टाचार:**

भारतीय लोकशाही समोर भ्रष्टाचारामुळे मोठे संकट निर्माण झाले आहे. भारतात भ्रष्टाचार आता कर्करोगा सारखा पसरला आहे.लोकशाही पुढील आव्हाने मध्ये आज सर्वात मोठे आव्हान आहे. भ्रष्टाचाराची कीड समाजातील सर्व क्षेत्राला लागलेली आहे व यामुळे संपूर्ण समाजव्यवस्था पोखरून निघालेली आहे. खालच्या स्तरापासून ते वरिष्ठ स्तरापर्यंत सर्वांनाच भ्रष्टाचाराने आपल्या कवेत घेतले आहे. भ्रष्टाचार हा भारतीय लोकशाहीला नवा नाही परंतु आज ज्या प्रमाणात भ्रष्टाचार भारतीय समाजात बोकाळत आहे ते पाहिले तर भ्रष्टाचार हेच लोकशाही पुढील एक प्रमुख आव्हान आहे हे लक्षात येईल. राजकारण, प्रशासन, न्याय व्यवस्था, माध्यमे, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था पर्यंत या भ्रष्टाचाराने आपले पाय मुळे रोवली आहेत. भारताच्या लोकशाहीला ओरकखडणारा किडा

म्हणून भ्रष्टाचाराकडे पाहिले तर चुकीचे ठरणार नाही. सुशासन, विकास, लोककल्याण या तत्त्वांना भ्रष्टाचाराने हरताल फासला आहे. राजीव गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे एक रुपयावर खाली चाळीस पैसे पोहोचतात. आता मात्र परिस्थिती त्यापेक्षा बिकट बनली आहे. कधी दहा पैसे तर कधी काहीच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.आज अशा घटना आपल्याला दिसून येतात की एखाद्या व्यक्तीच्या नावावर सरकारी अनुदान उचलले जाते पण त्यांना याबद्दल काहीच माहिती नसते ही खरोखरच चिंतेची बाब आहे.भ्रष्टाचारामुळे विकास कामांमध्ये होणारी दिरंगाई,कामाचा निकृष्ट दर्जा यामुळे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला तडा जाऊन लोकशाही धोक्यात आली आहे. आज आपण पाहतो की भ्रष्टाचाराचे अनेक मोठी प्रकरणे उघडी होताना दिसत आहेत.भ्रष्टाचारामुळे आज समाजात सर्व स्तरावर गैरमार्गाने,अवैद्य पद्धतीने ज्यादा पैसा कमवण्याची अपप्रवृत्ती वाढत आहे. राजकीय नेते व लोकशाही यांच्यामध्ये भ्रष्टाचाराबाबत साटेलोटे होऊन भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. भ्रष्टाचारामुळे समाजात लोकशाही बाबत चीड व संताप निर्माण होत आहे म्हणून भ्रष्टाचार रोखणे अथवा भ्रष्टाचाराचे निर्मूलन करून समाजाला स्वच्छ व पारदर्शक सरकार देणे हे एक आव्हानच आहे.

2) **राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

शांततामय पद्धतीने सत्तांतर घडवून आणण्याचा मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पडणाऱ्या निवडणुकांची वर्णन केले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र उमेदवारांना पळवणे, त्यांना धाक दाखवणे, ठार मारणे, मतदारांना भीती दाखवणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, पैशाचे आमिष दाखवणे अशा स्वरूपाचे व्यवहार निवडणुकीत वाढलेले दिसून येतात. निवडणुका जिंकण्यासाठी पक्षा पक्षात व उमेदवारांमध्ये होणारी स्पर्धा जीवघेणी ठरत आहे. सत्तेचे राजकारण करणारे नेते विरोधकाला संपवण्यासाठी

भाडोत्री गुंडांना हाताशी धरतात, त्यांचे गुन्हे पाठीशी घालतात, अनेकदा हे गुंड स्वतः निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहतात व निवडून येतात. आज देशातील अनेक आमदार व खासदार यांच्यावरती गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे आपणाला दिसून येते. मनी, मसल व माफिया हे तीन घटक आज भारतीय राजकारण नियंत्रित करत आहेत. कायदा भंग करणारे व त्याची अवहेलना करणारेच कायदा निर्माण करत आहेत ही बाब भारतीय लोकशाहीसाठी घातक आहे.

**3) जातिवाद:**

भारतीय राजकीय संस्कृतीचे स्वरूप निश्चित करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे जात होय. भारतात जातीचा संबंध समाजाशी आहे अर्थकारणाशी व राजकारणाशी देखील आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात स्पर्धात्मक निवडणुकीच्या राजकारणामुळे जात केंद्रस्थानी राहिलेली आहे.प्रभावी नेत्यांचा प्रभाव रोखण्यासाठी नेहमी जातीचा वापर राजकीय पक्षांनी केलेला आपणाला दिसून येते.प्रबळ जातींनी दुबळया जातीवर आपले प्रभुत्व निर्माण करून निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवले व सत्ता संपादन केलेले अनेक उदाहरणे आहेत. महाराष्ट्रात मराठा, आंध्रप्रदेशात रेड्डी, कर्नाटका लिंगायत, हरयाणात जाट, राजस्थानमध्ये राजपूत, बिहार मध्ये यादव या प्रबळ जातींनी सर्वोच्च स्थानापासून ते स्थानिक सत्ता स्थानापर्यंत आपली राजकीय मक्तेदारी निर्माण केलेली आहे. त्यामुळे दुबळया जाती गटांना सत्ता स्थानापासून वंचित राहावे लागते. त्यामुळेच पुढारलेल्या जाती व मागासलेल्या जाती अशी विभागणी देशाच्या विविध राज्यांमध्ये निर्माण झालेली आपल्याला दिसून येते. त्यामुळे मागास जाती मध्ये आपल्यावर अन्याय होण्याची भावना निर्माण झाली आहे. यातूनच जातीय तेढ निर्माण होण्यास चालना मिळालेली आहे.यामुळेच जाती जाती मधील दंगली जातीजातीतील द्वेष मोठ्या प्रमाणात वाढलेला

आपणाला दिसून येतो आणि हे देखील या देशातील लोकशाही पुढील एक मोठे आव्हान असल्याचे दिसून येते.

4) **प्रादेशिकवाद :**

भारतीय लोकशाही ज्या घटनेच्या आधारावर टिकून आहे त्या घटनात्मक तरतुदीनुसार प्रत्येक नागरिकांना कुठल्याही राज्यात जाऊन राहता येते. त्याला आपल्या बोलीभाषेचा वापर करता येतो. परंतु भाषावार प्रांतरचनेनुसार प्रादेशिक वादाचा नवा प्रश्न निर्माण झाला. त्यातून प्रादेशिक पक्ष स्थापन झाले व त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे काही प्रादेशिक विभागातून समाविष्ट करण्याबद्दल वाद निर्माण झाले. याच वादांचे रूपांतर त्या त्या वेळी काही करार करून त्यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण करण्यात आला. उदाहरणात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी नागपूर करार करण्यात आला. अशा करारातून ही असमाधानी राहिलेल्यासाठी समतोल विकास हे सूत्र मानत घटनेच्या कलम 371 (2) कलमानुसार वैधानिक विकास महामंडळ निर्माण करण्यात आली व त्यासाठीचे आर्थिक अधिकार राज्यपालांना देण्यात आले. ज्या मागे प्रादेशिक असमतोल दूर होऊ शकेल अशी अपेक्षा होती. या असमतोलाच्या भावनेतून वेगवेगळया राज्याच्या मागणीचा आग्रह हा भारतीय लोकशाही पुढील आव्हान ठरत आहे. कारण प्रादेशिक पक्षांच्या राजकीय हव्यासापोटी त्यांच्या पाशी असलेल्या सत्ताधिकार यातून त्या राज्याच्या विभाजनतेला अनुकूलता दाखवली जात आहे. हेच भारतीय लोकशाहीच्या अखंडतेला आव्हान ठरले आहे..

5) **धर्मांधता** :

भारतामध्ये विविध धर्माने संस्कृती अस्तित्वात आहेत. हे विविध धर्म कित्येक शतकापासून एकत्र राहत आहेत. मुख्य धर्मामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, जैन, बौद्ध याचा समावेश होतो. या

भिन्न धर्मीय लोकात ऐक्याची सहकार्याची भावना आढळत नाही. भारतात हिंदू मुस्लिम संघर्षातून देशाची फाळणी झाली. धर्मांधतेमुळे लोक आपल्या धर्माचे संरक्षण पालन करतात.धार्मिक विषमतेतून भारतात अनेक दंगली झाल्या.1984 पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या, 1992 बाबरी मशीद प्रकरण, 2002 गोद्रा हत्याकांड अशा अनेक छोट्या-मोठ्या दंगली झालेल्या आपणाला दिसून येतात. थोडक्यात राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने विचार केल्यास ही बाब अतिशय चिंतनीय वाटते.भारतीय राजकारणावर सामाजिक विषमतेचा फार मोठा परिणाम झालेला आहे. भारतातील राजकीय पक्ष जनतेच्या धर्मांधतेचा फायदा घेताना दिसतात. राजकीय नेते लोकांच्या धार्मिक व जातीयतेच्या भावनांना खतपाणी घालून त्यांची मते मिळतात. त्यामुळे लोकशाही समोर एक आव्हान निर्माण झालेले आहे.

6) **दहशतवाद:**

सध्या भारतीय लोकशाही समोरील एक गंभीर स्वरूपाचे आव्हान म्हणून दहशतवादाच्या समस्याकडे पाहिले जाते. कारण सध्या भारतामध्ये होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांची मालिका सतत सुरू असून त्यामुळे जनजीवन विस्कळीत होताना दिसून येत आहे. आज जरी दहशतवादी हल्ल्याचे प्रमाण हे अधिक वाढलेले दिसत असले तरी भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांनी निर्मितीपासूनच काश्मीरच्या विलीनीकरणाच्या प्रश्नावरूनच त्याची सुरुवात झालेली दिसून येते. भारतात सतत होणाऱ्या दहशतवादी कारवायांमुळे भारताची अंतर्गत शांतता व सुव्यवस्था धोक्यात आलेली दिसून येते. आज दहशतवादाने भयावह स्वरूप धारण केलेले आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाची संहारक शक्ती वाढली आहे. न्यूट्रॉन, हायड्रोजन बॉम्ब अशा अस्त्रांचे शोध लागले आहेत. तसेच क्षेपणास्त्राच्या शोधामुळे अशी विनाशक अस्त्रे कितीही लांब पडल्यावर अचूक टाकता येऊ शकतात. महासत्ता असलेल्या अमेरिकेवर हल्ला करून या दहशतवाद्यांनी जगाला विचार करायला भाग पाडले आहे. आज या हल्ल्याची भयावहता आणि संहारक शक्ती कमी आहे. याचे कारण अजून तरी जगातील अनुषक्ती पर्यंत त्यांचे हात पोहोचलेले नाही.आज जगभरात अण्वस्त्रे निर्माण

करून साठवून ठेवल्या जात आहे. या शक्तीवर प्रत्येक देशाच्या शासनाचे नियंत्रण आहे आणि हे साठे कोणाच्या हाती लागू नये म्हणून ती सांभाळून ठेवली जात आहे. परंतु पाकिस्तान सारख्या अनेक दुबळी लोकशाही असणाऱ्या व स्वतः दहशतवादाला थारा देणाऱ्या या राष्ट्रांना पुढे हे शक्य झाले  तर जगाचा विनाश होणार यात शंका नाही. म्हणून आज केवळ भारतासारख्या एखाद्या राष्ट्राची दहशतवाद ही समस्या राहिली नाही तर संपूर्ण जगापुढील एक प्रमुख समस्या म्हणून आज या समस्येकडे पाहिले जाते.

7) **नक्षलवाद** :

नक्षलवाद हे देखील भारतीय लोकशाही पुढील एक गंभीर समस्या आज ही समस्या एक चिंतनाचा विषय ठरत आहे. ही समस्या निर्माण होण्यास अनेक कारणे आहेत याचा व वास्तव दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. नक्षलवादी चळवळ ही मुळातच साम्यवादी विचारसरणीतून उदयाला आलेली चळवळ आहे. सुरुवातीच्या काळात नक्षली चळवळ हे शोषित,आदिवासी व कष्टकरी वर्गाच्या संदर्भात कार्य करणारी चळवळ होती. पण आज या चळवळीच्या कार्याची पद्धत बदललेली आहे. अमानुषपणे हत्या करणे, आधुनिक शस्त्रास्त्रे बाळगणे, अवैध व्यापार करणे, सनदी अधिकारी, पोलीस, राजकीय नेते यांचे हत्या करणे, अपहरण करणे इत्यादी कृतीवर अधिक भर देताना दिसतात, यामुळे भारताच्या शांतता स्थैर्य व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.

नक्षलवादी चळवळीची सुरुवात त्यावेळी झाली तेव्हा ही चळवळ सुरू होण्या पाठीमागे एक विचार होता. सुरुवातीच्या काळात या चळवळीने विचारांशी असलेली बांधिलकी जपली होती. परंतु नंतरच्या काळात विशेषता सध्याच्या स्थितीत या चळवळीने जे रूप धारण केले आहे यावरून हेच जणू या चळवळीचे मुख्य ध्येय आहे की काय असे वाटायला लागले आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी ते निर्माण करण्याचे काम नक्षलवादी चळवळ करताना दिसून येत आहे.

**सारांश:**

एकूणच भारतीय लोकशाहीचा विचार करता आज भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने उभे आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की भारतीय लोकशाही मुळे जनतेला फक्त वाईट दिवस आले तर चांगले हि आले. परंतु चांगले आणि वाईट यांची गोळाबेरीज केली तर वाईटचे प्रभुत्व अधिक आहे. देशातील राज्यकर्त्यांचे चारित्र्य शुद्ध झाले आणि त्यांनी नैतिकतेचा मार्ग अवलंबला तर देशाची लोकशाहीची गडी रुळावर यायला फारसा वेळ लागणार नाही. त्याच बरोबर जनतेनेही लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आपल्या राजकीय हक्का प्रती जागृत होण्याची आवश्यकता आहे. जनता जर जागरूक झाली तर नवी आव्हाने पेलण्यास भारतीय लोकशाही सक्षम होईल यात शंका नाही.

**संदर्भसूची:**

1. डॉ. पंडीत नलावडे, भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
2. के सागर, समग्र राज्यशास्त्र, के सागर प्रकाशन, पुणे.
3. एरंडे पी एल, भारतीय लोकशाही अपेक्षा आणि वास्तव, निर्मल प्रकाशन, नांदेड.
4. अरुण सारथी, भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने, रविराज प्रकाशन, पुणे.

***

# भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने

## राजेश गंगाधरराव उंबरकर
नेताजी सुभाषचंद्र बॉस कॉलेज नांदेड

आर्थिक संदर्भात बोलायचे तर आर्थिक सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा असे वर्गीकरण करता येईल. पंतप्रधानांच्या या संदेशामुळे येणा-या अर्थसंकल्पात त्यांना काय अपेक्षित आहे याचा अंदाज आपण करू शकतो. अर्थसंकल्पीय भाषणाचे दोन भाग असतात. पहिला सरकारच्या आर्थिक धोरणाचे विवेचन करणारा आणि दुसरा करयोजना सांगणारा. पहिला भाग पंतप्रधानांनी आधीच लिहिला आहे. आता अर्थमंत्र्यांना त्यात महत्त्वाचे तपशील भरायचे आहेत.

आर्थिक सुरक्षेमध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न वित्तीय तुटीचा आहे. ही तूट 4.6 टक्के असेल असे वाटत होते, पण ती प्रत्यक्षात त्याच्याही वर जाऊन पोहोचणार आहे. जागतिक आर्थिक मंदी आणि भारतीय उद्योगांना मंदीला तोंड देण्यासाठी द्यावी लागलेली खास पॅकेजेस यामुळे गेल्या वर्षी वित्तीय तुटीचे प्रमाण वाढले होते. अर्थात सरकारने हा निर्णय समजून उमजून घेतला होता. गेल्या वर्षात अपेक्षित असलेला महसूल 20 ते 25 हजार कोटींनी कमी गोळा झाला. जागतिक अर्थव्यवस्था दोलायमान असल्याने काही सार्वजनिक उद्योगांतील समभाग विकून पैसे उभारण्याचे सरकारने ठरवले होते. ते प्रत्यक्षात येऊ शकले नाही. साहजिकच ही सगळी तूट भरून काढण्यासाठी सरकारला वित्तीय बाजारातून 90 हजार कोटी उभारावे लागले. याचा मोठा परिणाम पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पावर होणार आहे. सरकारी खर्च कमी करण्याचे सर्व प्रयत्न, अनुदान कमी न करता आल्यामुळे फिसकटले आहेत. पेट्रोलियम पदार्थ आणि खते यासाठी द्यावे लागणारे अनुदान इतके मोठे आहे की, त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो आहे. पेट्रोल हे इंधन सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात वापरतात. त्यावरचे अनुदान काढून टाकल्यानंतर डिझेलवरचे अनुदान

का चालू ठेवायचे, हा प्रश्न सातत्याने विचारला जात आहे. घरगुती गॅससह इंधनावरचे सर्व अनुदान रद्द केले तरच अनावश्यक सरकारी खर्च कमी होईल, असा मोठा मतप्रवाह आहे. खतांवरील अनुदानही बंद करून या सर्व अनुदानांसाठी लागणारा पैसा ग्रामीण भागात विद्युतीकरणासाठी वापरावा, असा आग्रह सर्व घटकांकडून धरला जात आहे. याचे प्रतिबिंब येणा-या अर्थसंकल्पात पाहायला मिळेल.

सन 2008-09 मध्ये जागतिक मंदीला तोंड देण्यासाठी उद्योगांना ज्या सवलती दिल्या गेल्या होत्या त्या गेल्या वर्षीच संपुष्टात येतील असे वाटत होते, पण त्याच वेळी युरोपीय अर्थव्यवस्थाही गटांगळ्या खाऊ लागल्यामुळे सरकारने सावध भूमिका घेत हा निर्णय टाळला होता. या वर्षी तो सरकारला घ्यावा लागेल, असे स्पष्ट दिसत आहे. पण गेले संपूर्ण वर्ष उत्पादन क्षेत्रातील वाढीचा दर मंदावतो आहे. त्यामुळे हा निर्णय एकदम घेतला जावा की सवलती टप्प्याटप्प्याने मागे घ्याव्यात एवढाच पर्याय सरकारसमोर आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीने तर एक्साइज ड्यूटी आणि सेवाकर वाढवावा, असा आग्रह धरला आहे.

अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने अप्रत्यक्ष करात सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारने गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स या नावाने आणलेली योजना इतर राजकीय पक्षांच्या विरोधामुळे अडचणीत आली आहे. सरकारने यासंबंधी ताठर भूमिका न घेता भाजपसह सर्व प्रमुख विरोधी पक्षांशी तपशीलवार चर्चा करून ही योजना मार्गी लावली पाहिजे. रिटेल क्षेत्रात परदेशी गुंतवणूक करण्यासंबंधीचा निर्णय सरकारला मागे घ्यावा लागला. त्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांमध्ये चुकीचा संदेश गेला आहे. सरकारने या निर्णयाचे निमित्त करून, सर्व पक्षांशी परदेशी भांडवलाबाबत चर्चा केली पाहिजे. कारण अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी अशी परकीय गुंतवणूक आपल्याला हवी आहे. या गुंतवणुकीबरोबरच नवे तंत्रज्ञान, माल साठवणुकीची आणि वाहतुकीची अत्याधुनिक व्यवस्थाही येत असते, ज्याचा उपयोग इतर क्षेत्रांतही होतो हे लक्षात घेतले पाहिजे.

अर्थव्यवस्थेच्या सुरक्षेशी अन्न सुरक्षेचे आव्हानही जोडले गेले आहे. एकूण अर्थव्यवस्थेची वाढ सात टक्के दराने होत असताना शेती उत्पादन मात्र चार टक्क्यांच्या खाली घोटाळते आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात सतत वाढ होताना दिसत असली तरी अन्न सुरक्षेच्या दृष्टीने ती पुरेशी नाही. त्यासाठी पुन्हा एकदा ‘हरित क्रांती’ होण्याची गरज आहे. त्या दिशेने संशोधन आणि अन्न व्यवस्थापन या क्षेत्रात अधिक दमदार पावले टाकावी लागतील. खतांवरचे अनुदान काढून टाकत असताना महागणा-या रासायनिक खतांना स्वस्त जैविक खतांचा पर्याय देण्याचा विचारही करावा लागेल. अर्थसंकल्पात भरीव तरतूद करूनच हे घडवणे शक्य आहे.

विकासातील विषमता राज्याराज्यांमध्येसुद्धा आहे. उच्च उत्पन्न असलेल्या अनेक विकसित राज्यांनी आपल्याकडील गरीबी कमी करण्यात यश मिळवले आहे. पण आसाम, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्य प्रदेश, ओरीसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही राज्ये विकासात मागे पडली आहेत. विकासातील विषमता राज्याराज्यांमध्येसुद्धा आहे. उच्च उत्पन्न असलेल्या अनेक विकसित राज्यांनी आपल्याकडील गरीबी कमी करण्यात यश मिळवले आहे. पण आसाम, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्य प्रदेश, ओरीसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही राज्ये विकासात मागे पडली आहेत.

**आर्थिक विकास कायम न ठेवल्यास**

आर्थिक पातळीवर देश चांगली कामगिरी करत असला तरी आर्थिक स्थैर्य कायम राखण्यासाठी काही पावले उचलण्याची गरज आहे. पायाभूत प्रकल्प आणि सामाजिक विकास प्रकल्पांसाठी राखीव निधी मोठ्या प्रमाणात उभारावा लागेल. तेलाच्या वाढलेल्या किमती व तेलाची आयात यामुळे उद्योगातील तूट (ट्रेड डेफिशीट) वाढली आहे. त्यासाठी परकिय गंगाजळीचा साठा वाढवावा लागेल. अर्थात त्यात मोठी वाढ झालेली आहेच. हा साठा आता जवळपास तीन अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. सध्या सुरू असलेली सुधारणांची गती वाढवावी लागेल. हळूहळू होत असलेला विकास अडचणीचा ठरतो हे आंतरराष्ट्रीय उदाहरणांवरून दिसून आले आहे. देश स्वातंत्र्य झाला

तेव्हा आपल्याकडे देशवासीयांना पुरवता येईल एवढे अन्नही नव्हते. म्हणून नंतर डॉ. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरितक्रांती घडविण्यात आली. त्यामुळे उत्पादन वाढले आणि भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. आज दुष्काळ पडला तरी उपासमारीने गरीब मरतील अशी स्थिती नाही. हे हरीतक्रांतीचे यश आहे.

साठ वर्षांत हे कमावले या संपूर्ण काळात जगभरात उलथापालथ झाली. साम्यवादी राजवटी कोसळून पडल्या. शेजारच्या पाकिस्तानात हुकुमशाही राजवट आली. अनेक ठिकाणी बंड, उठाव झाले. वेगवेगळया भाषा, बोली, वेगवेगळया समस्या, वातावरण असूनही भारतात मात्र लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास अभंग राहिला. दुष्काळावर मात करण्यात आपल्याला गेल्या काही वर्षात यश मिळाले आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे रोजगार उत्पन्न होऊन निम्मापेक्षा गरीबी कमी झाली आहे. त्याचवेळी साक्षरताही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आरोग्य व्यवस्थाही सुधारली आहे. अगदी खेड्यातही आज किमान प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे उपचार मिळू शकतात. इतकेच काय पण आता परदेशातील लोक उपचारासाठी भारतात येऊ लागले आहेत. गेल्या तीन वर्षांपासून देशाच्या आर्थिक विकासाचा दर आठ टक्क्यांहून जास्त आहे. जगात सर्वांत वेगाने विकसित होणारी भारताची अर्थव्यवस्था आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात जगात भारताचे नाव आज घेतले जाते. भारतीय बुद्धिला मिळालेली ही जगन्मान्यता आहे. त्यामुळेच बीपीओ, टेलिकम्युनिकेशन्स, आणि फार्मास्युटीकल्समध्ये भारताचा दबदबा आहे. जगात सध्या भारतीय अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर आहे. भारतासमोरील आव्हाने उत्पन्न वाढल्यामुळे आता नागरिक मुख्य सुविधांचा दर्जा वाढविण्याची मागणी करत आहेत. पाणीपुरवठा, शिक्षण, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रांकडे लक्ष देण्याची गरज आहे. शिक्षण आता गावागावात मिळू लागले आहे. मात्र, त्यातून अपेक्षित ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. भारताच्या जन्मदरात दोन टक्के घट झाली असली तरी लग्नानंतर मुलींच्या मृत्यूच्या दरात मात्र थोडी वाढ झाली आहे. बालमृत्यूचे

प्रमाणघडले असले तरी कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबले नाहीत. पायाभूत सुविधांमध्ये वीज, रस्ते, वाहतूक आणि बंदरे यांची मोठी गरज आहे. आर्थिक विषमता विकासाच्या वाटेवर चालताना देशातल्या देशात अनेक विषमता निर्माण होत आहेत. 1990 नंतर देश वेगाने विकास करत असताना उत्पन्नात मोठी वाढ झाली. मात्र श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण भाग, विकसित आणि अविकसित भाग, कुशल कामगार आणि अकुशल कामगार यातील दरी मात्र वाढली आहे. यातून नवी विषमता जन्माला आली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत.

**विकासातील विषमता**

भारतातील शेती विकासाचा दर अत्यंत कमी आहे. अद्यापही दोन तृतीअंश भारतीय शेतीवर अवलंबून आहेत. पण शेतीतून मिळणारे उत्पादन आणि उत्पन्न अत्यंत कमी आहे. आर्थिकदृष्ट्या ती न परवडणारी आहे. अनेक ठिकाणी ती पारंपरिक रितीने केली जाते. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनाही जुन्याच आहेत. शेतमाल बाजारपेठेत नेण्याची योग्य वाहतूक व्यवस्था नाही. मार्केटपर्यंत जायला रस्ते नाहीत. शेतकरी बाजारही नियमांच्या कचाट्यात आणि मक्तेदारीच्या जाळ्यात अडकले आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. सेवा क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होत असताना दुसरीकडे बेरोजगारांचा आकडाही वाढत आहे. त्यातही अकुशल कामगारांना हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे.

**आधारः** जागतिक बॅंकेचा अहवाल

# पर्यटन आणि भारतीय अर्थव्यवस्था

प्रा. डॉ. मोहोकर हरिहर शिवदास
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, इंदिरा गांधी वरिष्ठ
महाविद्यालय,सिडको, नांदेड,

**प्रस्तावना:**

पर्यटन हा प्राचीन व्यवसाय आहे. जागतिक स्तरावर पर्यटन हा व्यवसाय प्रचंड वेगाने विस्तारत आहे. वर्तमान काळात अनेक देशांची अर्थव्यवस्था हि पर्यटनावर अवलंबून आहे. तसेच देशाचा वेगवान विकास साध्य करण्यासाठी पर्यटन व्यवसायाची कास प्रत्येक देश धरताना दिसून येतो. जगातील अनेक देशान प्रमाणेच भारतात देखील पर्यटन व्यवसायास फार मोठा वाव आहे. कारण भारतात निसर्ग सौंदर्य, विविधतेने नटलेली भारतीय संस्कृती, भारताचा ऐतिहासिक वारसा, भारतीय लोकांची जीवन शैली यासारख्या पर्यटन व्यवसायाला आवश्यक असणाऱ्या बाबी भारतात देखील प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास व रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण करण्यासाठी भारतीय लोकांनी एक संधी म्हणून बघितल्यास भारताच्या विकासाची वेगळी दिशा निश्चित होणार आहे.

भारत हा पर्यटनासाठी आकर्षक बनण्याचे कारण म्हणजे भारताला लाभलेला सात हजार पाचसे किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा, निसर्गसंपन्न हिमालय, बारमाही वाहणाऱ्या नद्या, भारतातील पक्षी व वनस्पतींच्या विविध जाती, भारतीय लोकांचा आदर भाव, भारतातील खाद्यसंस्कृती, भारताची कुटुंब व्यवस्था इत्यादी सारख्या बाबी भारतात मोठ्या प्रमाणात पर्यटन क्षेत्र रुजविण्यासाठी सहाय्यक ठरत आहे. म्हणूनच

वर्तमान काळात भारतातील पर्यटन व्यवसाय बळकट होताना दिसून येत आहे.

**उद्दिष्टे:**

१) पर्यटनाची संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) भारतातील पर्यटन व्याप्ती चा अभ्यास करणे.

३) पर्यटनाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात साठी द्वितीय सामग्रीचा अवलंब केला आहे. त्यामध्ये संपादित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, अहवाल, इत्यादी

**पर्यटनाचा अर्थ:**

पर्यटन म्हणजे काय हे सांगताना अनेकांनी पर्यटनाचा वेगळा अर्थ काढला आहे.जोस अँरिलाग यांच्या मते,सायकल वरून प्रवासासाठी फिरणे, गिर्यारोहण, नौका विहार, खेळ, इत्यादी म्हणजे पर्यटन होय.जागतिक पर्यटन संघटनेच्या मते, एखाद्या व्यक्तीने आपल्या कायम वास्तव्य पासून तात्पुरत्या काळासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.हरमन यांच्या मते,विदेशात व्यक्तीचे आगमन व प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे म्हणजे पर्यटन होय.

**पर्यटन क्षेत्राची व्याप्ती:** पर्यटन हे फार मोठे क्षेत्र आहे.वर्तमान काळात देशातील प्रत्येक क्षेत्रांमध्ये पर्यटन शिरलेल आहे.म्हणून पर्यटनाची व्याप्ती पुढील प्रमाणे दर्शविता येते.

१) कृषी पर्यटन: कृषी पर्यटनाची संकल्पना सर्वप्रथम ब्राझील या देशाने विकसित केली, मानवाला शेतीचे मोठ्या प्रमाणात आकर्षण असते. अशावेळी शेती क्षेत्रामध्ये किंवा शेत जमिनीवर आकर्षक टेकड्या, निसर्गरम्य वातावरण, विविध प्रकारच्या झाडांच्या जाती, विविध प्रकारचे पक्षी, कृषी प्रक्रिया उद्योग,लहान मुलांना बैलगाडीची सफर, ग्रामीण खाद्य व हुरडा पार्टी यासारख्या बाबी कृषी क्षेत्रामध्ये निर्माण करून कृषीला पर्यटनाचे स्वरूप दिले जाते व त्यातून कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत आहे.

२) ऐतिहासिक पर्यटन: भारतामध्ये अनेक गड किल्ले आहेत. अनेक लढाया भारतात झाल्या आहेत. अनेक ऐतिहासिक स्थळ आहेत. यांचा स्वतंत्र असा इतिहास आहे. तो इतिहास जाणून घेण्याची जगातील प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते. म्हणून अशा ऐतिहासिक स्थळांचा विकास करून भारतात ऐतिहासिक पर्यटन मोठ्या प्रमाणात रुजविता येते.

३) धार्मिक पर्यटन: भारत हा अनेक धर्मांनी नटलेला देश आहे.भारतात प्रत्येक धर्माची वेगळी परंपरा आहे, वेगळे उत्सव आहे. वेगवेगळे प्रार्थना स्थळे आहेत.अशा ठिकाणी पर्यटकाला आकर्षित करण्यासाठी पळवे पर्यटन क्षेत्र विकसित केले जात आहे.

४) शैक्षणिक पर्यटन: भारतात प्राचीन काळापासून शिक्षणाला मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले जाते, भारतात प्राचीन काळी तक्षशिला, नालंदा सारखी विद्यापीठे जागतिक स्तरावर प्रसिद्ध होती.आजही भारतातील अनेक विद्यापीठे,शैक्षणिक संस्था

जगामध्ये प्रसिद्ध आहेत.त्याचा अभ्यास करण्यासाठी,ध्यानधारणा करण्यासाठी,मानसिक शांतीसाठी तसेच भारतीय ज्ञानाचा व शिक्षणाचा अनेक देशातील लोक फायदा घेऊ इच्छितात. म्हणून भारतात शैक्षणिक पर्यटन मोठ्या प्रमाणात विकसित झाली पाहिजे

५) थंड हवेची ठिकाणे: भारतामध्ये निसर्गता अनेक ठिकाणी थंड हवेची ठिकाणे निर्माण झाली आहेत. त्यामध्ये कश्मीर, महाराष्ट्रातील महाबळेश्वर, लोणावळा, खंडाळा, माथेरान ही थंड हवेची ठिकाणे आहेत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटन आकर्षित होत आहे.

६) औद्योगिक पर्यटन: भारतामध्ये सूतगिरण्या,हात माग,लाकडी खेळणी, इत्यादी सारख्या परंपरागत उत्पादन घेतले जाते ते उत्पादन घेण्याची पद्धती वेगळी आहे त्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी व उत्पादन जाणून घेण्यासाठी विदेशातील अनेक पर्यटक भारतात येतात.

७) साहसी पर्यटन: भारतामध्ये प्रचंड स्वरूपात पर्वत रांगा आहेत. त्या पर्वतरांगांमध्ये गिर्या रोहन, जंगल भ्रमंती, ट्रेकिंग यासारख्या बाबी करण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात.म्हणून भारतात साहसी पर्यटनाला मोठ्या प्रमाणात वाव आहे.

**पर्यटनाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम:**

पर्यटन हा असा व्यवसाय आहे ज्या व्यवसायामध्ये पर्यटक हा स्वतः पर्यटनस्थळी येऊन भेट देतो, भेटीदरम्यान तो पर्यटन स्थळावर मोठ्या प्रमाणात खर्च करतो. त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून आपल्या अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होते.

पर्यटनाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था कशी प्रभावित होते ते पुढील प्रमाणे सांगता येते

१) आर्थिक विकासाला साहाय्य

पर्यटनाच्या माध्यमातून देशाचा जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते. परंतु पर्यटन व्यवसाय देशात विकसित होण्यासाठी देशातील सरकारने पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी धोरण निर्माण केली पाहिजे, देशामध्ये पर्यटकांना राहण्यासाठी उत्तम दर्जाची हॉटेल्स निर्माण केली पाहिजे, पर्यटन देशांमध्ये रुजविण्यासाठी लोकांची मानसिकता निर्माण केली पाहिजे, देशाबाहेरील पर्यटक देशात येण्यासाठी ज्या कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागते त्या सहज पर्यटकांना करता आल्या पाहिजे तरच देशांमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक येऊन पर्यटन व्यवसाय वाढीस लागतो. पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या देशात गुंतवणूक होते, अनेक लोकांना रोजगार प्राप्त होतो, अनेक वस्तूंची खरेदी होते.त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळते

२) परकीय चलन प्राप्ती:

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय असून पर्यटकांच्या माध्यमातून देशाला मोठ्या प्रमाणात विदेशी चलन प्राप्त होते,जसे भारतातील महत्त्वाच्या पर्यटनस्थळाला जेव्हा विदेशी पर्यटक भेट देतात तेव्हा ती पर्यटक पर्यटनस्थळी आपल्यासोबत आणलेल परकीय चलन खर्च करतात. भारतासारख्या विकसनशील देशांच्या दृष्टिकोनातून ही एक जमेची बाजू आहे.कारण परकीय चलन हे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरते.विदेशी देणी देण्यासाठी ते उपयोगी पडते. म्हणून परकीय

चलनाच्या माध्यमातून देखील पर्यटन व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे.

३) रोजगार निर्मिती

पर्यटनाच्या माध्यमातून देशाला तिसरा होणारा महत्त्वाचा फायदा म्हणजे पर्यटनाच्या माध्यमातून देशात मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्त होतो. जसे पर्यटनस्थळी हॉटेल्स निर्माण केली जातात, त्या हॉटेल्स मध्ये मालकाला, नोकराला, कुकला, वेटरला रोजगार प्राप्त होतो, स्थानिक भागातील वाहतूक करणाऱ्या घटकांना देखील रोजगार प्राप्त होतो. तसेच पर्यटन विषयक माहिती देणाऱ्या गाईड्स ला देखील रोजगार प्राप्त होतो..

४) बाजारपेठेचा विकास :

पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बाजारपेठेचा विस्तार झालेला दिसून येतो.भारतामध्ये आग्रा या ठिकाणी ताज महल असणाऱ्या परिसरात मोठ्या प्रमाणात बाजारपेठ विकसित झाली आहे.या बाजारपेठे मध्ये आकर्षक वस्तू, कलाकुसरीच्या वस्तू, स्वेटर्स, शाली, लाकडी खेळणी, चांदीच्या वस्तू, गृह सजावट वस्तु, गालिचे इत्यादींची मोठ्या प्रमाणात विक्री होते. आग्रा प्रमाणेच भारतातील उटी, शिमला, कश्मीर, जयपुर इत्यादी पर्यटनस्थळी मोठ्या प्रमाणात बाजारपेठा विकसित झाल्या आहेत.

५) सरकारी उत्पन्नाचे साधन:

पर्यटनाच्या माध्यमातून सरकारला देखील मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत आहे.जसे पर्यटन स्थळे चालवली

जाणारी हॉटेल्स, रेस्टॉरंट, खानावळी, क्लब इत्यादींवर सरकार कर आकारते त्यामुळे या करातून सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. तसेच पर्यटन स्थळे चालविणाऱ्या व्यक्तीवर देखील सरकार मोठ्या प्रमाणात कर लावते. त्यातून देखील सरकारला उत्पन्न प्राप्त होते.

६) स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत:

भारतामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. कारण बाहेरून येणारा पर्यटक स्थानिक बाजारपेठेत वस्तू खरेदी करतो. स्थानिक बाजारपेठेत तो वस्तू खरेदी करताना स्थानिक लोकांपेक्षा जास्त किंमत देतो. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात फायदा होतो. याशिवाय स्थानिक भागांमध्ये हॉटेल्स, टॅक्सीवाले, गाईड्स, यांना देखील पर्यटकांच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त होते त्यामुळे त्यांच्या देखील जीवन मानात बदल होतो. एकूणच स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी पर्यटन व्यवसाय फायद्याचा ठरतो.

**समारोप**:

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पर्यटन हा अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय असून अलीकडील काळात या व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.भारतातील प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश स्वतंत्रपणे पर्यटन व्यवसाय विकसित करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. जसे महाराष्ट्र सरकार, कर्नाटक सरकार, गुजरात सरकार, आंध्रप्रदेश सरकार, मध्यप्रदेश सरकार इत्यादी स्वतंत्रपणे पर्यटन विभाग स्थापन करून पर्यटनाच्या

वृद्धि साठी प्रयत्न करत आहे. त्याचेच फलित म्हणून आज भारतातील प्रत्येक राज्यात पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणात विकसित झालेला दिसून येतो. येणाऱ्या काळात पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये एक वेगळी ओळख निर्माण होणार आहे.

**संदर्भ सूची:**


१) घारपुरे विठ्ठल,पर्यटन,भूगोल पिंपळापुरे,पब्लिशर्स नागपूर,२००९

२) कुलकर्णी एस.व्ही.महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगातील संधी,उद्योजक,महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र.

३) बॅनर्जी रत्नदीप,भारतातील पर्यटन क्षेत्राचा आढावा.

४) मनीषा चौधरी,पर्यटन क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम,अर्थसंवाद,२०१७.

५) संतोष दास्ताने,भारत,२०००.


***

# ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती

श्री एस. के. वाहुळकर

वसमत

प्रस्तुत लेखात ग्रंथालय आणि वाचन संस्कृती म्हणजे काय ? हे सांगून वाचनसंस्कृतीच्या विकासात ग्रंथालयाचे विविध उपक्रम राबविण्यात ग्रंथालयाची भूमिका विशद केली आहे. ग्रंथालय ही एक सेवाभावी संस्था आहे. या माध्यमाद्वारे वाचनसंस्कृती विकसित होते. वाचनामुळे वाचकाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात व व्यक्तिमत्वाचा विकास होतो.  तसेच वाचनसाहित्याचे जतन आणि संवर्धन करुन पुढच्या पिढीला सांस्कृतिक ठेवा म्हणून उपलब्ध करून वाचन संस्कृतीची जबाबदारी ग्रंथालयपार पाडतात. म्हणूनच या विषयाचे ग्रंथप्रेमीना सहजच आकलन व्हावे आणि वाचनसंस्कृती विषयी वाचकात अभिरूची निर्माण व्हावी हा हेतू या लिखानामागे आहे.

**प्रस्तावना :-**

आजच्या स्पर्धेच्या युगात वाचनाची आवड असायला हवी तरच वाचनसंस्कृतीत वाढ होईल ' वाचाल तर वाचाल '  हा विचार आजच्या युगात किती समर्पक आहे.  हे आपण सर्वजण जाणतो. आजच्या वाचकाच्या ठिकाणी असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या साहाय्याने माणूस विद्वान प्रगल्भ तर होतोच परंतु त्याच्या कार्य संस्कृतीवर त्याचा प्रभाव पडतो. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झाले आहे. अशी चर्चा सर्वच स्तरातून होते. वाचनसंस्कृती टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक माणसाचे मन सुविचार संपन्न होण्यासाठी वाचनाची आवड मुळातून निर्माण

होणे आवश्यक आहे. वाचनामुळे माणसाचे व्यक्तिमत्व खुलत असते. पुस्तकाचे वाचन कराल तेवढच ज्ञान वाढत जाईल. 'ग्रंथ हेच गुरू' मानून जास्तीत जास्त वाचनामुळे वाचक हा चिंतनशील बनतो, चांगला विचार करतो व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. त्यामुळे चांगले जीवन जगण्यास मदत होते. वाचन म्हणजे जीवनातील उन्नत करणारी उल्हासित करुणारी बाब असून त्यामुळे बुध्दीची मशागत होते आणि चांगले जीवन जगण्यांचा मार्ग सापडतो. वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृध्द करा आपल्या ज्ञानात वाढ करण्यासाठी वाचन हा एकमेव मार्ग आहे. वाचनातून मिळालेले ज्ञान माणूस केवळ ज्ञानासाठी किंवा मानसिक समाधानासाठी मिळवतो असे नाही तर त्या ज्ञानाचा वापर करून तो निसर्गावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळया सुखसमाधानाची निर्मिती करतो. ज्ञान मिळविणे व ते वितरित करणे, ज्ञानाची पद्धतशीर रचना करणे व तिचा सुखसमृध्दीसाठी वापर करणे हा सर्वज्ञानाचा व्यवहार वाचनसंस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. वाचनसंस्कृतीचे विकास करण्याचे मुख्य कार्य आजची ग्रंथालये आणि ग्रंथपाल करीत आहेत यांना सरकारची आणि समाजाची सहकार्य मिळणे गरजेचे आहे.

**ग्रंथालय या शब्दाचा अर्थ :-**

इंग्रजीतील 'लायब्ररी' या शब्दांचे मराठीत भाषांतर ग्रंथालय, वाचनालय असे आहे. मूळ ग्रीक व लॅटिन लिपी मध्ये असलेला हा शब्द मराठीत पुस्तकाचे कपाट या अर्थाने वापरण्यात आला आला.

१) ' ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान ज्या ठिकाणी ग्रंथ एकत्र केले जातात ही जागा म्हणजे ग्रंथालय '. ग्रंथालय ही सामाजिक संस्कृतीचा

वारसा जपणारी केंद्रे आहेत. ग्रंथालयाचे ग्रंथ, वाचक आणि कर्मचारी हे तीन घटक महत्त्वाचे आहेत.

२) वाचन संस्कृती म्हणजे मनाची सर्वसाधारण स्थिती किंवा प्रवृत्ती होय.

३) वाचन संस्कृती म्हणजे त्या त्या समाजात विकसित झालेल्या कलात्मक व बौध्दिक कृतीची समग्रता होय.

जसे आई मुलांना संस्काराचे धडे देते व शिक्षक संस्कार मूल्य रूजवतात त्याचप्रमाणे ग्रंथ वाचकांना संस्कार देतात. 'श्यामची आई' हा साने गुरुजीचा ग्रंथ मूल्य संस्कार देणारा आहे. 'एक होता कार्व्हर', डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख' हे आत्मचरित्र, संभाजी राजे यांचा 'बुध्दभूषण ग्रंथ', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र ग्रंथ हे माणसाचे जीवन परिवर्तन करणारे ग्रंथ आहेत.

सुसंस्कृत माणसाने वाचनसंस्कृती टिकविणे आवश्यक आहे. जीवनातील दुःख कमी करण्यासाठी ग्रंथासोबत मैत्री करणे आवश्यक आहे. जीवनातील नैराश्य, अज्ञान, दारिद्र्य कमी करण्यासाठी पुस्तके वाचणे महत्वाचे आहे. महात्मा फुले म्हणतात की, एवढे अनर्थ एका विद्येने केले म्हणून वाचन महत्त्वाचे आहे. ग्रंथ जीवन जगण्याकरिता बळ देतात. म्हणून प्रत्येकाच्या घरात पुस्तकाच कपाट असण गरजेच आहे. वाचनामुळे माणसात आत्मविश्वास निर्माण होतो. हा सर्वात मोठा आधार वाचनामुळे निर्माण होतो.

खालील उपक्रमामुळे वाचन संस्कृती विकसित होते.

१) ग्रंथ प्रदर्शन / ग्रंथदिंडी

२) कार्यशाळा

३) व्याख्यान

४) चर्चासत्र

५) सांस्कृतिक मेळावे

६) सामुहिक वाचन

७) निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व, वादविवाद स्पर्धाचे आयोजन

८) आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग

९) जागतिक ग्रंथालय दिनाचे आयोजन

१०) ग्रंथालय सप्ताहाचे आयोजन

११) वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन

१२) वाचनसाहित्याचा सामुहिक उपयोग

१३) ग्रंथालयात मुक्त प्रवेश

१४) वाचक शिक्षण

वरील उपक्रमामुळे वाचनसंस्कृतीचा विकास व वाढ होऊ शकते. ग्रंथप्रदर्शन व ग्रंथदिंडीमुळे ग्रंथाचा प्रचार आणि प्रसार होतो. या उपक्रमामुळे ग्रंथालयाविषयी वाचकांच्या मनात वाचनाची जिज्ञासा निर्माण होते. कार्यशाळा, व्याख्यान व चर्चासत्र यामधून वाचकास योग्य ती माहिती मिळते.

शाळा, महाविद्यालये व विद्यापिठ या अंतर्गत निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा याची तयार करण्यासाठी स्पर्धक ग्रंथालयातील ग्रंथाचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करतात.

खालील उल्लेखनीय शब्दांत जगदगुरु तुकाराम महाराज यांनी वाचनाचे महत्त्व सांगीतले आहे.

'आम्हा घरी धन' शब्दाचीच रत्ने

शब्दाचीच शस्त्रे यत्ने करू !

वाचनाचे संस्कार घरा घरात होण्याची गरज आहे. जीवनात ज्ञानाचे महत्त्व किती आहे हे त्यांनी सांगितले. म.जोतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ग्रंथालाच गुरू मानले. 'वाचाल तर वाचाल' हा विचार त्यांनी मांडला. पुस्तकांनी आम्हाला घडवले असे सांगत. त्यांच्या जडणघडणीत वाचनाचे आणि ग्रंथाचे महत्त्व विशद केले आहे. राज्यसरकारने माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम त्यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा केला आहे. केवळ शाळा, महाविद्यालयांनी हा उपक्रम साजरा करून चालणार नाही, तर सार्वजनिक ग्रंथालयांनी विशेष ग्रंथालयांनी सुसंस्कृत वाचकांनी हा उपक्रम राबवून वाचनाचे संस्कार घराघरापर्यंत पोहोचण्याची जबाबदारी ही सर्व सुजाण नागरिकांची आहे. आजची ग्रंथालये ही ख-या अर्थाने सामाजिक व सांस्कृतिक केंद्र व्हावेत याची वाचनसंस्कृती वाढीसाठी निश्चित मदत होईल.

पुस्तकेच माणसाचे वास्तविक मित्र असतात. पुस्तकेच गुरू व शिक्षक असतात अस ग्रंथाचं महत्व ग्रंथपालांनी वाचकाला सांगणे आवश्यक आहे. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयाचे पाच मूलभूत सिध्दांत मांडले.

१) ग्रंथ हे उपभोगासाठी आहेत

२) प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे.

३) प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे

४) ग्रंथालयाचा वेळ वाचला पाहिजे.

५) ग्रंथालय ही एक वर्धिष्णू संस्था आहे.

ही पाच मूलभूत सिंद्धांत ग्रंथालय वाचनसंस्कृती विकासासाठी पूरक आहे. हे संशोधन ग्रंथालयांनी जर उपयोगात आणल तर वाचन

संस्कृती वाढल्याशिवाय राहणार नाही. भारतीय ग्रंथालय चळवळीचे जन डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वरील पाच सुत्रापैकी तीन सुत्रे वाचन साहित्याचे महत्व सांगतात व शेवटीचे दोन सुत्रे ग्रंथालय व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शन करतात. ग्रंथालये ही ज्ञानाची ऊर्जाकेंद्रे आहेत. याकडे वाचकाला आकर्षिक करण्यासाठी ग्रंथालये वेगवेगळया माध्यमांचा वापर करतात.

ग्रंथालय या संस्थेच्या माध्यमातून प्रसिध्द लेखकांचे व्याख्यानाचे आयोजन केले तर परिसरातील आवड असलेल्या वाचकाला त्याचा उपयोग होईल. तसेच चर्चासत्र, कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी इ. ग्रंथ प्रदर्शनामुळे वाचकाच्या मनामध्ये ग्रंथ बघितल्यानंतर वाचन करण्याची जिज्ञासा निर्माण होते. सामान्य वाचक देखील वाचन करू शकतो. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यामुळे वाचकाचा ग्रंथालयाशी संपर्क येतो आणि यशस्वी होण्यासाठी प्रत्येक स्पर्धक वाचन करतो. जगातील ग्रंथालय दिनाचे औचित्य साधून ग्रंथाचे महत्त्व वाचकाला सांगितल्यानंतर वाचनसंस्कृती वाढीसाठी ते साहाय्य ठरते. प्रत्येक ग्रंथालय ही परिपूर्ण नसतात. त्यामुळे वाचकाच्या वाचन विषयक गरजा ते पूर्ण करू शकत नाहीत. म्हणून ग्रंथालयांनी वाचन साहित्याचा सामुहिक उपयोग करून वाचकाचे समाधान करावे. त्यामुळे वाचकाच्या मनात ग्रंथालया बदल सकारात्मक विचार निर्माण होऊन तो ग्रंथालयाकडे येत जाईल.

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचनसंस्कृतीची माध्यमे बदलली आहेत. आज ग्रंथालयाची जागा इंटरनेटने घेतली आहे. इंटरनेटवर एका क्लिकमध्ये अनेक लेखकांची ई-बुक्स वाचायला मिळतात. म्हणून आज ग्रंथालयाकडे वाचकाचा कल कमी झाला आहे.

ग्रंथालय ही पारंपरिक पध्दतीने न चालविता आज ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाची गरज आहे. तंत्रज्ञान ग्रंथालयाने जर स्वीकारली तर ग्रंथालयात येवून वाचक ऑनलाईन ग्रंथ वाचू शकतो.

वाचन संस्कृतीचा लोप झाला आहे का ?

राज्याच्या वाचन संस्कृतीचे धोरण समाधानकारक वाटत नाही. त्याचे कारण म्हणजे शासनाच्या वतीने राज्यात 'वाचन प्रेरणा दिवस' हा उपक्रम साजरा केला जातो. याचा आढावा शासन घेतो का ? यामुळे वाचनसंस्कृतीचा विकास होईल का ? हा प्रश्न निर्माण होतो. आजच्या युगात माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचा परिस्फोट होत आहे. रोज नवनवीन ज्ञान साहित्याची निर्मिती होत आहे. ही नवीन माहिती नेमकी अचूक माहिती खरेदी करण्यासाठी सरकारने गुंतवणुक करायला हवी. अशी मागणी पुढे येत आहे. डॉ.एस. आर. रंगनाथन यांनी मांडलेला पाचवा सिंध्दात म्हणजे ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. या सूत्राप्रमाणे दरवर्षी ग्रंथालयात ग्रंथाची वाढ होते ती संख्यात्मक होते की, दर्जात्मक होते हे गुण त्या त्या ग्रंथालयाचे वाचकच ठरवितात. वाचन संस्कृती टिकवावयाची जबाबदारी केवळ ग्रंथालयाचीच नाही तर ती प्रत्येक सुसंस्कृत नागरिकांची, पालकांची, ग्रंथदेणगीदारांची आहे. घराघरात मनोजरंनासाठी दूरदर्शन आहे. त्यात मुले गुंतून पडत आहे. संगणक, इंटरनेट, टॅब मोबाईल यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वावर वाढत चालला आहे. हॉटस्अपसारख्या माध्यमापलीकडे आजचा तरुण जाताना दिसत नाही. आज वाचनाचे माध्यम बदलले आहे. सार्वजनिक ग्रंथालयाच्या संदर्भात सांगायचे तर महाराष्ट्रातील काही अपवादात्मक ग्रंथालये सोडली तर बहुतांश ग्रंथालय ही समृध्द नाही. म्हणून तिकडे वाचक फिरकत नाहीत. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या

माध्यमाने वाचनसंस्कृती लोप पावते आहे का ? तर सर्वच वाचक संगणक साक्षर नाही असे वाचक यामाध्यमाकडे फिरकणार नाहीत. तर ते पारंपरिक ग्रंथालयाचाच उपभोग करतील. शालेय वाचकापासून महाविद्यालय व विद्यापीठाच्या वाचकापर्यंत तसेच सार्वजनिक व विशेष ग्रंथालयाच्या वाचकाचा ग्रंथवाचन हा सर्वांचा जिव्हाळयाचा विषय आहे. पूर्वी ग्रंथ मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय होते. आज ग्रंथालयाची जागा इंटरनेटने घेतली आहे. या माध्यमातून वाचकांना अनेक ई- बुक्स वाचायला मिळतात. अखिल भारतीय साहित्य संमेलने वाचकांना ई-बुक्स उपलब्ध करून देत आहेत. इंटरनेटमुळे गुगलच्या साहाय्याने एका क्लिकवर वाचक हे जगभरातील अनेक भाषांमधील असलेले ग्रंथ वाचू शकतात. इंटरनेटवर अनेक नामवंत लेखकांचा ब्लॉग असतो. आणि ही माहिती सोशल मिडियाद्वारे एकमेकांना शेअर केली जाते. यामुळे वाचनसंस्कृती ही लोप पावणार नाही तर ती विकसित होईल. आजच्या वाचकाच्या वाचन सवयी मध्ये त्या माध्यमामुळे पूर्वीपेक्षा वाढ झालेलीच आहे असे सांगता येईल. पुस्तक वाचण्याचे माध्यम कितीही बदलले तरी पुस्तक आणि वाचकामधील संवाद कधीच संपणार नाहीत. म्हणून आजच्या ग्रंथालयांनी वाचकांच्या वाचन सवयीचा अभ्यास करून त्यांच्या वाचनाच्या गरजाची पूर्तता करणारे वाचन साहित्य ठेवणे, वाचकाला ग्रंथालयाची तोंड ओळख करून देणे याचा वाचनसंस्कृती वाढीसाठीच उपयोग होणार आहे. ग्रंथालयात दर्जेदार ग्रंथ असणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाचनसंस्कृति लोप पावणार नाही. तर वाचन संस्कृतीसाठी त्याचा उपयोग होईल.

**सारांश :-**

अशा प्रकारे आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या ग्रंथालयात वाचक टिकवून ठेवण्यासाठी ग्रंथालयाने आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे, विविध शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे. आजच्या ग्रंथालयात प्रशिक्षित ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. आजची ग्रंथालये जर इंटरनेटला जोडली व जर या तंत्रज्ञानाचा ग्रंथालयाने उपयोग केला तर जास्तीत जास्त वाचक वाचन करतील. वाचनाला बरेच पर्याय आले असले तरी वाचनसंस्कृती ही लोप पावणार नाही. तर ती दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथ साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्याची भूमिका ही ग्रंथपालाची देखील आहे. त्यामुळे ग्रंथपाल हे वाचनसंस्कृतीचे महत्त्वाचे घटक आहेत.

***

# ग्रामीण उद्योजकता : ऊर्जितावस्थेची गरज

डॉ . पी. एम. शहापूरकर
सामाजिक कार्य महाविद्यालय, बा. आं. म. विद्यापीठ , औरंगाबाद

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील लोकसंख्येपैकी बहुतांश लोक ग्रामीण भागात राहतात आणि त्यापैकी 75% कामगार आजही शेती आणि संलग्न उद्योगामधून आपली उपजीविका करत आहेत. लोकसंख्या वाढत असली तरी जमीनीचे क्षेत्र वाढत नाही. जमीन मर्यादित असल्यामुळे शेती सर्वश्रमशक्ती सामील करू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात गरीबी व बेरोजगारी वाढतच आहे. तसेच भारतीय शेती ही कमी उत्पादकता आणि पावसाची अनिश्चितता याला सामोरी जाते हे वास्तव आहे. शेतीला राजाश्रय नाही. यामुळे ती कमकुवत आहे. पिकांवरील खर्च व उत्पादन यांच्यातील विसंगती, मूल्यवर्धनासाठी अपुरी पायाभूत सुविधा, कृषी क्षेत्राकडे शासनाचे दुर्लक्ष यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आणि गरिबी निर्माण होत आहे. यातून सामाजिक विघटनाच्या गोष्टीही घडत आहेत. युवकांमधील अस्वस्थता वाढत आहे. शेतीला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. गरीबी, बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. म्हणून गरीबी, बेरोजगारी आणि ग्रामीण भागातील शहरांकडे होणारे स्थलांतर सोडविण्यासाठी ग्रामीण उद्योग विकसित करण्याची गरज आहे. यासाठी ग्रामीण उद्यमशीलतेला चालना देण्याची गरज आहे.

राष्ट्राच्या विकासासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेची वाढ आणि विकास अत्यावश्यक बाब आहे. ग्रामीण व शहरी विषमता कमी होण्यासाठी आणि ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ग्रामीण उद्योगांची पायाभरणी करण्याची गरज आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे मागासलेपण सोडवण्यासाठी मदत होईल. यासाठी ग्रामीण आणि आदिवासी भागातील उद्योजकता विकसीत करणे हेच उत्तर आहे. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी ' ग्रामीण उद्योजकता ' एक प्रभावी माध्यम म्हणून उदयास

येत आहे. भारत सरकारही ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपाययोजना राबवत आहे. ही ग्रामीण उद्योजकता म्हणजे "ग्रामीण भागातील नवकल्पना या आर्थिक स्वरुपामध्ये रूपांतरित करण्यासाठी व्यावसायिक कौशल्ये अचूकतेने वापरात आणणे होय."

महाराष्ट्रातील खेडी नैसर्गिक संसाधनानी विपुलतेने नटलेली आहेत. याच खेड्यातील युवकानी विचाराची जोड देवून रोजगार निर्मीती केली तर ग्रामिण उद्योजकतेला वाव मिळेल.

**प्रस्तुत अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे**:

या विषयाची मांडणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे ठेवली आहेत.

1. आर्थिक विकासाभिमुख ग्रामीण उद्योजकतेचे विश्लेषण करणे.
2. ग्रामीण उद्योजकतेचे प्रमुख फायदे विशद करणे.
3. ग्रामीण उद्योजकतेतील समस्यांचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण भागातील उद्योजकतेतील समस्या सोडवण्यासाठी उपाय सुचवणे.

**भारतातील ग्रामीण उद्योजकता:**

स्मार्ट क्लास रूम की उपलब्धता का अध्ययन करने पर ज्ञात होता है, कि केन्द्रीय विद्यालय दुर्ग में इनकी संख्या मात्र 10 है, इनका अनुपात .004:1 है। केन्द्रीय विद्यालय बीएमवाय चरोदा दुर्ग में स्मार्ट क्लास रूम की संख्या मात्र 14 है, इनका अनुपात .0123:1 है। वहीं केन्द्रीय विद्यालय सीआईएसएफ दुर्ग में स्मार्ट क्लास रूम की मात्र 4 है, इनका अनुपात .006:1 है। इस प्रकार सबसे अधिक स्मार्ट क्लास रूम केन्द्रीय विद्यालय बीएमवाय चरोदा दुर्ग में है।

इस प्रकार दुर्ग जिले के समस्त केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना स्रोतों का अनुपात 8.40:1 प्रति विद्यार्थी है। वहीं स्माटकलस रूम का अनुपात .00743:1 प्रति विद्यार्थी है

अध्ययन में यह भी ज्ञात होता है, कि सभी विद्यालयों में ई–सूचना स्रोतों की सुदूर अभिगम्यता प्रदान की जाती है। वहीं सभी विद्यालयों में एक कन्सोरटियम की सहायता से ई–सूचना स्रोत उपलब्ध कराये जाते है।

**सारणी क्रमांक 3**

दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयों में इलेक्ट्रानिक सूचना स्रोतों की उपयोगिता

| क्र. | ई–सूचना स्रोतों की उपयोगिता | N= 80 | |
|---|---|---|---|
| | | उपयागकर्ता | प्रतिशत |
| 1 | ई–सूचना स्रोत का उपयोग | 78 | 97.5 |
| 2 | मल्टीमीडिया सूचना स्रोत का उपयोग | 79 | 98.5 |
| 3 | कन्सोरटिया का उपयोग | 64 | 80 |
| 4 | ई–सूचना स्रोतो की सुदूर अभिगम्यता | 62 | 77.5 |

सारणी क्रमांक 3 के माध्यम से ज्ञात होता है, कि दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयों में 97.5 प्रतिशत उपयोगकर्ता ई–सूचना स्रोतों का उपयोग करते है, 98.5 प्रतिशत उपयोगकर्ता मल्टीमीडिया सूचना स्रोतों का उपयोग करते है, कन्सोरटिया का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 80 प्रतिशत है। वहीं ई–सूचना स्रोतों की सुदूर अभिगम्यता करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 77.5 है।

**सारणी क्रमांक 4**

दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयो में ई–सूचना सेवाओं के माध्यम से विभिन्न प्रकार के ई–सूचना स्रोतों की उपयोगिता

| क्र. | ई–सूचना सेवाओं की उपयोगिता | N= 80 | |
|---|---|---|---|
| | | उपयागकर्ता | प्रतिशत |
| 1 | ई–पुस्तकें | 75 | 93.75 |
| 2 | ई–पत्रिकायें / ई–षोध पत्रिका | 62 | 77.5 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | ई–समाचार पत्र | 69 | 86.25 |
| 4 | मल्टीमीडिया सूचना स्रोत | 63 | 78.75 |

उक्त सारणी के तथ्यों के आधार पर ज्ञात होता है, कि दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना सेवा के माध्यम से ई–पुस्तकों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 93.75, ई–पत्रिकाओं का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 77.5, ई–समाचार पत्रों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 86.25 एवं मल्टीमीडिया सूचना स्रोतों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 78.75 है।

## सारणी क्रमांक 5

दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना स्रोतों तथा मल्टीमीडिया सूचना स्रोतो की शैक्षणिक उत्कृष्टता पर प्रभावशीलता

| क्रमांक | ई–सूचना स्रोतों एवं मल्टीमीडिया सूचना स्रोतों की शैक्षणिक उत्कृष्टता पर प्रभावशीलता का विवरण | N=80 | |
|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत |
| 1 | परीक्षाओं हेतु | 79 | 98.75 |
| 2 | प्रतियोगी परीक्षाओं हेतु | 75 | 93.75 |
| 3 | प्रोजेक्ट वर्क / असाईनमेंट हेतु | 77 | 96.25 |
| 4 | प्रतिभा / व्यक्तित्व विकास हेतु | 70 | 87.5 |
| 5 | सामान्य ज्ञान हेतु | 71 | 88.75 |

दुर्ग जिले के केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना स्रोतों तथा मल्टीमीडिया सूचना स्रोतों की शैक्षणिक उत्कृष्टता पर प्रभावशीलता से संबंधित तथ्यों को उक्त सारणी के आधार पर प्रदर्शित किया गया है। सारणी का अध्ययन करने पर ज्ञात होता है, कि परीक्षाओं हेतु ई–सूचना स्रोतों को प्रभावशील मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 98.75, प्रतियोगी परीक्षाओं हेतु ई–सूचना स्रोतो को उपयोगी मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 93.75, प्रोजेक्ट वर्क एवं असाईनमेंट हेतु ई–सूचना स्रोतों को उपयोगी मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 96.25, प्रतिभा एवं व्यक्तित्व विकास हेतु ई–सूचना स्रोतों को उपयोगी मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 87.5

एवं सामान्य ज्ञान प्राप्त करने हेतु ई–सूचना स्रोतों को प्रभावी माानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 88.75 है।

**निष्कर्ष**

विश्लेषण के आधार पर यह निष्कर्ष निकालता है, कि दुर्ग जिले के सभी  केन्द्रीय विद्यालयों में  इन्टरनेट एवं स्मार्ट क्लास रूम उपलब्ध है। वहीं कम्प्युटरों की नेटवर्किंग किसी भी विद्यालय में नहीं है। पुस्तकालय में ई–सूचना स्रोतों को उपलब्ध कराने हेतु मात्र एक विद्यालय में साफ्टवेअर उपलब्ध है।

विश्लेषण के आधार पर यह निष्कर्ष निकलता है, कि दुर्ग जिले के समस्त केन्द्रीय विद्यालयों में ई–सूचना स्रोतों  का अनुपात प्रति विद्यार्थी 8.40:1, स्मार्ट क्लास रूम का .00743:1 है। वहीं कन्सोरटियम की उपलब्धता विद्यालयों एवं शासन के प्रयास से शतप्रतिशत है। कन्सोरटियम के माध्यम से ई–सूचना स्रोतों की उपलब्धता सुनिश्चित हो जाती है।

तथ्यों के विश्लेषण से यह निष्कर्ष निकलता है, कि 97.5 प्रतिशत उपयोगकर्ता ई–सूचना स्रोतों, 98.5 प्रतिशत मल्टीमीडिया सूचना स्रोतों एवं 80 प्रतिशत ई–सूचना स्रोतों हेतु कन्सोरटिया का उपयोग करते है। वहीं 77.5 प्रतिशत उपयोगकर्ताओं के द्वारा ई–सूचना स्रोतों की सुदूर अभिगम्यता की जाती है।

तथ्यों के आधार पर यह निष्कर्ष निकलता है, कि ई–पुस्तकों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 93.75, ई–पत्रिकाओं का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 77.5, ई–समाचार पत्रों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 86.25 एवं मल्टीमीडिया सूचना स्रोतों का उपयोग करने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 78.75 है।

तथ्यों के विश्लेषण के आधार पर यह निष्कर्ष निकलता है, कि परीक्षाओं हेतु ई–सूचना स्रोतों को प्रभावशील मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 98.75, प्रतियोगी परीक्षाओं हेतु 93.75 प्रतिशत, प्रोजेक्ट वर्क एवं असाईनमेंट हेतु 96.25 प्रतिशत,

प्रतिभा एवं व्यक्तित्व विकास 87.5 प्रतिशत है। वहीं सामान्य ज्ञान प्राप्त करने हेतु ई–सूचना स्रोतों को प्रभावी मानने वाले उपयोगकर्ताओं का प्रतिशत 88.75 है।

**उपसंहार**

अध्ययन के विश्लेषण के आधार पर हम कह सकते है, कि ई–सूचना स्रोत एवं मल्टीमीडिया सूचना केन्द्रीय में पर्याप्त संख्या में उपलब्ध है। इन ई–सूचना स्रोतों का प्रत्यक्ष रूप से प्रभाव शैक्षणिक उत्कृष्टता पर पड़ता है। प्रस्तुत अध्ययन के निष्कर्ष के आधार यह तथ्य प्रकाश में आता है, कि ई सूचना स्रोतों की उपलब्धता एवं उपयोगिता केन्द्रीय विद्यालयो में शैक्षणिक उत्कृष्टता की प्रभावशीलता हेतु सहायक सिद्ध हो रहे है।

**संदर्भ**


1. Kendriya Vidhyalaya Sangthan <http//www.kvsanghtan.nic
2. Aplin, T. (2005). *Copyright law in the digital society : The challenges of multimedia*.ProQuest Ebook Central https://ebookcentral.proquest.com
3. Bernhard, P. ed, (2013). *Resourcebook for school libraries and resource centers*. ProQuest Ebook Central https://ebookcentral.proquest.com
4. Collins, J., Hammond, M., Wellington, J., & Wellington, J. (1997). *Teaching and learning with multimedia*. ProQuest Ebook Central https://ebookcentral.proquest.com
5. Singh, Jagtar Status of School development in India. Libarainship and information management. 1(1) 2008 pp 7-10
6. Central School Durg https://durg.kvs.ac.in/
7. Central School BMY Bhilai https://bhilai.kvs.ac.in/
8. Central School CISF Bhilai https://cisfbhilai.kvs.ac.in/


***

# रेशीम शेती : भारताच्या ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली आणि सद्यस्थिती

संशोधक विद्यार्थी

**कृष्णा गंगाधर गोरे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

संशोधन मार्गदर्शक

**डॉ. पी. एम. कल्याणकर**

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, श्री-संत सावता माळी ग्रामीण, महाविद्यालय फुलंब्री, औरंगाबाद..

प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्थेत आणि बदलत्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात आजही कृषी क्षेत्राची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ५,८०,७८१ खेडी असून २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी आहे- एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ६८.०२ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ५८ टक्के लोकसंख्या कृषी आणि पूरक व्यवसायांवर अवलंबून आहे- कृषी क्षेत्राचे रोजगार निर्मितीमध्ये मोलाचे योगदान असल्यामुळे खऱ्या अर्थाने कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे- भारतातील कृषी क्षेत्र हे प्रामुख्याने मान्सून वर आधारित आहे- वातावरणातील बदल] मान्सून मधील चढ-उतार] दोन पावसामधील पडणारा खंड ]कृषी आजारांच्या वाढत्या किमती व बाजारभावातील चढ-उतार यामुळे कृषी क्षेत्रावर त्याचे प्रतिकूल परिणाम झालेले आढळून येतात-पर्यायाने निव्वळ

पारंपरिक शेतीवर अवलंबून राहणे सर्वसामान्य शेतकऱ्याला परवडणारे नाही-कृषी क्षेत्र आणि कृषिपूरक जोडधंदे यांचे परस्पर पूरक असे संबंध आहेत -या पार्श्वभूमीवर जोड धंद्यांचा विकास होऊ लागला असून यामध्ये प्रामुख्याने दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन शेळीपालन व ,काच रेशीम शेती व्यवसायात चांगला जम बसविला आहे- परंतु सर्वच शेतकऱ्यांनी एकाच प्रकारचे उत्पादन केले व उद्योगधंद्याचा अंगीकार केला तर विक्रीव्यवस्था ढासळेल व नुकसान होईल-या पार्श्वभूमीवर रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारित ग्रामीण भारताची अर्थशक्ती बदलण्याची व रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे- देशातील भौगोलिक परिस्थिती व हवामान रेशीम उद्योगास अत्यंत अनुकूल आहे-भारतातील ग्रामीण भागातील बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेता ग्रामीण भागातील स्त्रिया] भूमिहीन शेतमजूर] अल्पभूधारक]अशिक्षित व सुशिक्षित बेकारांना ग्रामीण भागातच स्व;ंम रोजगार प्राप्त झालेला आहे-देशाच्या दृष्टीने फायदेशीर ठरणारा मोठी रोजगार क्षमता असलेला रेशीम शेती उद्योग अनेक दृष्टीने आदर्श उद्योग आहे-आर्थिक दृष्ट्या इतर पारंपरिक पिकांच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर असलेला उद्योग आहे-

## रेशीम उद्योगाची जागतिक ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

रेशीम इतिहास सुमारे ५००० वर्षांपासूनचा आहे. ५००० वर्षांपूर्वी चीनमध्ये रेशीम उद्योगाची सुरुवात झाली असावी अशी माहिती अनेक दंतकथा मधून मिळते- त्यामुळे रेशमाचा नेमका शोध कधी व केव्हा लागला हे निश्चितपणे सांगता येणार नाही-रेशीम अळयांचे संगोपन सर्वप्रथम चीनमधील करण्यात आली असावी असे

अध्यायात आढळून आले आहे. तर काही तज्ञांच्या मते रेशीम उद्योगाची सुरुवात सर्वप्रथम भारतात झाली असावी असे अध्ययनात येते- जवळजवळ तीन हजार वर्ष चीनने रेशीम व्यवसायाबाबत गुप्तता पाळली व त्यामुळे रेशीम उद्योगात आजही चीनची मक्तेदारी टिकून राहिलेली आहे-जागतिक स्तरावर चीन बरोबरच कोरिया ]जपान] इटली, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, भारत या देशांमध्ये देखील रेशीम उत्पादनाला सुरुवात झाली.

जागतिक पातळीवर सध्या चीन, भारत, ब्राझील, **उझबेकिस्तान**, थायलंड, व्हिएतनाम आणि जपान हे देश रेशीम उत्पादनात अग्रेसर आहेत. जगात चार प्रकारचे रेशीम उत्पादन केले जाते. भारतात या चारही प्रकारचे रेशीम उत्पादन घेतले जाते.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे:-

या शोधनिबंधाचh उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) भारताच्या रेशीम शेतीच्या विकासाचा अभ्यास करणे.

२) भारतातील रेशीम शेतीतील उत्पादनाचा अभ्यास करणे.

३) भारतातील रेशीम शेती मुळे निर्माण झालेल्या रोजगार संधी अभ्यासणे.

४) भारताच्या रेशीम उत्पादनाबरोबरच आयात-निर्यातीचा अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहिते:-

१) भारताच्या रेशीम उत्पादन व रेशीम शेतीमधील रोजगार निर्मितीमध्ये वाढ झाली आहे.

## संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक साधन संग्रहण पद्धतीच्या आधारे माहितीचे संकलन करून त्यांच्या विश्लेषणासाठी सांख्यिकी साधनांचा वापर केला आहे.

रेशीम उद्योगाची भारतातील सद्यस्थिती:-

रेशीम उत्पादनाच्या दृष्टीने भारत हा वैशिष्ट्यपूर्ण देश आहे- रेशीम निर्माण करणाऱ्या जगातल्या कीटक जातींपैकी सर्व चारही प्रजाती भारतात आढळतात -त्यामध्ये तुती, टसर, एरी, मुगा या आहेत- एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतीय रेशीम जगात मूल्यवान व किमती समजण्यात येई-या काळापर्यंत प्रति वर्ष सुमारे दहा लाख किलोग्रॅम रेशीम व रेशीम वस्त्रे भारतातून निर्यात होत असत-आजही बंगाली साडी, कश्मीर व म्हैसूर येथील रेशीम, सुरतचे रेशीमावरील जरीकाम व कला जगप्रसिद्ध आहे-ब्रिटिश सरकारने 1945 मध्ये देशात रेशीम विकास करण्यासाठी रेशीम विकास संचालनालयाची स्थापना केली व यातूनच पुढे देश स्वतंत्र झाल्यावर 9 एप्रिल 1949 रोजी राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय रेशीम मंडळाची स्थापना झाली-आजही याच मंडळाद्वारे देशातील सर्व राज्यात रेशीम निर्मिती संबंधात विविध योजना व त्या अनुषंगाने सर्व बाबींवर नियंत्रण ठेवले जाते.

भारतातील प्रकार निहाय रेशीम उत्पादन:-

जगातील एकूण रेशीम उत्पादनामध्ये चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो देशाच्या रेशीम उत्पादनात प्रमुख रेशीम उत्पादक राज्य म्हणजे कर्नाटक, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू काश्मीर, आसाम, तामीळनाडू व महाराष्ट्र होय. मुगा व एरी रेशीम उत्पादन फक्त ईशान्य भारतातच होते- सन 2000 -2001 ते 2020-2021 या वर्षातील तुती, टसर, एरी व मुगा या चारही प्रकारच्या रेशीम उत्पादनाचा तपशिल तक्ता क्रमांक 1-1 मध्ये दिलेला आहे.

## तक्ता क्रमांक - १.१
## भारतातील प्रकारनिहाय रेशीम उत्पादन
## (मे.टन) (सन-२०००-०१ ते २०१९-२०)

| अनु कमांक | वर्ष | तुती | टसर | ,री | मुगा | ,एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2000.01 | 14,432 | 237 | 1089 | 99 | 15,857 |
| 2 | 2001.02 | 15,842 | 249 | 1,160 | 100 | 17,351 |
| 3 | 2002.03 | 14,617 | 284 | 1,316 | 102 | 16,319 |
| 4 | 2003.04 | 13,970 | 315 | 1,352 | 105 | 15,732 |
| 5 | 2004.05 | 14,620 | 322 | 1,4448 | 110 | 16,500 |
| 6 | 2005.06 | 15,445 | 308 | 1,442 | 110 | 17,305 |
| 7 | 2006.07 | 16,525 | 350 | 1,485 | 155 | 18,475 |
| 8 | 2007.08 | 16,245 | 428 | 1,530 | 117 | 18,320 |
| 9 | 2008.09 | 15,610 | 603 | 2,038 | 119 | 18,370 |
| 10 | 2009.10 | 16,322 | 803 | 2,460 | 105 | 19,690 |
| 11 | 2010.11 | 16,360 | 1,166 | 2,760 | 124 | 20,410 |
| 12 | 2011.12 | 18,272 | 1,590 | 3,072 | 126 | 23,060 |
| 13 | 2012.13 | 18,715 | 1,729 | 3,116 | 119 | 32,679 |
| 14 | 2013.14 | 19,476 | 2,619 | 4,237 | 148 | 26,480 |
| 15 | 2014.15 | 21,390 | 2,434 | 4,726 | 158 | 28,708 |
| 16 | 2015.16 | 20,478 | 2,819 | 5,060 | 166 | 28,523 |
| 17 | 2016.17 | 21,273 | 3,268 | 5,637 | 170 | 30,348 |
| 18 | 2017.18 | 22,066 | 2,988 | 6,661 | 198 | 31,906 |
| 19 | 2018.19 | 25,344 | 2,981 | 6,910 | 233 | 35,468 |
| 20 | 2019.20 | 25,239 | 3,136 | 7,204 | 241 | 35,820 |

Source :- Central Silk Board] Bangaluru.

वरील तत्ता क्रमांक 1-1 मध्ये भारतातील रेशीम शेतीच्या उत्पादनाची विश्लेषण अभ्यासल्यावर लक्षात येते की, 2000 –01 ते

2019&20या कालखंडातील भारतातील सर्व रेशीम उत्पादनामध्ये मधल्या काही वर्षातील झालेला चढ&उतार वगळता सातत्याने उत्पादनात वाढत असल्याचे दिसून येते- भारतामध्ये सन 2000–2001 पासूनच एकूण रेशीम उत्पादनात तुती उत्पादनाचा वाटा सर्वाधिक राहिलेला आहे-सन 2000-01 पासून तुती उत्पादनात 14,432 मीटर पासून 2019-–20 पर्यंत 25,239 मेट्रिक टन एवढी विक्रमी वाढ झाल्याचे दिसून येते- भारतातील एकूण रेशीम उत्पादनाचा अभ्यास केल्यास लक्षात येते की, 2000&01 ते 2019 –20 पर्यंत काही वर्षातील चढ-उतार वगळता एकूण उत्पादनांमध्ये १५,८५७ मॅट्रिक टनांवरून 35,820 मेट्रिक टनांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते- रेशीम उत्पादनामध्ये तुती रेशीम उत्पादनाचा कायम प्रथम क्रमांक आलेला दिसून येतो- त्यापाठोपाठ एरी रेशीम] टसर रेशीम तर मुगा रेशीम सर्वात कमी उत्पादन भारतात होत असल्याचे दिसून येते- सन 2002–03 व सन 2003–04 मध्ये सर्वच प्रकारच्या रेशीम उत्पादनात घट झाली- कारण या कालखंडात काही राज्यांत दुष्काळग्रस्त परिस्थिती होती असे अध्ययनात आले आहे-एकंदरीत विचार करता काही वर्षांतील चढ–उतार वगळले तर भारतातील रेशीम उत्पादनात सातत्याने विकास झालेला दिसून येतो.

### भारतातील एकूण रेशीम उत्पादन आणि रोजगार निर्मिती निहाय वर्गवारी :-

भारतात 2010 –2011 ते 2019–20 या कालावधीत एकूण कच्चे रेशीम उत्पादन किती टन झाले आणि देशात रेशीम शेती मधून किती लाख लोकांना रोजगार निर्मिती झाली या विषयीची माहिती खालील तक्ता क्रमांक 1-2 मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक - १.२

भारतातील एकूण रेशीम उत्पादन आणि रोजगार निर्मिती निहाय वर्गवारी (सन-२०१०-११ ते २०१९-२०)

| अ.क्र. | वर्ष | एकुण क रेशीम उत्पादन(मे.टन) | रोजगार निमिर्ती (लाखात) |
| --- | --- | --- | --- |
| १ | २०१०.११ | २०,४१० | ७२.५० |
| २ | २०११.१२ | २३,०६० | ७५.६० |
| ३ | २०१२.१३ | २३,७६९ | ७६.५३ |
| ४ | २०१३.१४ | २६,४८० | ७८.५० |
| ५ | २०१४.१५ | २८,७०८ | ८०.३० |
| ६ | २०१५.१६ | २८,५२३ | ८२.५० |
| ७ | २०१६.१७ | ३०,३४८ | ८५.१० |
| ८ | २०१७.१८ | ३१,९०६ | ८६.०४ |
| ९ | २०१८.१९ | ३५,४६८ | ९१.७८ |
| १० | २०१९.२० | ३५,८२० | ९४.३० |
| एकूण | | २,८४,४८८,(मे.टन) | ७२८.८५ |

Source :- Central Silk Board, Bangaluru.

तक्ता क्रमांक 1-2 वरून असे दिसून येते की, भारतातील एकूण कच्चे रेशीम उत्पादन आणि त्यातून निर्माण झालेली रोजगार उपलब्धी याविषयी विश्लेषण केले असता सन 2010–11 पासून 2019–20 पर्यंत सातत्याने कच्चे रेशीम उत्पादन व रोजगार निर्मितीमध्ये वाढ झालेली आहे- 2010–11 मध्ये रेशीम उत्पादन 20, 410 मेट्रिक टन तर त्यापासून उपलब्ध झालेली रोजगार निर्मिती 72-

50 लाख एवढी होती. 2019–20 मध्ये रेशीम उत्पादन व रोजगार निर्मितीमध्ये विक्रमी वाढ होऊन अनुक्रमे 35,820 मेट्रिक टन रेशीम उत्पादन व 94-30 लाख रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते- भारतातील मागील दहा वर्षांच्या कालखंडाचा विचार करतात तर रेशीम शेती पासून 2010–11 ते 2019–20 या कालखंडात कच्चे रेशीम उत्पादनात 2,84,488उपलब्धी व रोजगार निर्मिती मध्ये 728-85 लाख लोकांना रेशीम शेती मधून प्राप्त झाल्याचे दिसून येते- यावरून असे स्पष्ट होते की]भारताला रेशीम शेतीमध्ये उत्पादन व रोजगार निर्मितीसाठी मोठ्या संधी आहेत- सन 2010–11 ते 2019–20 या कालावधीत रेशीम उत्पादन आणि त्यातून निर्माण झालेल्या रोजगार निर्मिती मध्ये सातत्याने वाढ होत असून, वाढीचा दरही जास्त असल्याचे संशोधनातून स्पष्ट होते-

## कच्चे रेशीम आणि रेशीम उत्पादने यातील भारताचा विदेशी व्यापार :-

भारताच्या एकूण निर्यातीत रेशमा पासून बनवलेले ड्रेस मटेरियल, रेडीमेड कपडे, रेशीम साड्या व शोभेच्या तयार वस्तू इत्यादींचा समावेश आहे-या रेशीम उत्पादनाची निर्यात प्रामुख्याने यु-एस- ए -,रिपब्लिक जर्मनी, इटली, स्पेन, फ्रान्स, सौदी अरेबिया, सिंगापूर या दहा देशांना केली जाते. हे दहा देश भारताचे प्रमुख रेशीम आयातदार देश आहेत- भारताचे एकूण व्यापारात जरी रेशीम व रेशीम उत्पादने यांचा वाटा मोठा नसला तरी भारताच्या विदेशी विनिमय यात भर घालण्याइतपत त्याचे महत्त्व निश्चित आहे- भारताचा विदेशी व्यापार तक्ता क्र. १.३ मध्ये दर्शवला आहे.

तक्ता क. १.३

कच्चे रेशीम आणि रेशीम उत्पादने यातील भारताचा विदेशी व्यापार.

(कोटी रु.) (सन २०१५-१६ ते २०२०-२१)

| वर्ष | रेशीम निर्यात उत्पन्न (कोटी रू.) | कच्चे रेशीम आयात मुल्य (कोटी रू.) |
|---|---|---|
| २०१५-१६ | २४९५.९८ | १३८९.१० |
| २०१६-१७ | २०९३.४२ | १४३८.१७ |
| २०१७-१८ | १६४९.४८ | १६५२.३९ |
| २०१८-१९ | २०३१.८८ | १४९७.४६ |
| २०१९-२० | १७४५.६५ | १५३५.७२ |
| २०२०-२१ | १४६६.६० | ७५९.७५ |
| एकूण | ११,४८३,०१ | ८,२७२,५६ |

Source :- Central Silk Board] Bangaluru.

वरील तक्ता क्रमांक 1-3 वरून असे दिसून येते की,2015 –16 ते 2020–21 या सहा वर्षांच्या कालखंडात भारताचे रेशीम निर्यात उत्पन्न 11,483-01 कोटी रुपये तर त्याची प्रति वर्ष सरासरी 1913–83 कोटी रुपये इतके आहे. रेशीम उद्योगाची आदान वस्तू म्हणजे कच्चे रेशीम त्याचे एकूण आयात मूल्य 8,272-56 कोटी व त्याची प्रति वर्ष सरासरी 1378-76 कोटी रुपये इतके आहे .एकूण निर्यात उत्पन्न व आयात यांचा विचार केल्यास लक्षात येते की मागील सहा वर्षांच्या कालखंडात देशाला परकीय चलन मिळवण्यात रेशीम उद्योगाचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे.

**निष्कर्ष:-**

रेशीम शेती: भारताच्या ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली आणि सद्यस्थिती या विषयाचा अभ्यास केल्यास लक्षात येते की] बदलते वातावरण] कृषी आदानांवरील वाढता खर्च] कृषी क्षेत्रातील अनिश्चितता ]तसेच नैसर्गिक आपत्ती या सर्वांवर मात करून शेतकऱ्यांना कमी कालावधीत भरघोस उत्पन्नाची शाश्वती देणारा

पर्याय म्हणून सध्या रेशीम शेतीकडे पाहिले जाते-रेशीम शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि त्याच बरोबर कमी कालावधीत शेतकऱ्यांना अधिक उत्पादनाबरोबर योग्य बाजारभाव देखील प्राप्त होतो-भारतात रेशीम शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार सामावून घेण्याची क्षमता आहे-भारताच्या रेशीम उत्पादनाला जागतिक स्तरावर मोठी मागणी असल्यामुळे भारताच्या रेशीम उद्योगाच्या विकासाला मोठा वाव आहे-तसेच रेशीम व रेशीम उत्पादनांचे भारताच्या विदेशी व्यापारामध्ये देखील महत्त्वाचे स्थान आहे-म्हणून भविष्यात शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना हमखास भरघोस उत्पन्न]बदलत्या वातावरणात पूरक आणि अमाप रोजगार संधी असणारा रेशीम शेती उद्योग भारताच्या ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली आहे असे ठामपणे सांगता येते-

संदर्भः–


3. Government of India, 35th annual report: 2020-21, Central silk board] ministry of textiles, Bengaluru.
4. Howard C.J.,"scenario of sericulture industry in Maharashtra state ]India", journal of entomology and zoology studies 2016;4(1),601-05
5. Government of India, India 2016, publication division, ministry of information and broadcasting, New Delhi, 2016.

Website :-

1. www-csb-gov-in
2. www-inserco-org
3. https:-//mahasilk-maharashtra-gov-in


***

# ग्रामीण शेतकरी आत्महतेच्या समस्या

प्रा. प्रियंका राजेंद्र आठे
डॉ .अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालया,
जळगाव. समाजशास्त्र विभाग .

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांमागील नेमकी कारणे शोधण्याची जबाबदारी सोपविलेल्या अकरा विभागाच्या प्रधान सचिवांनी शेतकरी आत्महत्यांमागे नापिकी नव्हे, तर व्यसनाधिनता, हुंडा, घरगुती भांडणे ही कारणे दिली आहेत. त्यांच्या अहवालावर सरकारी धोरण ठरणार आहे. त्यामुळे सरकारी पातळीवरच शेतकरी आत्महत्यांबाबत एवढी असंवेदनशीलता असेल तर धोरणांचे काय? उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी शेतकरी आत्महत्यांमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी आपल्या अकरा विभागांच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांना म्हणजे प्रधान सचिवांना उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यात पाठविले. ही कारवाई निश्चितपणे मुख्यमंत्र्यांच्या या प्रश्नाबाबतच्या तळमळीचे द्योतक आहे. पण प्रधान सचिवांनी बाधित कुटुंबांना भेटी देऊन आत्महत्यांची कारणे जाणून आपापले ३-३ प्राथमिक अहवाल मुख्य सचिवांना ५ जून रोजी सादर केले आहेत. त्यानुसार बहुतांश प्रधान सचिवांनी शेतकरी आत्महत्यांमागे नापिकी हे कारण नाही, तर व्यसनाधिनता, हुंडा, घरगुती भांडणे ही कारणे असल्याचे म्हटले आहे. प्रत्येक घराची तपशीलवार माहिती पोलिस पाटलांना असते म्हणून भविष्यात त्यांच्यावर याबाबत अधिक जबाबदारी टाकावी, असे मत दिसते. जर अशाप्रकारचे मत बहुतांश प्रधान सचिवांचे असेल तर सामान्यपणे मुख्य सचिव

त्यांचेच संकलन करून स्वतःचा अहवाल तयार करून सादर करतील आणि सरकारी उच्च पदस्थांचा अहवाल असल्यामुळे व प्रत्यक्ष पीडितांना भेटून अहवाल तयार केला गेला असे म्हणत तो मान्यही होईल व त्यावर आधारित धोरण तयार करावे लागेल. ते धोरण कसे असेल? व्यसनाधीनता कमी करण्यासाठी सरकारला संपूर्ण ग्रामीण जनतेचे (विशेषतः) दारूमुक्तीचे प्रबोधन करावे लागेल. दुसऱ्या बाजूने संपूर्ण विदर्भ-मराठवाड्यात दारूबंदी करावी लागेल हे शक्य आहे का? शक्य वाटत नाही. कारण दारूवरील उत्पादन व विक्रीकर हे राज्य सरकारचे खूप महत्त्वाचे महसूल साधन आहे, ते नष्ट होईल.

सरकार दारूपासूनच्या महसूलावर अवलंबून आहे. तो महसूल नसला तर पर्यायी कर उत्पन्नाची साधने कुठे आहेत? लोक टोलच द्यायला (रस्त्याची उपयोगिता मिळत असतानासुद्धा) तयार नाहीत तर दारूच्या कराची हानी भरून द्यायला कसे तयार होतील? आणखी गंभीर बाब तर दारू उत्पादक साखर कारखान्यांची आहे. चंद्रपूर जिल्ह्यात जी दारूबंदी नुकतीच केली गेली त्याविरुद्ध विधानसभेतील विरोधी पक्षांचे प्रमुख, काँग्रेसचे नेते आणि त्यांच्या साखर कारखान्याचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. त्यांनीच न्यायालयाला सादर केलेल्या माहितीनुसार त्यांच्या कारखान्याच्या दारू उत्पादनापैकी सुमारे ४ टक्के माल एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात विकला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील किती कारखाने विदर्भ-मराठवाड्याच्या किती जिल्ह्यांवर अवलंबून आहेत याची खरे तर एक श्वेतपत्रिका शासनाने प्रकाशित करावयाला हवी. पण या मुद्यापुरता निष्कर्ष असा की शेतकऱ्यांची व्यसनाधीनता कमी होऊ देण्यास खुद्द सरकार आणि पश्चिम महाराष्ट्रातील दारू उत्पादक राजकारणी तयार होणार

नाहीत. म्हणजे व्यसनाधीनता घातच आहेच. परंतु सरकार आणि साखरे कारखाने चालू ठेवायचे असतील तर व्यसनाधीनता चालू ठेवावी लागेल. हुंडा ही सामाजिक कुप्रथा आहेच. परंतु पीडित कुटुंबांपैकी जिथे लग्ने झाली नसतील तिथे अन्य कारणे घडलेली असणार, ती कोणती? घरगुती भांडणे ही तसे पाहता, कौटुंबिक जीवनातील सार्वत्रिक बाब आहे. मग त्यामुळे शेतकऱ्यांचाच बाबतीत आत्महत्या घडून येतात त्याचे कारण काय? नापिकी (कदाचित सततची) हे उत्पन्न ऱ्हासाचे मुख्य कारण मानल्यास व्यसनाधीनता, हुंडाबळी, घरगुती भांडणे हे परिणामस्वरूप आहेत हे ध्यानात येईल. त्यामुळे असे दिसते की प्रधान सचिवांनी परिणामांनाच कारणे म्हणून पुढे केले आहे, जेणेकरून आत्महत्यांची जबाबदारी आत्महत्या करणारांचीच होऊन जाते आणि बाकी सारे सहीसलामत.नापिकी हे आत्महत्यांचे खरे कारण आहे हे मान्य केले आणि सरकारची त्याबाबतची जबाबदारी शंभर टक्के आहे असे मानले तर त्यापैकी प्रत्येक प्रधान सचिवाचा हिस्सा किती आहे ते ठरविण्यात यावे व तो हिस्सा शून्य करण्याचे उद्दिष्ट व वेळापत्रक दिले जाणे आवश्यक आहे. म्हणजेच सगळयातच सरकारी विभागातील प्रशासन अधिक कार्यक्षम होईल. निर्धारित वेळेत उद्दिष्टपूर्ती झाली नाही तर इतके उच्चशिक्षित,इतके अनुभवी अधिकारी, इतकी प्रगत, सहकारी नोकरशाही व इतके कार्यक्षम मंत्रिमंडळ असण्याचा शेतकऱ्यांना उपयोग काय?नापिकीला आत्महत्यांचे प्रमुख कारण मानण्याला आधार असा की नापिकी नसली तर, म्हणजेच हानी समाधानकारक पैसा येत राहिला तर, लोक थोडीबहुत व्यसने करतीलही किंवा कुरकुर करीत हुंडा देतीलही. परंतु भविष्यात पुन्हा उत्पन्न मिळण्याची आशा असल्याच घरगुती भांडणे इतकी होणार नाहीत व ती आत्महत्यांच्या टोकापर्यंत जाणार

नाहीत.नापिकी हे मुख्य मानण्याचे आणखी एक कारण असेही दर्शविता येईल की अगदी कितीही श्रीमंत परिवार असू द्या, नियमित येणाऱ्या उत्पन्नात ३-४ महिने खंड पडल्यास (उत्पन्नाची नापिकी झाल्यास) जे परिणाम शेतकरी कुटुंबावर होतात ते सर्वत्र दिसून येतील व कोणीही म्हणेल की मूळ कारण नापिकीच आहे.

**शब्द बीज :-**

शेतकरी आत्महत्या, नगदी पिके, अल्पभूधारक शेतकरी, निविष्ठा.

**शेतकरी आत्महत्यांची कारणे :-**

**शेतीसाठी आर्थिक मदत कमी होणे**

1991 च्या आर्थिक सुधारणा नुसार देशभरामध्ये शेतकऱ्यांना दिली जात असलेली सबसिडी कमी झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांना शेती करताना आणि पिके घेताना जो भांडवली खर्च येतो.त्याची तोंडमिळवणी करणे अतिशय जिकिरीचे झाले आहे. शेती निसर्गाच्या लहरीपणावर जास्त अवलंबून आहे. गुंतवलेले आर्थिक भागभांडवल आपल्या पिकाच्या उत्पन्नातून पुन्हा प्राप्त करणे शेतकऱ्यांना फार कठीण जात आहे.

**शेतीमालाला बाजार भाव न मिळणे**

खुल्या आर्थिक धोरणामुळे परदेशातून अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर आयात होते महागाई वाढू नये म्हणून सरकार अन्नधान्य आयात करते. यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकविलेल्या अन्नधान्याला भाजीपाल्याला पाहिजे तसा बाजार भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उदासीनता निर्माण झालेली आहे.आपले आर्थिक चक्र कसे चालवावे हे शेतकऱ्यांपुढे उभे राहिलेले फार मोठे गंभीर संकट असते. बऱ्याचदा शेतीमाल चांगला पिकू नये मार्केटमध्ये शेतकऱ्यांच्या

भाजीपाल्याला आणि अन्नधान्याला कवडीमोलाने आणि बऱ्याचदा हमीभाव पेक्षाही कमी दराने व्यापारी खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्याला गुंतवलेले भांडवल सुद्धा पुन्हा उभे करणे शक्य होत नाही.

**खाजगी सावकारी व कर्जबाजारीपणा :-**

शेतकरी आपल्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी त्याचप्रमाणे शेतीसाठी भागभांडवल म्हणून अनेकदा खाजगी सावकारांकडून तसेच पतसंस्था कडून कर्ज उचलताना दिसून येतो. या परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला मोठ्या व्याजदराचा सामना करावा लागतो. जगभरामध्ये व्याजाचे प्रमाण अल्प असतानाही भारतात खाजगी सावकार आणि पतसंस्था मोठा व्याजदर लावतात. त्यामुळे कर्ज परतफेड शेतकऱ्यांना शक्य होत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होतात प्रत्येक ऋतूमध्ये असणारे पिके घेण्यासाठी भागभांडवल गरजेचे असते. एखाद्या हंगामात भांडवलही गेले आणि पुन्हा पुढील पिकासाठी आर्थिक चणचण भासू लागली की शेतकरी नैराश्यग्रस्त होतो. त्यातूनच खाजगी सावकार आणि खाजगी पतसंस्था कर्ज तगादा लावतात. त्यामुळे शेतकरी आपली मनस्थिती गमावून बसतो.

**रूढी व परंपरा :-**

काही भागांमध्ये आजही अनेक कालबाह्य रूढी व परंपरा टिकून आहेत. उदाहरणार्थ लग्न ठरवताना मोठ्या प्रमाणात हुंडा घेतला जातो. शेतकरी यासाठी कर्ज तरी काढतो किंवा आपली जमीन तरी विकतो. त्याच्याकडे हुंडा देण्यासाठी पैसा नसतो. लग्न करण्यासाठी आवश्यक पैसा नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. लग्न समारंभ हा फार मोठ्या आर्थिक गळीचा आणि कळीचा प्रश्न निर्माण झाला आहे. कालबाह्य रूढी-परंपरा शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. हे समाजजीवनातील एक विदारक आणि अस्तित्वावर निर्माण करणारे प्रश्नचिन्ह आहे.

**सिंचन सुविधांचा अभाव :-**

शेतकरी प्रामुख्याने जिरायती शेती करून आपले कुटुंब चालवतात पुरेशा जलसिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे शेतकऱ्यांना जिरायती शेतीत करावी लागते. बागायती शेती करून नगदी पिके घेण्यासाठी पुरेशा जलसिंचन सुविधा असणे गरजेचे आहे. परंतु विकासाचा असमतोल आणि अनुशेष भरून काढणे कोणत्याही सरकारला अद्याप शक्य झालेले नाही. नगदी पिके घेण्यासाठी पुरेशा जलसिंचन सुविधा जोवर निर्माण होत नाहीत; तोवर शेतकऱ्याकडे आर्थिक समृद्धी येणे शक्य नाही हे वास्तव स्वीकारण्याची गरज आहे.

**आर्थिक साक्षरतेचा अभाव :-**

शेतकऱ्यांना आर्थिक साक्षरतेच्या अभावामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आर्थिक साक्षरता निर्माण होणे काळाची गरज आहे.शेतकरी जेव्हा एखादी पिक घेतो. तेव्हा त्यामागचे अर्थकारण केवळ ढोबळ मानाने न स्वीकारता निश्चित अशा धोरणाने शेतकऱ्यांनी पिके घेण्याची गरज आहे.

**वाढत्या भौतिक गरजा :-**

पूर्वीच्या काळी शेतकरी राहत असलेले गाव स्वयंपूर्ण असे त्याच्या भौतिक गरजा ह्या मर्यादित होत्या परंतु बदलत्या काळामध्ये भौतिक गरजा वाढलेल्या आहेत घरामध्ये विविध भौतिक सुविधांचा अभाव शेतकऱ्यांना सहन होत नाही सध्याच्या काळातील शेती ही भांडवली झाल्यामुळे विविध प्रकारची यंत्रे वापरून शेती करावी लागते.

**नैसर्गिक आपत्ती :-**

दुष्काळ गारपीट चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्ती यांनी शेतकरी अक्षरशहा मोडून पडतो पिकांचे अपरिमीत असे नुकसान होते त्यामुळे कोणत्याही पिकासाठी गुंतवलेले भांडवल पुन्हा उभे करणे अशक्य होते नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होतो दुष्काळामुळे

एकशिपी घेता येत नाही गारपिटीमुळे पिके उध्वस्त होतात चक्रीवादळामुळे घरे-दारे ही व दोस्त होतात त्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज काढतो सरकारने दिलेली मदत तुटपुंजी ठरते त्यामुळे शेतकऱ्याला आपले जीवनमान अतिशय दारिद्र्यात काढावे लागते नैसर्गिक आपत्तीचे दुष्टचक्र हे सातत्याने चालूच असते त्यामुळे शेतकरी पुन्हा नव्याने सुरुवात करण्यासाठी मनाने तयार झाला तरी त्याच्यापाशी आवश्यक असे धन नसल्यामुळे नैराश्यग्रस्त होतो.

**अल्पभूधारक शेतकऱ्याचे वाढते प्रमाण :-**

भारतामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते मुळातच शेती कमी असल्यामुळे पाहिजे तितके उत्पादन आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न कमीच असते त्यातही निसर्गाचा लहरीपणा बाजार भावांचा अभाव यामुळे शेतकऱ्याला आपल्या अल्प अशा जमिनीमध्ये पाहिजे तितके उत्पादन घेता येत नाही परिणामी उत्पन्नही कमी येते आर्थिक उत्पन्न कमी आल्यामुळे आपल्या दैनंदिन गरजा भागविणे शक्य होत नाही. लोकसंख्येबाबत साक्षरतेचा अभाव असल्यामुळे अल्पभूधारक त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे एवढेच नव्हे तर शेतकरी भूमिहीन होऊन शहरांकडे स्थलांतरित होताना दिसून येतो.

**प्रक्रिया उद्योगाची कमतरता :-**

शेतकरी जे पीक आपल्या शेतामध्ये घेतो त्यावर असलेल्या प्रक्रिया उद्योगाची कमतरता हे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मागील एक मोठे कारण समजता येईल बऱ्याचदा प्रचंड उत्पादन ठेवू नये शेतकऱ्याला बाजार भाव मिळत नाही कारण त्या उत्पादनाला मागणी नसते शेतमालाची प्रक्रिया करून जर हा अतिरिक्त उत्पादित झालेला शेतमाल उद्योगांकडे गेला तर शेतकरी आपला आर्थिक उत्पन्न तर चांगल्या ठेवू शकतो यासाठी

अधिकारी प्रक्रिया उद्योगांची उभारणी ग्रामीण भागातच होणे आवश्यक आहे.

**शासकीय पातळीवरील उदासीनता :-**

कोणतेही सरकार शेतकऱ्यांसाठी काही ना काही चांगले निर्णय घेत असते असे आपण सकारात्मक विचार करताना म्हणू शकतो परंतु ग्राउंड लेव्हल ला परिस्थिती वेगळीच असते शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या सुविधा आणि सवलती देत असताना विविध प्रकारचे अडथळे पार पाडावी लागतात शासनाचे अधिकारी कर्मचारी शेतकऱ्यांकडे आपुलकीच्या दृष्टीने पाहत नाहीत शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे एका शेतकऱ्याच्या मनोभाव आतून शेतकऱ्यांना शासकीय पातळीची उदासीनता कमी करून मदत दिली गेली पाहिजे.

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना**

**शेत-जमीन :-**

शेताची 'मालकी' या संकल्पनेला पहिला हादरा बसला तो स्वातंत्र्यानंतर पहिल्या घटनादुरुस्तीने. गावोगावचे 'मालक' सैरभैर झाले ते सरकारने जमीनधारणेच्या मर्यादा ठरवल्याने. ही उत्पन्नावरील, क्षमतेवरील मर्यादाही ठरते. भारतात इतर कुठल्याही व्यवसायावर ही क्षमतेची व उत्पन्नाची मर्यादा नाही. त्यावेळी संख्येने फार थोडी असली तरी अशी मातब्बर मंडळी सरकारने संपवली, याची धास्ती व जरब सगळ्या शेतकरी समूहाला बसली. शिवाय, हे सरकारचे म्हणणे न्यायाला धरून होते काय याची शहनिशा कोर्टाला करता येणार नाही अशी मेख नवव्या परिशिष्टाच्या रूपाने घटनेत आणली. यानंतर हळूहळू जमिनीचे क्षेत्र-मर्यादा, जमिनीची प्रत, दर्जा, भौगोलिक स्थान, विहिरी, पाट व इतर संसाधने या सर्व मालकीच्या बाबी जमिनीसंबंधीच्या कायद्याने जखडल्या. यातील बहुतेक सगळ्या

गोष्टी न्यायिक तपासणीच्या कक्षेबाहेर आहेत, हे विशेष. असे करण्याचे धारिष्ट्य इंग्रजानीही केले नव्हते.उरल्यासुरल्या, वाटी आलेल्या जमिनीची वहिती वैयक्तिकच राहिली. वहितीचे क्षेत्र उत्तरोत्तर कमी होत गेले. वहितीसाठी का होईना, एकत्रीकरण, वहितीच्या पद्धती, सामायिक मालकी, कंपनी/कॉर्पोरेट मालकी या गोष्टी भाडेपट्टा, करार, कामगार, मजूर याबद्दलचे कायदे यांच्यामुळे अश्यक्य झाल्या.

**कृषी उत्पादनापासून होणारी मिळकत :-**

शेतकऱ्यांना आपला माल खुल्या बाजारात विकता आला पाहिजे, म्हणजे सरकार किंवा इतर कोणालाही माल कुठे, कसा, कोणत्याही किमतीला, खुल्या स्पर्धेत विकता आला पाहिजे. लेव्ही म्हणजे शेतीवरील कोणतीही वस्तू सरकारला किंवा कुणालाही त्यांना हव्या त्या किमतीला दिलीच पाहिजे अशी तरतूद. शेतकऱ्यांनी आपली उत्पादने सरकारला दिलीच पाहिजेत म्हणजे मक्तेदारी खरेदी. शेतकऱ्यावर आपत्ती येते तेव्हा करावी लागते ती आपत्ती विक्री. या संकल्पना समजून घेतल्या की सरकार शेतकऱ्याची कशी लूट करते ते समजेल. हे सगळे स्वातंत्र्यानंतर आजपावेतो चालू आहे.

**नुकसान, आणि भरपाई :-**

शेतकऱ्यांच्या मिळकतीवर आणि खर्चावर परिणाम करणारे सगळे घटक, सामाजिक आणि इतर कायदे नुकसानकारक ठरतात. गोहत्या-गोवंश हत्या बंदी; मोकाट जनावरे, कुत्रे, हरणे, डुकरे, गेंडे, हत्ती, जंगलातले इतर प्राणी, वन्य जीव रक्षणाचे कायदे; झाडे तोडणे, वन रक्षण, वन उत्पादने यांचे कायदे असे प्रत्यक्ष परिणाम करणारे आणि सार्वजनिक वितरण प्रणाली

(PDS), अन्नसुरक्षा, रोजगार हमी, जनुकीय सुधारित वाणबंदी (GMO ban), पर्यावरण रक्षण असे अप्रत्यक्ष परिणाम करणारे घातक निर्णय गेल्या पन्नास वर्षांपासून लाखो शेतकऱ्यांसाठी टोकाची समस्या निर्माण करणारे ठरले आहेत. अशा बाबी दारिद्र्य, चिंता, जोखीम वाढवतात. यांचा आम्ही कधी गांभीर्याने विचार करत नाही. त्यांच्यापासून होणारे नुकसान व भरपाईबद्दल बोललेही जात नाही.

**निविष्ठा:-**

पाणी आणि खते ही खरी तर निविष्ठा नियंत्रण आणि आर्थिक विकृतीनिर्मिती क्षेत्रातील उत्कृष्ट उदाहरणे आहेत. पाणी हे मर्यादित साधन मान्य असेल तर त्याच्या किमतीवर वापराचे निर्णय होणे अपेक्षित आहे. ज्वारी, बाजरीला भाव असता तर ऊसासारखे पीक धरणाच्या किंवा भूगर्भातील पाण्याच्या जोरावर घेतले गेले नसते. कमी कार्यक्षमतेचे पंप प्रचंड खोलवरचे किंवा दूरवरचे पाणी आणण्यासाठी वापरले नसते. वीज नाही म्हणून टाहो फोडला नसता. सूक्ष्मसिंचन करा, पाणी जपून वापरा असा उपदेश करावा लागला नसता. असेच काही वास्तव शेती संयंत्रे/ अवजारे यांच्या वापराबद्दल. असून अडचण, नसून खोळंबा.

**शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा :-**

या सर्व चर्चेत कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या कमी किमती हा मुद्दा कळीचा आहे, ही गोष्ट मान्य करण्याबद्दल अर्थशास्त्रज्ञ का मागे आहेत ते कळत नाही. बाकीच्या गौण बाबी उदा. शेती निविष्ठांच्या वाढत्या किंमती, पिकावरील संकट, उच्च व्याजाने कर्ज आणि सरकारी मदतीत घट किंवा अपुरेपण याबद्दल बोलण्यात नेत्यांना आणि स्वयंसेवी विद्वानांना आपण काही करतो आहोत याचा दिखावा किंवा समाधान मिळत असेल

एवढेच. पण त्यामुळे प्रश्न सुटणार नाही हे खरे!

**विमा :-**

आजपर्यंत तरी हमखास दिलासा देणारी यंत्रणा असा विश्वास विमा योजनेतून मिळालेला नाही. तरीही एक तत्पर आणि किमान संरक्षण देणारी यंत्रणा म्हणून विमा योजना विकसित करता येणे शक्य आहे. नव्या योजनेची वाटचाल त्यासाठी महत्वाची ठरेल अशी अशा आहे.शेतीत शिरणे, शेतीतून बाहेर पडणे आमच्या कायद्यांमुळे शेतीवरील लोक शेतीचे गुलाम झाले आहेत. त्यांना लेनिन भूदास म्हणायचा. नव्यांना शेतीत शिरता येत नाही. शेतकऱ्यांना उद्योजक म्हणून बाहेर पडण्याची इच्छा आहे, पण निर्वासित म्हणूनही बाहेर पडता येत नाही अशी अवस्था आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. शेतकऱ्याची आत्महत्या (वास्तव आणि उपाय), डॉ. संभाजी काळे/डॉ. विलास खंदारे, अथर्व पब्लिकेशन.
२. शेतकरी आत्महत्या कारणे व शाश्वत उपाय, विनायक हेगणा, चिन्मय पब्लिकेशन.
३. शेतकरी आत्महत्या एक चिंतन, गोविंदराव भोसले, निर्मल पब्लिकेशन.
४. गारपीट, भारत देवगावकर, आयडिया पब्लिकेशन.
५. शेतकरी आत्महत्या उभारी पथक मार्गदर्शिका, डॉ. अनघा पाटील, दिलासा जनविकास प्रतिष्टान.
६. http://puneresearch.com/media/data/issues/58766fa61c6d2.pdf
७. https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=3631573
८. https://marathi.krishijagran.com/agripedia/farmer-suicides-a-crisis-on-indian-agriculture/

# शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न एक सामाजिक समस्या

मार्गदर्शक

**डॉ. शेषराव क. राठोड**

**नलिनी पंडितराव जाधव**

पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अद्यापही ७० टक्के भारतीय लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. सुरुवातीपासून शेतीच्या बाबतीत अनेक समस्या पहावयास मिळतात. दारिद्र्य, विषमता, नैसर्गिक आपत्ती इ. समस्यांना तोंड द्यावे लागते. अलीकडच्या काळात शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाची प्रक्रिया मंदावली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. यातून शेतकरी कंटाळून आत्महत्येचा मार्ग स्वीकारु लागला आहे. देशात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या लक्षात घेता शासकीय पातळीवर विविध पॅकेजच्या माध्यमातून तरतुदी करण्यात आल्या आहेत. तरीदेखील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबवायला तयार नाही.

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे आपण गर्वाने म्हणतोत आणि अशा समाजामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या

होतात ही खरी चिंतेची, चिंतनाची बाब आहे. शेतकरी आत्महत्या ही भारतीय समाजामधील एक फार मोठी समस्या म्हणून आज समोर आली आहे. खऱ्या अर्थाने भारत देशामध्ये शेतकरी वर्गाला जगाचा 'पोशींदा' म्हटले आहे.

**शेतकरी** - "शेतकरी ही विस्तृत संज्ञा असून त्यामध्ये कृषी योग्य जमिनीवर शासकीय नियमानुसार मालकी असणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश होतो. तसेच दुसऱ्याची शेतजमीन भाडेतत्वावर कसण्याकरिता केली असेल तर त्याची शासकीय कार्यालयामध्ये नोंद असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला शेतकरी म्हणता येणार नाही."

**आत्महत्या** - "आत्महत्या ही आपल्या इच्छेनुसार मुद्दाम केले गेलेले आत्महनन होय." यावरुन जाणिवपूर्वक सर्व परिणाम विचारात घेवून व्यक्ती आपली जीवन यात्रा संपविते त्याला आत्महत्या म्हणता येईल."

शेती करताना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक इ. कडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीतील होणारे शासकीय बदल अशा अचानक येणाऱ्या अनेक संकटांचा सामना करावा लागतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. हजारो रूपये खर्च करुन शेतकरी आपला शेतमाल तयार करतो त्याची काळजी घेतो. पण त्याच्या कष्टाला दरवेळी

फळ मिळतेच असे नाही शेतकरी निसर्गावर अवलंबून असल्याने शाश्वत कमाईचा नक्की अंदाज बांधणे कठीण असते तसेच शेतकऱ्यांसमोर हमीभावाची समस्या आहे सततची नापिकी वाढता उत्पादन खर्च, शेतमालाला आत्महत्येशिवाय पर्याय नसतो तसेच कर्जाची परतफेड करण्यास हतबल असल्याने शेतकरी आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे शेतकरी हा संपूर्ण समाजव्यवस्थेचा कणा आहे पण तोच अज्ञान अंधश्रद्धांच्या भारानी वाकला आहे त्याच्या ताठपणावरच समग्र समाजाचे जीवन अवलंबून आहे

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा सद्यकाळात सर्वात महत्वाचा प्रश्न असून सद्यस्थितीत चिंता आणि चिंतनाचा विषय म्हणून हा प्रश्न चर्चिला जात आहे विविध शासकीय समित्या, स्वंयसेवी संस्था, वर्तमानपत्रे यांच्या अहवालातून शेती, शेतकरी व त्यांचे जीवन, त्यांच्या समस्या व त्यांच्या समस्यांवर उपाय सूचविण्याचे प्रयत्न दिसून येत आहेत

**उद्दिष्ट्ये -**

१.शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा शोध घेणे

२.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे परिणाम अभ्यासणे

३.शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर उपाय सूचविणे

४.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची परिस्थिती जाणून घेणे

५.शेतकऱ्यांचे आर्थिक, सामाजिक व भावनिक मनोबल उंचावणे

६.राष्ट्रीय उत्पन्नात ‘शेती’ व्यवसायाचे असणारे महत्त्व आणि गरज विशद करणे

७.शेतकऱ्यांचे समुपदेशन करुन आत्महत्येपासून परावृत्त करणे

**शेतकरी आत्महत्या -**

शेतकरी हा शेती धारण करणारी व्यक्ती असते शेती कसणारा तो शेतकरी, प्रत्यक्ष जमीन कसणारा म्हणजे शेतकरी होय. शेतात येणाऱ्या पिकाच्या उत्पन्नावरुन शेतकऱ्यांची उपजीविका चालते परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी देशासमोर एक गंभीर आव्हान उभे केले आहे शेतकऱ्यांच्या आत्महत्या किती संख्येने झाल्या किंवा त्या कोणत्या प्रदेशात झाल्या यापेक्षा शेतकऱ्यांवर आत्महत्येची परिस्थिती कशी ओढवली व यावरील उपाय काय, याचा विचार महत्त्वाचा आहे आजही संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीव्यवस्थेवर अवलंबून आहे त्यामुळे शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न हा व्यवस्थेच्या मुळाशी भिडलेला आहे म्हणून याचा विचारही ‘पॅकेज’ सारख्या वेगळा बंदिस्त न करता समग्रपणे करणे गरजेचे आहे शेतकऱ्यांच्या आत्महत्यासाठी जबाबदार असणारे घटक आहेत कर्जाचा भार, शासनाचे कृषी धोरण, शेतकऱ्यांच्या निर्णय स्वातंत्र्याची गळचेपी, मानसिक ताण-तणाव, नैराश्य, विफलता, दुष्काळ कीटकनाशके, रासायनिक खते, बी-बियाणे इ वाढत्या किंमती या सर्व कारणांचा समावेश होतो शेतकऱ्यांच्या नैराश्य आणि वैफल्ये ग्रस्ततेचे मूळ कारणे शोधणे ही काळाची गरज आहे

**शेतकरी आत्महत्येची कारणे –**

**१.कर्जबाजारीपणा -** एकदा बँकेकडून कर्ज घेतलेला शेतकरी जो पर्यंत कर्ज परत करत नाही तोपर्यंत त्याला दुसऱ्या बँका कर्ज देत नाहीत अशावेळेस पूर्वीचे कर्ज फेडायला पैसा नसलेला शेतकरी नवीन पीक घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पैशासाठी खाजगी सावकाराकडे वळतो खाजगी सावकार हे अव्वाच्या सव्वा व्याजदराने कर्ज देतात शेतकऱ्याला हे व्याजदर परवडणारे नसतात अनेक वर्ष हे कर्ज फेडून सुद्धा शेतकरी हा त्या कर्जाचे व्याजच फेडतो, मुद्दल तर तशीच राहते एकदा कर्ज थकले की त्या शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो या कर्जातून सुटका होणे शक्य नसते शेवटी कर्ज फेडायच्या पलीकडे जाते तेव्हा सावकार जमीन ताब्यात घेतात आणि शेतकऱ्याला एकतर मोलमजूरी करणे भाग पाडते यातूनच नैराश्य निर्माण होऊन शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करतात अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण हे कर्जबाजारीपणा हेच आहे असे निदर्शनास येते

**२.बाजारपेठेत मिळणारी मालाची किंमत -** अनेक समस्यांना तोंड देत जेव्हा शेतातील माल तयार होतो आणि बाजारपेठेत येतो तेव्हा त्याला योग्य ती किंमत मिळत नाही कधी चांगल्या हवामानामुळे प्रचंड पिके आली तर बाजारपेठेत माल जास्त झाल्याने भाव पडतात शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतकऱ्यांच्या हातात पडत नाही भारतात अद्यापही

शेतकालाचा व्यापार मोठ्या प्रमाणात मध्यस्थांच्या हातात आहे हंगाम संपल्यावर तो अधिक किंमतीला विकतात दलालीमुळे ग्राहकाला शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतकऱ्याच्या हातात पडत नाही हे एक शेतकऱ्याचे महत्त्वाचे कारण आहे

**३.पावसावरील अवलंबित्व -** भारतीय शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीतून उत्पादनाची हमी देता येत नाही काही प्रमाणात शेतीत सिंचनाचा वापर करण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याजवळ नाही.

**४.वाढता उत्पादन खर्च -** शेती उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या बि-बियाणांचा, रासायनिक खतांचा, मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून, सर्वसामान्य शेतकऱ्यांना हा उत्पादन खर्च परवडणारा नाही उत्पादन खर्चात होणाऱ्या वाढीबरोबर शेतीमालाच्या किंमतीत वाढ होत नाही ही एक चिंतेची बाब आहे

**५.वाढत्या कौटुंबिक जबाबदाऱ्या -** मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, घर बांधणे, गाडी घेणे यासारख्या अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या शेतकऱ्यांना पार पाडाव्या लागतात यासाठी समाजातील काही घटकांकडून शेतकऱ्यांना खाजगी सावकारी कर्जासाठी प्रवृत्त केले जाते

**६.शेतकऱ्यांचा अज्ञानपणा -** शासन ज्या योजना राबवते, त्या योजनाचे शेतकऱ्याला परिपूर्ण ज्ञान नसते म्हणून त्याचा फायदा सावकार, व्यापारी, आडत, दुकानदार, भोंदू लोक अज्ञानाचा फायदा घेतात ग्रामीण भागातील शेतकरी त्यास बळी पडतो पण या सर्वांचा परिणाम शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढवण्यात होत आहे

**७.इतर कारणे -** वाढती व्यसनाधीनता, दारिद्र्य, गंभीर आजारपण, संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, असंघटितपणा, गाव पातळीवरील राजकारण, अकार्यक्षम कृषी उत्पन्न बाजार समित्या, शेतकऱ्यांचे परावलंबित्व, कृषीपूरक व्यवसायाचा अभाव, सिंचनाचा अभाव हे देखील शेतकरी आत्महत्येस कारणीभूत घटक आहेत

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या : उपाययोजना :**

१.शेतकऱ्यांच्या आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती आहे हे शासनाने घोषीत करुन उपायोजना आखाव्यात

२.शेतकऱ्यांना सबसिडी वाढ करावी.

३.स्मार्ट शेतीची संकल्पना राबवावी.

४.सिंचनाच्या सोयी-सुविधा वाढवाव्यात.

५.जलयुक्त शिवाराची व्याप्ती वाढवावी.

६ पुनर्भरण मोहीम राबविण्यासाठी शासन आणि प्रशासन कठोर भूमिका घ्यावी

७.अभ्यासक्रमात जलसाक्षरतेचा समावेश करावा

८.शेती पुरक व्यवसाय उभे करावेत्

९.शासनाकडून शेतकऱ्यांना जीवनविमा आणि पिक विमा योजना लागू करावा्

१०.गाव तिथं प्रशिक्षण केंद्र उभे करावेत्

११.भौतिक गरजा कमी कराव्यात्

१२.शेतमालाला योग्य भाव मिळावा्

१३.शेतकऱ्यांनी व्यसनमुक्त व्हावे्

१४.भ्रष्टाचार मुक्त भारत करावा्

१५.योग्यवेळी कृत्रिम पावसाचे प्रयोग करावेत्

१६.शिक्षण आणि आरोग्याचे राष्ट्रीकरण करणे आवश्यक आहे्

१७.शेतकऱ्यांच्या मुलांना सर्व शिक्षण मोफत व्हावे्

१८.शेतीला व्यवसायाचा दर्जा देण्यात यावा्

१९.योजनामध्ये पादर्शकता आणणे, शासकीय योजना्

शेतकऱ्यापर्यंत योजना पोहचविण्याकरिता योजनांमध्ये पारदर्शकता आणणे आवश्यक आहे्

अशाप्रकारे भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषीला म्हणजेच शेतीला महत्त्वाचे स्थान आहे् परंतु पाहिजे त्या प्रमाणात शेतीकडे लक्ष पुरविले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामना करावा लागतो.

**समारोप** – शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय आहे. आजही ७० टक्के पेक्षा जास्त लोक शेती हा मुख्य व्यवसाय करतात. देशातील शेती आणि शेतकरी आज संकटात आहेत. शेतकऱ्यांची वैयक्तिक

स्थिती सुधारण्यासाठी शेतीकडे जास्तीत जास्त लक्ष देवून चांगले उत्पादन कसे घेता येईल व शेतीची प्रगती कशी करता येईल यासाठी शासनामार्फत शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना प्रोत्साहित केले पाहिजे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे शेती हा आजही एक प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेतील एक महत्त्वाचा मूलभूत घटक आहे. परंतु शेतकरी आत्महत्येची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला सतत आर्थिक संकटाशी सामना कराव्ाा लागतो. शेतकऱ्यांची आत्महत्या ही एक कुटुंबावर आलेली दुख:द घटना होय. त्यांच्यावर ही वेळ येऊ नये म्हणून काही उपाययोजना करण्यात आल्या आहेत, शासनाने काही अजून उपाययोजना आखल्या तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येस आळा बसेल. “शेतकरी आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन म्हणजेच आत्महत्येच्या दराचे विश्लेषण होय.”

२१ व्या शतकाच्या सुरुवातीस आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याने समाज व शासन व्यवस्थेसाठी ती एक चिंतनीय बाब आहे. देशात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या लक्षात घेता शासकीय पातळीवर विविध पॅकेजच्या माध्यमातून तरतुदी करण्यात आल्या आहेत. तरी देखील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबायला तयार नाही. याचा विचार करता समाजातील सर्वच

घटकांना हेलावून सोडणारा हा प्रश्न सर्वच स्तरांवर काळजीचा ठरत आहे.

**संदर्भ सूची :**

१.शेतकरी आत्महत्या : प्रश्न आणि आव्हाने - डॉ. नलिनी बोरकर.

२.शेतकऱ्यांच्या आत्महत्या - डॉ. गव्हाणे.

३.दै. लोकसत्ता.

४.शेतकऱ्यांची आत्महत्या वास्तव आणि उपाय : काळे सं. भा.

५.भारतातील सामाजिक समस्या : कुलकर्णी पी. के.

६.ग्रामीण व नागरी समाजशास्त्र - गोरे अशोक.

७.भारतापुढील आव्हाणे आणि सद्य:स्थिती - नलावडे पंडित

***